म. ग्रं. सं. ठाणें
विषय निघंटु
सं. क्र. २२४८

REFBK-0018712

2248 निबंध

८०५८२

भा.१७३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. मुंबई
क्रमांक.....८०५८२.....दिनांक.....
बोधक.....२२४८.....वर्ग क्रमांक.....

निबंध
भा.१७३

भारतातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षण

आवश्यकता आणि दिशा

लेखक :

अरविन्द सदाशिव जोशी


M. A., B. Com., LL. B.

संस्कृत विशारद,

प्राचार्य,

मे ए. सो. कला व वाणिज्य महाविद्यालय,

मेहकर, जि. बुलडाणा.



आशीर्वाद :

श्री. राजेश्वर शास्त्री द्राविड,

पद्मभूषण, पंडितराज, वाराणसी.

REFBK-0018712

पुरस्कार :

मा. श्री. मधुकरराव ध. चौधरी,

अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य; मुंबई.

❋ प्रकाशिका :
ग्रंथ प्राप्ती स्थळ :
सौ० कल्याणी जोशी
'चैतन्य प्रकाशन,'
मेहकर.
(जि• बुलडाणा) महाराष्ट्र

❋ सर्व हक्क लेखकाधीन

❋ प्रमुख विक्रेते :
साहित्य सहकार संघ लि.
मोदी लाईन नं० ३
लिमये वाडा, सिताबर्डी,
नागपूर-१

❋ प्रकाशन :
जानेवारी १९७३

❋ मूल्य पंचवीस रुपये

❋ मुद्रक
श्री० आनंद पुराणिक
अक्षर मुद्रण,
खा म गां व .
(जि० बुलडाणा) महाराष्ट्र

❋ वेष्टण : चित्रण व मुद्रण
श्री० आनंद पुराणिक
खामगांव.

ज्ञानसागरातील हे विचारमंथन

प्रेरणा आणि पसायदान

ह्यांचे स्वामी

श्री ज्ञानियांचे राजे

यांना

सश्रद्ध समर्पण

आशीर्वाद....

॥ श्रीगुरूःशरणम् ॥

श्री राजेश्वर शास्त्रीद्राविड

("शास्त्ररत्नाकर,""पद्मभूषण,""पण्डितराज")

देशहिताकांक्षाभिर्भारतीयैः पूर्वसमये आदाविदमनुष्ठितं यत्-
धर्मावेजायेनो राज्ञः गुरूभक्तस्य विद्याचतुष्टयानिपुण्यस्य
सात्विकस्य प्रतिष्ठा यथा भवेत्, तत्राप्यान्वीक्षिक्या
त्रिशेषतया शंकाकुले समये प्रचारणंच यथा भवेत् ।

भारतीयराजनीत्यनुसारेण प्रतिष्ठिते राजनि तत्प्रेरणामरात्य
गुरूभिर्विद्यारक्षणाय तथा यतितं, यथा विद्यार्थिनां पूर्णगुणवत्ता
प्रकाशिता भवेत्, भवेच्च पुनः बुद्धिमत्त्व-तर्ककर्कशधीमत्त्वादिना
विष्णुभक्त्या सह परलोक विश्वासपूर्वकं त्रयीधर्मानुयायित्वं
समस्तस्य मित्रतायोग्यत्वं गुरूकार्यरतत्वंचेति ।

एवंविधः शिक्षाक्रमः"विवेकश्रुतसम्पत्ति गुरूभक्ति तपस्यित
सिद्ध्यर्थमेतच्चतुष्टयं यावज्जीवमहं करिष्ये" इतिसंकल्पे
पर्यवस्यति ।

श्रीमद्भिः सुगुहितनामधेयैः अरविन्द स. जोशी
महकरमहोदयैर्निबद्धं "भारते नैतिकाध्यात्मिक शिक्षापद्धति"
नामक्रमिमं निबन्धमनुसृत्य वर्तमानशिक्षाक्रमः उपर्युक्त
प्राचीन भारतीय शिक्षाक्रमेण सह संशोध्य नियोजितः फलाय
मंगलाय भवितुमर्हतीति-

श्रीराजेश्वर शास्त्रीद्राविड

के. २० / १५४,
राजमंदिर
वाराणसी–१



मा. मधुकरराव चौधरी, व लेखक पू. विनोबाजींकडून ग्रंथासाठी आशीर्वाद स्विकारतेवेळी.

मा. मधुकरराव चौधरी यांचा पुरस्कार

शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री
महाराष्ट्र राज्य
सचिवालय, मुंबई–३२
२३ फेब्रुवारी १९७२

भारतातील शिक्षण बिषयक पुनर्रचनेच्या विचारांना अलिकडे जोराची चालना मिळाली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शिक्षणाची घडी योग्य प्रकारे बसूच शकली नाही, परकीय राजकर्त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वार्थी, कोता व संकुचित होता भारतीय समाजातील सत्त्व, स्वाभिमान व सर्जनशीलता खच्ची करावी, या उद्देशानेच त्यांनी शिक्षणाची चौकट बसविली व कार्यक्रमांची उभारणी केली. या भारतद्रोही भूमिकेचा प्रतिकार करण्यासाठी म्हणूनच महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे, चिपळूनकर, लो. टिळक, आगरकर, महर्षि कर्वे इ. कर्मवीरांनी महाराष्ट्रात शिक्षण संस्था स्थापन केल्या व राष्ट्रविकासाची एक नवी वाट खुली करून दिली. राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयत्न करण्यासंबंधी बंगालमध्ये अनेक प्रयत्न एकोणिसाव्या शतकात झाले व त्यानंतर विसाव्या शतकात रविंद्रनाथ टागोर व रामकृष्ण मिशनचे कार्यकर्ते यांनी नव्या पाऊल वाटा पाडल्या. महर्षि अरविंद घोष यांनी पांडेचरी येथे शैक्षणिक प्रयोगाचे एक केंद्र उभे करून भारतीय शिक्षणाचा आशय कसा असावा याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले. महामना मदनमोहन मालवीय, डॉ. ॲनी बेझंट, लाला लजपतराय इत्यादींनी भारतीय शिक्षणावर ब्रिटीशांनी जे आक्रमण केले होते, त्यातून भारतीय शिक्षणाची सुटका कशी करता येईल यासंबंधीचे प्रायोगिक बहुमोल कार्य केले आहे.

याच संदर्भात राष्ट्रपिता म. गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचा जो पुरस्कार केला त्याचा खास उल्लेख

केला पाहिजे. महात्माजींच्या प्रेरणेमुळे शेकडो गांवात छोटया प्रमाणात का होईना राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग केले गेले. त्यांनी पुरस्कृत केलेल्या "मुलोद्योग" शिक्षण पद्धतीचा संपूर्ण स्विकार जरी आपण बदललेल्या भौतिक परिस्थितीत करू शकत नसलो तरी त्यातील मूलतत्त्वे आजही मार्गदर्शक ठरत आहेत हे विसरून चालणार नाही.

भारतीय शिक्षणविषयक पुनर्रचनेच्या विचारांचा स्रोत अशाप्रकारे स्व तंत्र्यपूर्व काळापासून वाहत आला आहे. अलीकडे त्यात अनेक नव्या ओहोळांची भर पडत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणासंबंधी जे तीन प्रमुख आयोग नेमण्यात आले–राधाकृष्णन आयोग, मुदलीयार आयोग व कोठारी आयोग त्यात भारतीय शिक्षणाच्या पुनर्रचनेचा चालू विचार व अपेक्षा गर्भित केलेल्या आढळतात. या आयोगातील सूचना लक्षात घेऊन भारतीय शिक्षणाला संजीवनी प्राप्त व्हावी म्हणून विविध दिशांनी सध्या प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकार राज्य सरकारे, विद्यापीठे, खाजगी शिक्षण संस्था व शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते शिक्षणातील उणीव दूर करण्यासाठी प्रयत्नशील आहेत असे उत्साहजनक दृष्य दिसत आहे.

तथापि ज्या विशिष्ट उणीवावर उपाययोजना करणेसंबंधी अद्यापही शासनाने अगर कार्यकर्त्यांनी पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. असा एक विषय म्हणजे नैतिक शिक्षण हा होय. या महत्वपूर्ण परंतु पुष्कळशा उपेक्षित विषयाकडे मेहकर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य अ. स. जोशी यांचे अभ्यासू लक्ष वेधले आहे ही आनंदाची व स्वागतार्ह घटना आहे.

सुमारे दहा वर्षे ते मेहकर येथील महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. या अवधीत श्री. जोशी यांनी युवक मनाचा व युवक प्रेरणांचा बारकाईने अभ्यास केला आहे. युवक मनामध्ये सध्या जी पोकळी वाढत चालल्याचे दिसून येते ती पाहुन प्राचार्य जोशी व्यथित झाले आहेत. अकराव्या प्रकरणात त्यांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक सहलीस गेले असतांना परत सायंकाळी मेहकरकडे येतांना घडलेला प्रसंग सांगितला आहे. सामुदायिकरित्या म्हटलेल्या भजनामुळे भक्तिरसाचा उदय कसा होतो याची प्रचिती त्यांना आली व त्यानंतर त्यांचे लक्ष

धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक संस्काराच्या आवश्यकतेकडे वेधले जाऊ लागले.

प्राचार्य जोशी यांच्या प्रस्तुत ग्रंथाची तुलना एखाद्या पदव्युत्तर प्रबंधाशी करावी लागेल. आपल्या अभ्यासासाठी त्यांनी शेकडो ग्रंथाचे परिशीलन केलेले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस त्या त्या प्रकरणाला सहाय्यभूत ठरलेल्या ग्रंथांची व अन्य साधनांची सूची त्यांनी जोडली आहे. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची गरज कां आहे, तिची तात्विक व ऐतिहासिक पार्श्वभूमि काय आहे, नैतिकतेचे प्रयोजन आत्मसुख असून तिचे अधिष्ठान धर्मच आहे. सर्व धर्म समभावना बाळगून आचरलेला धर्मसिद्धांत समाजाला कसा पोषक ठरतो, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेतील प्रमुख अडचणी कोणत्या व त्यावर उपाय कोणते; भारतीय संविधानातील निधार्मिकतेचा खरा अर्थ काय व नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या संदर्भात ज्या अडचणी संभवतात त्याचे निराकरण कसे करावयाचे इयादि बाबींचा उहापोह या ग्रंथाच्या प्रकरण १ ते ७ पर्यंत करण्यात आला आहे. प्रकरण ८ पासून ग्रंथाचा शेवटचा भाग सुरू होत आहे. या भागात एकूण चार प्रकरणे आहेत. आठव्या प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे अंतिम ध्येय कोणते व ते साधून घेण्याचे प्रमुख साधन जे मन त्याचा विचार आहे. नवव्या प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम देण्यात आला आहे. दहाव्या प्रकरणात मूळ कार्यक्रमाला पूरक असे आणखी कोणते सहाय्यक कार्यक्रम शिक्षण संस्थांनी हाती घ्यावे या बाबींचा उहापोह केला आहे. ११ व्या प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा प्रयोग कुठे कुठे केला गेला व त्याला कितपत यश मिळाले याची माहिती लेखकाने दिली आहे. "योजनेचा प्रत्यक्ष प्रयोग व प्रतिसाद" असा या प्रकरणाचा मथळा आहे. यानंतर शेवटच्या प्रकरणात लेखकाने अल्पावधी व दीर्घावधी योजना कशी असावी यासंबंधी विचार मांडले आहेत.

शिक्षण विषयक संशोधन करण्याची "कृति संशोधन *(Action-Research)*" ही एक नवी पद्धत अलीकडे सर्वमान्य होत आहे. लहान प्रमाणात प्रत्यक्ष कृती करून, पाहून तिचा काळजीपूर्वक अभ्यास प्रथम करावयाचा व नंतर प्रयोगाची कक्षा वाढवीत जावयाची अशी ही रीत

आहे. नैतिक शिक्षणाची गरज आजही कोणी फारशी अमान्य करित नाही. त्याबाबत सखोल अध्ययन करून श्री. जोशी यांनी आपला दृष्टीकोण या ग्रंथात सादर केला हे चांगले झाले. तथापि, यापुढील जी गरज आहे ती काही निवडक संस्थांमध्ये प्रयोग करून पाहण्याची. असा प्रयोग सातत्याने काही वर्षे करून आवश्यक ते अध्यापन, अध्ययन, साहित्य याची निर्मिती करावी लागेल व एकूण प्रयोगाचे मूल्यमापन करावे लागेल. युवक मनावर इष्ट संस्कार घडविण्यासाठी प्राचीन भारतात जे धार्मिक विधी व उपाय प्रभावी ठरले, ते विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उपयुक्त ठरतीलच अशी ग्वाही कोणी देऊ शकणार नाही. प्राचार्य जोशी मात्र प्राचीन हिंदु धर्मातील व समाज व्यवस्थेतील संस्कार शिक्षणाने भारावलेले दिसतात; अर्थातच याबाबत संशोधन करूनच निष्कर्ष काढणे योग्य ठरेल. प्राचार्य जोशी यांनी याबाबत पुढाकार घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या क्षेत्रात शासनापेक्षा खाजगी शिक्षण संस्थांतर्फेच प्रयोग केले जाणे अधिक उचित ठरेल. याबाबत विचारांना चालना देण्याच्या दृष्टीनेही प्राचार्य जोशी यांनी सादर केलेला नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेचा आराखडा महाराष्ट्रातील प्रयोगशील शिक्षक बंधु-भगिनींना निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल. प्राचार्य जोशी यांच्या या ग्रंथाचे स्वागत शिक्षणात रस असणारे सर्वचजण करतील असा मला विश्वास वाटतो.

म. ध. चौधरी

दहा

काही शिक्षण तज्ञांचे अभिप्राय

" नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सांगड आधुनिक शिक्षणाशी कशी घालावी याचा अत्यंत तर्कशुद्ध व मुद्देसूद असा सर्वांगीण विचार प्राचार्य जोशी यांनी या ग्रंथात केला आहे. तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंचे समतोल, समर्पक व सर्वव्यापी विवेचन करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. भारतीय भाषांमध्ये या विषयावर एवढा विस्तृत ग्रंथ निदान माझ्या पाहण्यात नाही.

राष्ट्रीयदृष्टया अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नाकडे सर्व समाजाचे लक्ष वेधण्याची या ग्रंथाद्वारे व्यक्त होणारी लेखकाची आंतरिक तळमळ खचितच स्तुत्य आहे."

प्राचार्य गो. अ. पुराणिक
अधिष्ठाता,
शिक्षण शाखा; नागपूर विद्यापीठ

प्राचार्य श्री. अे. एस्. जोशी यांनी लिहिलेला हा ग्रंथ वाचला. हा वाचून अत्यानंद झाला.....प्रस्तुत ग्रंथाच्या लेखनासाठी लेखकाने भरपूर परिश्रम घेतले. त्यांच्या या ग्रंथात त्यांची अनेक वर्षांची साधना प्रतिबिंबीत झालेली दिसते. नैतिक शिक्षणाचा विचार प्रस्तुत ग्रंथात लेखकाने अति प्राचीन काळापासून अति अर्वाचीन काळा-पर्यंत केला आहे. गीर्वाण भाषेतील विचारवंतांच्या अवतरणापासून तर इंग्रजी भाषेतील अनेक विचारवंतांची अवतरणे उद्धृत केली आहेत. त्यांच्या या परिश्रमाचे कौतुक करावेसे वाटते. माझ्याप्रमाणेच इतरांना हा ग्रंथ आवडावा अशीच या ग्रंथाची थोरवी आहे. लेखकाकडून यापुढेही अशीच सरस ग्रंथनिर्मिती व्हावी हीच आमची अपेक्षा असणार !

डॉ. एम्. एम्. शहा
M. A; Ph. D.
अधिष्ठाता,
वाणिज्य शाखा; नागपूर विद्यापीठ

आहे. नैतिक शिक्षणाची गरज आजही कोणी फारशी अमान्य करित नाही. त्याबाबत सखोल अध्ययन करून श्री. जोशी यांनी आपला दृष्टीकोण या ग्रंथात सादर केला हे चांगले झाले. तथापि, यापुढील जी गरज आहे ती काही निवडक संस्थांमध्ये प्रयोग करून पाहण्याची. असा प्रयोग सातत्याने काही वर्षे करून आवश्यक ते अध्यापन, अध्ययन, साहित्य याची निर्मिती करावी लागेल व एकूण प्रयोगाचे मूल्यमापन करावे लागेल. युवक मनावर इष्ट संस्कार घडविण्यासाठी प्राचीन भारतात जे धार्मिक विधी व उपाय प्रभावी ठरले, ते विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उपयुक्त ठरतीलच अशी ग्वाही कोणी देऊ शकणार नाही. प्राचार्य जोशी मात्र प्राचीन हिंदु धर्मातील व समाज व्यवस्थेतील संस्कार शिक्षणाने भारावलेले दिसतात; अर्थातच याबाबत संशोधन करूनच निष्कर्ष काढणे योग्य ठरेल. प्राचार्य जोशी यांनी याबाबत पुढाकार घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या क्षेत्रात शासनापेक्षा खाजगी शिक्षण संस्थांतर्फेच प्रयोग केले जाणे अधिक उचित ठरेल. याबाबत विचारांना चालना देण्याच्या दृष्टीनेही प्राचार्य जोशी यांनी सादर केलेला नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेचा आराखडा महाराष्ट्रातील प्रयोगशील शिक्षक बंधु-भगिनींना निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल. प्राचार्य जोशी यांच्या या ग्रंथाचे स्वागत शिक्षणात रस असणारे सर्वचजण करतील असा मला विश्वास वाटतो.

म. ध. चौधरी

दहा

काही शिक्षण तज्ञांचे अभिप्राय

" नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सांगड आधुनिक शिक्षणाशी कशी घालावी याचा अत्यंत तर्कशुद्ध व मुद्देसूद असा सर्वांगीण विचार प्राचार्य जोशी यांनी या ग्रंथात केला आहे. तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंचे समतोल, समर्पक व सर्वव्यापी विवेचन करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. भारतीय भाषांमध्ये या विषयावर एवढा विस्तृत ग्रंथ निदान माझ्या पाहण्यात नाही.

राष्ट्रीयदृष्टचा अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नाकडे सर्व समाजाचे लक्ष वेधण्याची या ग्रंथाद्वारे व्यक्त होणारी लेखकाची आंतरिक तळमळ खचितच स्तुत्य आहे."

प्राचार्य गो. अ. पुराणिक
अधिष्ठाता,
शिक्षण शाखा; नागपूर विद्यापीठ

प्राचार्य श्री. अे. एस्. जोशी यांनी लिहिलेला हा ग्रंथ वाचला. हा वाचून अत्यानंद झाला.....प्रस्तुत ग्रंथाच्या लेखनासाठी लेखकाने भरपूर परिश्रम घेतले. त्यांच्या या ग्रंथात त्यांची अनेक वर्षांची साधना प्रतिबिंबीत झालेली दिसते. नैतिक शिक्षणाचा विचार प्रस्तुत ग्रंथात लेखकाने अति प्राचीन काळापासून अति अर्वाचीन काळा-पर्यंत केला आहे. गीर्वाण भाषेतील विचारवंतांच्या अवतरणापासून तर इंग्रजी भाषेतील अनेक विचारवंतांची अवतरणे उद्धृत केली आहेत. त्यांच्या या परिश्रमाचे कौतुक करावेसे वाटते. माझ्याप्रमाणेच इतरांना हा ग्रंथ आवडावा अशीच या ग्रंथाची थोरवी आहे. लेखकाकडून यापुढेही अशीच सरस ग्रंथनिर्मिती व्हावी हीच आमची अपेक्षा असणार !

डॉ. एम्. एम्. शहा
M. A; Ph. D.
अधिष्ठाता,
वाणिज्य शाखा; नागपूर विद्यापीठ

मी आपला प्रबंध काळजीपूर्वक समग्र वाचला. माझ्या मते विनाकारणच विवाद्य बनलेल्या विषयाच्या मूळालाच हात घालून आपण एक थोर कार्य केले आहे. बहुतेक सर्व शैक्षणिक आयोगांनी या विषयाचा परामर्ष घेतला असला तरी व्यवहार्य उपाय योजना, अभ्यासक्रम तथा नैतिक आध्यात्मिक शिक्षण, संस्कार स्वरूपात रूजविण्याचे मार्ग-दर्शन आपण केले आहे ते सद्य:परिस्थितीत निरूत्तर करणारे आहे.

श्री. प्र. माणकोकर
एम्. ए., एम्. एड.
प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलडाणा.

लेखकाचे हृदगत.....

विश्वविद्यालयीन क्षेत्रात व्यतीत केलेल्या गेल्या दीड दशकातील वाचन, चिंतन व प्रयोग यांचे सार असलेला हा ग्रंथ वाचकांच्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

हा ग्रंथ लिहिण्यास खरोखरी मी का प्रवृत्त झालो ? अध्यापनाचा एक सिद्धान्त अनुभवाने मला चांगला उमगला आहे. तो असा की, आपणास ठाऊक असलेला सिद्धान्त आपण इतरांना समजावून सांगू लागलो म्हणजे त्या सिद्धान्ताचे अधिक सूक्ष्म असे बारकावे आपणालाच आकलन होऊ लागतात. 'शिकविता शिकविता शिकावे' हा मंत्र शिक्षकाने कधी विसरता कामा नये. हा ग्रंथ लिहितांना शिक्षकाची ही 'विद्यार्थ्याची' भूमिकाच मला अभिप्रेत आहे; उपदेशकाची किंचितही नव्हे.

हा ग्रंथ म्हणजे "एकमेका करू सहाय्य, अवघे धरू सुपंथ" या भावनेने केलेले हितगुज आहे; एक प्रकारचे प्रगट चिंतन आहे; न राहवून केलेले आत्मनिवेदन आहे! शिक्षणाद्वारे बाल–तरूणांचा सात्त्विक गुणोत्कर्ष व्हावा म्हणून सर्वांना एकत्रित, येण्यासाठी केलेले विनम्र आवाहन आहे! सर्व सज्जनांच्या हळुवार हृदयाला घातलेली साद आहे.

कुणी याला प्रतिसाद देईल का ? तपशीलाबाबत मतभेद राहणार असला तरी तत्त्वत: नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देण्याबाबत सहसा दुमत होऊ नये. मग तपशीलाची आपल्या कल्पनेप्रमाणे स्थूल चौकट निश्चित करून सर्वांनी एकजुटीने प्रयत्नाला का लागू नये?

याच संदर्भात सर्व वाचकांना एक विनंती आहे की, हा ग्रंथ वाचतांना त्यामधील व्यावहारिक योजनाबद्दल त्यांच्या आणखी काही कल्पना वा विचार असतील तर त्यांनी मला कळविण्याची कृपया तसदी घ्यावी; म्हणजे पुढील आवृत्तीच्या वेळी अशा सर्व सूचनांचा विचार करता येऊ शकेल. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे क्षेत्र अद्याप प्रयोगावस्थेत असल्याने विचारांची ही देवघेव अत्यंत मोलाची ठरेल. एवढेच नव्हे तर कुणा विद्वान अधिकाऱ्याने या शिक्षणाच्या आणखी काही पैलूवर वा

प्रक्रियेवर ग्रंथ लेखन केले तर आज हवेच आहे. या शिक्षणास चालना मिळण्यास ते उपयुक्त ठरेल.

मनुष्य विचाराने देव आहे तर शरीराने पशु! साहजिकच तो विचाराने वागला तर त्याची वागणूक देवाप्रमाणे हिताची होते; याउलट विकाराने वागला तर पशुप्रमाणे घातक ठरते; विचाराचा शरीरावर ताबा ठेवणे हे मनुष्यत्व आहे आणि या माणुसकीचा ऱ्हास झाला असल्यानेच आजच्या सर्व समस्या उद्भवल्या आहेत. मग ही माणुसकी कशी उत्पन्न करता येईल? इमारती, मोटारी, खाणी, कारखाने इ. बाह्य वस्तूंच्या कमी जास्त होण्याने माणुसकीत वाढ किंवा घट होते का? मुळीच नाही. यांचा माणुसकीशी काही संबंधच पोचत नाही. मग वर म्हटल्याप्रमाणे विवेकाने देहबुद्धीवर, विचाराने विकारावर नियंत्रण ठेवावयास शिकविणे म्हणजेच मनुष्यत्व निर्मिण्यासारखे आहे. आता प्रश्न उरतो, तो हे केव्हा नि कुठे निर्मिता येईल? कसे शिकविता येईल? एवढाच!

आता हे ओघानेच आले की आयुष्याच्या प्रारंभी बाल व तरूण असतांनाच माणसाला हे शिकविले गेले पाहिजे. इतर विषय जसे शिकविले जातात तसे विचारांचे, माणुसकीचे हे शिक्षण विद्यार्थ्याला शाळा–कॉलेजातून मिळाले पाहिजे. हेच समजावून सांगावे, सर्वांना पटवून द्यावे, नव्हे त्या दिशेने सर्वांनी सक्रिय व्हावे एवढ्यासाठीच हा ग्रंथ!

याच विषयावरील माझ्या लेखमालेच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे शिक्षण शिल्पकार मा. मधुकरराव चौधरी यांच्या परिचयाचा सुयोग आला. माझ्या लेखांतील विचाराशी सहमत असल्याचे तर त्यांनी मला कळविलेच; शिवाय चर्चेसाठी आस्थापूर्वक आमंत्रण दिले; ग्रंथ लिहिण्यास प्रेमळ प्रोत्साहन दिले. पू. विनोबाजींकडे नेऊन त्यांना या ग्रंथासाठी मार्गदर्शन व आशीर्वाद देण्याची विनंती केली. शेकडो व्याप मागे असूनही माझे हस्तलिखित वाचून मौलिक पुरस्कार लिहून दिला. या निरपेक्ष सद्भावाबद्दल त्यांचे विषयी कोणत्या शब्दात कृतज्ञता व्यक्त करावी? मी त्यांच्या ऋणातच राहणे अधिक पसंत करतो.

वाराणसीचे जगविख्यात पंडितराज श्री. राजेश्वर शास्त्री द्राविड पुण्याचे डॉ. ग. श्री. खैर, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. उपासनी या ज्येष्ठ

विद्वानांनी आस्थापूर्वक हस्तलिखित वाचून ज्या मोलाच्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा अंत:करणपूर्वक आभारी आहे शिक्षण शाखेचे अधिष्ठाते प्राचार्य श्री. गो. अ. पुराणिक, प्राचार्य श्री. श्री. प्र. माणकीकर, बुलढाणा, प्राचार्य श्री. केवलीया, वर्धा या शिक्षण तज्ञांनी सर्व तऱ्हेचे उत्तेजन दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

मेहकर शिक्षण संस्थेचे चालक यांनी या ग्रंथाचे महत्व जाणून उदारपणे छपाईच्या वेळी जी सवड दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे. ज्या खामगांव येथे छपाई सुरू होती तेथील मराठी विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. भैय्याजी सहस्त्रबुद्धे, प्रा. भीमराव जहागिरदार, प्रा. गोपाळराव सावजी या सर्वांनी मी वेळी अवेळी हक्काने मागितलेले सहकार्य तितक्याच प्रेमाने दिले, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. खामगांव येथील वास्तव्यात बंधुतुल्य जिव्हाळ्याने ज्यांनी माझे निरपेक्ष आतिथ्य केले त्या ती. श्री. बाबुराव काळे, ॲडव्होकेट व सौ. नलिनी वहिनी यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

नागपूर विद्यापीठाने आयोजित केलेल्या नैतिक शिक्षण सम्मेलना–पासून ग्रंथ लेखनासाठी प्राचार्य श्री. मुनशी यांनी वडीलकीच्या नात्याने उद्युक्त केले. तसेच परमस्नेही श्री भैय्यासाहेब घटाटे यांचे सहकार्य मागेल तेव्हा मिळत गेले वर्धेच्या 'गांधी ज्ञान मंदिर' चे संचालक प्राचार्य डॉ. शहा व नागपूर विद्यापीठ ग्रंथालयाचे श्री. कुळकर्णी यांनीही सर्व सवलती उपलब्ध करून दिल्या.

प्रा. सौ. देशमुख, आमच्या महाविद्यालयातील श्री. शर्मा, श्री. लोखंडे, ग्रंथपाल श्री. गोवर्धनकर, श्री. महादेव शिंदे, श्री. बाळकृष्ण बोरकर यांनीही विविध प्रकारे सहाय्य केले. श्री. काकासाहेब पिंगळे व श्री. गावंडे यांचेही हस्तलिखित तपासतांना व टंकलेखन करतांना फार सहाय्य झाले. या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

ज्या अनेक ग्रंथाचे ग्रंथ लेखनासाठी आधार घेतले त्या सर्व ग्रंथ–लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहे.

'अक्षर मुद्रण'चे तरुण संचालक श्री. आनंदराव पुराणिक यांचे तर या ग्रंथ छपाईबद्दल कौतुक करावे तेवढे थोडे होईल. या क्षेत्रातील अत्यल्प अनुभव, लहान वय व साधनाची कमतरता अशा सर्व प्रति–

कूलतेला साहस आणि सातत्य कसे पराभूत करू शकते हे श्री. आनंदराव यांनी आपल्या उदाहरणाने सिद्ध केले. अन्यथा केवळ ४ पृष्ठाच्या ट्रेडल मशिनवर सुमारे दोन महिन्यात एवढा ग्रंथ या स्वरूपात प्रकाशित करणे केवळ अशक्य झाले असते. त्यांचे व अक्षर मुद्रणच्या सर्व कामगार बंधूंचे या सहकार्याबद्दल मी शतशः अभिनंदन करतो व आभार मानतो.

श्री. अनंतराव वझे, सेंट्रल स्टुडिओ, खामगांव आणि श्री. बाळासाहेब खेकाळे ह्यांनी ग्रंथातील छायाचित्रणाच्या कामात वेळोवेळी जे सहकार्य व मार्गदर्शन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

लेखक व मुद्रक यांनी आपापल्या परीने ग्रंथ निर्दोष करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे, परंतु मानवी शक्तीची मर्यादा लक्षात घेऊन किरकोळ मुद्रण दोषाबद्दल वाचकांनी उदार मनाने क्षमा करावी ही नम्र विनंती.

या ग्रंथात जे काही चांगले असेल त्या सर्वांचे धनी आहेत माझे लालन, पालन नि रक्षण करणारे पूज्य माता, पिता नि श्रीगुरू! उरलेल्या त्याज्य फोलकटाला कारणीभूत आहे सर्वस्वी मी ! सहृदय वाचकांनी क्षीर नीर न्यायाने धान्याचा वाहून आणलेला हा माल स्विकारावा ही प्रार्थना !

अरविंद सदाशिव जोशी

अनुक्रमणिका

आशीर्वाद; पुरस्कार; अभिप्राय; लेखकाचे हृदगत्, अनुक्रमणिका इ. एक ते तेवीस

उपोदघात्

एक. भारतीय शिक्षण : समस्यांची समस्या १ त ४६

१. प्राचीन भारतातील शिक्षण ३
२. प्राचीन आदर्श शिक्षण पद्धतीचा ऱ्हास ९
३. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शिक्षणाची दुर्दैवी आबाळ १९
४. भारतीय शिक्षणाच्या पुनरूज्जीवनाचा उपाय– शिक्षणाचे आध्यात्मिकरण २७
५. शिक्षणाच्या आध्यात्मिकरणास सार्वत्रिक अनुकूलता २९
६. प्रबंधाचे प्रयोजन ३४
७. गृहीत तत्वे ३७
८. उपसंहार ३८
संदर्भ टीपा ४०

प्रथम विभाग

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणच का ?
तात्विक पार्श्वभूमी

दोन. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची तात्विक पार्श्वभूमी ४७ ते८९

१. नैतिकता म्हणजे काय ? ४९
२. बालकांत नैतिकतेचा विकास ६३
३. समारोप ८४
संदर्भ टीपा ८८

तीन. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा आधार सर्व-धर्म-समभाव ८९ते१२८

१. नैतिक आचरणाचे प्रमुख प्रयोजन : अखंड अविनाशी सुख ९१
२. नीती व अध्यात्माचे अधिष्ठान धर्म १००
३. सर्व धर्मातील समानता सामंजस्य नि सहिष्णुता १०६
४. धर्मसिद्धांताचा नैतिक आचरणावर हितावह परिणाम: चार प्रमुख सिद्धान्त ११२
(अ) आत्म्याच्या अमरत्वाचा सिद्धान्त
(ब) पुनर्जन्माचा व कर्मविपाकाचा सिद्धान्त
(क) शाश्वत सुख बाहेर नसून स्वत:मध्येच आहे.
(ड) मानवाचे अंतिम साध्य–परमेश्वरप्राप्ती वा आत्यंतिक सुखप्राप्ती
संदर्भ टीपा १२५

चार. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा जीवनावर सर्वांगीण सुपरिणाम १२९ते१६२

१. राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीसाठी
२. राष्ट्रीय शिक्षणाला पायाभूत होण्यासाठी १३७
३. "संपूर्ण मानव सिद्धान्त" दृष्टचा वा सन्तुलित व्यक्तित्व विकासासाठी १३९
४. नागरिकत्वाचे गुण अंगी बाणविण्यासाठी १४२
५. सामाजिक स्वास्थ्य व सुखासाठी १४३
६. राजकीय निकोप स्पर्धेसाठी १४७
७. लोकशाहीच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी १४८
८. बदललेल्या परिस्थितीमळे शिक्षण संस्थांवरील वाढती जबाबदारी पार पाडण्यासाठी १४९
९ विज्ञानाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी १५१
१०. शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी १५५
११. जागतिक शांततेसाठी १५७
संदर्भ टीपा १६०

द्वितीय विभाग

योजनेतील विभिन्न अडचणी व त्यांचे निराकरण

पाच. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेतील
प्रमुख अडचणी व उपाय (पूर्वार्ध) १६३ ते १९८

१. शासनाचे औदासिन्य व उपेक्षा १७५
२. विविध शिक्षण संस्थांत व विद्यापीठात या
विषयाबाबत एकवाक्यता नसणे १८०
३. अशा शिक्षणाला लागणाऱ्या विशिष्ट दर्जाच्या
व गुणांच्या अध्यापकांची उणीव १८३
४ माध्यमिक बोर्ड व विद्यापीठ यात या योजनेला
स्वतंत्र स्थान नसणे १८९
५. प्राथमिक शिक्षणापासून तहत उच्च शिक्षणापर्यंत
सुसूत्र अशा शिक्षणाचा अभाव १९४
संदर्भ टीपां १९८

सहा. नैतिक आध्यात्मिक शिक्षण योजनेतील
अडचणी व उपाय (उत्तरार्ध) १९९ ते २२८

गोण अडचणी २०१

६. विद्यार्थ्यांच्या विविध वयोमर्यादा व अवस्था यांना
अनुसरून संस्कारक्षम व प्रेरक असे प्रभावी साहित्य
उपलब्ध नसणे २०२
७. पालकांच्या अपेक्षित सहकार्याचा अभाव. २०३
८. नैतिक मूल्यांच्या विपरीत घडणाऱ्या घटना व
वागणाऱ्या व्यक्ती यांचा गौरव व सन्मान २०७
९. शाळातून आज अवलंबिली जाणारी मऊ शिक्षण
प्रणाली २१०
१०. योजनेच्या कार्यवाहीसाठी लागणाऱ्या द्रव्यबलाची
चणचण २१३
संदर्भ टीपा २१९

सात. शिक्षणाच्या संदर्भात भारतीय
संविधानातील '' निधार्मिकता '' २२१ ते २५२
१. संविधानातील 'निधार्मिकते' चा मथितार्थ २२३
२. विविध शिक्षण आयोगांचे सिंहावलोकन २२९
३. निधार्मिक संविधानामुळे उद्भवणारे दोन
प्रश्न व त्यांची सोडवणूक २३५
संदर्भ टीपा २५१

तृतीय विभाग

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण कसे अमलात आणावे ?
परिणामकारक व्यावहारिक उपाय योजना

आठ. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय
व तत्प्राप्तिचे साधन : मन २५३ते२८६
१. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय २५७
२. शिक्षणाच्या ध्येय प्राप्तीचे साधन – मन २७२
संदर्भ टीपा २८३
नऊ. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण
योजनेचा अभ्यासक्रम २८७ते३२८
(अ) अभ्यासक्रमाची स्थूल रूपरेषा २८९
विभिन्न अवस्थांतील अभ्यासक्रमाचे स्थूल स्वरूप २९२
(ब) अभ्यासक्रमाबाबतच्या मुद्यांचे स्पष्टीकरण ३०२
१. सार्वत्रिकपणे सर्व संस्थांमध्ये सामूहिक सुरूवात ३०२
२. प्राथमिक अवस्थेत प्रयोगाचे मूल्यांकन ३०३
३. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण अनिवार्य स्वरूपाचे ३०५
४. अभ्यासक्रम अवस्थानुसार की वर्गानुसार ३०६
५. अभ्यासक्रम हे केवळ साधन, साध्य नव्हे ३०७
६. शिक्षणाची परीक्षा पद्धती ३०७
७. शिक्षण वर्गाची सर्वसाधारण रूपरेषा ३०९
८. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण विषयाची परीक्षा ३१२

९. परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांचा विचार ३१५
१०. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज ३१८
११. धर्मज्ञान नव्हे, अध्यात्म शिक्षण हा हेतू ३२१
१२. सदाचरण स्वान्त:सुखाय ३२४
संदर्भ टीपा ३२५

दहा. वातावरण निर्मीतीचे उपाय व योजनेची सप्त सूत्रे ३२९ते३७०

(अ) शिक्षण संस्थेतील पोषक वातावरण निर्मितीसाठी काही उपाय ३३१

१. दैनंदिन प्रार्थनेने शुभारंभ ३३५
२. मौन मानसपूजा ३३५
३. प्रार्थनोत्तर सुविचार वाचन ३३६
४. विचार मौक्तिक संग्रह ३३६
५. समान गणवेश ३३७
६. संपूर्ण मौन दिन ३३७
७. ईश संकिर्तन ३३७
८. कथा कथन ३३८
९. व्यक्तिगत मार्गदर्शनासाठी संपर्क योजना ३३९
१०. सवय व शासन म्हणून नाम लेखन ३४०
११. दैनंदिनीची सवय ३४१
१२. विद्यार्थ्यांद्वारे योजनेची अंमलबजावणी ३४२

(ब) योजनेची मार्गदर्शक सप्तसूत्रे ३४४

१. प्रचलित जुन्या पद्धतीमध्ये कालानुरुप बदल ३४७
२. क्रियात्मक अशा विधायक बाजला प्राधान्य ३४९
३. विवेकाने विचारांचे उन्नयन ३५१
४. शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासाची प्रक्रिया ३५३
५. वातावरणात नैतिक व अध्यात्म शक्तीचा प्रभाव जाणविणे ३५५
६. आध्यात्मिक अनुभूतीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन ३५७

७. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची पथ्ये ३६१
(अ) आध्यात्मिक उत्कर्षासाठी विज्ञानाचा वापर
(ब) मातृ भावनेचा उत्कर्ष
(क) विभिन्न धर्मियात प्रेम परिपोष
संदर्भ टीपा ३६७

अकरा. योजनेचे प्रयोग व प्रतिसाद ३७१ते४०२
संदर्भ टीपा ३९८

उपसंहार


बारा. शिक्षणाची अल्पावधी व दीर्घावधी योजना. ४०३ते४७०
अल्पावधी योजना
१. सर्व राज्यांकडून राज्यस्तरावर समितीची स्थापना ४०३
२. सर्व राज्यातील विद्यापीठ व माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या संहितेत इष्ट सुधारणा ४२१
३. वार्षिक अंदाज पत्रकात योजनेसाठी तरतूद ४२३
४. निवडक विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन ४२४
५. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण प्रदान करणाऱ्या शिक्षकासाठी प्रशिक्षण केंद्रे ४२९
६. शिक्षक, विद्यार्थी यांच्यासाठी व्यक्तित्व चांचण्या व त्यांची अंमलबजावणी ४३३
दीर्घावधी योजना ४३८
१. चलचित्रपट ४३९
२. आकाशवाणी ४४५
३. चित्रवाणी ४४९
४. साहित्य निर्मिती व ग्रंथालयात "सत्साहित्य कक्ष" योजना ४४९

(५) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणास वाहिलेले
मासिक व साप्ताहिक चालविणे ४५२
(६) शुद्धाचरणी विद्वानांच्या वास्तव्यस्थानी गुरूकूल ४५३
(७) निवडक महाविद्यालये व विद्यापीठ यांची
निवांतस्थळी,नगरापासून दूर स्थापना ४५५
(८) ब्रह्मचर्य व्रत पालनास विद्यार्थ्यांना आवाहन
व प्रोत्साहन ४५७
(९) अखिल भारतीय नैतिक व आध्यात्मिक
शिक्षण संशोधन केन्द्र ४६०
(१०) आंतरराष्ट्रीय नैतिक व आध्यात्मिक
शिक्षण केन्द्र ४६१
संदर्भ टीपा ४६६

परिशिष्ट, १ ते ४ ४७१
संदर्भ ग्रंथ सूची ६. ४८२

एक

भारतीय शिक्षण : समस्यांची समस्या



" देशातील त्यागी, आदरणीय व शिक्षणासंबंधी मूलभूत विचार करणाऱ्या विशेषज्ञांची एक सभा बोलावून त्यांनी विचार करून कोणती शिक्षणपद्धती पाहिजे हे ठरविण्यास जितका वेळ लागेल, तितके दिवस सध्याचे चालू शिक्षण पूर्ण बंद केले तरी राष्ट्राचे जितके नुकसान होणार नाही, तितके नुकसान सदोष शिक्षण चालू ठेवण्याने होईल. "

पू. विनोबा[1]

"*Formation of character, building up of personality, preservation of ancient culture and the training of the rising generation in the performance of the social and religious duties, these were the main aims of the Ancient system of Education.* "

Dr. Altekar[2]

१. प्राचीन भारतातील शिक्षण

भारतीय शिक्षणाचे सुवर्णयुग

प्राचीन भारतातील शैक्षणिक इतिहासाचे सिंहावलोकन केले तर एक वैभवशाली व गौरवास्पद असे मानचित्र मन:चक्षूंसमोर रेखाटले जाते. सुमारे १००० अध्यापक व ९००० विद्यार्थी असलेल्या जगप्रसिद्ध नालंद विद्यापीठापासून[३] तो तहत दक्षिणेत प्रत्येक देवालयाला जोडून असलेल्या खेड्यापाड्यांतील संस्कृत पाठशाळेपर्यन्त[४] शिक्षणाचा प्रसार संपूर्ण भारतात एवढ्या व्यापक प्रमाणात झाला होता की, एकंदर समाजजीवनावर त्याचा अनुकूल असा प्रभावी ठसा उमटल्याशिवाय राहिला नाही. समृद्ध, समाधानी व सुखी समाजाचे जे सुवर्णयुग संपूर्ण भारतात त्या काळी अवतरले, त्याचे फार मोठे श्रेय त्यावेळी प्रचलित असलेल्या भारतीय शिक्षण पद्धतीला देणे अपरिहार्य आहे. कारण इ. स. पूर्वी ८०० साली देखील साक्षरतेचे भारतातील प्रमाण सुमारे ७५ टक्के असावे असा अंदाज केला जातो.[५] त्याच सुमारास झालेल्या राजा अश्वपतीने त्याच्या राज्यात कुणीही निरक्षर नाही असे अभिमानाने म्हटले आहे.[६] अशा रीतीने सामान्य व्यक्तीपर्यन्त पोचलेल्या शिक्षणाचा परिणाम सामाजिक जीवन उन्नत होण्यात न झाला तरच आश्चर्य !

शिक्षणाचा सामाजिक नीतिमत्तेवर सुपरिणाम

भारतीय समाजाची त्यावेळची नीतिमत्तेची पातळी शिक्षणाद्वारे केवढीतरी उंचावली होती. भारतीयांची सत्यप्रियता, प्रामाणिकपणा, न्यायबुद्धी, व्यापारातील सचोटी इ. अनेक गुणाबद्दल तत्कालीन सर्व लेखकांनी एकमुखाने कौतुकोद्‌गार काढले आहेत. विशेष म्हणजे प्राचीन भारतीयांच्या सच्छीलतेबद्दल एकही उणेदुणें वाक्य कुणाही विदेशी इतिहासकाराने नमूद केलेले नाही.[७] राजकीयदृष्ट्या हिंदूंशी मित्रत्व नसलेले ग्रीक व मुसलमान प्रवासी देखील भारतीयांच्या विविध गुणांवर मोहित झाले आहेत. सुप्रसिद्ध ग्रीक राजदूत मेगास्थेनिस[८] लिहितो,

" An Indian has never been covicted of lying. Truth and virtue they hold in high esteem .... They are not litigious. Witnesses and seals are not necessary when a man makes a deposit; he acts in trust. Their houses are usually unguarded. "

अल् इड्रिसी[९] हा मुस्लीम लेखक लिहितो,

" The Indians are naturally inclined to Justice and never depart from it in their actions. Their goodfaith, honesty and fidelity to engagements are well known and they are so famous for these qualities that people flock to their country from every side; hence the counry is flourishing and their condition prosperous."

भारतीयांच्या या गुणसंपन्नतेमुळे त्यांचा व्यापार उदीम वाढून भारताला आर्थिक सुबत्ता लाभली असा निष्कर्ष त्याने स्वाभाविकपणे काढला आहे. अलीकडील १३ व्या शतकातील मार्को पोलो याने सुद्धा व्यापाऱ्यांच्या सचोटीचे असेच गुणगान केले आहे तो लिहितो,[१०]

" ... These Brahmanas are the best merchants in the world and the most truthful, for they would never tell a lie for anything on the earth."

शिक्षणाद्वारे आदर्श विद्यार्थी

याप्रमाणे भारतीयांच्या सद्गुणावर लुब्ध झालेल्या कितीतरी लेखकांचे[११] दाखले देता येतील. या गुणसंपदेप्रमाणेच गणित; ज्योतिष्य, रसायनशास्त्र, वैद्यक, तर्कशास्त्र, इ. भौतिक शास्त्रांमध्येही भारताचा जगभर लौकिक पसरावा अशी शिक्षणपध्दतीची एकूण आखणी तत्कालीन तज्ञांनी केलेली होती. व्यापार, उद्योग, नृत्य संगीतादी कला ह्यांचाही विकास त्याद्वारे होत होता. सामाजिक कार्यक्षमता *(Social Efficiency)* आणि नागरिकत्वाची कर्तव्ये व जबाबदारी *(Civic duties & responsibilities)* ह्यांची जाणीव वृद्धिगत होत होती. स्वाभिमान, स्वावलंबन व स्वात्मानुशासन *(Self – respect, self-reliance & Self-restratint)* यांनी युक्त असा युवक प्राचीन शिक्षणामुळे तयार होत होता. सारांश भारतीयांची संस्कृती व सुधारणा ह्यांच्या परंपरेला अनुरूप व त्यांचा संरक्षक असा सर्वांगीण विकास साधलेला विद्यार्थी प्राचीन शिक्षण व्यवस्थेत घडविला जात होता.[१२]

प्राचीन शिक्षापद्धतीला गुणवान, लौकिक विद्येत पारंगत व समाज-संस्कृति-संरक्षक अशा विद्यार्थ्याचा अत्युच्च आदर्श कसा निर्मिता आला? शिक्षणाचे शास्त्र आज एवढे प्रगत झालेले असूनही अद्याप आम्हाला असा सर्वांगविकसित विद्यार्थी, तयार करणे तर दूरच पण त्याची अधोगतीही थांबविता येत नाही असे का ? प्राचीन शिक्षणात असे काय वशेष होते ?

प्राचीन शिक्षण अध्यात्म नीती व आचरणप्रधान

प्राचीन शिक्षणामुळे असा सर्वांगीण उन्नती साधलेला विद्यार्थी बाहेर पडू शकला याची अनेक कारणे असू शकतील. पण प्रस्तुत प्रबंधाच्या दृष्टीने महत्वाचे प्रमुख कारण असे की, प्राचीन शिक्षण पद्धती, अध्यात्म, नीती व आचरण प्रधान होती. 'अध्यात्म विद्या विद्यानाम्' हे भगवंताचे वचन तिच्या डोळ्यासमोर होते. विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार बिंबवानेत म्हणून ४० संस्कारांची व्यवस्था केली होती.[१३] ह्या संस्कारांनी उत्तम

शीलनिर्मिती व्हावी हा एकमेव हेतू. कारण 'केवळ विद्वत्तेपेक्षा निरक्षर चारित्र्यसंपन्न पुरुष श्रेष्ठ' हाच मुळी भारतीयांचा पूर्वापार संकेत. मनूने[१५] स्वच्छच सांगून ठेवले आहे की 'अपवित्र जीवन व्यतीत करणाऱ्या व तिन्ही वेद कंठस्थ असलेल्या ब्राह्मणापेक्षा केवळ वेदांचे शाब्दिक ज्ञान नसलेल्या पण शुद्ध चारित्र्याच्या व्यक्तीची निवड करावी'; कारण विचारातील व जीवनातील शुध्दता हा तर आत्मिक विकासाचा मुळी पायाच आहे.[१५] मनूने विध्यार्थ्यांना आत्मसंयमनाचे महत्व अनेक प्रकारे समजाऊन सांगितले आहे.

प्राचीन शैक्षणिक तत्वज्ञानातील तीन सूत्रे

प्राचीन भारताच्या शैक्षणिक तत्वज्ञानात *(Philosophy of Ancient Indian Education)* ज्या मूल्यांवर भर दिला गेला व जी मान्यता पावली ती मुख्यत: तीन. या मूल्यांमुळेच त्या काळातील तरुण पिढी वर सांगितल्याप्रमाणे गुणयुक्त निपजली. कोणत्याही देशातील शिक्षण पद्धतीचे जे मूलभूत तत्वज्ञान वा तात्विक अधिष्ठान असेल, त्यावरच तिचे श्रेष्ठत्व–कनिष्ठत्व अवलंबून असते व त्या प्रमाणात त्या शिक्षणाद्वारे बाहेर पडणारी युवकांची पिढी उत्कृष्ट वा निकृष्ट तयार होत असते. भारतीय शिक्षणाने पायाभूत मानलेली मूल्ये खालील प्रमाणे[१६] :–

१. व्यक्तीची अविद्या-निवृत्ती वा आत्मप्राप्तीची पिपासा

The quest for the liberation of the individual from the bondage of evil.

२. सहिष्णुता व क्षमा

Tolerance and forgiveness

३. निष्काम कर्म वा निष्ठेचे तत्व

The Principle of disinterested devotion.

भारतीय शास्त्रांत परमार्थज्ञानाच्या साधकाला विवेक, वैराग्य शमादिषट्क आणि मुमुक्षुता अशा चार गुणांचे जे 'साधन चतुष्टय' आग्रहाने प्रतिपादिले आहे ते देखील या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे.

ज्ञान तसेच विज्ञानही

असे हे श्रेष्ठ तत्वज्ञान दृष्टीपुढे असल्यामुळे भारतीय शिक्षण केवळ विशिष्ट विषयांचा अभ्यास करवून घेण्यापुरते सीमित नव्हते तर त्यांत भावी जीवनात जगावयाच्या जीवनमूल्यांचीही पायाभरणी केली जात असे. विद्यापीठ शिक्षण आयोगाने[१७] म्हटले आहे,

"Our ancient teachers tried to teach subjects and impart wisdom. Their ideal was wisdom (Irfan) along-with knowledge (ilm), 'ज्ञानविज्ञानसहितम्.' We cannot be wise without some basis of knowledge though we may easily acquire and remain devoid of wisdom."

सुप्रसिद्ध दार्शनिक प्लेटो याने देखील विषयाची 'वस्तुस्थिती निदर्शक माहिती' व 'तदुनषंगाने येणारे शहाणपण' *(distinction between actual information and understanding)* यात फरक केला आहे. विख्यात इंग्रज कवी इलियट याने आपल्या मार्मिक काव्यपंक्तीत[१८] "आपण माहिती गोळा करण्याच्या हव्यासात ज्ञान मात्र हरवून बसलो आहोत. त्यामुळे गेल्या २० शतकात ईश्वरापासून दूर दूर जात धुळीच्या फापट पसाऱ्याच्या मात्र आपण जवळ जात आहोत" अशी व्यथा व्यक्त केली आहे. छान्दोग्य उपनिषदात मंत्रवित् *(Knowers of Texts)* आणि आत्मवित् *(Knowers of self)* हे शब्दप्रयोग केवळ विषयाचे ज्ञान व आत्मज्ञान यामधील भेद स्पष्ट करणारे आहेत.

ज्ञानप्राप्तीसाठी आध्यात्मिक विधींचे सहाय्य

ज्ञानासोबत अध्यात्मज्ञानासाठी हवी असलेली चित्ताची संवेदनशीलता व कोमलता उत्पन्न व्हावी म्हणून मानसशास्त्रीय दृष्ट्या मनावर खोल परिणाम घडविणारे संस्कार बालवयातच करण्याची पद्धत, त्या काळात, प्रचलित होती. विद्यारंभ, उपनयन, श्रावणी, उत्सर्जन, अश्वमेधिका इ. सारख्या विविध धार्मिक संस्कारांच्या प्रक्रियांतील तपशील बारकाईने अभ्यासिला तर देह, मन, बुद्धी व आत्मा या विद्यार्थ्यांच्या सर्व महत्वाच्या घटकांना परिष्कृत करुन अध्ययनासाठी त्याला कसे अनुकुल करुन घेतले जात असे, हे पाहण्यासारखे आहे.[१९] केवळ एक उप-

नयनाचा संस्कार घेतला तरी तदंतर्गत कौपीन धारण, आश्रमारोहण, भिक्षाचरण, मेधाजनन वगैरे लहानसहान विधींवर नजर टाकली तर विद्यार्थ्यांच्या आत्मिक अभिवृद्धीसाठी मानसिक पार्श्वभूमी तयार व्हावी म्हणून प्राचीन शास्त्रकारांनी केवढे चिंतन केले होते, याची कल्पना येते. उदा:- अध्यापकाने बटु ब्रह्मचाऱ्याचा (विद्यार्थ्याचा) स्वीकार करते वेळी त्यांच्या हृदयाला आपला हात लाऊन अशी प्रार्थना करावयाची असे की "आम्हा उभयतामधें संपूर्ण व कायम सामंजस्य उत्पन्न होवो.[२०]" विद्यार्थी व अध्यापक यांचे नाते आर्थिक संबंधापलीकडे पवित्र भावनेने बांधले गेले असेल तरच परस्परांविषयी प्रेम व सहानुभूती उत्पन्न होऊन अंत:करणपूर्वक विद्येचे आदानप्रदान होऊ शकेल. मेधाजनन विधीतही बुद्धी व ग्रहणशक्ती यांच्या कुशाग्रतेसाठी दैवी शक्तीचे आवाहन केले जाई.[२१]

विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे हे सर्व संस्कार होत असत साधारणपणे वयाच्या ५ ते १० वर्षापर्यंतच, विभिन्न शास्त्रकारांनी ५, ७ वा ९ ही वर्षे उपनयनासाठी योग्य असल्याचे सांगितले आहे.[२२] सोळाव्या वर्षानंतर तर वेदाध्ययनाचा निषेधच केला आहे. कारण या वयानंतर इन्द्रियजन्य आकर्षणाकडे चित्त वेधले जाऊन गहन व गंभीर आध्यात्मिक अध्ययन कंटाळवाणे होते,[२३] हा अधुनिक मानसशास्त्रातील विचार त्या काळी भारतीयांना ज्ञात असावा.

ज्ञानाबद्दल अत्याधिक आदर

विविध संस्कारांनी प्राप्त झालेल्या अशा विधिवत ज्ञानांची महती प्राचीन काळी अनेक प्रकारे वर्णिली आहे. त्यातील काही दाखले उध्दृत केले तरी तत्कालीन समाजात ज्ञानाचा केवढा गौरव व मानसन्मान केला जात असे हे कळून येईल. मनू म्हणतो मानवाचें खरे वैभव त्याचे अध्यात्मयुक्त शिक्षणच होय. वय, संपत्ती किंवा वंश नव्हे.[२४]

गीतेत सुद्धा भगवंताने अध्यात्मज्ञान हेच नित्य असल्याचे नमूद केले आहे. अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम्।

एतज्ज्ञानामिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥११॥ अ. १३

अर्थ:– अध्यात्मज्ञानाचे नित्य अनुशीलन, तत्वज्ञानाच्या अर्थाचे (मोक्षाचे अथवा परमात्म्याचेच) आलोचन, ह्यांना 'ज्ञान' असे म्हणतात. ह्याहून जे विपरीत, ते अज्ञान होय.

जन्मत:च व्यक्तीवर येणारी जी तीन ऋणे फेडायची असतात त्यापैकी ऋषि ऋणातून मुक्त होण्यासाठी त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास हेच साधन सांगण्यांत आले आहे.[२५] "ब्राम्हणत्व मातापित्यामुळे निश्चित होत नसते, तर विद्वता हेच त्याचे गमक होय" असे मैत्रयणीय संहितेने स्पष्टपणे म्हटले आहे.[२६] तैत्तेरीय संहिता देखील या मताला आपली पुष्टी देते.[२७] इन्द्राने देवामध्ये मिळविलेले श्रेष्ठत्व हे त्याचे ब्रम्हचर्या श्रमात कमावलेल्या आध्यात्मिक शिक्षणाचेच फळ आहे, असें अथर्ववेदातील एका सूत्रात सांगितले आहे.[२८]

(२) प्राचीन आदर्श शिक्षण पद्धतीचा ऱ्हास

आदर्श शिक्षणाचा व समाजाचा अध:पात का ?

प्राचीन भारतीय शिक्षणाचे व त्यामुळे प्रस्थापित झालेल्या आदर्श समाजजीवनाचे वरील चित्र व तथाकथित प्रगत अशा अणुयुगातील विसाव्या शताब्दीतील सद्य:कालीन शैक्षणिक दुरवस्थेचे व तदुनषंगिक समाजाचे आजचे भेसूर चित्र यांत केवढा हा विरोध नि केवढी ही विसंगती ? तत्कालीन शिक्षण व समाज यात हे विपरीत परिवर्तन केव्हा व कसे झाले ? या प्रश्नाच्या तपशीलात जाण्याचे जरी आपणास काही कारण नसले तरी प्रामुख्याने मध्ययुगात झालेली मोगलांची पाशवी आक्रमणे व ब्रिटिशांनी स्वार्थप्रेरित भावनेने सुरू केलेली इंग्रजी शिक्षण पद्धती यामुळे सांप्रतची अवस्था प्राप्त झाली असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

मोंगलांचा शिक्षणावर अघोरी घाला

नालंदा व विक्रमशिला यांसारख्या आंतराष्ट्रीय विद्यापीठांचा संपूर्ण विध्वंस १२ व्या शताब्दीच्या मोंगल, अफगाण, पठाण इ. आक्रमकांकडून झाला. तेव्हापासून शिक्षणाच्या भारतीय परंपरेला उतरती कळाच लागली. महम्मद गझनीच्या आक्रमणानंतर तात्कालीन शिक्षणाच्या अवस्थेबद्दल लिहितांना अलबेरुनी म्हणतो,[२९]

"The present times are not of this kind; they are very opposite (because there is no royal support to learning) and therefore it is quite impossible that a new science or any new kind of research should arise in our days. What we have of sciences is but the scanty remains of bygone better times."

विद्वानांना पूर्वीचा बहुमान व मोबदला मिळेनासा झाल्यामुळे व्यासंगी विद्यार्थ्यांची शिक्षणाबद्दलची आस्था व चिकाटी कमी झाली असल्याचे १७व्या शतार्द्धीतील शिक्षणाविषयी बर्नियरने लिहिले आहे.[३०] बंगाल शिक्षण समितीचा अहवाल[३१] तर "मोंगलांचा विजय हा स्थानिक शिक्षण संस्थाना अत्यंत घातक ठरला नि टॉल्स वा पाठशाळा एकतर मृत्युपंथाला लागल्या आहेत किंवा कशाबशा तग धरून आहेत" असे सांगतो.

इंग्रज येईपर्यंत प्राचीन शिक्षणाचा आदर्श अस्तित्वात

कित्येक शतकांच्या अरब, मोगल इ. च्या अघोरी अत्याचारांना व आक्रमणांना सारखे तोंड द्यावे लागल्याने भारतीयांच्या प्राचीन शिक्षणाची मूर्तिमंत स्मारके असलेली प्रचंड विद्यापीठे व ग्रंथालये जवळजवळ नष्ट झाली असली, तरी भारतीयांच्या रक्तात भिनलेली अध्यात्मशिक्षणाविषयीची उत्कट आस्था व आदर हा रतिमात्रही कमी झाला नव्हता. प्राचीन भारतीय शिक्षणाचा शुद्ध स्त्रोत अखंडपणे एकोणिसाव्या शतार्द्धीच्या अखेरपर्यंत वाहतच होता. फक्त तो क्षीण झाला होता एवढेच! इंग्रजी अमलाच्या सुरवातीस अनुभवलेला पंजाबातील शिक्षणाविषयीचा आदर पाहून डॉ. लिट्नर[३२] म्हणतो,

"Respect for learning has always been the redeeming feature of the East..... Torn by invasion and civil war, it ever preserved and added to educational institutions. The most unscrupulous chief, the avaricious moneylender and even the freebooter vied with the small moneylender in making peace with his conscience by founding schools and rewarding the learned".

केवळ विद्या व विद्वान यांच्या विषयी अत्यंत आदर वसत होता व शिक्षणसंस्था स्थापन होत होत्या; एवढेच नव्हे तर प्राचीन शिक्षणाचे –मूलभूत अध्यात्म शिक्षणाचे–तत्व १९ व्या शताद्वीच्या अखेरीपर्यंत, कमी अधिक प्रमाणांत का होईना, पाठशाळांतून टिकून होते. मग त्याला नांव कोणते का असेना! डॉ. लिट्नर[३३] पुढे नमूद करतात,

"There was not a mosque, a temple, or a Dharmashala that had not a school attached to it to which the youth flocked chiefly for religious education. There were few wealthy men who did not entertain a Maulavi, a Pandit or a Guru to teach their sons, and along with them the sons of their friends and dependents. There were hundreds of religious men who gratuitously taught their coreligionalists and some times all comers for the sake of God".

ऑक्सफोर्ड विद्यापीठात अध्यासन

याप्रकारे अध्यात्मशिक्षणातून व्यावहारिक शिक्षण देतांना विभिन्न धर्मियात कलह होत नव्हते, दंगेधोपे होत नव्हते. उलट आस्तिकतेच्या धाग्याने सर्वजण एकत्र गुंफले जात. मोंगलाच्या काळात शिक्षण संस्थांच्या वाह्य स्वरुपाला जरी धक्का बसला असला तरी भारतीयांच्या अंत:करणातील स्वदेशाभिमान व स्वत्व या गोष्टी सुरक्षित होत्या. परंतु इंग्रज अमदानीत या गोष्टींना तडा जाईल, या धोरणानेच शिक्षणाची अंमलबजावणी केली गेली. या कुटील धोरणाचा थोडा पूर्वेतिहास पाहण्याजोगा आहे. किती दूरदृष्टीने व धूर्तपणे हे धोरण आखले होते याची त्यामुळे कल्पना येईल. या धोरणानुसार प्रथम हल्ला चढवायचे ठरले भारतीय संस्कृतीचा प्राण असलेल्या वेदांवर ! संस्कृतीचा मूलाधार असलेल्या वेदांविषयीची भारतीयांची श्रध्दा भ्रष्ट करण्यासाठी १५ ऑगष्ट १८११ रोजी कर्नल बोडन याने ऑक्सफोर्ड विद्यापीठाला मोठी देणगी देऊन एक अध्यासन *(Chair)* स्थापन केले. त्याचे कार्य प्रो. मोनिअर विल्यम यांजकडे सोपविण्यात आले. इंग्रजांना भारतीयांचे धर्मांतर करून ख्रिश्चन करता येईल अशा रीतीने भारतीय धर्मग्रंथांचा अनुवाद

करणे हा उद्देश या अध्यासनाचा असल्याचे श्री. विल्यम यांनी स्पष्ट नमूद केले आहे.[२४] त्याप्रमाणे, इ. स. १८११ पासून ऑक्सफोर्ड विद्यापीठात प्रथम इंग्रज विद्यार्थ्यांना प्राचीन भारतीय साहित्याचे शिक्षण देणे सुरु झाले.

मेकॉले – मॅक्समुल्लर संगनमत

पुढे १८३४ साली, पाद्री कुटुंबात जन्म घेतलेल्या मेकॉलेची भारतात प्रथम कायदेशीर सल्लागार (*Legal advisor to the council of India*) म्हणून व नंतर भारतीय शिक्षण मंडळाचे प्रधान म्हणून नेमणूक झाल्यावर त्याने सर्व प्रांतात हिंडून मनाशी पुढची योजना ठरविली. डिसेंबर १८५४ मध्ये मेकॉले यांची मॅक्समुल्लरशी भेट झाल्यावर अनेक तास चर्चा करुन कार्यक्रमाची पुढील दिशा ठरली. त्यानुसार १८५५ साली मॅक्समुल्लरने मेकॉलेच्या सूचनेनुसार वेदांच्या भाषांतराचे काम हाती घेतले. १८५५ ते १९०० या प्रदिर्घ कालात त्याने प्रचंड कार्य केले हे निःसंशय ! पण या अनुवादाचा उद्देश वेदाविषयी विकृती उत्पन्न करण्याचा होता हे त्यावेळी कुणाच्या ध्यानात आले नाही. १८६६ साली आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रात मॅक्समुल्लर स्पष्ट म्हणतो की,[२५]

" I feel convinced, though I shall not live to see it, that this edition of mine and the translation of veda will hereafter tell to a great extent on the fate of India and on the growth of millions of the souls in that country. It is the root of their religion and to show them what the root is, is I feel sure, the only way of uprooting all that has sprung from it during the last 3000 years.

'मधु तिष्टति जिव्हाग्रे, हृदये तु हलाहलम' या सुभाषिताप्रमाणे भारतीय ग्रंथांच्या व्यासंगाचा मॅक्समुल्लरचा असलेला आंतरहेतू इतरही अनेक पत्रातून व्यक्त झाला आहे.[२६] एका ठिकाणी त्यांच्या अंतःकरणातील मनीषा प्रकट झाली ती अशी,[२७]

" India has been. conqured once, but India must be conqured again and that conquest should be conquest by education."

इंग्रजी शिक्षणाने भारतीय देहात इंग्रजी मन

याप्रमाणे शिक्षणाद्वारे भारतीयावर विजय प्राप्त करण्यास बनारस व लाहोर येथे केन्द्रे उघडली गेली. या संस्थाद्वारा पाश्चात्य विचारधारा प्रसृत करण्यासाठी बनारस येथे श्री. टी. एच. ग्रिफिथ व लाहोर येथील ओरिएन्टल कॉलेजमध्ये श्री. ए. सी. वुलनर यांच्या प्राचार्य म्हणून नेमणूका केल्या गेल्या. विद्यार्थ्यांना हे दोन्ही प्राचार्य ऑक्सफोर्ड येथे निश्चित केलेल्या पाठ्यक्रमानुसार वेद स्वत. शिकवित असत. या महाविद्यालयात संस्कृतमध्ये एम.ए. चो उपाधि घेतलेल्या बुध्दिमान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन ऑक्सफोर्ड येथे पाठविले जाई व तेथील गौरांग महाप्रभूकडून(?) विद्याग्रहण करून आलेल्या विद्वानांना भारतात सर्वत्र प्राचार्य व प्राध्यापक म्हणून नेमण्याचा उपक्रम सुरू झाला.[३८] पाहता पाहता देशभर पाश्चात्यांच्या बौध्दिक दास्यात धन्यता मानणाऱ्या आत्मविस्मृत सुशिक्षितांचा वर्ग सर्वत्र दिसू लागला. ब्रिटिशांचे अधिराज्य स्थिरावल्यापासून मेकॉले योजनेप्रमाणे 'भारतीय देहात इंग्रजी मन' उत्पन्न होईल असे शिक्षण संपूर्ण देशांत सुमारे दीड शतक सर्वत्र रुढ झाले! त्यानेच देशाची खरी हानी झाली.

लॉर्ड मेकॉलेची कुटिल नीती

लॉर्ड मेकॉलेने आपल्या शिक्षणपद्धतीचा उद्देश काही लपवून ठेवला नव्हता. विजेते राष्ट्र जित राष्ट्रातील जनतेविषयी जी भावना व्यक्त करते, तिचेच प्रतिबिंब त्यांच्या शिक्षणविषयक धोरणात पडल्यास आश्चर्य नाही. मेकॉलेने[३९] आपल्या वडिलांना कलकत्याहून लिहिलेल्या पत्रातील खालील उतारा मोठा असला तरी देण्याचा मोह आवरू नये इतका तो बोलका आहे.

"Our English Schools are flourishing wonderfully. The effect of this education on the Hindoos is prodigious. No Hindu, who has received an English education,

even remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy; but many profess themselves pure Deists, and some embrass Christianity. It is my firm belief that, if our plans of education are followed up, there will not be a single idolator among the respectable classes of Bengal 30 years hence..... I heartily rejoice in this prospect.''

मानसिक गुलामगिरीचे शिक्षण

अशा प्रकारे शक, हूण, मोंगल, अफगाण, पठाण इ. विजेत्यांना शेकडो वर्षे सत्ता गाजवूनही जे साध्य झाले नव्हते, ते मानसिक व वैचारिक दास्य इंग्रजांनी कुटिलपणाने शिक्षणाद्वारे भारतीयात उत्पन्न केले. भारतीय ते ते सर्व त्याज्य व पाश्चात्य तें ते सर्व ग्राह्य, अशी मनोवृत्ती सर्वदूर पसरली.[१०] पोषाखापासून तो आचारापर्यन्त सर्वच बाबतीत परानुकरणात सुशिक्षितांना धन्यता वाटू लागली. आपले राज्य चालविण्यासाठी नौकर पेशात आनंद मानणारे कारकून तयार करण्यापुरतेच हे शिक्षण उपयोगी आहे, हे कुणाच्या ध्यानात आले नाही. एका इंग्रज अधिकाऱ्याने आरऱ्याच्या एका पाद्रयाला[११] या संदर्भात दिलेले उत्तर लक्षात घेण्याजोगे आहे. तो म्हणतो,

"Mistake to educate the blighters but one must have a supply of clerks to run the blasted country, must not one?"

आध्यात्मिक मूल्यांची शिक्षणातून उचलबांगडी

आज अस्तित्वात असलेली शिक्षण पद्धती इंग्रजांनी स्वत:च्या अधिशासनाला बळकटी आणावी व आमचा स्वाभिमान नष्ट व्हावा या उद्देशाने आखली होती.[१२] १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाने धास्ती घेतलेल्या इंग्रजांनी "धर्मात आम्हाला ढवळाढवळ करायची नाही" असा वरपांगी देखावा करीत करीत नव्या पिढीला या नव्या शिक्षणाद्वारे चारित्र्यहीन बनविले. नैतिक व आध्यामिक मूल्यांना तथाकथित सुशिक्षित पारखे होऊ लागले.

आमची अनैतिक-शिश्नोदरपरायण वृत्ती वाढू लागली. आमच्यातील आध्यात्मिक–नैतिक मूल्यांचा हळूहळू ऱ्हास होत जाऊन, आम्ही मानसिक व वैचारिक दास्याने जखडले गेलो ! आमच्या अत:करणातील पूर्वजांच्या आध्यात्मिक ज्ञानाचा झरा आटू लागला. मन हाच आत्मा, देह हाच आत्मा, असे मानून आम्ही जडवादी बनत गेलो. पाश्चात्यांच्या भौतिक, यांत्रिक प्रगतीने आम्ही संभ्रमात पडलो व आमचे अध्यात्म खरे ? की हे जे दिसते ते खरे ? असा आम्हाला भ्रम झाला. आमची श्रुति–माता आम्हाला सांगत होती, "यद्दृष्टं तन्नष्टं" जे दिसते ते विनाशी आहे! जे अविनाशी आहे तोच आत्मा होय. पण आमचा हा 'आत्मानात्म' विवेकच मुळी पाश्चात्य अविद्येने नष्ट झाला.

"विवेक भ्रष्टानां भवति विनिपात: शतमुख:" (भर्तृहारि नीति शतक; श्लोक १०) ह्या सुभाषितानुसार आम्ही वैचारिक दास्यपंकात खोल रुतून बसलो. अशा ह्या अवस्थेत 'इदंच नास्ति परंच न लभ्यते' अशी आमची करुणाजनक स्थिती झाली. परिणामत: आमच्यातील सात्विकतेचा, अध्यात्म ज्ञानाचा ऱ्हास व तमोगुणाचा उद्भव आज सर्वत्र झालेला दिसत आहे.

घातक शिक्षण पोषक असल्याचा भ्रम

बळीचे द्वारी द्वारपाल झालेल्या विष्णूप्रमाणे आम्ही आजवर अनेक परकीय राज्यांची प्रसंगोपात्त एकनिष्ट सेवा केली तरीही आम्ही स्वत्वाला, आमच्या अध्यात्म तत्वाला, विसरलो नव्हतो. आपध्दर्म म्हणून परसत्तेचे जू आम्ही खांद्यावर वागविले होते. शारीरिक दास्य स्वीकारले तरी कुणाच्याही वैचारिक दास्याने आम्ही आजवर बांधले गेलो नव्हतो. पण इंग्रजांच्या कुटिल नीतीमुळे–की अनीतीमुळे?–मात्र आम्ही वैचारिक गुलामगिरीत स्वातंत्रप्राप्तीनंतरही अद्याप रखडत आहोत. आश्चर्य म्हणजे या इंग्रजी काव्याला आम्ही एवढे फसलो की या शिक्षणाला आम्ही "वाघिणीचे दूध" म्हणून संबोधू लागलो. तत्कालीन कांही सुधारकांनी तर इंग्रजी राज्य हे वरदानाप्रमाणे मानले. स्वत्व न विसरता नाईलाजास्तव जबरदस्तीने लादलेली अनिष्ट गोष्ट पत्करणे हे वेगळे; पण आत्मघातकी अशी गोष्ट स्वहिताची आहे या कल्पनेने कवटाळणे हा

केवढा भ्रम! पण दुर्दैवाने अनेक भारतीयांना तो झाला होता हे मात्र खरे! "स्मृतिभ्रंशाद्बुध्दि नाशो बुध्दिनाशात्प्रणश्यति," हेच त्याचे फलित दुसरे काय ?

भारतीय द्रष्ट्यांचे अचूक दोषदिग्दर्शन

अर्थात असा भ्रम कांही सर्वांनाच झाला नव्हता. दूरदृष्टी असलेल्या द्रष्ट्या समाज धुरिणांनी ब्रिटिशांचा या शिक्षणा मागील शुध्द स्वार्थी हेतू जाणला होता; त्यांना या शिक्षणाचा फोलपणा कळला होता; त्यांचे संभाव्य दुष्परिणाम त्यांच्या लक्षात आले होते. स्वामी विवेकानंदांनी[२] या संदर्भात काढलेले उद्गार पाहिले की वर उल्लेखिलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांचा आंतरिक हेतू त्यांनी किती यथार्थपणे हेरला होता हे पाहून आश्चर्य वाटते. ते म्हणतात,

" The present system is nothing but a perfect machine for turning out clerks. I would even thank my stars if they were all. But no, see how men are becoming destitute of Shraddha and faith. They assert that the Gita was only an interpretation and that the vedas were but rustic songs."

आधुनिक शिक्षणात अनुस्यूत असलेल्या काही चांगल्या गोष्टींची त्यांना जाणीव नव्हती असे नाही, पण त्या सोबत येणाऱ्या अनिष्ट गोष्टी त्यांना एवढ्या भयंकर वाटत होत्या की त्यापुढे या चांगल्या बाबींचे मोल त्यांना वाटत नव्हते. इंग्रजी शिक्षण नकारात्मक असून माणूस घडविणारे नव्हते हा त्यांचा मुख्य आक्षेप. ते पुढे म्हणतात,[३]

" In the first place, it is not a man-making education it is merely and entirely a negative education.... Nothing positive has been taught to us; we do not even know how to use our hands and feet".

थिऑसॉफीच्या प्रणेत्या व जगप्रसिध्द आग्ल विदुषी डॉ. ॲनी बेझंट यांनी देखील इंग्रजी शिक्षणातील दोष नेमका हेरला होता. या

शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचे शारीरिक व भावनिक विकसन उच्च कार्यक्षमतेची पातळी तर गाठू शकलेच नाही, पण विशेष म्हणजे आध्यात्मिक भावनांच्या आविष्काराकडे या शिक्षणाने दुर्लक्ष केले असे त्या म्हणत.[१५]

"Modern Education in India has practically confined itself to the training of the mental and intellectual nature and has ignored the unfolding of the spiritual nature."

अशा प्रकारे केवळ बौध्दिक शिक्षणावरच लक्ष केंद्रित केल्याने गुरुवर्य रवीन्द्रनाथ टागोरांनी[१६]

" The modern school is a factory specially designed for grinding out uniform results."

असे उद्‌गार आधुनिक शिक्षणाविषयी काढले. डॉ. कुमारस्वामी यांनी प्राचीन भारतात विकसित झालेली कला, विज्ञान, धर्म, संगीत शिल्पशास्त्र इ. सर्व पैतृक धनाची आधुनिक शिक्षणाने कशी वासलात लावली याचे कुणाही देशभक्ताला व्यथित करणारे चित्र रेखाटले आहे. ते म्हणतात,[१७]

" (Modern Education).....has succeeded in driving art to museum and picture – galleries, knowledge into libraries and bookstalls, religions to Sundays and scriptures, and music into gramophones and concert halls. The progress of India is not so much in human souls as in bluebooks."

लोकनेत्यांचे राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग

आत्मविस्मृतीच्या गर्तेत लोटणारे हे जे शिक्षण ब्रिटिशांच्या राज्यात सुरू होते त्याला आव्हान देऊन त्यातील दुष्परिणाम दूर करण्याच्या हेतूंनी काही नेत्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. लोकमान्य टिळकांची पुण्याची 'राष्ट्रीय शिक्षण संस्था,' महात्मा गांधींची 'वर्धा बेसिक शिक्षण योजना,' अँनी बेझंट यांची बनारस येथे 'सेन्ट्रल हिन्दू स्कूल्स'ची स्थापना, रवीन्द्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतन येथे स्थापिलेले 'विश्वभारती विद्यापीठ', स्वामी दयानंद यांनी प्राचीन गुरुकुलाच्या आदर्शानुसार चालविलेले 'कांगडी विश्वविद्यालय' इ. लहानमोठे

प्रयत्न, देशभर १९१० ते १९४० या अल्पकालखंडात सर्वत्र झाले.[१८] देशाभिमान व देशप्रीतीचे बाळकडू देणाऱ्या 'राष्ट्रीय शिक्षणाची' नांदी अनेक पक्षोपपक्षांनी फिरवली. अनेक प्रांतात 'राष्ट्रीय शिक्षण संस्था' अस्तित्वात आल्या व भावी पिढीला स्वदेशप्रेमाचे व स्वाभिमानाचे धडे देण्याचा प्रयत्न केला गेला; पण अपेक्षेप्रमाणे तो यशस्वी होऊ शकला नाही. याची मुख्य कारणे तीन.

राष्ट्रीय शिक्षण अयशस्वी का ?

एक तर वरील सर्व पुढारी एकत्र येऊन एकाच वेळी प्रयत्न होणे शक्य नव्हते. कारण प्रत्येकाचा देशसेवेसाठी अर्पिलेला कार्यकाल वेगवेगळा होता. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रयत्नाला सामूहिक उठाव मिळाला नाही. दुसरे म्हणजे प्रामुख्याने स्वराज्याचे वा अन्य प्रकारच्या राष्ट्रीय जागृतीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर असल्याने भारतातील या नेत्यांना आपली सर्व शक्ती या कार्यासाठी खर्च करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे शिक्षणाला स्वाभाविकच काहीसे गौणत्व आले. जनतेत पुरेशा जागृतीचा अभाव, तळमळीच्या ध्येयवादी शिक्षकांची उणीव, इंग्रजी शिक्षणाचे मोहक आकर्षण व पैशाची टंचाई इ. विविध प्रकारची प्रतिकूलता, हे तिसरे कारण या संदर्भात पंजाब केसरी लाला लजपतराय[१९] यांनी राष्ट्रीय शिक्षणाची जी तत्कालीन अवस्था वर्णिली आहे ती पुरेशी बोलकी आहे.

"The National Council of Education still existed but only in name. Its condition is moribund..... The nationalist schools, started by the council, have most of them, been disintegrated by the force of circumstances."

राष्ट्रीय शिक्षणाचे राष्ट्रीय नेत्यांनी केलेले प्रयत्न अशा रीतीने अनेक कारणांनी अयशस्वी झाल्यामुळे इंग्रजी शिक्षणाचे दुष्परिणाम टाळता आले नाहीत. जे शिक्षण भारतीयांनी अखंड एक शतक घेतले ते होते कसे ? म. गांधी[२०] कडवटपणे त्याचे वर्णन करतांना म्हणतात,

"It is sinful to receive any education under the control of the present Government, no matter how high its quality may be, even as it would be to take the richest milk when it is tainted with poision."

विषयुक्त असे हे शिक्षणाचे दुग्धपान अव्याहतपणे केल्यावर भारतीय पिढी निर्बल, नि:सत्व व निस्तेज झाली तर आश्चर्य कोणते? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र दोषपूर्ण अशा ह्या इंग्रजी शिक्षणप्रणालीची पुनर्रचना होईल अशी स्वाभाविकच सर्वांची अटकळ होती. पण प्रत्यक्षात तसे कांही घडले का ?

(३) स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही शिक्षणाची दुर्दैवी आबाळ

बालकांची जीवनपुष्पे उमलण्याऐवजी कोमेजली

१९४७ साली स्वातंत्र्यसूर्य उगवल्यानंतर भारतीय अस्मितारुपी कोवळ्या सोनेरी किरणाचे पावन स्नान खऱ्या अर्थानें घडण्याचे भाग्य जर कुणाला लाभणार असेल, तर ते प्रामुख्याने त्यावेळी शैशव वा किशोर अवस्थेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या वाटचाला येईल, अशी सर्वांची अपेक्षा होती. कारण उगवत्या स्वातंत्र्य सूर्याबरोबरच ही बाल्यावस्थेतील भारतीय जीवनपुष्पे स्वतंत्र राष्ट्राच्या स्वतंत्र वातावरणात उमलणार होती. अनेक वर्षांपासून पारतंत्र्यातील गुलामगिरीचे संस्कार रुजलेल्या वयस्कांवर, त्याचा फारसा परिणाम होण्याचा संभव नव्हता. सारी अपेक्षा होती ती नव्या पिढीकडून ! मातृभूमिच्या पुनर्निमाणाचे कार्य अपेक्षित होते, ते नवोदित बालकांच्या प्रेरणेतून! आणि हे सर्व होऊ शकले असते नवचैतन्य प्रदान करण्याचे सामर्थ्य असलेल्या नव्या शिक्षण-पद्धतीतून !

भारतीय जीवनप्रणाली व राष्ट्रीय विकासाची दिशा प्रतिबिंबित होईल अशी शिक्षणपद्धती आखण्याचे प्रयत्न, स्वातंत्र्य मिळताक्षणीच सुरु होतील अशी बहुतेकांची भावना होती. ही रास्त अपेक्षा पूर्ण झाली असती तर नव्या उमेदीने, उल्हासाने नि उत्कट देशप्रीतीने रसरसलेली तरुण पिढी उदयाला आली असती. हजारो, लाखो नवयुवक उत्स्फूर्तपणे मातृभूमीची दैन्यावस्था दूर करून स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी अहमहमिकेने पुढे सरसावले असते. तरुण रक्ताची ही प्रचंड शक्ती आजच्या पंचवार्षिक योजनेसारख्या कैक योजना यशस्वी करून वेदान्तातल्या ब्रह्माप्रमाणे पुन्हा दशांगुळे उरली असती. भारतीय धारणा नि संस्कृती यांच्या भरभक्कम आधारावर

उभारलेल्या शिक्षापद्धतीतून बुद्धि-वैभवाने नळपणारी नि सात्विक बलाने सर्वांना दिपवणारी अशी तेजस्वी तरूण पिढी बाहेर पडली असती की' जगाच्या पाठीवर असलेल्या कोणत्याही पाशवी शक्तीने भारत मातेकडे वाकडचा नजरेने दृष्टी टाकण्याचे धाडस केले नसते. खऱ्या अर्थाने सुशिक्षित युवकांच्या एका पिढीनेच भारताचे संपूर्ण मानचित्र पार बदलून टाकले असते."

इस्त्रायलचे तेजस्वी उदाहरण

महायुद्धात वेचिराख झालेल्या जर्मनी, जपान, इंग्लंड इत्यादी राष्ट्रांचा इतिहास काय सांगतो ? केवळ १५–२० वर्षांच्या कालखंडात ही सर्व राष्ट्रे केवळ स्वावलंबीच नव्हे तर 'प्रचंड शक्तिमान राष्ट्रे' म्हणून नव्या तेजाने जगाच्या नभोमंडळात पुनश्च तळपू लागली इस्त्रायलचे अगदी ताजे उदाहरण तर खरोखरी कुणालाही थक्क करणारे आहे. भारताबरोबरच सुमारे २००० वर्षांनी हे पुरातन राष्ट्र स्थापन झाले. नि काय आश्चर्य ! आपल्या मरूभूमिचे त्यांनी सुपीक जमिनीत रुपांतर केले. परभाषेचे दास्य झुगारुन मृत अशा हिब्रू भाषेचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. राष्ट्रीय शिक्षणाची विचारपूर्वक घडी बसविली. केवळ २५ लाखांच्या या चिमुकल्या राष्ट्राने १० अरब राष्ट्रांना युद्धात परास्त करण्याचा विक्रम केला नि हे सर्व घडले केवळ सुमारे दोन दशकांच्या अल्पावधीत ! विस्मयाने तोंडात बोटे घालावीत असा हा चमत्कार आहे ! स्वातंत्र्याची संधी उपलब्ध होताच संपूर्ण शक्ती पणाला लावून एखादे राष्ट्र कसे वैभवाला नेता येते, याचा हा जिवंत दाखला आहे. आणि लोकसंख्या, क्षेत्रफळ, नैसर्गिक साधनसंपत्ती इ. सर्वच बाबतीत इस्त्रायलपेक्षा अधिक श्रेष्ठ असलेले आपण, एवढ्याच कालावधीत काय करु शकलो ? सर्वांनाच ज्ञात असलेले या प्रश्नाचे उत्तर इतके दु:खद व उद्वेगजनक आहे की त्याचा पुनरुच्चार करावासा वाटत नाही !

या अनुकंपनीय स्थितीचे एक मुख्य कारण आपण शिक्षणाच्या पुनर्रचनेची केलेली आत्यंतिक आबाळ होय! आदर्श अशा शिक्षणाच्या प्रसारामुळे अन्नधान्याचा, भारतीय एकात्मतेचा, संरक्षणाचा वा इतर

कोणताही प्रश्न एकतर उद्‌भवलाच नसता नि जर थोडा बहुत उपस्थित झाला असता तर त्या नव्या पिढीने तो इतक्या सहजपणे सोडविला असता की, आजचे या प्रश्नाचे उग्र स्वरुप आपणास केव्हाच जाणवले नसते.

स्वातंत्र्यात पहिला श्वास घेण्याचे अहोभाग्य–पण ?

परंतु दुर्दैवाने तसे काहीही स्वातंत्र्योत्तर काळात घडले नाही ! गेल्या २६ जानेवारी १९६९ रोजी साजऱ्या झालेल्या गणराज्य दिनाच्या सोहळ्याच्या वेळी हे विशेष प्रकर्षाने जाणवले. कारण त्या दिवशी स्वातंत्र्य मिळून २२ वर्षे पूर्ण होत होती. १५ ऑगस्ट १९४७ नंतरच्या पहिल्या वर्षात ज्या भाग्यवान बालकांनी स्वतंत्र भारतात जन्म घेतला, त्या सर्वांच्या वयाला २१ वर्षे पूर्ण झाल्यामुळे त्यांना नागरिकत्व प्राप्त झाले होते. गेल्या कित्येक पिढ्यांना न लाभलेले, 'स्वतंत्र' म्हणून जीवनातला पहिला श्वास घेण्याचे भाग्य लाभलेल्या या तरुणांचा सत्कार त्या दिवशी शासनातर्फे केला गेला आणि या भाग्यवान युवकांचा सत्कार औचित्याला धरुनच होता, हे निःसंशय ! पण पारतंत्र्यात जन्मलेल्या आर्धांच्या पिढीतील तरुणात नि या तरुणात लक्षात घेण्याजोगा काय फरक होता ? स्वतंत्र देशात जोपासला गेलेला हा तरुण पूर्वीच्या तरुणापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळा होता ? या प्रश्नाचे उत्तर निराशाजनकच द्यावे लागेल ! स्वातंत्र्याचा उपभोग जन्मापासून घेतलेला हा तरुण शरीर, मन, बुद्धी या सर्वांच्या बाबतीत, तुलनाच केली तर, पूर्वीच्या पिढ्यांच्या मानाने एक पाऊल बहुधा मागेच आढळेल ! याचे एक कारण इंग्रजी गुलामगिरीतील शिक्षण पद्धतीत, स्वतंत्र राष्ट्राकडून अपेक्षित असलेला, कसलाच फरक केला नाही, हे होय !

विकास योजनेत शिक्षणाला गौणत्व

शिक्षणपध्दतीचे राष्ट्रजीवनात असलेले महत्व ओळखून आदर्श शिक्षणप्रणालीचे नियोजन करण्यासाठी लागणारे, द्रष्टे पुढारीपण भारताला हवे तसे लाभले नाही असे म्हणणें क्रमप्राप्त आहे. देशाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाचे असलेले अनन्यसाधारण स्थान दृष्टीआड झाले. वाह्यतः अनुत्पादक वाटणारी परंतु गुंतविलेली शक्ती व भांडवल शेकडो पटीने परत करणारी शिक्षण ही बाब शुध्द आर्थिक दृष्टीने

सुध्दा लाभदायक ठरते हे आपण विसरलो. गेल्या तिन्ही पंचवार्षिक योजनेत शिक्षणावर खर्च केलेल्या शेकडा प्रमाणावर जरी आपण नजर टाकली तरी देशविकासाच्या कार्यक्रमात या प्रमुख बाबीला आपण कोणते नि कितवे स्थान दिले हे आपणास सहज कळू शकेल. वस्तुत: अन्नधान्य नि संरक्षण यांच्या पाठोपाठ तिसरा अग्रक्रम शिक्षण या बाबीला मिळायला हवा होता. परंतु वस्तुस्थिती काय आहे? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण ज्या तीन पंचवार्षिक योजना अमलात आणल्या, त्या-मध्ये 'शिक्षण' या बाबीवर आपण किती रक्कम खर्च केली? एकूण खर्चाच्या किती टक्के खर्च आपण भावी पिढ्यांच्या शिक्षणाकरता राखून ठेवला? खालील तक्त्यावरुन हे प्रमाण किती अल्प आहे हे स्पष्ट होईल..

अ. नं.	योजना	एकूण खर्च (कोटी रु.)	शिक्षणावरील खर्च (कोटी रु.)	शेकडा प्रमाण
१	प्रथम	१९६०	१३३	६.७८%
२	द्वितीय	४६००	२०८	४.५२%
३	तृतीय	७५००	४१८	५.५६%

प्रथम, द्वितीय व तृतीय पंचवार्षिक योजनेत आपण शिक्षणाला अनुक्रमे ६ वे, ५ वे व ७ वे स्थान दिले. यावरुनच या प्रश्नाची आपण केवढी घोर उपेक्षा केली, हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे.

Better build schoolrooms for "the Boy"
Than cells and gibbets for "the Man"

या श्री. कुक[५२] यांच्या वचनाची आठवण व्हावी असा या उपेक्षेचा दुष्परिणाम आज सर्वत्र दिसू लागला आहे.

इतर उद्योगांच्या तुलनेने प्रचंड व्याप

एवढी आबाळ होऊनही शिक्षणाचा आज जो व्याप भारतात आहे तो देखील, विविध व्यवसायात गुंतलेल्या भांडवल व व्यक्ती यांची

तुलना केली असता, फार प्रचंड आहे हे विसरुन चालणार नाही. शिक्षण क्षेत्रासाठी व्यापलेल्या जमिनीची किंमत वगळून देखील शिक्षणा-साठी गुंतलेल्या भांडवलाचे अनुमान अंदाजे ६००० कोटी रु. चे लावले जाते. वार्षिक आवर्ती परिव्यय *(Annual recurring costs)* सुमारे ६००० कोटी रु. चे असावे. १९५० ते १९६५ या कालखंडात राष्ट्रीय उत्पन्न २१० टक्यांनी वाढले पण याच काळात झालेला शैक्षणिक खर्च ४९१ टक्यांनी वाढला. सुमारे १९८५ पर्यन्त म्हणजे आणखी सुमारे २५ वर्षांनी शिक्षणावरील वार्षिक खर्च निदान ४००० कोटी रु. पर्यन्त व एकूण भांडवली गुंतवणूक ४०,००० कोटी रु. पर्यन्त होईल असा अंदाज आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येतही अशीच प्रचंड वाढ गेल्या १५ वर्षांच्या योजना काळात झाली आहे. १९५०–५१ साली असलेली २४,१०८ विद्यार्थ्यांची संख्या १९६५ – ६६ साली ७०,०३१ पर्यन्त पोचली.[५३] शिक्षणक्षेत्रात या ना त्या प्रकारे कार्य करुन उपजीविका करणाऱ्यांची संख्या तर याहून विस्मयजनक आहे. आज एकूण शिक्षकांची संख्या २१ लाखावर गेली आहे व नांव नोंदवलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जाते ७ कोटीच्या वर. १९८५ सालापर्यन्त हे आकडे अनुक्रमे ८० लाख व १७ कोटी पर्यन्त जातील असे अनुमान आहे.[५४]

संख्यावाढ म्हणजे सुधारणा नव्हे

याप्रमाणे गुंतलेले प्रचंड भांडवल व विद्यार्थ्यांची व प्राध्यापकांची वाढती संख्या याकडे कदाचित शिक्षणाची प्रगती म्हणून कुणी अंगुलीनिर्देश करील. परंतु ही झालेली केवळ संख्यावाढ *(Improvement in Quantity)* गुणवृद्धी *(Qualitative imporvement)* नव्हे ! ही झाली इमारतीच्या खोल्यांची वाढ; इमारतीच्या मजबुतीत किंवा सौंदर्यात पडलेली भर नव्हे! सुप्रसिद्ध शिक्षण तज्ञ श्री. जे. पी. नाईक[५५] यांनीही नियोजनातील हा दोष निःसंदिग्धपणे मान्य केला आहे. ते एका विस्तृत लेखात स्पष्टच म्हणतात,

" an educational system that is inappropriate or unsuited to national needs can become a great impediment to progress and may even take the country down-hill. Equally

uvgcnt is the need to rise standards in education because the progress of country depends ultimately upon the quality of men and women who came out of the schools and colleges.

.... But unfortunately both these programmes received a lower priority and this has been the major weakness of our planning,"

प्रथम, द्वितीय व तृतीय पंचवार्षिक योजनेमध्ये शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमाची *(Programme for Educational Development in First, Second & Third Five Year Plans)* जी रुपरेषा ग्रंथित केली आहे[५६] त्यावर आपण नजर टाकली तरी भावी पिढ्यांच्या गुणवत्तेच्या विकासाची आपण केवढी घोर उपेक्षा केली आहे हे चटकन डोळ्यात भरल्याशिवाय रहात नाही. पहिल्या योजनेत तर सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्र उल्लेख देखील नाही. दुसऱ्या व तिसऱ्या योजनेत त्याची आठवण आपल्या नियोजनकारांना झाली आहे. पण या योजनांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाखाली केवळ संगीत, नाटक व नृत्य इ. बाबींचा विचार प्रामुख्याने झाला आहे. तिसऱ्या योजनेच्या 'राष्ट्रीय एकात्मता' या शीर्षकाखाली नैतिक व सामाजिक मूल्यांचा ओझरता उल्लेख आहे. 'चारित्र्य निर्मितीसाठी' कोणतेही खास प्रयत्न मुद्दाम करण्याची दुर्दैवाने कुणाला आजवर गरजच वाटली नाही.

नाही म्हणायला काही शिक्षण समित्या केन्द्रीय व राज्य सरकारांनी स्थापन केल्या. परंतु पृष्टांचे अहवाल सादर करण्यापलीकडे शिक्षणाची सुधारणा होण्याच्या दृष्टीनें असा त्यांचा काही उपयोग होऊ शकला नाही. गुणांची उपेक्षा करून केवळ शिक्षणप्रसारावर शासनाचे लक्ष केन्द्रित झाल्याने भारतीय विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी होण्यातच त्याचा परिणाम झाला. सर्वत्र विद्यार्थीवर्गाच्या अध:पतनाचे दृष्य आज जे पदोपदी अनुभवावयास मिळते त्याचे अंशत:कारण हेच तर नव्हे ?

स्वातंत्र्यात विद्यार्थ्यांचे अध:पतन

गेल्या पाव शतकाच्या स्वातंत्र्यकाळात विद्यार्थ्यांनी देशभर घातलेल्या बेशिस्त गोंधळाचा, त्यामुळे आर्थिक व अभ्यासदृष्टया झालेल्या

हानीचा नि नंतर लाठीचार्जं व गोळीबाराला बळी पडलेल्या विद्यार्थ्यांचा जर एखाद्या जिज्ञासू अभ्यासकाने साग्र माहिती मिळवून प्रबंध लिहिला, तर ती शिक्षण क्षेत्रातील काळा इतिहास वाचून कुणालाही शरमेने खाली मान घालावी लागेल. ओरिसा सरकारची विधानसभा ताब्यात घेण्यापासून तो तहत परीक्षेत अयोग्य मार्गाचा अवलंब केल्याबद्दल ज्या परीक्षकाने पकडले त्याला चोपून काढण्यापर्यन्त, शेकडो अनिष्ट घटनांचा दु:खद चित्रपट थोडी स्मृती चाळविली तरी मन:चक्षूसमोरुन सरकू लागतो.

अंत:करण अस्वस्थ करणाऱ्या घटना पदोपदी अनुभवावयास येतात. आज काय तर, एका हायस्कूल मधला विद्यार्थी मधल्या सुटीत शाळे-बाहेर पडला, तो नट होण्याच्या इर्षेने थेट मुंबईला गेला. तर उद्या, दुसऱ्या शाळेतील एका वर्गातील सर्व विद्यार्थी तासाला बुट्टी देऊन सामुहिक रीत्या मॅटिनी-शो पाहण्यास गेल्याचे कानावर येते. तर तिसऱ्या ठिकाणी मुलींना अत्यंत अश्लील भाषेत लिहलेली पत्रे येतात. किशोरावस्थेत शाळेच्या जगात वाबरत असतांना, असली अपवादात्मक एक दोन नव्हे तर, नित्याची होऊन बसलेली ही उदाहरणे पाहून मन भयभीत झाल्याशिवाय रहात नाही.

श्री. राधेशरणजी माथूर यांनी शासकीय उच्च माध्यमिक विद्यालय, कमोल (उदयपूर) येथील विद्यार्थ्यांच्या दैनिक जीवनात नैतिक व्यव-हाराच्या पाहणीचा अहवाल,[७] किशोरावस्थेतील मुलांचा खालावलेला दर्जा स्पष्ट दर्शवितो. १९५९ ते १९६५ या कालावधीत केवळ विद्या-पीठाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या संपाची संख्या १२३७ पर्यन्त पोचते,[८] हे कशाचे निदर्शक मानायचे ? " रोज मरे त्याला कोण रडे " या उक्तिप्रमाणे रोजच कानावर येणाऱ्या त्या बातम्यांबद्दल आज कुणाला कांही वाटेनासे झाले आहे ! या अपक्व अवस्थेतच अशा कुसंस्काराने विद्यार्थी बेछूट होत असतील तर त्यांच्या भावी आयुष्याचे भविष्य नष्टचर्य हेच नव्हे काय ?

शिक्षण समस्यांची समस्या !

चिरकाल वाट पाहून भव्य स्वप्न नि आशा आकांक्षा उराशी बाळगून सायासाने मिळालेल्या या स्वातंत्र्याच्या काळात शिक्षणाची

ही केवढी शोकांतिका ! जेक्स बारझमने *House of Intellect* मध्ये काढलेले उद्‌गार खरे वाटू लागतात. तो म्हणतो,

" The present education turns out with certainty only two products–complaints and cripples."

सारांश, भारतात शिक्षण ही आज एक समस्या होऊन बसली आहे. वास्तविक शिक्षण हीच अशी वस्तु आहे, की जिच्यामुळे सर्व समस्या सुटू शकतील. अर्थोत्पादनाचा, भौतिक समृध्दीचा, मूलभूत घटक जो मानव, तोच घडविण्याचा सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न दुर्देवाने स्वातंत्र्य-काळात झाला नाही. ज्या मनुष्यासाठी व ज्या मनुष्याद्वारे सर्व योजना राबवायच्या त्याच्या शिक्षणाचीच नेमकी उपेक्षा झाली. साहजिकच ज्या शिक्षणामुळे सर्व समस्या सुटाव्यात ते शिक्षणच समस्या होऊन बसले.[५९] तेव्हा अशा स्थितीत सर्व समस्यांची मूलभूत समस्या हे शिक्षणच नाही का म्हणता येणार ?

या हलाखीला शिक्षक, पालक, चालक व शासकच जबाबदार

मात्र विद्यार्थ्यांच्या हलाखीच्या सद्य:स्थितीला विद्यार्थ्याला जबाबदार ठरविणे अन्यायाचे होईल. विद्यार्थी म्हणजे विद्याभिलाषा, याऐवजी विद्यार्थी म्हणजे अविवेक नि बेशिस्तता हे समीकरण आज रुढ होण्यास विद्यार्थी कसा दोषी ठरतो? मडके कच्चे राहिले तर दोषी कोण ? माती की कुंभार ? शर्ट नीट न शिवला गेला तर शिंप्याला जबाबदार धरणार की कापडाला ? तद्वतच विद्यार्थ्याच्या आजच्या वागणुकीला, विद्यार्थी कारणीभूत नसून, समाजातील एकंदर वातावरण व शिक्षणाशी संबंधित असलेले विविध घटक–विशेषत: शिक्षक, पालक, चालक व शासक प्रामुख्याने जबाबदार आहेत. एखाद्या टेबलाचा किंवा पलंगाचा एक पाय जरी चांगला नसला तरी ज्याप्रमाणे तो नीट उभा राहू शकत नाही, त्याचप्रमाणे शिक्षणाच्या या चार घटकांपैकी एक जरी आपले कर्तव्य नीट बजावत नसेल, तरी विद्यार्थी आपल्या भावी जीवनात यशस्वीपणे उभा राहू शकणार नाही, आदर्श नागरिक म्हणून त्याच्यात उणेपणा आल्याशिवाय राहणार नाही. या सर्व घटकांकडून विद्यार्थी जीवनाची झालेली आबाळच मुख्यत: याच्या मुळाशी आहे. आणि विद्यार्थी उन्नत होण्यास त्यांच्याच प्रयत्नांना मुख्यत: आवाहन करावयास हवे.

(४) भारतीय शिक्षणाच्या पुनरुज्जीविनाचा उपाय- शिक्षणाचे आध्यात्मीकरण

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण अपरिहार्य

या प्रयत्नाच्या दिशा विभिन्न असू शकतील. त्या सर्वांचा विचार करणे या प्रबंधात आम्हाला अभिप्रेत नाही. मात्र विद्यार्थ्यांना नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देणे हा या प्रयत्नाचाच एक प्रमुख भाग आहे असे आग्रहाने म्हणावेसे वाटते. प्रगुख म्हणावयाचे कारण असे की, या शिक्षणाने जर विद्यार्थी सत्प्रवृत्त व सदाचारी झाला तर त्याच्या जीवनातील अनेक घातक प्रवृत्तींना आपोआपच पायबंद बसणार आहे. झाडाच्या मुळाला पाणी घातले की, फांद्या व फळांची वेगळी काळजी घ्यावी लागत नाही. पण अन्य सर्व करुनही पाणीच तेवढे टाकावयाचे राहिले तर मात्र केलेली सर्व मेहनत व्यर्थ जाईल! तसेच विद्यार्थीवर्गाची मूळ अधिष्ठान असलेली नैतिक व आध्यात्मिक गुणसंपदा याकडे दुर्लक्ष करून केवळ शारीरिक शिक्षण, नियोजन मंडळ, विद्यार्थी शिबिरे, स्नेहसंमेलने वा तत्सम उपायांच्या सहाय्याने थोडीफार तात्कालिक नि एकांगी सुधारणा होऊ शकेल. पण खरा जीवनस्त्रोत न मिळाल्यामुळे सद्गुणांची व सद्विचारांची विद्यार्थ्यांची जीवनवेल हळूहळू सुकू लागेल.

स्वाभाविक अंकुराला या शिक्षणाचे खतपाणी

भारतवर्षात तरी या बालकाची स्वाभाविक प्रवृत्ती धर्माकडे असते. परंतु त्या प्रवृत्तिला प्रतिकूल अशा वातावरणात जर त्याचे शिक्षण झाले तर धार्मिकतेचा हा अंकुर नष्ट होण्याचा संभव असतो. या अंकुराला सदुपदेश, सच्छील अध्यापकांचा प्रत्यक्ष आदर्श, काही किमान सदाचाराचा आग्रह इ. गोष्टींचे सिंचन मिळाले तर तो विद्यार्थ्यांच्या अंत:करणात प्रस्फुटित व्हायला वेळ लागणार नाही. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे हा अंकुर चांगला विकसित झाला तर सुविद्य व सुसंस्कृत अशा गुणी नागरिकांचे फळ या योजनेला आल्याशिवाय राहणार नाही.

नैतिकतेच्या प्राणवायूची समाजाला गरज

विद्यार्थी विश्वात दिवसेंदिवस वाढत असलेला वेजवाबदारपणा, उच्छृंखलता, वडिलांविषयी व शिक्षकांविषयी अनादर, भगिनीवर्गाकडे वघण्याचा दूषित दृष्टिकोन इ. विविध दुर्गुणांना समूळ उपटून काढून त्या ऐवजी आस्तिकता, संयम, विवेकपूर्ण वागणूक, कर्तव्यावद्दल प्रखर जाणीव, जीवनातील विविध अंगांचा संतुलित विकास *(Balanced development of various faculties)* इ. सद्गुणांची निर्मिती व जोपासना करायची असेल तर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची कास धरल्याशिवाय तरणोपाय नाही. काही जण असे विचारतील की, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण स्वतंत्र असा प्रमाणित *(Certified)* विषय करण्याची काय आवश्यकता आहे ? आजवर कुणाला कशी त्याची गरज भासली नाही ? प्रश्न अगदी रास्त आहे

एके काळी नैतिक शिक्षणाचा अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे विचार करण्याची तितकीशी गरज खरोखरीच भासत नसे. समाजाचे एकूण वातावरण असे असे की, मूलभूत नीतितत्वे विद्यार्थी सहज अंगी वाणवीत असत दुर्दैवाने आज तसे वातावरण नाही. हवेत प्राणवायू असला तरच तो घेऊन कर्बाम्लवायू सोडणे व्यक्तीला शक्य असते. पण समुद्राच्या तळाशी ज्याप्रमाणे मुद्दाम बाहेरुन प्राणवायू पुरवावा लागतो तसेच नीति–शिक्षणाचा प्राणवायू समाजरुपी समुद्रात विशेष प्रयत्न करुन पुरविण्याची नितांत गरज आज उत्पन्न झाली आहे.

भारतीय शिक्षणाचे आध्यात्मिकरण

'कळते पण वळत नाही' या लहानशा पण मार्मिक म्हणीत सुचविल्याप्रमाणे 'चांगले व वाईट' यातला भेद मनुष्याला बहुतेक वेळा कळत असतो पण त्याप्रमाणे मन वळविणे त्याला अशक्य होते. जे चांगले वाटते तसे वागायला हवा असलेला आत्मनिग्रह बहुधा त्याजजवळ नसतो. सदाचरणी असावे असे कुणास वाटत नाही ? पण त्या सदिच्छेनुसार वर्तन होत नाही म्हणून तर जगात सर्वत्र पेचप्रसंग उभा राहिला आहे. याही दृष्टीने नैतिक शिक्षणाचा उपयोग होण्यासारखा आहे.

सर्व प्रकारच्या सूक्तासूक्त मार्गाचा अवलंब ज्यात क्षम्य समजला जातो अशा राजकारणाचे देखील अध्यात्मिकरण व्हावे *(Politics must be spiritualised)* असे नामदार गोखले स्वातंत्र्यपूर्व काळातही प्रतिपादीत असत. मग स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षण क्षेत्राचे अध्यात्मिकरण व्हावे *(Let Education be spi.itualised)* अशी अपेक्षा केली तर ती का वावगी ठरावी ?

बाह्य अराजकता आंतर जीवनाचे प्रतीक

आणि अशी अपेक्षा या विसाव्या शताब्दीतील गेल्या ७० वर्षात भारतीय शिक्षणाचा विचार करणाऱ्या बहुतेक शिक्षणतज्ञांनी, धर्मनेत्यांनी व राजकीय पुढाऱ्यांनी एकमुखाने व्यक्त केली आहे. कारण बाह्य जीवनातील गडबड नि गोंधळ हा आंतरिक हृदयातील व मनातील गोंधळाचे केवळ प्रतिबिंब आहे याची या सर्वांना कल्पना होती[६०] धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनाविषयी भारतात मतामतांचा एवढा गलबला झाला आहे की, कोणत्या एका गोष्टीविषयी सर्व भारतीयात एकमत आहे ? असा प्रश्न उपस्थित केला तर उत्तर देणे अवघड व्हावे. भूतकाळावर श्रध्दा नाही, भविष्य काळावर विश्वास नाही; वर्तमान काळात समाधान नाही असे या अशांततेचे यथार्थ वर्णन सुमारे ३० वर्षापूर्वीच करुन सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वा. म. जोशी[६१] लिहितात,

"(भारतीयांना) निश्चित सिध्दांत नाहीत, निश्चित आकांक्षा व ध्येये नाहीत, निश्चित स्नेह किंवा द्वेष नाही; निश्चयाने मन आनंदविणारी किंवा दुखविणारी स्थळे किंवा कारणे नाहीत; निश्चयाने विशिष्ट लोकांना बळकट जोडणारी किंवा कायमची तोडणारी सत्कर्मे किंवा दुष्कर्मे नाहीत, तर सर्वत्र अनिश्चय, संशय, ढिलेपणा, गुळमुळीतपणा व चालढकलपणा दिसत आहे."

(५) शिक्षणाच्या आध्यात्मिकरणास सार्वात्रिक अनुकूलता

नैतिक पैलूंवर भर देणारा जागतिक विचारप्रवाह

अशी जी अस्थिरता व अनिश्चितता बाह्य जीवनात, गेली काही दशके वाढत्या प्रमाणावर आढळत आहे, तिचे मुख्य कारण भारतीयांचे

आंतर – जीवन ढासळत चालले आहे, हेच होय. आणि ही आंतरिक जीवनाच्या अध:पतनाची अवस्था फक्त भारतात आहे असे नव्हे, तर जगातील सर्व राष्ट्रांतच कमी अधिक प्रमाणात ही स्थिती आज सर्वत्र आढळते; आणि ती सुधारण्याकरिता नैतिक व धार्मिक पैलूंवर अधिक भर द्यायला हवा असा एक आधुनिक विचार नव्याने पुढे येत आहे.[६२] ह्या विचाराच्या प्रतिपादकांच्या दृष्टीने *"Our problem is to change man's mind and hearts to increase human goodness."* मानवी कल्याणाची प्रवृत्ती वाढेल अशा प्रकारे मन व हृदयात परिवर्तन घडविणे हाच प्रमुख प्रश्न जगासमोर आहे. आणि या विचारसंप्रदायाचे प्रमुख प्रणेते डॉ. अल्डस् हक्सले यांची अशी श्रद्धा आहे की, या कार्यात पौर्वात्यांचे पाश्चिमात्यांना मार्गदर्शन होऊ शकेल. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की,

" West has much to learn from the detachment of the wise men of the East, their aloofness from material ends, their capacity to escape from the domination of passion and desire"

एकच उपाय – ईशकेन्द्रित जीवन

माणसाला आजच्या संकटात तारु शकेल असा एकच मार्ग असल्याचे ते ठामपणे प्रतिपादन करतात. फार थोडयांना पत्करावासा वाटेल असा तो मार्ग म्हणजे ईश्वराकडे वळणे *(the return to God)* होय. पाश्चात्य विचारवंतांच्या बुध्दीला ज्या मौल्यवान अशा भारतीय वैशिष्टयांचे आकलन झाले, त्यांचे महत्व भारतीय जीवनात मुरलेल्या येथील चिंतकांना कळले नव्हते असे नाही. महात्मा गांधींनी हा विचार फार स्पष्टपणे १९३४ साली बोलून दाखविला होता. ते लिहितात,[६३]

" Man's ultimate aim is the realization of God, and all his activities, social, political, religious, have to be guided by the ultimate aim of Vision of God."

अध्यात्मप्रधान शिक्षण

जीवनाचे अंतिम साध्य असलेल्या ईश्वराची वा आध्यात्मिक जीवन-मूल्यांची उपेक्षा आधुनिक शिक्षणात केली जात आहे याची महात्माजींना

पूर्ण जाणीव होती व त्यामुळे आत्मिक सामर्थ्याच्या प्राप्तीकडे विद्यार्थी न वळता त्यांचा कल तात्कालिक अशा भौतिक शक्तिसंचयाकडे वळतो असे त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिले आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणातील हा दोष दाखवतांना म्हटले आहे की,[६४]

"modern education tends to turn our eyes away from the spirit. The possibilities of spirit force or soul-force, therefore, do not appeal to us, and our eyes are consequently revetted on the evenescent, transitory, material force."

पूर्वी म्हटल्याप्रमाणे अनेक समाज धुरीणांनी आपआपल्या कल्पनेनुसार जे शिक्षणाचे लहान मोठे प्रयोग केले, त्याद्वारे महात्माजींनी दर्शविलेला आध्यात्मिक व नैतिक जीवनमूल्यांच्या अभावाचा दोष काढून टाकण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न केला. किंबहुना ही उणीव दूर करावी हा प्रमुख हेतू अशी शिक्षणाची केन्द्रे काढतांना त्यांच्या मनात होता असे स्पष्टपणे दिसून येते.

त्याच उद्देशाने शिक्षणाचे प्रयोग

१९१३ साली डॉ. अँनी बेझंट यांच्या अधिपत्याखाली स्थापन झालेल्या "थिऑसॉफिकल एज्युकेशन ट्रस्ट" या संस्थेने आपल्या उद्देशातच मुळी धर्म–शिक्षण एक अपरिहार्य अंग राहील अशा, सर्व धर्मियासाठी शाळा व महाविद्यालये स्थापन करावीत असे स्पष्टपणे नमूद केले.[६५] बनारस येथील सेंट्रल हिन्दू कॉलेज हा या दृष्टीने एक प्रयोगच होता. शिक्षणाशी धर्माची सांगड ही थिऑसॉफिस्टांची भारतीय शिक्षणाला एक मौलिक अशी देणगीच आहे अशी अँनी बेझंट यांची भावना[६६] होती.

रवीन्द्रनाथ टागोरांनीदेखील आपले शान्तिनिकेतन स्थापन करण्यामागचा प्रमुख हेतू आध्यात्मिक संस्कृती विद्यार्थ्यांच्या जीवनात उतरविणे हा होता, असे लिहिले आहे.[६७] स्वामी दयानंद सरस्वती, व स्वामी विवेकानंद यांनी तर त्यांच्या शिक्षणसंस्थांमार्फत नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा होईल तेवढा प्रसार केला. अर्थात अशा

संस्थांचा इंग्रजांच्या काळात तितकासा व्याप का वाढला नाही याचा विचार आपण मागे केलाच आहे.

बहुतेक समाजधुरीणांचा अनुकूल अभिप्राय

तसेच ज्यांनी स्वत:च्या संस्था स्थापिल्या नाहीत पण नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे महत्व परोपरीने शासनासमोर व समाजापुढे वारंवार विषद केले अशाही थोर पुरुषांची संख्या थोडी नाही. उदाहरण द्यायचे झाले तर विख्यात विचारवंत श्री. केशवचंद्र सेन यांचे देता येईल. ते एका पत्रात आपले या विषयीचे मत लिहितांना म्हणतात,[१८]

" Moral Training must be an integral part of any system of general education . . . . . Knowledge without morality is a danger and a curse, and unquestionably it is more so in India than elsewhere." नामदार गोखल्या पासून तो डॉ. राधाकृष्णन् पावेतो अनेकांची या संबंधीची अनुकूल वचने शेकडोंनी उद्धृत करता येतील. पण विस्तारभयास्तव तसे करणे शक्य नाही. तात्पर्य एवढेच की, एखाददुसऱ्या नव्हे तर शिक्षणाचा विचार केलेल्या बहुतेक सर्व नेत्यांनी, आधुनिक शिक्षणामध्ये नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची गरज आग्रहाने प्रतिपादिली आहे. ते एक शिक्षणाचे आवश्यक व अपरिहार्य असे अंग आहे हे, पुन:पुन्हा बजावले आहे.

सर्व शिक्षण आयोगांकडून स्वागत

सुदैवाने स्वातंत्र्यप्राप्तीपासून शिक्षणाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या सर्व शिक्षण आयोगांनी *(Education Commissions)* अशा नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला अनुकूलता दर्शविली आहे. एवढेच नव्हे, तर त्याच्या अभावी भारतीय विद्यार्थ्यांचा एकांगी व अपूर्ण विकास होईल असे आपले मत नमूद केले आहे. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीशांनी नेमलेल्या सरकारी समित्यांनीही तोच प्रवृत्ती दर्शविली. सर्वात अलीकडे नेमल्या गेलेल्या डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील शासकीय समितीने (कोठारी-आयोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या) भारतीय शिक्षणाचा केलेला विचार हा शैक्षणिक क्षेत्राच्या इतिहासातील एक मोठे व्यापक व मह-

त्वाकांक्षी पाऊल आहे. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या दृष्टीने त्यात स्पष्ट केलेली दिशा, ही त्या पूर्वीच्या कोणत्याही शिक्षण आयोगाने गाठलेल्या मजलीच्या तुलनेने, पुढेच वाटचाल करणारी आहे. भारताचा प्राचीन व श्रेष्ट असा वारसा आधुनिक जगतास वरदान देण्यास समर्थ आहे व हा वारसा जगाच्या कल्याणकारक विचारसंपदेत उपयुक्त व अद्वितीय अशी भर घालू शकतो, हा विश्वास कोठारी समितीने पुन:पुन्हा व्यक्त केला आहे. आणि ही भर दुसरी तिसरी कोणतीही नसून आजच्या विज्ञानास विशेषेकरून नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान देण्याच्या बाबतीतल्याच होय हे असंदिग्ध शब्दात तिने व्यक्त केले आहे.

कोठारी आयोगाची व्यथा व आग्रह

परंतु असे अधिष्ठान जगाला देण्याची पात्रता असलेला वारसा ज्या भारताजवळ आहे, त्या भारताच्या भावी पिढीकडे तो वारसा संक्रमित होण्याची काही सोय आहे काय? कोठारी समितीने आध्यात्मिक मूल्यांच्या शिकवणुकीबाबत सध्या भारतात असलेल्या अनास्थेबद्दल विषाद व्यक्त केला आहे तो असा:

"हे लक्षात ठेवले पाहिजे की शाळांमधून धार्मिक पाठ देण्याबाबत बंदी घातलेली असल्यामुळे व पूर्वीच्या काळी घराघरातून जे हे शिक्षण मिळत असे ते मिळणे कमी झाल्यामुळे, मुले आपल्या धर्माबद्दल 'कोणत्याच निश्चित कल्पना नसलेली' अशी निपजली आहेत. इतर धर्माबद्दल माहिती मिळणे तर मग दुरापास्तच.[६९]

"शाळांच्या अभ्यासक्रमातला गंभीर दोष म्हणजे सामाजिक नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणासंबंधीच्या सोयींचा अभाव. भारतातील बहुसंख्य जनतेच्या जीवनात धर्म ही एक मोठी प्रेरक शक्ती *(Motivating force)* आहे. आणि तिचे चारित्र्य निर्मितीशी घनिष्ट नाते आहे. जनतेच्या जीवनाशी, गरजांशी व आकांक्षांशी संबंध असलेल्या राष्ट्राच्या शिक्षण पद्धतीस ही 'हेतुगर्भ शक्ती' *(purposeful-force)* नजरेआड करता यावयाची नाही."

कोठारी–समितीने आपला हा दृष्टिकोन व आग्रह इतक्या स्वच्छ शब्दात प्रगट केला आहे की नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाबाबत खरोखरी कुणाच्याही मनांत संशय राहू नये.

अंमलबजावणी का नाही ? अद्याप संशय, गैरसमज

परंतु आश्चर्य असे की, वरीलप्रमाणे अनेकानेक धर्मधुरंधरांनी, विचारवंतांनी, लोकनेत्यांनी व भारतातील शिक्षण आयोगांनी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची निकड वारंवार प्रतिपादीली असली तरी, केन्द्र वा प्रांतिक शासनाने सातत्याने योजना आखून चिकाटीने असे शिक्षण सुरु केले असल्याचे फारसे कुठे आढळत नाही. परवा परवापर्यन्त केन्द्रात व राज्यांत एकाच पक्षाची एकमुखी सत्ता संपूर्ण देशात अस्तित्वात असतांना व शासन निर्मित आयोगाने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे आग्रह-पूर्वक प्रतिपादन केले असतांना ही योजना आजवर का अंमलात येऊ शकली नाही ? अद्याप त्याला अनेकांचा विरोध का आढळतो ? या शिक्षणाविषयी काही गैरसमज पसरले आहेत का ? याबाबत सर्वांची पूर्ण संशय निवृत्ती होऊन अद्याप समाधान झाले नाही काय ? सद्यः स्थितीची भयानकता लक्षात येऊन अशा शिक्षणाची जेवढी निकड काहीना वाटते तेवढीच इतरांना का वाटू नये ?

(६.) प्रबंधाचे प्रयोजन

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणच का व कसे द्यावे याचा सविस्तर उहापोह करुन, संबंधितांच्या मनात, या योजनेविषयी जी वरील प्रमाणे अनेक प्रश्नचिन्हे आहेत, त्यांचे संपूर्ण समाधान करण्याचा प्रांजळ प्रयत्न करावा हा या प्रबंधाचा प्रमुख हेतू ! नैतिक व आध्यात्मिक शिक्षणावद्दल जे विविध संशय व गैरसमज आहेत त्यांचे निराकरण करावे व वाचकांच्या मनात या शिक्षणाविषयी आस्था व आदर उत्पन्न करावा, हे या प्रबंधाचे मुख्य प्रयोजन आहे

प्राचीन भारतीय आध्यात्मिक मूल्यावर व शिक्षण प्रक्रियेवर ज्यांची पूर्ण श्रध्दा आहे त्याच्यासाठी हा ग्रथ लिहिलेला नाही. त्यांना या ग्रथाचा एवढाच उपयोग होईल की, आपल्या श्रध्देच्या समर्थनासाठी त्यांना नवे शास्त्रीय युक्तिवाद उपलब्ध होतील. उलट ज्यांच्या श्रध्दा विभिन्न आधुनिक विचार प्रवाहामुळे डळमळीत झाल्या आहेत त्यांच्यासाठी हे पुस्तक लिहिले आहे, केवळ बुद्धिवादाची कास धरुन प्रतिपादीलेल्या विचारसरणीने, ज्यांचे नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान ढासळू लागले

आहे, अशांसाठी हे पुस्तक लिहिले आहे; मानवी सद्गुण व सद्भाव यांच्या आधारावरच अखेर जगाचे प्रश्न सोडविले जाऊ शकतात, असा ज्यांचा विश्वास आहे, अशा सज्जनासाठी या पुस्तकातील विवेचन आहे.

'सर्व धर्म सम भाव' जागृत झाल्यास सर्व धर्म, पंथ, संप्रदाय यांत समन्वय होऊन शांतता नांदू शकते यावर ज्यांची निष्ठा आहे; या निष्ठेच्या आधाराने शिक्षणात प्रयोग होऊ शकतात यावर ज्यांचा विश्वास आहे नि या विश्वासाच्या बळावर नैतिक व आध्यात्मिक संस्कारांचा शिक्षणसंस्थेमध्ये प्रत्यक्ष प्रयोग करण्याची ज्यांची मनीषा आहे, अशा सर्व धर्म-पंथ-संप्रदायांतील बांधवांना आवाहन करणारा हा ग्रंथ आहे.

कोणत्याही विशिष्ट धर्माचा, एखाद्या धर्मातील पंथाचा वा संप्रदायाचा प्रचार किंवा प्रसार करावा अशी प्रबंधकर्त्याची दूरान्वयानेही भावना नाही. या ग्रंथाचा जन्म झाला तोच तर प्रामुख्याने सर्व धर्मा-विषयी अंत:करणात असलेल्या उत्कट प्रेमभावनेमुळे! या सर्व धर्म-सम-भावनेचा प्रत्यय वाचकांना प्रबंधात पदोपदी यावा. क्वचित कुठे न आल्यास कृपया तो दोष भाषेचा समजावा, भावनेचा गृहित धरु नये ही विनम्र प्रार्थना!

विनम्र आवाहन

तसेच शिक्षणाशी संबंधित अशा सर्व व्यक्ती वा संस्था यांना तर हा ग्रंथ विशेष उपयुक्त ठरावा अशी अपेक्षा आहे. या ग्रंथातील प्रतिपाद्य विषयाचे, कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता, चिंतन-मनन करावे अशी सर्वांना कळकळीची विनंती आहे. राष्ट्रीय जीवन अधिक एकात्म, शुद्ध व बलशाली व्हावे, असे ज्या लोकनेत्यांना, मंत्र्यांना, व शासनाला वाटते त्यांच्या विचाराला हा ग्रंथ बरेच खाद्य पुरवील. आपल्या शिक्षण संस्थांतून सत्प्रवृत्त, व राष्ट्रभक्त नागरिक बाहेर पडावे अशी प्रांजळ इच्छा असलेल्या शिक्षण संस्थांच्या सर्व चालकांना या ग्रंथाचे सहाय्य होऊ शकेल आपला पाल्य बुद्धिमान, आज्ञाधारक व कर्तव्यदक्ष निपजावा असे ज्या पालकांना प्रामाणिकपणे वाटते त्यांना आपल्यावरील जबाबदारीची अंशत. ओळख करुन देणारा हा ग्रंथ व्हावा.

सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक व अध्यापक हे तर माझे आत्मीय, सर्वात जवळचे ! व्यावसायिक स्नेहसंबंध असल्यामुळे अधिक जिव्हाळ्याने नि प्रेमाने, नव्हे काहीशा हक्काने मी त्यांना हाक देऊ इच्छितो. विद्यमान विद्यार्थ्यांचे विधाते खरोखरी आपणच आहोत. सर्व बाजूने विस्कटलेल्या विद्यार्थ्यांचे जीवन पाहून जो विमनस्क होत नसेल असा शिक्षक विरळाच! नव्हे, विद्यार्थ्यांचे स्वैराचारी व संस्कारहीन जीवन पाहून जो दु:खाने कळवळत नाही तो शिक्षकच नव्हे ! आजच्या शिक्षण पद्धतीच्या चौकटीत व सामाजिक वातावरणाच्या प्राप्त परिस्थितीत इच्छा असूनही विद्यार्थी हितासाठी विशेष काही करता येत नाही याची व्यथा प्रस्तुत लेखकाजवळ अनेकांनी व्यक्त केली आहे ! त्या सामान्य शिक्षकांच्या व्यथेला प्रातिनिधिक स्वरुपात विधायक वाचा फोडण्याचा यथामती प्रयत्न करावा हे देखील या प्रबंधाचे एक प्रयोजन ! मला विश्वास आहे शिक्षक वर्ग या प्रयत्नाचे स्वागत करील !

परंतु तेवढ्याने समाधान मानता येणार नाही ! शिक्षकांनी आणखी एक पाऊल पुढे टाकून मला सहकार्य द्यावे अशी माझी त्यांना हात जोडून प्रार्थना आहे. त्यांनी, या ग्रंथात सुचविलेला नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा प्रयोग प्रत्यक्ष आपल्या संस्थेत अंमलात आणण्याचा आटोकाट प्रयत्न करावा ! आपसांतील इतर अनेक मतभेदांना मूठमाती देऊन निदान या योजनेपुरते तरी सर्वांनी एकत्र यावे. स्वयंस्फूर्तीने सहकार्य करुन सहयोग द्यावा. स्वेच्छेने अनेक शिक्षक जर तनमनाने या सत्कार्यासाठी पुढे आले तर मुख्याध्यापक वा प्राचार्य, हे अशा कार्याला खचित उत्तेजनच देतील. संस्थाचालकही, निरपेक्षपणे शिक्षकवर्ग हे कार्य करीत असलेले पाहून, या योजनेला सहानुभूती दर्शवितील !

अर्थात, शासनाची मान्यता मिळवून सर्व राज्यभर वा देशभर असा प्रयोग सामुदायिकपणे केल्याशिवाय त्याला संपूर्ण यश मिळणे अवघड आहे, हे ग्रंथात नमूद केलेच आहे ! पण तोवर आपापल्या परिस्थितीनुसार अनेक शाळां–कॉलेजांतून जागोजाग असे प्रयत्न झाले, तर शासनाची अनुकूलता उत्पन्न होणे अधिक सुलभ होईल ! भावी पिढीच्या कल्याणासाठी, कर्तव्यपूर्तीच्या समाधानासाठी, शिक्षक वा गुरू म्हणून

आपण स्वीकारलेली भूमिका यथार्थपणे वठविण्यासाठी व राष्ट्रीय हित-संवर्धनातील आपला वाटा उचलण्यासाठी, संपूर्ण देशातील अध्यापक वर्ग या ग्रंथातील योजनेला योग्य प्रतिसाद देईल का ?

(७') गृहीत तत्वे *(POSTULATES)*

कोणत्याही सिद्धान्ताचे प्रतिपादन करावयाचे झाले तर सिद्धान्ताच्या चर्चेसाठी काही गोष्टी गृहीत धरुन विवेचन करणे अपरिहार्य असते. या प्रबंधातील विवेचनात आम्ही गृहीत धरलेली तत्वे सारांशरुपाने खालीलप्रमाणे :–

१. मानवाच्या पंचभौतिक देहामध्ये ईश्वराचे आध्यात्मिक तत्व *(God's Spiritual element)* कार्य करीत असते.

२. या ईश्वरी अध्यात्मतत्वाच्या अस्तित्वामुळेच मानव जीवन जगत असतो. हे तत्व निघून जाताच मनुष्य मृत्यु पावतो.

३. मानवी देहात अधिष्ठित असलेल्या या अध्यात्म-तत्वाचा विकास करुन ते सर्वव्यापी–सर्वांतर्यामी परमेश्वराशी तद्रूप करणे हे मानवी जीवनाचे अत्युच्च ध्येय होय.

४. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी जगातील साक्षात्कारी संतांनी, सत्पुरुषांनी दिग्दर्शित केलेल्या विभिन्न उपासना व आचार मार्ग म्हणजेच विभिन्न धर्म, पंथ व संप्रदाय होत.

५. सर्व धर्म, पंथ व संप्रदाय यांचे आंतरिक व बाह्य असे दोन भाग असतात. आंतरिक भागात शाश्वत सनातन तत्वांचा व बाह्य भागात कर्मकांडांचा समावेश असतो.

६. सर्व धर्म–संप्रदायांच्या आंतरिक अंगात एकप्रकारचे एकत्व असते. विभिन्न धर्मातील या एकत्वाची, साधर्म्याची जाणीव असणाऱ्यांना बाह्य कर्मकांडाच्या विभिन्नतेबद्दल आश्चर्य वाटत नाही. मानवी प्रकृतीनुसार बाह्य आचारातील या भेदांना ज्ञानी स्वाभाविकच मानतात. अज्ञानी मात्र वाद घालतात. मानवी इतिहासातील बहुतेक सर्व धर्म–कलहाचे बीज या धर्माच्या आंतरिक मूलभूत अंगाच्या अज्ञानातच आढळते.

७. या ग्रंथातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या विवेचनात आम्हाला अभिप्रेत आहे ते सर्व धर्मांचे हे अंतर्गत मूलभूत स्वरूप! 'ईश्वरानुभूती' हे जे सर्व धर्मांचे समान साध्य त्याला अनुकूल अशी मनोवृत्ती व प्रवृत्ती उत्पन्न व्हावी हे या शिक्षण – योजनेचे मुख्य उद्दिष्ट!

सामान्यत: कुणीही मान्य करावी अशी आहेत हीं गृहीत तत्वे. भारतीय संस्कृतीला मान्य असलेली, भारतीय परंपरेने जोंपासलेली नि भारतीय जीवनाचा मुळी गाभाच असलेली! या तत्वाच्या सत्यतेसाठीं अनेक आधार देता येतील. पण त्याची गरज वाटत नाही. आधुनिक युगातील अवतारी सत्पुरुष भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या जीवनाची ओझरती ओळख देखील वरील गृहीत कृत्यांची सत्यता सिद्ध करण्यास पुरेशी होईल. "सर्वधर्मसमभाव बाळगून ईश्वरानुभूतीची प्राप्ती" हाच तर या महापुरुषाचा मुख्य युगसंदेश! या संदेशाच्या अनुरोधाने शिक्षणाची सद्य:कालीन दिशा नि प्रक्रिया निश्चित करुन भारतीय शिक्षणक्षेत्रातील समस्या आपणास नाही का सोडविता येणार?

(८) उपसंहार

या प्रकरणातील विवेचनावरुन जे निष्कर्ष निघतात ते खालील प्रमाणे थोडक्यात नमूद करता येतील.

१. भारताची प्राचीन शिक्षणपद्धती ही आदर्श विद्यार्थी घडविणारी, कला - विज्ञानादी लौकिक शास्त्रांचा अत्युत्कर्ष साधणारी, सामाजिक जीवन सर्वांगाने परिपुष्ट करणारी, एक जगन्मान्य व आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झालेली, शिक्षणव्यवस्था होती.

२. राष्ट्रीय, ऐहिक जीवन, सुखी, समृद्ध व समाधानी होण्यास या शिक्षणाचे सहाय्य झाले होते.

३. या प्राचीन शिक्षणाचा मूलाधार अध्यात्म, नीती व शुद्धाचरण अभ्युदय व नि:श्रेयस हे होते या शिक्षणाचे ध्येय, व साधन होते, विभिन्न नैतिक व आध्यात्मिक संस्कार.

४. मोंगल, अफगाण, पठाण इ. च्या अघोरी आक्रमणाने शिक्षणसंस्थांचा उच्छेद, तरीही या शिक्षणातील मूलभूत आध्यात्मिक व नैतिक

अधिष्ठान नष्ट झाले नाही ! इंग्रजांच्या आगमनापर्यन्त, प्राचीन शिक्षण व्यवस्था व तिचा हा मूलाधार, लहान प्रमाणांत का होईना, टिकून होता.

५. इंग्रजी शिक्षणाने प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती व तिचे अध्यात्मिक अधिष्ठान नष्ट केले. आजवर तग धरुन असलेला प्राचीन शिक्षणाचा प्राणच हरवला. एकांगी, अपूर्ण, केवळ बौद्धिक भूक व ती देखील अर्धवट भागविणारे, इंग्रजी शिक्षण सुरु झाले.

६. ध्येयविहीन व आत्मविस्मृतिकारक, इंग्रजी शिक्षणाने, सुमारे दीड शतकात 'भारतीय देहात इंग्रजी मन ' तयार केले! परिणामतः, आम्हाला भारतीय जीवनधारणाची लज्जा, इतकेच नव्हे, परानुकरणात धन्यता, वाटू लागली.

७. या स्वत्वहीन व राष्ट्रघातक प्रवृत्तीला आळा घालून, भारताचा कणा असलेल्या अध्यात्ममूल्यांची जोपासना करण्यासाठी व देशाभिमान जागविण्यासाठी, राष्ट्रीय लोकनेत्यांनी, राष्ट्रीय शिक्षणासाठी प्रयत्न केले. पण काही कारणांमुळे ते अपुरे पडले.

८. स्वातंत्र्य काळात शिक्षणाच्या पुनर्रचनेची अत्यंत अपेक्षा, पण झाली. अक्षम्य आबाळ! केवळ शासकीय आयोगांच्या प्रचंड पृष्ठांच्या अहवालांच्या पुढे, अंमलवजावणीचे प्रत्यक्ष पाऊल पडले नाही ! कोणतीही गुणवृद्धी न होता विद्यार्थ्यांच्या संख्येत कित्येक पटीने भरमसाठ वाढ झाली !

९. या सर्वांचा स्वाभाविक परिणाम म्हणजे भारतीय विद्यार्थ्यांचे जीवन पूर्वी नव्हते एवढे उन्मार्गी, उध्वस्त व उजाड झाले. शिक्षण संस्था केवळ विविध विषयांची माहिती पुरविणारी व्यापारी केन्द्रे झाली ! शिक्षक केवळ पोपटपंची करणारे पोटभरू पंडित झाले ! या दोहोंचा परिपाक म्हणजे सदाचार, स्वाभिमान व संस्कृती यांना पारखा झालेला, केवळ पदवीत धन्यता मानणारा, आधुनिक विद्यार्थी !

१०. आजच्या या भयानक दुरवस्थेवर उपायही तितकाच कडक व कायम स्वरुपाचा हवा. आमच्या मते मानवी जीवनाचा व राष्ट्रीय संस्कृतीचा आधार असलेल्या नैतिक व आध्यात्मिक मूल्यांवर अधिष्ठित असे शिक्षण, योजनाबद्धरीत्या देशभर सर्वत्र, निदान पदवी परिक्षे-पर्यन्त तरी अविलंब लागू करावयास हवे.

संदर्भ टीपा

१. *Dr. Altekar, A. S. : Education in Ancient India; p. 326.*

२. विनोबा भावे : शिक्षण–विचार; पृ. ५०

३. *Dr. Altekar, A. S. : Education in Ancient India; p. 266.*

४. *"For, down to the 18 th century every religious centre in South India used to maintain a Sanskrit Patha-sala. The whole country was in fact studded with them."*

Report of the Madras Committee, Education Commission, 1882, p. 1, foot-note.

५. *Dr. Altekar, A. S. : Educatian in Ancient India; p 295.*

६. छांदोग्य उपनिषद; ५, ११, ५.

७. *Dr. Altekar, A.S.: Education in Ancient India; p.331.*

८. *Megasthenes, Fragment. 27.*

९. *Elliot; History of India; as told by its historians; Vol. I, p. 88. London 1870.*

१०. *Yule : Marco Polo; Vol. II (Third Edition) ; p. 363.*

११. अशाच प्रकारच्या अन्य लेखकांच्या आधारासाठी पहा :–
Gibs : Ibn Batuta, p. 228.
Watters: Watters, on Yuan Chwang's Travels.I,p.171.

१२ *Dr. Altekar, A. S. : Education in Ancient India; p. 331 to 340.*

१३. गौतम धर्मसूत्र, १, ८, ८.

१४ सावित्री मात्रसारोपि वरं विप्रं सुयंत्रितः ।
नायंत्रितस्त्रिवेदोपि सर्वाशी सर्व विक्रयी ।। मनुस्मृती, २, ११८.
आणखी पहा : वर प्रमाणे २, ९७.

१५. यस्य वाङ्मनसी शुद्धे सम्यग्गुप्ते च सर्वदा ।
स वै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम् ।। मनुस्मृती, २, १६०.

१६. *Prof. Humayun Kabir : Continuity of Traditional Educational Thought – Article in " Philosophy East & West." (April 1956)*

१७. *Report of University Education Commission; 1966 Vol. I; p. 35.*

१८. *"Where is the wisdom we have lost in knowledge*
Where is the knowledge. We have lost in information
The cycle of Heaven in twenty centuries,
Bring us farther from God And nearer to dust."
T. S Eliot : Ibid.

१९. सविस्तर माहितीसाठी पहा: वीरमित्रोदय, संस्कारप्रकाश, याज्ञवल्क्य स्मृती, १ १३, संस्कारकांड पृ. ६७, संस्काररत्नमाला – गोपीनाथ भट्ट;

२०. हिरण्यकेशी गृह्य सूत्र. १ ५, ११.

२१. भारद्वाज गृह्य सूत्र; १. १०

२२. गौतम धर्म सूत्र; १, १ ७;
मानव गृह्य सूत्र; १, २२. १:
वराह गृह्य सूत्र; ६.

२३. नातिषोडशवर्षमुपनयीत प्रसृष्टवृषणं हयेष वृषली भूतो भवती ।
जैमिनि गृह्य सूत्र, १ १२.

२४. न हायनैर्न पलितैर्न वित्तेन न बंधुभिः ।
ऋषयश्चक्रिरे धर्म योऽनूचानः स नो महान ।।
मनुस्मृती २, १५४.

१५. तैतरिय संहिता; ६, ३, १०.
सत्पथ ब्राम्हण; १,५,५; १–५.

२६. किं ब्राह्मणस्य पितरं किमु पृच्छसि मातरम् ।
श्रुतं चेदस्मिनेद्यं स पिता स पितामह: ॥
मैत्रयनिय संहिता ४८, १, १०७.
कथक संहिता ३०, १.

२७. एष वै ब्राह्मण ऋषिरार्षेय:य: शुश्रुवान ॥
तैतरिय संहिता ६, ६, १, ४.

२८. अथर्ववेद, ११, ५, १९.

२९. *Alberuni's India, edited by Sachau I, p. 252.*

३०. *Bernier : Travels in the Mogul Empire, p. 334.*

३१. *" The Mahomaden conquest proved disastrous to all indigenous educational institutions..... the tolas or the pathasalas either died or barely managed to survive. "*
The Report of the Bengal Provincial Committee; Education Commission, 1882.

३२. *Indian Education Commission : A History of Indigenous Education in the Punjab; 1882; p. 1.*

३३. वरप्रमाणेच पृ. १. शिवाय पहा. *C. N. Patwardhan : History of Education in Medieval India; Bombay 1959; p. 83 & 109.*

३४. *" That the special object of his (Bodens) manificient request was to promote the translation of the scriptures into English, so as to enable his countrymen to proceed in the conversion of the natives of India to Christian religion. "*
मोनिअर विल्यम यांच्या संस्कृत-इंग्रजी शब्दकोशाच्या प्रस्तावनेमधून उदधृत.

३५. *The Life & Letters of Friedrich Max Muller; Edited by his wife; Vol I, p. 346.*

३६. *Ibid; Vol. II; Letter to N. K. Mujumdar written on*

30 th oct. 1899; p. 411. Also see Vol. I; Letter to Duke of Argyll (Dec. 1916); p. 378.

३७. *Ibid; Vol. I; p. 346.*

३८. रामगोपालशास्त्री वैद्य: वेद मे आर्य–दास युद्ध सम्बन्धी पाश्चात्य मत का खंडन ; पृ. ५ ते ७.

३९. *Macauley's Life and Letters* : लॉर्ड मेकॉलेने आपल्या वडिलांना लिहिलेले पत्र दि. १२ आक्टो. १८३६;
म. शि. गोळे: हिंदुधर्म व सुधारणा, यामधून उदधृत. पृ. ३६–३७.

४०. *" And after all, what is it they learn but that, what religion and custom we have are all bad and what the westerners have are all good. "*
Swami Vivekananda : On India and her problems; p. 50.

४१. *Welthy Fisher [Bishop of Agra]: To Light a candle; London 1962, p. 137.*

४२. *T. A. Mathias : Education and National Objectives; Article from " Social Action " July–August 1967; p. 265.*

४३. *Swami Vivekananda; On India and her problems. (Compiled by Swami Nirvedananda) p. 48 to 50.*

४४. वरप्रमाणे पहा.

The child is taken to school .... and the first thing he learns is that his father is a fool, the second thing, that his grant father is a lunatic, the third thing that all his teachers are hypocrites, the fourth that all the sacred books are lies ! By the time he is sixteen he is a mass of negation, lifeless and boneless. And the result is, that the fifty years of such education has not produced one original man in three presidencies.

Swami Vivekananda : Lectures from Colombo to Almora; p. 226.

४५. *The Besant Spirit, Vol. 2 (Ideas in Education); p. 40.*

४६. *Dr. Ravindranath Tagore : Personality; p. 114.*

४७. *Quoted in Dr. Radhakrishnan : The Philosophy of Rabindranath Tagore; p. 205.*

४८. *A number of Vidyapiths (National Universities) were established e.g.* गुजराथ विद्यापीठ, काशी विद्यापीठ, बिहार विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.
Sitarammaya : History of the Indian National Congress; p. 211.

४९. *Lala Lajpat Rai : The Problem of National Education in India; p. 25-26.*

५०. *Mahatma Gandhi : Young India, 29 th Sept; 1920 p. 48.*

५१. *" A generation of really educated people will change the face of India."*
'Besant Spirit' Vol. 2. p. 38.

५२. *Quoted from " Glorious Thoughts on Education," p. 21.*

५३. *Report of the Education Commission (1966) p.589.*

५४. सर्व आकडे शिक्षण समिती आयोग, १९६४–६६ च्या आधारे.

५५. *J. P. Naik : A Historical Review of Educational Planning in India ", a paper presented at the round table conference of Beirut, Lebanon, February 19-28; 1967.*

५६. खालील संदर्भ येथे विचारात घेण्यात आले आहेत.
1) Programme for Educational Development in the First Five Year Plan (1951 – 52 to 1955 – 56)

Extracted from : The First Five Year Plan. A Summery 1952.

2) *Programmes of Development in Education proposed in the Second Five Year Plan, (1956-57 to 1960-61) from Chapter XXIII of Second Five Year Plan, 1956.*

3) *Programmes of Development in Education proposed in the Third Five year Plan (1961-62 to 1965-66) From Chapter XXIV from Third Five Year Plan, Planning Commission, Govt. of India.*

५७. जमनालाल बायती, बिकानेंर " किशोर बच्चोमे नैतिक विकास"– 'साहित्य परिचय' मासिकामधील लेख, ऑगस्ट १९६९.

५८. *M.N. Chitra, "Cases Studies", Seminar 88(Dec.66); p. 34.*

५९. विनोबाजी भावे : आचार्यकुल; पृ. ८.

६०. *"The outward chaos and confusion of our life reflects the confusion of our hearts and minds." Dr. R. D. Ranade: The gospel of God-Realisation; p. 24,*

६१. वा. म. जोशी : विचार– सौन्दर्य, पृ. १४–१५

६२. *J. B. Coates : Essential English Literary Leaders of Modern Thought* या ग्रंथाच्या आधारे

६३. *Mahatma Gandhi : Harijan; Augst 29, 1934.*

६४ *Mahatma Gandhi : To the Students; p. 190.*

६५. *The Besant Spirit Series; Vol. II. p 21.*

६६. *" Wedding religion to education was a remarkable contribution made by the Theosophists to Indian Education". Ibid; p. 99.*

६७. *Quoted in " Shantiniketan and the Educational Institutions, " Vishva Bharati Bulletin; No. 12; p. 6.*

६८. *Keshub Chander Sen's Nine Letters; p. 39.*

६९. *University Education Commission (1964 - 66); p. 20-21.*

७०. *Ibid; p. 206.*

□ □ □

दोन

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची तात्विक पार्श्वभूमी

" श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ।। "

भगवग्दीता; ४, ३९.

जितेन्द्रिय, तत्पर व श्रद्धावान पुरुषाला आत्मज्ञान प्राप्ती होते. हे ज्ञान प्राप्त झाले असता तात्काळ परमशांती प्राप्त होते. (चित्तातील विषयसुखाची धडपड निःशेष नाहीशी होते असा भाव) "

" *This [moral] aspect of the education of the Indian child is at once the most important and neglected, the most difficult and least studied of all* "

Percival Wren[१]

(१) नैतिकता म्हणजे काय ?

'नीती' ची व्याख्या

नीती या संज्ञेची व्याख्या फार व्यापक आहे. अनेक तत्वज्ञांनी तिच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. आजच्या शिक्षण प्रणालीमध्ये ज्या नैतिक शिक्षणाचा समावेश व्हावा म्हणून मागील प्रकरणामध्ये सुचविले, त्यातील 'नीती' या शब्दाने नेमका कोणता अर्थ ध्वनित होतो?

लॅटिन भाषेतील *Mores* या शब्दापासून *Morality* हा शब्द तयार झाला आहे. त्याचा शब्दकोषातील अर्थ आहे पध्दती, रीति – रिवाज किंवा समूहाचे सिद्धान्त. टी. रेमॉन्ट च्या मतानुसार सदाचरण म्हणजे नैतिकता. हर्लोक म्हणतो, "सामाजिक मान्यतांना अनुकूल असलेल्या व स्वेच्छापूर्वक केलेल्या व्यक्तीच्या व्यवहाराला खरी नैतिकता म्हणता येईल. त्यात व्यक्तिगत जबाबदारीची जाणीव उत्पन्न होऊन सामाजिक हिताला प्राधान्य दिले जाते." अर्नेस्ट हेमिंग्वे[२] याने अगदी सोप्या भाषेत फार समर्पक अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे.

" What is morals is what you feel good after and what is immoral is what you feel bad after."

दैनंदिन जीवनातील कोणतीही वागणूक पहा. सर्व प्रकारच्या

वागणुकीमध्ये एक अंग सामान्यतः समान *(aspect common to all behaviour)* असते. अशी वागणूक समाजातल्या पूर्वनिश्चित नियमाशी सुसंगत असते. नैतिकतेचे पालन करणे म्हणजे सुस्थापित अशा निश्चित नियमांशी सुसंबद्ध असे आचरण ठेवणे. नैतिकतेचे व कर्तव्याचे क्षेत्र जवळपास एकच. कर्तव्य म्हणजे नीतीला धरुन असलेली वागणूक. त्यामुळे नैतिकता व कर्तव्य हे अनेकदा एकच आशय व्यक्त करीत असतात. तेव्हा समाजातील सुस्थापित नियमांशी सुसंगत अशी वागणूक ही नैतिक व अशा नियमांशी विसंगत वागणूक ही अनैतिक.

शुद्ध व व्यावहारिक नैतिकता

नैतिकतेचा सर्वसामान्य तात्विक अर्थ वा सामान्य नियम जरी एखाद्याला कळला असला तरी विशिष्ट परिस्थितीत त्याची अंमलबजावणी करतांना कशी वागणूक ठेवावी हे निश्चित करणे अवघड असते. विविध प्रसंगी विभिन्न परिस्थितीत सामान्य तात्विक नियम कशा रीतीने लागू करावा असा संभ्रम उत्पन्न होतो. त्यामुळे इतर सामाजिक शास्त्राप्रमाणेच नैतिकतेचे शुद्ध (तात्विक) व व्यावहारिक नैतिकता *(Pure & Applied Morality)* असे दोन भाग पाडता येतील मग नीतिमत्तेचे मूलभूत सामान्य तत्व वा सूत्र *(General Principle or formula of Morality)* एकेका क्षेत्रापुरते जसजसे उपयोगात आणले जाईल तसतसे नैतिकतेचे पोटविभाग पडत जातात. उदाहरणार्थ, हे तत्व जेव्हा कुटुम्बाला लावले जाते तेव्हा कौटुम्बिक नीतिमत्तेचे नियम तयार होतात; राजकारणाच्या संदर्भात उपयोगात आणले जाते तेव्हा राजकीय नीतिशास्त्र उगम पावते. (सारणी क्र. १ पहा).


तात्विक नीति–नियमांची दैनंदिन जीवनात जेव्हा आपण अंमल-बजावणी करू लागतो तेव्हा व्यावहारिक नैतिकतेचे सारणी क्र. १ मध्ये दर्शविलेले जे प्रमुख प्रकार आपल्या दृष्टीस पडतात, त्यांचा एकमेकाशी कुठेही विरोध येत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. सारणी क्र. २ मध्ये दिग्दर्शित केलेले व्यावहारिक नैतिकतेच्या प्रकारांचे वाढते वर्तुळ हे त्या त्या प्रकारांची वर्धिष्णु होणारी व्यापकता तर

नैतिकता म्हणजे काय ?

ग्रं. क्र. 9C:692

सारणी क्र. १

नैतिकतेचे प्रकार




दर्शवित आहेतच, पण याशिवाय प्रत्येक नैतिक प्रकाराचा जन्म हा मागच्या प्रकारामधून झाला आहे हे देखील सूचित करीत आहेत. (सा. क्र. २ पहा.)

तसेच व्यावहारिक नैतिकतेच्या प्रत्येक प्रकाराचा इतर प्रकारांशी इतका घनिष्ट संबंध आहे की एक प्रकार संपून दुसरा केव्हा नि कुठे सुरू होतो हे सांगणे अवघड ! किंबहुना, पहिल्या प्रकारातून दुसरा नि दुसऱ्यातून तिसरा, असे केव्हा नि कसे उगम पावतात हे सहजपणे कळणे कठीण ! या सातही प्रकारांच्या सीमारेषा एकमेकांशी अशा बिलगलेल्या असतात की जणू एखाद्या इन्द्रधनुष्यातील सप्तरंगच ! इन्द्रधनुष्यातील रंगाचा संयोगच ज्याप्रमाणे त्याचे सौंदर्य खुलवितो, त्याप्रमाणे परस्परांच्या (विरोधाने विसंगती न येऊ देता) सहकार्याने हे प्रकार नैतिकतेचे सौंदर्य वृद्धिगत करतात. आणखीही एका कारणाने इन्द्रधनुष्याची उपमा नैतिकतेला चपखल बसते. इन्द्रधनुष्यातील सप्तरंगांना एकाच वेळी गती दिली तर ज्याप्रमाणे त्या सर्व रंगाच्या जागी एक पांढरा रंगच दृगोचर होऊ लागतो, त्याप्रमाणे व्यावहारिक नैतिकतेचे सप्त प्रकार जर सर्व समाजात एकाचवेळी गतिमान झाले तर शुद्ध सात्विक नैतिकतेचे

सारणी क्र. २

व्यावहारिक नैतिकतेचे प्रकार व्यापकता व परस्परसंबंध



साम्राज्य सर्वंत्र पसरल्याशिवाय राहणार नाही. विशुद्ध नैतिकतेच्या शुद्ध स्वच्छ प्रकाशाने समाजातील अनैतिकतेचा अंधार त्यामुळे सहज दूर होऊ शकेल.

संदिग्धतेमध्ये सद्सद्विवेक हा आधार

व्यावहारिक नीतीमध्ये संदिग्धता येते त्यावेळी केवळ अंतर्मुख होऊन थोडे आत्मनिरीक्षण केले तर ही द्विधा मन:स्थिती चटकन दूर होते. सद्सद्विवेकबुद्धी हा हृदयात तेवत असलेला व सहज केव्हाही उपलब्ध होणारा अखंड दिवा आहे. त्याच्या प्रकाशात आचरणाची अचूक दिशा व्यक्तीला कळू शकते. सद्सद्विवेक हा अत्यंत काटेकोर न्याय देण्यास समर्थ असा जणू न्यायाधीश ! तो प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणात आसनस्थ आहे. तो कोणत्या परिस्थितीत कसे वागावे याचा तात्काल निर्णय देतो. त्यामुळेच नैतिकता ही व्यक्तीच्या सद्सद्-विवेक बुद्धीतच वास करीत असते असा जो एक दृष्टीकोन मांडला जातो तो मान्य होण्यासारखा आहे.

नैतिकतेचे तीन अर्थ

नैतिकतेचे वरील विवेचनावरुन तीन प्रमुख निष्कर्ष निघू शकतील. नैतिकता म्हणजे,

१. समाजातील रीति–रिवाज, रूढ आचार व पद्धती
२. व्यक्तीने व समाजाने अनुकरण व पालन करावे अशा सत्य व आदर्श सिद्धान्ताचे आचरण.
३. व्यक्तिगत दृष्टीने–सद्सद्विवेकाचे व अंत:करणातील नैतिकदृष्टया योग्य आज्ञांचे पालन.

मानवी क्रियांचे प्रकार[३]–स्वाभाविक व हेतुपूर्ण क्रिया

मानवी क्रियांचे जर सूक्ष्म निरीक्षण केले तर त्यांचे स्वाभाविक व अनिवार्य क्रिया आणि हेतुत: केलेल्या क्रिया असे दोन प्रमुख भाग पडतात.

स्वाभाविक क्रिया जरी व्यक्तीकडून घडत असल्या तरी त्यावर त्याचे नियंत्रण नसते; मुद्दाम इच्छापूर्वक त्या होत नसतात. उदा:– हृदयाचे ठोके वा श्वासोश्वास सुरू असणे; झोपेत बडबडणे; मन भरकटत असता आलेले विचार.

अशा क्रिया स्वेच्छापूर्बक केलेल्या नसल्याने त्यांच्या बऱ्या–वाईट पणाची जबाबदारी कर्त्या व्यक्तीवर पडत नाही. साहजिकच नैतिकतेच्या अभ्यास–विषयात त्यांचा समावेश होत नाही. उदा :– गोविंदाने विचारमग्न असतांना नकळत गॅसच्या पिप्यावर जळत्या सिगारेटचे थोटूक टाकले व भडका उडून फार नुकसान झाले. गोविन्दाने सहजपणे न कळत क्रिया केली असल्याने त्या क्रियेला अनैतिक म्हणता येणार नाही.

याउलट जाणूनबुजून बुद्धचा घडलेल्या मानवी क्रिया या हेतुपूर्ण क्रिया संबोधल्या जातात. या क्रिया स्वेच्छापूर्वक समजून उमजून केलेल्या असतात व त्यावर व्यक्तीचे नियंत्रण असते. त्यामुळे या गटात मोडणाऱ्या क्रियांच्या बरेवाईटपणाची जबाबदारी संबंधित व्यक्तीवर येते.

रचनात्मक व विघटनात्मक क्रिया

हेतुपूर्वक केलेल्या क्रियांचे आणखी दोन प्रकार पडतात.

१. रचनात्मक व समाजोपयोगी क्रिया
२. विघटनात्मक व समाज विरोधी क्रिया

पहिला प्रकार नैतिक समजला जातो तर दुसऱ्या प्रकारातील क्रिया अनैतिक. रचनात्मक नैतिक क्रियांचे पुन्हा दोन भाग पडतात. संपूर्ण मानव समाजाला सर्वमान्य असलेल्या नैतिक क्रिया हा पहिला प्रकार. यात सत्य बोलणे, मातापित्यांच्या आज्ञांचे पालन, अहिंसा इ. सर्वांना समानतेने मान्य असलेल्या नैतिक बाबींचा समावेश होतो.

समाजविशेषांच्या नैतिक क्रिया हा दुसरा प्रकार. यात मोडणाऱ्या क्रिया देशकाल व परिस्थितीप्रमाणे भिन्न भिन्न मानव समुदायात विभिन्न असतात. प्रत्येक समाजातील नीतिमत्तेची कल्पना त्या त्या समाजाच्या चालीरीतीप्रमाणे वेगवेगळी असल्याने या नैतिक क्रियांमध्ये फरक पडतो. जी घटना एका समाजात नैतिक समजली जाईल त्याच घटनेला दुसऱ्या समाजात तेथील सभ्याचारानुसार अनैतिक गणले जाईल. उदा :– पतीपत्नीमधील चुंबनादी क्रियांनी परस्परातील, प्रेमाचे उघड प्रदर्शन पाश्चात्यांना मान्य पण भारतात तेच असभ्यतेचे, अनैतिकतेचे मानले जाते. सारांश, कांही अंशी नैतिकता सापेक्ष असते.

नैतिकता निश्चित करणारे घटक

स्वेच्छापूर्वक केलेली कोणतीही मानवी क्रिया चांगली की वाईट हे क्रियेचे केवळ वाह्य स्वरुप पाहून ठरविणे योग्य नाही. सग नैतिक क्रियेचे गमक कोणते ? एखादी क्रिया नैतिक आहे किंवा नाही हे खालील तीन प्रमुख घटकांवर अवलंबून राहील.

१. क्रियेचा उद्देश *(Object of the act)*
२. क्रियेच्या भोवतालची परिस्थिती *(Circumstances surrounding the act)*
३. क्रियेच्या कर्त्याच्या मनातील हेतू *(Purpose which the one performing the act has in mind)*

या मुद्यांचे आपण थोडक्यात स्पष्टीकरण करू.

१. **क्रियेचा उद्देश :–** कर्ता करीत असलेल्या क्रियेचा उद्देश *[Object]* व क्रियेमागील कर्त्याच्या मनातील अंतिम हेतू (*Ultimate purpose*)

सारणी क्र. ३

मानवी क्रियांचे प्रकार

मानवी क्रिया *Human Act.*

- अनिवार्य वा मूलप्रवृत्त्यात्मक क्रिया *Inadvertent Act*
- स्वेच्छेवर आधारित क्रिया *Imputable Act*
  - रचनात्मक व समाजोपयोगी क्रिया
    - नैतिक क्रिया
      - संपूर्ण मानव समाजाला मान्य असलेल्या सर्वसामान्य नैतिक क्रिया
      - देश–काल–परिस्थितीनुसार भिन्न भिन्न मानव समुदायांत विभिन्न असलेल्या समाजविशेषांच्या नैतिक क्रिया
  - विघटनात्मक वा समाज विरोधी क्रिया
    - अनैतिक क्रिया

ज्यावर त्यांची नैतिकता ठरते ते घटक

- क्रियेचा उद्देश *(Object)*
- क्रियेच्या भोवतालची परिस्थिती *(Circumstances)*
- क्रियेच्या कर्त्याच्या मनातील हेतू *(Purpose)*

या दोहोतील फरक जाणून घेणे महत्वाचे आहे. उदाहरणार्थ, -आत्म-हत्येच्या क्रियेमागील उद्देश मेंदूची शकले करणे हा आहे पण कर्त्याचा त्या मागील हेतू असह्य अशा जीवनापासून सुटका करुन घेणे हा होय दुसऱ्याच्या मालकीची वस्तु अन्यायाने घेणे ही चोरी ठरते. पण, अशी चोरी करुन त्याचा आरोप दुसऱ्याच व्यक्तीवर लादण्याचा हेतू असेल तर तो अधिकच गंभीर गुन्हा ठरेल.

केवळ एखाद्या क्रियेचे बाह्य स्वरुप पाहून त्या क्रियेचा उद्देश कळू शकणार नाही त्या क्रियेचा नैतिक कल्पनांच्या संदर्भात विचार करूनच त्याचे बरेवाईटपण ठरवावे लागेल. नैतिकदृष्ट्या ती घटना बरोबर आहे का ? हे पहावे लागेल. उदाहरणार्थ, :— दुसऱ्याचे पैसे खिशात टाकणे हे आक्षेपार्ह नाही म्हणता येणार. कारण मागे तात्पुरते दिलेले वा उसने घेतलेले पैसे दुसऱ्याचेच असू शकतात. पण, अन्यायाने पैसे लुबाडणे ही चोरी संबोधावी लागेल.

२. क्रियेच्या भोवतालची परिस्थिती – कोणत्या परिस्थितीत व्यक्तीकडून क्रिया घडली हे महत्वाचे असते उदा .— व्याख्यान वा कीर्तन सुरु असतांना मधूनच उठून जाणे योग्य नाही. परंतु डॉक्टरांना त्यांच्या राग्यातर्फे घाईने बोलावणे आले किंवा कुणाला अपघात झाल्याचे कळले व त्यामुळे जावे लागले, तर ते अर्थातच क्षम्य ठरते.

भोवतालची परिस्थिती खालील प्रमाणे बदल घडवून आणण्यास समर्थ असते.

अ) साधी क्रिया दोषपूर्ण होणे.

ब) मूळची दोषास्पद क्रिया अत्यंत गर्हणीय ठरणे.
उदा – चोरी करणे व तीही कुणा गरीबाच्या पैशाची.

क) साध्या गुन्ह्याचे स्वरूप दुप्पट गंभीर होणे . उदा :— ईर्षाध्यानात निमग्न स्त्रीवर आघात करणे.

ड) दोषपूर्ण घटना निर्दोष ठरणे; उदा :— जळत असलेल्या घराच्या लगतचे घर पाडणे जेणेकरून आग इतरत्र पसरू नये.

३. क्रियेच्या कर्त्याच्या मनातील हेतू :— हा हेतू लक्षात घेऊनच क्रियेचे मूल्यमापान करायला हवे. उदा:- देवाल्यात वा मशिदीत जाण्याची

क्रिया तशी स्तुत्य असली तरी तिथे जाण्याचा हेतू देव दर्शनाऐवजी इतर कोणता असेल तर तेवढ्या प्रमाणांत तिचे चांगुलपणात न्यून उत्पन्न होते.

उपर्निर्दिष्ट तिन्ही बाबी जर पुरेशा चांगल्या असतील तरच ती क्रिया नैतिक म्हणता येईल. यापैकी कोणती एकही बाब अयोग्य असेल तर तिला अनैतिक म्हणावे लागेल.

वरील तात्विक विवेचन वाचून एखादी क्रिया नैतिक आहे की अनैतिक, हे ठरविणे फारच क्लिष्ट आहे असे वरवर पाहता कुणास वाटेल. पण प्रत्यक्षात जेव्हा आपण एखाद्याचे वागणे पाहून " त्याने असे वागावयाला नको होते; त्याला असे करणे बरे दिसले नाही; त्याच्या कडून ही अपेक्षा नव्हती," या अर्थाचे उद्‌गार सहजपणे चटकन बाहेर पडतात, त्यावेळी ती क्रिया अनैतिक आहे असा आपल्या मनाने अचूक निर्णय दिला असतो. एखादी क्रिया नैतिक आहे की नाही हे बहुतेक वेळी आपल्याला विनासायास ठरविता येते. फारच क्वचित आपण संभ्रमात पडतो.

नैतिकता–एक स्थिर व कायम कल्पना

इतक्या सहजासहजी आपण हा निर्णय का देऊ शकतो ? हे कसे शक्य होते ? एकतर कोणत्याही क्रियेच्या इष्टानिष्टतेची ग्वाही मन तेव्हाच देत असते. सद्‌सद्‌विवेकबुद्धी नि:पक्षपातीपणे नैतिकतेचा निवाडा देते हे तर खरेच, पण त्याचे आणखी एक कारण असे की नैतिकता ही एक स्थिर स्वरुपाची कल्पना आहे. आणि अत्यंत मोठा कालावधी सोडला तर सामान्यात: ती कायम असते. त्यात सारखा बदल होत नसतो.

नैतिकतेचे रुढीत रुपांतर

एका विशिष्ट परिस्थितीत सर्व व्यक्ती सारख्याच रीतीने वागत असतात. नि तशी परिस्थिती बहुतेकांच्या जीवनात अनेकवेळा उद्‌भवत असते. त्यामुळे त्या प्रत्येक वेळी व्यक्ती एका विशिष्ट रीतीने वर्तन करीत असते. फार वेळां अशी क्रिया व्यक्तीला करावी लागली तर ती तिची एक सवयच होऊन जाते. ही सवय अंगी इतकी मुरते की त्या व्यक्तीच्या नकळत सहजपणे ती क्रिया घडत जाते. अशा एखाद्या क्रियेची समाजातील अनेक व्यक्तींना सवय जडली म्हणजे त्यालाच आपण

रूढी किंवा चालीरीती (*Custom*) म्हणू लागतो. उदा:– जेष्ठ व्यक्तींची प्रथमच भेट झाली किंवा परगावी जातेवेळी मोठ्यांचा निरोप घ्यायचा झाला, की पायाला स्पर्श करून लवून नमस्कार करण्याची पद्धत अशीच रुढ झाली. त्यामुळे कुणाही जेष्ठ आदरणीय व्यक्तीची भेट होताच खाली वाकून अभिवादन इतक्या स्वाभाविकपणे होते, की ती क्रिया केव्हा घडली याची जाणीवही आपल्याला रहात नाही. ती क्रिया बुद्धचा जाणीव ठेऊन, काही मुद्दाम करावी लागत नाही. त्याप्रकारे वागण्याची सवयच आपल्याला जडून जाते.'

नैतिकता व रूढी यामधील मुख्य भेद

तेव्हा चालीरीती व नैतिकता या दोन्ही बाबी अनेक वेळां एकच अर्थ ध्वनित करतात. चालीरीती या बहुधा नैतिकतेत मोडत असतात. नैतिक वागणूक ही मात्र नेहमी सामाजिक रुढी असेलच असे म्हणता येणार नाही. दोहोमध्ये एक प्रमुख फरक असतो. रूढी ही व्यक्तीच्या अंत:करणातच वास करीत असलेली एक भावात्मक शक्ती आहे आणि प्रसंगोपात्त तिचा आविर्भाव होत असतो. कोणतीही रूढी ही व्यक्तीच्या आंतरिक अनुभवाचा संचय असते व निमित्ताने त्याचे प्रगटीकरण होत असते. याउलट नैतिक नियम व्यक्तिबाह्य असतो. रूढीप्रमाणे अंतर्गत सवयींचे वागणुकीत झालेले बाह्य रुपांतर नव्हे; तर बाहेरील नियमांचे वागणुकीवर उमटलेले प्रतिबिंब होय. नैतिक नियमांचे अस्तित्व व्यक्तीच्या इच्छा अनिच्छेच्या निरपेक्ष असते. आपणावर त्यांचे अस्तित्व अवलंबून नसते. या नियमांना आधार असतो व्यक्तीच्या बाहेरचा; त्यामुळे नैतिक नियम आतून बाहेर प्रगट होतात असे म्हणण्यापेक्षा त्यांचेच व्यक्तीवर प्रभुत्व असते असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

नैतिकतेला पाठबळ प्रभुसत्तेचे

नैतिक मूल्यांच्या–व्यक्तीवर प्रभुत्व गाजविण्याच्या–या गुणामुळे अनेकांना त्यांचे मूळ अधिष्ठान ईश्वरी सत्तेवर आधारले आहे असे वाटते. ईशसत्ताच या नैतिकतेला एवढे प्रचंड सामर्थ्य प्रदान करीत असावी. अन्यथा नैतिक मूल्यांना यत्किंचितही तडा जाऊ नये म्हणून व्यक्ती तेवढाच प्रसंग पडला तर प्राणाचीही आहुती द्यावयास सिद्ध

होती ना ! नीतिमत्तेच्या मुळाशी प्रभुसत्तेचा भरभक्कम आधार असतो. म्हणूनच, प्राणार्पण करण्याची क्रिया फार आकर्षक वाटते म्हणून नव्हे, तर ईशसत्तेद्वारा झालेली आज्ञा म्हणून, व्यक्ती सहजपणे करावयास तयार होते.

सत्तेशिवाय शासन अशक्य

प्रभुसत्ता हा शब्द फार व्यापक अर्थाने येथे वापरला आहे. केवळ आस्तिकांच्या ईश्वरी सत्तेच्या भावनात्मक दृष्टीने नव्हे. सत्तेच्या अभावी कोणत्याही शासनाची कल्पना करता येत नाही. ज्यांच्यावर शासन करायचे त्यांच्यापेक्षा सत्ता श्रेष्ठ असावयास हवी. तिचा अधिकार व प्रभाव मोठा हवा. त्याशिवाय सत्तेच्या आधिपत्याखाली सत्ताधाऱ्याला शासन चालविणे अवघड आहे. उदा :— साधी शाळा म्हटली तरी तिच्या मुख्याध्यापकाला सत्ता असली तरच शाळेचे संचालन सुयोग्यरित्या करता येऊ शकेल. विद्यार्थ्यांना ही सत्ता, श्रेष्ठ वाटली पाहिजे व त्या सत्तेच्या अधिकारात मुख्याध्यापकाने केलेली आज्ञा त्यांनी पांळली पाहिजे.

लहानशा शाळेच्या व्यवस्थेला सत्तेची गरज पडते. मग या संपूर्ण विश्वाच्या संचालनाला व नियंत्रणाला सत्ताधिष्ठानाची (*One to whom the authority is assigned*) गरज नाही काय? त्याशिवायच या सृष्टीचा हा प्रचंड पसारा सांभाळला जात असेल काय ? अशा तर्कशुद्ध विचारानंतर मनुष्याला अशा सत्तेच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणे अपरिहार्य होते. मग त्याला कुणी कोणतेही नांव देवो. परंतु अशी सत्ता असली पाहिजे यावर श्रद्धा ठेवणे मानवाला भाग पडते. यालाच आस्तिक प्रभुसत्ता म्हणतात.

नैतिकतेचे पालन केवळ प्रभुआज्ञा म्हणून

ही सत्ताच सर्व नैतिकतेचा मूल स्त्रोत होय. या सत्तेच्या आधिपत्यामुळे नीतिमत्तेचे पालन होते. या सत्तेच्या दडपणामुळेच व्यक्ती नैतिक नियमांचे निमूटपणे प्रथमावस्थेत पालन करीत असते. प्रथमावस्थेत म्हणावयाचे कारण असे की, सुरवातीला व्यक्तीला अगतिकपणे नीतीचे अनुसरण करण्यास ही सत्ता भाग पाडत असली तरी पुढे त्या नियमाबद्दल व्यक्तीला प्रेमादर वाटू लागतो. व्यक्तीच्या व समाजाच्या कल्याणा-

साठीच हे नीति–नियम आहेत हे त्या नियमाच्या आचरणाने अधिकाधिक पटू लागल्याने त्यांच्या पालनाचा आग्रह व कडकपणा वाढू लागतो. ज्या सत्तेतून या नीतीचा जन्म झाला त्या सत्तेबद्दल आदर व श्रद्धा दुणावत जाते. आस्तिकाच्या दृष्टीने असलेल्या या प्रभुसत्तेविषयी तर त्याच्या उपासकाची निष्ठा एवढी जाज्वल्य असते की प्रभूची आज्ञा *[Commandments]* वा ईश्वराचीइच्छा*[will of God]*म्हणूनच केवळ नैतिकतेचे पालन करावे ही भावना प्रबळ होते. इतकेच नव्हे तर 'प्रभू आज्ञा' याशिवाय इतर कोणताही हेतू या नैतिक क्रियांना चिकटविला गेला तर तेवढ्या प्रमाणात त्याला गौणत्व आल्यासारखे साधकाला वाटते.

प्रभुसत्तेवरील श्रद्धेचा पगडा मानवाच्या नैतिक आचरणावर एवढा अनुकूल झालेला दिसून येतो, की ईश्वराचे अस्तित्वाची स्वत:सिद्ध जरुरी नसली तरी शहाण्यांनी मनुष्याच्या हितासाठी आवश्यक म्हणून तो निर्मिला तरी असला पाहिजे असे कुणी म्हटले तर आश्चर्य वाटावयास नको. *" If there were no God, it would be necessary to invent one "* हे व्होल्टेअरचे उद्‌गार प्रसिद्धच आहेत.

नैतिकतेचे दुसरे अविभाज्य अंग – नियमितता

याप्रमाणे नैतिकतेला जशी सत्तेची अपेक्षा असते तशीच असते नियमिततेचीदेखील. आपण यापूर्वी हे पाहिलेच आहे, की एखादी नैतिक क्रिया व्यक्तीला वारंवार करावी लागली की त्याची तिला सवय जडते. दैनंदिन जीवनात अनेक क्रिया एका विशिष्ठ वेळी पुन:पुन्हा रोज कराव्या लागतात. अशावेळी त्या नैतिक क्रियामध्ये नियमितपणा न आला तरच नवल. उदा:– शाळा किंवा नोकरीच्या जागी रोज वेळेवर पोहचणे हे नैतिक बंधन कटाक्षाने कुणी पाळत असेल तर त्याच्या या क्रियेत (सकाळी ११ वाजता पोहचण्याच्या बाबतीत) नियमितपणा आपोआपच येईल.

संयमाशिवाय नियमितता अशक्य

एखाद्या क्रियेत नियमितपणा आला म्हणजे काय ? एक विशिष्ठ क्रिया एका विशिष्ठ वेळी दर दिवशी होणे. अर्थात तशी ती व्हावयास

इतर कोणतीही क्रिया त्याचवेळी व्हावयास नको, हे ओघाने आलेच. नेमलेली क्रिया नेमलेल्या वेळी होण्यासाठी जीवनातील दररोजच्या व निमित्ताने उद्‌भवणाऱ्या – नित्य व नैमित्तिक – क्रियांवर एक प्रकारचा संयम ठेवावाच लागणार. आत्मसंयमन नैतिक क्रियांच्या नियमितपणाला आवश्यक आहे, हे वेगळे सांगायला नकोच. त्याचा परिणाम मनुष्याची स्वाभाविक लहर वा स्वैराचाराकडे असलेला कल ताब्यात ठेवण्यासाठी लागणारी इच्छाशक्ती बळकट करण्यामध्ये होतो.

रोजच्या जीवनात अशा प्रकारच्या नैतिक क्रियांची संख्या जेवढी अधिक असेल तेवढ्या प्रमाणात व्यक्तीचा दिनक्रम एवढा नियमिततेच्या सूत्रात बांधेसूद झालेला दिसून येईल, की एका प्रकारे सतत संयम करण्याची सवयच त्याला होऊन जाईल. अशा संयमाच्या सवयींनी सूत्रबद्ध झालेले जीवन सहसा अयशस्वी झालेले आढळत नाही. शुद्धाचरणाच्या अशा चांगल्या सवयी ही भावी उज्वल भवितव्याची हमीच होय. अनेक धर्माचार्यांनी – विशेषत: हिन्दू शास्त्रकारांनी – नित्य नैमित्तिक कार्याची एक मोठी जंत्रीच आपल्या अनुयायांच्या आचरणासाठी नमूद करुन ठेवलेली आढळते. त्याचे मुख्य कारण आत्मसंयमनाची सवय जडावी हेच तर नसेल ?

सारांश, नैतिकतेला सत्ता व नियमितता या दोहोंची अपेक्षा असते. या दोन्ही मूलभूत बाबींच्या अस्तित्वाशिवाय नैतिकतेची कल्पना करता येत नाही. कोणतीही शासनसत्ता मागे नाही मग नीतीचे पालन का म्हणून करावयाचे ? हा प्रश्न निरूत्तरित राहतो. अनियमित राहून आम्ही नैतिक जीवन जगू हे सामान्यत: संभवत नाही. तेव्हा अमूर्त सत्तेने मानवी कल्याणासाठी आज्ञापिलेल्या पूर्वस्थापित अशा आज्ञांचे नियमित पालन करणे याला नैतिकता म्हणता येईल.

नैतिकता व कायदा यांचा अन्योन्य संबंध

अर्थात नैतिकतेचे पालन हे बहुतेक वेळा ऐच्छिक असते. अपेक्षित नैतिक क्रिया न केली तर कायद्याने त्याला शिक्षा होईलच असे नाही. उदा :– शेजाऱ्यावर प्रेम करुन त्याला संकट प्रसंगी सहाय्य करणे किंवा घरी आलेल्या अतिथीचे प्रेमाने स्वागत करून त्याची यथाशक्ती

व्यवस्था ठेवणे. मात्र काही नैतिक बाबी या कायद्याच्याही कक्षेत येतात. त्यांचे पालन व्यक्तीने न केले तर शिक्षा होते. उदा:– स्त्रीचा विनयभंग न करणे. चोरी–हिंसा न करणे. तसेच काही क्रिया नैतिकतेत मोडत असूनही कायदेशीर दृष्ट्या गुन्ह्यास पात्र ठरतात. (सारणी क्र. ४ पहा.)

सारणी क्र. ४

नीती व कायदा

नीती व कायदा यांच्या संबंधाचे प्रमुख प्रकार

केवळ नैतिक | नैतिक व कायदेशीर बंधन | केवळ कायदेशीर

ऐच्छिक क्रिया | स्वेच्छेने वा सक्तीने करण्यास बाध्य अशा क्रिया | सक्तीने व्यक्तीवर लादलेल्या क्रिया

गुन्हा वा शिक्षा नाही; परंतु सामाजिक दूषण व ठपका | पालन न झाल्यास गुन्हा व म्हणून शिक्षा, व शिवाय सामाजिक अपराध व दूषण | कायदेशीर दृष्ट्या गुन्हा; नि म्हणून शिक्षा

कायद्यापेक्षा नैतिक बंधन श्रेष्ठ

नीतिमत्तेचा व कायद्याचा हा परस्पर संबंध पाहिल्यावर कुणाला असे वाटेल, की पहिला केवळ ऐच्छिक नैतिक नियम पालनाचा प्रकार सोडला, तर इतर दोन्ही प्रकारात मोडणाऱ्या क्रियांचे पालन (होकारात्मक वा नकारात्मक) शिक्षेच्या भितीने सर्वत्र होत असेलच. परंतु वस्तुस्थिती अशी नसते असा सर्वत्र अनुभव येतो.

याचे प्रमुख कारण असे की, कायद्याने सक्ती केलेल्या नियमांची मनाला आवश्यकता पटली नसेल तर प्रामाणिकपणे त्यांचे पालन

होत नाही. कुणाला कळणार नाही, अशा रीतीने या नियमांचे उल्लंघन करण्याची प्रवृत्ती वाढीला लागते व हे उल्लंघन सार्वत्रिक झाले तर तो कायदेशीर नियम केवळ नाममात्र राहतो. उदा :– हुंडा घेण्यावर घातलेली बंदी. सरीस सर्वत्र लग्न प्रसंगी तो स्वीकारला जातो व कायदा केवळ नावालाच राहिलेला आढळतो.

नैतिकतेचे बीजारोपण बालपणीच

याचा निष्कर्ष असा की नैतिकतेच्या व कायद्याच्या नियमांच्या काटेकोर पालनासाठी व्यक्तीच्या मनातच तसा भाव जागविला पाहिजे. समाजातील सर्व घटकांच्या अंत:करणावरच या नियमांचे महत्व बिंबवले पाहिजे आणि नैतिकतेचे हे बीजारोपण व्हायला हवे वयाच्या बालपणापासूनच ! नैतिकतेच्या विविध तात्विक पैलूंचे वरीलप्रमाणे थोडक्यात विवेचन केल्यानंतर ती व्यक्तीत बालपणीच कशा रीतीने विकसित करता येईल याचा आपण आता विचार करू.

(२) बालकांत नैतिकतेचा विकास

बाल शिक्षणाचे दोन विभाग

बालपणचे व्यक्तीचे जीवन दोन विभागांत प्रामुख्याने विभागता येईल. एक कौटुम्बिक व दुसरे शालेय. नैतिक घडणीला सुरूवात होते कौटुम्बिक वातावरणात. व तिचा शेवट होतो साधारणपणे वयाच्या २० व्या वर्षी शैक्षणिक जीवन संपण्याच्या सुमारास. या दोन अवस्थांमध्ये ग्रहण केलेल्या नैतिक संस्कारांच्या भरवशावरच भावी नैतिक जीवनाची काय ती उभारणी व्हावयाची. या वयानंतर व्यक्तीच्या जीवन धारणेत फारसा बदल होणे अपवादात्मकच. त्यामुळे नैतिक शिक्षणाचे महत्व या दोन्ही अवस्थांतील कालखंडात फार अधिक आहे.

(अ) कौटुम्बिक जीवनातील शिक्षण

पाळण्यापासून शिक्षणाला सुरूवात

शाळेत प्रवेश घेण्यापूर्वीच्या बालकाचा कौटुम्बिक जीवनाचा काल किती संस्कारक्षम असतो हे अद्याप फारसे कुणी लक्षात घेतलेले आढळत नाही. बाल्यावस्थेपासून शिक्षणास सुरवात झाली पाहिजे याचा अर्थ ते

पाळण्यापासून सुरू झाले पाहिजे. बऱ्याच मातापित्यांना, विशेषतः मातांना, हे वाचून आश्चर्य वाटेल ! पण हे अगदी सत्य आहे. लहान वयातील मुलाच्या स्वभावाची लक्षणे ही सुधारणेच्या पहिल्या अवस्थेतील मानवाच्या स्वभावाशी बरीचशी जुळणारी असतात. अप्रगत मानवाप्रमाणे बालांच्या भावना व कल्पना अविकसित व अप्रगल्भ असतात. त्यांच्यात एक प्रकारची विसंगती असते.

बालस्वभावाची प्रमुख लक्षणे

बालकांच्या स्वभावाची लक्षणे साधारणपणे अनुभवाला येतात ती अशी :—

१. **उत्तेजकता** :— बाह्यत अत्यंत क्षुल्लक वाटणारी बागणूक ही मुलाच्या दृष्टीने अत्यंत उत्तेजनकारक असते. उदा :— तान्ह्या मुलाकडे पाहून तुम्ही सहज चुटकी वा टाळी वाजवून स्मित केले की मूल उत्तेजित होऊन आनंदाने हासू लागते. किंवा रागावण्याचा नुसता आविर्भाव केला तरी दुःखी होऊन रडू लागते. या वयात त्याच्या अंतःकरणाच्या वृत्ती इतक्या कोमल व हळुवार असतात की त्यांना उत्तेजित होण्यास वेळ लागत नाही. बाह्य घटनांचा परिणाम लगेच त्यांच्या मनावर होतो.

२. **चंचलता** :— क्षणात इकडे तर दुसऱ्या क्षणी दुसरीकडे अशी बालमनाची धाव सतत सुरू असते. एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे धावण्याची त्याची गतीही प्रचंड असते. ती इतकी, की क्षणापूर्वी मोठ्याने रडत असलेले मूल आनंदाचे उत्तेजन मिळताच मोकळेपणाने हासू लागते. डोळ्यातून स्रवलेल्या अश्रुधारांतील आसवांची टिपे गालावर असतांनाच आलेल्या, मुलाच्या गोड हास्याचे, विलोभनीय दृश्य अनेकांनी पाहिले असेल. स्वभावाच्या अस्थिर व चंचल स्वभावचेच ते द्योतक होय.

३. **अनियमितता** :— वरील दोन्ही लक्षणांचा स्वाभाविक परिणाम म्हणजे अनियमितपणा. या, त्या विषयाकडे सारखी धाव घेण्याची जेव्हा अस्थिरता स्वभावात असते तेव्हा विवक्षित गोष्ट विवक्षित वेळी करण्याची प्रवृत्ती संभवत नाही.

स्वभावातील गुण

बालस्वभावातील वरील दोषाप्रमाणे खालील काही गुणही बाल-वयात प्रत्ययाला येतात.

१. प्रचंड ग्रहणक्षमता :- विषयग्रहणाच्या बाबतीत लहानपणचा एक वर्षाचा काळ हा मोठेपणीच्या एका वर्षाबिरोबर धरणे उचित होणार नाही. लहानपणी ग्रहणशक्ती जबर असते. पण ती टिकते मात्र थोडा वेळ. साधारणपणे १० वर्षापर्यन्त कान व वाचा ह्या दोन्ही इन्द्रियांचे परस्पर सहकार्य विलक्षण असते. कानांवर पडलेला एखादा शब्द जीभ चटकन उच्चारू शकते, जीभेने उच्चारलेला शब्द कानाच्या लवकर परिचयाचा होतो. त्यामुळे या वयापर्यन्त मुले दोन तीन भाषा सहज अवगत करू शकतात. त्यानंतर हीच गोष्ट करावयास त्यांना फार कष्ट पडतात. कारण वयाच्या वाढीबरोबरच सृष्टीतील विविध व्यवधानांमुळे इंद्रियजन्य आवडीनिवडी व विरोध उद्भवून एक प्रकारे ग्रहण शक्तीला अडथळा निर्माण होतो. वयाच्या दुसऱ्या वा तिसऱ्या वर्षी तो अजिबातच नसतो.

त्यामुळे वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सात वर्षापर्यंतचा काळ, हा मोठ्या माणसाच्या १५–२० वर्षाबिरोबर गृहीत धरणे आवश्यक आहे. कारण ३ ते ७ वर्षापर्यन्तच प्रामुख्याने नैतिक वर्तणूकीची बीजे पेरली जातात. म्हणूनच या वयात १० मिनिटे मुलाकडे लक्ष देऊन जे काम करवून घेता येते, तेच काम मोठेपणी तासभर लक्ष देऊनही होऊ शकत नाही. फक्त त्यांना अर्ध्या तासाचा १ पाठ देण्याएवजी १–५ मिनिटांचे सहा पाठ द्यावेत हे बरे. नाहीतर मूल कंटाळून जाते. परंतु लहान मुलाला अर्धा तासाची दिलेली शिकवण ही मोठ्या माणसाला दिलेल्या सहा तासांच्या शिकवणीएवढी ठरते हे लक्षात ठेवले पाहिजे.

२. अनुकरणशीलता :- भोवती असलेल्या व्यक्तींचे व विशेषत: मातापित्यांचे निरीक्षण मूल इतक्या बारकाईने करीत असते की, त्यांचे तंतोतंत अनुकरण ते लवकरच करू लागते. एका विशिष्ट परिस्थितीत

भोवतालची मंडळी जशी वागतात, तसे बालकदेखील न कळत वागू लागते. आई वडिलांची बोलण्याची किंवा वागण्याची एखादी वैशिष्ट्यपूर्ण लकब मुलाच्या इतकी अंगवळणी पडते की भावी जीवनात त्याच्या व्यक्तिमत्वाचे ते एक अविभाज्य अंग होऊन जाते. मुलांच्या स्वभावाचा हा विशेष लक्षात घेता अत्यंत लहानसहान बाबतीतही कुटुंबातील सर्व व्यक्तींनी मुलासमोर वागतांना किती जपले पाहिजे हे लक्षात येईल.

३. सवयीकडे प्रवृत्ती :– लहान वयात जडलेल्या सवयींचा मानवी वागणुकीवर फार प्रभाव पडत असतो. एखादी क्रिया अनेक वेळा, नियमितपणे विशिष्ट कालावधीपर्यंत केली गेली तरी, पुढे ती तशी पुनः पुन्हा करण्याचे देहाला व मनाला एकप्रकारे व्यसनच लागते. त्यांत झालेला थोडाही बदल मग त्याला खपत नाही. पुरत्या रुजलेल्या सवयींच्या बाबतीत थोडाही फेरफार व्यक्तीला चालत नाही. आपल्या टेबलावरील टेबललँप, पेपरवेट, फाउंटनपेन इ. वस्तू एका विशिष्ट जागी विशिष्ट पद्धतीने नीटनेटक्या ठेवण्याची सवय झालेल्या व्यक्तीला या सर्व वस्तू थोड्याही मागे पुढे झाल्या तरी आवडत नाहीत. प्रथम तो त्या वस्तू नेहमी प्रमाणे ठेवील नि मगच आपल्या कामाला सुरुवात करील.

लहान बालकांना दोन गोष्टीमधील बदल तर एकदम जाणवतो. आवतीभोवतीच्या व्यक्ती व स्थान या त्या दोन बाबी होत. आई आपल्या मुलाला घेऊन परक्या गावी काही दिवस रहावयास गेली तर ह्या गोष्टीची प्रचीती ताबडतोब येते.[५] कारण नित्याची भोवतालची मंडळी व जागा या दोहोत बदल झालेला असतो. त्यामुळे मूल एकदम बावचळल्यासारखे होते. ते आई सोडून कुणाही जवळ जायला तयार होत नाही. जागेतील बदलामुळे ते भेदरल्यासारखे आवतीभोवती बघत असते. एकूण वातावरणाती ल परकेपणा त्याला एवढा जाणवत असतो की, क्षणभरही आई सोडून ते राहायला तयार होत नाही. क्वचित झोपेतूनही ते किंचाळून उठते. आई जेव्हा त्याला विचारते, "अरे काय झाले तुला रडायला ?" तेव्हा ते आपल्या घराच्या दिशेने हाताने खूण करुन घराकडे चल असे दर्शवित.

सवयीद्वारे सुसंस्कार

यावरुन बाल्यावस्थेत चांगल्या सवयी लावण्याचे महत्व किती आहे हे लक्षात येऊ शकेल. बालवयातील बऱ्यावाईट सवयींचा माणूस एका अर्थाने गुलाम होतो. सवय त्याच्यावर सत्ता गाजवीत असते. एखाद्या व्यक्तीला कोणत्या सवयी आहेत हे पाहून त्याच्या सुसंस्कृततेचे मूल्य-मापन करणे फारसे कठिण नाही. म्हणूनच लहानपणी चांगल्या सवयी प्रयत्नपूर्वक निर्माण कराव्या लागतात कारण याच सवयींनी बालकावर संस्कार होत असतो; त्याचा स्वभाव बनत असतो. "*Habit is man's second nature*" ही उक्ती प्रसिद्धच आहे. योजनापूर्वक सवयीद्वारे केलेल्या या सुसंस्कारामुळे, कुसंस्कारांना आपोआपच प्रतिबंध निर्माण होतो. "तज्ज संस्कारोऽन्यसंस्कार प्रतिबन्धी" हे पतञ्जलीचे योगसूत्र हाच सिद्धांत विषद करते. लहानपणी केलेल्या याच सवयीमध्ये पुढे विनासायास 'माणूस' निर्माण करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

बालकांचे पशुवृत्तीशी साम्य

बालकाच्या स्वभाव विशेषांचे वरील विवेचन विस्ताराने करण्याचे कारण एवढेच, की त्याच्यावर संस्कार करण्याचे महत्व व त्याची दिशा दिग्दर्शित करता यावी. बालकाच्या या सर्व लक्षणांचे निरीक्षण केले असता बालपणातील ह्या सर्व वृत्ती पशुवृत्तीला साजेशा आहेत हे जाण-वल्याशिवाय रहात नाही. बालकांच्या हिताची एखादी गोष्ट आपण त्यांना सांगत असूनही मुले त्याला जो विरोध दर्शवीत असतात, तो केवळ त्यांच्या या सहज अशा 'पशुवृत्तीला' अनुसरुनच असतो. उदा: – न मानवणारी एखादी खाद्य वस्तू बालक मागू लागले असता आपण त्याला नकार देतो. परंतु त्याचे त्या वस्तुच्या प्राप्तीसाठी सतत प्रयत्न सुरू होतात. प्रथम ते त्या वस्तूसाठी हट्ट धरून बसते. मग मोठ्याने रडून अकांडतांडव सुरू करते. नंतर हात-पाय आपटण्याचा, झाडण्याचा प्रकार सुरू होतो. त्याची पशुवृत्ती जर फारच तीव्र असेल तर अद्वातद्वा बोलण्याचा वा हाती लागेल ती वस्तू फेकून मारण्याचा, त्याच्या हाती असलेला अखेरचा प्रयत्नही होतो.

मातापित्यांची नमते घेण्याची वृत्ती अपायकारक

बहुधा मुलांना आपले इप्सित साधण्यास एवढया अटीतटीला पोहचावे लागत नाही. मुलांचा रुद्रावतार पाहून पालक त्यांच्यापुढे केव्हाच शरणागती पत्करतात. आपल्या मुलाची प्रसन्नता व हासू आईवडिलांना एवढे प्रिय असते, की त्याच्या रडण्या ओरडण्याने ते नष्ट होऊ नये म्हणून थोडीही नाराजी पत्करण्यास ते तयार नसतात. या पालकांच्या हे लक्षात येत नाही, की असा हा मुलाचा विरोध त्याच्या उत्क्रांतीच्या वा विकासाच्या विरुद्ध असतो. बालपणीचे हे चुकीचे वळण मोठेपणी त्याला भलतेच हट्टी बनविण्यास कारणीभूत होते. कारण पालकाने आपल्या हट्टापुढे मान तुकविली हे त्याच्या चांगलेच लक्षात रहाते. व पुढे प्रत्येक बाबीत ते आईबापांना नमते घ्यावयास भाग पाडून आपले म्हणणे पुढे रेटत जाते व आईवडिलांचा सल्ला झुगारून देण्याची संवयच त्याला जडते. पुढे मुलगा बिघडल्याची तक्रार सुरू होते.

योग्य वेळी धाक, बालकाच्या हिताचा

कोणत्या मातापित्यांना मुलगा बिघडावा व आपल्या आज्ञेत नसावा असे वाटते ? वस्तुतः त्याच्या हितासाठी केवढाही स्वार्थत्याग करावयास ते तयार असतात. पण लहान वयात योग्य वेळी धाक दाखविण्याची दक्षता ते घेत नाहीत. 'लहान मुलाला काही समजत नाही' या चुकीच्या कल्पनेने त्याचे अवेळी लाड केले जातात. परंतु मुलापेक्षा आपल्या म्हणण्यासाठी थोडा अधिक हट्ट पालकांनी धरला तर त्याच्या पशुवृत्तीला इष्ट वळण मिळू लागते. असे वळण विविध प्रसंगाने सातत्यपूर्वक दिले गेले म्हणजे मुलाची पशुवत बंडखोर वृत्ती कायम होण्यापूर्वीच तो सुधारला जातो. आईवडिलांची अवज्ञा करण्याचे साहस त्याच्याने होत नाही. पशुवृत्ती शमत जाऊन मानवी धारणांचा उदय त्याच्या ठिकाणी झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

(ब) शिक्षण संस्थेतील नैतिक शिक्षण

शाळाप्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यामधील नैतिकता

नैतिक शिक्षणाची प्रक्रिया अशा रीतीने कौटुंबिक जीवनातच सुरू होते. पशुत्वाकडून मानवत्वाच्या दिशेने व्यक्तीची होणारी वाटचाल

म्हणजे नैतिक मार्गक्रमणच होय. बालवयातच त्याला या मार्गावर आरूढ करावयाचे असते आणि या मार्गावर बालपणीच आणून उभे करण्याची जबाबदारी असते मातापित्यांवरच ! ते जर त्या वयात घडले नाही तर पुढे त्याला चांगल्या मार्गावर लावणे, अतिशय कठिण होऊन बसते.

या पुढले कार्य असते शिक्षणसंस्थांचे. परंतु शाळेत प्रवेश घेतेवेळी विद्यार्थी नैतिकदृष्टचा 'पूर्ण कोरा' असत नाही. तर त्याच्या अंत:करणाच्या पाटीवर मातापित्यांनी नैतिक जाणीवेचे बरे वाईट चित्र, कौटुंबिक जीवनात रेखाटलेले असते. हे मातापित्यांनी आपल्या मुलाला वळण लावण्यासाठी कसे प्रयत्न केले यावर अवलंबून राहील. वरील सारख्या उदाहरणात, आईवडिलांची आज्ञा पाळण्याची सवय जर त्यांनी मुलाला लावली असेल तर, आत्मसंयमनाचा पहिला नैतिक धडा त्याला मिळालेला राहील. 'आत्मसंयम' हा तर नीतिमत्तेचा पायाच ! त्याची सवय जर मुलाला कुटुंबात लागली असेल, तर शिक्षकांचे पुढले कार्य कितीतरी सुकर होईल. उच्च नैतिक पातळी असलेल्या व नियमित कुटुंबजीवन जगणाऱ्या सात्विक आईवडिलांची मुले इतरांपेक्षा अधिक नैतिक जाणीव असलेली आढळतात. अशा मुलांच्या बाबतीत शिक्षणसंस्थांना कुटुंबात पूर्वीच सुरु झालेले नैतिक शिक्षणाचे कार्य केवळ पुढे सुरू ठेवायचे असते. अर्थात *" Teacher is the second parent and parent is the first teacher"* हे सूत्र शिक्षक व पालक या दोघांनीही नेहमी लक्षात ठेवायला हवे.

बिघडलेले मूल शाळेत सुधारणे शक्य– पण ?

परंतु अशी 'आत्मसंयमनाची' सवय व नैतिक जाणीव नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्याच समाजात अधिक असते. ह्याला कारण पालकांचे नैतिकदृष्टचा मूल सुधारण्याबाबतचे अज्ञान व त्यांचा आळस. यामुळे शाळेत येते वेळी मूल बिघडलेले असण्याचीच संभावना अधिक. भारतासारख्या यादृष्टीने मागासलेल्या देशात तर बालकांची स्थिती अधिकच अनुकंपनीय ! शिक्षणसंस्था, अशा नैतिकदृष्टचा खालावलेल्या, विद्यार्थ्यांना उन्नत करु शकते. मात्र त्यासाठी शाळेतील 'प्रभावी वातावरण व गुणी शिक्षक' यांची तीस जोड हवी. शाळेतील विद्यार्थी जेवढा अधिक

बिघडलेला व त्यांची संख्या जेवढी अधिक, त्या प्रमाणात त्याला सुधरविण्यासाठी शाळा व त्यांतील शिक्षक वर्ग अधिक प्रभावी असावयास पाहिजेत.

शिक्षण संस्थेचे प्रकार—सामान्य सूत्रे

नैतिकदृष्ट्या सुधारलेला व मागासलेला यांना अधिक उणा (+ −) या खुणांनी संबोधले तर आपणास शालेय संस्थांसंबंधी पुढील-प्रमाणे स्थूल स्वरुपाची सूत्रे मांडता येतील.

१. + विद्यार्थी + शिक्षक = सर्वोत्तम, उत्कृष्ट नीतिमत्ता
२. + विद्यार्थी ∠ − शिक्षक = खालावलेली नीतिमत्ता
३. + विद्यार्थी 7 − शिक्षक = मध्यम नीतिमत्ता
४. + शिक्षक ∠ − विद्यार्थी = खालावलेली नीतिमत्ता
५. + शिक्षक 7 − विद्यार्थी = मध्यम नीतिमत्ता
६. − विद्यार्थी − शिक्षक = अत्यंत खालावलेली, निकृष्ट नीतिमत्ता

बहुतेक भारतीय शाळा निकृष्ट

भारतात या दृष्टीने आज काय स्थिती आहे ? विविध शाळांतील अवस्थांचे आज जर सूक्ष्म निरीक्षण केले तर फारच थोड्या शाळा पहिल्या सूत्रात मोडणाऱ्या आढळतील. बहुतेक शाळांची स्थिती अखेरच्या सूत्राप्रमाणे निकृष्टच दिसून येईल. भारतात सर्वत्र विखुरलेल्या खेड्या-पाड्यातील प्राथमिक शिक्षणसंस्थांची जर यादृष्टीने पाहणी केली तर, एकूण शिक्षणाची केवढी शोचनीय दशा आहे हे सहज समजू शकेल.

शिक्षकाशी तादात्म्य पावण्याची वृत्ती

नैतिक शिक्षणाच्या दृष्टीने कुटुंबामध्ये जे मातापित्यांचे स्थान तेच शिक्षणसंस्थेमध्ये शिक्षकांचे. शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाशी संपूर्ण तादात्म्य पावण्याची प्रवृत्ती (*Principal of indentification*) विद्यार्थ्यामध्ये उपजतच असते. आपल्या शिक्षकांची तो लहान सहान गोष्टही उचलत असतो. हातात छडी घेऊन मुलगा जेव्हा " मी आता मास्तर झालो आहे " असे म्हणून अभिनय करीत असतो, तेव्हा तो आपल्या शिक्षकाची केवळ नक्कल करीत नसतो, तर त्या क्षणी, तो भावनेने प्रत्यक्ष शिक्षकच

झालेला असतो. शिक्षक दुस्वभावाचा, मारकुटा असेल तर विद्यार्थीही तसाच होतो व तोच शिक्षक सुस्वभावी, प्रेमळ असेल तर त्याचा विद्यार्थी त्या गुणांचेही अनुकरण करतो.

एक शिक्षक वा मातापिता शिक्षणास अपुरे

या विद्यार्थ्यांच्या तंतोतंत अनुकरणाच्या स्वभावामुळे एकाच शिक्षकाच्या हाती विद्यार्थी सतत असू नये. एकेकाळी भगवान पतञ्जली वसिष्ट, सांदिपनी, द्रोणाचार्य, यांसारखे श्रेष्ठ ऋषिवर्य विद्यार्थ्यांना गुरुवर्य म्हणून लाभत असत, त्याकाळी हा प्रश्न उपस्थित होत नसे, पण सद्य:स्थितीत कितीही उत्तम शिक्षण देण्यास एखादे कुटुंब समर्थ असले तरी ते कौटुंबिक शिक्षण अपूर्ण नि अपुरे ठरते. कारण अशा परिस्थितीत केवळ एक शिक्षक वा आईवडील यांच्या गुणावगुणांचे प्रतिबिंब मुलावर उमटते. या एक दोन व्यक्तींच्या साच्यात मुलांचे जीवन घडविल्यासारखे होते. विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण विकासाला त्यामुळे पुरेसा वाव मिळत नाही. म्हणून अनेक उत्कृष्ट शिक्षकांच्या व आदर्श व्यक्तींच्या संपर्कात या वयातील विद्यार्थी यावयास हवेत. म्हणजे त्यांच्या गुणांना व सामर्थ्यांला सीमा पडणार नाहीत. संपर्कात येणाऱ्या विविध शिक्षकांमधील चांगल्या गुणांचे ग्रहण ते करु शकतील.

तादात्म्य पावण्याचे कारण

शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाशी विद्यार्थी एवढा का बरे समरस होत असतो? शिक्षक सांगेल ते प्रमाण अशी भावना, त्याच्यामध्ये का उत्पन्न होत असते? शिक्षकाच्या पाठीशी सत्तेचे *(Authority)* अस्तित्व त्याला जाणवत असते हे त्याचे मुख्य कारण आहे. या जाणीवेमुळे विद्यार्थी शिक्षकांच्या उपदेशाने भारला जातो; त्याच्या वचनावर विश्वास ठेऊन असतो. शिक्षकाला त्याच्या पेशामुळे मिळणाऱ्या या सत्तेचे मूळ कशात आहे? केवळ वडीलकीच्या नात्यामुळे, शारीरिक व मानसिक सामर्थ्यामुळे वा अवज्ञा केल्यास शिक्षा करण्याच्या अधिकारामुळे? काही अंशी या बाबी त्याला सहाय्यक ठरतात हे तर खरेच. पण ही सत्ता उत्पन्न, होते मुख्यत: शिक्षकाच्या अंतर्गत सामर्थ्यामुळेच! स्वत:च्या

नैतिक उत्कर्षाद्वारे त्याला प्राप्त झालेल्या आत्मविश्वासामुळेच, या सत्तेचे पाठबळ वाढत असते.

नैतिकतेचे माध्यम – शिक्षक

ज्याप्रमाणे धर्मतत्वांचा अर्थ उलगडण्यासाठी आचार्य असतात त्याप्रमाणे, नैतिक मूल्यांचे स्पष्टीकरण शिक्षकाद्वारे होत असते. धर्म–तत्वांचा अर्थ स्पष्ट होण्यास ज्याप्रमाणे आचार्यांची श्रेष्ट वागणूक कारणीभूत होते, तद्वतच नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यास शिक्षकांच्या आचारविचारांची उंची अभिप्रेत असते. कारण कोणतेही नैतिक तत्व म्हटले तरी त्याला स्वयंभू असे अस्तित्व कुठे असते? अखेर हे तत्व प्रगट होते, ते शिक्षकांच्या माध्यमातूनच! शिक्षक प्रतिपादित असलेल्या नैतिक नियमांना, जे काही सामर्थ्य वा सत्ता असते ती प्रामु–ख्याने त्यांच्या स्वत:च्या आचरणाच्या प्रभावामुळे ! नैतिक नियमांना शिक्षकांच्या आंतरिक वा बाह्य जीवनातील आचरणात जेवढे उच्च स्थान असेल, तेवढा त्यांच्या शिकवणीचा प्रभाव विद्यार्थ्यांवर अधिक पडेल.

विद्यार्थ्यांला, सक्तीने नव्हे तर, स्वेच्छेने नैतिकतेचे पालन करण्याची इच्छा व्हावी असे जर शिक्षकास वाटत असेल तर त्याच्या ठायी आविर्भूत झालेल्या या सत्तेचा प्रकाश त्याच्या आचरणाद्वारे अधिक तेजस्वी व्हावयास पाहिजे. तसा तो वृद्धिंगत होण्यास, शिक्षकाच्या अधिकारात वाढ करण्याऐवजी, त्याच्या काही गुणांतच वृद्धी केली पाहिजे.

नैतिक नियमाच्या बाबतीत ठाम भूमिका

या नैतिक सत्तेच्या प्रभावी प्रगटनासाठी शिक्षकाला स्वत:ला या सत्तेची जाणीव, विद्यार्थी सहवासात असतांना, असली पाहिजे. कोणत्याही प्रसंगी निश्चित निर्णयात्मक भूमिका त्याने घेतली पाहिजे. त्याच्या वागण्यात व बोलण्यात कधीही नैतिक मूल्यासंबंधी संदिग्धता व्यक्त व्हावयास नको. काही किमान नैतिक नियमांच्या बाबतीत त्याची भूमिका ठाम निश्चयाची असली पाहिजे. त्या विषयी त्याने कधीही तडजोड करता कामा नये. शिक्षकाच्या मनात काही मूल्यांच्या बाबतीत संशय

निर्माण झाला आहे वा त्या मूल्यांवर आपल्या शिक्षकाचा पूर्ण विश्वास नाही, हे विद्यार्थ्याच्या लक्षात येताच त्याच्या मनांत रुजत चाललेल्या त्या मूल्यांना हादराच बसतो.

शिक्षक सर्वज्ञ असल्याचा भाव

आपले शिक्षक कधीही कोणतीही चूक करू शकत नाहीत व चुकीचे सांगणार नाहीत, अशी विद्यार्थ्याची बालपणी एवढी ठाम श्रद्धा असते की प्राथमिक शिक्षक हा जणू सृष्टीतील सर्व ज्ञानाचे भांडारच आहे असे त्यास वाटत असते. " अग आई, तुला काय माहित आहे ? आमच्या बाईंनीच तर असे परवा वर्गात सांगितले ! " या पहिल्या दुसऱ्या वर्गातील आपल्या मुलीचे बोबडे विधान जेव्हा आपण ऐकतो, तेव्हा तिचा अविर्भाव असा असतो की जणू जगाच्या पाठीवर आपल्या मास्तर बाईना खोडून काढील असे कुणी अस्तित्वातच असू शकत नाही! या मुलीच्या वाक्यातून शिक्षकावर जी अढळ श्रद्धा प्रगट होते, ती त्या पदांत अनुस्यूत असलेल्या सत्तेचीच द्योतक असते. शिक्षकाच्या पेशासोबत अनुषंगाने आलेल्या या सत्तेमुळेच शिक्षकाविषयी हा विश्वास प्रगट होतो. अनेकदा आईवडिलावरील विश्वासापेक्षाही तो अधिक असतो. गणितातील एका विख्यात विद्वानाच्या मुलाने एकदा आपल्या वडिलांना त्याला जमत नसलेले गणित सोडवून मागितले. इतर कामात व्यस्त असल्याने त्यांची थोडी दिरंगाई झाली मुलाचे गणित सोडविण्यास. ते आपलेकडे चटकन लक्ष देत नाहीत असे पाहून ते चिरंजीव आपल्या गणितज्ञ बापाला विचारतात, " बाबा, तुम्हाला हे गणित येत नसेल तर तसं लौकर सांगा. म्हणजे उद्या मी ते आपल्या मास्तरांना विचारून घेईन. " प्रसंगी ज्याचा सल्ला आपण घेऊ शकू असा सर्वात जवळचा माणूस म्हणजे शिक्षक ही असते त्याची यथार्थ भावना [१].

बालमनातील शिक्षकाच्या प्रतिमेला धक्का

बालपणचा हा ज्ञान ग्रहणास उपयुक्त असा शिक्षकाविषयीचा भाव पुढे कमी कमी होत जातो. घरी – दारी शिक्षकाविषयी व्यक्त होणारा अनादर, समाजातील त्याचे गौण स्थान, शिक्षकाचा शाळेबाहेर दृष्टीस पडणारा सदोष आचार व अशाच अनेक गोष्टीमुळे बालमनातील शिक्षका-

वेषयीची सुंदर प्रतिमा डागळली जाते. आणि असे होणे शिक्षकापेक्षाही समाजहिताला अत्यंत घातक होय !

'श्रद्धावाँल्लभते ज्ञानं'

कारण सामाजिक नीतिमत्तेच्या दृष्टीने मातापित्यानंतर जर कुणाचा विशेष प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असेल तर तो अशा डागाळलेल्या प्रतिमेच्या शिक्षकांचाच ! या अध्यापकाविषयी अविश्वास, अश्रद्धा ही त्याच्या प्रगतीला घातक ठरते. अध्यापक आपल्या अनैतिक वागणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या श्रद्धेस अपात्र ठरणे हे विद्यार्थ्यांस व समाजहितास अत्यंत मारक होय. 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानं', श्रद्धेशिवाय ज्ञान संभवत नाही.[१०] आई, वडील वा गुरु यांच्या विषयींच्या श्रद्धेला तडा गेला की मनात उत्पन्न होतो संशय ! या संशयाच्या भुंग्याने एकदा का हृदयाचे घर पोखरायला सुरुवात केली की, उपदेशिलेल्या ज्ञानावर विश्वास वसत नाही; अशा अज्ञानी माणसाला सुख प्राप्त होत नाही. नि 'संशयात्मा विनश्यती' हे गीतोक्त वचन अनभवाला येते.

विद्यार्थ्यांच्या काही पिढ्या अशा अश्रद्ध निपजल्यामुळे, शिक्षकाबद्दल प्रथम हेटाळणी व पुढे पुढे अवज्ञा, अशी अवस्था निर्माण झाली. ह्यातूनच पुढे सारासारविवेक नसलेल्या बंडखोर विद्यार्थ्यांची जात जन्माला आली !

बेशिस्त शाळेचे भयंकर परिणाम

शाळेतील वर्ग म्हणजे एक प्रकारे समाजाचे छोटे दृश्य स्वरूपच असते. समाजाचा ज्याप्रमाणे एक विशिष्ट नैतिक दर्जा व गुण विशेष असतो त्या प्रमाणे प्रत्येक वर्गाचाही विशिष्ट दर्जा असलेला आढळतो. त्या वर्गातील विद्यार्थी व शिक्षक ह्यांच्या परस्पर धारणेवर, निष्ठेवर, वर्गांतल्या नैतिक दर्जाची उंचनीचता अवलंबून असते. शिक्षक मुख्यत: स्वत:च्या जीवन-मूल्यांच्या व मूलभूत तत्वांच्या बाबतीत किती खंबीर व निष्ठावान आहे यावर बरेचसे ठरत असते. तो जर ढिला, विद्यार्थ्यांच्या कलाने वागणारा व आपल्या अधिकाराची यथायोग्य जाणीव न ठेवता वावरणारा असेल तर वर्गाचा नैतिक दर्जा खालावतो. कुटुंबातल्यापेक्षाही वर्गात मुलांना

सैल सोडण्याचे परिणाम फार भयंकर स्वरूप धारण करतात. कारण त्याच्या वर्गात तो, कुटुंबातील घटकाप्रमाणे त्याच्या वयाचा, एकटा नसतो. समूहाच्या मानसशास्त्राप्रमाणे 'समुदायाचा' तो एक घटक असतो. समुदायाच्या प्रवृत्ती तो स्वीकारतो. या वर्गाच्या समुदायात काही थोडे विद्यार्थी जरी वरील बंडखोर जातीतले असले तरी, एक सडका आंबा ज्याप्रमाणे इतर सर्वांना कीड लावतो त्याप्रमाणे, इतर विद्यार्थ्यांत त्यांच्या विघातक प्रवृत्तीचे लोण पोहचायला वेळ लागत नाही. मग ऐन युवावस्थेत असलेली ही विद्यार्थ्यांची सामुदायिक शक्ती कसले तरी निमित्त करुन रस्त्यावर येते. अन्यायाचे परिमार्जन करण्याचा आव आणून ती नैतिकतेचे सर्व बंध तडातड तोडते. सभ्यतेच्या सर्व सीमा-रेषा ओलांडते. सार्वजनिक संपत्तीची व जीविताची प्रचंड हानी करते. एकटचाने करण्याचे जे धाडस कधी मनातही आले नसते, ते सर्व अनिष्ट प्रकार गर्दीतील समाजाप्रमाणे असा बेशिस्त पण संघटित विद्यार्थी वर्ग सहजपणे करुन जातो.

नियंत्रित वर्गच समाजहितपोषक

कोणत्याही शिस्तीशिवाय असलेला वर्ग हा एक प्रकारे रस्त्यावरील गर्दीप्रमाणेच नव्हे तर काय? वस्तुतः गर्दीपेक्षाही शाळेतील एखादा वर्ग वा सर्व विद्यार्थी अधिक संघटित, एकजीव व एकसम असतात. कारण त्यांनी एकत्रित जीवन जगलेले असते व त्यांच्या सुखदुःखाची कारणे समान असल्याने त्यांच्या उत्तेजनाचे विषय एकच असतात. या त्यांच्या सर्व वैशिष्ठ्यांचा कुशलतेने उपयोग करून त्यांना, त्यांच्या समुदायाला इष्ट असे वळण लावले तर या सर्व विद्यार्थी वर्गाला विधायक अशा सत्कार्याला जुंपता येऊ शकते. पण जर शिक्षकाला हे साधले नाही तर, या विद्यार्थी वर्गाचे अधःपतन होऊन, तो वर्गच सामाजिव स्वास्थ्य बिघडविण्यास कारणीभूत होतो. ज्याप्रमाणे एखादे राष्ट्र नियंत्रित व योग्यरीत्या शासित असेल तरच ते सुखी होते, त्याच प्रमाणे जो वर्ग शील व शिस्त यांनी युक्त असतो तोच समाजहित पोषक ठरतो.

नैतिक शिक्षणाच्या दोन पद्धती – पहिली पद्धत

विद्यार्थ्याला नियंत्रित ठेऊन नैतिक शिक्षण देण्याच्या दोन पद्धती साधारणपणे सुचविता येतील. पहिली पद्धत वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांच्या पशुवृत्तीस अनुसरून आहे. या पद्धतीचे होकारात्मक व नकारात्मक असे आणखी दोन उपप्रकार पडतात. होकारात्मक प्रकारांत विद्यार्थ्यांना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हे सांगून तसे केले तर त्यांना बक्षिसाचे प्रलोभन दाखवावे व न केले तर त्यांना शिक्षेची भीती दाखविण्यात यावी. नकारात्मक प्रकारांत कोणत्या गोष्टी न कराव्यात हे सांगून त्या हट्टाने केल्या तर शिक्षा होईल, असे बजावले जावे.

साधारणत: जनावरांच्या बाबतीत या पहिल्या पद्धतीचा अवलंब केला जातो. सर्कशीतल्या चालकाचा किंवा पशुपागांवरील अधिकाऱ्यांचा अनुभव या पद्धतीला अनुमोदन देईल. हत्ती, घोडा किंवा उंट यांच्याकडून करुन घ्यावयाच्या अनेक लहान मोठ्या कामाचे शिक्षण देण्यासाठी याच पद्धतीचा अवलंब केला जातो. पुढे पुढे ही सर्व कामे त्यांच्या इतक्या अंगवळणी पडून जातात की त्यांची ती सहज प्रवृत्ती बनून जाते.

दुसरी पद्धत

दुसरी पद्धत पशुवृत्तीचे शमन होऊन मानवी प्रवृत्ती उदित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असते. या पद्धतीत विद्यार्थ्यांच्या अंत:करणावर एक विचार असा बिंबविण्यात येतो की, " अमुक करणे तुला शोभणार नाही. तसे तू केलेस तर त्यामुळे तुला कमीपणा येईल." तसेच दुसरा विचार जो रुजविण्यात येतो तो असा की, " अशी गोष्ट तू केलीस तर ती सर्वांना कल्याणकारक होईल व त्यामुळे तुला समाजात प्रतिष्ठाही मिळेल. इतकेच नव्हे तर त्यापेक्षाही मोठे बक्षीस म्हणजे समाजहित साधल्यामुळे तुला मिळणारा आनंद होय." अर्थात सुविचारी व सत्प्रवृत्त विद्यार्थ्यांच्या बाबतीतच या शिकवणीचा उपयोग. 'शहाण्याला शब्दाचा मार' या म्हणीचे प्रत्यंतर या प्रकारात येते. (पुढील पृष्ठावरील सारणी क्र. ५ पहा.)

सारणी क्र. ५

नैतिक शिक्षण पद्धती

विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या दोन पद्धती

(१)	(२)
पशुवृत्ती प्रभावी असलेल्यासाठी.	मानवी प्रवृत्तीचे प्राधान्य असलेल्यासाठी.
उपदेश:—	उपदेश:—
(अ) होकारात्मक *(Positive)*	(ब) नकारात्मक *(Negative)*
"ही गोष्ट तू करावी. न केल्यास शिक्षा-केल्यास बक्षीस मिळेल."	"अस करणं वाईट आहे. ऐकलं नाहीस तर शिक्षा होईल."
	"हे करू नकोस. केल्याने कमीपणा येईल. हे कर. केल्याने प्रतिष्ठा मिळेल; समाजहित केल्याचा आनंद हे सर्वात मोठे बक्षीस."

बहुसंख्य समाजाला पहिली पद्धत उपयुक्त

या दोन्ही पद्धती विद्यार्थ्याप्रमाणेच मोठ्यांनाही लागू होतात. कारण अनेक वेळा, वयात व माहितीपर ज्ञानात वाढ झाली तरी, लहाणपणीची स्वाभाविक पशुवृत्ती, सुसंस्कारांच्या अभावी, फारशी बदलत नाही. त्या-मुळे वय वाढले असले तरी नैतिक पातळी मात्र खालीच असते. दुर्दैवाने निम्न नैतिक पातळीचे लोक जगात फार. अशांना लहान मुलाप्रमाणे समजून पहिल्या पद्धतीचा अवलंब करुन सुधारणे आवश्यक असते. या गटात मोडणारा बहुसंख्य समाज डोळ्यासमोर ठेऊनच विभिन्न धर्मातील नैतिक कल्पनांची उभारणी झालेली दिसून येते. उदा :— सत्यनारायणाची वा तत्सम धर्म क्रियांची फलश्रुती. अशा क्रियेमुळे मनातील आस्तिकतेचा

व समष्टिजीवनाचा भाव उद्दीपित होण्यास केवढे तरी सहाय्य होते ! परंतु केवळ तेवढ्यासाठी काही सामान्य माणूस निरपेक्ष भावनेने हे धार्मिक विधी करावयास तयार होत नाही. म्हणून ही फलश्रुतीची योजना !

सकाम क्रियांचे रुपांतर निष्कामतेत

अर्थात या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की कशाच्या तरी लोभाने वा भीतीने केलेल्या या क्रियांचा उपयोग केवळ व्यक्तीला वळण लावण्यापुरताच होतो. सकाम होणाऱ्या या गोष्टी हळूहळू निष्कामपणे व्हाव्यात असा प्रयत्न होणे जरुर आहे. मनुष्याची सर्व वागणूक समजून उमजून मनापासून होऊ लागेल तेव्हाच खरी सुधारणा झाली असे म्हणता येईल. मात्र हे विसरुन चालणार नाही की अशी सुधारणा सर्व मानवांची होणे दुष्प्राप्य आहे. म्हणून दुसरी पद्धत काही निवडक लोकांसाठी लावून पहिल्या पद्धतीचाच उपयोग बव्हंशी समाजासाठी करावा लागेल. मेंढरांप्रमाणे सर्वांना एकच एक पद्धत लाऊन चालणार नाही.

बहुसंख्य विद्यार्थ्यांना व समाजाला ज्या शिक्षेचा धाक व बक्षिसाची आशा नैतिकतेच्या पालनासाठी आपण दाखवीत असतो त्याचे थोडे अधिक विवेचन करणे अनुचित होणार नाही.

(क) शिक्षा व बक्षीस तत्व

(क १) शिक्षा - तत्व *(Principle of Punishment)*

सत्ता क्षीण होण्यापासून बचाव

शिक्षा करण्याचा अधिकार शिक्षकाला सत्ता प्रदान करीत असतो अशी अनेकांची चुकीची धारणा होते. वस्तुतः शिक्षेच्या संभवाची भावना विद्यार्थ्याला शिस्तीपासून विचलित होण्यापासून रोखते; शिस्तीत वागायला प्रवृत्त करते. त्यामुळे सत्तेची भावना टिकून राहण्यास सहाय्य होते. शिक्षेची शक्यता अजिबात नाही अशी आपण क्षणभर कल्पना करू. परिणाम काय होईल ? पशुवृत्तीकडे झुकणारा सामान्य विद्यार्थी शासन होण्याचे भय नाहीसे होताच बेशिस्त वागू लागेल.

कोणत्याही नियमांचे पालन करणार नाही. असे अनियंत्रितपणे बरेच विद्यार्थी वागू लागले तर शिक्षकाला प्राप्त असलेल्या सत्तेलाच पदोपदी आव्हान दिले जाऊ लागेल. शिक्षकाच्या म्हणण्याला, उपदेशाला कुणी विचारीनासे होईल. त्याच्या पाठीशी असलेली 'अमूर्त प्रभुसत्ता' क्षीण होत जाईल.

सार्वत्रिक पालनाने सत्तेला बळकटी

असा प्रत्यय आपल्याला शिक्षण संस्थांत अनेकदा येतो. शाळेच्या नियमांचे पालन सर्वांकडून सार्वत्रिकपणे होत आहे हे जेव्हा नव्याने प्रवेश घेणारा विद्यार्थी पाहातो तेव्हा, त्या नियमांचे महत्व व त्या नियमांमागे संस्थेच्या सत्तेचे असलेले सामर्थ्य, या दोहोंची त्याला आपोआपच जाणीव होते. शिक्षकाला ती वेगळी देण्याची गरज पडत नाही. या उलट मुख्याध्यापकांनी अनेक वेळा सूचना लाऊन व शिक्षकांनी कानी कपाळी ओरडूनही सर्व विद्यार्थ्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असेल तर नव्या विद्यार्थ्यांवर त्याचा काही एक परिणाम होत नाही. इतराप्रमाणे तोही नियमांचे पालन करीनासा होतो.

भक्तावरुन देवाचे व विद्यार्थ्यावरुन शिक्षकाचे अनुमान

शेकडो भक्तांची श्रद्धा व निष्ठा यामुळे दगडाला देखील देवपण येते. त्या देवाबद्दल त्याच्या उपासकांच्या मनात वसत असलेला प्रेमादर व विश्वास पाहून एखादा नास्तिक देखील भाराऊन त्या देवापुढे नतमस्तक होतो. देवाला देवपण त्याच्या भक्तामुळे येते. जेवढा भक्त मोठा तेवढा त्याचा देव मोठा. अशीच काहीशी स्थिती शिक्षक व त्यांच्या शिष्यांची असते. शिक्षकाविषयीचे प्रेम व विश्वास त्याने केलेल्या आज्ञापालनातून व्यक्त होतो. जितक्या अधिक विद्यार्थ्यांकडून जेवढे शिस्तीचे काटेकोर पालन जास्त, तितके शिक्षकाचे स्थान व त्याच्या सत्तेचा प्रभाव अधिक. विद्यार्थी कसा आहे हे पाहून शिक्षकाचे अनुमान लावता येऊ शकते.

तेव्हा शिस्त पालनातून सत्तेचा प्रभाव वाढविण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो तो आज्ञांची अवज्ञा करणाऱ्यांचा. तो अडथळा दूर करण्या-

पुरता शिक्षेचा उपयोग! आज्ञाभंगामुळे सत्तेच्या प्रभावामध्ये आलेली क्षीणता भरून काढणे वा पूर्ण करणे, हाच शिक्षा करण्याचा मुख्य हेतू.

नैसर्गिक परिणाम हीच शिक्षा

काहींचे मत असे आहे की, चालू पद्धतीनुसार विद्यार्थ्याला शिक्षा केली जाऊ नये. त्याच्या चुकीचा नैसर्गिक परिणाम म्हणून जो काही त्रास सहन करावा लागेल त्यालाच शिक्षा मानण्यात यावे. उदा :— विद्यार्थी वसतीगृहातील आपल्या खोलीच्या खिडकीची कांच फोडतो. अशा वेळी ती काच पुन्हा न लावता, त्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या थंडी पावसाचा त्रास हीच त्याला झालेली शिक्षा समजण्यात यावी. या चुकीचा परिणाम भोगावा लागल्याने तो असल्या चुका पुन्हा करणार नाही.

मतपुष्टचर्थं दोन युक्तिवाद

या शिक्षा प्रकाराच्या पुष्टचर्थं दोन युक्तिवाद पुढे करण्यात येतात. एक तर या प्रकारामुळे मनापासून तो नैतिक नियमांचे पालन करील. कारण त्यांचे उल्लंघन केल्याने होणाऱ्या दुष्परिणामांचा अनुभव त्याने घेतलेला असतो. दुसरे असे की शिक्षा करणाऱ्या शिक्षकाविषयी व्यक्तिगत आकस उत्पन्न होण्याचा या पद्धतीत संभव नसतो.

परंतु व्यवहारात हे लाभ दृष्टोत्पत्तीला येत नाहीत. कारण विद्यार्थ्यांच्या हातून घडलेली चूक व त्याचे नैसर्गिक दुष्परिणाम यांचा परस्पर कार्यकारणभाव समजण्यास लागणारी वैचारिक पात्रता विद्यार्थ्यात असतेच असे नाही. दुसरे म्हणजे प्रत्येक चुकीचे दुष्परिणाम असे तात्काळ दिसून पडतील असे हमखासपणे म्हणता येत नाही.

सारांश, विचारी व समजूतदार विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही प्रसंगी जरी ही पद्धत अंमलात आणणे योग्य असले तरी सामान्यत. चाल शिक्षापद्धत अधिक उचित ठरते.

(क २) बक्षिस तत्व

प्राणार्पण करुन प्रभुसत्तेबद्दल आदर

एखादे 'अनैतिक कृत्य' घडल्याने व्यक्तीची प्रतिष्ठा खालाऊन सामाजिक 'दूषण' तिला प्राप्त होते. त्याचे बाह्य स्थूल स्वरुप म्हणजे तिला

दिलेली 'शिक्षा' होय. तद्वतच सहसा कुणी न करण्यास धजावणारे साहसी 'नैतिक कृत्य' एखाद्या व्यक्तीकडून घडल्यास त्या व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा वाढून सामाजिक 'भूषण' म्हणून ती गणली गेली पाहिजे. आणि ह्याचे बाह्य स्वरूप म्हणजे तिला प्राप्त होणारे 'बक्षीस' होय. शिक्षेच्या भीतीने अनैतिक वर्तन करायला व्यक्ती ज्याप्रमाणे धजत नाही, त्याप्रमाणे बक्षीसामुळे मिळणाऱ्या बहुमानासाठी एखाद्या विशेष स्वरूपाची नैतिक क्रिया करून लौकिक प्राप्त करावा, असे समाज घटकास स्वाभाविकपणे वाटते. आणि हे मनुष्य स्वभावास धरूनच आहे. बक्षीसाच्या आशेने मनुष्याच्या हातून घडत असलेली क्रिया म्हणजे एकप्रकारे नैतिकता ज्या मूळ प्रभुसत्तेतून प्रस्फुटित होते त्या सत्तेविषयी व्यक्त केलेला आदरच होय. अशा क्रिया या सत्तेला अधिक वळकटी आणतात. उदा:— घराला आग लागली असता स्वत:चा जीव धोक्यात टाकून बालकाचा प्राण वाचविणे; अनेकदा तर अशा प्रयत्नात व्यक्ती आपले प्राणार्पण करून इतरांच्या कल्याणासाठी झटत असते. अशा प्रसंगी प्रभुसत्तेसाठी आत्मसमर्पणाची दृगोचर होणारी वृत्ती या अंतिम सत्तेचे मोल सामाजिक दृष्टीने केवढे तरी वाढवीत असते !

नैतिक कृतींबद्दल बक्षीस नाही

परंतु आश्चर्य असे की अशा प्रकारे सर्वस्वत्यागास सिद्ध असलेल्या व्यक्तीच्या बहुमानाची वा बक्षिसाची व्यवस्था समाज वा शासनाने त्या मानाने केलेली नसते. अत्यंत लहानसहान गुन्ह्यांची नोंद करून त्यासाठी कायद्याने शिक्षा सांगून ठेवल्या आहेत. पण ज्यामुळे असे गुन्हे करण्याकडे प्रवृत्तीच होणार नाही व काही चांगले करण्यास हुरूप येईल अशी सद्वर्तनाबद्दल बक्षीस देण्याची मात्र सोय कायद्यात केलेली नसते. त्यामुळे चुकून दुसऱ्याच्या हद्दीत प्रवेश केल्याबद्दल *(trespass)* वा चुकीच्या बाजूने वा अती वेगाने वाहन नेण्याच्या क्षुल्लक गुन्ह्यासाठी दंड केला जातो. पण चार गुंडांना थोपवून भगिनीच्या अब्रूचे रक्षण केल्याबद्दल वा प्रत्यक्ष वाघाशी दोन हात करून नागरिकांचे प्राण वाचविल्याबद्दल कोणत्याही बक्षिसाची तरतूद मात्र कुठेच आढळत नाही.

शिक्षण संस्थांतही बक्षिसांची उपेक्षा !

सामाजिक विचारसरणीचे हेच प्रतिबिंब शिक्षण संस्थेतही उमटलेले आढळते एखाद्या महाविद्यालयाचे माहिती पत्रक *(Prospectus)* आपण जरी वर वर चाळले तरी, " अमुक केले नाही तर इतका दंड होईल. अमुक केले नाही तर तो गंभीर गुन्हा समजण्यात येऊन त्याबद्दल कॉलेजातून नांव काढले जाऊ शकेल " अशी नकारात्मक गंभीर भाषाच अधिक व विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना आवाहन करुन त्यांना उत्तेजन देणारी बक्षिसांची योजना मात्र नावालाच दृष्टीस पडते !

केवळ शारीरिक व बौद्धिक स्पर्धांसाठी बक्षिसे

त्यातून जी काही थोडी बक्षिसे शिक्षण संस्था दरवर्षी वाटतात ती असतात बौद्धिक व शारीरिक स्पर्धासाठी ! जणू बुद्धी व शरीराचा विकास म्हणजेच संपूर्ण मानवाची परिपूर्णता. जीवनाच्या इतर बहुमोल अंगाची त्यामुळे उपेक्षा होते. एका फ्रेंच विचारवंताने म्हटले आहे,[११]

" The part played by punishment is much greater than that of rewards; while the first encompasses all the misdeeds the child can commit, the second is far from extending to everything he can do that is good and praiseworthy. Furthermore, everything seems calculated to promote intellectual emulation; almost nothing is planned to create moral emulation".

या सर्व म्हणण्याचा आशय बौद्धिक गुणांची कदर करू नये हा नसून नैतिक गुणांची उपेक्षा केली जाऊ नये एवढाच आहे. तसेच शिक्षा व बक्षिसे यांच्या संख्येत व प्रकारांत जी तफावत दिसते त्यावर मुख्यतः आक्षेप आहे.

(क ३) शिक्षा व बक्षीस सिद्धांताचे तात्पर्य

प्रतिमा अभंग व दृढ रहावी हा हेतू

शिक्षा व बक्षीस तत्व यांच्या वरील विवेचनाचे तात्पर्य सांगायचे झाले, तर एवढेच म्हणता येईल, की वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या

बालमनांत आपल्या शिक्षकांविषयी आदरयुक्त विश्वासाची जी प्रतिमा असते ती भंग पाऊ नये म्हणून 'शिक्षा', व ही प्रतिमा अधिक दृढ होण्यास सहाय्य व्हावे म्हणून 'बक्षीस' मिळणे हे कोणत्याही शिक्षण पद्धतीत अपरिहार्य असते. या दोहोंचा मुख्य हेतू, शिक्षक व त्याला हे दोन्हीचे अधिकार प्रदान करणारी जी सत्ता, ह्यावरील श्रद्धा वृद्धिंगत व्हावी हाच असतो.

अनुकरण प्रवृत्तीचा सदाचरणासाठी उपयोग

विद्यार्थ्याची अनुकरण प्रवृत्ती लक्षात घेता चांगल्या व वाईट अशा दोन्हींचे तो अनुकरण करण्याचा संभव असतो. वर्गातील विद्यार्थ्याच्या चांगल्या उदाहरणाचे अनुकरण करण्यास प्रोत्साहन देणे व अयोग्य अशा विद्यार्थ्याच्या अनुकरणापासून परावृत्त करणे यासाठी अनुक्रमे बक्षीस व शिक्षा यांची योजना केलेली असते. समाजात चांगली व वाईट अशी दोन्ही प्रकारची माणसे असणारच. नि शाळेतील वर्ग हा समाजाचेच छोटे रूप ! त्यात सद्वर्तनी व दुर्वतनी विद्यार्थ्यांची उदाहरणे सापडायचीच. ही दोन्ही टोके वगळून उरणारे नकर्ते मध्यम वर्गातले विद्यार्थीच बहुसंख्य. हे विद्यार्थी स्वत:च्या आचरणासाठी या दोन उदाहरणापैकी एकाचे अनुकरण प्रवृत्तीनुसार करणारच. अशा वेळी बक्षीस व शिक्षा या दोन्हीमुळे या अनुकरणाला इष्ट दिशा मिळावी हा हेतू असतो. शिक्षेमुळे दुर्वतनी होण्यापासून तो परावृत्त होतो, तर बक्षिसामुळे सद्वर्तनी होण्यास विद्यार्थ्याला उत्तेजन मिळते.

बक्षीस व शिक्षा यांत समतोल

बक्षीस व शिक्षा देतांना शिक्षणसंस्थांनी पूर्ण समतोल राखला पाहिजे. अनेक प्रकारच्या मानवी नैतिक गुणांच्या विकासाला प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन ती बक्षिसे मिळविण्यास लायक अशा विद्यार्थ्यांच्या गुणवृद्धीसाठी उत्तेजनपर प्रयत्न झाले पाहिजेत. लायक विद्यार्थ्यांच्या अभावी बक्षिसे वाटता आली नाहीत असे होऊ नये. तसेच विविध प्रकारच्या गुन्ह्यासाठी शिक्षांची जरी योजना असली तरी त्या सहसा द्याव्या लागणार नाहीत, असे कडक शिस्तीचे वातावरण वर्गात व शाळेत असावे. शिक्षा व बेशिस्त यांचे साहचर्य

सामान्यत: आढळते. तोच आदर्श वर्ग, जिथे शिक्षेचे प्रमाण कमित-कमी राहील व नैतिक वागणूकीबद्दल बक्षीस मिळवणाऱ्यांची संख्या जास्त असेल. गुन्हेगारांची संख्या कमी असलेला नीतियुक्त समाज 'उन्नत' मानला जातो. तसेच शिक्षणसंस्थेबद्दलही म्हणता येईल.

(३) समारोप

नीतीची सापेक्षता

नीतिशास्त्र म्हणजे सदाचाराचे असे एक शास्त्र, की त्यातील सिद्धांताप्रमाणे मानवाने नित्य आपली वागणूक ठेवावी. या वागणूकीबाबत अगदी काटेकोर नियम मात्र करता येणार नाहीत. एका विशिष्ट परिस्थितीत एकाकाळी यथायोग्य वाटणारे आचरण वेगळ्या परिस्थितीत भिन्न काळी अयोग्य गणले जाऊ शकेल. अविवेकी अत्याचाराला प्रवृत्त होणाऱ्या व्यक्तीला त्यापासून परावृत्त करण्यासाठी केलेल्या कोणत्याही योग्य अयोग्य वागणकीला नैतिकतेच्या सदरात बसवावे लागेल. सारांश, नीतिशास्त्र हे एक सापेक्ष भूमिका असलेले शास्त्र आहे. स्थल-काल-परिस्थिती व संबंधित व्यक्ती यांच्या अपेक्षेने नैतिक आचरणात बदल झालेला दिसून येईल!

विश्वकल्याण हा हेतू

या नैतिक वातावरणाचा मुख्य उद्देश असावा जीवमात्राची सुख-वृद्धी व त्यांचे कल्याण हा ! हे कल्याण साधावयाचे आहे जीवाजीवातील, कुटुंबा-कुटुंबातील, जातीजातीतील व राष्ट्राराष्ट्रातील सुसंवादी नाते उत्पन्न करून व त्याचे संवर्धन करून! "*Ethics is the principles of harmonious relations*" अशी नीतीशास्त्राची केलेली स्थूल व्याख्या या संदर्भातच असावी. कल्याणाचे वा सुखाचे स्वत:पुरते वा कुटुंबापुरते संकुचित असलेले क्षेत्र हे नैतिक शिक्षणाद्वारा अधिकाधिक व्यापक होत जाउन त्यात हळूहळू संपूर्ण सृष्टी समाविष्ट व्हावयास हवी. कौटुंबिक प्रेमापासून हळूहळू उन्नती होत होत आध्यात्मिक प्रेमात त्याची परिणती होऊन मनुष्य प्रेमाच्या शिखरावर पोहचावयास हवा.[११] संपूर्ण सृष्टीत असे सुसंवादित्व निर्माण करावयाचे असल्यास व्यक्तीचे

विश्वाशी ज्या विविध पातळीवर संबंध प्रस्थापित होतात, त्यांच्या अनुषंगाने नीतिमत्तेचे जे विविध प्रकार पडतात, ते आपण सुरवातीस पाहिले. उच्च प्रकारचे अधिकांचे कल्याण साधणाऱ्या बाबींसाठी थोडयांच्या निम्न प्रकारच्या हिताचा बळी देणे हितावह ठरेल. कौटुंबिक कल्याणासाठी व्यक्तिगत लाभाचा, सामाजिक हितासाठी कौटुंबिक सुखाचा व प्रसंगी राष्ट्रीय कर्तव्यासाठी सामाजिक हक्काचा, व जागतिक कल्याणासाठी राष्ट्रीय आकांक्षेचा आणि आत्मिक प्राप्तीसाठी जागतिक साम्राज्याचाही, होम करण्याची हिम्मत व्यक्तीत यावयास हवी. महाभारतात[१३] ही नीति स्पष्टपणे विषद केली आहे,

" त्यजेदेकं कुलस्यार्थे, ग्रामस्यार्थेकुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे, आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥१॥

अर्थ :– कुलाकरिता एकाचा त्याग करावा, गावाकरिता कुलाचा त्याग करावा, देशाकरिता ग्रामाचा त्याग करावा आणि आत्मकल्याणासाठी सर्व पृथ्वीचाही त्याग करावा.

प्रत्येक व्यक्ती जेव्हा जाणीवपूर्वक आपल्या जीवनात ही नीतिमत्ता अंगी बाणवू लागेल, अधिकांच्या सुखासाठी स्वतःच्या संकुचित स्वार्थाचा त्याग करण्यास शिकेल, तेव्हा संपूर्ण वातावरणांत एकप्रकारचे आश्चर्यजनक सामंजस्य, अननुभूत आनंद, व अपूर्व अशी आत्मीयता उत्पन्न झालेली बघायला सापडेल. परस्पर सहकार्य, परस्पर सहानुभूती व परस्पर सहाय्य *(Mutual co-operation, Mutual sympathy & Mutual assistance)* यांची देवघेव सुरू झाली तर . . . . तर जगातील कोणताही प्रश्न सुटणे अवघड नाही. जागतिक शांतीचा, मानवजातीच्या सुखाचा हाच एकमेव मार्ग आहे.

" सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः । "
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।

भारतीय ऋषींचे हे भव्य स्वप्न व्यक्तीच्या नैतिक आचरणातूनच साध्य होऊ शकेल.

नीतीला तर्कशुद्ध अधिष्ठान नाही

परंतु भारतीय तत्ववेत्यांची नैतिकतेची कल्पना पाश्चात्यांइतकी ठिसूळ नाही. युरोपियन विचारवंतांनी नीतिशास्त्राला कोणत्याही युक्ती संगत तर्काचा भक्कम आधार दिला नाही. त्यामुळे माणसाने नीतिमान का व्हावे ? न झाल्यास काय बिघडेल? या सारख्या प्रश्नांचे समाधान त्यांना करणे अवघड जाते. सिनेमा बघितल्याने मला अधिक आनंद मिळतो हे प्रत्यक्ष अनुभवीत असता मी त्यात खर्च होणारा पैसा भुकेल्या माणसाला का द्यावा ? एखाद्या श्रीमंताची १० रु. ची नोट त्याला किंचितही सुगावा न लागता चोरल्याने पैसे गेल्याचे कळतही नाही व कोणतेही दुःख त्याला होत नाही, मी मात्र सुखी होतो; अशा स्थितीत चोरी का करू नये ? गुलाबाचे फुल देवाला वाहून कोमेजून टाकण्यापेक्षा, ते कोटाला लाऊन फिरले वा वेणीत घालून मिरविले तर काय हरकत आहे? या प्रश्नांना केवळ निखालस नैतिकतेचा पुरस्कार करणारे उत्तर देऊ शकतील असे वाटत नाही. आणि या प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे देता आली नाहीत तर अपेक्षित आचरणाची उपेक्षा झाली तर आश्चर्य वाटावयास नको. कारण " *Ultimately, all failure of action is a failure of thought* " हे विधान[१४] काही खोटे म्हणता यावयाचे नाही.

दैनंदिन विचारसरणीत जर नैतिकतेच्या आचरणात ही अडचण जाणवते तर मग स्वार्थनिरपेक्ष सेवा करण्याच्या भावनेने एखाद्या उच्च ध्येयवादासाठी आपले उभे आयुष्य, व्यक्तिगत आशाआकांक्षांना तिलांजली देऊन, का वेचायचे ? हा प्रश्न साहजिकच निरुत्तरित राहतो. देशासाठी मी काय म्हणून झिजावे ? भावी अज्ञात पिढ्यांच्या उज्वल भवितव्या-साठी आखलेल्या पंचवार्षिक योजना व शासनाचे प्रयत्न यांसाठी मी काय म्हणून खस्ता खाव्यात ? मला नफा मिळत असतांना स्वबांधवांच्या माना पिरगळून मी काळा बाजार का करू नये ? लाच का खाऊ नये ? स्वार्थासाठी युद्धप्रसंगी मी देशद्रोह केला तर काय हरकत आहे? अशा-सारख्या सामाजिक व राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या प्रश्नांना कोणतेच तर्कशुद्ध उत्तर आज शासन, समाज वा शिक्षण संस्था देऊ शकत नाही. " नीतिमान व्हा, शुद्ध आचरण ठेव," असा उपदेश प्रत्यक्ष मोहाचा

कसोटीचा प्रसंग येत नाही तोवरच विद्यार्थ्यांच्या लक्षांत फार तर राहू शकेल; पण त्यांच्या अंत:करणावर खोल असा ठसा नि त्याचप्रमाणे आचरण ठेवण्यासाठी लागणारे मनोबल उत्पन्न व्हायला अशा आचरणामागे, आपआपल्या धर्मातील जीवनमूल्यांना असलेली पायाशुद्ध तात्विक बैठक, आदर्श आचरणाच्या व्यक्ती वा पुढारी, आणि समाजातील एकूण अनुकूल वातावरण, यांची अत्यंत निकड असते. आज दुर्भाग्याने या तीन्ही गोष्टींचा आत्यंतिक अभाव जाणवतो. परिणामत: स्वार्थ व सुखलोलुपता यांच्यातून उद्भवणारे काळाबाजार, लाचलुचपत, हिंसाचार, असत्य भाषण, दंभाचार इ. अनेक रोग आज समाजाला ग्रासीत आहेत. दिवसानुदिवस अत्यंत अविश्वासाचे वातावरण देशात सर्वत्र पसरू लागले आहे.

या संपूर्ण प्रकरणात आपण "नैतिकता म्हणजे काय? व नैतिकतेचा बालकात विकास कसा करता येईल?" या प्रश्नाचे तात्विक विवेचन केले. अध्यात्म म्हणजे काय? याचे विवेचन पुढे येणार असल्याने येथे केले नाही. मात्र बालकांत नैतिकतेचा विकास करण्याबाबत जी मीमांसा या प्रकरणात केली आहे, ती आध्यात्मिक विकासाला देखील लागू होईल हे या ठिकाणी गृहीत धरले आहे.

मी नीतिमान का व्हावे ?

परंतु या सर्व विवेचनात एक मोठी उणीव आहे. नैतिकता काय किंवा आध्यात्मिक मूल्ये काय, मातापित्यांनी व शिक्षकांनी ती बालकात कशी विकसित करावी येवढेच केवळ समजाऊन घेऊन चालणार नाही. तर वर म्हटल्याप्रमाणे मी नीतिमान का व्हावे ? या प्रश्नाचे तर्कशुद्ध उत्तरही देता आले पाहिजे. त्याशिवाय शिक्षक किंवा विद्यार्थी नैतिक व आध्यात्मिक विकासाकडे अंत:करणपूर्वक लक्ष देणार नाहीत. या प्रश्नाचा उहापोह आपण पुढच्या प्रकरणात करू ●

संदर्भ टीपा

१. *Percival Wren : The Indian Teachers Guide; p. 27.*

२. *Earnest Hemingway : Death in the afternoon; p. 11.*

३. *Edwin F. Healy: Moral Guidance; 1942;*
या ग्रंथातील पृ. ६ ते ८ च्या आधारे केलेले विवेचन.

४. या व पुढील विवेचनात काही ठिकाणी आधारासाठी घेतलेले ग्रंथ:
Emile Durkheim: Moral Education; पृ. २३ ते ३८ व १४४ ते १५६. *Lecomte du Nouy: Human Destiny;*
अनुवादक: डॉ. चि. श्री. कर्वे : मानवाचे भवितव्य; पृ. १४५ ते १५०.

५. *James Sully: Studies of Childhood; Reference is to p. 274 of a French translation published in 1898.*

६. श्री पातञ्जल योगदर्शन; समाधिपाद, ५०.

७. *Dr. J. A. Hadfield : Moral Values and Human Progress; 36 th Annual Report of the Conference of the Educational Institutions; London; 1953; p. 22.*

८. *Emile Durkheim : Moral Education;* या ग्रंथातील पृ. १५९ ते २०४ या पृष्ठांच्या आधारे केलेले विवेचन.

९. विनोबा भावे : आचार्यकुल ; पृ. २९-३०.

१०. *Magdal Ramchandra : Buddhiyoga; p. 24–26.*

११. *M. Vessiate; " De l' e' ducation a' l' ecole; p. 144.*

१२. श्री गुलाबराव महाराज : अलौकिक व्याख्यानमाला; प्रकरण ३ रे; प्रेमोन्नति; पृ. ३९ ते ५२.

१३. महाभारत : सभापर्व, अध्याय ६१; श्लोक १.

१४. *Dr. Sisis kumar Ghosh : Total Education an article from 'Mother India' Special issue of 15 th Aug-1966.*

तीन

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा आधार सर्व-धर्म-समभाव

" बल म्हणजे भोगाचे आघात सहन करून शुभ कर्म करीत राहणे हे शरीर शिक्षण साध्य आहे.

कौशल्य म्हणजे शुभाशुभविकारांचा योग्य उपयोग करणे हे नीति-शिक्षणसाध्य आहे.

शुद्ध म्हणजे असद्वासना नि:शेष जाऊन नेहमी सद्वासना स्फुरणे. हिला धर्म शिक्षणाची आवश्यकता आहे.

स्वातंत्र्य म्हणजे सर्वविकारविनिर्मुक्त होऊन सहज भगवत्प्रेमात रंगून जाणे हे वेदान्ताच्या व भक्तीच्या शिक्षणाने साध्य होते. "

श्री गुलाबराव महाराज [1]

" *Why not organize your thinking around religion ? .....It is the one common denominator of all intellectual life. This powerful universal indestructible instinct which impels men to pray is the one factor which binds men together and whose constructive influence reintegrates the soul and the social order.* "

C. F. Wishart [2]

(१) नैतिक आचरणाचे प्रमुख प्रयोजन

अखंड अविनाशी सुख

सुखी जीवनासाठी नीतिमानता

मी नीतिमान का व्हावे ? नैतिक आचरण का करावे ? या प्रश्नांचे उत्तर अेका वाक्यात द्यावयाचे झाले तर "इहलोकीचे जीवन सुखी होण्या-करता " असे थोडक्यात म्हणता येईल. अेखाद्या तार्किकाला हे विधान अैकून हसू येईल ! कारण त्याग, संयम, परोपकार, सेवा इ. सद्‌गुणांचा सतत पाठपुरावा करणाऱ्या नैतिकतेचे पालन केल्याने सुख कदाचित मिळेलही; पण ते इतर सर्व जगाला, त्याला स्वत:ला नव्हे, असे त्यांना साहजिकच वाटेल. पण वस्तुस्थिती तशी नाही. कारण हे सुख अभिप्रेत आहे प्रामुख्याने नैतिक क्रिया करणाऱ्याला, कर्मकर्त्याला; इतरांना मिळणारे सुख केवळ आनुषंगिक होय. या ठिकाणी नीतिमान व्यक्तीला जे सुख मिळते त्या 'सुख' शब्दाचा नेमका अर्थ प्रथम आपण समजावून घेतला पाहिजे.

सुखांत अुच्चनीच हे तारतम्य

सुखाचा अर्थ समजावून घेतांना सुखाच्या स्वरुपाचे आपणास विवेचन करावयाचे नाही. त्यात तारतम्यभाव नसेलही; परंतु सुखासोबत येणाऱ्या

आनुषंगिक गोष्टीमुळे, सुखामध्ये अुच्चनीच असे तारतम्य करावे लागेल, हे अुघड आहे. अेखाद्या क्रियेमुळे सुख किती काळपर्यंत मिळते ? त्या सुखामुळे इतर सुखे अुत्पन्न होतात काय व ती किती ? ते सुख स्वाधीन आहे की पराधीन ? ते सुख मिळविण्यास दुःख भोगावे लागते की काय व किती ? या व तत्सम गोष्टींवर सुख कोणत्या श्रेणीचे आहे हे ठरत असते.

अुदाहरणार्थ मादक पदार्थाचे व्यसन वा स्त्रीसेवन या पेक्षाही अुच्च प्रकारचे सुख अेखाद्याला सद्ग्रंथाचे वाचनात वा ईशध्यानात अनुभवायास सापडेल. पहिल्या प्रकारच्या सुखप्राप्तीसाठी थोडीफार शरीरहानी व शिवाय परावलंबित्व, तर दुसऱ्या प्रकारांत प्रकृतीची थोडीही हानी न होता स्वाधीन असे अधिककाल टिकणारे सुख अुपलब्ध होते म्हणून तो प्रकार अधिक श्रेष्ठ !

" सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवर "

या संदर्भात आणखी अेक महत्वाची गोष्ट आपण केव्हाही दृष्टीआड करता कामा नये. आणि ती ही की, सुखाचा मूल स्रोत कुठेही बाहेर नसून तो " स्व " मध्येच अधिष्ठित आहे. पूर्वसूरींनी सुखाच्या स्वरुपाची केलेली मीमांसा मननीय आहे. भारतीय साधुसंतांनी देखील हीच मीमांसा ग्राह्य धरली आहे. महाराष्ट्र तर अशा सत्पुरुषांची खरोखरी खाणच ठरला आहे. या सर्व संत महात्म्यांनी " अविनाशी अखंड सुखाचा " स्वानुभव घेऊन ते सर्वांनी प्राप्त करावे म्हणून आपले आयुष्य वेचले. त्यांच्या प्रतिपादनाप्रमाणे, कुठल्याही बाह्य विषयापासून सुखप्राप्ती होत नसून, " सुखसागर " आपल्या स्वतःमध्येच साठविला आहे. गाढ झोपेत मिळणारा आनंद हा या आंतरिक सुखाची स्वल्पप्रतीती असते. आनंद हा आत्म्याचाच स्वरूपधर्म आहे. परंतु देह म्हणजे, " मी " अशी विपरीत समजूत आपली झाली असल्याने या आत्मानंदाचा अनुभव दुर्दैवाने आपणास घेता येत नाही. दृढ झालेली ही देहात्मभावना दूर झाली की देहासोबत येणाऱ्या विषयवासना नाहीशा होउन आत्मस्वरूपाची ओळख पटते. आणि हे आत्मरूप सर्वत्र व्यापून असलेल्या परम आत्म्याशी जेव्हा अैक्य पावते, तेव्हा त्याला ' परमानंद ' सुखाची

प्राप्ती होते. असे आत्म्याचे परमात्म्याशी ऐक्य होण्याकरता, जीव व शिव यांची भेट होण्याकरता, सर्व संतानी ईशचिंतनरूप भक्ती हा सुलभ मार्ग अेकमुखाने वर्णिला आहे. मात्र या मार्गाचे दिग्दर्शन करण्याकरता संताचा सहवास लाभला पाहिजे. श्री तुकाराम महाराजांनी सुखप्राप्तीसाठी ओलांडाव्या लागणाऱ्या तीन अवस्था व त्यांची फलश्रुती सोप्या शद्धात सुंदर वर्णन केली आहे. ते म्हणतात,

संतचरणरज लागता सहज। वासनेचे बीज जळून जाय।
मग रामनामी अूपजे आवडी। सुख घडोघडी वाढो लागे।
कंठी प्रेम दाट नयनी नीर लोटे। हृदयी प्रगटे रामरुप।

संतासारख्या गुरूची प्राप्ती होणे, देहोद्भव वासना नष्ट होणे, ईशस्मरणाविषयी आवडी उत्पन्न होणे, या तीन अवस्था पार पडल्या म्हणजे क्षणोक्षणी सुख नुसतेच मिळत नाही, तर वाढू लागते असे श्री तुकाराम महाराज सांगतात.

"ज्ञानदेवा नाम रामकृष्णी ठसा। तेणे दशदिशा आत्माराम।"

माझे वाणीचे ठिकाणी हरीनाम व हृदयात रामकृष्णाचे रुप दृढ ठसले आहे. त्यामुळे मला दशदिशा आत्मारामस्वरुप, झाल्या असे श्री ज्ञानेश्वर महाराज देखील आपला अनुभव सांगतात. 'सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवर' या त्यांच्या प्रतीतीला पुष्टी देणारी अनेक सत्पुरुषांची शेकडो वचने ऊद्धृत करता येतील. परंतु त्या सर्वांचे स्पष्टीकरण करण्याचे हे स्थळ नव्हे. तात्पर्य अेवढेच, की आत्मज्ञानामुळे होणाऱ्या परमानंद प्राप्तीसाठी इतर कोणत्याही बाह्य साधनांची अपेक्षा नाही. ते पूर्ण स्वाधीन आहे. अेवढेच नव्हे तर हे आत्मसुख अखंड अपरिच्छिन्न व अविनाशी असे आहे. साहजिकच ते उच्च प्रकारचे व इतर कोणत्याही सुखापेक्षा श्रेष्ठ आहे, हे निःसंशय!

मनोमार्गी गेला तो येथे मुकला

मात्र या अुच्च सुखाच्या प्राप्तीसाठी निम्न प्रकारच्या सुखाचा त्याग करावा लागतो. विविध इन्द्रियांच्या भोगासाठी आपण अनेक बाह्य विषय गोळा करतो, पण या विषयसुखाच्या वासनेने देहबुद्धी दृढ होते. आपल्या कल्याणाचे जे असेल, तेच नेमके या इन्द्रियांना आवडत नाही.

रोगमुक्त करून आयुष्य वाढविणारे औषध तरी जिभेला कोठे आवडते ? श्री ज्ञानेश्वर महाराज[३] म्हणतात,

पाहे या आयुष्याते अढळ करी । जे सरते जीवित वारी ।
तया औषधाते वैरी । काय जिव्हा न म्हणे ॥
अैसे हितासी जे जे निके । ते सदाचि या इन्द्रियां दु:खे ।
या इन्द्रियांच्या स्वाधीन मन झाले म्हणजे या परस्वाधीन पुरुषाला
विषय विषाचा पडिपाडू । गोड परमार्थ लागे कडू ।
कडू विषय तो गोडू । जीवासी जाहला ॥[४]

आत्मघातक विषयसुख गोड वाटते व खरे अविनाशी आत्मसुख दु:ख-दायक वाटते. तेव्हा मनाच्या धावेबरोबर विषयसुखाच्या मागे जो वाहावत गेला तो या परमानंद सुखाला आंचवतो. हरिपाठांत वेगळ्या रीतीने हेच सांगितले आहे.

"मनोमार्गी गेला तो येथे मुकला ।
हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ॥"

तेव्हा शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी मनामागे न धावता, आत्मस्वरुपाचे ठिकाणी जो स्थिर होईल तोच धन्य होय, असे श्री ज्ञानेश्वर महाराज प्रतिपादन करतात.

मनाच्या समतेमुळे सुख

विषय त्यागात सुख आहे अमे म्हणताच अनेकांच्या मनांत अशी शंका अुद्भवेल की विषयोपभोगाचा आस्वाद घेतांना जो आनंद वाटतो तो अनुभव काय खोटा ? या संदर्भात हाड चवळत असलेल्या कुत्र्याचे अुदाहरण योग्य ठरेल. मांस रक्तादिक काहीही नसून नुसतेच हाड कुत्रे का चघळत असते ? ते हाड त्या कुत्र्याचेच रक्त बाहेर काढत असते व ते हाडापासून निघत आहे असे समजून कुत्रे ते सारखे चघळत राहते. बाह्य विषय भोगतांना माणसाचे नेमके असेच सुरू असते. प्रचंड इमारती, अुत्तमोत्तम वाहने, अुंची खाद्यपेये या सर्व उपभोग्य वस्तुमुळे सुख प्राप्ती होते असा ग्रह मनुष्याचा असतो. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. या विषयाच्या अभिलाषेने, प्राप्त होईपर्यंत अुत्पन्न झालेली मनाची तळमळ, अस्वस्थता, ते विषय प्राप्त होताच शांत होते व मनाच्या या

समतेमुळे, स्थिरतेमुळेच खरोखरी सुखाचा अनुभव व्यक्तीला येत असतो, बाह्य अुपभोगाच्या साधनामुळे नव्हे, परंतु विषयांचा इन्द्रियांशी संयोग झाला म्हणूनच सुख झाले असा भ्रम माणसाला होतो.

विषय विस्मरणास नामस्मरण

त्यामुळे बाह्य विषयाविषयी वाटणाऱ्या अभिलाषेमुळे अुठणाऱ्या संकल्पविकल्पांचा निरास करुन मन निर्विकल्प केले, म्हणजे निरतिशय आत्मसुखाचा प्रत्यय येऊ शकेल, असे भारतीय तत्ववेत्यांनी तर्कशुद्धरीत्या प्रतिपादन केले आहे. आणि विविध संकल्पामुळे मनांत अुठणाऱ्या विषय-वासनांचा विसर पाडण्यासाठी ज्या अभ्यासाची अपेक्षा सर्व संतांनी केली आहे, ती आहे नामस्मरणपूर्वक ईशचिंतनाची. जसजसे आत्म्याचे व्यापक स्वरुप असलेल्या परमात्म्याचे स्मरण वाढेल तितक्या प्रमाणात वृत्तींचे, संकल्पांचे, विस्मरण होत जाईल. या बाह्य विषयात गुंतविणाऱ्या वृत्ती जसजशा क्षीण होत जातील, तसतसे व्यक्तीला आत्मज्ञान ब्रह्मज्ञान होऊ लागेल. पाण्याचे बिंदू अैक्य पाऊन ज्याप्रमाणे त्यांची गार बनते त्याप्रमाणे सर्व वृत्तींना अेकाग्र करुन स्थिर केले तर साक्षात श्रीहरी प्रगट होईल. वृत्तींच्या विकासाची ही प्रक्रिया खालील अभंगात[५] फार सुरेख रेखाटली आहे,

जितुकी जितुकी नाम सांठवण । तितुके विस्मरण वृत्तिलागीं ।
जैशा जैशा वृत्ति लीन होत जाती । तैसि तैसि व्यक्ति ब्रह्मपणा ।
पाणियाचे बिंदु जैसे अैक्या येती । तैशा गारा होती भारमुक्त ।
तैसा वृत्यभावे येता अैक्यपणा । श्रीहरिसगुणा आविर्भाव ।
ज्ञानेश्वरकृपे अनुभव सुख । गोविंदासी मुख अर्पिताची ।

परमात्मरुपी गोविंदाला नामस्मरणासाठी जीभ अर्पण करताच आत्यंतिक आत्मसुखाचा अनुभव येतो. "सुखी होण्यासाठी मला कल्पनेची बाधा होऊ देऊ नको मी देह, या अहंकाराचा वारा मला लागू देऊ नको व ज्यांच्या तोंडी तुझे नामाचा ठेवा आहे त्यांचे कल्याण कर" असे मागणे संत नामदेवांनीही पांडुरंगाला मागितले आहे.

" कल्पनेची बाधा न होवो कोणे काळी । ही संत मंडळी सुखी राहो ।
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी ।

रोगमुक्त करून आयुष्य वाढविणारे औषध तरी जिभेला कोठे आवडते ? श्री ज्ञानेश्वर महाराज[३] म्हणतात,

पाहे या आयुष्याते अढळ करी । जे सरते जीवित वारी ।
तया औषधाते वैरी । काय जिव्हा न म्हणे ॥
अैसे हितासी जे जे निके । ते सदाचि या इन्द्रियां दुःखे ।

या इन्द्रियांच्या स्वाधीन मन झाले म्हणजे या परस्वाधीन पुरुषाला

विषय विषाचा पडिपाडू । गोड परमार्थ लागे कडू ।
कडू विषय तो गोडू । जीवासी जाहला ॥[४]

आत्मघातक विषयसुख गोड वाटते व खरे अविनाशी आत्मसुख दुःख-दायक वाटते. तेव्हा मनाच्या धावेबरोबर विषयसुखाच्या मागे जो वाहावत गेला तो या परमानंद सुखाला आंचवतो. हरिपाठांत वेगळ्या रीतीने हेच सांगितले आहे.

" मनोमार्गी गेला तो येथे मुकला ।
हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ॥ "

तेव्हा शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी मनामागे न धावता, आत्मस्वरुपाचे ठिकाणी जो स्थिर होईल तोच धन्य होय, असे श्री ज्ञानेश्वर महाराज प्रतिपादन करतात.

मनाच्या समतेमुळे सुख

विषय त्यागात सुख आहे अमे म्हणताच अनेकांच्या मनांत अशी शंका अुद्भवेल की विषयोपभोगाचा आस्वाद घेतांना जो आनंद वाटतो तो अनुभव काय खोटा ? या संदर्भात हाड चवळत असलेल्या कुत्र्याचे अुदाहरण योग्य ठरेल. मांस रक्तादिक काहीही नसून नुसतेच हाड कुत्रे का चघळत असते ? ते हाड त्या कुत्र्याचेच रक्त बाहेर काढत असते व ते हाडापासून निघत आहे असे समजून कुत्रे ते सारखे चघळत राहते. बाह्य विषय भोगतांना माणसाचे नेमके असेच सुरू असते. प्रचंड इमारती, अुत्तमोत्तम वाहने, अुंची खाद्यपेये या सर्व उपभोग्य वस्तुमुळे सुख प्राप्ती होते असा ग्रह मनुष्याचा असतो. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. या विषयाच्या अभिलाषेने, प्राप्त होईपर्यंत अुत्पन्न झालेली मनाची तळमळ, अस्वस्थता, ते विषय प्राप्त होताच शांत होते व मनाच्या या

समतेमुळे, स्थिरतेमुळेच खरोखरी सुखाचा अनुभव व्यक्तीला येत असतो, बाह्य अुपभोगाच्या साधनामुळे नव्हे, परंतु विषयांचा इन्द्रियांशी संयोग झाला म्हणूनच सुख झाले असा भ्रम माणसाला होतो.

विषय विस्मरणास नामस्मरण

त्यामुळे बाह्य विषयाविषयी वाटणाऱ्या अभिलाषेमुळे अुठणाऱ्या संकल्पविकल्पांचा निरास करुन मन निर्विकल्प केले, म्हणजे निरतिशय आत्मसुखाचा प्रत्यय येऊ शकेल, असे भारतीय तत्ववेत्यांनी तर्कशुद्धरीत्या प्रतिपादन केले आहे. आणि विविध संकल्पामुळे मनांत अुठणाऱ्या विषय-वासनांचा विसर पाडण्यासाठी ज्या अभ्यासाची अपेक्षा सर्व संतांनी केली आहे, ती आहे नामस्मरणपूर्वक ईशचिंतनाची. जसजसे आत्म्याचे व्यापक स्वरुप असलेल्या परमात्म्याचे स्मरण वाढेल तितक्या प्रमाणात वृत्तींचे, संकल्पांचे, विस्मरण होत जाईल. या बाह्य विषयात गुंतविणाऱ्या वृत्ती जसजशा क्षीण होत जातील, तसतसे व्यक्तीला आत्मज्ञान ब्रह्मज्ञान होऊ लागेल. पाण्याचे बिंदू अैक्य पाऊन ज्याप्रमाणे त्यांची गार बनते त्याप्रमाणे सर्व वृत्तींना अेकाग्र करुन स्थिर केले तर साक्षात श्रीहरी प्रगट होईल. वृत्तींच्या विकासाची ही प्रक्रिया खालील अभंगात[५] फार सुरेख रेखाटली आहे,

जितुकी जितुकी नाम सांठवण । तितुके विस्मरण वृत्तिलागीं ।
जैशा जैशा वृत्ति लीन होत जाती । तैसि तैसि व्यक्ति ब्रह्मपणा ।
पाणियाचे बिंदु जैसे अैक्या येती । तैशा गारा होती भारमुक्त ।
तैसा वृत्यभावे येता अैक्यपणा । श्रीहरिसगुणा आविर्भाव ।
ज्ञानेश्वरकृपे अनुभव सुख । गोविंदासी मुख अर्पिताची ।

परमात्मरुपी गोविंदाला नामस्मरणासाठी जीभ अर्पण करताच आत्यंतिक आत्मसुखाचा अनुभव येतो. "सुखी होण्यासाठी मला कल्पनेची बाधा होऊ देऊ नको मी देह, या अहंकाराचा वारा मला लागू देऊ नको व ज्यांच्या तोंडी तुझे नामाचा ठेवा आहे त्यांचे कल्याण कर" असे मागणे संत नामदेवांनीही पांडुरंगाला मागितले आहे.

" कल्पनेची बाधा न होवो कोणे काळी । ही संत मंडळी सुखी राहो ।
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी ।

"शरीर प्राणाची करोनि कुवंडी । क्षण अेक न सोडी पाय त्याचें ।
नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ।

अशा रीतीने नामस्मरणाने सारे जीवनच हरिमय होऊन जाते. अेक क्षणही मन त्याला विसंबत नाही. मग सर्वत्र आनंदाचाच अनुभव येतो. सर्वत्र सुखच सुख प्रत्ययाला येते.

अखंड सुख देणारे कर्मच धर्म्यं

वरील प्रमाणे आत्मसुखाची प्राप्ती ज्यापासून होईल ते कर्म धर्म्य होय. धर्माप्रमाणे जो कर्म करील तो या अत्युच्च सुखाचा वाटेकरी होतो. प्रत्येक मनुष्य जीवनात अहोरात्र धडपडत असतो तो या सुखासाठीच. पण दुर्देवाने त्याला या धर्ममार्गाचे अनुसरण करण्याची इच्छा होत नाही. सुखाचा धर्माशी संबंध कसा आहे हे पुढील वचनावरुन स्पष्ट होईल.

सुख वांच्छंति सर्वे हि तच्च धर्मसमुभ्दवः ।
तस्माद्धर्मः सदा कार्यः सर्ववर्णैः प्रयत्नतः ।।[१]

अर्थ :– सर्व सुख इच्छितात आणि ते तर धर्मापासून अुत्पन्न होते. म्हणून सर्व वर्णांनी सदा धर्म करावा.

अधर्मप्रभवं चैव दुःखयोगं शरीरिणां ।
धर्मार्थप्रभवं चैव सुखसंयोगमक्षयम् ।।[२]

अर्थ :– प्राण्यांना अधर्मापासून दुःख व धर्मापासून अक्षयसुख प्राप्त होते.

या शिवाय इतरही पुष्कळ वचने देता येतील. यावरुन हे स्पष्ट होते की अक्षयसुख हे धर्माचे साध्य आहे. आणि मानवाच्या सर्व क्रियांचे साध्य तरी दुसरे कोणते आहे ? किंवहुना धर्माचे साध्य ठरवितांना मानवाचा सुखप्राप्तीसाठी झटणारा हा स्वभावच लक्षात घेतला गेला. या मानवी स्वभावाची कल्पना प्राचीन धर्माचार्यांना होती, हे छान्दोग्योपनिषदातील पुढील वचनावरुन लक्षात येऊ शकेल.

यदा वै सुखं लभतेऽथ करोति । नासुखं लबधा करोति ।
सुखमेव लबधा करोति । सुखं त्वेव विजिज्ञासितव्यं ।।२२।।

अर्थ – जेव्हा मनुष्याला सुखाची आशा असते तेव्हा तो कृती करतो,

सुखाची आशा नसेल तर कृती करीत नाही. सुखाचा लाभ असेल तरच कृती करतो; म्हणून सुखच जाणून घेतले पाहिजे.

भगवंताची भक्ती हाच श्रेष्ठ धर्म

मनुष्याला सुख प्राप्त व्हावे म्हणून सर्व संतांनी सांगितलेली नामस्मरणाची प्रक्रिया आपण थोडक्यात समजाऊन घेतली. या साधन प्रक्रियेने सर्वोच्च सुख प्राप्त करून घेणे हाच मुख्य धर्म. भीष्मांनीही विष्णुसहस्त्रनामांत म्हटले आहे,

एष मे सर्व धर्माणां धर्मोऽधिकतमो मतः ।
यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ॥८॥

अर्थ :– सदा सर्वदा स्तुती स्तोत्र, नामस्मरणादिकांनी भगवंताचे प्रेम-भावाने भजन करणे, हाच सर्व श्रौत–स्मार्त धर्मामध्ये श्रेष्ठ धर्म आहे.

याप्रमाणे भगवंताची भक्ती करणे हाच मुख्य धर्म होय, प्रत्यक्ष भगवंतानेच असे भक्त मला अत्यंत प्रिय होतात असे स्पष्टपणे म्हटले आहे. वर म्हटल्याप्रमाणे विषयाची इच्छा नाहीशी करून आत्मस्वरुपाच्या दर्शनाने आत्मसुख अनुभविले पाहिजे असेही पुढे मार्गदर्शन केले आहे.

यदा विनियतं चितमात्मन्येवावतिष्ठते ।
निस्पृहः सर्वकाम्येभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥
यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योग सेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥

स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्ण चेतसा ॥

अर्थ:– जेव्हा आवरुन धरलेले मन आत्म्याच्याच ठिकाणी स्थिर होते आणि कोणत्याही कामाची इच्छा रहात नाही, तेव्हा तो युक्त झाला असे म्हणतात. . .योगानुष्ठानाने निरूद्ध झालेले चित्त जेथे रममाण होते आणि जेथे आत्मा आत्म्यालाच पाहून संतुष्ट होऊन रहातो. . . . तो योग मन कंटाळू न देता निश्चयेकरून आचरण केला पाहिजे.'

याप्रमाणे धर्मदृष्ट्यासुद्धा वासनारहित्य व चितैकाग्रता याच श्रेष्ठ सुखाच्या दोन बाजू असल्याचे लक्षात येईल.

सुख–प्राप्तीचे दोन प्रकार

आतापर्यंतच्या विवेचनावरून सुखप्राप्तीचे दोन प्रकार आपण पाहिले.

१. विषयेन्द्रिय संयोगानें

२. चित्ताच्या एकाग्रतेने

या दोन्ही प्रकारच्या सुखाचे व्यवच्छेदक लक्षण गीतेतील पुढील श्लोकात वर्णिले आहे.

१. अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥३६॥
यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिप्रसादजम् ॥३७॥

अर्थ :– अभ्यासाने जेथे रमतो व जेथे दुःखाचा अंत होतो, जे आरंभी विषासारखे परंतु अंती अमृततुल्य ते आत्मबुद्धीच्या प्रसन्नतेपासून होणारे सुख सात्विक होय.

२. विषयेंद्रिय–संयोगात् यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव सत्सुखं राजसं स्मृतम् ॥३८॥ अध्याय १८ वा.

अर्थ :– विषय व इन्द्रिये ह्यांच्या संयोगापासून होणारे, जे प्रथम अमृतासारखे पण परिणामी विषासारखे, ते राजस सुख होय.

सुख आत्म्यातच आहे ही जी बुद्धी तीच आत्मबुद्धी, ह्या बुद्धीच्या जोरावर कोठेही चित्त एकाग्र केले तरी सुखासच कारण होते. ह्यास नित्यसुख, आत्मसुख अशी नांवे आहेत. विषयेन्द्रियसंयोगाने जेव्हा क्षणभर का होईना चित्त एकाग्र व अत्यल्पाहंकार होते, तेव्हा त्या सुखास राजस वा वैषयिक सुख असे संबोधतात.

आत्मसुख व वैषयिक सुखात श्रेष्ठ कोणते ?

या दोहोंपैकी उच्चतर सुख कोणते ? सुखाचा अनुभव सर्वांस आहेच. प्रत्येकाने स्वतःच्या आत्यंतिक सुखाच्या वेळच्या स्थितीचे निरीक्षण केले तर त्यास दिसून येईल की त्यावेळी कोणतीच वासना अस्तित्वात नसते. कोणती तरी वासना उत्पन्न झाल्याबरोबर त्या सुखाच्या स्थितीपासून तो च्युत होतो. अर्थात सुख म्हणजे वासनेचा अभाव हे सिद्ध होते. मग तो वासनेचा अभाव वासनापूर्तिमुळे होवो किंवा वासनेचा त्याग केल्यामुळे किंवा चित्ताच्या एकाग्रतेने वासना लुप्त झाल्यामुळे होवो.

विषयजनित सुख हे क्षणिक किंवा अनित्य आहे. विषयांचा इन्द्रियाशी संयोग असतो तोवरच ते टिकते. बरे विषयाशी नित्य संयोग ठेवावा, तर हे ही शक्य नाही. यात अडचणी दोन. अेक तर नेहमी संयोग ठेवण्यासाठी एवढ्या प्रमाणात विषय प्राप्त होणे नेहमी शक्य नसते. दुसरे असे की मर्यादेच्या पलीकडे विषयभोग घेणाऱ्यास तो सुखोत्पादक न होता उलट दु:खदायक होतो, इतकेच नव्हे तर त्यापासून अप्रत्यक्षपणे अनेक दु:खे उत्पन्न होतात.

हे दोष आत्मसुखात नाहीत. केव्हाही चित्त वासनारहित व एकाग्र केले, की ते प्राप्त होते व हे तर स्वाधीन आहे. म्हणून त्याला नित्य-सुख म्हणतात. ते कितीही वेळ सेवन केले तरी त्यापासून प्रत्यक्षपणे दु:ख उत्पन्न होत नाही. मनुस्मृतीत सुखदु:खाच्या सुटसुटित व्याख्या केल्या आहेत.

सर्वं परवशं दु:खं सर्वं आत्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदु:खयो: ।।

अर्थ :– परक्याच्या ताब्यात असते ते सर्व दु:ख व स्वत:च्या ताब्यात असते ते सर्व सुख हे सुखदु:खाचे संक्षिप्त लक्षण होय.

आत्मसुख श्रेष्ठ असूनही वैषयिक सुखाकडे धाव

अशा रीतीने आत्मसुख श्रेष्ठ असूनही बहुसंख्य लोक पराधीन व दु:खकर अशा वैषयिक सुखाकडे वळतात असा अनुभव येतो. कठोपनिषदात[१०] हेच सांगितले आहे.

परांचि खानि व्यतृणत् स्वयंभूस्तस्माप्तराङ् पश्यति नांतरात्मन् ।
कश्चिद्धीर: प्रत्यगात्मानमैक्षदावृ तचक्षुरमृतत्व मिच्छन् ।।

अर्थ :– परमेश्वराने शरीरास जे इन्द्रियरूपी दरवाजे बसविले आहेत ते बाहेर उघडणारे आहेत; म्हणूनच मनुष्य सुखाच्या शोधार्थ बाहेर पहातो, आत अंतरात्म्याकडे पहात नाही. अेखादाच बुद्धिमान मनुष्य आत्यंतिक शाश्वत सुखावर नजर ठेवून उलट दृष्टी करून अंतरात्म्याकडे पहातो.

या मानवी स्वभावाचे चित्रण करणारे एक रूपक सांगण्यासारखे आहे. एका डोळयाने अधू झालेली एक म्हातारी असते. रात्रीच्या वेळी तिच्या पेटीची किल्ली झोपडीतच कुठे तरी हरवते. परंतु घरात दिवा

नसतो. सडकेवरच्या म्युनिसिपल दिव्याखाली मात्र उजेड असतो. झाले, ती तिथेच आपली किल्ली शोधू लागते. का ? तर म्हणे किल्ली हरवली त्या घरात अंधार आहे, म्हणून उजेड दिसतो तिथेच किल्ली शोधते. अशा स्थितीत किल्ली सापडण्याचा कधी सुतराम संभव आहे का ?

अशी हास्यास्पद वर्तणूक आपली सर्वांची सध्या सुरू आहे. मानव सुख शोधायला निघाला आहे. पण कुठे ? जिथे ते आहे त्या अंतरात्म्यात अंधार असल्याने, तिथे ते कसे शोधायचे हे माहीत नसल्याने, जिथे ते नाही पण आहे असे भासते, अशा लखलखाटने दिपविणाऱ्या बाह्य विषयात आपण ते शोधतो आहोत. कितीही शोधले तरी ते कधी गवसणार आहे का ? या मार्गाने केवळ नैराश्य, विफलता, अशांतता, या क्रमाने केवळ आत्मनाशच व्हायचा; आत्मसुखाची अपेक्षा कशी करता येणार ?

आत्मसुखाची आवड उत्पन्न करण्यासाठी धर्म

आत्मसुखाची अशी उपेक्षा करणाऱ्या मानवाच्या मनाला योग्य वळण लावण्यासाठी त्याला धरून ठेवण्यासाठी, धर्माची कास धरावी लागते. "धारयति स धर्मः" म्हणजे धरून ठेवतो (नियमित मार्गाच्या बाहेर जाऊ देत नाही) तो धर्म; "धारणात् धर्ममित्याहुः" ज्याने धारण होते तो धर्म, अशीच मुळी धर्माची व्याख्या केली आहे. *'Religion is Realization.'* आत्मज्ञान वा साक्षात्कार म्हणजे धर्म. नराला नारायण करणारा, जीवा-शिवाची भेट घडविणारा, आत्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य उत्पन्न करणारा तोच व्यापक अर्थाने वस्तुतः धर्म ! तोच मानवाला शाश्वत सत्याची, अक्षय सुखाची किंवा परमपुरुषार्थाची वाट दाखवू शकतो. त्यामुळे नैतिक शुद्धाचरणाचा मूलस्रोत-देखील धर्मच ! नीतिमान आचरण ठेवावे असे धर्मच सांगतो. त्यामुळे नीतिमत्तेचे अधिष्ठान आहे धर्म.

(२) नीती व अध्यात्माचे अधिष्ठान धर्म

नैतिक आचरणाचे अधिष्ठान धर्मच

सुखप्राप्ती ही मानवाची मूलप्रवृत्ती. निरंतर टिकणारे सुख हेच धर्माचे साध्य. त्यामूळे या अक्षय सुखाची इच्छा असणाऱ्याने धर्मपालन

वि. प्र. 9८७२

करावे हे ओघानेच आले. धर्माने लोकव्यवहारात आचरणासाठी घालून दिलेल्या मर्यादा व नियमांचे पालन म्हणजे नीती. या नीतीचे आचरण करायचे आहे, अखेर व्यक्तीनें स्वत:च्या सुखासाठीच ! दुसऱ्यावर उपकार करण्याकरता नव्हे. स्वकल्याणासाठी, स्वहितासाठीच सदा–चरणी होण्याची सारी धडपड आहे. त्यामुळे, मी खरे का बोलायचे ? सदाचरण का करायचे ? सज्जनांच्या सहवासात का रहावयाचे ? अश्लील वाङ्मय का नाही वाचायचे ? कामुक चित्रपट का नाही पहायचा ? थोडक्यात सर्व इन्द्रियांवर संयम का ठेवायचा ? या नैतिक उपदेशाबावत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांना तर्कशुद्ध उत्तर धर्म देऊ शकतो. मी अमुक असे का वागायचे याचे तात्विक व बौद्धिक स्पष्टीकरण धर्मामुळे होते. धर्माने प्रतिपादिलेल्या नीतिमत्तेचे आचरण करायचे आहे ते 'शाश्वत' सुखाचा मार्ग चोखाळण्याकरता, आत्मानंदाचा अनुभव येण्याकरिता, भगवद्भक्तीने परमप्रेमाचा आस्वाद घेण्याकरता !

धर्म व नीती यांचे ऐक्य

भगवंताने आपल्या विभूतींचे वर्णन करतांना "नीतिरस्मि जिगीषताम्" म्हणजे जिंकू इच्छिणाऱ्यामध्ये नीती 'मी' आहे असे म्हटले आहे.[११] यावर भाष्य करतांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

पै सारासार निर्धारितयां । धर्मज्ञानाचा पक्ष धरितयां ।
सकळ शाखामाजि यया । नीतिशास्त्र ते मी ।।२९७।। (ज्ञा.अ.१०)

अर्थ :– आपत्प्रसंगी धर्म व ज्ञान यांचा पक्ष धरून हिताचे काय व अहिताचे कोणते याचा निश्चय करून देणारे शास्त्र नीतिशास्त्र होय.

वस्तुत: धर्म व नीती हे एकच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. जेव्हा कठीण प्रसंग आल्यामुळे जेव्हा स्वधर्माचे तंतोतंत आचरण करता येत नाही, अशा आपत्प्रसंगी धर्म व नीती यांच्या स्वरूपात थोडा फरक पडतो. परंतु दोहोमधली ही तफावत असते तात्कालिक स्वरूपाची. आपत्काल सोडला तर धर्म व नीती यात काहीही भेद नाही.[१२] हे दोन्ही समानार्थीच घेतले पाहिजेत. नीती व धर्म यांची फारकत फार झाली तर ती अनिष्ट होय. सज्जनांचा प्रभाव कमी झाल्याचे व दुर्जनांचा प्रभाव वाढल्याचेच ते लक्षण[1] अशावेळी मी अवतार घेऊन धर्म–नीतीचे ऐक्य करवितो असे

भगवंताने आश्वासन दिले आहे.

दैत्याची कुळे नाशीं । साधूंचा मान गिवशीं ।
धर्मासी नीतीसीं । शेंस भरीं ॥५३॥ (ज्ञानेश्वरी अ. ४)

अर्थ : ज्यावेळी मी भक्तांचा कैवार घेऊन सगुण साकार होऊन अवतरतो तेव्हा दैत्यकुळाचा नाश करितो, साधूंचा लोकात आदर वाढवितो आणि धर्म–नीति यांचे ऐक्य करवितो.

अध्यात्म म्हणजे काय ?

अध्यात्म म्हणजे काय ? या अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नाला गीतेत भगवंताने अुत्तर दिले आहे की,

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥३१॥ अध्याय ८

अर्थ: ब्रह्म हे अविनाशी व श्रेष्ठ आहे; स्वभाव (ब्रह्माचे शरीरात असणे) म्हणजे अध्यात्म.

श्री ज्ञानेश्वर महाराज या श्लोकावरील भाष्यात अध्यात्म म्हणजे काय हे सांगतांना म्हणतात,

आणि आकाराचेनि जालेपणे । जन्मधर्मांति नेमे ।
आकारलोपी निमणे । नाही कही ॥१८॥
ऐशिया आपुलियाची सहज स्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती
तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ॥१९॥ (ज्ञानेश्वरी अ. ८)

अर्थ: आकार म्हणजे शरीर हे जन्मास आल्याने त्याचे जे धर्म, त्याला जे जाणत नाही व ते शरीर नाश पावल्यावरही जे कधी नाश पावत नाही, हे सुभद्रापते, अशा रीतीने ज्या ब्रह्माची आपल्याच ठिकाणी निरंतर स्थिती असते, त्याला अध्यात्म असे म्हणतात.

नीति अध्यात्म व धर्म यामधील अेकात्मता

नीतियुक्त आचरण व अध्यात्मज्ञान या दोहोंची सर्वोत्कृष्ट परिणती धर्मातच होते. आदर्शअवस्थेत नीति, धर्म व अध्यात्मज्ञान यात किंचितही भेद रहात नाही. नैतिकता व अध्यात्मज्ञानाने परिपूर्ण जीवन हे धर्माचरण असते. खालील वचनावरून भारतीयांना या तिहींचे अेकीकरण कसे अभिप्रेत होते हे व्यक्तीच्या आचरणाबाबत व्यक्त केलेल्या अपेक्षांवरून स्पष्ट होईल.

सर्वेषां यः सुहृन्नित्यं सर्वेषां च हिते रतः ।
कर्मणा मनसा वाचा स धर्मः वेद जाजले ॥९॥ शांतिपर्व अ २६२.
यद्येकांतिभिराकीर्ण जगत्स्यात्कुरुनंदन ॥६२॥
अहिंसाकैरात्मविद्भिः सर्वभूतहिते रतेः ।
भवेत्कृत युग प्राप्तिराशीः कर्मविवर्जिता ॥६३॥शांतिपर्व अ.३४८.

अर्थः– हे जाजले, जो सर्वांचा नेहमी मित्र असून सर्वांच्या हिताकरितां कर्माने, मनाने व वाणीने झटतो तोच धर्म जाणतो ॥९॥ प्रवृत्तिपर धर्म पूर्णपणे आचरण करणारे, हिंसारहित, आत्माच आनंद आहे हे जाणणारे, सर्व भूतांच्या हितासाठी झटणारे असेच लोक जर ह्या पृथ्वीवर राहतील, तर स्वार्थबुद्धीने केली जाणारी कर्मे या जगातून नाहीशी होऊन, कृतयुगाची म्हणजे अत्यंत सुखाची प्राप्ती होईल.

देवाला न मानणारी देवमाणसे

अनेकदा अशी शंका उपस्थित केली जाते की धर्माला अजिबात न मानणारी पण नैतिक आचरण असलेली माणसे आपण समाजात पहातो; देवाला न मानणारी ही देवमाणसे असतात; मग धर्म वा अध्यात्माची कास धरण्याची गरज काय? अशा कर्तव्यनिष्ठ गृहस्थांमध्ये व धार्मिक वृत्तीच्या सात्विक मनुष्यांमध्ये काही अंतर असते काय? दोघेही परहित-तत्परता, सुस्वभावीपणा, दयाळूपणा, देशभक्ती इ. गुणांच्या बाबतीत एकाच योग्यतेचे असतील तर नैतिक गुणांच्या विकासासाठी आध्यात्मिक अधिष्ठानाची आवश्यकता काय ?

नीतिनिष्ठामध्ये दृढ श्रद्धेचा अभाव

सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, व सर्वव्यापी ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल ज्याच्या मनात किंचितही संशय राहिलेला नाही, विश्वात चालू असलेल्या सर्व घडामोडी केवळ त्या जगच्चालकाच्या इच्छेनेच घडत आहेत व त्या सर्व मंगलकारक आहेत, अशी ज्याची श्रध्दा आहे किंवा असा ज्याचा विचारपूर्वक निश्चय झाला आहे, तो केवळ नीतिनिष्ठच नव्हे, तर तो धर्मनिष्ठही आहे, असे समजावे. धार्मिक वृत्तीच्या अशा व्यक्तीला याबाबत जो आत्मप्रत्यय आला असतो, त्यामुळे त्याची नीतिप्रियता जितकी उत्साहयुक्त, आनंदप्रचुर, स्फूर्तिदायक व स्वयंप्रेरित असते तितकी

ती केवळ नीतिनिष्ठ व्यक्तीची नसते. बाह्यतः अुभयतांमधे जरी समान गुण दिसत असले, तरी धर्मनिष्ठ व्यक्तीची, उपरोक्त गुणांच्या आचरणाच्या बाबतीत जशी दृढ व संशयातीत श्रद्धा दृग्गोचर होते, तशी ती नीतिनिष्ठ मनुष्याच्या जीवनात व्यक्त होत नाही.

धर्मनिष्ठाचे निर्भय मन

अुदाहरण देऊन सांगायचे झाले तर, जगात दुर्गुणांची कदर, सद्गुणांची अुपेक्षा, दुर्गुणांचा मान सद्गुणांची अवहेलना, दुर्गुणी श्रीमंत तर सद्गुणी दरिद्री, अशी जी अवस्था आपण नित्य अनुभवतो त्यामुळे नीतिनिष्ठ व्यक्तीच्या मनात, स्वार्थत्यागपूर्वक आपण जे धर्माचरण करतो ते मूर्खपणाचे आहे की काय, अशी शंका, मनाच्या अेका कोपऱ्यात सदैव लपून असते, व तिची छाया मनोवृत्तीवर, सूक्ष्मपणे का होईना, दिसल्याशिवाय रहात नाही. नीतिनिष्ठ मनुष्यामध्ये सदाचरणामुळे अुत्पन्न झालेले पावित्र्याचे तेज असतेच, पण त्या मनुष्याच्या मनाला, आपल्या वागण्याबाबत ठाम निश्चय व समाधान नसते. स्वभावातील सरलता, सुसंस्कृतता व परहिततत्परता इ. गुणांमुळे तो सदाचरणाने वागत असतो इतकेच; परंतु त्याला संसाराचे गूढ अुलगडलेले नसते. किंबहुना त्यातील क्रूरता, अन्याय वगैरे पाहून तो अनेकदा भयभीत होतो. जग जसे असावे तसे आहे, असे त्याला वाटत नाही. धर्मनिष्ठ व्यक्तीच्या मनात अशा संशयांना थारा नसतो. सर्व जग आनंदाने भरलेले आहे, सच्चिदानंदात्मक आहे, असे त्याला वाटते. सर्व गोष्टी ईश्वराच्या अनुज्ञेनेच होत असून त्या सर्व न्याय्य, सुखद व मंगलकारक आहेत असा त्याचा दृढ विश्वास असतो. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल प्रगाढ श्रद्धा अुत्पन्न झाली म्हणजे त्यातूनच सदाचरणावर निरपेक्ष प्रेम, त्याच्या मनात अुत्पन्न होते. " भिद्यते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयः " अशी स्थिती प्रगल्भ धार्मिक वृत्तीच्या माणसात अुत्पन्न होते. या अुच्च भुमिकेवर तो अेकदम येत नाही. हळूहळू त्याचा अधिकार वाढत गेलेला असतो. पण अुच्चतम अवस्थेत त्याचे मन निर्भय, संशयरहित व आनंदपरिपूर्ण असते. त्यामुळे शेकडो संकटे कोसळली नि कुणाचा कितीही विरोध झाला तरी, खरा धर्मनिष्ठ मनुष्य सदाचरणापासून यत्किंचितही विचलित होत नाही.

कारण त्याची प्रत्येक कृती कसल्याही अपेक्षेशिवाय केवळ परमेश्वर-प्रीत्यर्थंच घडत असते.

नीतीला धर्माचे अधिष्ठान अपरिहार्यं

नैतिक गुणांवर अेवढी अविचल निष्ठा, निरीश्वरवादी नीतिनिष्ठाजवळ असण्याची अपेक्षा बाळगता येत नाही. आपले कर्तव्य करण्यास तो चुकणार नाही पण "कर्तव्य" हे त्याला अेक प्रकारचे ओझे वाटेल. सावत्र मुलाला सांभाळणाऱ्या सुशील स्त्रीप्रमाणे तो सर्व काही यथास्थित करील, पण स्वत:च्या मुलाला न्हाऊ घालतांना मातेला जो आनंद वाटत असतो तो त्याला वाटणार नाही ! धर्मनिष्ठ मनुष्याला कर्तव्य हे जाचक वाटत नाही. कर्तव्य हेच त्याला अत्यंत प्रिय असल्यामुळे प्रिय गोष्ट करतांना जसा आपणाला आनंद होत असतो, तसा आनंद त्याला कर्तव्य करीत असतांना होतो; आणि म्हणूनच नैतिकतेला धर्माचे अधिष्ठान अपरिहार्य आहे, असे म्हणावेसे वाटते.[१३] अेका विद्वान लेखकाने[१४] हेच प्रतिपादन करतांना म्हटले आहे.

" At no time has the mass of mankind treated morals and religion as mutually independent.....Ethics must have its roots in the divine and in the divine it must find its consummation. "

नीतीचे रोपटे मजबूत व्हावयाचे असेल तर त्याची मुळे खोलवर धर्मतत्वाशी वा अध्यात्माशी निगडित असली पाहिजेत. जीवन अध्यात्मतत्वाशी जेवढे समरस झाले असेल तेवढ्या प्रमाणात नीतीचे स्वाभाविक पालन व्यक्तीकडून झालेले आढळेल; म्हणून सुरवातीला जरी केवळ नीतीचा आग्रह धरणे संयुक्तिक असले, तरी पुढे यशस्वी मानवी जीवनाचा राजमार्ग आध्यात्माच्या दिशेने वळतो, हे कदापि विसरून चालणार नाही.

" A man can aspire for spiritual uplift only after his moral being is strongly built up. To say that ethics and spiritualism have little to do with one another is a very wrong idea and should be discarded at the very outset."

हे कुलगुरू श्री. नंददुलारे बाजपेयी[१५] यांचे उद्गार मननीय आहेत.

(३) सर्व धर्मांतिल समानता सामंजस्य नि सहिष्णुता

सर्वधर्मसमभाव शक्य

मात्र कुणीही कृपया येथे धर्माचा कोणताही संकुचित अर्थ घेऊ नये. नराचा नारायण हेच साध्य असलेल्या सर्व धर्मांना या प्रकरणात वर केलेले संपूर्ण विवेचन शब्दशः लागू होण्यासारखे आहे. केवळ विभिन्न प्रकृतीच्या लोकांसाठी विविध धर्माची उत्पत्ती झालेली असली तरी त्या सर्वांचे मूलभूत सूत्र अेक आहे. ते म्हणजे सदाचार व संयमाची कास धरून मानवाला आत्मज्ञानद्वारा आत्मसुख मिळवून देणे. जर कुणी विचारले की सर्वधर्मसमभाव उत्पन्न करणे शक्य आहे का? तर अत्यंत विश्वासाने याचे होकारार्थी अुत्तर देता येईल.

सर्व धर्मांना समान बाबी

प्रत्येक धर्माने आपल्या अनुयायासाठी शुद्धाचरणाचे काही नीति-नियम घालून दिले आहेत. त्याप्रमाणे दैनंदिन जीवन प्रत्येकाने व्यतीत करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसे आचरण ठेवल्याने काय फळ मिळते याचे वर्णनही सर्व धर्मग्रंथात आढळते. विविध धर्माने प्रतिपादिलेले वाह्य वर्तन व उपासना पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्यामधील आंतरिक तत्वांचे सूत्र अेकच असलेले अनुभवास येते.

आपल्या विवेचनाच्या दृष्टीने या सर्व धर्मात समान असलेल्या मुख्य बाबी खालीलप्रमाणे :—

१. सर्व प्राणिमात्रांना समभावनेने पहावे. जनतेला जनार्दनाच्या रूपाने भजावे.
२. आपल्याप्रमाणेच इतरावर प्रेम करून यथाशक्ती सर्वांना सहाय्यभूत व्हावे.
३. स्त्रियांबद्दल मातृभाव बाळगावा.
४. जेष्ठ व्यक्ती व गुरूजनांविषयी आदरबुद्धी असावी.
५. परमेश्वरावर दृढविश्वास व निष्ठा असावी.

सर्व धर्मांचे वरील मुद्यांच्या बाबतीत अेकमत असल्यामुळे मूलभूत मानवी मूल्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे याबद्दल, कोणताही पंथ,

संप्रदाय व धर्म यांचा अनुयायी असला तरी, अेकवाक्यता व्हायला काय हरकत आहे? सद्गुणांची जोपासना करण्याविषयी कुणाचे दुमत होण्याचे कारण नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने धार्मिक जीवन निष्ठेने जगणाऱ्या कोणत्याही दोन धर्मियांमध्ये भांडण होऊ शकत नाही. फार तर तात्विक वाद संभवू शकतात. धर्माचा खरा अर्थ समजला असेल तर परस्परांचे गळे कापण्यास ते कधीच अुद्युक्त होऊ शकणार नाहीत. धर्मात जेव्हा राजकारण शिरते तेव्हा मात्र परिस्थिती बदलते. सहकार्याचा व सहिष्णुतेचा धार्मिक दृष्टिकोन व शिकवण यांचा विसर पडतो आणि राजकीय हेतू व आशाआकांक्षा प्रबळ होऊन परस्पर कटुता व हेवेदावे यांना मनुष्य बळी पडतो.

नैतिक शिक्षणाद्वारे धर्मसहिष्णुता

तेव्हा नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे प्रत्येक व्यक्तीला जर यथार्थ धार्मिक जीवन जगण्याची कला आपण शिकविली तर परस्परांच्या धर्माबद्दल सर्वत्र आदर व सहानुभूती उत्पन्न होऊन आनंदाचे व सुखाचे साम्राज्य पसरल्याशिवाय रहाणार नाही. धर्म व राजकारण यामधील सीमारेषा सर्वांना समजू लागेल. प्रामाणिक मतभेद फार तर राहू शकतील ; पण आज जे धर्माच्या नावाखाली अत्याचार नि अनाचाराचे थैमान सुरू आहे त्याला पायबंद बसण्यास साह्य होईल. स्वत:चा धर्म ज्याला यथार्थपणे समजला त्याला इतरांच्या धर्मातील मर्म समजणे सुलभ आहे. महात्माजींच्या[११] प्रभावी भाषेत सांगायचे झाले तर, " *If a man reaches the heart of his own religion he has reached the heart of the others too.*"

सदाचरण स्वान्त:सुखाय

सारांश, लहानपणापासून शिक्षणाद्वारे अेखादी व्यक्ती जर धर्मनिष्ठ झाली तर सामाजिक व नागरिक जीवनास पोषक असे कितीतरी सद्गुण तिच्या अंगी सहजपणे बाणले जातात. प्रत्येक धर्माने प्रतिपादिलेली नीतिमत्ता काही आध्यात्मिक तत्वावर आधारलेली असते. त्यामुळे सदाचाराने वागण्यात आपले अंतिम कल्याण आहे या निरपेक्ष भावनेने तो सद्गुणांची अुपासना करीत असतो. उदा: मधुर प्रेमळ भाषण,

दयाळुता, परहिततत्परता किंवा उपभोगात संयमशीलता इ. गुण व्यवसायातील प्रगतीचे धोरण (*Business Policy*) म्हणून तो अंमलात आणीत नसतो तर स्वहिताचे, आत्मिक उन्नतीचे साधन म्हणून या गुणांचा त्याने सहज स्वीकार केला असतो. त्याचे सदाचरण स्वान्त :सुखाय होत असते; कसल्याही लौकिक स्वार्थासाठी नव्हे.

शुद्धाचरणास सर्व धर्मांचे प्रोत्साहन

एखादा ख्रिश्चन बंधु असेल तर थॉमस अे केम्पिसच्या[१७] खालील ओळी त्याला शुद्धाचरणास प्रवृत्त करतात.

"कोणता का एहिक विषय असेना, त्याला तू अधिक महत्व दिलेस की तुला तसेच मोठे अपयश आलेच. प्रत्यक्ष परमेश्वरावाचून तुला काही उंच नसो, मोठे नसो..... ज्याचे देवावर प्रेम आहे, तो देवाहून कमी अशा सर्व गोष्टींचा तिरस्कार करतो. चांगल्या मनुष्याचे वैभव म्हणजे चांगल्या सद्सद्विवेकबुद्धीची साक्ष होय. सद्सद्विवेकबुद्धी चांगली असू दे म्हणजे तू निरंतर सुखी राहशील."

एखाद्या मुस्लीम बांधवाला पुढील ओळी[१८] सद्वर्तनासाठी प्रेरणा देतील.

"बिस्मील्ला हिर्रहमा निर्रहिम":- अलहम्दो लिल्ला हे रब्बील आलमीन अर्रहमा निर्रहीमे मालीके यौमेद्दिन इय्याक न अबुदो ब इय्याक नस्तअीन एहदे नस्मीरातल मुस्तकीमा सिरातल लजीना अन अम्त अलैहीम गैरील मगदूबे अलैहीम वलद्दॉल्लीन."

अर्थ :– हे परमेश्वरा, सर्व स्तुती केवळ तुझ्यासाठीच आहे. तूच सर्व पृथ्वीचे पालनपोषण करणारा आहेस. आणि तूच सर्वांना क्षमा व कृपा करणारा आहेस. (अखेरच्या प्रलयाच्या) न्यायाच्या दिवशी तूच सर्वांना न्याय देणार आहेस. हे जगन्नियंत्या आम्ही तुझीच स्तुती करतो. व तुझीच मदत मागतो, आम्हाला योग्य मार्गाने ने. ज्या रस्त्याने गेले असता तुझी दया – कृपा प्राप्त होते, त्याच रस्त्याने आम्हास ने. ज्या वाटेने तुझी अवकृपा होते त्या रस्त्याने नव्हे.

तसेच मानवाच्या चिरंतन कल्याणासाठी भारतीय ऋषींनी सामवेदातील खालील श्रुतींद्वारे केलेला उपदेश केवढा अर्थपूर्ण आहे ?

सेतूंस्तर दुस्तरान्	पार करण्यास कठिण असा ह्या सेतु तू ओलांडावास.
दानेनादानम्	दानाने कृपणतेला ओलांडावे.
अक्रोधेन क्रोधम्।	शांततेने क्रोध जिंकावा.
श्रद्धयाऽ श्रद्ध्म्।	श्रद्धेने अश्रद्धा नाहिशी करावी.
सत्येना नृतम्।	सत्याने असत्याला नष्ट करावे.
अेषागतिः। अेनदमृतम्	हाच मार्ग आहे. हीच अमृत प्राप्ती आहे.
स्वर्गंच्छ। ज्योतिर्गंच्छ।	चतुरतेने सेतु पार करून स्वर्गाकडे व
सेतूंस्तर चतुरः।	प्रकाशाकडे जा.

हिंदूना संत तुकाराम महाराजांचा खालील अभंग सत्प्रवृत्त करील यात्वद्दल कुणाचे दुमत होईलसे वाटत नाही.

परावियां नारी माउलीसमान। मानिलीया धन काय वेचे ? ॥१॥
न करिता परनिंदा परद्रव्य अभिलाष। काय तुमचे यास वेचे सांगा ॥२॥
बैसलिये ठायीं म्हणता राम राम। काय होय श्रम अैसे सांगा ॥३॥
संताच्या वचनी मानिता विश्वास। काय तुमचे यास वेचे सांगा ॥४॥
खरे बोलता कोण लागती सायास। काय वेचे यास अैसे सांगा ॥५॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठी। आणिक ते आटी नलगे काही ॥६॥

या अभंगातील उपदेशाप्रमाणे सनातन वैदिक धर्माने जे मूलभूत सिद्धान्त हजारो वर्षांपासून भारतीय जनमानसात अंकित करून ठेवले, त्यामुळेच इथल्या व्यक्तीच्या आचरणाला भक्कम आध्यात्मिक बैठक लाभली. भारतीय सभ्यता, संस्कृती व परंपरा आजवर अक्षुण्ण राहू शकली याचे तरी दुसरे कोणते कारण सांगता येईल ?

हिन्दू व मुसलमान या मध्ये धर्मदृष्टया अभेद

हिन्दू धर्मान्तर्गत असलेल्या शीख धर्माचा प्रमाण म्हणून मानलेला जो "आदिग्रंथ" त्याचे अुदाहरण घ्या. हिन्दू व मुसलमान या दोन्ही धर्माविषयीचा समभाव या ग्रंथात समाविष्ट केलेल्या संत श्री नामदेवांच्या अेका पदात व्यक्त झाला आहे तो असा:[१९]

हिंदू अन्ना तुरक काणा
दोघां ते गिआनी सिहाणा ।।

हिंदू पूजै देहुरा मुसलमाण मसीत ।
नामे सोई सेविजा जह
देहुरा न मसीत ।।

अर्थ :- हिंदू आंधळे आहेत. तुर्क काणे आहेत. दोघेही अडाणीच. या दोघांपेक्षा ब्रह्मज्ञानी हा शहाणा समजावा. हिंदू देवळात जाऊन परमेश्वराची पूजा करतो. तर मुसलमान मशिदीत जातो. पण नामदेव अशा एका देवाची पूजा करतो की त्याला देऊळही नाही आणि मशीदही नाही.

हाच अर्थ जसाच्या तसा व्यक्त करणारे भाव गुरू नानक यांच्या पद्यातही उतरले आहेत. गुरू नानक हे हिंदूमुसलमानामध्ये धार्मिकदृष्ट्या अभेद भावना बाळगीत. त्यांच्या विषयीचे

गुरू नानक शाही फकीर
हिंदुका गुरू और मुसलमानका पीर ।।

हे वचन प्रसिद्धच आहे. दोन्ही प्रमुख धर्माच्या अनुयायांनी आपापला स्वधर्म न सोडता खरा मानवधर्म कसा आचरणात आणावा या संबंधी ठिकठिकाणी उपदेश केला आहे.

एकदा एका हिन्दू पंडिताने " आपण यज्ञोपवीत का धारण करीत नाही? " असा गुरू नानकांना प्रश्न केला. त्यानी या प्रश्नाला दिलेले खालील मार्मिक उतर प्रसिद्ध आहे :

" हे पंडित महाशय, ज्यांत दया हा कापूस, शांती हा धागा, ब्रह्मचर्य ही गांठ, सत्य हा त्या गांठीचा पीळ आहे, असे एखादे आध्यात्मिक यज्ञोपवीत आहे का तुमच्याजवळ? असल्यास जरूर द्या. मी त्याचा स्वीकार करीन. "

एका धर्मशील मौलवीलाही त्यांनी असाच उपदेश केला होता.

" तुम्हाला खरा मुसलमान व्हावयाचे आहे ना ? मग दया ही तुमची मशीद, श्रद्धा ही तुमची प्रार्थनेची चटई, प्रामाणिकपणा हे तुमचे कुराण, नम्रता ही तुमची सुंता आणि उत्तम आचरण हा तुमचा रोजा होऊ द्या, म्हणजे तुम्ही खरेखुरे मुसलमान व्हाल. "

अशा रूपकात्मक भाषेत व सूक्ष्म अुपरोध वापरून अनेक संतानी आपल्या काळातील दांभिक धर्मनिष्ठांच्या संकुचित दृष्टिकोनावर प्रहार केला. याचा अर्थ त्यांना शाश्वत अशा धर्ममूल्यांचा अुच्छेद करावयाचा होता असे नव्हे. अुलट भोंदू भक्तांच्या कर्मठतेमुळे आलेली मलिनता दूर करून त्रिकालाबाधित श्रेष्ठ अशा तत्वांना त्यांना अुजाळा द्यायचा होता. साहजिकच कोणत्याही नवीन धर्माची त्यांनी स्थापना केलेली नाही. आपण कोणतेही धर्ममत स्वीकारा, पण सर्व देवांचा देव असलेला सत्यरूपी ईश्वर दृष्टीआड होऊ देऊ नका असा कळकळीचा संदेश सर्व संतांनी अेकमुखाने दिलेला आढळतो. संत कबीराच्या अेका पदातील नामदेवांच्या तोंडी घातलेले अुद्गार असे :

" नामा का त्रिलोचना ।
मुखमे राम संभाली ॥
हाथ पावु करि काम सभ ।
चित निरंजन नाली ॥ "

अर्थ:— माझे हातपाय काम करीत असले तरी माझे मुख हे सतत राम-नामाचा जप करीत असते व माझे चित्त निरंजन अशा परमेश्वराकडे वेधलेले आहे.

सर अहमद हुसैनसुद्धा [२०] समाजाच्या ईश्वरविषयक कल्पनेनुसार अनेकविध धर्मांच्या अस्तित्वाला मान्यता देतांना म्हणतात,

" Please remember that there are many men and many minds and there are likely to be as many religions, as many conceptions of God, as many notions of His attributes and as many ideas of the beginning or end of things, as there are thinking minds."

धर्ममुळे जीवनदृष्टीतच बदल

सारांश, नीतिमान आचरणाला ईशचिंतनरूपी आत्मसुखाचे स्थायी व बळकट असे आध्यात्मिक अधिष्ठान जर कुणी दिले असेल, तर ते वरील प्रमाणे धर्माने ! धर्मतत्वे अंगी मुरून आत्मानंदाची अेकदा मनाला गोडी लागली म्हणजे त्याची स्वाभाविक परिणती सदाचरणात कशी होते, हे अभ्यासण्यासारखे आहे. जगातील सर्व धर्मांच्या मूलभूत तत्वांचा

हिंदू पूजै देहुरा मुसलमाण मसीत ।
नामे सोई सेविजा जह
देहुरा न मसीत ।।

अर्थ :– हिंदू आंधळे आहेत. तुर्क काणे आहेत. दोघेही अडाणीच. या दोघांपेक्षा ब्रह्मज्ञानी हा शहाणा समजावा. हिंदू देवळात जाऊन परमेश्वराची पूजा करतो. तर मुसलमान मशिदीत जातो. पण नामदेव अशा एका देवाची पूजा करतो की त्याला देऊळही नाही आणि मशीदही नाही.

हाच अर्थ जसाच्या तसा व्यक्त करणारे भाव गुरू नानक यांच्या पद्यातही उतरले आहेत. गुरू नानक हे हिंदूमुसलमानामध्ये धार्मिकदृष्ट्या अभेद भावना बाळगीत. त्यांच्या विषयीचे

गुरू नानक शाही फकीर
हिंदुका गुरू और मुसलमानका पीर ।।

हे वचन प्रसिद्धच आहे. दोन्ही प्रमुख धर्माच्या अनुयायांनी आपापला स्वधर्म न सोडता खरा मानवधर्म कसा आचरणात आणावा या संबंधी ठिकठिकाणी उपदेश केला आहे.

एकदा एका हिन्दू पंडिताने " आपण यज्ञोपवीत का धारण करीत नाही? " असा गुरू नानकांना प्रश्न केला. त्यानी या प्रश्नाला दिलेले खालील मार्मिक उतर प्रसिद्ध आहे :

" हे पंडित महाशय, ज्यांत दया हा कापूस, शांती हा धागा, ब्रह्मचर्य ही गांठ, सत्य हा त्या गांठीचा पीळ आहे, असे एखादे आध्यात्मिक यज्ञोपवीत आहे का तुमच्याजवळ? असल्यास जरूर द्या. मी त्याचा स्वीकार करीन. "

एका धर्मशील मौलवीलाही त्यांनी असाच उपदेश केला होता.

" तुम्हाला खरा मुसलमान व्हावयाचे आहे ना ? मग दया ही तुमची मशीद, श्रद्धा ही तुमची प्रार्थनेची चटई, प्रामाणिकपणा हे तुमचे कुराण, नम्रता ही तुमची सुंता आणि उत्तम आचरण हा तुमचा रोजा होऊ द्या, म्हणजे तुम्ही खरेखुरे मुसलमान व्हाल. "

अशा रूपकात्मक भाषेत व सूक्ष्म अुपरोध वापरून अनेक संतांनी आपल्या काळातील दांभिक धर्मनिष्ठांच्या संकुचित दृष्टिकोनावर प्रहार केला. याचा अर्थ त्यांना शाश्वत अशा धर्ममूल्यांचा अुच्छेद करावयाचा होता असे नव्हे. अुलट भोंदू भक्तांच्या कर्मठतेमुळे आलेली मलिनता दूर करून त्रिकालाबाधित श्रेष्ठ अशा तत्वांना त्यांना अुजाळा द्यायचा होता. साहजिकच कोणत्याही नवीन धर्माची त्यांनी स्थापना केलेली नाही. आपण कोणतेही धर्ममत स्वीकारा, पण सर्व देवांचा देव असलेला सत्यरूपी ईश्वर दृष्टीआड होऊ देऊ नका असा कळकळीचा संदेश सर्व संतांनी अेकमुखाने दिलेला आढळतो. संत कबीराच्या अेका पदातील नामदेवांच्या तोंडी घातलेले अुद्गार असे :

" नामा का त्रिलोचना ।
मुखमे राम संभाली ॥
हाथ पावु करि काम सभ ।
चित निरंजन नाली ॥ "

अर्थ:— माझे हातपाय काम करीत असले तरी माझे मुख हे सतत राम-नामाचा जप करीत असते व माझे चित्त निरंजन अशा परमेश्वराकडे वेधलेले आहे.

सर अहमद हुसैनसुद्धा [२०] समाजाच्या ईश्वरविषयक कल्पनेनुसार अनेकविध धर्मांच्या अस्तित्वाला मान्यता देतांना म्हणतात,

" Please remember that there are many men and many minds and there are likely to be as many religions, as many conceptions of God, as many notions of His attributes and as many ideas of the beginning or end of things, as there are thinking minds."

धर्ममुळे जीवनदृष्टीतच बदल

सारांश, नीतिमान आचरणाला ईशचिंतनरूपी आत्मसुखाचे स्थायी व बळकट असे आध्यात्मिक अधिष्ठान जर कुणी दिले असेल, तर ते वरील प्रमाणे धर्माने ! धर्मतत्वे अंगी मुरून आत्मानंदाची अेकदा मनाला गोडी लागली म्हणजे त्याची स्वाभाविक परिणती सदाचरणात कशी होते, हे अभ्यासण्यासारखे आहे. जगातील सर्व धर्मांच्या मूलभूत तत्वांचा

परिणाम जीवनदृष्टीच आमूलाग्र वदलण्यात कसा होतो, हे प्रत्येक धर्माचे पृथक विवेचन करून स्पष्ट करणे अवघड नाही. पण विस्तारभयास्तव ते शक्य नाही. त्यामुळे बहुसंख्य भारतीयांचा जो हिन्दू धर्म, त्यातील मूलभूत सिद्धांताचा व्यक्तीच्या नैतिक आचरणावर हितकर परिणाम कसा होतो हे आपण निवडक सिद्धांत घेऊन थोडक्यात विशद करू. "शितावरून भाताची परीक्षा" होते त्याप्रमाणे या विवेचनामुळे इतर धर्मतत्वांबाबतही विचार करण्याची यथार्थ दृष्टी प्राप्त होण्यास सहाय्य होईल.

(४) धर्मसिद्धांताचा नैतिक आचरणावर हितावह परिणाम : चार प्रमुख सिद्धान्त

(अ) आत्म्याच्या अमरत्वाचा सिद्धान्त

(*Law of the Immortality of the soul*)

"नैनं छिद्रन्ति शस्त्राणि । नैनं दहति पावकः ।" या शब्दात वर्णन केलेला आत्मा अनादी नि अविनाशी आहे ही हिन्दूंची धारणा सुप्रसिद्ध आहे. त्यामुळे इहलोकीच्या मृत्यूने जीवन संपत नाही ही भावना दृढ होते. मृत्यूची भीती वाटेनाशी होते. केवळ कपडे बदलावे तसा मृत्यु म्हणजे जीर्णशीर्ण झालेला देह टाकून नवा देह धारण करणे एवढाच मतितार्थ असल्याने माणूस निर्भय होतो. एका इंग्रज सैनिक अधिकाऱ्याने हिन्दू सेनेच्या अतुल शौर्याची कारणमीमांसा करतांना याच सिद्धान्तावर नेमके बोट ठेवले. आत्मा अमर असल्याची जी श्रद्धा त्यांच्या ठिकाणी असते त्यामुळेच मृत्यूची पर्वा न करता अत्यंत धैर्याने ते लढतात असा त्याचा अनुभव.

तसेच आत्मा हा सान्त व विनाशी आहे असे गृहीत धरताच जन्मापासून मृत्युपर्यंतच्या परिमित कालखंडात शक्य तेवढे सुखोपभोग वाटेल त्या मार्गाने प्राप्त करावेत ही विचारसरणी प्रादुर्भूत होते.

यावज्जीवेत् सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥

अर्थ :- जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत मिळतील तेवढे सुखोपभोग

भोगावेत. मग ऋण काढून तूप घ्यावे लागले तरी चालेल. कारण देहाचे भस्म झाल्यानंतर पुनः येणे कुठले ?

या चार्वाक नीतीचे वा सुखवादाचे *(Hedonism)* प्राबल्य सर्वत्र होते. हा देह नष्ट झाल्यानंतर पुन्हा इन्द्रिय भोग मिळण्याची आशा नसल्याने सूक्तासूक्त मार्गाने देहाची पूजा करण्यातच माणसाला आयुष्याची इतिकर्तव्यता वाटू लागते. तो वाढत्या वयाबरोबर संयमी होण्याऐवजी अधिकाधिक भोगवादी बनतो.

या भोगवादाचा, नास्तिकवादाचा पगडा भारतावर कधी बसू शकला नाही याचे प्रमुख कारण आत्म्याच्या अमरत्वाचा हा सिद्धान्त.

(ब) पुनर्जन्माचा व कर्मविपाकाचा सिध्दान्त

(Law of Rebirth and Law of Karma)

कर्माच्या गुणावगुणानुसार फल

या दोन्ही सिद्धान्तांचा परस्पर घनिष्ट संबंध असल्याने त्यांचा एकत्रित विचार केला आहे. परमात्म्यात विलीन होईपर्यंत, अमर असलेला आत्मा पुनःपुन्हा नवे देह धारण करून अभिव्यक्त होत असतो. त्यालाच आपण पुनर्जन्म असे संबोधतो. ही अभिव्यक्ती जीवाच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार होत असते. जीवाने केलेल्या प्रत्येक कर्माचे त्याच्या गुणावगुणाप्रमाणे बरे वाईट फळ मिळत असते. कोणतेही कर्म कधीच निष्फळ होत नाही. यालाच कर्मसिद्धान्त म्हणतात. शुक्रमुनी म्हणतात,

"कर्मैव कारणं चात्र सुगर्ति दुर्गति प्रती ।
कर्मैव प्राक्तनमपि क्षणं किं कोऽस्ति चाक्रियः ॥३७॥ (शुक्रनिती)

अर्थ :– सुगती वा दुर्गती प्राप्त होण्याचे अेकमेव कारण कर्म हेच आहे. प्राक्तन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून कर्मच होय. कर्माशिवाय क्षणभर तरी कोणी राहू शकेल काय ?

स्वामी विवेकानंदानी या सिद्धान्तावर श्रद्धा प्रकट करतांना म्हटले आहे.

" What you are today is the result of your past actions and what you will be in future is the outcome of your present actions."

पुनर्जन्म व कर्मविपाक या सिद्धान्ताचा परिणाम भारतीय जीवनावर व तद्द्वारा सामाजिक व आर्थिक व्यवस्थेवर फार खोलवर झालेला दिसून येतो. या सिद्धान्तावरील श्रद्धेमुळे व्यक्तीचा जीवनविषयक दृष्टिकोन कसा समाजहितैषी बनतो हे आपण अेका उदाहरणाने पाहू.

धर्मतत्वांचा आर्थिक व्यवहारावर ठसा

धनलोभामुळे आज समाजात किती असंख्य गुन्हे घडत आहेत हे सर्वांना विदित आहेच. परंतु या सिद्धान्ताची मजबूत पकड जर मनावर असेल तर व्यक्तीच्या आर्थिक वागणुकीवर त्याचा ठसा *(Impact on Economic behaviour)* उमटल्याशिवाय रहात नाही. धनाची प्राप्ती व व्यय याबाबतचा दृष्टिकोनच मुळी या सिद्धान्तामुळे बदललेला आढळेल. संपन्नतेची व विपन्नतेची अेक अशी अुपपत्ती त्यामुळे अंगी बाणते, की जी सामाजिक स्थैर्य व लोकशाहीचे संरक्षण यांना अत्यंत सहाय्यक ठरावी. साम्यवादी व समाजवादी म्हणणाऱ्या राष्ट्रांनाही अद्याप परिपूर्ण आर्थिक समानता उत्पन्न करता आलेली नाही. तेव्हा विविध कारणांनी थोडीबहुत आर्थिक विषमता ही रहाणारच.

श्रीमंत व गरीबात परस्पर सद्भाव

अशा आर्थिक विषमतेमुळे धनिक वर्गात कमीजास्त प्रमाणात अहंमन्यता, स्वगुणांची प्रौढी, अुन्मत्तता, इतराविषयी तुच्छता, चैनीची प्रवृत्ती तर निर्धनाच्या मनात धनिकाविषयी असूया, कुमार्गाने धनार्जनाची प्रवृत्ती, नैराश्य शैथिल्य इ. केवळ दुर्गुणांचीच उत्पत्ती दोन्ही सांपत्तिक स्तरांत झालेली आढळून येते. परिणामतः पाश्चात्य देशात व तेथील विचारसरणीने प्रभावित झालेल्या भारतीयांत या दुर्गुणांची कशी जोपासना होत आहे हे सर्वविदित आहेच. परंतु भारतीय तत्वज्ञानाची अपूर्वता अशी की या दोन सिद्धान्तामुळे, श्रीमंत वा गरीब कुणीही असो, परस्पराविषयी सद्भावच उत्पन्न होतो. तो समाजस्वास्थ्यास कसा हितावह ठरतो हे लक्षात घेण्यासारखे आहे.

संपन्नतेची व विपन्नतेची अुपपत्ती

आपली श्रीमंती ही गतजन्मातील पुण्यात्मक सुकर्माचे फळ आहे व गरिबी ही गत पापकर्माचा परिपाक आहे, अशीच श्रद्धा त्या त्या वर्गातील

व्यक्तीच्या मनात असते. आपल्या गत बऱ्यावाईट कर्मांचे फळ म्हणजेच आपली ही सांप्रतची सांपत्तिक स्थिती, असे कर्मसिद्धान्तानुसार त्यांना वाटत असते. त्यामुळे मागील पुण्यकर्माने मिळालेला पैसा हा चैनीत खर्च केला, वा धनामुळे येणाऱ्या इतर दुर्गुणांचा जर मी धनी झालो तर सर्व संचित सुकृतांचा साठा संपुष्टात आल्यानंतर निर्धनाचे वा नरकाचे जिणे मला जगावे लागेल म्हणून, भारतीय धारणा दृढ असलेला श्रीमंत सावध राहतो; कारण रामायण त्याला बजावत असते की,

न चिरं पापकर्माणः क्रूरा लोकजुगुप्सिताः।
ऐश्वर्यं प्राप्य तिष्ठन्ति शीर्णमूला इव द्रुमाः॥

अर्थ :- पापकर्मे केलेले क्रूर, जरी संपत्ती प्राप्त करीत असले तरी, (कीड लागलेले) जीर्ण मुळे झालेले झाड ज्याप्रमाणे लवकर नष्ट होते, त्याप्रमाणे, त्याचा उपभोग घेण्यासाठी फार काळ जगत नाही.

एका जन्माने आयुष्य संपले नसून पुढील जन्मासाठी वा भविष्यकाळासाठी काही तरतूद केली पाहिजे म्हणून व्रतवैकल्ये, यज्ञ, दान, देणगी इ. अनेकविध उपायांनी धनाला तो सत्कारणी लावण्याचा प्रयत्न करतो. दान करतांना सुद्धा याचकावर आपण काही अुपकार करीत आहोत ही भावना न बळावता उलट दानाची संधी देऊन याचकानेच मला उपकृत केले आहे ही भावना बळावते. सारांश, लक्ष्मीच्या साहचर्याने येणारे जे दुर्गुण, त्यांचा समाजातील धर्मशील लक्ष्मीपुत्रांत प्रादुर्भाव होत नाही.

निर्धन मनुष्यही जर आपल्या विपन्नावस्थेची उपपत्ती गत पापकर्माशी लावत असेल तर पुन्हा कुमार्गाने या जन्मात पैसे मिळवून (आधीच साचलेल्या गत दुष्कर्मात अधिक भर घालून) आपला पुढला जन्म वा भविष्यकाळ अधिकच संकटग्रस्त करावा असे त्यास कसे वाटेल ?

प्रयत्नाला प्रेरणा

या विचारसरणीमुळे निष्क्रियतेला प्रोत्साहन मिळते असा आक्षेप अनेक विचारवंतांनी घेतला आहे. परंतु तो गैरसमजावर आधारलेला आहे, हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. कारण पुनर्जन्माचा सिद्धान्त प्रयत्नवादाला कुठेही विरोध करीत नाही. फक्त स्वतःच्या भौतिक उन्नतीसाठी

करावयाचे प्रयत्न कुणाच्या द्वेषावर आधारलेले कुमार्गाचे नसावेत अेवढीच गोष्ट हा सिद्धान्त मानवी मनावर ठसवितो. तसेच कोणताही प्रयत्न वाया जाणार नसून या नाही तर पुढल्या जन्मी तो फलदायी होईल या आशेमुळे माणूस कर्म करण्यास अधिक अुद्युक्त होण्याचाच संभव जास्त. सन्मार्गाने होतील तेवढे प्रयत्न करावेत अशी प्रेरणा त्यामुळे अंत:करणात अुत्पन्न होते.

धनाविषयीचा अुदात्त दृष्टिकोन

" जोडोनिया धन अुत्तम व्यवहारे। अुदास विचारे वेच करी "

या तुकोक्तीत या धारणेचा सारांश व्यक्त झाला आहे. "अुत्तम व्यवहाराने" या प्रमाणे जे काही " धन जोडले " असेल त्यामुळे अहंकार अुत्पन्न होऊन माज न येऊ देता " अुदासपणे वा अनासक्तपणे " ते खर्च कर, असा अुपदेश तुकोबांनी केला आहे. आद्य शंकराचार्यांच्या[२१] खालील श्लोकात धनविषयक भारतीय दृष्टिकोन असाच व्यक्त झाला आहे.

" मूढ जहीहि धनागमतृष्णां, कुरू सद्बुद्धिं मनसि वितृष्णाम्।
यल्लभसे निजकर्मोपात्तुं, वित्तं तेन विनोदय चित्तम् ॥

अर्थ : धन हेच सर्वस्व, जिविताचे अंतिम साध्य केव्हाही समजू नये. सन्मार्गाने प्राप्त झालेले विविध भोग ईश्वरार्पण करून केवळ प्रसाद या नात्याने, निर्लेपता ठेवून त्याचा खुशाल अुपभोग घ्यावा. धनाचे अर्जन, अुपभोग व वंटन हे अर्थशास्त्रीय व्यवहार कोणत्या तत्वावर आधारलेले असावेत हे यावरून मात्र कळून येईल. ईशावास्योपनिषदातील खालील सुप्रसिद्ध श्लोकात हेच तत्व सुस्पष्टपणे घोषित केले आहे.

" ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यांजगत ।
तेन त्यक्ते न भुंजीथा मा गृध: कस्यस्विद्धनम् ॥

अर्थ : या विश्वात जे म्हणून पदार्थ आहेत ते सर्व ईश्वराधिष्ठित आहेत; अशी दृढ भावना करून निष्काम बुद्धीनेच त्यांचा अुपभोग घ्यावा. कोणत्याही धनाचा अभिलाष धरू नये.

संपत्तीच्या अुपभोगाकडे बघण्याचा हा दृष्टिकोन म्हणजे धनविषयक विचाराबाबत भारतीयांच्या विचारसरणीची अंतिम अुदात्त परिणतीच होय.

(क) शाश्वत सुख बाहेर नसून स्वतःमध्येच आहे

इन्द्रियजन्य सुख देणाऱ्या वस्तू एखाद्याजवळ जितक्या अधिक तितका तो अधिक सुखी, असे चुकीचे समीकरण सामान्यतः गृहीत धरले जाते. मनुष्य हा इच्छांचा पुंजका आहे (*Man is a bundle of desires –Adam Smith*) ही दोषास्पद अर्थशास्त्रीय विचारसरणी या समीकरणाच्या मुळाशी असते. "मनात येतील त्या इच्छा अनेकविध साधनांनी भागविण्याचा प्रयत्न करीत राहणे, हेच मानवी जीवनाचे सार आहे," अशी विचारसरणी त्यामुळे प्रादुर्भूत होईल. इच्छा अनंत, विविध, व क्षितिजाप्रमाणे वाढत्या असल्याने, त्यांची भूक कधीच संपायची नाही. विज्ञानाच्या नवनवीन शोधामुळे सुखसोईंच्या साधनांमध्ये नित्य नवी भर पडत आहे. अनंत इच्छा भागविण्यासाठी सुखद अशी बाह्य उपकरणे जमा करण्याची जणू प्रत्येकाची स्पर्धा सुरू आहे. जगण्याची साधने जमविण्याच्या धडपडीत होणारा जीवनाचा बेदरकार अपव्यय (*"the reckless waste of life in pursuit of the means of life."*) असे याचे यथार्थ वर्णन एकाने केले आहे.

परंतु मनातील सर्व इच्छा अेकाचवेळी तृप्त होऊन सुखी झालेला माणूस कुणाच्या पाहाण्यात आहे काय ? मनूने म्हटल्याप्रमाणे अग्नि विझविण्यासाठी जर कुणी तुपाच्या आहुती टाकू लागला तर तो शमण्याची जशी कधी शक्यता नाही, तसेच मानवी मनाचे आहे. इच्छा भागविल्याने त्या शांत होण्याऐवजी अधिक भडकत जातात. तेव्हा बाह्य वस्तूंपासून मिळणाऱ्या क्षणिक सुखाच्या मागे न लागता अंतर्मुख होऊन शाश्वत व अखंड सुखाचा अनुभव स्वतःमध्येच घेण्याचा प्रयत्न करावा, असे भारतीय तत्वज्ञान आजवर सांगत आले आहे. 'तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी', ही श्री तुकोबांची उक्ती प्रसिद्धच आहे.

(ड) मानवाचे अंतिम साध्य परमेश्वर-प्राप्ती वा आत्यंतिक सुख-प्राप्ती

मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ साध्य वा परमपुरुषार्थ आहे ईश्वरानुभूती वा अखंडसुखप्राप्ती ! ईश्वरदर्शन झालेल्या सत्पुरुषांच्या सर्व

कामनांचे परिपूर्ण शमन होत असल्याने ते अखंड अविनाशी अशा सुखाचे स्वामी झालेले असतात. आत्मसुखाची आवड वाढत गेली म्हणजे त्याची परिणती साक्षात्कार किंवा परमेश्वर प्राप्तीत होते व नित्यसुखाचा आस्वाद त्याला मिळू लागतो. थोडक्यात म्हणजे ईश्वर-प्राप्ती व अखंडसुख या अेकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, त्या अभिन्न आहेत. परमेश्वर व अविनाशीसुख हे वेगळे करता येत नाही. "आनंदाचे निधान, कैवल्याचा पुतळा, सुखाचा सागर" इ. शब्दात परमेश्वराचे वर्णन जे अनेक संतानी केले आहे ते याच अभिप्रायाने. चालू शतकातच होऊन गेलेले जन्मांध संत श्री गुलाबराव महाराज[११] एका पदात म्हणतात,

बाळा जग आनंद स्वरूप ।। धृ. ।।
आनंदातुनि जगदुत्पत्ति । आनंदस्थितिरूप ।।
आनंदातचि लय विश्वाचा । मूल आनंद अमूप ।।
त्याची तू जिज्ञासा करि बा । सांडुनि संसृतिकूप ।।
ज्ञानेश्वरप्रभु ऐसे वदता । शिष्या सत्व अमूप ।।

शिक्षणाची परिणती आत्मानुभवाच्या प्रवृत्तीत

आनंदाश्चर्याची गोष्ट अशी की अुपर्निर्दिष्ट तिसऱ्या व चवथ्या सिद्धान्ताच्या बाबतीत सर्व धर्मियांच्या तत्वज्ञानात डोळ्यात भरावी अशी अेकवाक्यता आहे. धर्म म्हणजे साक्षात्कार वा आत्मानुभूती हे तत्व बहुतेक सर्वच धर्मांनी प्रतिपादिलेले आहे. सर्वच देशातील, धर्मातील व काळातील साक्षात्कारी सत्पुरुष, अेकाच आध्यात्मिक विश्वात वावरत असल्याने, स्वत:च्या पारमार्थिक अनुभवासंबंधी अेकच भाषा बोलतात. शाश्वत व मर्यादातीत असा त्यांचा आत्मानुभव दिक्कालातीत असतो; मग जात, धर्म, पंथ यांच्या मर्यादा त्याला कशा पडणार?

तसेच आत्मानुभूतीमुळे सर्व संतांना प्राप्त झालेला आत्मानंद हा कोणत्याही बाह्य लौकिक साधनापासून उपलब्ध होत नसतो. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णिल्याप्रमाणे

वर्षियेवीण सागर । जैसा जळे निर्भर ।
तैसा निरुपचार । संतोषी जो ।। १५१।। (बारावा अध्याय)

पावसाशिवाय देखील ज्याप्रमाणे समुद्र पूर्ण पाण्याने भरला असतो, त्याप्रमाणे सुखभोग प्राप्त न होता देखील सत्पुरुष अखंडसुखानुभव घेत असतात.

याप्रमाणे सर्वांचेच ध्येय असलेले आत्यंतिक व शाश्वत सुख, हे कुठे बाहेरच्या सुखसाधनात शोधायचे नसून, स्वत:मध्येच असलेल्या या सुखामृताचा स्रोत अखंड स्रवेल यासाठी अव्याहत प्रयत्न व्हावेत, हे सर्व मानवजातीला, मग ती कोणत्याही धर्माची असो, अभिप्रेत आहे. तात्पर्य, नैतिक व अध्यात्मिक शिक्षणाची परिणती अशा आत्मानुभवाच्या वा साक्षात्काराच्या प्रवृत्तीत व्हावयास हवी.

विभिन्न धर्म विभिन्न भाषांसारखे

स्वामी शिवानंद म्हणतात,[२३] *"The innermost principle within all existence has been described by all the founders of religions as the highest spiritual consiciousness that is latent in all. It is pure unity without parts, a unique homogeneity admitting no differences."* सर्व चराचरात एकच अध्यात्मतत्व जरी सुप्तपणे वास करीत असले तरी त्याच्या प्रगटीकरणाचे मार्ग प्रवृत्तीनुसार विभिन्न असू शकतात. मनातील भाव प्रगट करण्यासाठी ज्याप्रमाणे देशकाल परिस्थितीनुरूप अनेक भाषांचा जन्म झाला, त्याप्रमाणे अखंड आनंदरूप असलेल्या अनंताचा अनुभव घेण्यासाठी विभिन्न मानवी प्रवृत्तीनुसार भिन्न भिन्न धर्मांचा उदय झाला असे म्हणता येईल.[२४] किंबहुना जितके अधिक धर्म, पंथ, संप्रदाय, असतील तितक्या अधिक व्यक्तींची, त्यांची पात्रता, बुद्धी, आवडनिवड यांना अनुसरून धर्माची गरज भागविता येईल.[२५] शाश्वत सुखाकडे नेणारे मार्ग जितके अधिक, तितकी समाजाची सोय अधिक चांगली ! त्यामध्ये अमुकच मार्ग चांगला हे म्हणणे हास्यास्पद आहे. हृषीकेश येथील सर्वधर्म–परिषदेच्या प्रारंभीच उद्घोषित केलेले वाक्य या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे.[२६] *"Religions disharmany is a misnomer.... No true follower of any religion will ever condemn other religions What creates disharmony is the irreligious part of man, the animal in man. We are living in the atomic*

कामनांचे परिपूर्ण शमन होत असल्याने ते अखंड अविनाशी अशा सुखाचे स्वामी झालेले असतात. आत्मसुखाची आवड वाढत गेली म्हणजे त्याची परिणती साक्षात्कार किंवा परमेश्वर प्राप्तीत होते व नित्यसुखाचा आस्वाद त्याला मिळू लागतो. थोडक्यात म्हणजे ईश्वर-प्राप्ती व अखंडसुख या अेकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, त्या अभिन्न आहेत. परमेश्वर व अविनाशीसुख हे वेगळे करता येत नाही. "आनंदाचे निधान, कैवल्याचा पुतळा, सुखाचा सागर" इ. शब्दात परमेश्वराचे वर्णन जे अनेक संतानी केले आहे ते याच अभिप्रायाने. चालू शतकातच होऊन गेलेले जन्मांध संत श्री गुलाबराव महाराज[११] एका पदात म्हणतात,

बाळा जग आनंद स्वरूप ।। धृ. ।।
आनंदातुनि जगदुत्पत्ति । आनंदस्थितिरूप ।।
आनंदातचि लय विश्वाचा । मूल आनंद अमूप ।।
त्याची तू जिज्ञासा करि बा । सांडुनि संसृतिकूप ।।
ज्ञानेश्वरप्रभु ऐसे वदता । शिष्या सत्व अमूप ।।

शिक्षणाची परिणती आत्मानुभवाच्या प्रवृत्तीत

आनंदाश्चर्याची गोष्ट अशी की अुपर्निर्दिष्ट तिसऱ्या व चवथ्या सिद्धान्ताच्या बाबतीत सर्व धर्मियांच्या तत्वज्ञानात डोळ्यात भरावी अशी अेकवाक्यता आहे. धर्म म्हणजे साक्षात्कार वा आत्मानुभूती हे तत्व बहुतेक सर्वच धर्मांनी प्रतिपादिलेले आहे. सर्वच देशातील, धर्मातील व काळातील साक्षात्कारी सत्पुरुष, अेकाच आध्यात्मिक विश्वात वावरत असल्याने, स्वत:च्या पारमार्थिक अनुभवासंबंधी अेकच भाषा बोलतात. शाश्वत व मर्यादातीत असा त्यांचा आत्मानुभव दिक्कालातीत असतो; मग जात, धर्म, पंथ यांच्या मर्यादा त्याला कशा पडणार?

तसेच आत्मानुभूतीमुळे सर्व संतांना प्राप्त झालेला आत्मानंद हा कोणत्याही बाह्य लौकिक साधनापासून उपलब्ध होत नसतो. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णिल्याप्रमाणे

वार्षियेवीण सागर । जैसा जळे निर्भर ।
तैसा निरुपचार । संतोषी जो ।। १५१।। (बारावा अध्याय)

यावसाशिवाय देखील ज्याप्रमाणे समुद्र पूर्ण पाण्याने भरला असतो, त्याप्रमाणे सुखभोग प्राप्त न होता देखील सत्पुरुष अखंडसुखानुभव घेत असतात.

याप्रमाणे सर्वांचेच ध्येय असलेले आत्यंतिक व शाश्वत सुख, हे कुठे बाहेरच्या सुखसाधनात शोधायचे नसून, स्वत:मध्येच असलेल्या या सुखामृताचा स्रोत अखंड स्रवेल यासाठी अव्याहत प्रयत्न व्हावेत, हे सर्व मानवजातीला, मग ती कोणत्याही धर्माची असो, अभिप्रेत आहे. तात्पर्य, नैतिक व अध्यात्मिक शिक्षणाची परिणती अशा आत्मानुभवाच्या वा साक्षात्काराच्या प्रवृत्तीत व्हावयास हवी.

विभिन्न धर्म विभिन्न भाषांसारखे

स्वामी शिवानंद म्हणतात,[२३] *"The innermost principle within all existence has been described by all the founders of religions as the highest spiritual consiciousness that is latent in all. It is pure unity without parts, a unique homogeneity admitting no differences."* सर्व चराचरात एकच अध्यात्मतत्व जरी सुप्तपणे वास करीत असले तरी त्याच्या प्रगटीकरणाचे मार्ग प्रवृत्तीनुसार विभिन्न असू शकतात. मनातील भाव प्रगट करण्यासाठी ज्याप्रमाणे देशकाल परिस्थितीनुरूप अनेक भाषांचा जन्म झाला, त्याप्रमाणे अखंड आनंदरूप असलेल्या अनंताचा अनुभव घेण्यासाठी विभिन्न मानवी प्रवृत्तीनुसार भिन्न भिन्न धर्मांचा उदय झाला असे म्हणता येईल.[२४] किंबहुना जितके अधिक धर्म, पंथ, संप्रदाय, असतील तितक्या अधिक व्यक्तींची, त्यांची पात्रता, बुद्धी, आवडनिवड यांना अनुसरून धर्माची गरज भागविता येईल.[२५] शाश्वत सुखाकडे नेणारे मार्ग जितके अधिक, तितकी समाजाची सोय अधिक चांगली ! त्यामध्ये अमुकच मार्ग चांगला हे म्हणणे हास्यास्पद आहे. हृषीकेश येथील सर्वधर्म–परिषदेच्या प्रारंभीच उद्घोषित केलेले वाक्य या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे.[२६] *"Religions disharmany is a misnomer.... No true follower of any religion will ever condemn other religions What creates disharmony is the irreligious part of man, the animal in man. We are living in the atomic*

age. An immediate change is inevitable." महात्मा गांधींनी विभिन्न धर्म पंथाचे अनुयायी परस्पराबद्दल आदर व प्रेम बाळगून एकत्र येत असल्याचा काळ नजीक येत असल्याचे नमूद केले आहे.[२७] स्वामी विवेकानंदांनी[२८] म्हटल्याप्रमाणे : "*. . . . religions are different forces in the economy of God, working for the good of mankind.*" मानवी हितासाठी परमेश्वरी योजनेनुसार कार्य करीत असलेले प्रचंड शक्तीचे विविध स्रोत म्हणजे धर्म. त्या धर्माच्या यथार्थ ज्ञानाने कुणाचे अहित कसे होईल ?

शीलसंपन्न नागरिक हेच राष्ट्रीय धन

हिन्दू धर्मातील प्रमुख सिद्धान्ताचे हे झाले थोडक्यात स्पष्टीकरण. परंतु तेवढ्यावरुनही मूलभूत धर्मतत्वांचा मानवाच्या आचरणावर समाजहिताला पोषक असा प्रभावी परिणाम कसा होतो हे स्पष्ट होईल. इतर धर्मातील पायाभूत अशा तत्वांचा देखील असाच प्रभाव त्या त्या धर्मियांच्या वागणुकीवर पडतो असा सर्वत्र अनुभव आहे. कोणत्याही राष्ट्रातील नागरिकांचे शील व सदाचरण यावरच राष्ट्रीय जीवनाची विविध अंगे परिपुष्ट होत असतात; आणि ते तर अवलंबून असते आत्मानुभूतीची आवड अुत्पन्न होऊन धर्म, नीति ब अध्यात्म यांची कास धरलेल्या शीलसंपन्न नागरिकांच्या संख्येवर ! ही संख्या जेवढी मोठी, त्याप्रमाणात राष्ट्रीय चारित्र्याची अुंची अधिक; नीति व अध्यात्मप्रेमामुळे सत्प्रवृत्त समाज देशात जेवढा अधिक, तेवढे त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय स्थान मोठे, धर्मतत्वे अंगी मुरल्यामुळे नैतिक आचरण हा ज्यांचा सहजस्वभाव झाला आहे अशा नरश्रेष्ठांच्या लौकिकामुळे राष्ट्राच्या लौकिकात भर पडत असते. भगवान रामकृष्ण परमहंस, योगी अरविन्द, रमण महर्षि, स्वामी रामतीर्थ, संतश्रेष्ठ श्री गुलाबराव महाराज, अवतार मेहेरबाबा या अर्वाचीन भारतात झालेल्या सत्पुरुषांच्या केवळ अस्तित्वाने भारत पुनीत झाला आहे.

चारित्र्य, नीती, धर्म–अभंग साखळीतील दुवे

अेवढा श्रेष्ठ आध्यात्मिक अधिकार असलेले सत्पुरुष, शाळा-कॉलेजातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे घडविणे शक्य होईल, असे कुणी म्हणणार नाही. मात्र त्याचे बीजारोपण खचितच केले जाऊ शकते. आणि धर्ममूल्ये अंत:करणात खोलवर रुजल्याशिवाय हे संभवनीय नाही. कारण ज्या नागरिकांच्या चारित्र्यावर राष्ट्राचा निकोप विकास अवलंबून असतो, ते चारित्र्य अवलंबून असते नैतिकतेवर व नीतीचे मूळ आहे धर्म ! सतत ३० वर्षे अेका विश्वविद्यालयाचे अध्यक्ष म्हणून लौकिक प्राप्त केल्यानंतर अेका शिक्षणतज्ञाने[२९] केवळ बौद्धिक शिक्षण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अपूर्ण आहे हे मत देऊन म्हटले आहे,

" Character is the man, and the strength of character is moral goodness. Morals must find their root in religion & draw their strength from it. "

तेव्हा शिक्षणात पूर्णता येण्यासाठी आध्यात्मिक शिक्षण आवश्यक आहे आणि त्यासाठी संपूर्ण शिक्षण-प्रक्रिया धर्माने व्यापली जावयास हवी.[३०]

धर्म भारताचा प्राणच

विद्यार्थ्यांची नैतिक घडण घडण्याच्या दृष्टीने धर्माचे शिक्षणात महत्वपूर्ण स्थान असल्याची यथार्थ जाणीव अनेक देशातील शासनांना व विद्वानांना होऊ लागली आहे. विज्ञानाच्या शिखरावर आरूढ झालेल्या व त्यामुळेच विज्ञानाच्या दुष्परिणामांची जाणीव झालेल्या अमेरिकेसारख्या देशातही द्वितीय महायुद्धानंतर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा आग्रहाने सर्वत्र पुरस्कार झाला.[३१] अनेक विद्यापीठांच्या ध्येय धोरणात या बाबतीतील अनुकूलता स्पष्टपणे प्रगट झाली आहे.[३२] अमेरिकेप्रमाणेच इतरही अनेक देशात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे शीलनिर्मितीचा केवढा तरी पाठपुरावा सातत्याने केला जातो. परंतु धर्म हा ज्या देशाचा प्राण समजला जातो, धर्मज्ञानाच्या अपूर्वतेमुळे ज्या देशाचा जगात सर्वत्र गौरव होतो, धर्मप्रभावामुळे ज्या देशाचे अस्तित्व अक्षय्य व अभंग असे आजवर राहिले, त्या या भारतवर्षात धर्म हा सार्वजनिक जीवनातून सर्वत्र बहिष्कृत व्हावा, हे काही शुभलक्षण नव्हे.धर्मशिक्षण हे आक्षेपार्ह व वादग्रस्त व्हावे हे खरोखरी दुर्दैवी म्हटले पाहिजे!

" न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानाम् "

बुद्धिवादी म्हणविणाऱ्या व्यक्तींनासुद्धा विज्ञानविश्वातील समस्या सोडविण्यास ते समर्थ आहेत असे म्हणण्याचे धाडस करवणार नाही.प्रख्यात शास्त्रज्ञ सुलिव्हन[१३] यांनी, अपेक्षेप्रमाणे विज्ञान जगातील मूलभूत प्रश्न वैज्ञानिक सोडवू शकलेले नाही याची कबुली देऊन " *Science has became self conscience and comparatively humble* असे उद्गार[१४] काढले आहेत. मॅक्स प्लँक, जेम्स जीन्स[१५] इ. अनेक शास्त्रज्ञांचाही विज्ञाना-बाबत असाच भ्रमनिरास झाला आहे. विज्ञान व धर्म हे परस्परविरोधी नसून परस्परपोषक आहेत हे जगविख्यात शास्त्रज्ञांना आता पटू लागले आहे.

" Science without religion is lame.
Religion without science is blind. "

हे आइन्स्टाईनचे वचन प्रसिद्धच आहे. परंतु मानवी आचरणावर समाजानुकूल असा कायम ठसा उमटविणाऱ्या उपरिनिर्दिष्ट धर्म–सिद्धान्ता-बाबत जरी कुणाचा आक्षेप असला, तरी नैतिकतेचे अेक प्रभावी साधन म्हणून ते आपण गृहीत धरावयास काय हरकत आहे? वर्नाड शाने म्हटल्याप्रमाणे, 'पूर्वी' आपली प्राणघाती तलवार व आपल्या शत्रुचा गळा यांच्यामध्ये निदान ख्राईस्ट उभा राही. आज त्याचीच हकालपट्टी झाल्यामुळे तलवारीला अटकाव करणारी सारीच शक्ति नष्ट झाली आहे." मानवी जीवन सुखावह होण्यास जर धर्माचे सहाय्य होऊ शकते, तर ते का घेऊ नये ? शिवाय, प्रत्येक नैतिक नियमाच्या मागे असलेली कारण-परंपरा समजाऊन घेण्याची इच्छा वा योग्यता सामान्य व्यक्तीची कुठे असते ? प्रत्येक चागल्या गोष्टीबाबतचा तर्कनिष्ठ युक्तिवाद वा बुद्धिवाद सामान्य जनतेला सहसा अभिप्रेत नसतो. 'महाजनो येन गतः स पन्थाः' या वचनाप्रमाणे समाजातील जेष्ठांचे अनुसरण नेहमी सामान्यांकडून केले जाते. त्यामुळे सुशिक्षित, विद्वान, समाजधुरीण यांनी, त्यांना पटो वा न पटो, सामान्यांचा बुद्धिभेद होणार नाही अशा नीति – नियमांचे काटेकोर पालन कटाक्षाने करावयास नको काय?

नीतिनियम म्हणजे व्यक्तीभोवतीचे कुंपणच

सुदैवाने शेकडो धाग्यांनी विणलेली अेखादी सुंदर शाल जशी थंडी–पासून व्यक्तीचे संरक्षण करीत असावी, त्याप्रमाणे समाजातील बाह्य

आघात प्रत्याघातापासून, व्यक्तीला संरक्षण देऊ शकेल, अशा शेकडो नीतीनियमांचे सुंदर जाळे, प्रत्येक धर्माने अुत्पन्न केलेले आहे. कुठलाही धर्मग्रंथ वरवर चाळला तरी मानवी जीवनाला आधार देणारे तत्वज्ञान वा सिद्धान्त यांनी जसा त्याचा अेक भाग व्यापला असतो, त्याचप्रमाणे त्या तत्वज्ञानाचा वा सिद्धान्ताचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा म्हणून, आचरणाबाबत काही निश्चित आज्ञा वा नियमही त्यातील दुसऱ्या भागात ग्रंथित केलेले असतात. त्या आज्ञांचे कडक पालन करून मानवाने आपले जीवन अुदात्त व अुन्नत करून घ्यावे, असे आवाहन त्यात केले असते. व्यक्तीचे व समाजाचे जीवन या नियमांमुळे समृद्ध झाल्याचा लक्षावधी धर्मानुयायांचा हजारो वर्षांचा अनुभव, या प्रमाणग्रंथातील वचनांच्या मागे अुभा असतो. या नियमांचे अनुसरण करून, लौकिक व पारलौकिक जीवन धन्य झालेल्या अनेक सत्पुरूषांचे दाखले, या ग्रंथाच्या जमेला असतात. सामान्यांची साहजिकच या धर्मग्रंथातील अनुभवगम्य अशा धर्मतत्वांवर श्रद्धा बसते. त्यांचे अनुकरण ते करू लागतात. या धर्माज्ञा म्हणजे अेकप्रकारे समाजघटकांना असलेले स्वातंत्र्य अबाधितपणे अुपभोगता यावे म्हणून नीतीनियमांचे व्यक्ती-भोवती घातलेले कुंपणच होय.

" परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम् " या मुख्य सूत्राला अनुलक्षून या नियमांची मांडणी केलेली आढळेल.

नीति देहासारखी तर धर्म आत्म्यासारखा

अुपमाच द्यावयाची झाली तर देहाचा व आत्म्याचा जो परस्पर संबंध तोच नीतीनियमांचा व धर्माचा संबंध होय. आत्मा ज्या प्रमाणे अविनाशी, अमूर्त व अस्पर्श, तसेच धर्मचिदेखील असते. आत्म्याचे अस्तित्व देहाद्वारे प्रगट होत असते, त्या प्रमाणे धर्म नैतिक आचरणा-द्वारे प्रगट होतो. आचारातच धर्म अनुस्युत असतो. " आचार प्रभवो धर्मः. " धर्म हा आचरणप्रधान असतो असे जे धर्माचार्यांनी नमूद केले आहे, ते याच अर्थाने असावे. आचरणाचा आधार नसला तर नुसत्या धर्माची वटवट व्यर्थच ठरते. तसेच धर्मदिग्दर्शित अशी निश्चित दिशा नसली तर केवळ आचरणाला अर्थ रहात नाही शरीराशिवाय

आत्म्याचे अस्तित्व जसे व्यर्थ, किंवा आत्म्याशिवाय जसे शरीर निरर्थक, तसेच नीतिशिवाय धर्म व धर्माशिवाय नीतीबाबत म्हणता येईल. धर्म हा नैतिकतेचा प्राण तर नीती हे धर्माचे शरीर. परम्परांच्या सहाय्याशिवाय एकमेकांचे अस्तित्वच अशक्य आहे. समाज धारणेला या दोहोंची नितांत गरज असते. नीती व धर्म हे दोघे मिळून समाजाचे सारखे पोषण करीत असतात. नीती समाजरूपी जहाजाला मजबुती आणून देते, तर धर्म सुकाणूप्रमाणे अंतिम साध्याकडे नेणारी दिशा दर्शवीत असतो.

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सर्वाधिक गरज

सारांश, धर्मनिहित अशा नीतिमत्तेच्या आचरणाचे बाळकडू विद्यार्थ्यांना बाळपणापासूनच पाजावयास नको काय ? धर्माचरणाचे पालन करण्याची संवय जर शिक्षणाद्वारे लहानपणापासून लावण्याचा प्रयत्न केला तर समाजाला भेडसावत असलेले भयानक प्रश्न सोडविण्यास केवढे तरी सहाय्य होईल ! आज तर त्याची सर्वाधिक गरज आहे[१६] ख्रिश्चन बंधू प्रार्थनेच्या वेळी जे मागणे[१७] परमेश्वराजवळ मागतात, ते जरी उदाहरणादाखल पाहिले तरी, धर्म, व्यक्ती व समाज ह्यांचे जीवन, सुखावह करण्यास कसा कारणीभूत होतो, हे कळण्यासारखे आहे.

" Lord, make me an instrument of your Peace
Where there is hatred, let me sow love,
Where there is injury, pardon,
Where there is doubt, faith,
Where there is despir, hope,
Where there is darkness, light
And where there is sadness, joy ● "

संदर्भ टीपा

१. *C. F. Wishart, " Religion " in Symposium " On going to College," P. 230.*

२. राजेश्वरशास्त्री त्रिपुरवार : श्री गुलावराव महाराज यांचे चरित्र (उत्तरार्ध); पृ. २४२ – २४३.

३. ज्ञानेश्वरी : अध्याय ६; ओव्या ३६१ ते ३६३.

४. ज्ञानेश्वरी : अध्याय १०, ओवी १५९.

५. श्री गुलावराव महाराज : मधुर नित्यनैमित्तिक पाठ, पृ. १००.

६. दक्षस्मृति : अध्याय ३ रा; श्लोक २३.

७. मनुस्मृती : अध्याय ६ वा; श्लोक ६४.
संदर्भासाठी आणखी पहा– महाभारत; अनुशासन पर्व, अध्याय १११; श्लोक २६.

८. श्रीमद्भगवद्गीता : अध्याय १२ वा; श्लोक २०, २१; २२.

९. श्रीमदभगवद्गीता : अध्याय १८ वा; श्लोक ३६, ३७, ३८.

१०. कठोपनिषद : अध्याय २; वळी १; श्लोक १.

११. श्रीमद्भगवद्गीता : अध्याय १० वा; श्लोक ३८.

१२. ना. पै. उर्फ बाबाजी महाराज पंडित : श्री ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका; प्रथम खंड, पृ. ३१७.

१३. वामन मल्हार जोशी : नीतिशास्त्र – प्रवेश; पृ. ३५ ते ३९.

१४. *Balfour : Theism and Humanism; p. 128–129.*

१५. *Nand Dulare Bajpeyi: Record of Proceedings of All India Colloqnium on Ethical and Spiritual Values as the Basis of National Integration p. 62.*

१६. *Wit and Wisdom : Published by the United States of Information Service; New Delhi – 1.*

१७. *Thomus A. Kempis:Imitation of Christ* या ग्रंथाचा अनुवाद रे. नारायण वामन टिळक; "ख्रिस्तानुवर्तन"; भाग १. पृ. १४-१५.

१८. 'सुरये फातेहा' : कुराण.

१९. डॉ. मा. गो. देशमुख : "अंतरी वसला गोविन्द तेणे लागला भक्तिछंद" या लेखातील विवेचनाचा आधार; पहा दै. लोकसत्ता दि. १८-१-७०.

२०. *Sir. Ahmad Hussain : Notes on Islam; p. 24.*

२१. आद्य शंकराचार्य : द्वादशपञ्जरिका स्तोत्रम्, श्लोक १.
आणखी पहा : श्रीमद्भगवद्गीता, अध्याय ३; श्लोक ११.

२२. श्री गुलाबराव महाराज : पदांची गाथा; सुक्तिरत्नावली; नवमयष्टि; आवृत्ती १ ली : पद क्रमांक ४८५ पृ. ९४.

२३. *Shivananda : Unity of Religions; p. 72.*

२४. विद्यापीठ शिक्षण समिती आयोग (१९४८–४९) पृ. २९८.

२५. *R. G. Mujumdar : Swami Vivekananda Centenary Vol; Calcutta 1963; p. 310.*

२६. *World Parliament of Religions; Commemoration Volume; p. 5.*

२७. *M. K. Gandhi : All Religions are true; p. 10.*

२८. *The Complete Works of Swami Vivekananda : Vol. II; p. 364.*

२९. *John H. Harris : Thirty Years as President of Bucknell; p. 103.*

३०. *"Religion should pervade the entire educational process,"*

John W. Hoffman : The Religious ideal in Education; p. 106–107.

३१. अमेरिकेतील महाविद्यालयात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची लाट द्वितीय महायुद्धानंतर सर्वत्र कशी आली याचे विवेचन करणारा खालील प्रबंध पहा : *Merriman Cuninggin : The College seeks Religion;* या प्रबंधात पृ. ३० वर लिहिले आहे,

" Yet this much is already clear : religion occupies a larger place in the College's thinking and practice than at any time in the twentieth century. To furnish documentation for this judgement is the purpose of the succeeding chapters."

३२. पहा परिशिष्ट क्र. ३.

३३. *J. W. N. Sullivan : Limitations of Science; p. 164.*

३४. *Ibid : p. 182.*

३५. *Max Planck : Where is Science going; P. 200.*
Sir James Jeans : The Mysterious Universe; p. 150.

३६. *" Surely, if there was ever a time when moral and ethical and religious training should be at the Centere of every College campus, that time is now."*

C. D. F. Wishart : " Religion," in symposium " On going to College " p. 230.

३७. *St. Francis of Assisi " Essence of Prayer."*

✠ ✠ ✠

वाशी ज्ञान मंदिर

चार

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा जीवनावर सर्वांगीण सुपरिणाम

" यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥
मनसेवेंदमाप्तव्यं नेह नानास्ति किंचन ।
मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नानेव पश्यति ॥ "

कठोपनिषद् १

अर्थ– येथे जे आहे. तेच तेथेही आहे, जे तेथे आहे तेच येथेही आहे. जो येथे अनेकत्व (भिन्नत्व) पहातो तो एक दुःख संपत नाही तोच दुसरे दुःख पावतो.

येथे नानात्व नसून एकत्वच आहे हे मनानेच समजावे (कल्पावे) कारण जो नानात्व पहातो तो दुःखापाठी दुःखे भोगतो.

" *.....it follows that only religion can give ultimate meaning and depth to man's aspirations and that only education can make these aspirations intelligent, informed and creatively effective. So defined, religion and education are both absolutely essential to man's perennial quest for responsible freedom and enlightened dedication* "

Theodore M. Green

३६. *"Surely, if there was ever a time when moral and ethical and religious training should be at the Centere of every College campus, that time is now."*

C. D. F. Wishart : "Religion," in symposium "On going to College" p. 230.

३७. *St. Francis of Assisi "Essence of Prayer."*

✠ ✠ ✠

चार

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा जीवनावर सर्वांगीण सुपरिणाम

" यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥
मनसेवेंदमाप्तव्यं नेह नानास्ति किंचन ।
मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नानेव पश्यति ॥ "

कठोपनिषद्।

अर्थ– येथे जे आहे. तेच तेथेही आहे, जे तेथे आहे तेच येथेही आहे. जो येथे अनेकत्व (भिन्नत्व) पहातो तो एक दुःख संपत नाही तोच दुसरे दुःख पावतो.

येथे नानात्व नसून एकत्वच आहे हे मनानेच समजावे (कल्पावे) कारण जो नानात्व पहातो तो दुःखापाठी दुःखे भोगतो.

" *.....it follows that only religion can give ultimate meaning and depth to man's aspirations and that only education can make these aspirations intelligent, informed and creatively effective. So defined, religion and education are both absolutely essential to man's perennial quest for responsible freedom and enlightened dedication.* "

Theodore M. Green[1]

पारमार्थिक प्रगतीचा परिणाम लौकिक व्यवहारावर

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या वागणुकीला विशिष्ट वळण का लावायचे ? त्याचे प्रमुख प्रयोजन कोणते ? या शिक्षणाचे मूलभूत अधिष्ठान कोणते ? या प्रश्नांचे जे विवेचन आपण केले त्यामुळे व्यक्तीच्या आंतरीक वा आत्मिक जीवनाचा दृष्टिकोन कसा बदलतो हे आपण पाहिले. या दृष्टिकोनाचा बाह्य आचरणावर कसा हितावह परिणाम होतो त्याचाही आपण काही धर्म सिद्धांत वानगी-दाखल घेऊन उहापोह केला. परंतु आज भारतासमोर जे विविध प्रश्न 'आ' वासून उभे आहेत त्यांची सोडवणूक होण्याच्या दृष्टिने, ही नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे भावी पिढ्यांना प्राप्त होणारी जीवनदृष्टी, अमोल असा हातभार लाऊ शकते. या शिक्षणाची परिणती ईश्वर-दर्शन वा साक्षात्काराच्या प्रवृत्तीमध्ये व्हावी; या शिक्षणाने अविनाशी अशा आत्मसुखाची चटक लागावी; या आत्मसुखाच्या आवडीमुळे क्रमशः निरपेक्ष सदाचरणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा; श्रेष्ठ दर्जाच्या अशा निष्काम व निस्पृह धर्माचरणाने प्रथम पशुवृत्ती नष्ट होऊन मानवतेकडे वाटचाल करावी व नंतर मानवतेकडून देवत्वाकडे प्रगती व्हावी अशी अपेक्षा मागे व्यक्त केली आहे. परंतु या सर्व पारमार्थिक प्रगतीच्या

समजल्या जाणाऱ्या बाबींचा परिणाम लौकिक व्यवहारावर फार प्रभावीपणे उमटत असतो हे विसरून चालणार नाही.

आत्मिक जीवन जेवढे शुद्ध तेवढे बाह्य जीवन निर्मल

शुद्ध व निर्मळ अशा आंतरिक जीवनाचे प्रतिबिंब जीवनाच्या विविध अंगांना शुद्ध व निर्मळ करण्यास सहाय्यभूत ठरते हे लक्षात ठेवले पाहिजे. अंतरंग जेवढे तेजस्वी तेवढे बाह्य जीवन उज्वल होते. आत्मिक सामर्थ्य व समृद्धी जेवढी अधिक तेवढ्या प्रमाणात बाह्य लौकिक जीवन सामर्थ्यवान व समृद्धीने परिपूर्ण बनते. एखादी व्यक्ती आंतरिक उन्नतीकडे दुर्लक्ष करून केवळ बाह्य जीवनाचा भपकेबाज दिखाऊ डोलारा उभा करीत असेल तर तो अल्पजीवी ठरतो. दांभिकपणाचा दुर्गंध अशा जीवनाला आल्याशिवाय रहात नाही. या उलट आत्मिक सामर्थ्याच्या तुलनेने बाह्य लौकिक जीवनाचा देखावा विनयाने जेव्हा स्वल्प प्रमाणात प्रगट होतो तेव्हा तो चिरकाल टिकतो व गांभीर्याचा सुगंध जीवनात दरवळल्याशिवाय रहात नाही. आंतरिक सुखाने समृद्ध अशा जीवनापुढे भौतिक समृद्धीचा डोलारा फार काळ टिकत नाही, म्हणूनच भारतवर्षाने आत्मिक बळाच्या मजबूत आधारावरच भौतिक समृद्ध जीवन उभारण्याचा आदर्श समोर ठेवला. प्रचंड असे लौकिक सामर्थ्य असलेल्या राजशक्तीने, आत्म सामर्थ्याचे वैभव असलेल्या, पण बाह्यतः सामान्य दिसणाऱ्या ऋषिवर्यापुढे लोटांगण घालावे ही आहे प्राचीन भारतीय परंपरा!

अनेक समस्या सोडविण्यास हे शिक्षण पोषक

ही परंपरा विसरून भारताने जेव्हा जेव्हा केवळ भौतिक समृद्धीकडे लक्ष पुरविले, तेव्हा तेव्हा आत्मिक बळ कमी पडल्याने, त्याला लौकरच ओहोटी लागली. आज भारताची तीच चूक पुनश्च होत आहे. विविध योजनाद्वारे आपण आधिभौतिक उन्नतिकडे आपली सर्व शक्ती खर्च करीत आहोत. अर्थात त्यांची मुळीच गरज नाही असे कोण म्हणेल? पण त्याचबरोबर समाजाची आंतरिक आध्यात्मिक गुणसंपदा वाढविण्याचा प्रयत्न व्हावयास हवा. ज्या व्यक्तीसाठी व समाजासाठी भौतिक समृद्धीचा एवढा आटापिटा करायचा, त्यांना त्याचा सुयोग्य उपभोग घेण्याची क्षमता प्राप्त

होण्यासाठी काही किमान सदाचार व शहाणपण अपेक्षित नाही का ? आणि ते उत्पन्न व्हावे म्हणूनच नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा आग्रह! या शिक्षणामुळे जीवनाची अनेक अंगे परिपुष्ट तर होतातच; शिवाय लौकिक समृद्धी, स्थायी–टिकाऊ स्वरुपाची होण्यास सहाय्य होते. अनेक सामाजिक व राजकीय प्रश्न कायमचे सोडविण्यास मदत होऊ शकते. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणामुळे हे सर्व कसे संभवनीय होते याचे थोडक्यात दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

या शिक्षणाने भारतातील विविध समस्या सोडविण्यास कसा हातभार लागू शकतो, याचा आपण एकेक समस्या घेऊन क्रमशः विचार करू.

(१) राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीसाठी[३]

सुखदुःखाची समान संवेदना म्हणजे एकात्मता

सुखदुःखाची समान संवेदना समाजात जेवढी अधिक तेवढ्या प्रमाणात त्या देशात राष्ट्रीय एकात्मता अधिक असते. राष्ट्रीय दृष्ट्या सुखदायक वा दुःखदायक अशी इष्ट वा अनिष्ट घटना घडताच, अनुकूल वा प्रतिकूल अशा सामुदायिक कृतींची स्वाभाविक प्रेरणा जेव्हा सर्व देशभर उमटते, तेव्हा त्या देशात राष्ट्रीय एकात्मतेचा भाव जागृत आहे असे म्हणता येईल. भारताच्या गेल्या एक हजार वर्षांच्या कालखंडात ही एकात्म भावना क्षीण होत चालली आहे. या भारताच्या भावनिक एकात्मतेला तडा गेल्याचे दर्शविणाऱ्या घटनाच अधिक ! पृथ्वीराज चव्हाण महम्मद घोरीशी वायव्य सरहद्दीवर लढत असतांना उर्वरित भारत केवळ प्रेक्षकाची भूमिका वठवीत होता. इतकेच नव्हे तर काही शेजारी राजांनी ही संधी साधून पृथ्वीराजाच्या राज्याचे लचके तोडावयास कमी केले नाही ! अल्लाउद्दीन खिलजीसारखा तत्कालीन सामान्य सरदार थोड्या सैन्यानिशी दिल्लीहून निघून थेट दक्षिणेतले प्रचंड हिन्दू साम्राज्य अकारण नष्ट भ्रष्ट करतो व अगणित लूट घेऊन शेकडो मैलांचा प्रवास करून पुन्हा सुखरूपपणे परततो हे तरी दुसरे कशाचे निदर्शक आहे?

भारतीय एकात्मतेची भावना क्षीण

धर्म, प्रांत, भाषा, जात, पक्ष यांच्या आजतर एवढ्या प्रचंड भिंती उभ्या झाल्या आहेत की, भारतीय एकात्मतेच्या भावनेला पदोपदी पायदळी न तुडविले गेले तरच नवल ! राष्ट्राच्या ऐन विजयाच्या वा पराजयाच्या क्षणी धर्म, प्रांत, भाषा इ. संकुचित निष्ठा या राष्ट्रनिष्ठेपेक्षा वरचढ होऊ पहात आहेत. त्यामुळे राजकीय व शासकीय दृष्ट्या आज जरी भारत एकसंध दिसत असला तरी सुखदु:खाची समान प्रेरणा घेऊन कोणतीही सामुदायिक कृती करण्यास तो असमर्थ असल्याने भावनिक दृष्ट्या तो शतश: खंडित झाला आहे, असे म्हटले तरी वावगे होणार नाही. कोणतीही संकुचित दृष्टी न ठेवता संपूर्ण राष्ट्राचा समग्रपणे विचार करणाऱ्याला आजची ही स्थिती भयावह वाटल्याशिवाय रहात नाही. सर्व थोर राष्ट्रीय नेत्यांना ही एकात्मता कशी टिकवावी हा प्रश्न चिंताग्रस्त करीत आहे ते याचमुळे ! भेदभावनेमुळे छिन्नविछिन्न झालेले हे राष्ट्र फार काळ स्वतंत्र रहाणे दुरापास्त आहे हे दूरदृष्टी असलेल्या नेत्यांना जाणवू लागल्यास आश्चर्य नाही ! ही शेकडो वर्षापासूनच बळावत चाललेली व राष्ट्राला सतत संकटाच्या खाईत लोटणारी परिस्थिती कशी पालटता येईल ? राष्ट्रीय एकात्मता कशी निर्माण करता येईल ?

एकात्मतेची निर्मिती दोन प्रकारे

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने हे कार्य बऱ्याच प्रमाणात करता येईल. राष्ट्रीय एकात्मतेचा भाव या शिक्षणाने दोन प्रकारे जागविता येईल.

१. भारताच्या विशिष्ट जीवन निष्ठा वा जीवनोद्देशाची निर्मिती करणे.
२. राष्ट्रातील महत्कृत्याच्या, पराक्रमाच्या व विजयाच्या स्मृती ठसविणे. व चुकांमुळे झालेल्या हानींचे दिग्दर्शन करणे.

प्रत्येक राष्ट्राला त्याच्या प्रकृतीला अनुसरून स्वत:ची स्वतंत्र अशी जीवननिष्ठा असते. विशिष्ट असा जीवनोद्देश असतो. त्या त्या राष्ट्रातील विभिन्न धार्मिक, सामाजिक वा आर्थिक गट जरी आपल्या काही वैशिष्ट्यांसह आपले वेगळे अस्तित्व टिकऊन असले तरी संपूर्ण राष्ट्राच्या

या मूळ जीवननिष्ठेच्या प्रवाहाशी ते पूर्णपणे समरस झालेले असतात. राष्ट्रपुरुषाच्या या जीवनोद्देशाशी विसंगत असा विचार वा आचार कोणत्याही गटाचा वा घटकाचा आढळत नाही.

जीवननिष्ठेमुळे सामुदायिक कृतींची स्वाभाविक प्रेरणा

लोकशाही जीवन पद्धतीचा प्रसार करणे, भौतिक प्रगतीत सर्वोच्च स्थान प्राप्त करणे, हुकूमशाहीचा मुकाबला करणे हे आहेत अमेरिकेचे मुख्य जीवनोद्देश. तर रशिया व चीन इ. साम्यवादी राष्ट्रापुढे संपूर्ण जगात साम्यवाद प्रस्थापित करण्याचे भव्य स्वप्न आहे. ह्या ध्येयाच्या सिद्धी-साठी ते अविरत झटत आहेत. जीवननिष्ठेची ही भावना सर्व अरब व मुस्लिम राष्ट्रामध्येही थोड्याफार प्रमाणात आढळते. मुस्लिम धर्म व त्याची विचारसरणी सर्व जगभर प्रसारित करणे हा आहे त्यांचा जीवनोद्देश ! ह्या जीवनोद्देशाने ज्या राष्ट्राचे नागरिक जेवढे अधिक भारले गेले असतील तेवढा प्रचंड पराक्रम, स्वार्थत्याग करण्याचे सामर्थ्य त्या राष्ट्रामध्ये अधिक असते. ह्या जीवननिष्ठेमुळे सामुदायिक राष्ट्रीय कृती करण्याची स्वाभाविक प्रेरणा त्या देशाला मिळत असते.

उदात्त जीवनोद्देशांचा भारताला विसर

सुदैवाने भारताला त्याच्या संस्कृतीशी - प्रकृतीशी सुसंगत असा उदात्त जीवनोद्देश प्राप्त झाला आहे. सर्व जगाचे नैतिक व आध्या-त्मिक नेतृत्व पत्करून सांस्कृतिक साम्राज्य प्रस्थापित करणे; सर्वधर्म-समभावना दृढ करून आध्यात्मिक अनुभवाची सर्वत्र समानता जगाच्या दृष्टोत्पत्तीला आणणे; आत्मसुखाची आवड निर्माण करून ईश्वर प्राप्तीची अभिलाषा उत्पन्न करणे; अविनाशी अशा दैवी आनंदाचा प्राप्त झालेला वारसा जगाला प्रदान करून जागतिक सुख व शांतता प्रस्थापित करणे; हे महान कर्तव्य नियतीने आपणा-वर सोपविले आहे. प्राचीन काळी या जीवनोद्देशांची भावना भारतात एवढी प्रभावी होती की जगाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक नेतृत्व आपणास प्राप्त झाले होते. नि ते इतर देशाप्रमाणे सैनिक आक्रमणे व पाशवी अत्याचार करून नव्हे, तर सत्य - अहिंसेच्या मार्गाने

परकीयांची अंत:करणे जिंकून ! " कृण्वन्तो विश्वम् आर्यम् " हे प्राचीन आर्याच्या जीवनोद्देशाची प्रबळ भावना व्यक्त करणारे घोषवाक्य चीन-प्रमाणे साम्राज्य पिपासेचे द्योतक नसून स्वेच्छेने पत्करलेल्या भारताच्या सांस्कृतिक गुरूत्वाचे निदर्शक आहे. गत इतिहासात बजा-वलेल्या या महान भूमिकेचा आज भारतीयांना विसर पडला! जगा-तील मानवी जीवन समृद्ध करण्यात आपलाही महत्वपूर्ण सिंहाचा वाटा असतो हा आपला विश्वासच ढळला ? त्यामुळे भारतातील जीवनोद्देशाची भावना अत्यंत दुर्बल झाली आहे.

एकात्म भावनेचे जागरण संभवनीय

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेमुळे ही भावना पुन्हा जागविता येईल. राष्ट्रातील सत्पुरुषांच्या, वीर पुरुषांच्या महत्कृ-त्याच्या व पराक्रमाच्या स्मृती विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविणे हे देखील राष्ट्रीय एकात्मता उत्पन्न करण्यास सहाय्यभूत होईल. भिन्न धर्मीय समाज असल्याने धर्मनिष्ठा राष्ट्रनिष्ठेच्या आड येतील अशी भीती आपण उगीचच बाळगून आहोत ! न्यूनगंडात्मक अशा भ्रामक विचारसरणीने ते एक प्रश्नचिन्ह आपण अकारण उत्पन्न केले आहे! कॅनडामधील ब्रिटिश आणि फ्रेंच; तसेच स्वित्झर्लंड मधील फ्रेंच, जर्मन आणि इटालियन लोक ह्यांच्या मनात त्या त्या देशांनी सामूहिक स्मृतींचा वारसा यशस्वीपणे ठसविला आहे. विविध देशा-तून स्थायिक व्हायला येणाऱ्या परकियांची संख्या अमेरिकेतही फार मोठी आहे. त्यामुळे बहुधर्मी - बहुभाषीं अशा तेथील समाजात राष्ट्रीय एकात्मता उत्पन्न करणे फार दुर्घट; परंतु अमेरिकन शिक्षण-पद्धतीच्या प्रभावामुळे नव्याने नागरिकत्व स्वीकारलेल्यांची दुसरी नाही, तर तिसरी पिढी पूर्ण 'अमेरिकन,' म्हणूनच राष्ट्राच्या मूळ जीवन प्रवाहाशी तादात्म्य पावते. वॉशिंग्टन व लिंकन हे तिला राष्ट्रपुरूष वाटू लागतात. अशाच प्रकारे देशाच्या प्राचीन स्मृती व तदनुषंगाने येणारी राष्ट्रनिष्ठा निग्रहाने जतन करणाऱ्या राष्ट्राचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून इंग्लंडकडे अंगुली निर्देष करता येईल !

विजयाच्या सामूहिक स्मृती बिंबवणे

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या दिशेने म्हणावा तसा प्रयत्न झाला नाही. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या माध्यमातून हे शक्य होईल. आपल्या देशातील थोर राष्ट्र-पुरुषांचे स्फूर्तिदायक चरित्र, त्यांची गुणसंपदा, त्यांनी केलेली साहसे व मिळविलेले विजय यांच्या सामूहिक स्मृती शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या मन:पटलावर उमटविता येतील. आपण अशा थोर पूर्वजांचे वंशज आहोत याचा यथार्थ अभिमान व त्यांच्या श्रेष्ठ गुणांचे अनुकरण करण्याची प्रेरणा या स्मृती भावी पिढ्यांना देतील! भव्य यश संपादन केलेल्या एका विजिगीषू व समृद्ध राष्ट्राचे आपण वारसदार आहोत, ही भावना या शिक्षणाने खोलवर रुजविता येईल! संकुचित निष्ठा राष्ट्र निष्ठेपुढे गौण ठरतील. शिवाजी व राणा प्रताप, महात्मा गांधी, व योगी अरविंद यांना राष्ट्रपुरुष म्हणून देशभर सन्मानिले जाईल !

सारांश, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय व एकूण स्वरूप पाहता या शिक्षणामुळे राष्ट्राची जीवननिष्ठा व सामूहिक स्मृती विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविणे शक्य होऊन, या शिक्षणामुळे राष्ट्रात सुख - दु:खाची समान संवेदना उत्पन्न करता येईल. याबद्दल सहसा दुमत होणार नाही असे वाटते !

(२) राष्ट्रीय शिक्षणाला पायाभूत होण्यासाठी

राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय एकात्मता–हचा एकाच नाण्याच्या दोन बाजू

प्रत्येक राष्ट्र आपले ध्येय, आपली संस्कृती व आपली जीवन धारणा यांच्याशी सुसंगत अशी शिक्षण पद्धती आखून ती अशा रीतीने अमलात आणीत असते की, ज्यामुळे देशभक्ती व राष्ट्रीय जाणीव. (*National consciousness*) उत्पन्न होऊन राष्ट्राचा जो सांस्कृतिक वारसा त्याचे संरक्षण व पुढच्या पिढीमध्ये संक्रमण *(preservation and transmission of the cultural heritage of the nation*) होऊ शकेल! अशा शिक्षणाला ' राष्ट्रीय शिक्षण ' असे संबोधता येईल ! या शिक्षणाने राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होईल हे वेगळे सांगायला

नकोच ! किंबहुना राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय एकात्मता या एकाच नाण्याच्या दोन बाजू असाव्यात इतक्या अभिन्न कल्पना आहेत. एकमेकाशिवाय त्या संभवू शकत नाहीत. समान राष्ट्रीय ध्येय व आकांक्षा (*Common national ideals and aspirations*) यांनी युक्त असा, सहकार्याने सामुदायिक जीवन जगणारा समाज 'एकात्म' संबोधता येईल तर असा समाज निर्माण करणारे शिक्षण 'राष्ट्रीय शिक्षण' म्हणून संबोधिले जाईल. तेव्हा राष्ट्रीय शिक्षणाने राष्ट्रीय एकात्मतेची निर्मिती केली पाहिजे.*

राष्ट्रीय शिक्षणाचा पाया – आध्यात्मिक शिक्षण

भारतातील राष्ट्रीय शिक्षण, आपले राष्ट्रीय ध्येय, राष्ट्रीय संस्कृती व राष्ट्रीय आशाआकांक्षा यांच्याशी सुसंगत असे रहावयाचे असेल तर त्याचा पाया नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे घातला जावयास हवा. नैतिक व आध्यात्मिक जीवन हा तर भारताचा गाभा, ही तर त्याची जीवन निष्ठा ! आदर्श आध्यात्मिक जीवनाचे दर्शन घडऊन संपूर्ण जगाला सुखी समृद्ध करणे ही तर भारताची राष्ट्रीय आकांक्षा ! या आकांक्षेच्या पूर्तीसाठी राष्ट्रीय शिक्षणाचा मुलभूत आधार म्हणून नैतिक व आध्यात्मिक शिक्षण सर्वत्र दिले गेले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणाचा हेतू सफल होण्यास नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे अमोल असे सहाय्य होईल.

राष्ट्रीय भावना जागतिक शांततेच्या आड न येण्यासाठी

हे शिक्षण राष्ट्रीय शिक्षणाला पूरक होण्याचे आणखीही एक कारण सांगता येईल. राष्ट्रीय शिक्षणाने उत्पन्न होणारी प्रखर राष्ट्रनिष्ठा आंतरराष्ट्रीय विद्वेषाला जन्म देऊन जागतिक शांतता नष्ट करण्यास कारणीभूत होईल, अशी शंका व्यक्त केली जाते ! द्वितीय महायुद्धापूर्वी जर्मनी मधील हिटलर प्रणीत अतिरेकी राष्ट्रवादाचे उदाहरण या संदर्भात दिले जाते ! आणि ते अयोग्य आहे असे कोण म्हणेल ? एक भगवद्-भक्ती सोडली, तर कोणत्याही गोष्टीचा मग ती कितीही चांगली असो, अतिरेक हा वाईटच ! राष्ट्रीय शिक्षणातील सामान्य अतिरेक टाळण्यासाठी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा उतारा फार उपयोगी ठरेल !

भारताचे उदाहरण या बाबतीत लक्षातघेण्यासारखे आहे. भारताची आध्यात्मिक धारणा दृढ असल्याने येथील राष्ट्रीय निष्ठा जागतिक कल्याणाच्या कधीही विरोधात गेल्याचे इतिहासात सांगत नाही. ही ऐतिहासिक परंपरा टिकविण्यासाठी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा अवलंब सर्व राष्ट्राने करणे इष्ट ठरेल. त्यामुळे राष्ट्रीय हिताची भावना जागतिक कल्याणाच्या जाणीवेच्या अलिकडली पायरी म्हणून ओळखली जाईल. आध्यात्मिक भूमिकेमुळे 'विश्वविषयक' दृष्टिकोन दृष्टिआड होणार नाही.

(३) ''संपूर्ण मानव सिध्दान्त'' दृष्टया वा सन्तुलित व्यक्तित्व विकासासाठी

शिक्षणातील अपूर्णता दूर करण्यास अध्यात्म शिक्षण

इ. स. १९०० च्या सुमारास "संपूर्ण मानव" शिक्षणाद्वारे घडविला जावा असा विचार अमेरिकेमधील महाविद्यालयातील शिणक्षतज्ञांनी पुढे मांडला. केवळ शारीरिक व बौद्धिक ज्ञान मानवात पूर्णता आणणारे नसल्याने धर्म व अध्यात्म शिक्षणाद्वारा विद्यार्थ्याचा मानसिक व आध्यात्मिक विकास साधला म्हणजे मानव 'पूर्ण' होऊ शकेल विचाराला या पुढे विशेषच चालना मिळाली. भविष्यातले अराजक टाळायचे असेल तर एकात्म वा संपूर्ण मानव घडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे या संदर्भात एक लेखक म्हणतो,[५] *"Culture or Anarchy ? We have to choose between the two, in our schools as elsewhere. And if, as we must, we choose culture, we must realize that this can never be the product of teachers and taught who are at sixes and sevens alike with themselves, and one another. Education, in those circumstances, can be nothing but anarchical. To be cultural it must be based on an integrated organisation, integrated personalities and integrated methods."*

'संपूर्ण मानव' सिद्धान्ताच्या *(The theory of whole man)* प्रतिपादकांनी धर्म व शिक्षण यांची सांगड घालावी असा आग्रह धरला यांचे[६] म्हणणे असे की,

" . . . .the theory of ' whole man ' brings religion and education together and demands that colleges give religion its rightfulplace. Thus the influence of religious education . . . . has resulted in the inclusion of religion not merely in the curriculum but in the total programme."

सारांश, केवळ शारीरिक व बौद्धिक ज्ञान देणे हे मानवात अपूर्णता आणणारे असल्याने धर्म व अध्यात्मशिक्षण द्वारा विद्यार्थ्याचा मानसिक व आध्यात्मिक विकास साधला म्हणजे मानवाचा संपूर्ण विकास होऊ शकेल, असे या सिद्धांतात प्रामुख्याने मांडले आहे. योगी अरविद घोषांनी देखील अशा ' संपूर्ण मानव ' विकासाची गरज प्रतिपादिली आहे. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने ही गरज बऱ्याच प्रमाणात पूर्ण होऊ शकेल. हे निःसंशय !

मानवाची एकांगी वाढ टाळण्यास अध्यात्म शिक्षण

हे शिक्षण संतुलित व्यक्तित्व विकासासाठीही *(growth of blanced personality)* उपयुक्त ठरू शकेल. ' संपूर्ण मानव विकास व संतुलित व्यक्तित्व विकास ' या दोहोमधील सूक्ष्म फरक सोडला तर या दोन्ही कल्पना सामान्यतः एकच अर्थ ध्वनित करतात. प्रत्येक क्षेत्रांत विशेषीकरणाकडे कल असलेल्या आजच्या जगात इतर अनेक शास्त्राप्रमाणे शिक्षण देखील एकतर्फी एकांगी होऊ नये; तर विद्यार्थ्याची सर्वांगीण वाढ करून सन्तुलित विकास साधेल अशी शिक्षणाची मांडणी केली पाहिजे. डॉ. अँनी बेझंट ह्यांनी हाच विचार समर्पक पणे मांडतांना म्हटले आहे.

" . . . . the education of the young must be religious, mental, moral and physical. Any so called education which omits any one of these four departments of human nature is imperfect and unscientific. . . . . ".

म. गांधींनी देखील सन्तुलित व्यक्तित्वाच्या विकासासाठी *'Heart, Head and Hand* या *3H's'* च्या विकासावर भर दिला आहे. महात्माजींचे शिष्योत्तम पूज्य विनोबाजी' तर म्हणतात, "शिक्षणक्षेत्रात करता येतील तेवढ्या सर्व चुका आम्ही करून ठेवल्या आहेत.

एकही चूक आता करण्यासाठी शिल्लक राहिली नाही. आज आमच्या शिक्षण व्यवस्थेत अध्यात्माला स्थान नाही. जो भारताचा विचार, ज्याच्या आधारावर भारत उभा राहिला, मजबूत बनला, तो पायाभूत विचार आज आमच्या शिक्षणात राहिलाच नाही. हे माझे तिसरे दु:ख आहे"

गुरूवर्य टागोरांनी व्यक्तीच्या सन्तुलित विकासाचा पुरस्कार करून एकात्म जीवनाच्या दृष्टिकोनाचा *(a synthetic view of life)* अंगीकार शिक्षण पद्धतीत केला जावा असे म्हटले आहे. हे साध्य करण्यासाठी त्यांनी खालील कल्पना सुचविल्या आहेत.[९]

१. मानवाचे जे सर्वोच्य ध्येय असेल त्याच्याशी सुसंगत असाच हेतू शिक्षणाने समोर ठेवावा.

२. मानसिक आरोग्य व विकासासाठी पाठ्यपुस्तकांच्या अभ्यासाशिवाय इतरांबद्दल प्रेम व सद्भाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे !

३. सत्य सर्व श्रेष्ठ व एकच असल्याचे शिकवले पाहिजे !

आधुनिक व्यक्तितत्व भंगलेल्या आरश्यासारखे

याप्रमाणे अनेक विद्वानांनी आजच्या शिक्षणाने अपूर्ण वा असंतुलित मानव तयार होत असल्याची जी तक्रार केली आहे ती नाकारणे अवघड आहे. आज आपणास व्यक्तितत्वाची एक विशिष्ट बाजू एक विशिष्ट क्षमता वा व्यक्तितत्वाचे एक विशेष अंग शिक्षणाने परिपुष्ट होऊन सर्वत्र सत्ता गाजवतांना दिसते. सर्व संभाव्य सामर्थ्याचा संपूर्ण विकास घडवून मानवी व्यक्तितत्वाचा परिपूर्ण फुलोरा फुलविण्याचा प्रयत्नच मुळी फार क्वचित होतो; मग तो यशस्वी होण्याचा संभव तर फारच कमी. त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तितत्व खुजे खुरटलेले आढळले तर आश्चर्य नाही. एकाने याचे वर्णन करतांना म्हटले आहे.[१०]

" In the Existentialist phrase, we are all broken mirrors. We are not one but many."

व्यक्तितत्वाच्या या भंगलेल्या आरशाच्या काचा पुन्हा जोडून सन्तुलित वा संपूर्ण मानव जर घडवायचा असेल तर 'नैतिक व आध्यात्मिक,' या आजवर उपेक्षिलेल्या महत्वपूर्ण धारणा नको का विकसित करायला ?

(४) नागरिकत्वाचे गुण अंगी बाणविण्यासाठी

कर्तव्याशिवाय हक्क नाही

कुठल्याही देशात जा, तेथील नागरिकाला जेवढी हक्कांची जाणीव असते, तेवढी सामान्यत: कर्तव्याची असलेली आढळत नाही ! आणि हे मनुष्य स्वभावास अनुसरूनच आहे. प्रत्येक जण हे सोयिस्करपणे विसरत असतो की, "मला हक्क उपभोगावयाचा असेल तर ज्याप्रमाणे दुसऱ्या कुणाला तरी आपले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडावे लागते, त्याचप्रमाणे इतरांना त्यांचा हक्क अबाधितपणे उपलब्ध होण्यासाठी मला माझे कर्तव्य पार पाडले पाहिजे. माझा हक्क ते दुसऱ्या नागरिकांचे कर्तव्य तर इतरांचा हक्क ते माझे कर्तव्य!"

वेगळचा शब्दांत असे म्हणता येईल की समाजाकडून सोयी–सवलतींची अपेक्षा आपण तेव्हाच करू शकू ज्यावेळी समाजासाठी आपण काही नियम वा संयम पाळू शकू. उदा: इतरांनी आपले धन चोरू नये अशी अपेक्षा तेव्हाच करता येईल जेव्हा आपण दुसऱ्यावे धन अन्यायाने लुबाडणार नाही, एका पुरुषाने एका विवाहित स्त्रीशी असलेल्या अनैतिक संबंधाबाबत बोलतांना जणू त्याने काहीच गुन्हा केलेला नाही असा अविर्भाव आणून म्हटले, "या प्रश्नाच्या सामाजिक वा नैतिक बाजूशी मला काहीच कर्तव्य नाही; कारण ही बाब माझी पूर्णतया खाजगी स्वरूपाची आहे." ही बाब खाजगी काय म्हणून ? त्याच्या विवाहित बहिणीच्या जीवनात दुसऱ्या कुणी असेच विष कालबले तर ती त्या दोघांची खाजगी बाब म्हणून उपेक्षिता येईल काय ? द्यावे तसे घ्यावे, करावे तसे भरावे हा सामान्य नियम नागरिक जीवनाला देखील लागू आहे.

नैतिक शिक्षणाने नागरिक गुणात वृद्धी

हे नीतिनियमच नैतिक व आध्यात्मिक शिक्षणात विद्यार्थ्यांला शिकविले जातात. या शिक्षणाने विद्यार्थी शीलसंपन्न होतो व 'उत्कृष्ट चारित्र्य' हा तर आदर्श नागरिकांचा पहिला गुण आहे. तज्ञांच्या मते तर चारित्र्याचे व नागरिकत्वाचे शिक्षण एकत्र दिले जावे एवढे त्यात परस्पर साधर्म्य आहे.[१] नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे ज्या गुण-

विकासाची व सदाचरणाची अपेक्षा असते ती जरी काही प्रमाणात व्यक्तित्वाच्या विकासासाठी असली तरी त्याचा लाभ अनुषंगाने समाजालाच व्हायचा असतो. व्यक्तीचा सतत संपर्क असतो अखेर समाजाशी ! त्यामुळे या शिक्षणाने गुणवान, शीलवान बनलेली व्यक्ती उत्तम नागरिक गणली जाऊन समाजोपयोगी सिद्ध ठरते.

धर्म सिद्धांताचा व्यक्तीच्या आचरणावर कसा अनुकूल परिणाम होतो हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. नागरिक जीवनाचे जे मुख्य सूत्र वर विवेचिले आहे ते खालील सुलभ वाटणाऱ्या पण आचरण्यास अत्यंत कठीण असलेल्या एका धर्माज्ञेत कसे गोवले ते पहा.

"Do unto others as you would have them to do unto you"

हेच वचन थोडयाफार वेगळया शब्दात सुमारे १० धर्मांच्या शिकवणुकीत आले आहे [१२] नागरिक जीवनाला पोषक अशी आणखी किती तरी वचने सर्व धर्म ग्रंथात उपदेशिलेली दाखविता येतील. सर्वमान्य अशा या धर्मतत्वांचे व सदाचरणाचे प्रतिबिंब जीवनामध्ये ठसविणारे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण नागरिकत्वासाठी पोषक आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होईल काय ?

(५) सामाजिक स्वास्थ्य व सुखासाठी

व्यक्तीच्या प्रत्येक क्रियेचा समाजावर बरा वाईट परिणाम

संपूर्ण दिवसभरात व्यक्तीच्या जीवनातील क्वचितच असा क्षण असेल जेव्हा त्याचा बरा वाईट परिणाम सामाजिक स्वास्थ्य व सुखावर होत नसेल ! त्यामुळे समाज घटकाच्या जागृत अवस्थेत घडत असलेली प्रत्येक प्रक्रिया समाजदृष्टया पोषक वा घातक ठरत असते. केवळ एखाद्याची इच्छा वा लहर म्हणून बेताल वर्तनाला त्यामुळे मुभा देता येत नाही. समाज जेवढा प्रगत व सुधारलेला, तेवढया प्रमाणात व्यक्तीच्या वर्तनात अधिक शिस्त व नियमितपणा आणणे आवश्यक असते. कारण पुढारलेल्या समाजात परस्परावलंबित्व व गुंतागुंत अधिक असल्याने व्यक्तीच्या लहानश्या चुकीचे परिणाम फार व्यापक प्रमाणात झालेले दिसून येतात. उदा:- सामान्य कामगाराच्या निष्काळजीपणामुळे वीज काही तास बंद पडली तर संपूर्ण शहरातले अनेक

(४) नागरिकत्वाचे गुण अंगी बाणविण्यासाठी

कर्तव्याशिवाय हक्क नाही

कुठल्याही देशात जा, तेथील नागरिकाला जेवढी हक्कांची जाणीव असते, तेवढी सामान्यत: कर्तव्याची असलेली आढळत नाही ! आणि हे मनुष्य स्वभावास अनुसरूनच आहे. प्रत्येक जण हे सोयिस्करपणे विसरत असतो की, "मला हक्क उपभोगावयाचा असेल तर ज्याप्रमाणे दुसऱ्या कुणाला तरी आपले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडावे लागते, त्याचप्रमाणे इतरांना त्यांचा हक्क अबाधितपणे उपलब्ध होण्यासाठी मला माझे कर्तव्य पार पाडले पाहिजे. माझा हक्क ते दुसऱ्या नागरिकांचे कर्तव्य तर इतरांचा हक्क ते माझे कर्तव्य!"

वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की समाजाकडून सोयी–सवलतींची अपेक्षा आपण तेव्हाच करू शकू ज्यावेळी समाजासाठी आपण काही नियम वा संयम पाळू शकू. उदा: इतरांनी आपले धन चोरू नये अशी अपेक्षा तेव्हाच करता येईल जेव्हा आपण दुसऱ्याचे धन अन्यायाने लुबाडणार नाही, एका पुरुषाने एका विवाहित स्त्रीशी असलेल्या अनैतिक संबंधाबाबत बोलतांना जणू त्याने काहीच गुन्हा केलेला नाही असा अविर्भाव आणून म्हटले, "या प्रश्नाच्या सामाजिक वा नैतिक बाजूशी मला काहीच कर्तव्य नाही; कारण ही बाब माझी पूर्णतया खाजगी स्वरूपाची आहे." ही बाब खाजगी काय म्हणून ? त्याच्या विवाहित बहिणीच्या जीवनात दुसऱ्या कुणी असेच विष कालवले तर ती त्या दोघांची खाजगी बाब म्हणून उपेक्षिता येईल काय ? द्यावे तसे घ्यावे, करावे तसे भरावे हा सामान्य नियम नागरिक जीवनाला देखील लागू आहे.

नैतिक शिक्षणाने नागरिक गुणात वृद्धी

हे नीतिनियमच नैतिक व आध्यात्मिक शिक्षणात विद्यार्थ्याला शिकविले जातात. या शिक्षणाने विद्यार्थी शीलसंपन्न होतो व 'उत्कृष्ट चारित्र्य' हा तर आदर्श नागरिकांचा पहिला गुण आहे. तज्ञांच्या मते तर चारित्र्याचे व नागरिकत्वाचे शिक्षण एकत्र दिले जावे एवढे त्यात परस्पर साधर्म्य आहे." नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे ज्या गुण-

विकासाची व सदाचरणाची अपेक्षा असते ती जरी काही प्रमाणात व्यक्तित्वाच्या विकासासाठी असली तरी त्याचा लाभ अनुषंगाने समाजालाच व्हायचा असतो. व्यक्तीचा सतत संपर्क असतो अखेर समाजाशी ! त्यामुळे या शिक्षणाने गुणवान, शीलवान बनलेली व्यक्ती उत्तम नागरिक गणली जाऊन समाजोपयोगी सिद्ध ठरते.

धर्म सिद्धांताचा व्यक्तीच्या आचरणावर कसा अनुकूल परिणाम होतो हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. नागरिक जीवनाचे जे मुख्य सूत्र वर विवेचिले आहे ते खालील सुलभ वाटणाऱ्या पण आचरण्यास अत्यंत कठीण असलेल्या एका धर्माज्ञेत कसे गोवले ते पहा.

"Do unto others as you would have them to do unto you"

हेच वचन थोडयाफार वेगळया शब्दात सुमारे १० धर्मांच्या शिकवणुकीत आले आहे [१२] नागरिक जीवनाला पोषक अशी आणखी किती तरी वचने सर्व धर्म ग्रंथात उपदेशिलेली दाखविता येतील. सर्वमान्य अशा या धर्मतत्वांचे व सदाचरणाचे प्रतिबिंब जीवनामध्ये ठसविणारे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण नागरिकत्वासाठी पोषक आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होईल काय ?

(५) सामाजिक स्वास्थ्य व सुखासाठी

व्यक्तीच्या प्रत्येक क्रियेचा समाजावर बरा वाईट परिणाम

संपूर्ण दिवसभरात व्यक्तीच्या जीवनातील क्वचितच असा क्षण असेल जेव्हा त्याचा बरा वाईट परिणाम सामाजिक स्वास्थ्य व सुखावर होत नसेल ! त्यामुळे समाज घटकाच्या जागृत अवस्थेत घडत असलेली प्रत्येक प्रक्रिया समाजदृष्ट्या पोषक वा घातक ठरत असते. केवळ एखाद्याची इच्छा वा लहर म्हणून बेताल वर्तनाला त्यामुळे मुभा देता येत नाही. समाज जेवढा प्रगत व सुधारलेला, तेवढ्या प्रमाणात व्यक्तीच्या वर्तनात अधिक शिस्त व नियमितपणा आणणे आवश्यक असते. कारण पुढारलेल्या समाजात परस्परावलंबित्व व गुंतागुंत अधिक असल्याने व्यक्तीच्या लहानश्या चुकीचे परिणाम फार व्यापक प्रमाणात झालेले दिसून येतात. उदा:- सामान्य कामगाराच्या निष्काळजीपणामुळे वीज काही तास बंद पडली तर संपूर्ण शहरातले अनेक

व्यवहार तत्क्षणी थांबतात. चक्की बंद पडते, दवाखान्यातील शल्य चिकित्सा थांबवावी लागते, उत्पादनाच्या गिरण्या काम थांबवितात. विविध क्षेत्रांत केवढे प्रचंड नुकसान त्यामुळे समाजाला सोसावे लागते !

नीति–शिक्षणाने सामाजिक कर्तव्याची प्रखर जाणीव

तेव्हा व्यक्तीची प्रत्येक क्रिया (विशेषत: समाजाशी संबंध येणारी) विशिष्ट वेळी, विशिष्ट पद्धतीने घडेल तरच सामाजिक स्वास्थ्य व सुखाची हमी देता येईल. व्यक्तीच्या क्रिया अशा रीतीने नियंत्रित करण्यास तिला संयमाने व नियमाने जीवन जगण्याची शिस्त लावली जावयास हवी ! नैतिक व आध्यात्मिक शिक्षण जर बालपणापासून दिले गेले तर संपूर्ण समाजाला अशी शिस्त लावणे फारसे अवघड नाही. अर्थात सामाजिकदृष्टचा नैतिक व आत्मोन्नतिच्या दृष्टीने आध्यात्मिक, शिक्षण अधिक उपयुक्त ठरेल, हे उघड आहे ! अमेरिकेत नेमलेल्या समितीनेही आपले हेच मत प्रतिपादन करतांना म्हटले आहे,[१३]

" Moral values have consequences chiefly in social relationships. Spiritual values, however, take effect mainly in terms of inner emotions and sentiments."

व्यक्तीमधील नैतिक मूल्ये नीति–शिक्षणाने विकसित झाली तर समाजविषयक कर्तव्याची प्रखर जाणीव उत्पन्न होऊन सामाजिक सुख–स्वास्थ्य टिकविणे सुलभ होते. मात्र कर्तव्य पालनासाठी जीवनात संयम व नियमितता नैतिक शिक्षणाद्वारे अंगी बाणली जावयास हवी !

नीती विरहित शिक्षण समाजाला अभिशाप

परंतु दुर्दैवाने जर समाज घटकांमध्ये ही नैतिक मूल्यांची जोपासना झाली नाही तर विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे समाजाला वरदान ठरण्याऐवजी अभिशाप ठरण्याचा संभवच अधिक.[१४] प्रत्येकाने आपले कर्तव्य जाणीवेने केले तर प्रत्येकाला आपले हक्क आपोआपच प्राप्त होऊन खरे सामाजिक स्वातंत्र्याचे सुख उपभोगावयास मिळेल. पण नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अभावी केवळ हक्काचीच मागणी जर सर्व करतील तर अराजकाशिवाय दुसरे काय संभवणार !

> *" Rights without duties make anarchy ;*
> *Duties without rights make slavery ;*
> *Rights & Duties indissolubly united one to another make liberty."*

या उद्‌गारात फार मोठे सत्य सामावले आहे. अराजक माजण्याचे मुख्य कारण व्यक्ती व समाज यांच्यात परस्पर सामंजस्य नसणे. व्यक्ती केवळ समाजापासून हक्काची अपेक्षा करते. कर्तव्य कर्माची कुसुमांजलि अर्पण करण्यास मात्र तत्पर नसते. साहजिकच मूळ सामाजिक प्रवाहाशी अशा फटकून वागणाऱ्या व्यक्ती अल्पकाल सुखी असल्याचा भास होतो पण त्या क्रमशः बिआत्मनाशाकडे वाटचाल करीत असतात.

अहंमन्यतेने आत्मनाश

जन्मभर अविवाहित राहणाऱ्या व्यक्तीचे उदाहरण या संदर्भात देता येईल. असे एकाकी जीवन जगणाऱ्या व्यक्ती सामान्यतः रुळलेल्या सामाजिक जीवनापेक्षा काहीशा अहंकाराने वेगळे जीवन जगण्याच्या प्रयत्नात असतात. परंतु त्या सामान्यापेक्षा बहुधा सुखी नसतात. विवाहितापेक्षा अविवाहितांचे आत्महत्तेचे शेकडा प्रमाण सुमारे तिप्पट असते असा अनुभव आहे. इतकेच नव्हे, तर विवाहितामध्ये देखील निपुत्रिकांचे आत्महत्तेचे प्रमाण पुत्रवानांपेक्षा दुप्पट असते. स्वतः व्यतिरिक्त मन गुंतवायला इतर कोणते साधन असेल तर लगेच आत्महत्येचा संभव कमी होतो. शांततेच्या काळापेक्षा युद्धकाळांत आत्महत्या कमी होतात. कारण युद्धामुळे मातृभूमिवर आलेले संकट व्यक्तीला सामाजिक जीवन प्रवाहाशी समरस करते हे होय.[१५]

स्वयंकेन्द्रित जीवनाचे अधःपतन

तेव्हा समाजाशी असलेल्या संबंधाचे धागेदोरे तोडून टाकणे म्हणजे स्वतःचे स्वतःशी असलेले संबंध तोडण्यासारखे आहे. पूर्णपणे स्वयंकेन्द्रित जीवन जगणाऱ्या व्यक्तीचे जीवन अस्थिर, अनिश्चित व असन्तुलित झाल्यास आश्चर्य नाही. कारण असे स्वतःला स्वयंपूर्ण मानणारे अहंमन्य-जीवन निसर्गाच्या विरोधी असते. अशा व्यक्तीचा समाजाशी जो आंतरिक

संघर्ष सारखा सुरू असतो त्याचा विसर पडण्यासाठी मादक पदार्थाचे सेवन व्यक्ती करू लागते. अशा वस्तूंचे व्यसन जडले की समाजाशी त्याची असलेली फारकत व तज्जन्य संघर्ष अधिकच वाढतो. चोरी, व्यभिचार, सट्टेबाजी इ. सारख्या दुर्गुणांना तो वाढत्या प्रमाणात बळी पडत जातो. आत्मनाशाकडे त्याची वाटचाल सुरू असते.

अध:पतन थोपविण्यास नैतिक व आध्यात्मिक शिक्षण

डोळसपणे अवती-भोवती नजर टाकली तर भारतात वर वर्णिलेल्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असलेली दिसेल. मूळ सामाजिक प्रवाहाला झुगारून स्वत:चे स्वतंत्र असे जीवन जगू पहाणारे पुष्कळच आढळतील ! या भयावह परिस्थितीचे मुख्य कारण व्यक्तीला समाज-जीवनाशी समरस होण्याचे वळण देण्याचा प्रयत्न फारसा कधी होतच नाही. त्यामुळे व्यक्ती व त्याबरोबरच समाज या दोहोंचे अध:पतन होऊ लागते. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने हे खचित थांबविता येईल. समाज घटकाला 'स्व' चे समर्पण समाजात करायला शिकविता येईल. पाण्याचा थेंब व महासागर यांचे जे नाते असते, तेच व्यक्ती व समाजाचे असते, हे विद्यार्थीमनावर बिंबविता येईल. थेंब जोपर्यन्त सागराशी समरस होऊन राहील तोपर्यंत त्याचे अस्तित्व; तो सागराशी स्पर्धा करून वेगळा होण्याचा प्रयत्न करताच सुकून जाईल, नष्ट होईल, हे व्यक्तीने कदापि विसरून चालणार नाही.

डॉ. ॲनी बेझंट यांनी शिक्षण प्रक्रियेची जी दोन मुख्य तत्वे सर्वांसमोर ठेवली त्यामध्ये व्यक्तित्वाचा संन्तुलित व सर्वांगीण विकास हे जसे पहिले, तद्वतच सामाजिक सुखाचे म्हणून दुसरे तत्व नमूद केले. दुसऱ्या तत्वाचे स्पष्टीकरण त्यांनी केले ते असे,[१६] *" The Principle of Social Happiness : Education is not training of an isolated individual, but of an individual as the " embroyonic citizen ", a factor in the collective good of the Society ".*

तेव्हा सामाजिक स्वास्थ्य व सुखाच्या अभिवृद्धीसाठी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा 'अविलंब' अवलंब आपण करावयास नको काय?

(६) राजकीय निकोप स्पर्धेसाठी

अध्यात्मावर अधिष्ठीत राजकारण

अध्यात्मावर अधिष्ठीत अशा उच्च प्रतीच्या राजकारणाचा मनु एक दिवस जगात सुरू होईल व त्याची यशस्वी मूहूर्तमेढ लोकमान्य टिळकांनी भारतात सर्वप्रथम केली असे प्रतिपादन करणारा एक विचार परिप्लुत प्रबंध एका अमेरिकन विद्वानाने[१७] फिलाडेल्फिया विद्यापीठाला सादर केला होता. त्यांत अमेरिकेचा भांडवलवाद व रशियाचा साम्यवाद यांचा सुवर्णमध्य म्हणून अध्यात्मावर अधिष्ठीत अशा भारतातील धर्मराज्याची कल्पना मांडली आहे. न्या. गोखले व योगी अरविन्द यांनीही राजकारणाचे अध्यात्मिकरण करण्याची कल्पना प्रतिपादिली आहे. राजकारणातील निकोप स्पर्धेसाठी आज त्याची अत्यंत गरज आहे.

स्वार्थाधिष्ठीत राजकारणाने स्वातंत्र्यालाच धोका

राजकारण खेळतांना कोणतेही नीति-नियम पाळण्याची आवश्यकता नाही. एवढेच नव्हे तर नीतिमान राहून मुळी राजकारण करताच येत नाही, अशी भावना आज सर्वत्र पसरली आहे. त्यामुळे कुणीही उठावे व सूक्तासूक्त मार्गाचा अवलंब करून सत्ता हस्तगत करण्याचा हव्यास बाळगावा असे दृष्य आज सर्वत्र दृष्टीस पडते. सत्ता व संपत्तीच्या लोभाने व्यक्ती वाटेल ते करण्यास प्रवृत्त होतांना दिसते. परिणामतः समाज व राष्ट्राचे अतोनात नुकसान होते. अशा व्यक्तीच्या स्वार्थापायी संपूर्ण देशाचे स्वातंत्र्य गमावण्याची भीती निर्माण होते.

नैतिकता वाढविणे हाच कायम उपाय

राजकारणातील ही शोचनीय दुरवस्था बदलायची असेल तर सामान्य नागरिकांचा नैतिक दर्जा उंचावणे हा, काहीसा कठीण वाटत असला तरी, कायम स्वरूपाचा रामबाण उपाय आहे. उदा: कोणताही प्रचार न करता ऐन निवडणुकीच्या वेळी ५–१० रु. देऊन, मत विकत घेऊन, निवडून येऊ असा विश्वास धनिक पण नालायक उमेदवाराला वाटतो. याचे प्रमुख कारण सामान्य नागरिकाचे अज्ञान व खालावलेली नैतिक पातळी हेच होय. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता 'मी

लायक व निस्वार्थी देशभक्त उमेदवारालाच मत देईन, एवढा जरी निर्धार प्रत्येक मतदाराने केला तरी आजच्या राजकारणाचे चित्र बरेचसे पालटेल. मग जर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे नागरिकांचा नैतिक दर्जा व राजकारणातील इष्टानिष्टतेचा विवेक वृद्धिंगत झाला तर राजकीय निकोप स्पर्धा होण्यास त्याचे केवढे तरी सहाय्य होईल. कारण *" Fundamentally the political problem is a problem of human character."*
हे एका विद्वानाचे" मत नाकारता येईल काय ?

(७) लोकशाहीच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी

नैतिकता लोकशाहीला पोषक

यापूर्वी केलेल्या विवेचनावरून समाजजीवनाशी व्यक्तिगत जीवन समरस होण्याची लोकशाहीला आवश्यक अशी प्रक्रिया, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे कशी घडून येते, हे आपण पाहिलेच. नैतिक व आध्यात्मिक दृष्ट्या विकसित असे व्यक्तीचे जीवन हे त्या व्यक्ती-पुरते मर्यादित व खाजगी स्वरूपाचे कधीच असू शकत नाही. खाजगी नैतिकता हे शब्द परस्पर विरोधी आहेत. व्यक्तीच्या उन्नत अशा नैतिक व आध्यात्मिक जीवनाचा समाजावर एक अपरिहार्य असा परिणाम होत असतो व हा परिणाम लोकशाहीच्या संरक्षणासाठी व संवर्धना-साठी अत्यंत पोषक असतो. भारतीयांच्या रोमरोमात ही आध्यात्मिक जीवनमूल्ये भिनली असल्यामुळे अत्यंत स्फोटक व बिकट परिस्थिती असूनही भारताने साम्यवादी वा हुकूमशाही विचारसरणीचा अंगिकार केला नाही. इतर अनेक शेजारचे देश या मार्गाने गेल्याने तर भारताचे हे वैशिष्ट्य विशेषच उमटून दिसते!

लोकशाही टिकविण्याचे सामर्थ्य धर्मप्रवृतीत

परंतु आहे तशीच परिस्थिती राहिली तर फार काळ भारत लोकशाही टिकऊन ठेऊ शकेल असे वाटत नाही ! याचे एक मुख्य कारण म्हणजे लोकशाही विरोधी प्रवृतींना थोपऊ शकेल अशी जी नैतिक, आध्यात्मिक व धार्मिक भावना ती गेल्या कित्येक वर्षांच्या

उपेक्षेने अत्यंत क्षीण होऊ लागली आहे. लोकशाही प्रवृत्ती टिकऊन ठेवण्याचे सामर्थ्य धर्मप्रवृत्तीत आहे. एका विचारवंताने[१९] लिहिले आहे की, *"Democracy where most we notice other persons and spontaneously experience their weal and their woe as our own ..... (is) more akin to religion than to art."*

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने विद्यार्थ्यांमधील सात्विक गुण-संपदा वाढली तर लोकशाहीच्या विकासासाठी त्याचा अमोल असा उपयोग होऊ शकेल, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

(८) बदललेल्या परिस्थितीमुळे शिक्षण संस्थांवरील वाढती जबाबदारी पार पाडण्यासाठी

पारंपारिक संस्थांचा भार शिक्षणसंस्थांवर

विसाव्या शतकातील गतिमान अशा औद्योगिक व तांत्रिक युगांत शिक्षणाविषयीच्या आशा अपेक्षात बराच विस्तार झाला आहे. शिक्षण-संस्थांवरील जबाबदारी पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. सतत बदलणाऱ्या सांस्कृतिक व सामाजिक वातावरणाचा मानवी जीवनावर जो इष्टानिष्ट परिणाम होत असतो त्याला सुयोग्य असे वळण लाऊन विद्यार्थी घडविण्याचे अत्यंत कठिण कार्य या संस्थांना शिक्षणाद्वारे साधावयाचे आहे.

पूर्वी शिक्षणाचे परिणाम कसे सीमित असत हे व्यक्त करतांना लॉर्ड टिडमाऊथ या लेखकाने डॉ. सॅले या पात्राच्या तोंडी आपल्या कादंबरीत घातलेले वाक्य मोठे सूचक आहे. तो प्रगट चिंतन करतांना म्हणतो, *"They did not teach me at school except the difference between right and wrong. There is some difference, but I've forgotten what."* एकेकाळी शिक्षणाची असलेली ही स्थिती आज पार पालटली आहे. पूर्वी कुटुंब, मंदिरे, व कुटुंबप्राय असे ग्रामीण वातावरण यांच्या द्वारा जे शिक्षण मिळत असे त्यामुळे शिक्षणसंस्थांची विद्यार्थ्यांबाबतची पारंपारिक जबाबदारी

(Traditional responsibility of schooling) ही फार अल्प असे. समाजातील आजच्या संघर्षकाळात इतर संस्थांचे पूर्वीचे शिक्षणदृष्टया होणारे कार्य तोकडे पडू लागले आहे. सहाजिकच शिक्षण संस्थांवरील भार वाढला आहे. एकेकाळी इतर पारंपारिक संस्थाकडून (*Traditional Institutions*) होणारे कार्यसुद्धा आज शिक्षण संस्थांद्वारा व्हायला हवे आहे. जॉन डेवे[१०] याने या संदर्भात लिहितांना म्हटले आहे,

" The school in an industrial society must assume the educational responsibilities of these (traditional) institutions. "

ही जबाबदारी पार पाडण्यास अध्यात्म व नीतिशिक्षण

अशी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावयाची असेल तर कुटुंब, मंदिरे इ. विविध संस्थामधून जे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण सहजपणे मिळत असे, ते आताशिक्षण संस्थांमधून मिळण्याची सोय झाली पाहिजे. भारतातील बहुसंख्य पालकांचा जीवनसंघर्ष आज इतका तीव्र झाला आहे की, आपल्या पाल्यांची साधी आवश्यक ती विचारपूस देखील करणे मोठ्या शहरातून शक्य होइनासे झाले आहे. मग त्यांच्या नैतिक विकासाकडे लक्ष देणे दूरच ! पूर्वीच्या पिढ्यांवर कुटुंबातील वातावरणाचा प्रभाव एवढा असे की, लहानपणापासून धर्मसंस्कार होऊन विद्यार्थी सहजच नीतिमान बनत असे. त्यासाठी शिक्षणसंस्थामधून मुद्दाम वेगळ्या प्रयत्नाची गरज पडत नसे, हा मुद्दा विषद करून ३५ वर्षाचा आपला अनुभव सांगतांना एक प्राचार्य लिहितात.[११]

" Due to all this, the task of ' Shaping the moral man of tomorrow out of the groping toddlers and the erring youths of today' is an exclusive responsibliiy and a major function of schools and colleges "

राहणीमान व जीवनमान टिकविण्यासाठी

शिक्षण संस्थांवर पडलेली ही महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडण्यासाठी सार्वत्रिकपणे नैतिक व अध्यात्म शिक्षण योजना त्वरीत लागू करावयास नको काय ?

तसेच भारताचा आजवर झालेला व भविष्यात अधिक गतिशील होण्याचा संभव असलेला औद्योगिक विकास व तदनुषंगाने येणारी

आर्थिक समृद्धी यांचा स्वाभाविक परिणाम राहणीचे मान *(Standard of Living)* वाढविण्यात होईल हे निःसंशय ! पण त्यामुळे जीवनमान *(Standard of Life)* खालावणार नाही याची दक्षता घेतली जावयास हवी ! कारण अखेर जीवनमानावरच राहणीमानाची स्थिरता अवलंबून आहे. स्वामी चिन्मयानंद[२२] हा मुद्दा विषद करतांना म्हणतात,
" The material growth and prosperity raise the ' Standard of living, whereas the spiritual inner rehabitation improves the ' Standard of life ' .... The ' Standard of living is like the mast of the ship, if it is to be ligh, the keel must be made deep and wide enough to prevent toppling and this depth of the keel measures the ' Standard of life.' हे साध्य करता यावे म्हणूनच बनारस विद्यापिठाचे माजी कुलगुरू श्री. भगवती[२३] याबद्दल आग्रह धरतांना म्हणतात,
" This cannot be brought about without proper resort to the ethical and spiritual values inherent in our ancient culture and civilisation. The first and foremost thing therefore is to impart instruction in spiritual and moral values."

(९) विज्ञानाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी

विज्ञानामुळे भांबावलेली स्थिती

१८८० सालापासून विज्ञानाने एकामागोमाग लावलेल्या अनेक अद्भुत शोधामुळे, एखाद्या आदिवासी मनुष्याने प्रथमच मोठया गावी येऊन आगगाडी, सिनेमा पाहिल्यावर तो जसा भांबाऊन जातो, तशी मानवाची अवस्था झाली. विज्ञानाने उपलब्ध करून दिलेल्या विविध सुखसोईच्या जल्लोषाने खऱ्या जीवनमूल्यांचा सर्वांना विसर पडू लागला. नाविन्यांचा पूजक असलेल्या मानवाने नव्या विज्ञानदेवतेची पूजा भक्तिभावाने सुरू केली. विज्ञानाच्या अद्भुत सामर्थ्यावर तो मनापासून प्रेम करू लागला. विज्ञान म्हणजेच सर्वश्रेष्ठ व श्रेयस्कर ही भावना निर्माण झाली. परिणामतः मानवी मनावर संभ्रमाचे - संमोहाचे एक प्रकारचे पटल उत्पन्न झाले ! नको एवढा विश्वास विज्ञानावर मनुष्य ठेऊ लागला! शक्य नाही त्या अपेक्षा बाळगू लागला.

विज्ञानाला जीवनात सर्वोच्च स्थान दिल्यामुळे प्रामुख्याने खालील चार प्रकारच्या चुका वा गैरसमजूती झालेल्या दिसून येतात.

(अ) विज्ञानाच्या मर्यादांचा विसर

विज्ञानाला मर्यादा आहेत याचा सामान्य मानवाला विसर पडला. शास्त्रज्ञ ज्या तांत्रिक साधनाने एखाद्या प्रमेयाचा अभ्यास करतात त्यावेळी त्यांची जास्तीत जास्त चूक किती होऊ शकते याचा निश्चित अंदाज घ्यावाच लागतो. अशा चुकांचे प्रमाण हा शास्त्रातील महत्वाचा भाग असतो. मानवी समस्याचा विचार करण्याकरिता साधन म्हणून वापरत असलेल्या मेंदूच्या कार्य पद्धतीत तर काही चुका इतक्या भयंकर आहेत की, त्या लक्षात घेतल्या म्हणजे विज्ञानाच्या शास्त्रीय शोधाचे महत्वच नष्ट होण्याची वेळ येते.

विज्ञान संपते तिथे अध्यात्माला सुरूवात

त्याच प्रमाणे प्रयोग शाळेच्या परीक्षण नळीमध्ये *(Test tube in Laboratory)* मानवाचे मन, बुद्धी, भावना या सारख्या कित्येक अमूर्त गोष्टींचे निरीक्षण करता येत नाही. त्यामुळे विज्ञान अशा अनेक ठिकाणी निरुपयोगी ठरते. लंगडे पडते ! अध्यात्मासारख्या सूक्ष्म शास्त्रात तर विज्ञान प्रवेशही करू शकत नाही. किंबहुना विज्ञान जिथे संपते तिथेच अध्यात्माला सुरूवात होते. विज्ञानाच्या या मर्यादांचा माणसाला विसर पडला. अध्यात्मज्ञानाने विज्ञानाच्या या मर्यादांची समाजाला जाणीव करून देणे आवश्यक आहे.

(ब) विज्ञान व धर्म परस्पर विरोधी ?

विज्ञान व धर्म परस्पर विरोधी आहेत ही अशीच एक आणखी गैरसमजूत ! जगाचे कोडे उलगडण्याचे सामर्थ्य केवळ विज्ञानात आहे अशी धारणा होताच, धर्माचे स्थान विज्ञानाने घेतले ! विज्ञान हाच ज्यांना 'धर्म' वाटू लागला अशांना धर्म हे एक थोतांड वाटू लागल्यास आश्चर्य नाही ! धर्माला 'अफूची गोळी' म्हणून संबोधताच माणूस हा इतर प्राण्याप्रमाणेच गतिमान अशा जड तत्वांचा केवळ समुच्चय आहे ; व्यक्ती ही एक पदार्थ-रासायनिक वस्तू आहे ; त्याला इच्छा शक्तीचे कसलेच स्वातंत्र्य नाही, व त्यामुळे नैतिक जबाबदारीही नाही

ही विज्ञानवादी विचारसरणी पुढे येते. मानवी आयुष्याला काही अर्थच उरत नाही ! जीवनाला आलेल्या या निरर्थंकतेमुळेच सर्वत्र अस्वस्थता, वैफल्य व भकासपणा उत्पन्न झालेला आढळतो !

जगच्चालकाला विज्ञानाची मान्यता

शास्त्रज्ञांना आपल्या विचारातील 'चूक' आता कळली आहे. भौतिक–जड–विनाशी जगताच्या पलीकडे विज्ञानाच्या कक्षेत न येणारे विश्व आहे, ह्याची जाणीव त्यांना झाली आहे. जीवसृष्टी कशी निर्माण झाली ? याचे कोणतेही शास्त्रीय कारण देता येत नसल्याने, जगाची 'उत्पत्ती कुणीतरी महान अदृश्य शक्तीने' केलेली आहे हे विज्ञानाला मान्य करावे लागत आहे ! मग त्याला धार्मिकांनी 'ईश्वर' संबोधले असो वा विज्ञानवाद्यांनी असंभाव्य घटना *(Antichance)* असे म्हटलेले असो ! अर्थात हा आता श्रद्धेचा प्रश्न नमून वादातीत असे शास्त्रीय सिद्धांतावर आधारलेले एक 'सत्य' आहे.[२४] त्यामुळे अध्यात्म व आधुनिकता यामध्ये संघर्ष असण्याचे कारण नाही. आधुनिक असूनही व्यक्ती अध्यात्मप्रवण असू शकते. भगवान रमण महर्षींचे एक पाश्चात्य विद्वान शिष्य श्री. आसबोर्न[२५] एका ठिकाणी म्हणतात,

" There need be no conflict between tradition and modernity. It is possible to adhere to traditional, spiritual and ethical values while living in a modern way. Many people do. For many, however, the whole attraction of modernism is that it gives them an excuse for discarding spiritual and ethical values."

तेव्हा एका अर्थाने ईश्वराच्या अस्तित्वाला आता विज्ञानाची पुष्टी आहे आणि जग निर्माण करणाऱ्या जगच्चालकाला–सर्वशक्तिमंताला एकदा मान्यता दिली म्हणजे जीवनात असलेले 'धर्म अधिष्ठान' मान्य केल्यासारखे होते ! विज्ञान व धर्म परस्पर विरोधी नसून 'परस्पर पूरक' आहेत[२६] ही यथार्थ भावना समाजात बळावणे आवश्यक झाले आहे. हे कार्य नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाशिवाय कशाने होऊ शकेल?

(क) मानव प्रधान, विज्ञान गौण

अनेक जण असा युक्तिवाद करतात की, भारताला आज वैज्ञानिक व तांत्रिक विकासाची *(Scientific and Technological development)* खरी गरज आहे. नीती व अध्यात्माचे अवडंबर आता कमी केले पाहिजे. आत्मज्ञानाचे स्तोम अधिक माजविल्याने भारत यांत्रिक व औद्योगिक प्रगतीत *(Mechanical and Industrial progress)* जगाच्या मागे पडला आहे !

ही विधाने करतांना विज्ञान व अध्यात्म हे एकाच मापाने मोज-ण्याची मोठी चूक आपण करीत असतो. विज्ञान हे मानवाच्या भौतिक हितासाठी आहे! विज्ञानाच्या प्रयोगासाठी मानवाचा जन्म नाही हे दृष्टीआड होता कामा नये ! विज्ञानाच्या प्रगतीमुळे मनुष्याचा दु:खभार हलका होत नसेल वा सुखानुभव वाढत नसेल तर त्याचा काय उपयोग ? आत्मोन्नती ऐवजी आत्मिक अधोगती होत असेल तर त्या विज्ञानापासून कोणता लाभ ? विज्ञानाची या बाबतीतील निरर्थकता व्यक्त करतांना एकाने[२७] म्हटले आहे,

" Some people frankly embrace the slavery and think that we shall be cured by more science. . . . . The advance of these studies, valuable in itself, has left us morally almost where we were before it began: men are not less greedy, less cruel, less false than they were hundreds of years ago."

विज्ञानाने पूर्वी मनुष्य अधिक चांगला होण्याऐवजी तो जर बिघडत चालला असेल तर ? तर त्यांचे अध:पतन टाळण्यासाठी अध्यात्म शिक्षणाचे सहाय्य घेतले पाहिजे.

(ड) आधुनिक विज्ञानामुळे स्वत:चा विसर

आज शास्त्रज्ञांना चिंता पडली आहे ती वेगळीच! विज्ञानामुळे सुखोपभोगाच्या साधनात जसजशी वाढ होत आहे तसतसा विज्ञानाचा उपयोग करण्याचे शहाणपण कमी होत चालल्याचे अनुभवास येत आहे. विज्ञान झेप घेत आहे आकाशाकडे तर मनुष्याची 'मानव' म्हणून धाव

आहे पाताळाकडे ! विज्ञान विश्वाला गवसणी घालू पहात आहे, तर मनुष्याला आपल्या कुटुंबापलिकडे कुणाचाही विचार करायला फुरसत नाही. विज्ञानामुळे सर्व जग जवळ येऊन 'जागतिक बंधुभाव' उत्पन्न होण्याची वस्तुत: अपेक्षा करायची पण मनुष्याला लागली आहे आपला शत्रु क्षणात नष्ट करण्याची आसुरी उत्कंठा ! त्यामुळे बाह्य जगातील संशोधनापेक्षा 'स्व' चा शोध विज्ञानाने प्रथम घेण्याची गरज आता उत्पन्न झाली आहे. पॉल ब्रन्टन[२८] सारख्या शास्त्रज्ञाने चिंताग्रस्त होऊन हाच विचार मांडतांना लिहले आहे की,

" Science has gone out and investigated the Universe in every direction except one– The scientist himself. Such is the pressure and tension of our so called civilized life that it is less and less possible for man to find time to look their ownselves. "

आजच्या तथाकथित सुधारलेल्या प्रगतीशील जीवनात मनुष्य स्वत:ला इतका हरऊन बसला आहे की 'स्व' ची खरी ओळख करून घेण्यासाठी त्याला फुरसतच मिळेनाशी झाली आहे ! विज्ञानाची हीच खरी शोकांतिका ! त्यामुळे आजवर कधी नव्हती एवढी गरज नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची आज सर्वत्र भासू लागली आहे ! कारण आजवर उद्भवली नव्हती अशी परिस्थिती विज्ञानाने आज निर्माण केली आहे ! सुप्रसिद्ध नोबेल पारितोषक विजेते डॉ. करेल[२९] यानी हे संकट विषद करतांना म्हटले आहे की,

" Man should be the measure of all. On the contrary he is ' stranger ' in the world that he has created ..... Thus the normous advance gained by sciences of inanimate matter over those of living things in one of the greatest catestrophes ever suffered by humanity ! "

(१०) शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी

अनारोग्याचे कारण अनैतिक वर्तन

शरीराचे आरोग्य हे बव्हंशी मन:स्वास्थ्यावर अवलंबून आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. मन जेवढे आनंदी व प्रसन्न असेल तेवढे

शरीर प्रफुल्लित व कार्यक्षम राहील आणि मन नित्य आनंदी व सुखी ठेवायचे असेल तर पहिली प्रमुख आवश्यक अट आहे, मन शांत व सन्तुलित असणे. वाचकांना आश्चर्य वाटेल, पण मनाची शांतता व स्वस्थता बिघडते ती प्रामुख्याने व्यक्तीच्या अनैतिक वर्तनाने ! केवळ अनैतिक क्रिया करण्याचा विचार मनात येताच छाती धडधडू लागते, श्वासोश्वास जलद होऊ लागतात, नाडीच्या ठोक्यांची गती वाढते हा तर सामान्य अनुभव आहे. भीती, क्रोध, चिंता, यांचे प्रमाण वाढताच, माणूस मानसिक स्वास्थ्य गमावतो; त्याची मानसिक शांतता ढळते; मनाचे सन्तुलन नाहीसे होते. निदान ५० टक्के शारीरिक रोगाचे मूळ कारण अनैतिक वर्तनाने निर्माण झालेले मानसिक अस्वास्थ्यच आहे.

धर्मश्रद्धेने रोगनिवारण

समाजात धर्माधिष्ठित अशा नैतिकतेचे पालन प्रत्येक व्यक्तीकडून होऊ लागले तर तिच्या मनाचे व अनुषंगाने शरीराचे स्वास्थ्य सुदृढ रहाण्यास खचित सहाय्य होईल. आपल्या मध्यमवर्गीय रोग्यांविषयी लिहितांना डॉ. सी. जी. जंग[२०] यांनी असे नमूद केले आहे की,

" Everyone of them fell ill because he had lost that which the living religion of every age has given their followers, and none of them has been really healed who did not regain his religious outlook "

धर्मश्रद्धेमुळे नैतिकतेचे जे सहज पालन व्यक्तीकडून होते त्यामुळे मनाची व शरीराची निकोप वाढ होणे सुलभ होते. सुश्रुताने[२१] स्वास्थ्याची व्याख्या करतानांच मुळी इंन्द्रियासोबत आत्मा व मन यांची प्रसन्नता अभिप्रेत धरली आहे.

समदोषः समाग्निश्च समधातु मलक्रियः ।
प्रसन्नत्मेन्द्रियमनः स्वस्थइत्यभिधीयते ॥

आज समाजात कितीतरी प्रकारच्या मानसिक विकृती असलेली माणसे आपण सर्वत्र पहातो. मनाच्या विभिन्न विकृतीमुळे निरनिराळ्या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे अनुभवास येत आहे. समाज-शास्त्रज्ञ त्यामुळे फार चिंताक्रांत झाल्यास आश्चर्य नाही.

परंतु आश्चर्य असे की या सर्व प्रश्नाच्या मुळाला हात घालण्याचे सहसा कुणी मनात आणीत नाही. नैतिकतेचा अभाव हे या मानसिक विकृतीचे मूलभूत कारण हे लक्षात घेत नाही. मानसिक बिघाड दूर

करण्यासाठी लक्षावधी रुपये खर्चून अनेक उपाययोजना आखल्या जातात पण अशी विकृती उत्पन्नच होऊ नये म्हणून अध्यात्माधिष्टित नीतिमत्ता निर्माण होईल असा प्रयत्न फारसा कुणी करतांना दिसत नाही. आज अशा प्रयत्नांची अत्यंत गरज आहे.

(11) जागतिक शांततेसाठी

बाह्य शांततेसाठी आंतरिक शांततेची गरज

जगातील सर्व राष्ट्रात शांतता कशी नांदू शकेल ? याचा उहापोह आज सर्व पुढारी करतांना दिसतात ! जागतिक शांतता कशी प्रस्थापित करता येईल ? हा प्रश्न अणुयुगात आज अधिकच भीषण स्वरूपात सर्वांच्यापुढे उभा ठाकला आहे ! विविध उपाय या समस्येवर सुचविले जात आहेत.

परंतु भारतीय तत्वज्ञानात अनुस्यूत असलेला एक मूलभूत विचार सर्वांच्या दृष्टिआड होत आहे. राष्ट्रात किंवा जगात शांती निर्माण होण्यास प्रथम तिची अभिव्यक्ती व्यक्तीत होणे आवश्यक आहे. मानवाच्या मनात शांतीचा झरा उत्पन्न झाल्याशिवाय तो बाहेर कोठून येणार ? मनुष्याच्या चित्ताला शांती प्राप्त होण्यासाठी कोणत्याही बाह्य साधनांची आवश्यकता नाही.

शांततेची गीतोक्त मीमांसा

मानवी हृदयात शांतीचा अविष्कार होण्यासाठी इतर अनेक भारतीय ग्रंथात विस्ताराने मांडलेला हा विषय श्रीभगवंतानी थोडक्यात फार सुन्दर रीत्या विवेचिला आहे. गीतेत शांतीपर्यंत पोचावयाच्या पायऱ्यांची एक तर्कशुद्ध शृंखलाच सादर केली आहे.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥६४॥
प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥६५॥
नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशान्तस्यकुतःसुखम् १ ॥६६॥

अध्यांय १

अर्थ :– स्वाधीन अंत:करणाचा पुरुष, राग-द्वेष-रहित होत्साता इंद्रियांनी विषयात वावरूनही (विषयाचे भोग भोगूनही) चित्ताची प्रसन्नता प्राप्त करून घेतो.

त्या प्रसन्नतेच्या योगाने त्याच्या सर्व दु:खाचा नाश होतो व तशा प्रसन्नचित्त पुरुषाची बुद्धी परमात्म्यात लवकरच स्थिर होते.

जो पुरुष युक्त झाला नाही म्हणजे ज्याची इंद्रिये व मन स्वाधीन नाहीत. त्यांच्यात निश्चयात्मिका बुद्धी नसते. तसेच भावना म्हणजे आस्तिक भावही नसतो. ज्याला भावना नाही आणि ज्याला शांती नाही त्याला सुख कोठून ?

शांततेला आत्मौपम्य बुद्धीची गरज

अशा रीतीने शांती व तज्जन्य सुख समाजात उत्पन्न होण्यासाठी व्यक्ती सर्वप्रथम 'आत्मवश' व्हावयास हवी. विश्वबंधुत्व, विश्वप्रेम,समता, शांती या सर्व शद्वाचे खरे अर्थ आत्मरूप धर्माचा उदय होऊन, आत्मकेंद्रित असे जीवन व्यतीत करणाऱ्या पुरुषासच कळू शकतात. " शेजाऱ्यावर आपल्यासारखेच प्रेम करा " ही येशू ख्रिस्ताची शिकवण 'सर्वांचा आत्मा एकच आहे' अशी प्रचीती येईल तेव्हाच उमजू शकेल ! सर्वात्मभावातून उत्पन्न होणारे विश्वबंधुत्व टिकाऊ ठरेल. श्री ज्ञानदेवांनी वर्णिलेली

" हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर
किंबहुना चराचर । आपणचि जाहला ।। "

ही अवस्था गाठण्यासाठी आत्मौपम्य बुध्दिशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही. अशा बुध्दीची प्राथमिक ओळख अनुभवाने नव्हे तर केवळ माहिती म्हणूनही आज नव्या पिढीला नाही !

केवळ आर्थिक सुबत्तेने शांती अशक्य

अनेकांना असे वाटते की, आर्थिक सुबत्ता उत्पन्न झाली म्हणजे जागतिक शांती आपोआप प्रस्थापित होईल. सर्वांच्या अन्न-वस्त्र-निवारा इ. गरजा भागणे आवश्यक आहे हे तर खरेच; पण या गरजा भागल्या म्हणजे शांती प्राप्त होईलच अशी शाश्वती देता येत नाही. ज्या व्यक्ती वा जी राष्ट्रे श्रीमंत आहेत ती सर्व सुखी आहेत का ? असा प्रश्न केल्यास उत्तर नकारात्मकच येते.

जोपर्यन्त समाजातील घटकात अतिरिक्त अभिलाषा आहे तोपर्यन्त समाजात अशांतता राहणारच ! स्वत: च्या मालकीची चार घरे असूनही परक्याचे पांचवे घर घश्यात घालण्याची धडपड असेल तर त्या गावात शांती कशी नांदेल ? जी गोष्ट घराच्या बाबतीत तीच परधन व पर-स्त्रीच्या बाबतीत ! त्यांच्या प्राप्तीसाठी कोणतेही घोर कृत्य करायला तो मागेपुढे पहाणार नाही ! आधुनिक विज्ञानाने उपलब्ध झालेल्या नव्या साधनाने आपल्या अभिलाषेसाठी अनन्वित असे अत्याचार करण्याचे त्याचे सामर्थ्य कल्पनेबाहेर वाढले आहे ! आज सर्वत्र सत्तेचा अभिलाष, धन लोभ, सुखोपभोगाकडे धाव व हिंसा या सर्वांना उत आला आहे तो यामुळेच[१२] या सर्व अनिष्ट गोष्टीपासून सुटका करून शांती हवी असेल तर गीतेत भगवान श्रीकृष्णानी खालील श्लोकात सांगितलेला मार्गच चोखाळायला हवा !

विहाय कामान् यः सर्वान् पुमाश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ।। ७१ ।।

(अध्याय २ रा)

अर्थ :– सर्व कामना सोडून तो मनुष्य स्पृहारहीत होऊन वागतो, ज्याला ममत्व व अहंकार नाही त्यालाच शांती मिळत असते !

जागतिक शांतिप्रिय व्यक्तींची निर्मिती नीतिशिक्षणाने

अर्थात कामना विरहित शांत व्यक्ती म्हणजे काही स्वाद रंग वास विरहित (*Tasteless, colourless, odourless*) वायू नव्हे किंवा सर्व वासनांचा बाह्यत: त्याग करून इंद्रियांची मोडतोड करणेही नव्हे. शांत सुखी मनुष्य आपल्या वासना-विकारांचा 'मालक' असतो तर अशांत व्यक्ती त्यांच्या गुलाम असतात एवढाच फरक. न्यायाधीश व चोर या दोघांच्याही बाजूने कोर्टात प्रवेश करतांना पोलीस असतात. परंतु बाह्यत: सारख्या वाटणाऱ्या या दृश्यांत केवढी आंतरिक भिन्नता असते? न्यायाधीशाच्या ताब्यात पोलीस असतात, याउलट पोलिसांच्या ताब्यात चोर असतो. संत व सामान्य या दोहोतही असाच मूलभूत फरक असतो बाह्यत: उभयता समान दिसत असले तरीही!

ह्या प्रकारची शांती व सुखदायक अशी शुद्ध विचाराची बैठक आजच्या शिक्षणाने प्राप्त होईल असे वाटत नाही. कारण असा 'जीवन विषयक दृष्टिकोन देण्याचा प्रश्न आजच्या शिक्षणात कोणत्याही स्तरावर मुळीच स्पर्शिला जात नाही. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण ही उणीव भरून काढू शकेल ●

संदर्भ टीपा

१. कठोपनिषद, अध्याय २ रा; वल्ली १ ली; श्लोक १०–११.

२. *Theodore M. Green : Religion and the Philosophies of Education; Article in, 'Religious Education;' March–April 1954, p. 82 ff.*

३. डॉ. के. मा. मुनशी : " राष्ट्राची संजीवनी ", या लेखाचा आधार घेतला आहे. पहा 'नवनीत' मासीक; डिसें. १९६९.

४. *S. S. Dixit : Nationalism and Indian Education; p. 9 and 10.*

५. *M. L. Jacks : Total Education; p. 95.*

६. *Merriman Cuninggim: The College seeks religion; p.38.*

७. *The Besant Spirit, Vol. II, p 107.*

८. पू. विनोबा भावे : आचार्य कुल; पृ. ३९.

९. *The Visva-Bharati Quarterly : Education Number; Vol. XIII, Part I & II; May–Oct. 1947; p. 17–18.*

१०. *Dr. Sisir Kumar Ghosh : Total Education; From 'Mother India', Special issue ' The Integral culture of Man'; 5th Aug; 1966.*

११. *" . . . . . in actual functioning programmes in schools and elsewhere, character education and education for citizenship may well blend in to a comprehensive programme of character and citizenship education."*
Encyclopedia of Educational Research, Edited by Chester W Harris. p. 184 - 185.

१२. *Quoted in the Journal ' Religious ', April 1944. They include Buddhism, Christianity, Confucianism, Hebraism, Hinduism, Islam, Jain, Sikhism, Taoism, Zoroastrianism. Taken from, " The Eleven Religious & their proverbial Lore, " S. G. Champion, M. D.*

१३. *Moral and Spiritual values in the Public Schools Chap. I, p. 129.*

१४. *" .....you may be educating a menace to society rather than on ally".*
Hamitton Hold: Creative Education; Chap. XV in (P. A. Schilpp, ed.) " Higher Education Faces the Future " pp. 313–314.

१५. *Emile Durkheim : Moral Education; p. 68-69.*

१६. *The Besant Spirit, Vol. 2; p. 89.*

१७. *Theodor Shey : Legacy of Lokmanya.*

१८. *Sir Richard Livingstone : Some Tasks for Education; p. 26.*

१९. *George A. Coe : Educating for Citizenship; p. 171.*

२०. *John Dewey : Democracy and Education; p. 4-9.*
आणखी पहा :
Lawrence Cremin : The Geneius of American Education; p. 8–11.

२१. *D. J. Limaye :The Dynamics of Education; p. 115.*

२२. *Swami Chinmayananda: The Art of Living; p.19-20.*

२३. *N. H. Bhagawati : Record of Proceedings of All India Colloqnium on Ethical & Spiritual Values,p.117.*

२४. *Lecomle du Nouy; Human Destiny.*
अनुवादक डॉ. चि. श्री. कवें : ' मानवाचे भवितव्य ', पृ. ९७.
२५. *Sir Arthur Osporne : Record of Proceedings of All India Colloqnium on Ethical & Spiritual Values; p.86.*
२६. *Shri Shankaracharya of Kanchi : Prabuddha Bharat; Vol. LXIX No. 8; p. 339.*
२७. *Sir Richard Livingstone: Some Tasks for Education; p. 29.*
२८. *Paul Brunton : The Spiritual Crisis of Man; p 334.*
२९. *Dr. Alexis Carrel : Man the Unknown; p. 32.*
३०. *Dr. C. G. Jung : Quoted in Record of proceedings of All India Colloqnium on Ethical & Spiritual Values; p. 140.*
३१. सुश्रुत संहिता; अध्याय ६४; १.
३२. स. के. नेऊरगांवकर : ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांचे चरित्र; पृ. २९१.

पाच

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेतील प्रमुख अडचणी व उपाय (पूर्वार्ध)

A teacher affects eternity, he can never tell where his influence stops.

Adams[१]

Education is no exotic in India. There has been no country where the love of learning had seen such an early origin or has exercised so lasting and powerful influence. From the simple poets of the Vedic age to the Bengali philosophers of the present day, there has been an uninterrupted succession of teachers and scholars.

F. W. Thomas[२]

योजनेचा आधार–अध्यापक

आध्यात्मिक व नैतिक शिक्षणाद्वारा संस्कार दानाचे मुख्य कार्य करावे लागणार आहे अखेर प्रामुख्याने अध्यापकांनाच ! कारण विद्यार्थ्यांच्या वैचारिक भूमिकेत इष्ट तो बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य असलेले एकमेव साधन आहे. विद्यार्थ्यांशी सर्वात निकट संपर्क येणारे शिक्षक. एकाने[1] तर नैतिक शिक्षण योजनेतील शिक्षकाचे महत्वाचे स्थान विशद करतांना म्हटले आहे,

" Everything depends upon the teacher, and if he is what he ought to be, the matter may be safely entrusted to him, while if he is not, no amount of moral text books or moral lessons will do the slightest good."

तेव्हा शिक्षकाचे या योजनेतील स्थान अनन्यसाधारण आहे हे कुणालाही पटण्यासारखे आहे.

आचार प्रधान शिक्षण

या योजनेबाबत आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आध्यात्मिक शिक्षण म्हणजे काही गणित, अर्थशास्त्र किंवा भूगोल नव्हे, की ज्याचे सिद्धांत क्रमिक पुस्तकातून एकदा विद्यार्थ्यांना समजावून दिले

की पुढे त्याचा आचरणाशी काहीच संबंध नाही ! नैतिक शिक्षण हे काही केवळ चार भितीच्या आत वर्गामध्ये बसवून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे शास्त्र नाही. वर्गात मांडली जाईल ती केवळ या विषयाची तात्विक बाजूच ! नैतिक तत्वांचे प्रात्यक्षिक खरे म्हणजे चार भितींच्या बाहेर विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाच्या आचारात पहावयास मिळावे ! वर्गात बिंबविल्या गेलेल्या आध्यात्मिक मूल्यांची उपासना विद्यार्थ्याने आयुष्यभर करावी ! तो त्याचा स्थायीभाव व्हावा हा तर या शिक्षणाचा मुख्य हेतू.

वैचारिक भव्यता आचरणाच्या उंचीवर

एवढे उदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून आखले गेलेले नैतिक शिक्षण ज्या शिक्षकांच्या माध्यामातून द्यायचे, त्या शिक्षकांची आचार विचाराची तयारी केवढी भक्कम असावयास हवी ! केवळ विचाराची विशालता काही ठिकाणी आढळेलही, नाही असे नाही. पण अखेर विचाराची भव्यता आचरणाच्या उंचीवरच अवलंबून असते. *"Example is better than precept"* म्हणतात ते काही खोटे नाही. आचरणाचा आधार नसलेली वैचारिक उंची लवकरच खुजी वाटू लागते. दांभिकता, बोलघेवेडेपणा म्हणून तिच्यावर शिक्का बसतो नि शिक्षकांच्या अशा केवळ ओठातून निघालेल्या उच्च तत्वांचे अंत:करणावर काहीच संस्कार उमटत नाहीत. विद्यार्थ्यांचे कोणतेच हित ते करू शकत नाहीत. महात्मा गांधी आपले या विषयीचे मत नमूद करतांना नि:संदिग्धपणे म्हणतात, *"I know that some of the teachers too do not lead pure and clean lives. To them I say that, even if they impart all the knowledge in the world but inculcate truth and purity anong them, they will have betrayed not them and instead of raising them set them on the downward road to perdition"*

असा आचार आणि विचार यांचा सुरेख समन्वय जीवनात साधलेली किती शिक्षकमंडळी आपल्याला सापडतील ? आपण सूक्ष्म नज़रेने आपल्या शाळा कॉलेजांतून असे अध्यापक शोधू लागलो तर ही संख्या फारच थोडी असल्याचे आपल्या लक्षात येईल ! एवढचा

थोडचा शिक्षकांच्या सहाय्याने आपण कार्य करू शकू का? तेव्हा या योजनेतील मोठी अडचण पुरेशा संख्येत लायक अशा शिक्षकांचा अभाव हीच होय!

प्रत्येक संस्थेचा स्वतंत्र प्रयोग अव्यवहार्य

काहीजण असा युक्तिवाद करतांना आढळतात की, प्रत्येक शाळेने अगर महाविद्यालयाने अशा शिक्षणाचा वेगवेगळा स्वतंत्रपणे विचार करावा ! सामूहिक उपक्रमाची वा प्रयत्नांची त्यासाठी गरज नाही!

चालू शिक्षणाच्या चाकोरीतच तयार झालेला सध्याचा शिक्षकवर्ग स्वयंप्रेरणेने हे शिक्षण विद्यार्थ्यांना देऊ शकेल ही अपेक्षा करणे व्यर्थ ठरेल. शिवाय त्या शिक्षणात समानता राहणार नाही. पूर्णपणे साचेबंद असा अभ्यासक्रम नको हे मान्य करून देखील काही किमान गोष्टी तरी सर्वत्रच सारख्या ठेवाव्या लागतील.

असे एकाकी प्रयत्न काही तळमळीच्या चिवट शिक्षकांनी महाराष्ट्रात विभिन्न ठिकाणी अनेकावर केले. नाही असे नाही. परंतु एखाद्या पणतीतील ज्योत जोवर त्यात तेल आहे तोवर जळत राहते नि अल्प-काळात ती विझून जाते, तसेच काहीसे या व्यक्तिगत प्रयत्नांचे होते ! कारण असे जागोजाग झालेले लहान मोठे प्रयोग तिथल्या स्थानिक चारदोन शिक्षकांच्या बाबतीत एखादी खाजगी घरगुती अडचण, स्वत:ची परीक्षा व अभ्यास, अन्यत्र बदली, चालकांचा रोष, संस्थेतून हकालपट्टी, असे काही व्हावयाचा अवकाश, की झालेच समजावे हे बंद ! शाळा किंवा महाविद्यालयात दरवर्षी स्थापन होणारे शारदा मंडळ, स्नेहसंमेलन मंडळ किंवा क्रीडा मंडळ याप्रमाणेच कांही शिक्षकांनी स्वत:चा एक छंद म्हणून नैतिक शिक्षण देणे सुरू केले आहे अशीच समजूत सामान्यत: आढळते ! कित्येक ठिकाणी तर त्याला तेवढेही स्थान असत नाही. काही-वेळा हेटाळणीच्या दृष्टीनेच त्याकडे बघितले जाते. त्यांच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या संमिश्र निधीतून *(Amalgamated Fund)* कोणतीही रक्कम दिली जात नाही. मग अन्य प्रकारची मदत दूरच !

की पुढे त्याचा आचरणाशी काहीच संबंध नाही ! नैतिक शिक्षण हे काही केवळ चार भितीच्या आत वर्गामध्ये बसवून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे शास्त्र नाही. वर्गात मांडली जाईल ती केवळ या विषयाची तात्विक बाजूच ! नैतिक तत्वांचे प्रात्यक्षिक खरे म्हणजे चार भितींच्या बाहेर विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाच्या आचारात पहावयास मिळावे ! वर्गात बिंबविल्या गेलेल्या आध्यात्मिक मूल्यांची उपासना विद्यार्थ्याने आयुष्यभर करावी ! तो त्याचा स्थायीभाव व्हावा हा तर या शिक्षणाचा मुख्य हेतू.

वैचारिक भव्यता आचरणाच्या उंचीवर

एवढे उदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून आखले गेलेले नैतिक शिक्षण ज्या शिक्षकांच्या माध्यामातून द्यायचे, त्या शिक्षकांची आचार विचाराची तयारी केवढी भक्कम असावयास हवी ! केवळ विचाराची विशालता काही ठिकाणी आढळेलही, नाही असे नाही. पण अखेर विचाराची भव्यता आचरणाच्या उंचीवरच अवलंबून असते. *"Example is better than precept"* म्हणतात ते काही खोटे नाही. आचरणाचा आधार नसलेली वैचारिक उंची लवकरच खुजी वाटू लागते. दांभिकता, बोलघेवेडेपणा म्हणून तिच्यावर शिक्का बसतो नि शिक्षकांच्या अशा केवळ ओठातून निघालेल्या उच्च तत्वांचे अंत:करणावर काहीच संस्कार उमटत नाहीत. विद्यार्थ्यांचे कोणतेच हित ते करू शकत नाहीत. महात्मा गांधी आपले या विषयीचे मत नमूद करतांना नि:संदिग्धपणे म्हणतात, *"I know that some of the teachers too do not lead pure and clean lives. To them I say that, even if they impart all the knowledge in the world but inculcate truth and purity anong them, they will have betrayed not them and instead of raising them set them on the downward road to perdition"*

असा आचार आणि विचार यांचा सुरेख समन्वय जीवनात साधलेली किती शिक्षकमंडळी आपल्याला सापडतील ? आपण सूक्ष्म नज़रेने आपल्या शाळा कॉलेजांतून असे अध्यापक शोधू लागलो तर ही संख्या फारच थोडी असल्याचे आपल्या लक्षात येईल ! एवढ्या

थोडचा शिक्षकांच्या सहाय्याने आपण कार्य करू शकू का? तेव्हा या योजनेतील मोठी अडचण पुरेशा संख्येत लायक अशा शिक्षकांचा अभाव हीच होय!

प्रत्येक संस्थेचा स्वतंत्र प्रयोग अव्यवहार्य

काहीजण असा युक्तिवाद करतांना आढळतात की, प्रत्येक शाळेने अगर महाविद्यालयाने अशा शिक्षणाचा वेगवेगळा स्वतंत्रपणे विचार करावा ! सामूहिक उपक्रमाची वा प्रयत्नांची त्यासाठी गरज नाही!

चालू शिक्षणाच्या चाकोरीतच तयार झालेला सध्याचा शिक्षकवर्ग स्वयंप्रेरणेने हे शिक्षण विद्यार्थ्यांना देऊ शकेल ही अपेक्षा करणे व्यर्थ ठरेल. शिवाय त्या शिक्षणात समानता राहणार नाही. पूर्णपणे साचेबंद असा अभ्यासक्रम नको हे मान्य करून देखील काही किमान गोष्टी तरी सर्वत्रच सारख्या ठेवाव्या लागतील.

असे एकाकी प्रयत्न काही तळमळीच्या चिवट शिक्षकांनी महाराष्ट्रात विभिन्न ठिकाणी अनेकावर केले. नाही असे नाही. परंतु एखाद्या पणतीतील ज्योत जोवर त्यात तेल आहे तोवर जळत राहते नि अल्प-काळात ती विझून जाते, तसेच काहीसे या व्यक्तिगत प्रयत्नांचे होते ! कारण असे जागोजाग झालेले लहान मोठे प्रयोग तिथल्या स्थानिक चारदोन शिक्षकांच्या बाबतीत एखादी खाजगी घरगुती अडचण, स्वत:ची परीक्षा व अभ्यास, अन्यत्र बदली, चालकांचा रोष, संस्थेतून हकालपट्टी, असे काही व्हावयाचा अवकाश, की झालेच समजावे हे बंद ! शाळा किंवा महाविद्यालयात दरवर्षी स्थापन होणारे शारदा मंडळ, स्नेहसंमेलन मंडळ किंवा क्रीडा मंडळ याप्रमाणेच कांही शिक्षकांनी स्वत:चा एक छंद म्हणून नैतिक शिक्षण देणे सुरू केले आहे अशीच समजूत सामान्यत: आढळते ! कित्येक ठिकाणी तर त्याला तेवढेही स्थान असत नाही. काही-वेळा हेटाळणीच्या दृष्टीनेच त्याकडे बघितले जाते. त्यांच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या संमिश्र निधीतून *(Amalgamated Fund)* कोणतीही रक्कम दिली जात नाही. मग अन्य प्रकारची मदत दूरच !

केवळ शिक्षकांचे एकाकी प्रयत्न अयशस्वी

या सर्व संकटांना तोंड देवून, स्वत:च्या पदराला खार लावून जेव्हा काही ध्येयनिष्ठ शिक्षक चिकाटीने विद्यार्थ्यांना गीता शिकविणे, प्रार्थना म्हणणे, ऐतिहासिक कथा सांगणे असे चारित्र्य घडविणारे कार्यक्रम घेतात, तेव्हा त्यांवर शिक्का बसतो ते एक वैयक्तिक खूळ *(Fad)* असल्याचा! परिणामत: अशा सर्व उपक्रमाकडे बघितले जाते तेच मुळी दूषित दृष्टीने! इतर शिक्षकांचे प्रत्यक्ष सहकार्य तर लांबच राहो, उलट त्याबाबतचे औदासिन्य, उपेक्षा नि टिंगल ही सातत्याने सुरू असल्याने चाणाक्ष विद्यार्थ्यांच्या नजरेतून ती सुटली तरच आश्चर्य! साहजिकच हे विद्यार्थीही शिक्षकांच्या अपरोक्ष अशा कार्याची अवहेलना आपल्या विद्यार्थी मित्रांमध्ये करावयास मागे पुढे पाहात नाहीत! या सर्वांचा परिणाम होऊन अल्पावधीतच या मौलीक कार्यात कळकळीने पुढाकार घेणारे एक दोन शिक्षक व मोजकेच सत्प्रवृत्त विद्यार्थी एकाकी पडू लागतात. त्यांच्याकडे कौतुकाने व आपुलकीने पाहणारे थोडे आणि थट्टेने वा असूयेने पाहणारे जास्त! दुसऱ्या गटात मोडणाऱ्या व्यक्तींची संख्या हळूहळू वाढत जाते नि या कार्यात जिद्दीने भाग घेणारे शिक्षक व विद्यार्थी यांची संख्या मात्र दिवसेंदिवस कमी होत असते. सर्वसाधारणपणे कोणतेही सत्कार्य हाती घेतले की जो अनुभव येतो त्याचीच ही पुनरावृत्ती! नैतिक शिक्षणाबद्दल शिक्षकात आत्यंतिक निष्ठा, विशेष कार्यक्षमता व कर्तृत्व असेल तर हे कार्य काही शाळातून सातत्याने काही वर्षे चालू रहाते. परंतु असे नैतिक शिक्षणाचे महत्व ओळखणारे शिक्षक यदाकदाचित उपलब्ध असले तरी या कार्यासाठी हव्या असलेल्या गुणसमुच्चयांचा त्यांच्या ठिकाणी अभाव असतो! त्यामुळे संपूर्ण वर्षभर स्वयंप्रेरणेने नैतिक शिक्षण विद्यार्थ्यांना देणाऱ्या शाळा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच सापडतील.

सर्वांचे हार्दिक अनुमोदन, पण

आपण एखाद्या शाळेच्या शिक्षकांच्या सभेत किंवा महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या बैठकीत जर हा विषय मांडला तर पूर्ण नास्तिकवादी

विचारसरणीचे अध्यापक अपवादात्मक म्हणून सोडले तर सामान्यतः या कार्याला सर्वांचीच मनःपूर्वक मान्यता (अर्थात कृतीने क्वचितच) असते. अशा आध्यात्मिक संस्कारांची अत्यंत निकड आहे हे सर्वजणच एकमुखाने मान्य करतात. पण प्रत्यक्षात सुरूवात मात्र फारशी कुठे होतांना आढळत नाही. असे कां बरे व्हावे ? असा विरोधाभास कां उत्पन्न होतो ?

अत्यंत प्रतिकूल वातावरणाचा अडथळा

असे उपक्रम सुरू करायला मुख्य अडचण आहे ती समाजात असलेल्या आजच्या अत्यंत प्रतिकूल वातावरणाची ! असे चटकन कुणीही म्हणेल आणि ते खरेही आहे. कुठल्याही शहरात आपण फेरफटका मारला तर आपल्या काय नजरेस पडते ? कुसंस्कारांची केन्द्रे आपणास संपूर्ण शहरात पदोपदी विखुरलेली दिसतील! गल्ल्याबोळ्यातून नजरेस पडणारे वरळीमटक्याचे अड्डे, पैसे लावून पत्ते किंवा सोंगटचा खेळण्यातं दंग असलेली चौकडी, अश्लील व गुन्हेगाराला प्रवृत्त करणाऱ्या गचाळं वाङमयाची विक्री करणारी लहान मोठी पुस्तक विक्री केन्द्रे, दारूच्या गुत्त्यातून जास्त घेतल्यामुळे झिंगत बाहेर पडणारे भकास चेहऱ्याचे नागरिक, असे कितीतरी प्रकार आवतीभोवती विद्यार्थ्याला नित्य पहावयास मिळतात. या सर्व गोष्टी विद्यार्थीमनावर काय काहीच परिणाम करीत नसतील ?

थिएटर समोर राहणारा स्नेही

मला आठवते, माझ्या एका स्नेह्याने तो कित्येक वर्षांपासून रहात असलेले सर्व दृष्टीने सोयीस्कर असलेले कमी भाड्याचे घर अनपेक्षितपणे सोडले होते. तसे करण्याचे त्याने मला सांगितलेले कारण सर्वांना विचार करावयास लागणारे आहे. काही महिन्यापूर्वी त्याच्या घरासमोरील मोकळ्या जागेत एक आलेशान थिएटर तयार झाले होते. नवे नवे चित्रपट तिथे सतत येत होते. पानाचे ठेले, हॉटेल्स, सिनेसंगीताच्या पुस्तकांची दुकाने थाटली गेली होती ! स्त्री–पुरुषांच्या कामुक भावना रेखाटणारी भडक चित्रे व प्रचंड भितिपत्रके सहज दृष्टीस पडतील अशा जागी लावली जात होती! काही महिन्यातच बाळबोध वळण असलेल्या

त्या स्नेह्यांच्या कुटुंबातील अबोध व अपक्व बालकावर त्या सिनेगृहाच्या आसपासच्या वातावरणाचे अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय कसे राहतील ?

मी माझ्या स्नेह्याला फक्त एकच प्रश्न केला, " काय रे, तुझा तो ब्लॉक कुणी नंतर भाड्याने घेतला असेल नाही? " त्याने क्षणभरही न थांबता उत्तर दिले, "अरे, मी ते घर सोडणार हे कळण्याचा अवकाश ! अहमहमिका लागली भाडे वाढविण्याची ! अखेर एका सिंधी गृहस्थाने तिप्पट भाडे देऊन ताब्यात घेतलं ते घर !"

माझ्या मनात विचार आला, "माझ्या स्नेह्याची मुले तर बचावली या कुसंस्कारांपासून ! पण या सिंधी गृहस्थाच्या बालकांचे भवितव्य? "

प्रथम वातावरण निर्मिती की प्रयोग ?

तेव्हा नैतिक शिक्षणासारखा प्रयोग यशस्वी व्हायला आवती-भोवतीचे वातावरण अनुकूल हवे हे निःसंशय ! आजचे वाङ्मय, चित्रपट, कुटुंब, राजकारण इ. विविध क्षेत्रात इतकी गढूळता उत्पन्न झाली आहे की, विद्यार्थी मनावर अल्पकाळ नैतिक शिक्षणाद्वारे केले जाणारे स्वल्प सुसंस्कार, समाजात आज वहाणाऱ्या प्रचंड कुसंस्कारांचा लोंढा कितपत थोपवू शकतील ? हा खरोखरी प्रश्नच आहे! नागपूर विश्वविद्यालयात हा उपक्रम सुरू झाला त्यावेळी नागपूर येथील दैनिक "तरुण भारतात" या विषयावर प्रस्तुत लेखकाने दोन सविस्तर लेख[५] प्रसिद्ध केले. तेव्हा " एक अभिनंदनीय प्रयोग " म्हणून एका प्राचार्यांनी[६] या शिक्षणाचा गौरव करून, काही विचार एका सविस्तर लेखात मांडले होते. या प्रयोगासाठी अनुकूल वातावरणाची आवश्यकता प्रतिपादन करतांना त्यांनी लिहिले होते, " शांत चित्ताने देवपूजा करण्याकरता घरातील इतर भागात शांतता व सुव्यवस्था नांदणे आवश्यक आहे." अनेकांच्या मनांत उद्भवणारी अडचण त्यांच्या लेखाद्वारे प्रातिनिधिक रुपाने प्रगट झाली हे निःसंशय !

की नैतिक शिक्षण प्रयोगाने वातावरण निर्मिती ?

या लेखाला उत्तरवंजा लेख लिहण्यापूर्वीच यवतमाळच्या 'स्वदेश' च्या संपादकांनी आपल्या साप्ताहिकात[७] या अडचणीचा समर्पक शब्दात परिहार

केला. त्यांच्या लेखातील एक उद्‌बोधक परिच्छेद येथे उद्‌धृत करण्याचा मोह आवरत नाही. ते म्हणतात, "प्राचार्यांचेच उदाहरण घेऊन बोलावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, अगोदर साऱ्या घरातील वातावरणात शांत समाहित अशी अवस्था निर्माण करा आणि मग पहा आमच्या देवपूजेचा सुगंध साऱ्या घरभर दरवळतो की नाही? घरात दुर्गन्ध येतो त्याचा उपसर्ग टाळण्याकरिता उद्‌बत्ती लावावी आणि तिने म्हणावे की, 'अगोदर सारी घाण निर्गंध करा म्हणजे माझा सुवास तुम्हाला मिळेल,' तेव्हा त्या उदबत्तीला आवर्जून सांगावे लागेल की, 'बाई, तुझ्या सौगंधिक सामर्थ्याने जीवन सुसह्य करण्यासाठीच तर तुझा आश्रय केला. तूच सांगायला लागली की आधी सारी घाण काढून टाका. तोपर्यंत मला बोल लाऊ नका.' साऱ्या घरातच शांती नांदली तर वेगळ्या देवघराची मातब्बरी तरी का वाटली असती? घरात निर्मळतेचा, स्वच्छतेचा अभाव असो, पण देवघर मात्र स्वच्छ असावे, देवघरात गेल्यावर तरी प्रसन्नचित्त व्हावे. घरात कोठेही करमले नाही तरी देवघरांत देवासमोर जाऊन बसल्याबरोबर घरातील अनाचार, अत्याचार यांचा विसर पडावा, मनोमालिन्य नाहीसे व्हावे आणि देवमंदिरातील तेज आणि सामर्थ्य घेऊन माणसाने बाहेर पडावे. अशी जर देवघरापासून, देवमंदिरापासून आणि देवघरांत बसलेल्या पूजकापासून अपेक्षा केली तर ती वावगी ठरेल काय?"

युद्धस्तरावर सामुदायिक प्रयत्नांचा डोंगर

सारांश, समाज बिघडला आहे म्हणून शिक्षण चांगले मिळत नाही आणि शिक्षण बिघडले आहे म्हणून समाज सुसंस्कृत होत नाही. अमे कुचक्र इंग्रजी आमदानीपासून अव्याहत स्वातंत्र्यकाळात सुद्धा अखंड सुरू आहे. संपूर्ण देशभर वातावरणाला अनुरूप शिक्षण असावे की शिक्षणाच्या माध्यमाने वातावरणच अनुकूल करून घ्यावे, या प्रश्नाचे उत्तर डॉ. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या शिक्षण आयोगाने निःसंदिग्ध शब्दात खालीलप्रमाणे दिले आहे.

"In the great debate that has been going on for decades between those who hold that education must only

seek to adjust the individual to his environment and those who think that it should be an agency for the "superior reconstruction" of the environment and its pattern of life, we are definitely on the side of dynamic and creative view of education "

या प्रमाणे शिक्षणाचा वातावरण निर्मितीसाठी उपयो गकरून घ्यावयाचा असेल तर संपूर्ण देशभर एकाचवेळी शाळा कॉलेजातील एक उमलती पिढी दृष्टिसमोर ठेवून त्यांचे जीवन सुसंस्कार व सामर्थ्याने तेज:पुंज करण्यासाठी युद्धस्तरावर *(War-Footing)* सामूहिक प्रयत्न एकदिलाने करावयास हवेत! सुमारे ५ ते १० वर्षे सर्व शिक्षण संस्थांसमोर हाच एक प्रमुख विधायक कार्यक्रम असावा. इतर सर्व विषयांना गौण स्थान मिळावे ! जशी आपण अन्नधान्य व उद्योगधंद्यातील उत्पादनवाढीची एखादी पंचवार्षीक योजना आखतो तशी संपूर्ण देशात येती १० वर्षे 'माणूस' घडविण्याची सार्वत्रिक योजना आखण्याची वेळ आज आली आहे अन्यथा माणसातली "माणुसकी" नष्ट होईल की काय ही भीति वाटावी अशी महाभयंकर परिस्थिती आज ओढवली आहे. शिवाय अशा योजनेला फार खर्च येणार आहे असेही नाही. थोडी कल्पकता उपयोगात आणली तर आज शाळा कॉलेजात असलेल्या शिक्षकांच्या माध्यमातून हे लाखमोलाचे कार्य फार झपाट्याने पाहता पाहता होणार आहे! एकट्या-दुकट्याच्या प्रयत्नाने मात्र हे होण्यासारखे नाही. झालेच तरी ते 'दर्यामे खसखस' या प्रमाणातच. काही शाळा, काही महाविद्यालये 'स्वात्मसुखाय' हे काम आपापल्या परीने अंगावर घेतील ! परंतु त्याचा दृष्य परिणाम समाजात दिसावा अशी अपेक्षा करता येणार नाही. समाजातील एकूण वातावरणच इतक्या वेगाने दूषित होत आहे की, ते पार बदलवून टाकण्यास सर्व बाजूने शिक्षण संस्थांद्वारा प्रचंड हल्ला चढविण्याची खरी निकड आहे ! आणि त्यासाठी सर्वांकडून सामूहिक सुसंघटित प्रयत्न व्हायला हवा.

योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी

परंतु अशी योजना आखतांना येणाऱ्या अडचणी कोणत्या? नागपूर विश्वविद्यालयाने या विषयासाठी नेमलेल्या समितीचा एक सभासद या

नात्याने लेखकाला स्वत:च्या व अन्य महाविद्यालयात या प्रयोगाची जी जवळून पाहणी करता आली, त्याच्या आधारे नैतिक शिक्षण प्रभावी न होण्यास खालील प्रमुख कारणे नमूद करता येतील.

१. शासनाचे या बाबतीत असलेले औदासिन्य व उपेक्षा !
२. विविध शिक्षणसंस्था व विद्यापीठात या विषयाबाबत एकवाक्यता नसणे !
३. अशा शिक्षणाला लागणाऱ्या विशिष्ट दर्जाच्या व व्यासंगाच्या प्राध्यापकांची उणीव !
४. माध्यमिक बोर्ड व विद्यापीठ यामध्ये या योजनेला स्वतंत्र स्थान नसणे !
५. प्राथमिक शिक्षणापासून तहत उच्च शिक्षणापर्यंत सुसूत्र अशा शिक्षणाचा अभाव !
६. विविध वयोमर्यादा व अवस्था यांना अनुसरून संस्कारक्षम व प्रेरक असे प्रभावी साहित्य उपलब्ध नसणे !
७. पालकांच्या अपेक्षित सहकार्याचा अभाव !
८. नैतिक मूल्यांच्या विपरीत घडणाऱ्या घटना व तदनुसार वागणाऱ्या व्यक्ती यांचा गौरव व सन्मान !
९. शाळांतून आज अवलंबिली जाणारी मऊ शिक्षणप्रणाली. *(Soft-Pedagogy)*
१०. योजनेच्या कार्यवाहीसाठी लागणाऱ्या द्रव्यबळाची चणचण !

दोन परस्परविरुद्ध युक्तिवाद

वरील अडचणींची मोठी यादी वाचून कुणी म्हणेल की शासक, विद्यापीठ व पालक या सर्वांचीच याबाबतीत जर अनास्था असेल तर काय गरज आहे एवढी त्या नैतिक शिक्षणाची ? कुणाला नको असलेली गोष्ट आपण त्यांच्यावर काय म्हणून लादावी ? याउलट अशी निराशाजनक स्थिती असल्यामुळेच या शिक्षणाची आज विशेष निकड आहे असे नाही का म्हणता येणार ? एखादी चांगली गोष्ट समाजात कुणालाच आपणहून करावीशी वाटत नाही म्हणून ती करणे सोडून द्यायचे असा जर नियम आपण केला तर कितीतरी हितावह गोष्टी पार संपुष्टात येतील !

किंबहूना अशा गोष्टीबाबत समाजातील आवड नष्ट होणे हे एक मोठे दुश्चिन्हच समजले पाहिजे व ते दूर करण्याचा सामूहिक प्रयत्न व्हायला हवा.

नैतिक शिक्षण फारसे कुणाला नको आहे, तेव्हा ते देण्याच्या भरीस पडू नये हा जसा एका टोकाचा विचार झाला, त्याचप्रणाणे नैतिक शिक्षणा-सारखे कार्य निष्ठेने व त्यागानेच होणे इष्ट असते ! त्यासाठी शासन, माध्यमिक बोर्ड वा विद्यापीठ यांच्या सहकार्याशिवायच ते व्हावयास हवे, असा दृष्टिकोन बाळगणारी दुसऱ्या टोकाची काही मंडळी आढळतात ! आत्यंतिक प्रतिकूल वातावरणातच आजवर चांगली कामे झाली नि त्या परिस्थितीतच ती नेटाने व नीटनेटकी होतात, असा युक्तिवाद हे दुसरे टोक गाठणारे करीत असतात ! जणू सत्कार्यासाठी प्रतिकूल स्थिती व वातावरण आवश्यक नि अपरिहार्य आहे, अशी प्रतिकूलता असल्याशिवाय सत्कार्य होऊच शकत नाही ! असे ते का गृहीत धरतात ? ते कळत नाही ! नकारात्मक प्रेम वा दृष्टिकोन हे फार काळ टिकत नाही हे ते विसरतात.

राष्ट्रावर आक्रमण होताच प्रांत, भाषा, जाती यातील भेद दूर होऊन एकात्म भारताचे दर्शन घडावे व आक्रमणाचे भय दूर होताच पूर्ववत परस्परातील भांडणांना ऊत यावा, हे जसे भयावह तसेच प्रतिकूल परिस्थिती असतांनाच एखादे सत्कार्य करावेसे वाटावे व अनुकूलता असतांना त्याबद्दल अनास्था वाटावी हे देखील चिंतनीयच ! कारण एखाद्या गोष्टी-बद्दल विरोधातून जन्माला आलेले प्रेम हे चिरकाल टिकणारे नसते हा शाश्वत सिद्धांत आहे !

स्वातंत्र्यात सरकारचे सहाय्य का नसावे ?

स्वातंत्र्याची पहाट होण्यापूर्वी पारतंत्र्याच्या काही शतकांच्या काल-खंडात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतातील संस्कृत भाषा, ज्योतिष्य, वैद्यक, योगविद्या इ. भारतीय संस्कृतीच्या परिचायक बाबी जशा जन-तेने अनंत अडचणींना तोंड देवून कशाबशा प्राणपणाने जतन केल्या तसे त्यांचे रक्षण कमेबसे पुढेही होईल ! परंतु या विद्यांच्या संवर्धनासाठी भारतातील स्वतंत्र सरकारच्या सहकार्याची मुळीच अपेक्षा बाळगू नये, हा विचार बहुधा दीर्घकालीन गुलामगिरीचा परिपाक म्हणावा लागेल.

अर्थात सुरवातीस उल्लेखिलेल्या निष्क्रीयतेच्या उदासीन दृष्टिकोनापेक्षा अत्यंत चिवट व सक्रीय कर्तृत्वाला आवाहन करणारा हा विचार खचित जास्त स्फूर्तिप्रद व चैतन्यदायक आहे !

परंतु चिरवांच्छित असे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनुकूल वातावरण उपलब्ध होवून सन्मार्गाला नेणारी कोणतीही गोष्ट अधिक व्यापक, प्रमाणावर घडन जनमानसावर तिचा विशेष प्रभावी ठसा उमटावा अशी अपेक्षा करणे का वावगे ठरावे ? नैतिक शिक्षणासारख्या, विद्यार्थ्यांना सत्प्रवृत्त करणाऱ्या कार्याला, शासनासह सर्व सामाजिक संस्थांचे सहाय्य मिळाले तर सामाजिक नीतिमत्तेचा खालावलेला स्तर ऊंचावून मानवी जीवन अधिक संपन्न नाही का होणार ?

सारांश, समाजातील सर्व घटकांचे सहाय्य घेवून व्यापक प्रमाणावर एका प्रचंड मोहिमेच्या स्वरूपात राष्ट्रातील वातावरण सदाचरणाने भारून टाकण्याचा संकल्प करून ही योजना कार्यान्वित व्हावी !

योजनेतील प्रमुख अडचणी व उपाय

आपण आता उपरिनिर्दिष्ट अडचणींचे निवारण कसे करता येईल ते पाहू

(१) शासनाचे औदासिन्य व उपेक्षा.

शासकीय मान्यता आवश्यक

'राजा बोले व दळ हाले' किंवा 'राजा कालस्य कारणम्' या उक्तीप्रमाणे आजच्या लोकशाही युगातही या कार्याला अनुकूलता दर्शविणारे शासकीय धोरण फार सहाय्यक ठरेल हे कुणीही मान्य करील. शासकीय मान्यता जर निःसंदिग्ध शब्दात सरकारने घोषित केली तर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणास एकदम केवढे तरी व्यापक व परिणामकारक स्वरूप प्राप्त होईल !

संपूर्ण देशात अजून एकाही प्रांताने हे शिक्षण देण्याचा प्रयत्न गेल्या २५ वर्षांच्या स्वातंत्र्यकाळात केला नाही, ही वस्तुस्थिती आहे. असे का बरे व्हावे ? एकीकडे सचोटी, प्रामाणिकपणा इ. नैतिक गुणांचा ऱ्हास होत असल्याचा टाहो सर्वत्र फोडला जात असतांना दुसरीकडे नैतिक शिक्षणाची ही हेळसांड काय म्हणून ? नाही म्हणायला

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश या प्रांतात नैतिक शिक्षण राजस्तरावर आरंभ केल्याची स्तुत्य बातमी आली होती ! परंतु या दोन्ही राज्यातील अस्थिर राजकीय वातावरणा-मुळे या प्रयोगाचा पाठपुरावा दुर्दैवाने होऊ शकला नाही.

निधार्मिक घटनेची अडचण

या शिक्षणाला अधिकृत मान्यता देण्यात जी मुख्य अडचण पुढेकरण्यांत येते ती "निधार्मिक घटनेची." शासन निधार्मिक स्वरूपाचे ठेवायचे अस-ल्यास एखाद्या विशिष्ट धर्माचे किंवा पंथाचे किंवा संप्रदायाचे शिक्षणास कशी मान्यता द्यावी ? असा प्रश्न मांडण्यात येतो. परंतु "निधर्मी" याचा अर्थ अधर्मी (*With no religion*) किंवा विधर्मी (*inimical to religion*) असा नसून राजधर्म (*State religion*) असा कोणताही नाही एवढाच आहे आणि हा अर्थ लक्षात घेऊन आध्यात्मिक व नैतिक शिक्षण देता येणे शक्य आहे.

धर्म म्हणजे विशिष्ट पंथ, संप्रदाय नव्हे

एखादा विशिष्ट धर्म, पंथ, वा संप्रदाय यांनी प्रतिपादिलेल्या तत्वांचे शिक्षण देण्याची ही योजना असती तर खरोखरी मूलभूत अडचण म्हणून ही मान्य करता आली असती. परंतु नैतिक वा आध्यात्मिक शिक्षण म्हणजे एका विशिष्ट धर्ममताचा अभ्यास वा प्रचार नव्हे. त्यात इतका संकुचित अर्थ अभिप्रेत नाही. सर्व धर्म, पंथ व संप्रदाय एकाच शाश्वत सत्याचा शोध घेण्यात गुंतले असल्यामुळे परमेश्वराकडे जाण्याचे ते विभिन्न मार्ग आहेत; नि त्यामुळे त्यांच्यात परस्पर विरोध असण्याचे वस्तुतः काहीच कारण नाही. भगवान रामकृष्ण परमहंस म्हणत असत त्याप्रमाणे एखाद्या विस्तीर्ण पुष्करिणीला अनेक घाट असतात

एका घाटावरून हिंदू पाणी घेतात म्हणतात ' जल '.

दुसऱ्या घाटावरुन मुसलमान पाणी घेतात म्हणतात ' पानी '.

तिसऱ्या घाटावरुन ख्रिश्चन पाणी घेतात म्हणतात ' वॉटर '.

पाणी तेच-अेकच. जितकी मते तितके मार्ग. निरनिराळ्या धर्माच्या पंथाचे लोक निरनिराळ्या नावांनी एकाच देवाला आळवीत असतात.

" पाणी " घेऊन तृष्णा मिटविण्याशी काम–मग ते कोणत्याही "घाटा" वरून घेतलेले असो.

विविध धर्म म्हणजे साक्षात्काराचे विभिन्न मार्ग

एकाच गावाला जाण्याचे जसे भिन्न भिन्न ठिकाणाहून अनेक मार्ग असावेत, तसे शाश्वत सुखाचे निधान असलेल्या भगवंताच्या साक्षात्काराचे म्हणता येईल. शेकडो-हजारो संप्रदाय व धर्म हे जणू त्याला गाठण्याचे विभिन्न मार्ग होत भगवान रामकृष्णांचे जीवन म्हणजे तर हा सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी भूतलावर अवतरलेला अवतारच म्हणावा लागेल. कालीमाते-प्रमाणेच श्रीकृष्ण, प्रभु रामचंद्र, श्री शंकर अशा सर्व हिंदू देव–देवतांची उपासना करून त्या सर्वांमध्ये "एकाच परमेश्वराचे तत्व विराजमान आहे" हे जसे त्यांनी प्रत्यक्ष अनुभविले, तद्वतच मुसलमान व ख्रिश्चन बांधवांचे धर्मगुरू महम्मद व येशू ख्रिस्त यांनी उपदेशिलेले आचरण करून व त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेऊन सर्व धर्मांतील एकत्वाचा साक्षात्कार त्यांनी मानव जातीला घडविला! श्रीरामकृष्णांचे जीवन म्हणजे समष्टी धर्माच्या सत्यतेचे अेक प्रात्याक्षिकच होते ! विविध धर्माच्या अनुष्टानाची ती एक प्रयोगशाळाच होती.

आणखी एका समर्पक उपमेन श्रीरामकृष्णांनी म्हटले आहे की, जशी रंगहीन वीज लाल, निळ्या, पिवळ्या वगैरे निरनिराळ्या दिव्या-तून प्रकाशल्यामुळे निरनिराळ्या रंगाची दिसत असते, तद्वतच तो अेकमेवाद्वितीय सच्चिदानंद, भिन्नभिन्न धर्मामधून विभिन्न प्रकारचा वाटत असतो ! हिंदूचे जे ब्रह्म, तोच बौद्धांचा " धम्म " ख्रिस्तांचा "स्वर्गस्थ पिता", मुसलमानांचा 'अल्ला,' 'पारशांचा 'अहुर मज्झद'. नि यहुद्यांचा " जिहोवा " होय.

धर्मांध्यासाने धर्मभेद व कलहाला आळा

म्हणूनच श्रीरामकृष्णांची सर्व जगाला मुख्यत: शिकवण आहे धर्माचे एकीकरण नव्हे, तर धर्मांचा समन्वय, कोणत्याही भिन्नधर्मीय समाजाला त्यांच्या धर्माची मूलतत्वे यथातथ्य आकलन होऊन ते खऱ्या अर्थाने " धार्मिक " झाले तर त्यांच्यात कलह होऊ शकत नाही ! कलहाचे मूळ धर्माच्या बाह्य डोलाऱ्यालाच धर्म म्हणून कवटाळण्यात वा

राजकारणाशी त्याची सांगड घालण्याच्या प्रयत्नात आहे! धर्माने भेद-भाव नष्ट होतात, उत्पन्न होत नाहीत. कारण खरा धर्म भेदातीत आहे! तो मानवाच्या एकात्मतेचा पुरस्कारच करीत आहे! भेदभावाला अशा धर्मात मुळीच थारा नाही! संत कबीर या ऐक्याचा संदेश देणारे महान पुरूष होउन गेले. ते म्हणतात,

कबीरा खडा बजारमे दोनो दिनकी खैर
ना किसीसे दोस्ती ना किसीसे बैर.

कबीर बाजारात उभा आहे, तो दोन्ही धर्माचे कल्याण इच्छित आहे. त्याची कोणाशी मैत्री नाही! कोणाशी वैर नाही!

सर्व धर्मीय सत्पुरूषांच्या आत्मानुभूतीत साम्य

सर्व देशांतील, धर्मातील व कालातील साक्षात्कारी पुरूषांची आत्मानुभूती ही एकच असल्याचा सर्वांचा दाखला आहे. सर्व सत्पुरूषांचा आत्मानुभव जर सारखा असेल तर सर्व धर्मातील समानता मानणे भागच पडते. संताच्या अनुभूतिपर लिखाणांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या अमोल वचनांची तौलनिक मांडणी करण्याचा एक अभिनव व अधिकारयुक्त प्रयत्न महाराष्ट्रातील अर्वाचीन संत गुरूदेव श्री. रा. द. रानडे यांनी आपल्या ग्रंथातून केलेला आहे. ४० वर्षे केलेल्या आपल्या अध्यात्माच्या अभ्यासाचे सार म्हणून उपदेश करतांना गुरूदेव म्हणतात, "आपण आध्यात्मिक जगाचे नागरिक *(Citizen of the Spiritual-world)* झाले पाहिजे! कर्मप्रधान व्यवहारात जरी माणसामाणसातच भेद दिसत असला तरी तात्विक दृष्टीने त्यात भेद नाही! मानवता एकच आहे. माणूस उघडाच जगात येतो व उघडाच जाऊन अनंतात लीन होतो! या दृष्टीने सर्व माणसे सारखीच आहेत! तसेच सर्व माणसांचे देवाशी एकच नाते आहे व त्यायोगे सर्व मानवता एकच होते! अशा प्रकारची तात्विक दृष्टी ठेवली तरच धार्मिक व जातीय कलह मिटतील. राजकारणाने मिटणार नाहीत! यासाठी शुद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास वाढविला पाहिजे."

धर्मसहिष्णुतेचा भारतीय इतिहास

असे शुद्ध तात्विक ज्ञान आध्यात्मिक शिक्षणाद्वारेच नवीन पिढीला देता येईल. त्यामुळे विभिन्न जातीजमातीमध्ये अस्तित्वात असलेले वादंग, अनेकांच्या कल्पनेप्रमाणे वाढण्याऐवजी उलट परस्परा-तील गैरसमज व द्वेषभाव कमी होण्यासच मदत होईल. भारतवर्षाची उज्वल परंपरा नि अभिमानास्पद इतिहास आपणाला याचीच साक्ष देतो ! मानवजातीला ज्ञात असलेल्या सुमारे ५००० वर्षांच्या इतिहासात हिंदूंनी परकीय भूमी आक्रमित करून स्वधर्माचे सक्तीचे अधिराज्य प्रस्थापित करण्याचा पाशवी प्रयत्न आजवर कधीही केल्याचे कुठेही नमूद नाही. आक्रमण केले खरे, पण ते तलवार किंवा तराजू यापैकी काहीही हातात न घेता ! भारतीयांनी संपूर्ण पृथ्वी पालथी घातली, पण ती उभ्या मानवजातीला शाश्वत शांतीचा अमर संदेश देण्याच्या सद्हेतूनेच ! भगवान बुद्धाच्या अनुयायांपासून तो तहत स्वामी विवेकानंद नि स्वामी रामतीर्थापर्यंत, हजारो संतानी नि सन्याशांनी विश्वसंचार केला पण तो कुणाला बाटविण्यासाठी वा कुणाचे जबरदस्तीने धर्मांतर करण्यासाठी नव्हे, तर जगतावर आध्यात्मिक व सांस्कृतिक अधिराज्य प्रस्थापित करण्यासाठी !

या उलट युरोपातील पाश्चात्य देशांत जबरदस्तीने लोकांवर धर्म लादण्यापासून तो परधर्मियाला जिवंत जाळण्यापर्यंत शेकडो अनन्वित अत्याचारांनी तेथील इतिहास बरबटलेला आहे ! त्यामुळे काही आधुनिक विद्वानांना अशा शिक्षणाने विद्वेषाचा अग्नि विभिन्न धर्मियात भडकेल अशी भीती वाटणे स्वाभाविक आहे, परंतु परमत सहिष्णुतेचे व सह-अस्तित्वाचे तत्व भारतीय रक्तात इतके भिनले आहे की, त्यांच्यावर आरोप करायाचाच झाला तर तो आत्यंतिक सहिष्णुता व सहनशील-तेचाच करावा लागेल. तेव्हा अशा शिक्षणाचा भारतीयांवर अनिष्ट परिणाम होण्याची भीती बाळगण्याचे कारण दिसत नाही.

शासनाच्या उत्तेजनाची अपेक्षा

सारांश, शासनाने जाहीरपणे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला आपली मान्यता घोषित केली पाहिजे. त्वरित जाहीर मान्यता देणे जर

शक्य नसेल तर शिक्षणविषयक धोरण अशा शिक्षणाला अनुकूल ठेवणे सहज शक्य आहे. अनेक प्रकारे नैतिक शिक्षणाला शासन उत्तेजन देऊ शकेल. उदा:– अनुदानासाठी अनुज्ञेय खर्चांच्या बाबीत *(Admissible item of Expenditure)* नैतिक शिक्षणासाठी आलेला खर्च समाविष्ट करणे, नैतिक शिक्षणाचा प्रयत्न करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत देऊ करणे, या शिक्षणाच्या दृष्टीने आयोजिलेल्या शिबिरांचा आंशिक आर्थिक भार उचलणे इ.

अशा विविध पद्धतीने शासनाने या शिक्षणाला प्रतिष्ठा देऊन उचलून धरताच अनेक अडचणीवर मात करणे सोपे होणार आहे. या कार्यातील हा सिंहाचा वाटा शासनाने अंगिकारला मात्र पाहिजे. तसे करतांना उद्भवणाऱ्या मुख्य अडचणींचा सविस्तर विचार पुढे वेगळ्या प्रकरणात केलाच आहे.

(२) विविध शिक्षण संस्थात व विद्यापीठात या विषयाबाबत एकवाक्यता नसणे.

शासकीय प्रतिकूल धोरणामुळे विरोध

दुसरी अडचण म्हणजे या विषयावर शिक्षणक्षेत्रातील संबंधित व्यक्तित एकवाक्यता नसणे. सर्वत्रच अशी स्थिती आहे असे नाही. परंतु काही थोड्या मोजक्या संस्था अपवाद म्हणून सोडल्या, तर अशा शिक्षणाबद्दल अनेकांच्या मनात अनेक कारणामुळे गैरसमज व तज्जन्य विरोध दिसून येतो. काही ठिकाणी हा विरोध अतिशय तीव्र स्वरूपाचा तर काही ठिकाणी त्याचे स्वरूप सौम्य, एवढा प्रमाणाचाच काय तो फरक. बरोबरीने कार्य करणाऱ्या थोड्या अध्यापक मंडळीच्या विरोधाने फारशा अडचणी येत नाहीत. मात्र हा विरोध मुख्याध्यापक, प्राचार्य वा संस्थेचे चालक यांचा असला तर विशेषच जाणवतो. कारण त्यांच्या इच्छेविरुद्ध काही करणे, नौकरी सांभाळण्याच्या दृष्टीने फार अवघड असते. संस्थाप्रमुख वा खाजगी शिक्षण संस्थेचे चालक यांचे सहाय्य वा विरोध पुष्कळ वेळा सरकारी धोरणावरच अवलंबून असतो. सरकारी अनुदानाच्या भरवशावर कशाबशा चालणाऱ्या शाळा कॉलेजांना सरकारी

विरोध ओढवून घेणे परवडण्याजोगे नसते! कोणत्याही कारणाने सरकारची वक्रदृष्टी झाली तर ती शिक्षण संस्था बंद पडण्याची भीति असते! अशा स्थितीत शासनाचा नैतिक शिक्षणाला या ना त्या कारणामुळे विरोध असतांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून त्याला उत्तेजन मिळणे दुरापास्त असते. अनेकदा तर मनातून अशा कार्याबद्दल चालकांना सहानुभूती असते पण सरकारच्या प्रतिकूल धोरणामुळे उघडपणे ती व्यक्त करता येत नाही. म्हणूनच वर म्हटल्याप्रमाणे शासनाने आध्यात्मिक शिक्षणाला आपली मान्यता जाहीरपणे घोषित करणे हे फार सहाय्यक ठरणार आहे.

कार्यैकनिष्ठेने विरोधाचे सहानुभूतीत परिवर्तन

पण तसे ते घोषित होत नाही तोवर शिक्षकाने चालकांच्या विरोधाचे आपल्या कार्यैकनिष्ठेने सहानुभूतीत परिवर्तन करुन घेतले पाहिजे. "सर्वेषाम् अविरोधेन" हे सूत्र त्याने नित्य ध्यानात ठेवले पाहिजे.

नैतिक शिक्षणाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला हा विरोध नाहीसा करण्याचा उपाय एकच ! आणि तो म्हणजे स्वत:ची कार्याविषयीची आत्यंतिक निष्ठा व अत्यंत तळमळीने केलेले प्रयत्न यांच्याद्वारे घडविली गेलेली विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष एक चमू तयार करून दाखविणे. कोणत्या प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीत अध्यापकाने कशा रीतीने असे कार्य उभे करावे याचे साच्चेबंद ठोकताळे सांगणे अवघड आहे. पण विवेकाने नि कौशल्याने योग्य दिशेने प्रयत्न केल्यास, किमान १० ते १५ विद्यार्थ्यांचा गट, आपल्या शिकवणुकीने व आचरणाने प्रभावित होऊन, नैतिक मूल्यांची जपणूक करतांना वर्षभरात दिसू लागतो. त्यांच्या वृत्तीत हळूहळू पालट झालेला जाणवतो. त्यांच्या सवयीत लक्षात येण्याजोगा बदल झालेला असतो ! अशा विद्यार्थ्यांच्या वागण्यात व बोलण्यात एक वेगळीच चमक दिसू लागते ! पालकांना, शिक्षकांना व सहाध्यायी विद्यार्थ्यांना या १० ते १५ विद्यार्थ्यांच्या जीवनात होत असलेला बदल जाणवतो. इतकेच नव्हे तर त्या गटातील विद्यार्थ्यांचे मन देखील या सुखद, सात्त्विक नि शुभ वळणाची दखल घेऊ लागते. सन्मार्गाची सुखावह वाटचाल सुरू झाल्याची साक्ष त्यांना मनोमन पटते.

पुरुषार्थाने विरोधाचा परिहार

" त्या मास्तरांच्या नादी लागला नं, तेव्हापासून लागला ह्या सगळ्या गोष्टी करायला, शहाण्यासारखा ! आम्ही काय कानीकपाळी कमी ओरडत होतो, त्याने चांगले वागावे म्हणून ? पण सोनाराकडून कान टोचले जायला हवेत ना !" एखाद्या माऊलीने असे प्रेमाने काढलेले उद्‌गार म्हणजे शिक्षकाने तळमळीने केलेल्या कार्याच्या यशस्वितेची पावतीच असते ! विद्यार्थ्यावर केलेल्या सुसंस्काराचे फळ त्याच्या वागणूकीत जेव्हा दृगोचर होऊ लागते तेव्हा एखादा उत्तम कलाकार कष्टाने केलेल्या आपल्या कलाकृतीच्या पूर्णतेनंतर जे समाधान मिळवीत असतो, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त कृतकृत्यतेचा आनंद शिक्षकाला अनुभवता येतो.

कलाकार आपल्या कौशल्यरूपी कुंचल्याने अखेर एखाद्या निर्जीव वस्तूवर शेकडो संस्कार करून त्याला बाह्यतः सजीव करण्याचा प्रयत्न करीत असतो. शिक्षकाचा अभ्यासविषय तर " मन " असलेला चालता बोलता मानव असतो ! आशाआकांक्षा असलेला बालक असतो. शिव होण्याचे सामर्थ्य असलेला जीव असतो ! नि अशा मानवाला हा शिक्षक देवत्वाची वाट दाखवीत असतो. नराचा नारायण होत असल्याची अनुभूती घेत असतो. त्यामुळे शिक्षकाची स्वकार्यावरची श्रद्धा व स्वतःबद्दलचा आत्मविश्वास दुणावतो. ही श्रद्धा व हा आत्मविश्वास जेवढ्या प्रमाणात जास्त तेवढ्या प्रमाणात विरोधाची धार बोथट झालेली दिसून येते. कारण केवळ शाब्दिक टीकेला, कर्तृत्ववान पुरुषार्थाकडून आजवर नेहमीच पराभव पत्करावा लागला आहे.

सत्कार्याला विरोध हा सामान्य नियम

तसेच कितीही चांगले कार्य असले तरी विरोधाशिवाय ते पूर्ण झाले असे कधी घडते का ? कोणत्याही मुद्यावर, मग तो कितीही संयुक्तिक असो, संपूर्ण एकवाक्यता कधी अनुभवास येते का ? मग येथेच त्याची अपेक्षा कशी करता येईल ? आपली खरी कसोटी तर विरोधी परिस्थितीतच आहे. तेव्हा वरिष्ठांची अनुकूलता नसतांना नाऊमेद होऊन चालणार नाही. आपण आपली सर्व शक्ती युक्ती पणाला लाऊन

हे कार्य पूर्ण करूच करू असा विचार शिक्षकाने मनात आणून स्वत:ला ऊत्तेजन देत राहीले पाहिजे.

सारांश, शासनाची मान्यता व निष्ठावान शिक्षकांचा तळमळीचा प्रयत्न यामुळे या कार्याच्या यशस्वितेसाठी आवश्यक तेवढी विद्वानात व संस्था चालकात एकवाक्यता होणे फारसे अवघड नाही.

(३) अशा शिक्षणाला लागणाऱ्या विशिष्ट दर्जाच्या व गुणांच्या अध्यापकांची उणीव

आदर्श अध्यापकाकडून अपेक्षा

या कार्याबद्दल मनापासून आस्था बाळगून कार्यरत होण्यास उद्युक्त होणारा दर्जेदार अध्यापक हवा, हे प्रकरणाच्या सुरवातीसच नमूद केले आहे. श्री गुलाबराव महाराज[10] अध्यापकाचे कर्तव्य विशद करतांना म्हणतात, "गुरू-शिष्याचा प्रेमसंबंध हृदय व शरीर याच्या संबंधाप्रमाणे आहे. शरीरातील अशुद्ध रक्त घेऊन हृदय ते शुद्ध करते व फिरून शरीराकडे पाठविते. तद्वत श्रीगुरू-शिष्याचे अशुद्ध विचार घेऊन ते शुद्ध करून फिरून शिष्याला देतात. अशुद्ध शिष्याचे अशुद्ध मन शुद्ध करणे हे गुरूचे कर्तव्य," पू. विनोबाजी[11] तर अध्यापकाविषयी अधिक अपेक्षा बाळगून म्हणतात, "आचार्य सगळा विचार समजू शकतात. लोकांचे विचार परिवर्तन करू शकतात, हृदय परिवर्तन करू शकतात, आणि जीवन परिवर्तनाची दिशा दाखवू शकतात. अशाप्रकारे परिवर्तनाचे सामर्थ्य अंगी असलेल्या या जमातीने पोलीसांची आवश्यकता भारतात उरू द्यावी हे खरोखरीच लांछन आहे."

शिक्षकाकडूनच गुणांची अपेक्षा का ?

अशा गुणसमुच्चयाची अपेक्षा शिक्षक या समाजातील एकाच घटकाकडून काय म्हणून करायची ? व्यापारी, दुकानदार, शेतकरी, डॉक्टर, इंजिनियर, नट यांची प्राप्ती शिक्षकापेक्षा पुष्कळ जास्त असूनही, त्यांच्याकडून अपेक्षा नसलेल्या अनेक गुणांची यादी मात्र, तुलनेने फारच कमी वेतन मिळवणाऱ्या शिक्षकांच्या माथी मारली जाते. हे अनुचित नव्हे का ? असे प्रश्न उपस्थित करून शिक्षकांवर लादलेले हे ओझे

दूर व्हावे असे जोरदार प्रतिपादन पाश्चात्य देशात होऊ लागले आहे. रेडिओ व टेलिव्हिजन यासारखी ज्ञानप्रदान करणारी प्रभावी साधने उपलब्ध झाल्यानंतर शिक्षक या प्राण्याची गरजच नाही, असे काही लोक म्हणू लागले आहेत. या टीकेचा अर्थ एवढाच की, शिक्षक म्हणजे विविध विषयांची माहिती पुरवणारे एक मशीन, एवढ्यापुरताच सीमित आहे, असे ही मंडळी गृहीत धरीत आहेत. भारतीयांची शिक्षकाविषयीची धारणा अगदी वेगळी आहे. शिक्षकाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदी भिन्न आहे. शिक्षकाकडे पाहून आदर्श जीवनाचे पाठ समाजाने गिरवावे अशी आचरणाची त्यांच्याकडून त्यामुळेच अपेक्षा.

आचारवान तो आचार्य

शिक्षकाला पूर्वी आचार्य म्हणत ते यामुळेच. आचार्य म्हणजे आचारवान ! स्वतः आदर्श जीवन आचरून राष्ट्राकडून ते आचरवून घेणारा तो आचार्य ! अशा आचार्यांच्या कर्तृत्वानेच राष्ट्रे निर्माण झालेली आहेत. आज हिन्दुस्थानची नवीन घडी बसवायची आहे. राष्ट्र-निर्माणाचे काम आज आपल्यापुढे आहे. आचारवान शिक्षकाशिवाय ते होणार नाही.[१२] साहजिकच टेलिव्हिजन, रेडिओ या सारखी ज्ञानाची साधने शिक्षकाची जागा कधीही घेऊ शकणार नाहीत. प्रख्यात शिक्षणशास्त्रज्ञ श्री. जीन थॉमस[१३] शिक्षकाचे समाजातील महत्वपूर्ण स्थानाविषयी विवेचन करतांना एका लेखात लिहितात.

" But ultimately the successful outcome of this tremendous effort is based on one factor, the competence and devotion of men and women whose profession is to teach. A good teacher can enhance the value of education, a bad one can jeopardize it. "

अध्यापक हा विद्यार्थी घडविण्याचा साचा

विद्यार्थी मूलतः अत्यंत अनुकरणशील असतो. शिक्षकांचा जसा आदर्श त्यांच्यापुढे असेल तसे त्यांचे जीवन घडविले जाते. अध्यापक म्हणजे जणू विद्यार्थी घडविण्याचा साचा ! तो जितका दोषरहीत व सुंदर असेल तेवढे भावी नागरिकांचे जीवनही सुंदर होणार![१४] नेहमीच्या कांही विषयाचे केवळ बौद्धिक ज्ञान द्यावयाचे झाले तर अध्यापकाच्या

बौद्धिक पात्रतेचे व व्यासंगाचे महत्व अधिक राहील. परंतु आध्यात्मिक शिक्षंणदेणाऱ्या शिक्षकात आपल्या विषयातील पारंगतता तर हवीच; शिवाय त्याच्याकडून शुद्ध आचरणाचीही अपेक्षा राहीलच. कारण "दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान व आपण कोरडे पाषाण," ही शिक्षंकांची स्थिती विद्यार्थीजीवनावर कदापि प्रभाव टाकू शकत नाही. म्हणूनच आज सर्वच शिक्षक या कार्याला लायक आहेत, असे हमखास म्हणता येणार नाही आणि त्यात अस्वाभाविक असेही काही नाही.

It is not even as true to say that all teachers can give beneficial moral lessons to-day as it would be to say that all can give beneficial lessons in the higher mathematics swimming, or political economy.

हे एका लेखकाने[१५] काढलेले उद्‌गार खरे आहेत. मात्र इच्छा असेल अशा शिक्षकांना या कार्यासाठी शिक्षंण देऊन तयार करणे काही अवघड नाही.

इंग्रजी शिक्षणाने घडविलेला शिक्षक दोषपूर्ण

आजच्या शिक्षकांच्या बाबतीत एक गोष्ट या संदर्भात लक्षात घ्यावयास हवी. दुर्दैवाने गेल्या १५० वर्षाच्या इंग्रजी गुलामगिरीच्या काळांत भारतीय जीवन पद्धतीशी पूर्णपणे विसंगत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीद्वारा तयार झालेली पारतंत्र्यातील तरूण सुशिक्षित पिढीच आज स्वातंत्र्यकाळात अध्यापकाचे कार्य करीत असल्यामुळे, अध्यापकांच्या आजच्या पिढीची भारतीय संस्कृती व परंपरा यांच्याशी फारकत झाली आहे, असे म्हटले तर अतिशयोक्तीचे होणार नाही. भारतीय जीवनादर्शाचे जेथे साधे बौद्धिकज्ञान नाही, तेथे तो आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणणे दूरच! परिणामत: काही अध्यापकांना पाश्चात्य भौतिक ज्ञानाची वा साम्यवादी तत्वज्ञानाची भुरळ पडून स्वत:च्या भारतीय विचारसरणीबद्दल त्यांच्या मनात दुर्दैवाने एक प्रकारची अढी किंवा विकल्प उत्पन्न झालेला दिसतो. अर्थात या खेदजनक परिस्थितीचे खापर अध्यापकांच्या डोक्यावर फोडता येणार नाही ! त्यांना मिळालेल्या शिक्षणाचा तो प्रामुख्याने परिपाक आहे. असेच म्हणावे लागेल.

विहीरीत नाही मग पोहऱ्यात कोठून ?

परंतु अध्यापकांची आजची ही मानसिक स्थिती अाध्यात्मिक शिक्षणाची योजना आखतांना दृष्टीआड करता येणार नाही. विहीरीतच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार ? या म्हणीप्रमाणे असे शिक्षण ज्या अध्यापकांच्या द्वारे करायचे त्यांची आचारविचारांची बैठक भक्कम पायावर आधारल्याशिवाय या योजनेतून काही विशेष निष्पन्न होईल अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थ ठरेल. सर ऑलिव्हर लॉज[१६] याने म्हटले आहे.

" Aspirations cannot be realized by a pupil unless the teacher genuinely feels them first. Not every teacher is likely to feel them but then not every teacher will feel competent for moral instruction. "

नैतिक शिक्षण देण्याची अंत:करणापासून आच असल्याशिवाय शिक्षकाकडून हे कार्य होण्याची शक्यता नाही. थोडक्यात म्हणजे अशी योजना कार्यान्वित करण्यासाठी विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी प्रथम अध्यापक तयार केले पाहिजेत. यंत्रे तयार करण्यासाठी यंत्रांचे उत्पादन करणारे मूलभूत उद्योग (*Key or Basic Industries*) ज्याप्रमाणे औद्योगिकरणासाठी प्रथम उघडावे लागतात त्याप्रमाणे विद्यार्थी घडविणारे शिक्षक घडविण्याचे कार्य आपणास प्रथम अंगीकारावे लागेल.

शिक्षक घडविण्यास शिबिरांचे आयोजन

शारीरिक शिक्षणाचा विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण केल्याशिवाय शारीरिक शिक्षक (*P. T. I.*) आपणांस नेमता येत नाहीत. साध्या व्यवसायांची माहिती देण्यासाठी आपण *Diploma in Vocational Guidance* सारखे अभ्यासक्रम सुरू करतो, मग विद्यार्थ्यांच्या अंत:करणात सुसंस्कार करून जीवनमूल्यांची निर्मिती करणारे नैतिक शिक्षण शिक्षकाची विशेष तयारी करून घेतल्याशिवाय कसे देता येईल ? विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे दिवाळी व उन्हाळ्याच्या सुटीत अभ्यासक्रमातील विविध विषयांसाठी देशभर ज्या प्रमाणे अभ्यासवर्गाचे आयोजन (उदा:- गणित, पदार्थ विज्ञान इत्यादिंची उन्हाळी शिबिरे) तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे महिनाभर केले जाते, त्याच धर्तीवर विद्यापीठ अनुदान मंडळ

वा विद्यापीठ यांच्यातर्फे आध्यात्मिक शिक्षणासाठी शिबिरे का आयोजित केली जाऊ नयेत ?

शिबिराची सुसूत्र व योजनाबद्ध आखणी

मात्र अध्यापकांच्या निवडीपासून तो तहत शिबिराच्या समारोपाच्या अंतिम कार्यक्रमापर्यंत सर्व लहानमोठ्या गोष्टींची सुसूत्र योजनाबद्ध व हेतुपूर्वक आखणी असावयास हवी. विशेषत: अशा शिबिरासाठी अध्यापकांची निवड फार काळजीपूर्वक केली जावी. छात्र सेनेच्या *(N. C. C.)* अध्यापकाची निवड करतांना जशी शारीरिक पात्रतेसाठी किमान कसोटया ठरविल्या असतात तशा काटेकोर बाबी जरी याबाबतीत नमूद करणे अवघड असले तरी अध्यापकांना प्रत्यक्ष मुलाखतीला बोलावून कौश्यल्याने ही निवड करता येईल. प्रश्नावली *(Questionnaire)* भरावयास लाऊनही शिक्षकाचे मानसिक प्रतिबिंब स्पष्ट होण्यास मदत होऊ शकेल. शिबिरातील महिनाभराचा दिनक्रमसुद्धा अध्यापकांच्या सुप्त आध्यात्मिक प्रवृत्तीला व आवडीला वृद्धिगत व वाव देणारा असला पाहिजे. उदा : पहाटे प्रात:स्मरणाने दैनिक कार्यक्रमाचा प्रारंभ होऊन सामुहिक प्रार्थनेने त्याचा शेवट व्हावा. आठवड्यातून निदान दोन दिवस आत्म-संशोधनपर कार्यक्रम ठेवावा. स्काउट व एच्.एच्. क्लब *(Head, Heart, Hand & Help)* या संस्थेतील काही अनुकरणीय बाबी उचलता येतील. विद्यार्थी पुढे जसा व्हावा असे आपल्याला वाटते तसे आचरण अशा शिबिरातून प्रत्यक्ष शिक्षकाकडून अपेक्षिले जावे. साहजिकच सिनेमा, तमाशा, सिगारेट, तंबाखू ह्या सारख्या व्यसनांना अशा शिबिरात पूर्णपणे बंदी राहील. सद्साहित्याशिवाय अन्य ग्रंथाच्या वा मासिकांच्या वाचनावर निर्बंध राहील ! भोजनही साधे सात्विक असेच देण्यात येईल. थोडक्यात म्हणजे एखाद्या पारमार्थिक साधकाचे जसे संयमित व सात्विक जीवन असते तसे जीवन शिबिरात अध्यापकांनी अनुभवावे अशी एकूण योजना असावी ! देशात होणाऱ्या सर्व शिबिरांतील कार्यक्रम व नियम अगदी एकसारखे असावेत असे कुणीच म्हणणार नाही. स्थल काल व परिस्थितीनुसार वेगवेगळ्या प्रांतातील रीतीरिवाज व

आवश्यकता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे जीवन सुधारण्यास निघालेल्या शिक्षकाचे जीवन यथाशक्ती घडवायचे आहे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमांचे आयोजन करावे लागेल !

मानसिक पार्श्वभूमीसाठी प्रेरक व्यक्ती

शिबिराचा हा झाला बाह्य आवरणाबद्दलचा विचार. खरा शिबिराचा हेतू शिक्षकांची मानसिक तयारी आध्यात्मिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने करून घेणे, हाच आहे. हा हेतू साध्य होण्यासाठी काही निवडक व प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने उपयुक्त होतील अशी व्याख्याने, चर्चा, परिसंवाद ग्रंथ वाचन इ. कार्यक्रम प्रभावीरित्या योजावे लागतील. यांची सविस्तर कागदी योजना आखणे सुलभ आहे, परंतु शिक्षकांची वैचारिक बैठक मजबूत करून त्यांना कार्यप्रवण करण्यासाठी लागणारी प्रेरणा प्रदान करू शकतील अशा आदर्श आचरणाच्या व तनमनपूर्वक या कार्यात सहभागी होण्यास उत्सुक असलेल्या व्यक्ती उपलब्ध होणे आवश्यक आहे. फार नाही तरी अशा चारदोन व्यक्ती प्रत्येक माध्यमिक बोर्डातून व विद्यापीठातून आपणास जागोजाग आढळतील. त्या त्या भागात शिबिरातील ही महत्वाची बाजू सांभाळण्यास पुरेशी मंडळी उपलब्ध झाल्यास उत्तमच.

श्रीरामकृष्ण आश्रमास आवाहन

पण ही संख्या आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास अशा अधिकारी व्यक्तींची उणीव दूर करण्यास एक मार्ग उपलब्ध आहे नि तो म्हणजे स्वामी विवेकानंदांनी देशभर स्थापन केलेल्या श्रीरामकृष्ण आश्रमातील साधक संन्याश्यांना शिबिराच्या मार्गदर्शनासाठी आग्रहपूर्वक आवाहन करणे. ते या सत्कार्यासाठी केलेल्या आवाहनाला योग्य तो प्रतिसाद खचित देतील असा विश्वास वाटतो. श्रीरामकृष्णांच्या एका विशिष्ट संप्रदायाचेच तिथे प्रतिपादन होईल अशी भीति काहीजण व्यक्त करतील. परंतु सर्वधर्मसमानता हे या आश्रमांचे तर मुख्य ब्रीदवाक्य. परमत-सहिष्णुता हे या मार्गाचे मूलभूत तत्त्व ! तेव्हा एखाद्या विशिष्ट पंथाचा प्रचार होण्याची या आश्रमवासियांकडून शंका देखील बाळगू नये.

उलट या सन्यांशांच्या सहवासाने व अधिकारवाणीने केलेल्या विषय प्रतिपादनामुळे अध्यापकांच्या जीवनावर एक कायमचा प्रभावी असा ठसा उमटल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या उपस्थितीने मंगल, पवित्र नि उद्दात्त असे वातावरण उत्पन्न होण्यास मदत होईल. मनातील अनेक शंका दूर होतील. अशा तरूण संन्याशाकडे पाहून, मिशनऱ्यांचा उत्साह नि तळमळ शिक्षकांच्या अंगी संचरेल. ईशप्राप्तीसाठी वाहिलेले जीवन प्रत्यक्ष जवळून पहावयास मिळून अशा श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवन-प्रकाशात आपण आपले व विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळू शकू, असा आत्मविश्वास शिक्षकास वाटू लागेल.

(४) माध्यमिक बोर्ड व विद्यापीठ यात या योजनेला स्वतंत्र स्थान नसणे.

स्वतंत्र अभ्यास–मंडळ

शाळा व महाविद्यालये यातील शिक्षण ज्या मध्यवर्ती संस्थेकडून नियंत्रित होते, त्या माध्यमिक शिक्षण मंडळ व विश्वविद्यालय यांच्या स्तरावर आध्यात्मिक व नैतिक शिक्षण योजनेचे नियमन व्हावयास हवे. या शिक्षणात सुसूत्रता व सामंज़स्य *(Uniformity and Coordination)* प्रस्थापित होण्यास अशा मंडळाने व विश्वविद्यालयाने पुढाकार घ्यावयास पाहिजे. विविध विषयांच्या अभ्यासाचे नियंत्रण त्या विषयाचा अभ्यासक्रम (*Syllabus*) प्रसिद्ध करून व प्रश्नपत्रिका काढून आणि नियमित परीक्षा घेऊन त्या त्या विषयांचे अभ्यास मंडळ (*Board of Studies*) करीत असते. त्याचप्रमाणे नैतिक योजनेत आवश्यक ती एकवाक्यता उत्पन्न व्हावी म्हणून या शिक्षणासाठी एक अभ्यास मंडळ प्रत्येक माध्यमिक शिक्षण मंडळ व विश्वविद्यालय यांनी स्थापन करावे.

अनुभवाने अडचणींचे निराकरण

अशा अभ्यास मंडळात विविध शाळा व महाविद्यालये यातील या विषयाचा सखोल अभ्यास केलेली तज्ञ व अनुभवी मंडळी समाविष्ट करावी. या अभ्यास मंडळांनी शाळा व महाविद्यालये यांच्या विविध अवस्थांसाठी (*Various stages of Education*) त्यांना झेपेल असा

अभ्यासक्रम आखून द्यावा. या दैनंदिन अभ्यासक्रमाव्यतिरिक्त हे शिक्षण परिणामकारक व्हावे यासाठी अन्य कोणते नैमित्तिक कार्यक्रम *(Periodical Programmes)* शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आंखता येतील याबाबत व्यवहार्य नि सुस्पष्ट सूचना अभ्यास मंडळाने कराव्यात. असा एक अभ्यासक्रम व त्याला पोषक असे कार्यक्रम यांचा एक स्थूल आराखडा पुढे एका वेगळ्या प्रकरणात सादर केला आहे. दरवर्षीच्या अनुभवाने आवश्यक तो फेरबदल करीत गेल्यास ५–७ वर्षांच्या अनुभवानंतर या अभ्यासक्रमाला पुष्कळच स्थायी असे स्वरूप येऊ शकेल. काही वर्षे नियमितपणे हा अभ्यासक्रम सर्व शाळा व कॉलेज यांत शिकविला व इतर सुचविलेले कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले, तर ही योजना शिक्षक व विद्यार्थी यांच्या इतकी अंगवळणी पडेल की, आज हा प्रयोग सुरू होण्यापूर्वी या शिक्षणात ज्या अनेक अडचणी व आक्षेप येतील असे वाटते, त्यांचे पाहता पाहता निराकरण होऊन जाईल.

योजनेसाठी स्वतंत्र विभाग

आम्हाला तर पुढे जाऊन असेही सुचवावेसे वाटते की, एकदा असे अभ्यासक्रम सर्व शिक्षण संस्थातून सुरू झाले की, माध्यमिक शिक्षण मंडळ व विश्वविद्यालये यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकून आपल्या कार्यालयात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेसाठी एक वेगळा विभाग उघडावा. त्याचा प्रमुख म्हणून कार्याची गोडी असलेला एखादा कल्पक व बुद्धिमान प्रशासक, संचालक *(Director or Registrar for Spritual & moral Studies* अशी उपाधि देऊन) म्हणून नेमावा. एक लेखापाल दोन लिपीक, एक टंकलेखक दोन चपराशी असा गरजेप्रमाणे कार्यालयीन संच त्याला उपलब्ध व्हावा. एखादी जीप वा तत्सम वाहन त्याचेकडे सुपूर्त करावे. दूरध्वनिक्षेपक, टेपरेकॉर्डर, चलचित्रपट दाखविणारे यंत्र यासारखी शिक्षणास सहाय्यभूत होतील अशी अद्यावत साधने या विभागाला पुरवावीत. त्यांच्याकडे सोपविलेली कार्ये पार पाडण्यास एवढ्या साधनांची किमान आवश्यकता आहे.

विभागाच्या कार्याची त्रिसूत्री

अशा रीतीने स्थापन झालेल्या विभागाचे कार्य तीन प्रकारचे राहील. या प्रत्येक कार्याचा आपण स्थूलमानाने विचार करू.

(अ) आध्यात्मिक शिक्षण योजनेची अंमलबजावणी

(*Implementation of the Spiritual Education Scheme*)

अभ्यास मंडळाने आखन दिलेला अभ्यासक्रम संस्थांद्वारे कसा नि कितपत अंमलात येत आहे यावर देखरेख ठेवणे आवश्यक आहे. तिमाही व सहामाही अहवाल प्रत्येक संस्थाकडून मागविणे, त्यांना काही अडचणी येत असल्या, अभ्यासक्रमाबाबत काही शंका उद्‌भवल्या तर त्यांचे निराकरण करणे, वर्षअखेर अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांवर झालेल्या परिणामांचे मूल्यांकन (*Evaluation*) करणे, व त्या संदर्भात अभ्यास मंडळाच्या सभा बोलावून अभ्यासक्रमांत आवश्यक तो फेरबदल करून या शिक्षणात हळूहळू पूर्णता आणणे इ. गोष्टी पहिल्या भागात येतील.

या योजनेच्या अमलबजावणीसाठी होणारा जमाखर्च व विविध शिक्षण संस्थाशी होणारा पत्रव्यवहार सांभाळणे ही कामे या विभागाकडेच राहतील.

(ब) शैक्षणिक संस्थाना प्रोत्साहनपर भेटी

मागे आवर्जून लिहिल्याप्रमाणे केवळ विशिष्ट कालावधीत विशिष्ट अभ्यासक्रम विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घेण्याने या योजनेचे अपेक्षित फल आपल्या पदरात कधीच पडण्याचा संभव नाही. या नेमून दिलेल्या अभ्यासा इतकेच, किंबहुना कांकणभर जास्तच महत्व, या अभ्यासास पूरक अशा अवांतर कार्यक्रमांना द्यावयास हवे. (त्याचे सविस्तर विवेचन स्वतंत्र प्रकरणात केले आहे.) कारण नैतिकता ही केवळ बुद्धीने समजावून घेण्याची बाब नसून ती विविध मार्गाने दैनंदिन आचरणात प्रगट झाली पाहिजे. अन्यथा आज ज्याप्रमाणे मोठमोठया तत्वांचा पुरस्कार अनेकजण करतांना आढळतात; परंतु त्याचा त्यांच्या वागण्याशी मुळीही संबंध नसतो, तसेच आपल्या विद्यार्थ्यांचेही व्हावयाचे. नैतिक मूल्ये त्यांना तोंडपाठ होतील व त्या विषयात त्यांना प्रथम श्रेणीचे गुणही मिळतील पण त्यांचे आचरण मात्र तृतीय श्रेणीचे असले तर त्याचा कितीसा उपयोग ?

अशी क्रियेवीण वाचाळता व्यर्थ होवू नये म्हणून अभ्यासव्यतिरिक्त ज्या कार्यक्रमांचे आयोजन अभ्यास मंडळाने पुरस्कारिले असेल त्यांचे संचालन कसे होते हे संचालकाने समक्ष जाऊन पाहिले पाहिजे. कधी आधीपासून योजून तर कधी अनपेक्षित भेटी देऊन या कार्यक्रमाची पाहणी केली पाहिजे. या पाहाणीत त्यांना आढळलेले दोष दाखवून ते दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला पाहिजे. विविध ठिकाणी पाहिलेले अभिनव व अनुकरणीय कार्यक्रम त्यांनी इतर संस्थाना सुचविले पाहिजेत. वर्षातून प्रत्येक संस्थेला निदान दोन वेळा तरी संचालकाने भेट दिली पाहिजे. अशा भेटीत संचालकाने या योजनेत सहभागी होणाऱ्या अध्यापकांशी हितगुज केले पाहिजे. त्यांना योग्य ते मार्गदर्शन व उत्तेजन दिले पाहिजे. याशिवाय या विभागाकडून विद्यार्थ्यांसमोर भाषणे, परिसंवाद, चर्चा इ. चे आयोजन करावयास हवे. टेपरेकॉर्ड केलेले अन्य शाळातील स्फूर्तिप्रद कार्यक्रमही त्यांना ऐकवता येतील. उदा:–सामूहिक राष्ट्रीय गीत, पोवाडा, कथाकथन इत्यादि.

(क) नैतिक शिक्षणाची प्रचार आघाडी (*Propoganda Compaign*) उघडणे.

आकर्षक व प्रेरक कार्यक्रमांच्या टेपरेकॉर्डस्

तसेच शिक्षण संस्था व्यतिरिक्त अन्य ठिकाणी प्रसंगोपात्त काही फार सुरेख कार्यक्रम मोठ्या शहरी होत असतात. हे कार्यक्रम त्याच शहरी पुन: ऐकायला मिळत नाहीत. ग्रामीण भागात तर असे कार्यक्रम फारच दुर्मिळ. उदाहरणच द्यायचे झाले तर श्रीरामकृष्ण आश्रमात दर शुद्ध एकादशीला होणारे रामनाम, सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या ऐतिहासीक प्रसंगावरील भाषणे, स्वामी चिन्मयानंदाची 'भज गोविंदम्' वा 'गीतेवरील प्रवचने' यासारखे कार्यक्रम टेारेकॉर्ड करून ठेवावेत. विविध शाळा नि महाविद्यालयातून सर्व विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण विभागाकडून या रेकॉर्डस् ऐकविल्या गेल्या तर तो एक आकर्षक कार्यक्रम झाल्याशिवाय राहणार नाही. अशा कार्यक्रमांच्या योजनेत थोडी कल्पकता उपयोगात आणली तर या कार्यक्रमांना शिक्षण संस्थातून एवढी प्रचंड मागणी येईल की ती पुरविण्यासाठी या

विभागाला तंत्रज्ञांचा अशा कार्यासाठी एक वेगळा ताफाच पोसावा लागेल. अशा प्रत्येक कार्यक्रमासाठी संस्थेवर थोडे शुल्क आकारले तर या कार्यक्रमाप्रित्यर्थ येणारा पुष्कळसा खर्च वसूल होऊ शकेल.

संस्कारक्षम चित्रपटांची निर्मिती

या शिक्षणाला पूरक असे आकर्षक व संस्कारक्षम चलचित्रपट मुद्दाम तयार करवून घेतले व ते मधून मधून शिक्षण संस्थातून प्रदर्शित करण्याची व्यवस्था केली तर.....तर आजच्या पाश्चात्य वळणावर गेलेल्या भडक चित्रपटांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला लागणाऱ्या अनिष्ट वळणाला केवढा तरी आळा बसेल ! बऱ्याच खर्चाची ही कल्पना आहे खरी. परंतु आजच्या कामुक नि गुन्हेगारी प्रवृत्तीला अधिकच भडकवणाऱ्या चित्रपटावर बंदी घालण्यास असमर्थ ठरलेल्या सरकारने ह्या रूपेरी सृष्टीपासून भावी पिढी वाचविण्यासाठी एवढा खर्च सोसला पाहिजे. केवळ "चित्रपट पाहू नका" असा नकारात्मक उपदेश आजच्या उगवत्या पिढीला करून भागणार नाही. असा नन्नाचा पाढा वाचून ते आपले ऐकणारही नाहीत. त्यांनी त्या ऐवजी काय पहावे हे आपल्याला सांगता आले पाहिजे. चालू वाईट सिनेमा ऐवजी अमुक चांगला सिनेमा पहा असे त्यांना सांगता यावयास हवे. अशा हेतुत:निर्माण केलेल्या चित्रपटांनी आपण विद्यार्थ्यांना वैकल्पिक करमणूक (*Alternative Entertainment*) देऊ शकू.

सत्प्रवृत्तीस प्रोत्साहक चित्रपटांचा पुरवठा

अशी दुसरी करमणूक आपण या ध्येयनिष्ठ चित्रपटांद्वारे देऊ शकलो तर केवढी तरी समस्या सोडविण्याचे श्रेय शासन घेऊ शकेल! या योजनेच्या सुरवातीला पहिली काही वर्षे असे सुसंस्कारक्षम चित्रपट तयार करणे शक्य नसेल, तर काही निवडक चांगले चित्रपट नैतिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या या विभागांना विनामूल्य पुरवावे. काही उदात्त आणि परोपकाराची भावना जागविणारे सामाजिक चित्रपट, देशभक्तीची शिकवण देणारे "उपकार" व "नया दौर" सारखे चित्रपट व थोर पुरुषांचे स्फूर्तिदायक जीवन रंगविणारे 'महाप्रभू चैतन्य', संत तुकाराम, 'देशगौरव सुभाषचंद्र बोस' या सारखे चित्रपट जर सर्व शाळा महाविद्याल-

यातील विद्यार्थ्यांच्या मधून मधून पाहण्यात आले तर आज त्यांची चित्रपट पहाण्याची हौस तर भागेलच शिवाय आज भोगप्रवृत्ती वाढविणाऱ्या चित्रपटांनी बिघडविलेली त्यांची चव सुधारून त्यांच्या कोमल मनावर देशप्रेम, संयम, त्याग, भक्ती इत्यादी सात्विक गुणांचा केवढा तरी सुसंस्कार उमटेल ! आज नवयुवकांच्या जिभांवर नित्य खेळणारी पाश्चात्य तालासुरावरची प्रियकर प्रेयसीच्या मोहब्बतीची गाणी नाहीशी होऊन, त्याऐवजी देशभक्तीने रसरसलेली राष्ट्रगीते व भगवद्भक्तीने ओथंबलेली संतांची प्रासादिक वाणी त्यांच्या जिभेवर नाचू लागेल. यौवनांत अनुभवावयाची देशभक्तांची साहसी वीरवृत्ती व देवभक्तांची निर्भय नि निरपेक्ष प्रेमवृत्ती त्यांना चाखता येईल. एकदा का अशा निस्पृह नि निरहंकारी जीवनाची गोडी त्यांनी अनुभवली म्हणजे जगाच्या पाठीवरील कोणतीही शक्ती त्यांना अशा उच्च जीवनापासून अधःपतित करू शकणार नाही. त्यांच्या पवित्र जीवनाचा असा वर्धिष्णु आलेख नित्य उंचावत जावा यासाठी टेपरेकॉर्डर व चलचित्रपट या सारखी अद्यावत साधने कल्पनातीत उपयुक्त आहेत. म्हणून या मुद्याचे एवढे सविस्तर विवेचन

(५) प्राथमिक शिक्षणापासून तहत उच्च शिक्षणापर्यन्त सुसूत्र अशा शिक्षणाचा अभाव

टिकाऊपणासाठी पदवी परिक्षेपर्यंत शिक्षण

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा पाया मजबूत करून त्यावे होणारे सुपरिणाम दीर्घंकाल टिकावे असे वाटत असेल तर हे शिक्षण वयाच्या वा शिक्षणाच्या एका विशिष्ट अवस्थेपुरते मर्यादित ठेवून भागणार नाही. त्याची व्याप्ती आपणास प्राथमिक शिक्षणापासून तो थेट पदवी शिक्षणापर्यंत वाढविली पाहिजे. पदवी परिक्षेनंतर हे शिक्षण न दिले गेले तरी चालण्यासारखे आहे. त्याची मुख्य कारणे दोन. एक तर पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असते. दुसरे असे की प्राथमिक शाळेपासून पदवी परिक्षेपर्यन्त सुमारे १४ वर्षे संस्कारक्षम अशा वयाच्या म्हणजे सुमारे २० व्या वर्षापर्यंत हे शिक्षण मिळाल्यावर पुढे त्याची तितकीशी गरज राहात नाही. पुरेशी वैचारिक परिपक्वता

विद्यार्थ्यांत आलेली असते. मात्र शिक्षणाच्या सर्व पातळीवर असे शिक्षण दिल्याशिवाय ते टिकाऊ नि प्रभावी ठरणार नाही.

सुरूवात बालक – मंदिरापासूनच

वस्तुत: बालकांच्या बालक मंदिरापासूनच *(Montesory and Kindergarden Schools)* नैतिक शिक्षणाला सुरुवात व्हायला पाहिजे. कारण आधुनिक मानसशास्त्रज्ञांच्या मते विद्यार्थी जन्मापासूनच शिकत असतो. मानसशास्त्र तर पुढे जाऊन असे सांगते की, बालक वयाच्या ५ ते ७ वर्षांपर्यंत जे काही बरे वाईट संस्कार ग्रहण करते ते इतके प्रभावी असतात की पुढे आयुष्यभर मिळविलेले संस्कार त्यापुढे अगदीच गौण ठरतात. पहिल्या ५ ते ७ वर्षांत अंत:करणावर सृष्टीचा उमटलेला ठसा पुढे आयुष्यभर कधीही पुसला जात नाही.

ना. गोखले यांचे उदाहरण

या दृष्टीने एखादी सूचक घटना सांगावयाची झाली तर ती नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची देता येईल. असे सांगतात की, त्यांच्या मातोश्रींनी त्यांना लहाणपणी घरातील दुधदुभत्याच्या एका भल्या मोठ्या कपाटात शिक्षा म्हणून कोंडून ठेवले. त्या कपाटात आधीच एक मांजर लपून बसले होते. ते डोळे वटारून लहानग्या गोपाळावर गुरूगुरू लागले. साहजिकच हातपाय चोरून अत्यंत भयकंपित अशा अवस्थेत गोपाळला काही काळ काढावा लागला. गोपाळाच्या शिक्षेच्या त्या अल्पावधीत गुरगुरणाऱ्या त्या मांजराचा गोपाळच्या बालमनावर असा काही परिणाम झाला की, इंग्रजी सत्तेशी टक्कर देण्याचे धाडस करणारे नामदार गोखले मोठेपणी सुद्धा मांजराला मात्र भीत असत. असा असतो बाल मनावरचा अमिट संस्कार!

गर्भधारणेपासून संस्कारधारणा

बालकाच्या अपक्व मनाची ही घडण लक्षात घेऊनच बहुधा भारतीय शास्त्रकारांनी षोडश संस्कारापैकी, गर्भाधानापासून उपनयना-पर्यन्तचे, ७ संस्कार बालवयातच करावयास सांगितले आहेत. बालकाच्या जन्मापूर्वी ते आईच्या गर्भात असतांना करावयाचे संस्कारच तर मुळी चार आहेत. या सर्व संस्कारांचे संस्कृत मंत्र व त्यामागची पार्श्वभूमी पाहिली म्हणजे असे वाटते की, आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी मानवी

गौण अडचणी

आतापर्यंत मागील प्रकरणात विचारात घेतलेल्या अडचणी काहीशा मूलभूत स्वरूपाच्या होत्या. या योजनेच्या अंमलबजावणीशी ज्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो अशा शासक, चालक, शिक्षक, विद्यापीठ, माध्यमिक शिक्षण मंडळ या प्रमुख घटकांच्या बाबतीत उद्‌भवणाऱ्या समस्यांचा उहापोह त्यांत केला. या सर्वांना आपण क्रियाशील वा प्रधान बाबी *(Active or Major factors)* म्हटले तर या प्रकरणात विवेचिल्या जाणाऱ्या बाबींना गौण बाबी *(Passive or minor Factors)* म्हणावे लागेल. अशा अडचणींची यादी बरीच मोठी होऊ शकेल पण आपण विचारात घेणार आहोत प्रातिनिधीक स्वरुपाच्या फक्त पाचच.

मागे उल्लेखिलेल्या या गौण अडचणींचा आपण आता क्रमशः विचार करू.

संदर्भ टीपा

१. *N. B. Sen : Glorious Thoughts On Education; p. 349.*

२. *F. W. Thomas : History and Prospects of British Education in India; p. 1.*

३. *Percival Wren : The Indian Tcacher's Giuide, p. 34.*

४. *Mahatma Gandhi : Harijan; 5–9–1934.*

५. अ. स. जोशी : नागपूर विश्वविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम– महाविद्यालयात नैतिक शिक्षणाचा प्रयोग; दै. तरूण-भारत, नागपूर दि. ६-६-१९६४ व दि. १३-६-१९६४.

६. प्रा. डी. जी. देशमुख : "एक अभिनंदनीय प्रयोग," दै. तरुण-भारत, नागपूर दि. १०-७-६४.

७. ब. ना. एकबोटे : प्राचार्यांचा पराक्रम नि उपक्रम; साप्ताहिक 'स्वदेश' यवतमाळ, दि १५-७-१९६४.

८ *Report of Secondary Education Commission; 1952-1953; p. 119.*

९. रा. द. रानडे : परमार्थपर व्याख्याने, पृ. ३५.

१०. श्री गुलाबराव महाराज : मणिमंजूषा; ११४.

११. विनोबाजी भावे : आचार्य कुल; पृ ३२.

१२. विनोबाजी भावे : शिक्षण विचार; पृ. १५.

१३. *Jean Thomas : A Fair Deal for the teacher; in "The Unesco Courier" Sept. 1966.*

१४. *Sir. Richard Livingstone : Some Tasks for Education; p. 49. See also Second Chapter : Education & the Training of Character; p. 25–50.*

१५. *Percival Wren : Indian School Organisation; p. 161.*

१६. *Quoted in Percival Wren : Indian School Organisation; p. 158.*

१७. महाभारत; वनपर्व, अष्टावक्र आख्यान, अध्याय १३२.

सहा

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेतील अडचणी व उपाय (उत्तरार्ध)

" यही माता पिता का कर्तव्य कर्म, परमधर्म और कीर्ति का काम हैं जो अपने सन्तानो को तन, मन, धन से विद्या, धर्म, सभ्यता और उत्तम शिक्षायुक्त करना। "

स्वामी दयानंद[1]

" I think everybody who has any influence whatsoever on the child has an obligation for developing moral-character. . . . I believe, moreover, that character built on a religious faith is likely to be stronger and finer than character that lacks such a foundation. "

Earnest M. Ligon[2]

गौण अडचणी

आतापर्यंत मागील प्रकरणात विचारात घेतलेल्या अडचणी काहीशा मूलभूत स्वरूपाच्या होत्या. या योजनेच्या अंमलबजावणीशी ज्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो अशा शासक, चालक, शिक्षक, विद्यापीठ, माध्यमिक शिक्षण मंडळ या प्रमुख घटकांच्या बाबतीत उद्‌भवणाऱ्या समस्यांचा उहापोह त्यांत केला. या सर्वांना आपण क्रियाशील वा प्रधान बाबी *(Active or Major factors)* म्हटले तर या प्रकरणात विवेचिल्या जाणाऱ्या बाबींना गौण बाबी *(Passive or minor Factors)* म्हणावे लागेल. अशा अडचणींची यादी बरीच मोठी होऊ शकेल पण आपण विचारात घेणार आहोत प्रातिनिधीक स्वरुपाच्या फक्त पाचच.

मागे उल्लेखिलेल्या या गौण अडचणींचा आपण आता क्रमशः विचार करू.

(६) विद्यार्थ्यांच्या विविध वयोमर्यादा व अवस्था यांना अनुसरून संस्कारक्षम व प्रेरक असे प्रभावी साहित्य उपलब्ध नसणे.

नैतिक शिक्षण पाठ्यपुस्तक समिती

मागील प्रकरणात सुचविल्याप्रमाणे प्राथमिक शाळेपासून पदवी परिक्षेपर्यन्त नैतिक शिक्षणाची योजना सर्वांना मान्य झाली, तर पहिली अडचण येईल ती संस्कारक्षम अशा साहित्याची. आज असे साहित्य आधीच फार दुर्मिळ ! शिवाय जे थोडे वाङमय उपलब्ध आहे, ते या योजनेच्या दृष्टिकोनातून शिक्षण-अवस्थेतील विविध वयोमर्यादेच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल, असे साहजिकच लिहिलेले नाही. काहीच नसण्यापेक्षा आज त्याचा उपयोग करणे बावगे नाही. पण नेहमीसाठी त्याची नैतिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठी शिफारस करणे योग्य ठरणार नाही.

माध्यमिक शिक्षण बोर्ड व विश्वविद्यालय यांनी प्रथम अशा वाङमय निर्मितीसाठी ' नैतिक शिक्षण पाठ्यपुस्तक समिती ' नेमावी. सर्वसाधारण स्थूल अभ्यासक्रमाची माहिती प्रसिद्ध करून विविध लेखकांना त्या अभ्यासक्रमावर आधारीत पुस्तकांची हस्तलिखिते सादर करण्यास आवाहन करावे. अशा पुस्तकांतून समितीने उत्तम पुस्तकांची निवड करावी किंवा समितीने स्वत:च पुढाकार घेऊन, अधिकारी व्यक्तींच्या सहाय्याने पुस्तके लिहवून घेऊन ती सर्वांना उपलब्ध करून द्यावीत.

योग्य पारितोषक व मोबदला

त्याचप्रमाणे सत्साहित्य निर्मितीस प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने एक कल्पना शासनास सुचवावीशी वाटते. ज्याप्रमाणे दरवर्षी अनेक राज्य-शासनाकडून काव्य, कादंबरी, विज्ञान इ. वाङमयातील विविध शाखांत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथास प्रोत्साहनपर अशी बक्षिसे दिली जातात त्याच-प्रमाणे आध्यात्मिक शिक्षणदृष्टया सर्वोत्कृष्ट साहित्य कलाकृतीला देखील पारितोषक जाहीर करावे. लेखकांना त्यामुळे उत्तेजन मिळू शकेल. महा-राष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति-मंडळाने देखील अशा ग्रंथांना आर्थिक सहाय्य देतांना प्राधान्य द्यावे.

सुमारे ८ ते १५ या वयोमर्यादेतील बालविद्यार्थ्यांसाठी सुबोध, सचित्र व संस्कारक्षम असे साहित्य आज फारसे उपलब्ध नाही. अशा साहित्य-निर्मितीत पुरेसा मोबदला मिळण्याची शक्यता नसल्याने प्रथितयश लेखक त्याकडे आकर्षित होत नाही. पू. साने गुरूजी प्रमाणे "करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे" ही भूमिका समोर ठेवून बाल-साहित्य निर्मिणारा ध्येयवेडा कथाकार विरळा ! गीताप्रेस (गोरखपूर) या खाजगी संस्थेने आकर्षक शैलीत बालकासाठी प्रसिद्ध केलेल्या स्वस्त किंमतीतील लहान लहान पुस्तकांचे प्रकाशन खरोखरी कौतुकास्पद आहे. त्यांचा खपही प्रचंड आहे. एक खाजगी संस्था जर यशस्विपणे (आर्थिक दृष्टचाही) असे बाल साहित्य निर्माण करू शकते, मग शासनाने मनावर घेतले तर सदाचरणाची सत्प्रेरणा देणाऱ्या सत्साहित्याचा सर्वत्र सुकाळ व्हायला कितीसा वेळ लागेल?

(७) पालकांच्या अपेक्षित सहकार्याचा अभाव.

सर्व वाईटाचे खापर शाळेवर

नैतिक शिक्षण योजनेद्वारा शिक्षण संस्थेमधील संपूर्ण वातावरण बदलण्याच्या अध्यापकाकडून होणाऱ्या प्रयत्नाला विद्यार्थ्यांच्या पालकांचे जाणीवपूर्वक सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. असे सहकार्य जेवढचा प्रमाणात उपलब्ध होईल तितक्या प्रमाणांत ही योजना यशस्वी होऊ शकेल. परंतु पालक चारित्र्यसंवर्धनातील आपला अमोल असा वाटा उचलीत नाहीत असा अनुभव आज सर्वत्र येतो. कुटुंब ही संस्था चारित्र्याचा केवढा प्रचंड ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणारी आहे ! पण दुर्दैवाने ती आज आपले कार्य करीनाशी झाली आहे.

विद्यार्थ्यासमक्ष वर्तन–एक कसोटी

शाळा कॉलेजाप्रमाणेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या कुटुंवात नैतिक गुणांचा परिपोष होईल अशीच सर्वांची वागणूक व वैचारिक धारणा असली, तर शिक्षणसंस्थेतील शिकवणुकीचा विद्यार्थ्यांच्या मनावर अधिक खोल ठसा उमटेल. विद्यार्थ्याचा दिवसातील फार मोठा काळ कुटुंब व शिक्षण संस्था यातील परिसरात जातो. या दोन क्षेत्रांशी संबंधित व्यक्ती व

वातावरण यांनी त्याचे व्यक्तीमत्व बव्हंशी घडविले जात असते. तेव्हा शिक्षणसंस्थेप्रमाणेच प्रत्येक कुटुंब म्हणजे सदाचरणाचे नि संस्कृतीचे चालते बोलते. केन्द्र असावयास पाहिजे. कुटुंबात नैतिकतेचा विकास कसा करता येतो हे आपण मागील एका प्रकरणात सविस्तर बघितलेच आहे. आदर्श वागणुकीचे एक साधे सोपे गमक मात्र या ठिकाणी सुचवावेसे वाटते. पालकाने वा शिक्षकाने आपल्या प्रत्येक कृतीला एक कसोटी लावून पहावी म्हणजे सहसा त्यांच्या वागण्यात चूक होणार नाही. पाल्य वा विद्यार्थ्याच्या दृष्टीला आपण आपल्या कृतींनी कसे दिसत असू? कसे समजले जात असू? आपल्या वागण्याने त्याला काय वाटेल? त्याचे काय मत बनेल? आपल्या वागण्याचा त्याच्या मनावर चांगला परिणाम होईल का? असा प्रश्न कोणतीही कृती करण्यापूर्वी स्वत:लाच विचारून त्याचे समाधानकारक उत्तर मनाला मिळाले पाहिजे. असा विचार करण्याची मनाला एकदा सवय झाली म्हणजे विद्यार्थी वा पाल्याच्या उपस्थितीत अध्यापकाचे वा पालकाचे वर्तन समाजाच्या शिष्ट-संमत अभिरुचीशी सहजपणे सुसंगत असे राहू लागेल; सभ्य व सुसंस्कृत होऊ लागेल.

अध्यापकापेक्षाही पालकावर अधिक जबाबदारी

अध्यापकापेक्षाही पालकावर आचरणाच्या बाबतीतली जवाबदारी काही अंशी अधिक आहे. कारण अध्यापक शाळा कॉलेजात विद्यार्थ्यां-समोर वावरतो तो अध्यापकाची भूमिका बजावण्याच्या पूर्ण तयारीने; आपल्या पेशाला आवश्यक असा मुखवटा चढवून, सर्व बाह्य आवरणाचे आच्छादन अंगावर घालून! त्यामुळे विद्यार्थी अध्यापकाला बघतात, ते प्रामुख्याने अध्यापकाच्या भूमिकेत ते शाळा कॉलेजात वावरत असतांनाच! अभ्यास-विषयाचे व नीतीचे धडे देत असतांना त्यांचे खाजगी कौटुंबिक व सामाजिक जीवन विद्यार्थ्यांच्या समोर नसते. साहजिकच शिक्षण संस्थात वावरतांना शिक्षकांचे वर्तन आदर्श असले म्हणजे विद्यार्थ्यांपुरते त्यांचे कर्तव्य त्यांनी पार पाडले असे एकवेळ म्हणता येऊ शकेल; पण पालकांचे बाबतीत तसे म्हणायची सोय नसते. त्यांचे अंतर्बाह्य वर्तन नित्य त्यांच्या पाल्यांसमोर असते. घरात नि घराबाहेर पालकांची

बरीवाईट वागणूक सतत त्यांच्या डोळ्यासमोर घडत असते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे वर्तन अगदी जवळून पाहण्याची संधी त्यांना उपलब्ध असते. पुष्कळवेळा आपल्या लक्षात येणार नाही इतक्या बारकाईने आपले निरीक्षण मुलांकडून सुरू असते. आपला पाल्य शाळा कॉलेजांतील वेळेपेक्षा अधिक वेळ कुटुंबात राहात असतो, ह्याचा पालकाला नेहमी विसर पडतो. हे सत्य जर त्याच्या ध्यानात आले तर अध्यापकाइतकेच, किंवहुना काकणभर अधिकच, संयमाने नि शहाणपणाने त्यांनी वागणे किती आवश्यक आहे हे त्यांना कळू शकेल. *" One good mother is worth hundred teachers "* या मार्मिक म्हणीचा मथितार्थ त्यांच्या लक्षात येऊ शकेल. अर्थात फार मोठ्या शहरांच्या बाबतीतच अध्यापक नि पालक यांच्या बावतीत हा भेद करावा लागेल. गाव जेवढे लहान तसतसा हा फरक करण्याची गरज कमी कमी होत जाते. कारण पालकाइतके नसले तरी अध्यापकाचे मोठ्या शहरी दृष्टीस न पडणारे शिक्षणसंस्थेबाहेरचे सार्वजनिक जीवन लहान गावी त्यांच्या सहजच नजरेस पडते. त्यामुळे अशा ग्रामीण वातावरणात शिक्षकाला पालकाइतकेच किंबहुना थोडे अधिकच शुद्ध आचरण ठेवावे लागते. कारण तो ज्ञानदाता असतो. उपदेशकर्ता म्हणून गावात मिरवीत असतो. आचार्य म्हणून त्याला सर्व नागरिक ओळखत असतात.

आतापावेतो आपण शिक्षक व विशेषत: पालक यांची तुलनात्मक जबाबदारी का व किती आहे याचे तात्विक विवेचन केले. आता पालकावरची ही जबाबदारी पार पाडण्यास काय करता येईल हा व्यावहारिक मुद्दा घेऊ.

संस्थेचा पालकाशी संपर्क

सर्वप्रथम नैतिक शिक्षण योजनेला पालकांकडून सहकार्य अपेक्षिण्यापूर्वी त्यांना या योजनेद्वारा चाललेल्या प्रयत्नांची स्थूलमानाने माहिती होणे आवश्यक आहे. तीन प्रकारांनी पालकांशी संपर्क साधणे शिक्षणसंस्थेला शक्य होईल. एक तर संस्थेच्या माहिती पत्रकांत *(Prospectus)* या योजनेची सारांशाने माहिती देता येईल. दुसरे म्हणजे विद्यार्थ्याला प्रवेश देतेवेळी त्यांच्या पालकासही मुलाखतीला बोलावून यावाबत त्यांच्या-

शी विचार–विनिमय करता येईल. पण लहान संस्थेतच (३०० ते ४०० विद्यार्थी असलेल्या) हे शक्य होईल. मोठ्या संस्थेत हे काम शिक्षकांत विभागता येईल. प्रत्येक शिक्षकाकडे २५-३० विद्यार्थ्यांचा गट करून जबाबदारी सोपविल्यास ते देखील त्यांच्या पालकांशी संपर्क ठेवून त्यांना या योजनेद्वारे चालू असलेल्या प्रयत्नांची माहिती देऊ शकतील. शिक्षण संस्थेत नैतिक शिक्षणद्वारा जे सुसंस्कार होत असतील. त्या अनुरोधाने पालकांनीही त्या संस्कारांचा परिणाम अधिक प्रभावी होईल, असे घरातील एकूण वातावरण ठेवावयास हवे. नाही तर देशातील थोर पुढाऱ्यांबद्दल व शिक्षकांबद्दल आदर बाळगण्याविषयी शिक्षक विद्यार्थ्यांना एकीकडे शिकविणार नि घरी कुटुंबातील वडील मंडळी पुढारी व शिक्षक ह्यांना शिव्या-शाप देऊन त्यांचा उद्धार करतांना विद्यार्थ्यांच्या रोज दृष्टीस पडणार ! शाळेत विद्यार्थ्यांना सत्याचे पाठ रोज दिले जातील, तर आईवडील रोज सत्याचे धिंडवडे काढतांना मुलांच्या दृष्टोत्पत्तीस येतील ! अशी जर विसंगती शाळेतील शिकवणुकीत नि कुटुंबातील मंडळींच्या प्रत्यक्ष आचरणात पदोपदी विद्यार्थ्यांना आढळली, तर त्याचा अनिष्ट असा परिणाम त्यांच्या जीवनावर झाल्याशिवाय खचित राहणार नाही.

सामंजस्यासाठी एकत्रित बैठकी

शिक्षणसंस्था व कुटुंब यामधील संस्कारांत व शिकवणुकीत परस्परपूरकता व सामंजस्य प्रस्थापित व्हावे यासाठी शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या त्रैमासिक बैठकी होणे अतिशय उपयुक्त ठरेल. या बैठकी, संस्था लहान असेल तर सर्वांच्या एकत्रित घेता येतील. संस्था फार मोठी असेल तर वर्गशः घेता येतील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांतून व कुटुंबातून काय प्रयत्न होतात हे शिक्षकांना व पालकांना, या बैठकीतील परस्पर चर्चेतून समजावून घेता येईल. या दोन्ही प्रमुख घटकांच्या, एकमेकांपासून कोणत्या अपेक्षा आहेत हे कळू शकेल. विद्यार्थ्याला सन्मार्गाला लावण्यासाठी पुढील बैठकीपर्यंतच्या, तीन महिन्याच्या कालखंडासाठी कोणत्या दिशेने प्रयत्न करावयाचे, हे निश्चित करता येऊ शकेल. आवश्यकता वाटल्यास बैठकीतील सुरवातीचा

काही वेळ, विद्यार्थी वगळून, केवळ शिक्षक व पालक यांच्या विचार-विनिमयासाठी राखून ठेवावा. विद्यार्थ्यांसमोर न चर्चिता येण्याजोग्या प्रश्नांचा उहापोह या वेळात करता येऊ शकेल.

पालक जेवढा अधिक सुशिक्षित नि पाल्याच्या हिताबद्दल जागरूक असेल त्या प्रमाणात अशा बैठकी अधिक यशस्वी होतील हे उघड आहे. ग्रामीण भागापेक्षा मोठ्या शहरात अशा उपक्रमांना अधिक प्रतिसाद त्यामुळेच मिळतो. वस्तुत: अशा बैठकींची अधिक आवश्यकता व उपयुक्तता असते ग्रामीण भागातच ! पण नेमकी या भागातील पालकांना याची जाणीव कमी असलेली अनुभवास येते.

(८) नैतिक मूल्यांच्या विपरीत घडणाऱ्या घटना व वागणाऱ्या व्यक्ती यांचा गौरव व सन्मान.

प्रतिष्ठेचे गमक – नीतिमत्ता

सर्वमान्य अशी जी नैतिक मूल्ये आहेत ती जेव्हा बिनदिक्कतपणे पायदळी तुडविली जातात, तेव्हा समाजाने गंभीरपणे त्यांची दखल घेऊन, अशा घटनांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या प्रतिष्ठेला धक्का बसेल अशी वागणूक जनतेकडून त्यांना मिळावयास हवी. आपली वागणूक विपरीत झाली तर सामाजिक दृष्टया आपल्या मोठेपणाला कमीपणा येतो अशी प्रचीती व्यक्तीला आली पाहिजे. मान्यता पावलेल्या सामाजिक नीतित्वांची पायमल्ली आपणाकडून झाली तर त्याबद्दल समाज आपल्याला क्षमा करणार नाही, याची जाणीव व्यक्तीला असली, तर सहसा तो त्या वाटेला जाणार नाही. मानवी जीवनमूल्ये झिडकारण्याचे साहस तो सहजपणे करणार नाही.

अनैतिकतेचा आदर ?

या उलट नैतिक मूल्यांच्या विपरीत वर्तनाचा जाब विचारणे तर दूरच पण समाज जर अशा व्यक्तीला शासन करण्याऐवजी बक्षिसे देऊ लागला, निंद्य समजण्याऐवजी वंद्य मानू लागला. तिची प्रतिष्ठा कमी होण्याऐवजी जर ती अधिक वृद्धिगत होऊ लागली, तर ? ..... तर समाजघातक अशा घटना नि त्या करणाऱ्या व्यक्ती यांची संख्या न वाढली तरच नवल! दुर्दैवाने नेमके हेच आज देशांत सर्वत्र घडते आहे. बहुतेक सर्व

लहानमोठ्या शहरात व खेडयात तथाकथित बडया मंडळींनी सामाजिक नीतिमत्ता पायदळी तुडवून त्याची लक्तरे सार्वजनिक जागी टांगलेली कुणासही सहज पाहता येण्यासारखी आहेत. काळाबाजार राजरोसपणे करणारा व्यापारी आपले काळेकुट्ट अंत:करण पांढऱ्या स्वच्छ कपडयांनी झाकून सर्वत्र पुढारी म्हणून मिरवतो आहे. लांच खाणारा सरकारी अधिकारी समाजाकडून मानाने मानवंदना स्वीकारतो आहे, गल्लीपासून दिल्लीपर्यन्त स्वार्थाने बरबटलेली पक्षोपक्षांची माणसे देशभक्त म्हणून मिरवित आहेत. पक्षांच्या स्वार्थांसाठी मजूरांना संप करायला उद्युक्त करणारे कुविख्यात मजूर पुढारी, प्रचंड उत्पादनाची हानी करूनही, कामगारहितकर्ते म्हणून प्रतिष्ठा पावत आहेत. कुठल्यातरी निवडणूकी-वर लक्ष ठेऊन स्वत:ला प्रसिद्धी मिळावी या हेतूने. क्षुल्लक प्रश्नावर समाजाला भडकवण्यात भूषण मानणारी माणसे. सुप्रसिद्ध जनसेवक (?) म्हणून सन्मानाचे हारतुरे स्वीकारत आहेत.

अनीतीचे अनुकरण

अशी दृश्ये आज पदोपदी सर्वत्र दिसून येत असल्यामुळे विद्यार्थी-वर्गावर त्याचा विपरीत परिणाम न झाला तरच नवल ! समाजात काय केले नि कसे वागले म्हणजे सन्मान, प्रतिष्ठा नि लौकिक मिळतो हे त्यांना अशा विपरीतपणे दिसत असल्याने, त्यांनी आपल्या जेष्ठांच्या अनैतिक वर्तणुकीचे जर अनुकरण केले, तर त्यात कसले आश्चर्य ? अनुकरणप्रिय विद्यार्थी आपल्या समाजश्रेष्ठींच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची हुबेहुब नक्कल करू लागला तर त्यांना दोष तरी कसा देता येईल ?

कॉलेज निवडणुकीचे उदाहरण

साधे महाविद्यालयातील निवडणुकीचे उदाहरण घ्या. देशात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीचे छोटे स्वरूप या कॉलेज निवडणुकीत पहावयास मिळते. मोठ्या निवडणुकींच्या बऱ्या वाईट अशा सर्व दोषांचे प्रतिबिंब कॉलेजात पडलेले दिसते. सर्व भिंती घोषणांनी रंगविणे, मतदारांना नेण्या आणण्यासाठी वाहनांचा वापर करणे, प्रभावी उमेदवाराला लांच देवून बसविणे, प्रचंड पैसा खाण्यापिण्यात खर्चकरणे, प्रसंगी उमेदवाराला पळविणे इ. सार्वजनिक निवडणुकांची सर्व प्रात्यक्षिके आपणास विद्यार्थ्यांच्या निव-

डणुकीत पहावयास सापडतात. परिणामतः खरा समाजसेवक ज्याप्रमाणे सामान्यतः सार्वत्रिक निवडणुकीत पराभूत होतो, त्याचप्रमाणे बुद्धिमान, गुणी नि सालस विद्यार्थ्यांना सर्वच बाबतीत, त्यांच्यापेक्षा कनिष्ठ प्रतीच्या विद्यार्थ्याकडून कॉलेज निवडणुकीत बहुधा पराभव पत्करावा लागतो. अनेक ठिकाणी तर गुंड नि गुंडपणा करण्यात कुख्यात असलेले विद्यार्थी प्रचंड विजय मिळवून विख्यात होतात. त्यांच्या बाष्कळ चाळ्यांना या यशामुळे अधिकच ऊत आल्यास त्यात काय आश्चर्य ? मोठ्या शहरातील एका प्रसिद्ध कॉलेजात विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचा (*Students representaive Council*) अध्यक्ष गेल्या कित्येक वर्षात विश्वविद्यालयीन परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झाल्याचे उदाहरण नाही. अशाच एका नापास झालेल्या विद्यार्थी अध्यक्षाची, निकालानंतर भेट झाली. तेव्हा त्याला नापास होण्याचे कारण विचारताच बिनदिक्कतपणे तो उद्गारला, "अहो आमच्या अध्यक्षपदाच्या उज्वल परंपरेला, साजेसेचे नाही का ते ? आमच्या पास होण्याने काळीमा लागला असता की आमच्या अध्यक्षपदाला ! " मला वाटते, या उत्तरावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

सच्चरित्र का व्हायचे ?

जीवनात आचार–विचारांची कनिष्ठ पातळी धारण करणारे विद्यार्थी वा समाजधुरीण यांना जेव्हा सर्वत्र खुर्ची नि हारतुरे मिळतात, तेव्हा सद्गुणी, सच्छील नि सच्चरित्र व्हायचे का ? नि कशाकरता ? असा प्रश्न विद्यार्थ्यापुढे उभा राहिल्यास आश्चर्य नाही. अर्थात सन्मानाच्या व सत्काराच्या भावनेने काही फळाची आशा ठेवून माणसाने सन्मार्ग आचरावा असे नाही. सन्मार्गाची कास धरल्याने प्राप्त होणारे आंतरिक आत्मिक समाधान आणि शांती हेच त्याचे खरे महान फळ होय. सर वॉल्टर स्कॉट[१] यांचे या संदर्भात व्यक्त केलेले विचार मननीय आहेत.

" A glance on the great picture of life will show that the duties of Self-denial and the sacrifice of passion to principle are seldom thus remunerated; and that the internal consciousness of their high-minded discharge of duty, produces on their own reflections, a more

adequate recompence, in the form of that peace which they cannot give or take away.

परंतु विचाराची ही पातळी गाठण्यासाठी फार मोठी साधना नि तपस्येचे बळ असावे लागते. विद्यार्थी दशेत हा विचार समजणे अवघड; कदाचित बुद्धीने जरी तो समजला, तरी तो समजल्यावर त्याप्रमाणे सर्वांचे आचरण कसे अपेक्षिता येणार? समाजाच्या सर्व थरात बहुसंख्य व्यक्ती सदा -चरणाने वागणे हे विद्यार्थ्यांचे जीवन सुधारण्याच्या दृष्टीने अपरिहार्य आहे. मॅथ्यु अर्नोल्डच्या "*Conduct is three fourth of life*" या मता बाबत सहसा कुणाचे दुमत होणार नाही. ही मानवी वागणूक सुधारण्याच्या दृष्टीने, आज या शिक्षणाची केवढी गरज आहे हे वाचकांच्या सहज लक्षात येईल.

(९) शाळातून आज अवलंबिली जाणारी मऊ शिक्षण प्रणाली

शिक्षणप्रणालीची दोन आत्यंतिक टोके

सुमारे ३०–४० वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांच्या वर्तनावर शिक्षक बरीच नियंत्रणे ठेवीत. लहानसहान गुन्ह्यालाही कडक शासन असे. आता इतिहासजमा झालेली म्हण "छडी लागे छमछम विद्या येई घमघम" ही त्या काळचीच. शाळेत झालेली शिक्षा पालकाला मान्य असे.

शिक्षणाच्या या पद्धतीमुळे मुलांच्या मनावर दडपण (*Repression*) येते; त्यांच्या आत्मप्रगटीकरणाला (*Expression*) पुरेसा वाव मिळत नाही. तेव्हा त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांचा कल पाहून शिकवावे, ही मऊ शिक्षणप्रणाली पुढे आली. 'मुले म्हणजे छोटी माणसे' असे चुकीचे मत मान्य केले गेले.

पहिल्या शिक्षण पद्धतीत "शिक्षकाच्या इच्छेप्रमाणे विद्यार्थ्याने शिकावे" हे आत्यंतिक टोक होते, तर त्यावर अनुपान म्हणून अवलंबिलेल्या नव्या पद्धतीत "विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणे शिक्षकाने शिकवावे" हे दुसरे टोक गाठले गेले. घड्याळाच्या लंबकाप्रमाणे एका टोकापासून आपण थेट दुसरे आत्यंतिक टोक गाठले. हा लंबक आता सुवर्णमध्यावर स्थिर झाला पाहिजे.

विद्यार्थ्याला काय बनवायचे ?

विद्यार्थ्याला काय हवे आहे यापेक्षा विद्यार्थ्याला आपण काय देऊ इच्छितो, हे प्रथम निश्चित ठरविले पाहिजे. गाढव करायचा कीं गणपती, हे एकदा ठरले म्हणजे ज्याप्रमाणे त्या आकाराचा साचा तयार करता येतो, त्याप्रमाणे विद्यार्थी कसा असावा हे निश्चित झाले म्हणजे त्या-प्रमाणे शिक्षणाची रूपरेषा आखता येईल. ज्या समाजाचा विद्यार्थी हा घटक व्हावयाचा आहे, त्या समाजरचनेची जीवनमूल्ये व आदर्श विद्यार्थ्यांत उतरतील एवढी दक्षता शिक्षणात घेतली जावयास हवी. माजी केन्द्रीय शिक्षणमंत्री डॉ. श्रीमाळी यांनी आपले मत असेच मांडले आहे. ते म्हणतात,

" It is a mistaken-belief that child's interests alone can be the sole guide for the child's behaviour ..... In planning of education, the child's interests and the purposes of educatton should certainly, be taken into account; but an educational theory, which relegates the values and ideals of community to the background is bound to meet with failure and frustration. The theory, underlying the child-centered-education is the product of the bygone age of individualism " Laissez Faire.

हे प्रदीर्घ अवतरण उद्धृत करण्याचे कारण इतकेच की ही बाल-केन्द्रित *(Child-centered)* मऊ शिक्षणप्रणाली कशी दोषपूर्ण व कालबाह्य आहे हे लक्षात यावे. आदर्श नागरिक तयार करण्यासाठी काहीसे कडक व बंधनकारक असे शिक्षण अंगिकारावेच लागेल. बौद्धिक साचेबंदपणाचा *(Intellectual-Regimentation)* आरोपही कदाचित पत्करावा लागेल पण जुनाट रोगाला जसे कडक पथ्य पाळावे लागते, त्याप्रमाणे आज शिक्षणाला लागलेली दुर्धर कीड नाहीशी करण्यास मवाळ नि सौम्य औषधाचा उपयोग नाही !

विद्यार्थी हितासाठी शिक्षेची गरज

हिताचे वचन सांगणे जो कानी । तो लाड करोनी कामा नये ।।

" बैद्य आणि गुरु । भीडखोर घातकरु " इ. काव्य वचने अध्यापकानें

विद्यार्थ्याच्या बाबतीत प्रसंगी कडक असावे हेच सुचवितात. गुरूशिष्य संबंधाबाबत श्री गुलाबराव महाराज[५] म्हणतात, "सृष्टीचा नियमच असा आहे की, बालदशेत लालन, मध्यदशेत सुधारणा व उच्च दशेत स्वातंत्र्य हे बहुधा मिळत असते. पैकी मध्यदशेतच महात्म्यांना रागावण्याची पाळी येते. सर्वथा कडेवर बसणाऱ्या मुलाचे पाय ज्याप्रमाणे पक्के होत नाहीत, त्याप्रमाणे मध्यदशेतही लालन केले असता शिष्यांना आत्मविश्वास उत्पन्नच होत नाही." शिष्याच्या मनाला शिक्षण देऊन त्याची अंतर्निष्ठा परिक्षून पाहण्याची प्राचीन रीती गुरूचरित्रातही[६] वर्णन केली आहे. ह्या रीतीचे अधिक स्पष्टीकरण श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या 'स्वात्मानुभवात' सापडते ते येणेप्रमाणे,

"शिष्याचे तोडावया पाश । समाधाने न बोले तयास ।
शद्धाप्रति कठिगांश । बोलोनिचि जाय ।। ७० ।।
जो जो शिष्याचा अवगुण । तितका सोडवी तयाकडोन ।
नायके तरी एक क्षण । न राहे तेथे ।। ७१ ।।
शिष्य आडवाटा भरू जाय । विषय अथवा सगुण ध्याय ।
वज्रपाय वचनघाय । हाणोनि करी दृढता ।। ७४ ।।"

धर्मजिज्ञासेसाठी अध्यात्म-शिक्षण

भारतीय विद्यार्थ्याला भारतीय भूमीत रुजलेली, भारतीय परंपरेने पोसलेली व भारतीय आदेशावर अधिष्ठित असलेली शिक्षणप्रणालीच अधिक मानवगार ! इतर देशातील शिक्षण-पद्धती कितीही चांगली असली तरी भारतीय बालकाला ती कशी हितावह ठरेल ? एका शिक्षणतज्ञाने[७] म्हटलेच आहे की, "*a truly national system of education cannot be established simply by trying to initiate or transplant the educational system of other countries.*"

भारताच्या राष्ट्रीय शिक्षणात, भारतीय जीवनाचा मूलाधार जो धर्म वा अध्यात्म, त्याची उपेक्षा करून कसे चालेल ? जगातील सर्वच विद्यार्थ्यांना व विशेषत: भारतातील बालकांना, धर्मविषयक ज्ञानाची एक प्रकारची भूक असते, त्यांना ते उत्कटपणे समजावून घेण्याची

इच्छा पण असते; पण आपणास नेमके काय हवे आहे हे त्यांना उमजत नाही. लहान मुलाला रडताना पाहून आई त्याची गरज ओळखून त्याला हवे ते पुरवीत असते. मुलाला कुठे माहीत असते आपल्याला काय हवे ते ? त्याला रडणे तेवढे समजते ! तद्वतच विद्यार्थ्यांची धर्मज्ञानाची पिपासा ओळखून ज्ञानदात्या संस्थेने ती पूर्ण केली पाहिजे. हे कार्य करणाऱ्या एका शिक्षकाचे खालील स्वानुभवाचे उद्‌गार लक्षात घेण्याजोगे आहेत.

" The eager young men and women who fill the class-rooms of the University are seeking for religion . . . They need it desperately and they don't know what they need . . . . Might not thc University be logically expected to know how to help ? "

तेव्हा भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये अध्यात्म शिक्षण हे एक आवश्यक अंग समजले जावयास हवे. तेव्हाच त्याची धर्मजिज्ञासा तृप्त होईल.

(१०) योजनेच्या कार्यवाहीसाठी लागणाऱ्या द्रव्यबलाची चणचण

परिणामांच्या तुलनेने अत्यल्प खर्च

'स्तंडुलाः प्रस्थमूलाः' या उक्तीप्रमाणे नैतिक नि आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेसाठी पैसा हा लागणारच. या योजनेसाठी सुविचार नि सदाचार यांनी संपन्न अशा शिक्षकांची प्रामुख्याने गरज असली तरी या सर्वांना एका योजनेत गुंफून त्यांना कार्यान्वित करणे नि योजनेचे विविध कार्यक्रम पार पाडणे, याला बऱ्याच मोठ्या द्रव्याची अत्यंत आवश्यकता आहे हे उघड आहे.

परंतु विद्यार्थ्यांना सुशीलतेचे वळण लावण्याच्या दृष्टीने, या शिक्षणाचे, यापूर्वी विशद केलेले महत्व जर शिक्षणसंस्थांच्या चालकांच्या वा राज्यकर्त्यांच्या लक्षांत आले, तर संपूर्ण देशात या योजनेसाठी होणारा काही लाख रुपयांचा खर्च त्यांच्या होणाऱ्या सुपरिणामाच्या तुलनेने अत्यल्प आहे, असे त्यांना वाटल्याशिवाय राहणार नाही.

अनुत्पादक नव्हे उत्पादक खर्च

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेद्वारा जर आजच्या पेक्षा उत्तरोत्तर अधिकाधिक सद्वर्तनी, प्रामाणिक, कामसू, शालीन, आस्तिक, संयमी, निर्व्यसनी इ. सात्त्विक गुणांनी युक्त असे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविले गेले, तर समाजाचे भावी चित्र पालटल्याशिवाय राहणार नाही. राजकीय, सामाजिक, कौटुंबिक इ. जीवनाच्या सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या या बदललेल्या मन:स्थितीचा पगडा बसलेला आढळून येईल. समाज-जीवनाची ही सर्व अंगे पूर्वापेक्षा अधिक शुद्ध नि संपन्न झालेली अनुभवास येतील. अशी सर्वस्पर्शी सुधारणा घडवून आणण्याचे सामर्थ्य असलेल्या योजनेसाठी लागणारे द्रव्य, हा अनुत्पादक खर्च (*Unproductive expenditure*) नसून, भावी जीवनाच्या समृद्धतेसाठी गुंतविला जाणारा उत्पादक खर्च आहे असेच गृहीत धरले पाहिजे. कारण अनेक स्वरूपांत केलेली ही गुंतवणूक, समाज, दामदुपटीने परत करणार आहे, हे निश्चित. उदाहरणार्थ, केवळ समाजातील प्रामाणिकपणाचे प्रमाण पुरेशा प्रमाणात वाढले तर लांच देणे घेणे, सार्वजनिक संपत्तीचा अपहार करणे, व्यापारात फसविणे इ. कितीतरी अनिष्ट गोष्टींना आळा बसून सार्वजनिक पैशाचा अपव्यय टळेल ! बिनातिकीट प्रवास केल्याने दरवर्षी काही लाखांचे उत्पन्न बुडते हे नागरिकांत प्रामाणिकपणा नसल्याचेच लक्षण नव्हे का? अशा शेकडो समाजघातक घटना दाखविता येतील, ज्या केवळ प्रामाणिकपणा या एकाच गुणाचा समाजात प्रकर्षाने अभाव असल्याने राजरोसपणे सर्वत्र सुरू आहेत.

विश्वास व सौहार्दाचे वातावरण

आर्थिक अपव्यय तर या गुणांच्या वाढीमुळे टळेलच. त्यापेक्षाही अधिक महत्वाचे वाटते, ते, समाजात प्रामाणिकपणा हा सर्वांचा स्थायी गुण होताच निर्माण होणारे विश्वासाचे नि सौहार्दाचे वातावरण ! अवगुणाने जसा अवगुण वाढतो तद्वतच गुणाने गुणांची जोपासना होत जाते ! सद्गुणांचा गुणाकार व दुर्गुणांची वजाबाकी अशा सदाचरणाच्या वातावरणातच संभवते. प्रामाणिकांचे आधिक्य अप्रामाणिकाला प्रामाणिक बनविण्यास सहाय्यभूत ठरते. एका खेडेगावात काही तरूणांनी

संपूर्ण गांव एक वर्षात निर्व्यसनी करण्याचा शुभसंकल्प केला. बव्हंशी त्यांत ते यशस्वी झाले. अफू, गांजा, तंबाखू, सिगारेट इ. सर्व मादक वस्तूंची गावातील आवक एकदम बंद झाली. केवढ्यातरी खर्चाचा नि त्या व्यसनापायी होणाऱ्या वेळेचा, अपव्यय टळला ! परंतु असा सत्संकल्प करण्यास प्रोत्साहन देणारे शिक्षण तरूणांना दिले तरच हे शक्य आहे.

खर्च कुणी किती सोसायचा ?

सारांश, या योजनेसाठी एक तर फार मोठी रक्कम लागणार नाही आणि जी काही आवश्यक असेल ती भावी नागरिकांच्या सर्वांगीण उन्नतिसाठी केलेली गुंतवणूकच असल्यामुळे, कुणालाही जास्त वाटू नये. हा होणारा खर्च आवश्यक स्वरूपाचा आहे, (*Expenditure of Essential Nature*) हे एकदा मान्य झाल्यावर, तो कोणी किती प्रमाणात द्यावयाचा एवढाच प्रश्न शिल्लक राहतो.

याबाबतीत असे सुचवावेसे वाटते की, शिक्षण संस्थांवर या योजनेचे कोणतेही ओझे पडू नये. एखादी गोष्ट, आवश्यक नि निकडीची म्हणून जेव्हा शासनाला वाटते, तेव्हा त्यासाठी लागणारी संपूर्ण रक्कम शासन स्वत: देऊन, संस्थांना त्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडते. सार्वजनिक हित, हे ध्येय असणाऱ्या प्रत्येक लोकशाही राष्ट्रातील, तो एक सर्वमान्य असा संकेत आहे. महाराष्ट्रात १२०० रुपयापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकाच्या प्रत्येक पाल्याला, पैशाच्या अभावी शिक्षण घेता आले नाही, असे होऊ नये म्हणून या वर्गात मोडणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण फी शासन देते, ते एवढ्याचसाठी. प्राध्यापकांचे पगार नुकतेच वाढविण्यात आले, त्याचा खर्चही केंद्र व प्रांतिक शासनाने ८०–२० या प्रमाणात आपसातच विभागला. महाविद्यालयातील नियोजन मंडळासाठी महाराष्ट्र शासनाकडून व विद्यार्थी मदत निधीला (*Student Aid Fund*) विश्वविद्यालय अनुदान समितीकडून मिळणारे सहाय्यही, संस्थेने त्यासाठी गोळा केलेल्या रकमेच्या निरपेक्ष असते. शिक्षण संस्थांनी त्यासाठी किती पैसे उभे केले वा खर्च केले यावर अशा आवश्यक स्वरूपाच्या कार्यांसाठी द्यावयाची रक्कम अवलंबून नसते. याचा अर्थ संस्थांनी अशा स्तुत्य

योजनांसाठी मुळीच झीज सोसू नये वा हातभार लाऊ नये, असा मात्र मुळीच नाही.

मूलभूत व उत्तेजनात्मक अनुदान

या दृष्टीने विश्वविद्यालय अनुदान समितीने गरीब विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या, "विद्यार्थी मदत निधी" देण्याच्या बाबतीत अवलंबिलेली पद्धत अनुकरणीय आहे. आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेसाठी त्याचा अवलंब करणे संयुक्तिक होईल.

या पद्धतीत अनुदानाचे प्रकार दोन

१) **मूलभूत अनुदान** *Lump sum basic grant*
२) उत्तेजनात्मक अनुदान *Incentive grant*

शिक्षण–संस्थेने या योजनेसाठी पैसा गोळा केलेला असो अगर नसो, पहिल्या प्रकारचे अनुदान मागील वर्षी १ आक्टोबर रोजी विद्यार्थ्यांची जी संख्या पटावर असेल त्याच्या आधारावर खालील प्रमाणे मिळेल.

विद्यार्थी – संख्येचे गट	अनुदान (रूपये)
५०० विद्यार्थी किंवा त्यापेक्षा कमी.	५००
५०१ ते ७५० विद्यार्थी	७५०
७५० ते १००० विद्यार्थी	१२५०
१००१ ते १२५० विद्यार्थी	१५००
१२५१ विद्यार्थी किंवा त्यापेक्षा अधिक.	२०००

या अनुदानाशिवाय या योजनेसाठी जी काही रक्कम संस्थेने गोळा केली असेल तेवढीच आणखी रक्कम उत्तेजनात्मक अनुदान म्हणून त्या संस्थेला मिळेल. मात्र ह्या अनुदानाची महत्तम रक्कम १००० रुपयापेक्षा अधिक राहणार नाही.

तसेच वरील दोन्ही प्रकारचे अनुदान मिळून कोणत्याही वर्षी एका संस्थेला ३००० रु. पेक्षा अधिक आर्थिक सहाय्य या योजनेसाठी मिळणार नाही. मूलभूत अनुदान २००० रू. व उत्तेजनात्मक अनुदान १००० रू. असे फार तर ३००० रू. एखादी संस्था मिळवू शकेल. अनुदानाचे हे स्थूल स्वरूप सर्वमान्य होण्याजोगे आहे.

विशेष कायक्रमासाठी वेगळे सहाय्य

यापेक्षा अधिक मदत एखाद्या शिक्षण संस्थेला हवी असेल तर ? तर त्या संस्थेने आपणास हे जास्तीचे अनुदान का हवे आहे, ह्याची कारणे द्यावीत. काही योजना ते अंमलात आणू इच्छित असतील तर ती योजना, संस्थेने सादर करून हा जास्तीचा खर्च संयुक्तिक असल्याचे शासनाला समजावून सांगावे. त्या योजनेचे महत्व व परिणामकारकता पटल्यासच त्याला मान्यता मिळेल; मात्र एकदा मान्यता दिल्यावर योजनेचा संपूर्ण आर्थिक भार सरकारने उचलला पाहिजे.

शासन व शिक्षणसंस्था यांनी आपआपला, यथायोग्य वाटा उचलल्यावर, देशातील श्रीमंत देवस्थाने, मठ, सधन नागरिक, यांनाही या देवकार्यासाठी आवाहन करता येईल. प्रत्येक शिक्षण संस्था या योजनेप्रमाणे "आध्यात्मिक ज्ञान-विज्ञान मंदिर" झाल्याचे निदर्शनास येताच, समाज देखील विविध स्वरूपात आपले सहकार्य या सत्कार्यासाठी दिल्याशिवाय खचित राहणार नाही.

सद्यः शिक्षणाचा विपरीत परिणाम.

आजच्या शिक्षणाचा असा काही चमत्कार आहे की, ते जो कोणी घेतो तो आपला आचार, परंपरा, धर्म यांचे पासून अधिकाधिक विन्मुख होण्यात भूषण मानू लागतो. जितके जास्त शिक्षण तितका तो भारतीय संस्कृतीशी पारखा होऊ लागतो. भारतीय पोषाख घालण्याची त्याला लाज वाटू लागते. आपले पूर्वज व वडीलधारी मंडळी यांचेविषयी आदर नि-कृतज्ञता वाटण्याऐवजी, एकप्रकारची घृणा नि तिरस्कार वाटू लागतो; आपल्याच अशिक्षित नि अज्ञानी देशबांधवाबद्दल अपार प्रेम नि कळकळ उत्पन्न होण्याऐवजी, त्यांची उपेक्षा नि उपहास करण्याकडे त्याची प्रवृत्ती होते; अंग मोडून मेहनत करणे तर दूरच, पण स्वतःचे काम करणे, हे देखील तो कमीपणाचे समजतो. शेतीचा पदवीधर, शेती करणे हीन मानतो, ज्ञानवृद्धी बरोबर येणारी विनयशीलता व उदार दृष्टिकोन यांचा आढळ होण्याऐवजी, शिक्षणाबरोबर त्याचा अहंकार व संकुचित भावना वाढीस लागते. अंतर्गत मानसिक पावित्र्य नि स्वच्छता यांची उपेक्षा करून विद्यार्थी बाह्य सौन्दर्य व पोषाख याकडेच प्रामुख्याने लक्ष पुरवितो. "वसुधैव

कुटुंबकम्" चा उज्वल संदेश देणाऱ्या भारतीय संस्कृतीचा वारसा धारण करणारा हा विद्यार्थी, आंग्लविद्याविभूषित होताच "मी नि माझे कुटुंब" या पलीकडे बघेनासा होतो. एक सुविद्य नागरिक म्हणून सामाजिक-समष्टी जीवनाची आपल्यावर काही जबाबदारी नि आपले काही कर्तव्य आहे, याचा त्याला जवळजवळ विसर पडतो.

सारांश, राष्ट्रीय जीवनाचा, प्रसंगी बळी देऊनही, स्वत:चे व्यक्तिगत जीवन सुखी नि संपन्न करण्याकडे आज जो सर्वत्र कल दिसतो, तो प्रामुख्याने आजच्या शिक्षणाचा दुष्परिणाम आहे. भारताच्या लोकप्रिय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी एका पदवीदान समारंभात नुकत्याच केलेल्या भाषणात आजवर शिक्षण पद्धतीत कोणताच बदल आपण केला नाही ही फार मोठी चूक झाल्याचे स्पष्ट मत देऊन आजची विद्यार्थ्यांची परिस्थिती हे या चुकीचेच फळ असल्याचे म्हटले आहे.[१०] गेल्या २५ वर्षांच्या स्वातंत्र्यकाळात सर्व क्षेत्रांत जे राष्ट्रीय अध:पतन झाले, ते प्रामुख्याने आजच्या निरूद्देश नि नि:सत्त्व अशा भारतीय शिक्षणाचा परिपाक होय. भारतीय जीवन व त्याचे आदर्श यांच्याशी पूर्णपणे फारकत झालेल्या आजच्या शैक्षणिक धोरणाचे दुसरे काय फलित असू शकणार ?

केल्याने होत आहे रे !

हे सर्व टाळावयाचे असेल तर, त्यासाठी एक प्रमुख उपाय आहे, आध्यात्मिक व नैतिक शिक्षणाची योजना वरील सर्व अडचणी दूर करुन परिश्रमपूर्वक अंमलात आणणे. पूज्य विनोबांना नुकतीच एकाने पृच्छा केली, "संतप्त तरुण पिढीला देण्यासारखा काही कार्यक्रम गांधी विचाराजवळ आहे काय ?" तेव्हा नि:संदिग्ध शब्दात हाच उपाय सांगतांना ते उत्तरले,[११] "संतप्त तरुण पिढीला संतापातून मुक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे अध्यात्म विद्या होय. आज जो ताप त्याला जाळत आहे तोच तप बनेल व त्यांना अध्यात्मामुळे शुद्ध बनवील. खरी अडचण अशी आहे की आमचाच अध्यात्माच्या सामर्थ्यावर विश्वास नाही. आम्ही अध्यात्माला आणि तरुणांनाही घाबरतो, म्हणून तरुणापर्यंत अध्यात्म पोचू शकत नाही. अध्यात्माखेरीज तरुणांचे सामर्थ्य वाढणार नाही." विनोबांजींनी फार मार्मिकपणे एक निर्भेळ सत्य आपणासमोर ठेवले आहे.

आपला आपल्यावरच-अध्यात्मावरच विश्वास नाही ही खरी अडचण आहे.

केवळ शासन व शिक्षणसंस्थांतील शिक्षक-यांनी जरी जाणीवेने या दृष्टीने प्रयत्न केले, तरी उपरिनिर्दिष्ट सर्व प्रश्नातील गुंतागुंतीचे अनेक धागेदोरे हळूहळू उकलू लागतील नि या योजनेशी संबंधित अशा सर्व घटक पक्षांचे सहकार्य हळू हळू मिळू लागेल. परंतु होईल तितक्या लवकर, काहींनी आत्मविश्वासाने योजनाबद्ध पाऊल उचलले मात्र पाहिजे ! "केल्याने होत आहे रे-आधी केलेची पाहिजे" ●

संदर्भ टीपा

१. स्वामी दयानंद : सत्यार्थप्रकाश; प्रकरण २ रे. पृ. ३६.

२. *Ernest M Ligon : Education for Moral Character; Sixth chapter included in 'Philosophies of Education' edited by Philip H. Phenix; p. 60.*

३. *Sir Walter Scott : Introduction to Ivanho.*

४. *Dr. K. L. Shrimali : Problems of Education in India; p. 32, 33.*

५. श्री गुलाबराव महाराज; साधुबोध; पृ. ७७.

६. श्री गुरुचरित्र; अध्याय १६; ओ. ४४, ४५.

७. *S. S. Dixit : Nationalism and Indian Educaton; p. 8.*

८. *Edasther Mc D. Lloyed Jones : Student Personal Work at Northwestern University; p. 200.*

९. *Uuiversity Grants Commission Letter No F. 84-1/ 66(CI) dated 9 th Aug 68.*

१०. इंदिरा गांधी : गांधीग्राम (म्हैसूर) येथील पदवीदान समारंभातील भाषण; पहा दैनिक तरुण भारत; नागपूर दि. १०-१-७३.

११. श्रीपाद जोशी : विजनवासातील विनोबा; किर्लोस्कर; दिवाळी अंक; नोव्हेंबर १९७२; पृ. १७७.

❑ ❑ ❑

सात

शिक्षणाच्या संदर्भात भारतीय संविधानातील "निधार्मिकता"

" Basis of our secular state, to be secular is not to be religiously illiterate. It is to be deeply spiritual ... There is no such thing as a purely secular education."

-Uni. Education Committee on Moral Education.

" Whether ethical principles shall be applied well or badly or not at all, at all points of life, depends upon a true education and a true religion. Through ethics the entire activities of individuals and societies must be guided by their fundamental beliefs. And fundamental beliefs about the nature of the world and of God are all the more essential when we have no universally accepted solutions to our diverse problems. "

Aldous Huxley

(१) संविधानातील 'निधार्मिकते' चा मथितार्थ

यापूर्वी एका प्रकरणात आपण 'धर्म' या नेहमी वापरल्या जाणाऱ्या पण अनेक अर्थछटा असल्याने सर्वाधिक गैरसमज उत्पन्न करणाऱ्या, संज्ञेचा व्यापक गूढार्थ पाहिला. हा अर्थ गृहीत धरताच विविध धर्मात सामंजस्य व समानता उत्पन्न होऊन 'सर्व धर्म सम भाव' अंत:करणात निर्माण होतो. या समतेच्या भावासह स्वधर्माचे केलेले अनुसरण सामाजिक व राष्ट्रीय जीवनास कसे पोषक होते, हे आपण विस्ताराने बघितले !

संविधानात कुठेही 'सेक्युलर' शद्ब नाही

पण दुर्देवाने भारतीय संविधान अंमलात आल्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात बरीच वर्षे 'निधार्मिक' या शद्बाने अनेक राजकीय, सामाजिक व शासकीय नेत्यांच्या मनात फार गोंधळ उडवून दिला. अनेकांना हे वाचून आश्चर्य वाटेल की भारताच्या संपूर्ण संविधानात 'निधार्मिक वा निधार्मिकता' *(Secular or Secularism)* असा शद्बप्रयोग कुठेही आढळत नाही. नि हे केवळ अनवधानाने अपघात म्हणून चुकून राहून गेले असे म्हणणे घटनाकारावर ठपका ठेवल्यासारखे होईल. किंबहुना त्यांनी 'सेक्युलर' हा शद्बप्रयोग विचारपूर्वक हेतुत: वगळला असण्याचा संभवच

जास्त ! कारण घटनेने मान्य केलेली काही तत्त्वे निधार्मिकतेच्या तथाकथित रूढ कल्पनेशी विसंगत आहेत. घटनेतील २५ व्या कलमाप्रमाणे सर्व भारतीयांना धर्म–स्वातंत्र्य बहाल करतांना म्हटले आहे की, *" subject to public order, morality and the other provisions of this part, all persons are equally entitled to freedom of conscience and the right freely to profess, practice and propogate religion."*

पुढे २६ व्या कलमाप्रमाणे कुठल्याही धर्मपंथियास कोणत्याही धर्मकारणासाटी संस्था स्थापन करणे, चालविणे इ. चे अधिकार प्रदान करतांना घटनेने घोषित केले आहे की,
" subject to public order, morality and health, every religious denomination shall have the right to establish and maintain institutions for religions and charitable purposes, to manage its own affairs in matters of religion, to own and acquire moveable and immoveable property and to administer such property in accordance with the law."

बहुधा आयर्लंडचा अपवाद वगळता कोणत्याही देशातल्या आधुनिक घटनाकारांनी, भारतीय घटनेप्रमाणे धर्माला राष्ट्रीय जीवनात एवढे महत्वपूर्ण स्थान दिलेले नाही. धर्म–स्वातंत्र्याचे तत्त्व अबाधित ठेवण्यासाठी घटनेत 'सेक्युलर' शब्दाचा वापर संविधानकारांनी टाळणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. भारतीयांची धर्मविषयक सहिष्णुता व उदारता याचा आजवरचा इतिहास व तद्विषयक दृष्टिकोन पाहता[३] 'सेक्युलर' शब्दाचा घटनेत मुद्दाम उपयोग करण्याची बहुधा त्यांना गरज वाटली नसावी.

विभिन्न देशात 'सेक्युलर' शब्दाचा भिन्न अर्थ

शिवाय विविध देशांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या संदर्भात 'निधार्मिक' या शब्दाचा त्या त्या देशात रूढ झालेला अर्थ भिन्न भिन्न आहे हे लक्षात घेतले पाहिजे. इग्लंडने ख्रिश्चन हा राज्य–धर्म *(State Religion)* म्हणून जरी घोषित केला असला, तरी शासन हे अंशत:

निधार्मिक *(quasi-secular)* मानले आहे. रशियातील ' निधार्मिकता ' तर कुणाला उपासनेचा वा पूजेचा अधिकार देत नाही; धर्मप्रचार करणे मग दूरच राहिले. माओच्या चीनमध्ये तर 'धर्म' हा पूर्णपणे नष्ट करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला आहे. हे राष्ट्र निधार्मिक नव्हे, तर धर्म विरोधी म्हणावे लागेल.

काही विशेष परिस्थितीत विकसित झालेली अमेरिकेतील " निधार्मिकता " काहीशा विचित्र स्वरूपात मांडली गेली. स्वदेशातील धार्मिक छळाला विटून अमेरिकेत स्थानांतरण केलेल्या यात्रेकरू धर्मगुरुंचा *(Pilgrim Fathers)* वारसा अमेरिकन घटनेला प्राप्त झाल्याने, साहजिकच पुनश्च असा जाच होऊ नये म्हणून, त्यांनी घटनेत कोणत्याही विशिष्ट धर्माचे इतरावर प्राबल्य होऊ नये यासाठी अतिशय दक्षता घेतली. युरोपमध्ये गेल्या काही शतकात धर्माच्या नावाखाली जे अनन्वीत अत्याचार व अनाचार झाले त्यामुळे असे होणे स्वाभाविक होते. विशिष्ट धर्म, पंथ, वा संप्रदाय यांच्या दुराग्रहाचे व बंधनांचे एवढे दडपण व्यक्तीवर आले की, समाजाच्या कोणत्याही सार्वजनिक जीवनात धर्माचा अंकुश नको ही भावना मानवी स्वभावाप्रमाणे उफाळून वर आली.[४] पण धर्मा विरुद्ध झालेला हा उद्रेक तर्कशुद्ध नव्हता. योगी अरविन्द आपल्या मार्मिक शैलीत या धर्म विरोधी प्रतिक्रियेचे वर्णन करतांना म्हणतात,[५] *" ..... this western recoil from religion was the blind swing of the pendulum from a wrong affirmation to a wrong negation."* तर्कविसंगत असली तरी ही प्रतिक्रिया दुर्दैवाने अमेरिकेतील घटनेला टाळता आली नाही. पहिली दुरुस्ती *(First Amendment)* म्हणून ' *Non-Establishment Clause* ' या नावाने ज्ञात असलेल्या कलमात नमूद केले आहे की,

" Congress shall not make any laws regarding an establishment of a religion or restricting the free exercise thereof "

जस्टीस ब्लॅक[६] यांच्या म्हणण्यानुसार, *" It errects a wall of seperation between Church and state."*

सारांश, भारतीय संविधानात प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी अप्रत्यक्षपणे शासन 'सेक्युलर' असल्याचे जे ध्वनित झाले आहे त्याचा अर्थ उपरिनिर्दिष्ट देशांच्या घटनांमध्ये व्यक्त झालेल्या 'सेक्युलर' शब्दांच्या अर्थाप्रमाणे लावता येणार नाही. कारण पाश्चात्य वा साम्यवादी राष्ट्रांप्रमाणे 'निधार्मिकता' म्हणजे धर्माविषयी औदासिन्य वा विरोध हा अर्थ भारतीय घटनेला अभिप्रेत नाही.

व्यक्तीस्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्य यामध्ये समन्वय

घटनेतील २५ ते २८ ही कलमे प्रामुख्याने धर्मस्वातंत्र्याची कल्पना स्पष्ट करण्यासाठी खर्ची पडली आहेत. भारतीय संविधानाने भारतीयांना बहाल केलेले हे धर्म स्वातंत्र्य मात्र अनिबंध नाही. इतरांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला येणार नाही याची दक्षता, विभाग ३ मधील अटी, २५ व्या कलमाला जोडून (*Making Article 25 subject to the other provisions of Part III*), घेण्यात आली आहे. कोणत्याही व्यक्तीवर, धर्म जबरदस्तीने वा सक्तीने लादला जाऊ नये हा यामागचा सदुद्देश उघड आहे. सहअस्तित्व नि सहिष्णुता ह्यांचा, हजारो वर्षांची परंपरा असलेला, भारतीय जीवनाचा आदर्श, धर्म-प्रचारावरील या बंधनामुळे जोपासला गेला आहे धर्मस्वातंत्र्य व व्यक्तीस्वातंत्र्य यांचा सुरेख समन्वय संविधानाने साधला आहे.

घटनाकारांची अशीच समन्वयात्मक दृष्टी कलम २८ मध्येही प्रगट झाली आहे. बहुसंख्य समाजाच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण स्थान धर्माने व्यापले असून त्याची शिक्षणापासून पूर्ण फारकत करता येणार नाही याची पूर्ण जाणीव या कलमात व्यक्त झाली आहे. या कलमाद्वारे म्हणूनच एक तडजोड सुचविण्यात आली आहे. पूर्णपणे शासकीय निधीतून चालविल्या जाणाऱ्या संस्थेमध्ये धर्मशिक्षण देण्यास या कलमाद्वारे बंदी तर घातलेली आहे; पण या व्यतिरिक्त इतर शैक्षणिक संस्थांमध्ये दिल्या जाणाऱ्या धर्मशिक्षणावर, व्यक्तीस्वातंत्र्याचा अपवाद सोडला तर कोणतेही बंधन घातलेले नाही. म्हणजेच हे शिक्षण घेण्याची इच्छा नसलेले विद्यार्थी वगळून इतरांना असे शिक्षण देण्याची मोकळीक घटनेने दिली आहे. व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणून धर्मशिक्षणाची सक्ती

कुणावर होऊ नये हा त्यामागील हेतू. मात्र स्वेच्छेने असे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना घटनेने कोणताही मोडता घातलेला नाही. न्यायमूर्ती श्री. शेलट" या कलमांचे विवेचन करून आपले हेच मत व्यक्त करताना म्हणतात,

" These Articles thus secure the citizen's freedom of faith and his right to practice and even propogate his creed . . . . . At the same time they ensure that no compulsion is brought to bear on any individual to participate in any religious instruction imparted by them . . . . . There is thus no attempt through these provisions or otherwise to model the State on any anti-religious thesis."

शिक्षणाचे निधार्मिकीकरण धोकादायक

सारांश, भारतीय संविधान धर्माविषयी उदासीन नाही, धर्मविरोधी तर मुळीच नाही. उलट कुणावर बळजबरी न करता विशुद्ध भावनेने, प्रेमाने केलेल्या धर्मप्रचाराला घटनेची कोणतीही हरकत नाही. शिक्षणाचे निधार्मिकीकरण समाजात केवढा हाहाःकार उडवील यावद्दल लिहितांना प्रा. टेलर[८] म्हणतात,

" The question is one of an ideal of life for the whole future of humanity. It is idle to hope, as same do, that secularisation of education may at least leave religion in being graceful and desirable embellishment of life for exceptionally sensitive and imaginative souls. It is very nature of living religion to claim supreme direction of effort and action. If the claim is disallowed, religion itself ceases to be real; if it is allowed, it is idle to dispute the right of religion to be made the foundation of an education policy . . . . . and the adoption of a radically vicious educational policy means shipwreck for the spiritual future of mankind "

शिक्षणाचे पायाभूत तत्व म्हणून, धर्माला मान्यता प्राप्त होणे किती आवश्यक आहे हे लक्षात यावे म्हणून प्रदीर्घ असले तरी मुद्दामच हे अवतरण दिले आहे धर्म ही अफूची गोळी असल्याचे मानणाऱ्या

रशियाला देखील आज ना उद्या धर्माचा कास धरावी लागेल असे विचारवंतांना वाटू लागले आहे. जॉन ग्रीग एका लेखात म्हणतात,

" Russians, at any rate, have never ceased to be a deeply religious people and I would expect them to reinstate God officially at some not too distant date."

धर्मजीवन जगण्याचे व्यक्तीला स्वातंत्र्य न देणाऱ्या साम्यवादी रशियात देखील, खोलवर धर्मभाव असलेले लोक, रशियन क्रांतीनंतर इतक्या वर्षांनी जर अद्याप आढळत आहेत, तर भारतीय घटनेला निधार्मिकतेचा चुकीचा अर्थ चिकटवून, धर्म हाच प्राण असलेल्या भारतीयांची भावी पिढी धर्मापासून वंचित ठेवणे कितपत योग्य आहे व शक्य आहे याचा विचार व्हावयास हवा. एका संसद सदस्याच्या[१०] म्हणण्याप्रमाणे तर सर्व धर्मियांना इच्छेनुसार धर्मानुसरणाचे स्वातंत्र्य घटनेने बहाल केले असल्याने,

" India is a free state according to the Constitution. Ii is freedom not secularism that is embodied in the constitution."

अखिल भारतीय परिसंवादाचा अनुकूल कल

भारतीय घटनेचा आत्यंतिक टोकाचा हा विचार जरी सोडून दिला तरी भारतीय संविधानाला धर्माचे संरक्षण व संवर्धनच अभिप्रेत आहे असे मत सामान्यत: सर्व विचारवंतांनी मांडले आहे. या संदर्भात भारतीय विद्याभवन, संस्कृत विश्व परिषद, गांधी स्मारक निधी व श्रीरामकृष्ण मिशन या संस्थांनी, एकत्रितरित्या आयोजिलेल्या " राष्ट्रीय एकात्मतेचे अधिष्ठान-नैतिक व आध्यात्मिक जीवनमूल्ये " या विषयावर जो अखिल भारतीय परिसंवाद *(All India Colloquium on Ethical and Spiritual Values as the Basis of National Integration)* मुंबई येथे डिसेंबर ३०, १९६६ ते २ जानेवारी १९६७, या कालावधीत आयोजित केला होता, त्याकडे वाचकांचे लक्ष आम्ही वेधू इच्छितो. या अ. भा चर्चासत्राचे अध्यक्ष व उपाध्यक्ष होते भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन व उपराष्ट्रपती डॉ. झकीर हुसेन ! याशिवाय डॉ. के. एम्. मुन्शी, डॉ. रंगराव दिवाकर, सध्याचे राष्ट्रपती श्री. गिरी, स्वामी

रंगनाथानंद, रामकृष्ण मिशन, मुंबईचे आर्चबिशप श्री. कार्डिनल ग्रेशस; अनेक विद्यापीठांचे कुलगुरू इ. अनेक क्षेत्रांतील, विभिन्न समाजातील मान्यवर विद्वान मंडळी सहभागी झाली होती. या सर्वांनी शेती, विज्ञान, शिक्षण कायदा इ. विविध भारतीय जीवनाच्या अंगोपांगाना समृद्ध व संपन्न करण्यास नैतिक व आध्यात्मिक जीवनमूल्यांचा परिपोष अपरिहार्य असल्याचे आवर्जून प्रतिपादन केले. भारतातील साधारणतः सर्व प्रांतातील, सर्व भाषांतील, सर्व धर्मातील सुमारे ३०० नामवंत विद्वानांनी एकमुखाने पारित केलेले या विषयावरील ठराव पाहिले, म्हणजे नैतिक व आध्यात्मिक जीवन या खंडप्राय प्राचीन राष्ट्राच्या एकात्मतेचा केवळ प्राणच आहे व भारतीय घटनेत, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या अभिवृद्धीसाठी, कसलाच प्रतिबंध नाही हे लक्षात येण्यासारखे आहे.

सुदैवाने 'निधार्मिक' या शब्दाचा, धर्म विरोध वा धर्मविषयक उदासीनता असा, जो चुकीचा अर्थ काहींनी स्वातंत्र्यकाळात सुरवातीस लावला, तो आता बव्हंशी सर्वांकडून अमान्य झाला आहे. धर्म समानतेचा व धर्म सहिष्णुतेचा भारतीयांचा 'धर्मविषयक' उदार दृष्टिकोन, निधार्मिक घटनेशी सुसंगतच आहे, हे हळूहळू सर्वांना संमत होत आहे. राजकीय क्षेत्रात 'निधार्मिक' कोण? याबद्दल जरी वादंग माजले असले, तरी शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी धर्महीन बनण्यात निधार्मिकता आहे, असा चुकीचा दृष्टिकोन क्वचितच कुणी स्वीकारेल.

(२) विविध शिक्षण आयोगांचे सिंहावलोकन

शिक्षणविषयक शिफारशी करण्याकरता शासनातर्फे आधुनिक इतिहासामध्ये ज्या ज्या समित्या नेमल्या गेल्या, त्यांचे थोडे सिंहावलोकन करून सर्वांनी एकमताने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची आवश्यकता कशी प्रतिपादन केली, हे बघणे या ठिकाणी संयुक्तिक ठरेल.

हंटर कमिशनच्या शिफारशी[११]

ब्रिटीशांचे राज्य स्थिरावल्यावर इ. स. १८८२ मध्ये नेमलेल्या हंटर कमिशनने सर्वप्रथम या विषयी आपले अनुकूल मत नोंदविले. या कमिशनने धार्मिक शिक्षणाबाबत खालील शिफारसी केल्या होत्या.

१. सर्व धर्मांना समान असणाऱ्या मूलभूत धर्म तत्त्वावर आधारलेले नीतिपाठांचे एक पुस्तक तयार करण्यात यावे.

२. सर्व सरकारी व बिनसरकारी विद्यालयातून संस्थेच्या प्रमुखाने किंवा अध्यापकांपैकी एखाद्या योग्य व्यक्तीने मनुष्याची व नागरिकांची कर्तव्ये या विषयावर प्रत्येक सत्रात व्याख्यानमाला गुंफावी.

सर्व धर्मांच्या शिक्षणाची सोय एकाच शिक्षण संस्थेत करण्यात अनुल्लंघनीय अडचणी आहेत, असे कमिशनचे रास्त मत होते; व त्यामुळे सर्व धर्मियांना समान असलेल्या बाबीवर त्याने विशेष भर दिला. त्यावेळी या प्रश्नाचा सर्वत्र बराच उहापोह झाला. परंतु या शिफारसी तत्कालीन सरकारने स्विकारल्या नाहीत.

एक तर सर्व धर्मातील तत्त्वे समाविष्ट करून तयार केलेले पुस्तक फार मोघम व रूक्ष होईल व ते कोणत्याच धर्माच्या अनुयायांना पसंत पडणार नाही, हे पहिले कारण सरकारने पुढे केले. दुसरे म्हणजे असे पाठ्य-पुस्तक तयार करणे म्हणजे अनेक ज्वलंत धार्मिक प्रश्नांची भुतावळ उभी केल्यासारखी होईल, असे शासनाला वाटले. भारतात धर्म विषयक भावना किती तीव्र स्वरूप धारण करू शकतात हे १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाने निदर्शनास नुकतेच आणून दिले असल्याने, धूर्त इंग्रज सरकारने या शिफारसीबाबत निष्क्रीयता प्रगट करणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. पुढे १९२१ मध्ये तर भारत सरकारने शासकीय व सार्वजनिक शाळांवर धार्मिक शिक्षणाच्या बाबतीत खालील अटी लादल्या.[१२]

१. इतर धर्म वगळून कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य देऊ नये.

२. धर्म शिक्षणासाठी सार्वजनिक निधीचा उपयोग करू नये.

३. शाळेच्या वेळा व्यतिरिक्त इतर वेळात हे शिक्षण द्यावे.

मध्यवर्ती शिक्षण मंडळाचा वांझोटा प्रयत्न

या नंतर या प्रश्नाची प्रसंगोपात्त पुष्कळ चर्चा अधुनमधून होत राहिली पण हा प्रश्न तसाच भिजत पडला. इ. स. १९४४ साली मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळाने या प्रश्नाला पुन्हा हात घातला

व नैतिक व धार्मिक शिक्षणाची निकड खालील शद्वांत आग्रहाने प्रतिपादन केली.[१३]

" Religion in the widest sense should inspire all education and that a curriculum devoid of all ethical basis will prove barren in the end." हे शिक्षण कसे देता येईल, याचा तपशीलात जाऊन विचार करण्याकरिता एक स्वतंत्र समिती नेमली. या समितीच्या अहवालाचा विचार करून मंडळाने जो निर्णय घेतला तो मात्र मंडळाच्या उपरोक्त भूमिकेशी विसंगतच होता. मंडळाच्या शद्वात[१४] तो मुद्दाम खाली उद्धृत केला आहे.

" After fully considering all aspects of the question, the board resolved that while they recognize the fundamental importance of spiritual and moral instruction in the building of character, the provision for such teaching except in so far as it can be provided in the normal course of secular-instruction, shoud be the responsibility of the home and the community to which the pupil belongs."

डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखा प्रकार या मंडळाच्या बाबतीत झाला. कुटुंब व समाज यांच्यावर नैतिक व अध्यात्म शिक्षणाची जबाबदारी आहे, एवढेच जर अखेरीस सुचवायचे होते, तर त्यासाठी शासकीय मंडळाची काय गरज होती ? धर्म ही सर्व शिक्षणाची प्रेरक शक्ती असली पाहिजे व नैतिक अधिष्ठानाशिवाय आखलेला अभ्यासक्रम हा अंततोगत्वा निरुपयोगी ठरेल, एवढे महत्व मंडळ ज्या शिक्षणाला देते, त्यापासून विद्यार्थ्याला, शिक्षणसंस्थेत, वंचित ठेवणे उचित होईल का ? एकीकडे शीलसंवर्धनासाठी हे शिक्षण मूलभूत असल्याचे मान्य करायचे, नि लगेच, एवढी महत्वाची वाब कुटुंब व समाजाच्या भरवशावर सोपवून स्वत: मात्र हात झटकून मोकळे व्हायचे, हे कितपत सयुक्तिक आहे ? त्यातून कुटुंब व समाज जेव्हा शैक्षणिक व आर्थिकदृष्टचा मागासलेला असेल, अशावेळी त्याच्याकडून हे मूलभूत कार्य होण्याची अपेक्षा बाळगणे, म्हणजे घोर आत्मवंचनाच म्हणावी लागेल !

स्वातंत्र्योत्तर काळातील चार समित्या

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एकूण चार समित्यांनी या प्रश्नाचा आपआपल्या परीने विचार केला. शासनाने नियुक्त केलेल्या, या सर्वच समित्यांनी, एकमुखाने विविध कारणे देऊन, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. चारपैकी श्री. प्रकाश समिती प्रामुख्याने याच विषयाचा विचार करण्यासाठी नेमली होती. मात्र तिचे क्षेत्र माध्यमिक शिक्षणापुरतेच मर्यादित होते. नैतिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने शाळेतील शिक्षक नेमके कोणते कार्य करू शकतील, याचे विवेचन या अहवालात आहे.

माध्यमिक शिक्षण मंडळ, १९५३

केन्द्र सरकारच्या शिक्षण खात्याकडून अखिल भारतीय स्तरावर शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्याकरिता नेमली गेलेली स्वातंत्र्योत्तर कालातील डॉ. मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखालील ही पहिली समिती ! या समितीने तरुणांच्या मनावर काही निश्चित नैतिक मूल्यें बिंबवल्याशिवाय शिक्षणाचा हेतुच साध्य होऊ शकत नाही असे स्पष्ट नमूद केले. घटनेच्या निधार्मिकतेचा जो आक्षेप काहीजण घेतात त्याबाबत आपले मत व्यक्त करतांना समिती म्हणते,[१५]

"This does not imply that because the state is secular there is no place for religion in the state. All that is understood is that the state should not undertake to uphold actively, assist or in any way to set its seal of approval on any particular religion"

या शिक्षणास अनुकूल वातावरण उत्पन्न करण्याच्या दृष्टीने प्रभाव टाकू शकणारी तीन माध्यमे मंडळाने सुचविली आहेत. ती म्हणजे घर, शाळा व वस्तीतील समाज.[१६] या तिन्ही मधील वातावरण विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडवील हे उघड आहे.

डॉ. राधाकृष्णन् व डॉ. कोठारी आयोग

माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली उच्च शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्याकरिता जी समिती नेमली गेली,

तिने निधार्मिकतेचा अर्थ स्पष्ट करून, अध्यात्म शिक्षणाची दिशा विशद केली. हा अहवाल स्पष्टपणे म्हणतो,[१७]

"We do not accept a purely scientific materialism as the philosophy of the State. That would be to violate our nature and 'svabhava,' our characteristic genius, our 'svadharma.' Though we have no State religion, we cannot forget that a deeply religious strain has run throughout our history like a golden thread."

हा जो धर्मरूपी अखंड सुवर्णतंतू संपूर्ण इतिहासामध्ये अनुस्यूत असलेला दिसतो, त्याचे केवळ बाह्य पुस्तकी ज्ञान देण्याची गरज नसून आध्यात्मिक साधना *(Spiritual Training)* आज हवी आहे, हे मांडण्याचा प्रयत्न या अहवालात केला आहे.

डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेलेल्या सर्वात अलीकडच्या व अखेरच्या शासकीय समितीने तर, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा केलेला निःसंदिग्ध विचार व सुस्पष्ट अशा शिफारसी, या विषयाच्या संदर्भात उचलले गेलेले अत्यंत प्रगत व प्रशंसनीय असे पाऊल आहे. 'निधार्मिक' शद्बांबद्दल कोणताही भ्रम मनात न बाळगता ही समिती याविषयी आपले मत नोंदवितांना म्हणते,[१८]

"निधार्मिकतेचा अर्थ कोणत्याही एका धर्माचा पक्षपात न करणे असा आहे. तिचा अर्थ धर्महीनता अथवा धर्म विरोध *(irreligious or anti religious)* हा नाही. ती धर्माचे महत्व कोणत्याही प्रकारे कमी लेखीत नाही. धर्माधर्मातील सहिष्णुता व सौजन्य एवढेच तिला अपेक्षित नाही, तर धर्माविषयी सक्रिय पूज्य भावही तिला अभिप्रेत आहे. कोणत्याही एका धर्माचे शिक्षण शासन संस्थेने देणे, भारतासारख्या अनेकधर्मी देशाच्या बाबतीत संभवनीय नसले, तरी तिने धर्माच्या अभ्यासास प्रेरणा दिली पाहिजे."

समितीने व शासनाने चढविलेले कळस

इतर ज्या अनेक कारणांसाठी नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची निकड या समितीने प्रतिपादन केली आहे, त्याचा सविस्तर विचार येथे

विस्तारभयास्तव शक्य नाही. परंतु या विषयाच्या संदर्भात संपूर्ण अहवालाचा साकल्याने विचार करता, हंटर कमिशन पासून अस्तित्वात आलेल्या शासकीय समित्यांच्या, आजवर केल्या गेलेल्या शिफारसींवर. कोठारी कमिशनने कळस चढविला आहे, असे म्हणावयास हरकत नाही!

स्वातंत्र्यापूर्वीच्या दोन व स्वातंत्र्यानंतरच्या चार अशा, इ. स. १८८२ पासून तहत १९६६ पर्यंतच्या सुमारे ८० वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात एकूण सहा सरकारी समित्यांनी मानवी जीवनाच्या समृद्धतेसाठी नितांत आवश्यक म्हणून, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा सतत पाठ पुरावा केलेला असूनही, आजवर शासनाने याबाबत उदासीन राहुन, आपल्या निष्क्रियतेचा जो आत्यंतिक कळस गाठला आहे, त्याबद्दल काय लिहावे ? कोठारी समितीने या बाबत आपला विषाद व्यक्त करतांना, राष्ट्रातील अनेक विचारवंतांच्या मनातील दु:खाला प्रातिनिधिक स्वरूपात वाचा फोडली आहे.

घोर उपेक्षेचा घातक दुष्परिणाम

समिती आपले मत नमूद करतांना म्हणते,[१९] "उगवत्या पिढीमध्ये, ज्या आजच्या काळात नैतिक व सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव सर्वंकष असावयास पाहिजे, त्याच या काळात, शिक्षण खाते, त्यांच्या बाबतीत उदासीन आहे ! चारित्र्य निर्मिती ही 'कटाक्ष बाळगण्याची बाब,' आजच्या शिक्षण क्षेत्रात राहिली नाही ! त्याचप्रमाणे नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या निर्मितीबाबत व संगोपनाबाबत फार थोडा अथवा जवळजवळ नाहीच म्हणता येण्याजोगा प्रयत्न दिसून येतो."

श्री. प्रकाश समितीचा अहवाल देशापुढे ५ वर्षांपासून ठेवला गेला असूनही, शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही; त्याचा चारित्र्य संवर्धनाच्या दृष्टीने अनिष्ट परिणाम उगवत्या पिढीवर झाला आहे, असाही ठपका कोठारी समितीने शासनावर ठेवला आहे.[२०] आज देशभर सर्वत्र अनुभवास येत असलेले, सर्व क्षेत्रातील नैतिक स्खलन, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या या घोर उपेक्षेचा घातक दुष्परिणाम तर नसेल ?

(३) निधार्मिक संविधानामुळे उद्भवणारे दोन मूलभूत प्रश्न व त्यांची सोडवणूक

वादाचे दोन प्रमुख मुद्दे

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाशिवाय मानवाची सर्वांगीण उन्नती करण्याचे शिक्षणाचे ध्येयच अपूर्ण राहाते, हे मूलभूत तत्व मान्य झाले तरीही ते प्रत्यक्षात देताना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्या हा प्रश्न स्वाभाविकच उद्भवतो ! नैतिक शिक्षणाची निकड आज बहुधा सर्वमान्य आहे. पण ते कुणाचाही आक्षेप न येऊ देता कसे द्यावे याबद्दलच प्रामुख्याने विद्वानांमध्ये मतभेद आहेत. शिक्षण खात्याच्या सल्लागार मंडळातर्फे नेमलेल्या धार्मिक शिक्षण समितीचा अहवाल[२१] आपण वाचला तरी अशा मतभेदाचो कल्पना आपल्याला येते. सर्वसाधारणपणे मतभिन्नता दोन मुद्यांच्या बाबतीत विशेष तीव्र झालेली दिसून येते. ते महत्वपूर्ण मुद्दे खालील प्रमाणे :—

अ) सर्व धर्मांत समानतेने आढळणाऱ्या आध्यात्मिक व नैतिक तत्वांचे *(Spiritual and Moral teachings common to all religions)* शिक्षण द्यायचे कीं, प्रत्येक धर्मियाना त्यांच्या धर्माचे आचरण व तत्व विषयक शिक्षण *(tenets and teachings peculiar to different religious denominations)* द्यावयाचे ?

ब) धर्म निरपेक्ष घटनेच्या चौकटीत धार्मिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी करावा लागणारा खर्च, शासकीय गंगाजळीतून (*Public Exchequer*) करणे इष्ट आहे काय ?

धर्मशिक्षण — कोणत्या मर्यादेपर्यंत ?

पहिल्या प्रश्नाचा आपण प्रथम विचार करू. सर्व धर्मांत "माणूसकीची" जोपासना करणाऱ्या ज्या सर्वमान्य अशा मूलभूत तत्त्वांचा व मानवी गुणांचा उहापोह केला आहे, त्यांची शिकवणूक विद्यार्थ्यांना द्यावी या मताला, सहसा कुणाची हरकत राहणार नाही. या योजनेच्या प्राथमिक अवस्थेत तरी आध्यात्मिक शिक्षणाची कक्षा या सर्वमान्य तत्वांच्या विवेचनापर्यन्तच मर्यादित ठेवणे हिताचे होईल. सर्वधर्मसमन्वय,

आस्तिकता, बंधुता, परोपकारिता, देशभक्ती इ. तत्त्वे व निर्भयता, प्रेमळपणा, जेष्ठाबद्दल आदर इ. वैयक्तिक गुणांचे महत्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवल्यास ते खचित लाभदायक होईल !

प्रत्येक धर्माचे शिक्षण देण्यात अडचणी

प्रत्येक धर्माची शिकवणूक 'व आचरणाच्या बाबी विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या धर्माप्रमाणे शिकवायचे योजले, तर आजच्या परिस्थितीत ते व्यवहारात आणणे फार अवघड जाईल; खालील अडचणी त्यामध्ये उद्भवतील.

१) एकाच धर्मात अनेक पंथ नि संप्रदाय आहेत; त्यापैकी कोणत्या पंथाला प्रमाण समजून शिकवायचे ? उदा:- हिंदू धर्मात, जैन – शिख हे उपपंथ किंवा अद्वैत विशिष्टाद्वैत हे संप्रदाय; मुसलमान धर्मात शिया–सुन्नी पंथ; ख्रिश्चन धर्मात कॅथॉलिक प्रोटेस्टंट पंथ इ. यापैकी कोणत्या पंथाचे मत शिक्षणासाठी ग्राह्य समजायचे ?

२) प्रत्येक शिक्षण संस्थेत प्रत्येक धर्माच्या सर्व पंथाच्या विचारसरणीची ओळख त्या त्या पंथांच्या विद्यार्थ्यांना करून द्यायची म्हटली, तर या विविध मतांचे ज्ञान असलेले सुमारे १५ ते २० शिक्षक दर शाळे मागे आवश्यक होतील. सर्व संस्थांमध्ये लागणाऱ्या अशा शिक्षकांची संख्या हजारोंनी मोजावी लागेल. एखादा विद्यार्थी जर एखाद्या विशिष्ट पंथाचा असेल, तरी त्याच्यासाठी वेगळ्या शिक्षकाची नेमणूक करण्याची आवश्यकता भासेल. एवढया मोठ्या संख्येत एक तर असे शिक्षक उपलब्ध होणे शक्य नाही; आणि तसे ते उपलब्ध झाले तरी त्यांचा प्रचंड आर्थिक भार सोसणे शासन वा समाज यांना शक्य नाही !

प्रत्येक धर्माच्या एका पंथाचे शिक्षण देणे अवघड

३) प्रत्येक धर्माचा एकच विशिष्ट पंथ आपण प्रमाण समजून, त्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले, तर तेही संयुक्तिक ठरणार नाही ! त्याची प्रमुख कारणे चार :–

अ) एखाद्या धर्मातील कोणता पंथ प्रमाण समजायचा, यावर वादंग माजेल. केवळ एखाद्या पंथातील अनुयायांची संख्या मोजून प्रमाण ठरविणे चूक ठरेल. बहुसंख्य विद्यार्थी कोणत्या पंथाचे आहेत, हे शिक्ष-

णाच्या सोयीच्या दृष्टीने रास्त असले, तरी पारमार्थिक दृष्ट्या ते योग्य असेलच, असे म्हणणे धाडसाचे होईल ! मतानुयायांची संख्या मोजून सत्य-असत्य, योग्य-योग्य हे पडताळून पाहाण्याची लोकशाहीची पद्धती आध्यात्मिक क्षेत्रात लागू करणे, खुळचटपणाचे ठरेल ! कारण शाश्वत सत्य, हे ते कितीजण जाणतात वा मानतात, यावर अवलंबून नसते ! उलट सनातन सत्याचे ज्ञान, बहुधा फारच थोड्या व्यक्तींना झालेले आढळते, असा आजवरचा अनुभव आहे.

ब) समजा एक पंथ प्रमाण म्हणून गृहीत धरला, तरी एका धर्मातील ज्या विशिष्ट पंथाच्या विचार-सरणीचे शिक्षण दिले जाईल, तो पंथ सोडून, इतर पंथीयांना ते शिक्षण मान्य होणार नाही ! त्यांच्यावर, ते ज्ञान इच्छेविरूद्ध लादल्यासारखे होईल ! इतर पंथांचे पालक, अशा शिक्षणावर आक्षेप घेणे स्वाभाविक आहे; कारण धर्मातील एका विशिष्ट पंथाचा प्रचार केल्याचा दोष या पद्धतीत उद्भवतो.

क) प्रत्येक धर्मातील जो कोणता पंथ आपण प्रमाण समजू, त्याचे विभिन्न ठिकाणी भिन्न प्रमाणात अनुयायी राहतील. जेथे निवडलेल्या पंथाचे अनुयायी वहुसंख्य आहेत, तेथे या बहुसंख्य विद्यार्थ्यांची, धर्मज्ञानाची व्यवस्था होऊ शकेल. परंतु काही ठिकाणी प्रमाण म्हणून गृहीत धरलेल्या पंथाचे मतानुयायी, अल्पसंख्येत असले तर ? वहुसंख्याकांना या शिक्षणाचा लाभ होणार नाही. उदाहरणार्थ, ख्रिश्चनांचा कॅथॉलिक व मुस्लीमांचा शिया पंथ निवडून त्यातील धर्म तत्त्वे शिकविण्याची व्यवस्था महाराष्ट्र राज्यात करण्याचे ठरविले, तर ज्या ज्या शाळा कॉलेजांतून या पंथाचे विद्यार्थी संख्येने थोडे असतील त्या शाळेत, बहुसंख्य असलेले इतर विद्यार्थी, या योजनेपासून वंचित राहतील, हे उघड आहे.

संस्थापरत्वे अनुयायांची संख्या पाहून जर पंथाची निवड करू म्हटले तर तेही व्यवहार दृष्ट्या अवघड आहे ! कारण या संख्येत, दरवर्षी नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यामुळे, वरचेवर जर बदल होत गेला तर ? आपण हा पंथही सारखा बदलत राहणार का ? तसा तो सतत बदलत गेला तर एकदा शिया तर दुसऱ्या वर्षी सुनी पंथाचे, एक वर्ष प्रोटेस्टंट तर दुसऱ्या वर्षी कॅथॉलिक पंथाचे, असे शिक्षण शिक्षकाला द्यावे लागेल.

तसेच अनुयायांची जी संख्या आपण लक्षांत घेऊ; ती प्रत्येक वर्गातील की संपूर्ण शाळेतील ? सारांश, अशा कितीतरी अडचणी, पंथ निश्चित करतांना प्रत्यक्षात उद्भवतील !

ड) कितीही दक्षता घेतली तरी प्रमाण म्हणून मानल्या गेलेल्या पंथाला अधिक महत्व दिल्यासारखे वाटून, अन्य पंथांना गौणत्व दिले, असे त्यांच्या अनुयायांच्या मनांत आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे ज्या पंथाची शिकवण संस्थेत दिली जाते, त्या पंथाच्या मतानुयायांबद्दल, अकारण असूया, मत्सर, द्वेष, इ. विकार उत्पन्न होण्याची संभावना अगदीच नाकारता येणार नाही ! परस्पराबद्दल विद्यार्थ्यांत, श्रेष्ठ कनिष्ठ भाव, उत्पन्न होण्याचा संभव फार ! गैरसमज उत्पन्न होण्याची शक्यताच अधिक !

महाविद्यालयीन स्तरावर तुलनात्मक शिक्षण

प्रत्येक धर्मातील विविध पंथीयांच्या विशेष तत्त्वांचे व आचार धर्माचे ज्ञान या योजनेत विद्यार्थ्यांना द्यावे असा मार्ग कुणी सुचविल. ते तर खचितच उपकारक ठरेल ! पण तत्पूर्वी सर्व धर्माच्या समान तत्त्वांचा यथाशक्ती अभ्यास शाळेमध्ये विद्यार्थ्याकडून करून घ्यावयास हवा म्हणजे विविध धर्म परस्परविरोधी नसून, प्रकृती धर्माप्रमाणे विभिन्न व्यक्तींना एकाच सनातन अशा शाश्वत तत्वाकडे नेणारे, ते केवळ मार्ग आहेत, हे त्यांच्या मनावर प्रथम बिंबेल मॅट्रीक होईपर्यंत विशिष्ट वय व पक्वता विद्यार्थ्याने धारण केल्यावर मगच महाविद्यालयीन स्तरावर असे तुलनात्मक शिक्षण देणे उपयुक्त होईल ! महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी, शाळेत आध्यात्मिक शिक्षण योजनेच्या अभ्यासक्रमात विविध धर्माची सामान्य माहिती विद्यार्थ्यांला प्राप्त झालेली असेल. अशा वेळी सर्व धर्माची तुलनात्मक माहिती ग्रहण करून, त्यांच्यात समभाव निर्माण करण्याची बौद्धिक क्षमता व मानसिक स्थिती कॉलेज विद्यार्थ्यात उत्पन्न व्हावी, अशी अपेक्षा वावगी ठरणार नाही.

अशा वेळी इतर धर्म व पंथाचे ज्ञान झाले तर त्याच्या मनात त्यामुळे त्या पंथाबद्दल कलह वा कटुतेचे बीज पेरले जाण्याऐवजी सहिष्णुतेचा, सहकार्याचा भाव उत्पन्न होईल ! कुठलाही धर्म वा पंथ असो,

त्याबद्दल, स्वत:चा धर्म वा पंथ, यांच्या इतकीच आपुलकी व आदर त्यांना वाटू लागेल. मात्र हे शिक्षण देतांना, शिक्षकाने अत्यंत तटस्थपणे व अलिप्तपणे, हे ज्ञान दिले पाहिजे ! कसलाही अभिनिवेष त्यात प्रगट होता कामा नये ! एखाद्या विशिष्ट पंथांच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा दर्प, त्याच्या व्याख्यानाला यायला नको ! सर्वधर्मसमानतेचा भाव त्याच्या शिकवणुकीतून व्यक्त झाला पाहिजे ! म्हणजे विद्यार्थ्याच्या मनावर त्याचे प्रतिबींब पडल्याशिवाय राहणार नाही.

हे शिक्षण देखील पंथाचे स्थूल ज्ञान देण्यापुरतेच मर्यादित राहील. फार तपशीलात जाऊन सविस्तर माहिती देण्याची अपेक्षा राहणार नाही.

सर्व धर्माचे शिक्षण अव्यवहार्य

सारांश, एकाच धर्माची वा धर्मनिविष्ट पंथाची, शिकवण देणे ज्याप्रमाणे शक्य नाही त्याचप्रमाणे सर्व धर्मातील सर्व पंथांची व त्या त्या धर्मातील एका पंथाची शिकवण देणे देखील संभवनीय नाही ! पहिली बाब इतर धर्म वा पंथ यांच्या अनुयायांना अन्यायकारक म्हणून, तर दुसरी अव्यवहार्य म्हणून !

या ठिकाणी हे लक्षांत घेतले पाहिजे की भारतवर्षांत अनेक धर्मिय व विभिन्न पंथीय नागरिक असल्याने ज्या उपरिनिर्दिष्ट अडचणी उद्भवतात, त्यामुळेच सर्व धर्मातील अनुयायांची धर्म शिक्षणाची गरज भागविता येत नाही. व्यावहारिक दृष्टया ते अवघड आहे, म्हणून हा मार्ग योग्य नाही एवढेच ! असे सर्व धर्माचे शिक्षण कोणताही भेदभाव न ठेवता देणे, हे घटनाबाह्य मात्र नव्हे ! इतर एखाद्या निधार्मिक घटना असलेल्या लहान देशात, जर केवळ एक दोन धर्माचे अनुयायीच असतील तर तेथे त्या धर्माचे शिक्षण शासनाने स्वखर्चाने देणे, घटनाविरोधी ठरण्याचे कारण नाही ! भारतात ते शक्य नाही, ही गोष्ट वेगळी !

सर्वमान्य धर्मतत्त्वे म्हणजे काय?


सर्व धर्मांना मान्य अशा मूलभूत तत्वांचा अंतर्भाव नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या योजनेत करावा; ते व्यवहार्य व घटनेशी सुसंगत ठरेल, असा निष्कर्ष वरील विवेचनातून निघतो. परंतु या शिक्षणातील " सर्व धर्मांना मान्य अशी तत्वे, " म्हणजे नेमके काय ? हे फारसे कुणी

सारणी क्र. ६

भारताच्या निधार्मिक संविधानामुळे उद्भवणारे दोन मूलभूत प्रश्न व त्यांची सोडवणूक.

शासनातर्फे धर्म–अध्यात्म शिक्षण १. कोणत्या सीमेपर्यंत? २. कुणाच्या खर्चाने?

या प्रश्नांचे उत्तर ५ प्रकारे संभवते.



शासकीय खर्चाने देणे
घटनाबाह्य

व्यक्ती, संस्था वा धर्मपीठ यांच्या देणगीतूज दिल्यास घटनेशी सुसंगत !

शासकीय खर्चाने देणे
घटनाबाह्य

शासनाव्यतिरिक्त इतरांच्या अनुदानातून दिल्यास हरकत नाही.

चार प्रमुख अडचणी

अ

आमचाच पंथ प्रमाण समजावा म्हणून वाद माजल; संख्येनुसार अधिकृतता ठरविणे अवघड

ब

समजा एकवाक्यता झाली, तर इतर पंथीय विद्यार्थ्यांवर त्या पंथाचे ज्ञान लादणे अन्यायकारक

क

प्रमाण मानलेल्या पंथाचे विद्यार्थी बहुसंख्य आहेत तिथे अल्पसंख्यांकांची अडचण; मात्र उलट स्थिति असल्यास इतर पंथीय बहुसंख्य विद्यार्थी धर्मज्ञानापासून वंचित

ड

प्रमाणित पंथाला प्राधान्य; इतरांना गौणत्व दिल्याची अकारण भावना; तज्जन्य असूया, कलह इत्यादि.

घटनासंमत पण अव्यवहार्य म्हणून अयोग्य.

स्पष्ट केले नाही. *' Spiritual, spirit, moral, ethical '*. इ. शब्द अनेकांनी अनेक ठिकाणी वापरले आहेत. पण त्याचा निश्चितार्थ काय ? कारण ह्या शब्दांचा निधार्मिक म्हणविणाऱ्या अमेरिकन व रशियन शिक्षणक्षेत्रातही प्रचुरतेने वापर केला जातो.'अंतिम तत्त्व', 'मानवीआत्मा', 'जीवनाचे ध्येय' इ. शब्द प्रयोग कोठारी आयोगानेही वापरले आहेत, पण त्यातून नेमके काय ध्वनित होते हे कळत नाही !

" जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥ "

या समर्थोक्तीत निर्देशित केलेल्या सद्गुण संवर्धनापुरतेच या शब्दांचे अर्थ सीमित आहेत काय ? सद्गुणांचा अव्हेर करणारे व दुर्गुणांना स्पृहणीय समजणारे, सहसा कुणी नाही. मग या शब्दांनी खरोखरी आपणास काय अभिप्रेत आहे ?

सर्व धर्माना समान तत्त्वे

वरील शब्दांचे वैशिष्टय व श्रेष्ठत्व मनास पटत असूनही, त्यांचे रहस्य लक्षात येत नसेल तर, आपणास अधिक खोलात शिरले पाहिजे. म्हणजे सर्व धर्माना समान असलेल्या मूलभूत तत्त्वांमध्ये नीती व सद्गुण या व्यतिरिक्त पुढील गोष्टी आढळून येतात[२२].

१. पंचेन्द्रियांना ज्ञात होणाऱ्या सृष्टीव्यतिरिक्त परमेश्वराचे वा इतर कशाचे तरी सूक्ष्म अस्तित्व *(God head or ground)* आहे. व्यक्त भौतिक सृष्टीचे ते अव्यक्त असे तत्त्व आहे; व त्याचा या सृष्टीच्या व्यापाराशी घनिष्ठ संबंध आहे.

२. हे तत्त्व सर्वांतर्यामी, सर्वशक्तिमान व सर्वसाक्षी आहे.

३. मानव केवळ साडेतीन हात देहापुरताच संकुचित नाही; त्यातहीं अनेक सूक्ष्म थर आहेत.

४. मानवी देहाने या अव्यक्त तत्त्वाचे ज्ञान होणे, त्यावर प्रेम करणे व त्याच्याशी तादात्म्य पावणे शक्य आहे !

५. हे ज्ञान प्राप्त करून या सर्वशक्तिमान तत्त्वाशी तादात्म्य पावणे हे मानवाचे अंतिम ध्येय आहे ! सीमित व्यक्तित्त्वाचे अनंत देवत्वात

विलिनीकरण हे अखेरचे साध्य आहे! (*to merge finite individuality into infinite divinity*)

६. हे अंतीम साध्य प्राप्त करून ध्यावयाचे असेल तर त्याचा निश्चित असा कायदा आहे; निश्चित असा मार्ग आहे, ज्याचे अनुसरण करावयास हवे !

७. या मार्गाचे अनुसरण करावयाचे असेल तर काही दैवी गुणांची अपेक्षा असते !

८. माणसाच्या ठिकाणी बुद्धी, मन, प्राण व वाणी या ज्या चार शक्ती आढळून येतात,त्यांच्या ठिकाणी अनेक प्रकारची स्थूल, सूक्ष्म सामर्थ्ये आहेत. धर्मात त्यांची विविध प्रकारे वीण आहे. त्यांचा उपयोग अंतिम ध्येयाच्या प्राप्तीसाठी मानवाने करून घ्यावा.

९. पंचेन्द्रियांच्या अनुभूतीचे जे विश्व आहे. ते त्या अनुभूतीच्या बाहेर असलेल्या अस्तित्वाच्या (*realities*) प्रतीतीच्या बाबतीत 'आखाड्या सारखे' मशागतीचे क्षेत्र आहे ! म्हणजे मानवास जी काही परमार्थिक प्रगती करावयाची असते ती सर्व पंचेन्द्रियांच्या स्थूल विश्वात करावयाची असते. त्यामुळे अंतिम साध्याच्या प्राप्तीसाठी, निरपेक्षपणे केलेल्या त्यांच्या आध्यात्मिक साधनेचा लाभ, विश्वाची सुधारणा व उन्नती करण्याकडे अनायासे होतो.

धर्मतत्वे ठसविण्यामुळे जीवनात समृद्धता

प्रत्येक धर्माने आपआपल्या परीने वेगवेगळ्या स्वरूपात वरील गोष्टी धर्माचे हृदय म्हणून आजवर शिरोधार्य मानल्या आहेत. शील संवर्धन व व्यक्तित्व – विकास करीत असतांना सद्गुणांचा मूल स्रोत असलेली ही धर्म तत्वे, अंत:करणावर बिंबतील, अंगी मुरतील व आचरणात दृग्गोचर होतील, याची दक्षता या योजनेत घ्यावयास हवी. या तत्वाचे बीजारोपण विद्यार्थी दशेत खोलवर झालेले असले, तर भावी जीवनात विद्यार्थी उच्च आध्यात्मिक भूमिका गांठून सामाजिक व राष्ट्रीय जीवनास अमोल असे सहकार्य देऊ शकतो. एक उदाहरण घेऊ. परमेश्वर प्राप्तीसाठी ईश्वरात वास करत असलेले प्रेम, दया, सत्य, अहिंसा, सामर्थ्य, संयम इ. गुणांचा अभ्यास भक्ताला करावा लागतो व

पुढे तो त्याचा स्वभाव होऊन, या दैवी संपत्तीची तर, 'भक्त' जवळजवळ साकार मूर्तीच बनतो ! पंचभौतिक सृष्टीला त्याचा सहजच लाभ मिळून, मानवी जीवन त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न होते.

सर्व शिक्षणाचा केन्द्र बिंदु

अशा प्रकारे धर्म तत्त्वांचा जर व्यक्तीला व अनुषंगाने समाजाला लाभ मिळावयाचा असेल, तर शिक्षण–विशेषत: उच्च शिक्षण–उपरिनिर्दिष्ट 'अंतिम साध्य' वा 'परमेश्वर' या केन्द्रबिंदूभोवती गुंफले गेले पाहिजे. श्री. हॅरी एन्हरसल्ट[१३] यांनी हा मुद्दा विशद करतांना म्हटले आहे,

" Here then is the basic point about which the higher learning in the small endowed colleges must revolve – namely, the idea of God. Here is the heart and soul of higher education, for here is the one form of education capable of lifting society from the depth of hedonism."

समाजाला निम्न स्तराहून, उच्च पातळीवर नेणाऱ्या, ईश्वर-विषयक उच्च भावनेच्या भोवती, जर महाविद्यालयीन जीवन भारले गेले असेल, तर या धर्मतत्वांची प्रत्यक्ष प्रचीती विद्यार्थ्याला येऊ लागते. कारण धर्म ही अनुभवाचीच बाब आहे ! स्वामी विवेकानंद[१४] म्हणातात,

" Religion should be a living experience with oneself. It is being and becoming. It is realisation."

हा धर्माचा, आध्यात्मिक जीवनाचा अनुभव महविद्यालयीन शिक्षणात विद्यार्थ्यांना घडविला पाहिजे ! या अनुभवाला अनुकूल असा अध्यात्म शिक्षणाचा कार्यक्रम शिक्षण संस्थांनी आखला पाहिजे. संगीत, रसायन–शास्त्र, यासारख्या प्रयोगक्षम विषयासाठी जर आपण प्रात्यक्षिकांची *(Practical)* व्यवस्था करतो, तर मग मानवी अनुभवाच्या कक्षेत येऊ शकणाऱ्या आध्यात्मिक अनुभवाची योजना शिक्षणात अंतर्भूत का करू नये ? या मुद्याचे मंडन करतांना विश्वविद्यालयीन जीवनाचा सखोल अभ्यास केलेले श्री. होमर पी. रैने[१५] या अमेरिकन विद्वानाने लिहिले आहे,

" Religion is also a matter af " experience-getting " of living creativity..... It must provide the facilities for acquiring religious experiences, and further more, it

must stimulate and encourage students in the acquisition of these experiences."

सर्व धर्मियांच्या आध्यात्मिक अनुभवात एकवाक्यता असते हे आपण पाहिलेच आहे. तेव्हा इतर सर्व विषयापेक्षा सर्वंच दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या या महत्वपूर्ण विषयाचे ज्ञान शासनाने स्वखर्चाने देणे हे त्याचे परम कर्तव्य नव्हे का ?

योजना कुणाच्या खर्चाने ?

दुसरा वादाचा मुद्या असा की, धर्म निरपेक्ष घटना आपण मान्य केली असल्याने धार्मिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी योणारा खर्च शासनाद्वारे होणे रास्त होईल काय ? वर उल्लेखिलेले सर्व धर्मातील समान तत्वांचे शिक्षण देणे घटना विरोधी नाही, याचा उहापोह यापूर्वी केलाच आहे. विभिन्न धर्मियात सामंजस्य व बंधुत्व उत्पन्न होण्यास असे शिक्षण सहाय्यकच ठरते, हे तत्व एव्हांना वाचकांना मान्य व्हावयास हरकत नाही !

दुसरे असे की, भौतिक विचारसरणीने झपाटलेल्या आजच्या भारतीयाला विज्ञानाच्या नवनवीन शोधामुळे फार तर आर्थिक प्रश्न सोडविता येतील, परंतु आध्यात्मिक दृष्टया तो उपाशीच राहील ! धर्म वा अध्यात्म हा भारत वर्षाचा केवळ आत्माच आहे. अध्यात्मज्ञान विरहीत असलेला भारत म्हणजे "प्राण सोडून गेलेले कलेवरच !" प्राचीन कालापासून अध्यात्म विद्या या भूमीत विकसित झाली, जोपासली गेली, यच्चयावत सर्व देशांनी भारतीयापासून ही विद्या ग्रहण केली. हिन्दुस्थान या क्षेत्रात नेहमीच जगद्गुरुपद भूषवीत आला आहे. सत्य अहिंसा, मानवता यांचा दिव्य संदेश अखिल विश्वाला देण्याचे कार्य भारतानेच आजवर केले आहे. मानवाला अंतिम सुखाचा व कल्याणाचा मुख्य मार्ग निरपेक्षपणे नित्य प्रगट करण्याचे हेच कार्य भारताला पुढेही अंगिकारावयास हवे ! कारण भारताचे ते एकमेव वैशिष्टच आहे !

भारतीय वैशिष्टच जोपासण्यासाठी

भारताचे हे वैशिष्टच जर टिकवायचे असेल तर आजच्या विज्ञान युगात, मानवी जीवनातील नष्ट होत चाललेली ही आध्यात्मिक मूल्यें,

जतन केली पाहिजेत. वरं उल्लेखिलेल्या धार्मिक शिक्षण समितीने या संदर्भात लिहितांना नमूद केले आहे की,

"The exaggerated emphasis on material values in modern life could be offset only if spiritual values were given their right place in an educatianal institution ..... The committee thougt that while utilitarian type of training might aim at fitting an individual to fulfill his economic functions in the form of social organisation in which he lives, it may tend to starve the spiritual side of his nature which. is true bond of unian between him and his fellow men."

भारताचे केवळ प्राणच असलेले अध्यात्म-शास्त्र, भारतातच उपेक्षित राहू नये व भारतीय त्यापासून वंचित राहू नये, म्हणून अध्यात्म शिक्षणाची व्यवस्था, सर्व शिक्षण संस्थामधून, शासन संस्थेने, धर्मातीततेचे बिरुद लावलेले असले तरीही, स्वखर्चाने केली पाहिजे ! सर्व धर्माना समान असलेल्या तत्वांचीच शिकवण या योजनेत दिली जाणार असल्याने, शासनाच्या धर्मातील घटनेला त्यामुळे बाध येण्याचेही कसलेच कारण नाही !

स्वधर्माच्या यथार्थ मूल्यमापनासाठी

धार्मिक इतिहास, तत्वज्ञान वगैरे महाविद्यालयातून शिकविण्याने आणखी एक लक्षात येण्याजोगा फायदा असा की, धर्मातील खरी-खोटी व्यंगे, वेळी अवेळी चव्हाट्यावर आणून, कोवळ्या मुलामुलींची मने कलुषित करण्याचे कार्य, जे अनेक वेळा सुरु असते, त्याचे योग्य ते मूल्यमापन करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यात येईल ! प्रत्येक धर्माला शत्रू हे असतातच ! नि कोणताही धर्म पूर्णपणे निर्दोष नसतोच ! कारण कोठेही गेले तरी पळसाला पाने तीनच ! उदा:– चमत्कारिक कथा, काही एकाच धर्मशास्त्रात नाहीत सर्व धर्मग्रंथात आहेत. पण स्वधर्माचे दोष लपवून परधर्माचे दोष ठळकपणे मोठे करून दाखविणे, हे समाजात सरास सुरू असते !

परंतु धर्माचे यथार्थ ज्ञान होऊन 'घरोघर मातीच्याच चुली'

असतात; हे तत्व एकदा कळले म्हणजे स्वधर्मातील दोष पाहून परधर्माकडे विद्यार्थी एकदम धाव घेणार नाहीत ! आपल्या धर्माविषयी अनुदार व भलते सलते उद्‌गार काढणार नाहीत ! आज असे फार होतांना दिसते. स्वधर्मावर केलेले खोटे आरोप, खोटे कसे ? हे मुलांना समजणे आवश्यक आहे ! धर्मातील खरी व्यंगेही समजणे तितकेच आवश्यक आहे. पण, आई जशी आपल्या मुलांची व्यंगे दाखविते, त्या प्रेमाने, विपरित परिणाम होणार नाहीत, अशा दक्षतेने कळावीत ! कजाग सावत्र आईप्रमाणे नव्हे !

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून शासनाच्या गंगाजळीतून, सर्व धर्मातील मूलभूत अशा सामान्य तत्वांचे ज्ञान, प्राथमिक व माध्यमिक अवस्थेत व विविध धर्माचे वैशिष्टय दाखविणारे तौलनिक ज्ञान, महाविद्यालयीन अवस्थेत देणे, उपयुक्त ठरेल, हे आपण पाहिले. परंतु एखाद्या धर्मातील विशिष्ट पंथाच्या शिक्षणाबाबत शासनाचे धोरण काय असावे ?

विशिष्ट पंथाच्या शिक्षणाची मुभा

एखाद्या विशिष्ट पंथाच्या तत्वज्ञानाचे व आचार शास्त्राचे ज्ञान देण्याचे कार्य प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या कुटुंबात स्वगृही मिळावे, हे उत्तम ! पण एखाद्या विशिष्ट पंथीयांच्या समाजाला, जर हे ज्ञान , शिक्षण संस्थेत मिळावे, अशी इच्छा असेल तर तशी मुभा शासनाने द्यावी ! फक्त त्यासाठी येणारा खर्च मात्र त्या समाजानेच उचलावा. असे शिक्षण देण्यासाठी नेमाव्या लागणाऱ्या शिक्षकांचे वेतन व इतर चिल्लर खर्च मुख्यत: त्या समाजाने आपसात वर्गणी, वा देणगी देऊन भागवावा ! उदा :- जैन बांधवांनी आपल्या गावातील शाळेत वा कॉलेजात, शिकणाऱ्या जैन विद्यार्थ्यांसाठी, जैन पंथीयांचे ज्ञान देण्याची, मुख्याध्यापक वा प्राचार्यांना विनंती केली, तर ती कोणत्याही शिक्षणसंस्थेने नाकारता कामा नये, अशा प्रकारचे शासनाने आदेश द्यावेत. मात्र असे शिक्षण सुरू करण्यापूर्वी, त्या समाजाने शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या निदान दोन महिने आधी, वर्षभराचा खर्च भागविता येईल एवढी रक्कम, संस्थेच्या चालकांजवळ

जमा करावी. हा खर्च यथायोग्य होत आहे व शिक्षण कसे दिले जात आहे, हे पाहता यावे यासाठी, अशा समाजाच्या एक दोन प्रतिनिधींना काही अधिकार देऊन सुयोग्य अशी यंत्रणा उत्पन्न करता येईल ! हे पंथीय धर्म शिक्षण देण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या शिक्षकाची नेमणूक करतांना; त्या समाजाच्या प्रमुखाशी विचार विनिमय करणे इष्ट होईल ! ठेव म्हणून ठेवलेली रक्कम सत्कारणी खर्च होत आहे याची शहानिशा, त्या समाजातील प्रतिनिधींना करता आली पाहिजे ! त्या समाजाच्या आर्थिक सहाय्यानेच हे शिक्षण दिले जात असल्याने, हे शिक्षण, यथायोग्य खर्च होऊन, त्यांच्या अपेक्षेप्रमाणे दिले जात आहे, हे पाहण्याचा त्या समाजाला खचितच अधिकार आहे, तो आपण मान्य केला पाहिजे !

पण त्या पंथाच्या खर्चाने

थोडक्यात असे म्हणता येईल की, सर्व धर्मांना समान असलेली मूलभूत मानवी तत्त्वे व मूल्ये, यांचे शिक्षण देण्यासाठी, शासनाने संपूर्ण खर्च करावा व एखाद्या विशिष्ट धर्माचे वा पंथाचे ज्ञान देण्यासाठी, त्या त्या धर्मियांनी वा पंथीयांनी, स्वखर्चाने व्यवस्था करावी ! शासन अशा शिक्षणासाठी कपर्दिकही खर्चणार नसले, तरी असे शिक्षण देण्यासाठी शासनाची आडकाठी मात्र राहणार नाही ! नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेत, शासन व समाज, यांना हे धोरण किमानपक्षी, मान्य व्हावयास हरकत नाही! मागिल पृ. २४० व २४१ वरील सारणी क्र. ६ वरून या दोन्ही प्रश्नांचे स्वरूप, एका दृष्टिक्षेपात ध्यानात येऊ शकेल.

आपल्या घटनेमध्ये सद्सद्विवेकबुद्धीनुसार *(Conscience clause* अन्वये) वागण्याचे जे स्वातंत्र्य प्रत्येकाला बहाल केले आहे ते अबाधित ठेवण्यासाठी, कोणत्याही पालकाला या योजनेमधून, आपल्या पाल्याला वगळता येईल ! अर्थात या शिक्षणाद्वारा होणाऱ्या सुसंस्कारापासून आपला मुलगा वंचित रहावा असे वाटणाऱ्या नागरिकांची संख्या अत्यल्प राहील हे उघड आहे !

शिक्षण नको असणाऱ्यांची व्यवस्था

हे शिक्षण नको असलेल्या या विद्यार्थ्यांना आध्यात्मिक शिक्षणाचा वर्ग सुरू असतांना, कसे नि कुठे गुंतवून ठेवावे, हा प्रश्न कांही जण

कदाचित उपस्थित करतील. ग्रामीण शाळा व महाविद्यालयामध्ये अशी संख्या व त्यामुळे उद्‌भवणारा हा प्रश्न बहुधा राहणारच नाही. देव, धर्म, नीती इ. सर्व, केवळ भ्रामक कल्पना आहेत, असे मानणारे नास्तिक नागरिक, मोठ्या शहरात आढळण्याचा संभव अधिक ! त्यांची संख्याही राहणार थोडीच ! त्यांचे पाल्य-विद्यार्थीही, मोजकेच राहणार! आध्यात्मिक वर्ग सुरू असतांना त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून, खालील तीन प्रकारे त्यांची व्यवस्था करता येईल !

अ) एक तर शाळेच्या प्रारंभी वा अखेरीस, हे वर्ग ठेवण्यात आले तर तितके शाळेत उशीरा येवून वा लवकर जाऊन, हे नको असलेले वर्ग त्यांना टाळता येतील !

ब) वेळा पत्रकात अशी व्यवस्था करता येणे शक्य नसेल व काही शिक्षक स्वेच्छेने तयार असतील तर, सामान्य शिक्षण *(General Education)* देता आल्यास उत्तम! अभ्यासित असलेल्या ज्ञानशाखे-शिवाय *(Faculty)* इतर शाखांचे ज्ञान होऊन, विविध शास्त्रात समन्वय साधता यावा म्हणून, अशा शिक्षणाचा केंद्रिय शासनानेच पुरस्कार केला आहे. कुणाही पालकाची त्याबद्दल सहसा तक्रार असण्याचे कारण राहणार नाही !

क) वरील दोन्ही गोष्टी शक्य नसतील तर अशा विद्यार्थ्यांना वाचनालयात किंवा बैठे खेळ *(Indoor Games)* खेळण्यात गुंतविता येईल. एक तर शहरातील मोठ्या शाळांतून अशी व्यवस्था बहुधा उपलब्ध असते . नैतिक शिक्षण नको असलेल्या मोठ्या शहरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांत उपलब्ध असलेल्या ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी, वा विविध खेळ खेळण्यासाठी आवाहन करणे, उपयुक्त ठरेल! शिवाय आठवड्यातून नैतिक शिक्षण फार तर २ तासच दिले जाणार असल्याने, अशा विद्यार्थ्यांचा प्रश्न फारसा बिकट होण्याचे कारण नाही !

महाविद्यालयात वरील तीन्ही गोष्टी अमलात आणण्याचे देखील सहसा काम पडणार नाही. कारण इतर न घेतलेल्या ऐच्छीक विषयांचा तास मोकळा असतांना, तो ज्याप्रकारे, विविध मार्गांनी आपला वेळ

घालवितो तसाच, तो नैतिक शिक्षणाचे तास सुरू असतांना, आपला वेळ अन्य गोष्टीत व्यतीत करू शकेल ! महाविद्यालयापेक्षा शाळांतून नि अशा शाळांपैकी मोठ्या शहरातील मोठ्या शाळेमधील मुख्याध्यापकांनाच, हा प्रश्न हाताळण्याचे काम पडण्याचा संभव आहे. नि अशा प्रचंड शाळांमध्ये, वेळ सन्मार्गी लावण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध असतात!

विद्यार्थ्यांचे तीन गट

वरील सर्व विवेचनावरून आध्यात्मिक व नैतिक शिक्षण योजनेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे साधारणपणे खालील तीन गट पडतात.

१. सद्सदविवेकबुद्धिच्या स्वातंत्र्यानुसार *(Conscience Clause)* पालकांच्या इच्छेप्रमाणे या योजनेत सहभागी न होणारे विद्यार्थी !

२. एखाद्या विशिष्ट धर्म वा पंथाच्या समाजातर्फे सर्व खर्च सोसून त्या विशिष्ट धर्माचे वा पंथाचे देण्यात येणारे शिक्षण घेणारे विद्यार्थी !

३. सर्व धर्माच्या अनुयायांना मान्य असलेल्या नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे शिक्षण देण्यासाठी शासनाने, स्वखर्चाने, आखलेल्या सार्वत्रिक अध्यात्म शिक्षण योजनेत समाविष्ट होणारे विद्यार्थी !

अखेरच्या गटाचा मुख्यतः विचार

वरील तीन्ही गटापैकी तिसऱ्या शेवटच्या गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही सर्वात अधिक राहील, हे उघड आहे ! नि त्यांच्याच बाबतीत योजनेची अंमलबजावणी कशी करावी याचा विचार आपण करणे इष्ट होईल. कारण दुसऱ्या गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना अभिप्रेत असलेले धर्म वा पंथाचे शिक्षण कसे द्यावे, हे त्या त्या धर्माचे वा पंथाचे धुरीण ठरवितील. असे शिक्षण स्थलकालाप्रमाणे व पंथाच्या धर्मकल्पनेनुसार साहजिकच बदलत राहणार ! त्यामुळे अशा पंथीय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा विचार या ग्रंथात करण्याचे कारण नाही.

या योजनांतर्गत शिक्षण कुणाला, कुणाकडून व कुणाच्या खर्चाने द्यायचे ? यासंबंधीचे तपशीलवार विवेचन केल्यावर, आध्यात्मिक शिक्षण योजनेच्या अमलबजावणीचा विचार करण्यासाठी, योग्य ती पार्श्वभूमी तयार झाली असे म्हणावयास हरकत नाही !

शासनाच्या शिक्षण योजनेच्या कक्षेत मोडणारे, जे तिसऱ्या गटातील बहुसंख्य विद्यार्थी, त्यांच्याच दृष्टीने आता विचार करावयास हवा ! ही योजना प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंत, सर्व शिक्षणसंस्थात कशाप्रकारे अमलात आणता येईल या व्यावहारिक प्रश्नाकडे आता दृष्टी वळवू ●

संदर्भ टीपा

१. *University Education Commission's Report, p. 300 & 303.*

२. *Aldous Huxley : Ends and Means; p. 111–112.*

३. *Dr. Radhakrishnan : The Hindu View of Life; p. 41.*

४. *Auribindo : Reason beyond reason; p. 49.*

५. वरप्रमाणे पहा; पृ. ५७.

६. *In Everson V. Board of Education 330, U. S. I. (1947) at 16, Quoting from Reynolds V. United States, 98 (U. S.) 164 (1879).*

७ *J. M. Shelat, Justice, Supreme Court; Record of Proceedings of All India Colloquium held by Bharatiya Vidya Bhawan; p. 161.*

८. *A. E. Taylor : Gifford Lectures; Faith of a Moralist; Ibid; p. 140.*

९. *John Grigg : Religion and Secularism; published in Bhavan's Journal dt. 4 th December 1966.*

१०. *M. Ruthnaswamy : in a poper read in All India Colloquium held by B. V. Bhavan; p. 150.*

११. सौ. लीला पाटील व श्री. ह. शहाणे : प्रचलित शैक्षणिक समस्या (शिक्षणातील वाद, शोध व बोध); पृ. १४२–१४३.

१२. *Naik aud Narullah : A History of Education in India; p. 724.*

१३. *Introduction to the Memorandum on the post war Educational development in India; 1943.*

१४. *Memorandum on the post-war Educational Development; p. 142–143.*

१५. *Report of the Secondary Education Commission; Oct 1952–June 1953; p. 125.*

१६. वरप्रमाणे पृ. १२६.

१७. *University Education Committee (Dr. Radhakrishnan) on Moral Education; p 294–295.*

१८. *University Education Commission Report (Dr. Kothari); p. 20.*

१९. वरप्रमाणे; पृ. ६

२०. वरप्रमाणे; पृ. १९.

२१. *Report of the Religions Education Committee of the Central Advisory Board of Education in India; 1945; Pamplet No. 13.*

२२. डॉ. त्र्यं. ग. पंडे : नैतिक व धार्मिक शिक्षणाची समस्या, या अप्रकाशित ग्रंथाच्या आधारे.

२३. *Harry K. Eversult : The Inauguration speech as Ninth President of Marietta College; p. 38.*

२४. *The Complete works of Swami Vivekananda; p. 43.*

२५. *Homer P. Rainey : The New Educational Program at Bucknell Un. Chapter VI in 'Needed Readjustment in Higher Education ' ed. W. S. Gray; p. 86.*

आठ

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय व तत्प्राप्तीचे साधन : मन

" विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते।। "

ईशावास्योपनिषद् [१]

अर्थ:– विद्या व अविद्या ही दोन्ही एकमेकासह वर्तमान ज्याने जाणली तो अविद्येने मृत्यूस तरून जाऊन विद्येने (ज्ञानाने, वैराग्याने) अमृत (आत्मसुख) मिळवितो.

" *What do we find in modern India ? An education directed to one part of the boys nature only, developing the intelligence, training the intellect but leaving entirely on one side the spiritual, moral and emotional nature. ..... What sort of a nation can you have where the education given to its young is but one quarter of what it should be ?* "

Dr. Annie Besant [२]

मागील प्रकरणांचा मागोवा

मागील प्रकरणांचा मागोवा आपण प्रथम घेऊन उरलेल्या विवेचनाची वाटचाल वाचकांना दिग्दर्शित करणे येथे संयुक्तिक होईल. भारतातील शिक्षणाचे प्राचीन काळापासून सिंहावलोकन करून, मुस्लीम व इंग्रज राजवटीत, आदर्श अशा भारतीय शिक्षण व्यवस्थेला आलेल्या अवकळेमुळे आज ती समस्यांची समस्या कशी होऊन बसली आहे व त्यावर शिक्षणाचे 'आध्यात्मिकरण' हाच रामबाण उपाय कसा आहे याचे विवेचन करून आपण प्रतिपाद्य विषयाचा पहिल्या प्रकरणात उपोद्घात केला.

ग्रंथाचा पहिला भाग

तदनंतरच्या तीन प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणच का? याचे मुख्यत्वेकरून तात्विक विवेचन आपण केले. दुसऱ्या प्रकरणात नैतिकता म्हणजे काय हे सांगून कुटुंब व शिक्षण संस्था यांत नैतिकता कशी विकसित करता येईल; तसेच 'शिक्षा' व 'बक्षिसांचा' त्यासाठी कितपत उपयोग होऊ शकतो याचा विचार आपण केला. नैतिकतेचे प्रयोजन आत्मसुख असून तिचे अधिष्ठान धर्मच आहे व सर्वधर्मसमभाव बाळगून आचरलेल्या धर्म सिद्धांताचा समाजानुकूल परिणाम

कसा होतो हे तिसऱ्या प्रकरणात पाहिले. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणामुळे मानवी जीवनाच्या मुळालाच पाणी घातल्यासारखे होत असल्याने त्याच्या विविध शाखा, सत्कर्मरूपी फळाफुलांनी कशा सुरेख पल्लवित होतात, याचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न आपण चौथ्या प्रकरणात केला. जीवनातील, विशेषत: भारतीयांच्या, बहुतेक समस्या मोडविण्यास हे शिक्षण सहाय्यभूत होऊ शकेल हे त्यामुळे कळावे.

दुसऱ्या भागाचे स्पष्टीकरण

दोन, तीन, व चार या तीन प्रकरणांचा एकत्रित विचार करता नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा आम्ही का एवढा आग्रह धरतो आहोत याची तात्विक मीमांसा स्पष्ट व्हायला मदत होईल. पण एखादी गोष्ट जितकी मूलभूत व महत्वपूर्ण तितकी ती अमलात आणणे अवघड असते. भारतीय जीवनाची संपूर्ण विस्कटलेली घडी मजबूत पाया घालून पुन: नीटनेटकी बसविणे, हे जुने उध्वस्त झालेले घर नव्याने बांधण्यासारखे कठीण कार्य ! एखादी वस्तू पूर्णपणे नवीन तयार करणे त्यामानाने सोपे ! अयोग्य मार्गाने बराच पुढे जाऊन फार बिघडलेल्या तरुणाला ज्याप्रमाणे पुन्हा सन्मार्गाला आणणे हे कार्य–पहिल्यापासून आपल्या हाती असलेल्या अजाण तरुणाला वळण लावण्यापेक्षा–जसे अधिक अवघड तद्वतच राष्ट्राबद्दलही म्हणतां येईल ! चुकीच्या रस्त्याने बऱ्याच पुढे गेलेल्या राष्ट्राची उभारणी करणे–पूर्ण नव्या राष्ट्राला घडविण्यापेक्षा–केव्हाही दुर्घट होणार ! थोडक्यात म्हणजे भारतीय जीवनाला पायाभूत अशा ह्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अंमलबजावणीत अनेक अडचणींचा डोंगर आपल्याला ओलांडावा लागणार हे ओघाने आलेच !

आणि त्यासाठीच ग्रंथाचा दुसरा भाग खर्ची पडला आहे. या भागात एकूण प्रकरणे तीन–पाचवे, सहावे व सातवे. त्यातील पाचव्या व सहाव्या प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेत येणाऱ्या अडचणी व त्यांचे निवारण कसे करावे याचे सविस्तर विवेचन आपण केले. तसेच भारतीय संविधान 'निधार्मिक' असल्याने, आपल्या विषयाच्या संदर्भात, या संज्ञेचा कोणता अर्थ होतो व त्यामुळे कोणत्या

व्यावहारिक अडचणी उद्भवतात, याचा उहापोह आपण मागच्या सातव्या प्रकरणात केला.

तिसऱ्या भागात ध्येय व अभ्यासक्रम

आता सुरू होत आहे तो ग्रंथाचा तिसरा भाग. हा अखेरचा असला तरी तितकाच महत्वाचा आहे. या भागात एकूण प्रकरणे चार. चालू असलेल्या आठव्या प्रकरणात, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे अंतिम ध्येय व ते प्राप्त करण्याचे प्रमुख साधन जे मन, त्याचा विचार व्हावयाचा आहे. पुढल्या नवव्या प्रकरणात ध्येय प्राप्तीसाठी त्याच्या साधनाचा–मनाचा–उपयोग करून घेता यावा म्हणून या 'शिक्षण–योजनेच्या' विविध शैक्षणिक अवस्थांसाठी अभ्यासक्रम कोणता असावा ? याचे दिग्दर्शन केले आहे. परंतु केवळ अभ्यासक्रम शिकविल्याने शिक्षणाचे नियोजित ध्येय साध्य होणार नाही. त्यामुळे या शिक्षणक्रमाला पूरक असे आणखी कोणते सहाय्यक कार्यक्रम शिक्षण संस्थांनी हाती घ्यावे ? या प्रश्नाच्या उहापोहासाठी दहाव्या प्रकरणाचा उपयोग केला आहे. अकराव्या प्रकरणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा प्रयोग कुठे कुठे केल्या गेला व त्याला कितपत यश मिळाले याची माहिती दिलेली आहे. या तिसऱ्या अखेरच्या भागाने ग्रंथाचा प्रमुख गाभा संपुष्टात येतो.

मग उरते ती फलनिष्पत्ति ! ती बाराव्या प्रकरणात सांगितली आहे. त्यापूर्वीची अकरा प्रकरणे म्हणजे जनता जनार्दनाला भक्तीने सद्भावनारूपी सुगंधाने वाहिलेली 'एकादशणी' ! नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेतील 'एकादश पुष्पांची' ही माला जर समाजपुरुषाने धैर्याने, निष्ठेने स्वीकारली, तर सुग्रीवाप्रमाणे तो प्रसन्न, बलसंपन्न व विजयी होईल असा विश्वास वाटतो !

(१) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय

जीवनध्येय होकायंत्रासारखे

आता आपण चालू प्रकरणाकडे वळू. सर्व प्रथम नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय कोणते, याचा विचार करावयास हवा. तो करण्यापूर्वी आपण हे लक्षात घेतले पाहिजे, की प्रत्येक राष्ट्राच्या प्रकृतीनुसार

वा वैशिष्ट्यानुसार, त्या राष्ट्रातील नागरिकांचे 'जीवन ध्येय' ठरत असते. त्या राष्ट्रातील संस्कृतीशी ते सुसंगत असते. त्या राष्ट्राचा इतिहास व परंपरा यांच्यातून ते आविर्भूत झालेले असते. या जीवन ध्येयामुळे राष्ट्राला होकायंत्राप्रमाणे नेमके कोणत्या दिशेने पाऊल टाकायचे हे कळते. राष्ट्रातील सर्व कला व शास्त्रे यांना निश्चित दिशा देण्याचे महत्वाचे कार्य हे ध्येय करिते. जीवनाच्या सर्व अंगांचा विकास या ध्येय पूर्तीकरता व्हावा अशी अपेक्षा असते. ध्येयाने समाज जीवनाला घातलेली चौकट ओलांडणे कुणालाही हितावह नसते. देशाच्या 'जीवन-ध्येयाचा ध्रुवतारा' अंत: करणाच्या आसनावर अढळपणे बसवून त्याच्या प्रकाशात देशातील सर्व घटकांनी सर्व क्षेत्रांत आपल्या जीवनाचा मार्ग चोखाळावा अशी धारणा सर्वत्र उत्पन्न होणे अगत्याचे आहे. शिक्षण हे क्षेत्र त्याला अपवाद कसे असू शकणार ?

जीवन ध्येयापासून शिक्षणाची फारकत

साहजिकच भारतीय विचारवंतांनी, मानवी जीवनाचे जे अंतिम साध्य निश्चित केले, तेच साध्य शिक्षणानेही आपल्या डोळ्यासमोर ठेवले पाहिजे, अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली आहे. 'मानवी जीवन' व 'मानवी शिक्षण' यांच्या ध्येयात परिपूर्ण एकवाक्यता असायला हवी ! या दोन्ही-च्या अंतिम उद्दिष्टात फारकत असता कामा नये हे भारतीय सत्पुरुषा प्रमाणेच विदेशी तत्वज्ञांनीही प्रतिपादन केले आहे. नि ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे ! कारण 'शिक्षण हे जीवनाला' पूरक नि सहाय्यक ठरले पाहिजे ! त्यात जर परस्पर विरोध उत्पन्न झाला तर यशस्वी जीवनाचा प्रारंभ व परिपूर्ती करायला ते शिक्षण निरूपयोगी ठरेल !

आणि तसेच तर आज आपल्या शिक्षणाचे झालेले नाही ना ? आजचे शिक्षण जीवन यशस्वीपणे जगायला का समर्थ ठरत नाही ? थोडेफार समजायला लागल्यापासून सुमारे १६ वर्षे अखंडपणे शिक्षण घेऊन अत्युच्च पदवी प्राविण्याने संपादन करूनही, आजचा विद्यार्थी दैनंदिन जीवनाच्या व्यवहारात, अपयशी का होतो? ध्येय विहीन, विफल व विमनस्क अशी त्याची मन:स्थिती का होते ? आजचे शिक्षण भारतीय विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास का घडवू शकत नाही ? निश्चितच कुठे

तरी फार मोठी चूक होत आहे ! मूलभूत दोष राहून गेला आहे. कुठे तरी गल्लत झाली आहे.

नि थोडा बारकाईने विचार केला तर ही चूक इतर कोणतीही नसून वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षणाने मानवी जीवनाच्या अंतिम उद्दिष्टांकडे पाठ फिरवली ही होय ! इंग्रजापासून अमलात आलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीने भारतीय जीवन प्रणालीत आजवर अनुस्यूत असलेल्या, अंतिम आदर्शाकडे डोळेझांक केली हे होय! 'साध्याकडे दुर्लक्ष' होताच शिक्षणाचे मार्ग व पद्धती बदलत गेल्या; त्याचा दुष्परिणाम अनेक प्रकारांनी आज समाजाला भोगावा लागत आहे. चुकीच्या दिशेने सुरू असलेल्या शिक्षणाचे घातक असे भयावह परिणाम गेल्या शे-दीडशे वर्षांच्या काळात मानवी जीवनावर झाले आहेत. ते अल्पांशाने का होईना कमी करण्यास नैतिक व आध्यात्मिक शिक्षण महत्वपूर्ण कार्य करू शकेल!

ध्येयात समानता

सारांश, 'भारतीय जीवनाचे' जे ध्येय तेच 'भारतीय शिक्षणाचे' ध्येय असले पाहिजे आणि 'भारतीय शिक्षणाचे' जे ध्येय तेच ध्येय अंतिमतः 'नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे' राहणार! कारण हे शिक्षण अखेर संपूर्ण शिक्षण पद्धतीचा एक अल्पांशच नाही का ? आपआपल्या क्षेत्रांत कार्य करून सर्वांनी अंतिम साध्य गाठण्यास सहयोग द्यावा ही अपेक्षा ! भारतीय शिक्षणाने विद्यार्थी असा घडवावा की जेणेकरून त्याला आपल्या भावी जीवनात भारतीयांचे जे 'अंतिम साध्य' ते गाठण्यास सहाय्य व्हावे.

भारतीय 'जीवन ध्येय' प्राप्त करण्यास लायक असा विद्यार्थी तयार करणे हे जे शिक्षणाचे उद्दिष्ट ते अधिक तत्परतेने, वेगाने व जाणीवपूर्वक साध्य करण्यास नैतिक व आध्यात्मिक शिक्षण सहाय्यभूत ठरते, म्हणूनच एकंदर शिक्षण व्यवस्थेत या शिक्षणाचे विशेष असे आगळे स्थान असावे असा आग्रह ! हे वेगळे स्थान कसे नि का असावे हे पुढे यथावकाश पाहूच!

साक्षात्कारी सत्पुरुषांचे मत ग्राह्य

सर्वप्रथम भारतीय शिक्षणाचे उद्दिष्ट काय? असा प्रश्न उपस्थित होतो. भारतीय जीवनाच्या अंतिम ध्येयाचा ज्यांना साक्षात्कार झाला त्या सत्पुरूषांना भारतीय शिक्षणाच्या उद्दिष्टांचे जसे यथार्थ आकलन

झाले असेल तसे इतरांना क्वचितच होण्याचा संभव ! त्यामुळे शिक्षणच काय, कोणत्याही क्षेत्रातील अंतिम ध्येयाचा भारतीय दृष्टिकोणातून उलगडा करून घ्यावयाचा असेल तर त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व विचारवंतांनी भारतातील साक्षात्कारी सत्पुरुषांच्या मूलगामी विचार धनाचा लाभ घेणे जनहिताचे ठरल्याशिवाय राहणार नाही ! भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे तर केवळ भारतीयच नव्हे, तर संपूर्ण मानव जातीचे अंतिम ध्येय एकच आणि ते म्हणजे आत्मज्ञानप्राप्ती वा मोक्ष– मग त्याला देशधर्मपरत्वे नाव कोणते का दिलेले असेना ! मागे एका ठिकाणी स्पष्ट केल्याप्रमाणे सर्व देशातील सत्पुरुष हे या एकाच ध्येयाचे प्रवासी असल्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक अनुभवात, अंतिम ध्येयाच्या प्रतीतीत, परिपूर्ण एकवाक्यता असते. जीवनाच्या दृष्टिकोनात समानता उत्पन्न होते. जगातल्या कोणत्याही प्रश्नाबाबत अशा सत्पुरुषांच्या द्वारे प्रगट झालेल्या विचारात विलक्षण साम्य असते ! मग हे संत कुठल्याही देशाचे धर्माचे वा काळाचे असोत !

संताचा निर्णय हितावह !

या संतांचे शिक्षणविषयक विचार म्हणूनच समजून घेतले पाहिजेत ; कारण जीवनाच्या शाश्वत सत्याचे संपूर्ण दर्शन त्यांना घडले असल्याने, एकप्रकारचे ' द्रष्टेपण ' त्यांना लाभलेले असते. निरपेक्ष निरहंकार व निर्वैरपणे कोणत्याही प्रश्नांचा यथार्थ विचार करण्यासाठी आवश्यक असलेली दुर्मिळ अशी ' शुद्ध बुद्धी ' व स्वच्छ अंत:करण त्यांना प्राप्त झालेले असते ! साहाजिकच अशा संताच्या तुलनेने इतर कुणाचाही विचार, मग तो कितीही विद्वान वा लोकप्रिय असो, हा एकांगी, अर्धवट व पूर्वग्रहदूषित असा राहणारच ! साधुजनांच्या शुद्ध बुद्धीने व्यक्त केलेले मत मात्र तसेच शुद्ध व निर्दोष आढळते ! संतोक्तीला आप्तवाक्य म्हणतात याचे कारण बहुधा हेच असावे ! या संतांना या शिक्षणापासून काय अभिप्रेत आहे हे आपण प्रथम पाहू.

पूर्णत्वाच्या आविष्कारासाठी शिक्षण

" Education is the manifestation of perfection already in Man. "

'मानवात सुप्त असलेल्या पूर्णत्वाचा आविष्कार म्हणजे शिक्षण' असे अत्यंत समर्पकपणे शिक्षणाचे ध्येय स्वामी विवेकानंदानी[३] सर्वासमोर ठेवले आहे. श्री. गुलाबराव महाराज[४] यांचीही व्याख्या स्वामीजींच्या मताशी जुळणारी आहे. ते एका पत्रात लिहितांना म्हणतात, "शिक्षण म्हणजे सुसंस्कार भांडाराचे दान करणे होय! संस्कार वस्तुज्ञानजन्य असतो. 'अपरिच्छिन्नानंद प्राप्ती' हे शिक्षणाचे फळ होय. वस्तुचे यथार्थ ज्ञान हेच अपरिच्छिन्नानंद प्राप्तीला कारण असते; म्हणून तदीय संस्कार ते शिक्षण म्हणावे." अखंड अपरिच्छिन्न आनंदाची प्राप्ती हे शिक्षणाचे अंतिम साध्य आहे, हे श्री. गुलाबराव महाराजांचे म्हणणेच योगी अरविन्द घोषांनी वेगळ्या शब्दात प्रगट केले आहे.

"To bring out the real man is the first business of Education"

(आध्यात्मिक स्वरूपातील) खऱ्या मानवाला आविष्कृत करणे म्हणजे शिक्षण असे ते एका पुस्तकात[५] म्हणतात. कांगडी विश्वविद्यालयाचे संस्थापक महर्षि स्वामी दयानंद यांनी शिक्षणाद्वारे अंत:करण शुद्धी व्हावयास हवी, असे प्रतिपादन केले आहे. सत्य व असत्य याचा विवेक करून मानवाने सत्याची कास धरून स्वत:ची प्रगती व उत्कर्ष साधणे, हा शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे असे ते आग्रहाने म्हणत,[६]

"Purity of the self should be attained through Education. Our only object is that mankind may progress and prosper, man may know what truth is and what untruth is; they may forsake untruth and accept truth."

दैवी गुणाद्वारे 'स्व' चो ओळख

सॉक्रेटिसचे *"Virtue is knowledge"* हे वाक्य प्रसिद्धच आहे. शिक्षणाद्वारे त्याला अभिप्रेत होता तो सद्‌गुणांचा विकास! सुप्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञ प्लेटो याने शिक्षण म्हणजे शीलसंवर्धन असाच अर्थ केला आहे. तो म्हणतो,

"Not only that education is the basis of the State, but that the ultimate aim and essence of education is the

training of character–to be achieved by the discipline of the body, the will and the intelligence."

खि.पू. ३८४ मधील प्रख्यात तत्वज्ञ ॲरिस्टॉटलने शिक्षणाची व्याख्या करतांना लिहिले आहे,

"*The true aim of education is the attainment of happiness through perfect virtue.*"

आधुनिक काळातील विश्वविख्यात सत्पुरूष जे. कृष्णमूर्ती ° यांनी जीवनाचा सर्वांगीण विकास शिक्षणात व्हावयाला हवा यावर अधिक भर देऊन म्हटले आहे की,

"*Education is not merely acquiring knowledge, gathering and correlating facts; it is to see the significance of life as a whole. But the whole connot be approached through part which is what Government organised religious and authoritarian parties are attempting to do.*"

श्रेष्ठ सत्पुरुषांच्या या सर्व व्याख्या वाचल्यानंतर, विविध दैवी गुणांचा विकास करून 'स्व' ची ओळख करून घेणे, म्हणजेच शिक्षण हा सर्वांच्या म्हणण्याचा मथितार्थ आहे, हे स्पष्ट होते आणि अशी आपणास आपलीच ओळख करून घेण्यास कोणत्याही बाहय गोष्टींची गरज नसून संतश्रेष्ठांचा व मनाचा मागोवा घेत गेलो म्हणजे 'स्व' चे सहज ज्ञान होते. श्री ज्ञानेशांनी

"संतांचे संगती मनोमार्ग गति ।
आकळावा श्रीपती येणे पंथे ।।"

या पंक्तीतून हेच नाही का कथन केले ? योगी अरविंद घोष जेव्हां "*The first principle of true education is that nothing can be taught . . . The mind has to be consulted in its own strength*" असे आपले शिक्षण विषयक मत मांडतात, तेव्हा त्यांचा तरी अभिप्राय कोणता वेगळा असेल ? आज मात्र 'संपूर्ण जगाचा भूगोल ज्ञात झाला पण स्वत:चे विश्व मात्र हरवून बसलो ! "*We gained geography and lost our world*" अशी कविवर्य टागोरांनी वर्णन केल्याप्रमाणे आपली स्थिती झाली आहे ! आणि म्हणूनच

रूसोची " *It (Education) is a development from within, not an accretion from without* " ही व्याख्या विसरणे योग्य नाही.

शिक्षणाचे अंतिम साध्य–साक्षात्कार !

या प्रमाणे आणखी कित्येक सत्पुरुषांची विचार मौक्तिके सादर करता येतील. पण सुसंस्कारावे दान करून विद्यार्थ्याला आत्मज्ञानाद्वारा 'पशुत्वाकडून देवत्वाकडे' वाटचाल करायला शिकविणे (*Progressive subjugatian af the animal in man towards God*), हेच विविध प्रकारे सर्वांनी प्रतिपादल्यामुळे त्याबद्दल अधिक काही लिहिण्याचे प्रयोजन नाही. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, विविध क्षेत्रांतील आधुनिक श्रेष्ठांनी सुद्धा या विषयावर उपनिर्दिष्ट साधुजनांप्रमाणेच आपले विचार व्यक्त केले आहेत.

माँटेव्हिडो येथील युनेस्कोच्या आठव्या अधिवेशनांत माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन[९] यांनी दिलेल्या भाषणाचा खालील भाग उद्धृत करण्याजोगा आहे :–

" *Education to be complete, must be humane, it must include not only the training of intellect but the refinement of the heart and the discipline of the spirit. No-education can be regarded as complete if it neglectes the heart and the spirit.* "

अंत:करण व आत्मा यांची उपेक्षा करून शिक्षण कधीही पूर्णत्वाला प्राप्त होणार नाही हे स्पष्टपणे बजावून आत्माविष्कारासाठी चारित्र्य निर्मितीवर त्यांनी अत्यंत भर दिला आहे. 'चारित्र्य' हेच देशाचे भवितव्य ठरवित असते ! निम्न प्रकारचे 'शील' असलेली माणसे श्रेष्ठ प्रतीचा देश कधीही घडवू शकणार नाहीत, असाही त्यांनी इषारा देऊन ठेवला आहे. एका मार्मिक वक्तव्यात ते म्हणतात,.[१०]

" *Character is destiny. Character is that on which the destiny of a nation is built. One cannot have a great nation with men of small character. If we want to build a*

great nation, we must try to train a large number of young men & women who have character "

हर्बट स्पेन्सर[११] देखील असेच आपले मत व्यक्त करतांना म्हणतात,

" Education has, for its chief object, the formation of character."

शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ साध्य आहे साक्षात्कार ! अमेरिकेसारख्या भौतिक राष्ट्रांना देखील हा विचार मान्य होऊ लागला आहे. तेथील प्रख्यात शिक्षण तज्ञ डेवे हे आपल्या एका ग्रंथात हा भारतीय दृष्टिकोन स्पष्टपणे मांडतांना म्हणतात,[१२]

" Personality, character, is more than subject-matter. Not knowledge or information, but self-realization is the goal. To possess all the world of knowledge and lose one's own self is as awful a fate in education as in religion "

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणात देखील नेमके हेच अभिप्रेत आहे. व्यक्तीने सद्गुण संवर्धनाकडे लक्ष पुरवून शीलसंपन्न व्हावे, अशी किमान अपेक्षा शिक्षणापासून सर्व धर्मांनी व्यक्त केली आहे. कोणत्याही धर्माच्या उपासनेसाठी प्रत्येक साधकाकडून निदान एवढे शिक्षण अपेक्षित आहे.

सारांश, पौर्वात्य व पाश्चात्य अशा बहुतेक सर्व तत्त्वज्ञांच्या मते मानवी जीवन व शिक्षण यांच्या ध्येयात समानता व सुसंगतता असायला हवी.[१३] अनेक तत्त्वज्ञांच्या, विशेषत: भारतीयांच्या मते, मानवी जीवनाचे अत्युच्च ध्येय आहे ईश्वरप्राप्ती ! हे ध्येय भारतीय शिक्षणात दृष्टीआड करणे योग्य नाही.

" At no time will it (education) lose sight of man's highest object, the awakening and development of his spiritual being. "

योगी अरविन्दांनी[१४] अध्यात्म जीवनाचे जागरण व विकसन याची जी अपेक्षा शिक्षणाद्वारे केली आहे, ती पूर्ण करण्यास नैतिक व आध्यात्मिक शिक्षणामुळे सहाय्य व्हावे. नव्हे तेच तर त्याचे ध्येय आहे ! अर्थात शिक्षणाद्वारे संत महात्मे उत्पन्न व्हावे अशी अर्थातच कुणाची अपेक्षा राहणार नाही. मोठ्या प्रमाणावर सामुहिक पद्धतीने दिल्या जाणाऱ्या

शिक्षणपद्धतीत ते शक्यही नाही, परंतु आत्मानुभूतीचा अनुभव घेण्याची आवश्यक ती पार्श्वभूमी मात्र नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने तयार व्हावी हे म्हणणे वावगे होणार नाही. रॉबर्ट हॅवग्रस्ट यांच्या[१५] समर्पक शब्दात हेच वेगळ्या रीतीने सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की,

"It is too much to expect the educational system to produce prophets and saints, but it can produce intelligent supporters of innovation. Therefore, good education will always show an openness to deviancy-a willingness to give deviancy a chance to prove itself."

वरील सर्व विवेचनाच्या आधारे असे म्हणता येईल, की नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा मुख्य उद्देश, खालील मूल्यांचा विद्यार्थ्यांच्या अंगी आविष्कार करणे हा असावा.

१. संपूर्ण सृष्टीचे नियंत्रण व संचालन करणारी एक सर्व शक्तिमान, सर्वव्यापी व सर्वांतर्यामी अशी शक्ती कोणत्या ना कोणत्या रूपात अस्तित्वात आहे. या शक्तिच्या इच्छेनुरूप व संमतीनेच सृष्टीतील लहान मोठी प्रत्येक घटना घडत असते.

२. चराचर व्याप्त अशा सर्वोच्च शक्तीचे आपण अंश आहोत, साहजिकच त्या परमशक्तीचे सर्व गुणधर्म आपल्यात विद्यमान आहेत.

३. ते गुणधर्म प्राप्त करून घेणे, परमेश्वर प्राप्तीसाठी प्रयत्नशील राहणे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

४. ते उद्दिष्ट गाठण्याचे विभिन्न मार्ग विविध धर्मानुसार प्रतिपादण्यात आले आहेत सच्चिदानंदाच्या प्राप्तीसाठी व्यक्तीच्या प्रवृत्तीनुरुप एकाच धर्मातही विविध पंथ-संप्रदाय सांगितले आहेत. आवडीनिवडी प्रमाणे त्यात वेगळेपण आहे. विरोध नाही.

५. परिणामतः पंथ, धर्म, राष्ट्र यांच्या मतांच्या आग्रहासाठी द्वेष, कलह, युद्ध होणे हे धर्माच्या मूळ तत्वज्ञानाशी पूर्ण विसंगत आहे. सर्वव्यापी परमेश्वराचे अंशभूत असलेल्या जीवमात्रामध्ये परस्पर प्रेम, बंधुता व कल्याण हा भाव प्रस्फुटित होणे हाच धर्मप्रेमाचा स्वाभाविक परिणाम आहे.

ध्येयाच्या जाणीवेचा लोप

अशा रीतीने नैतिक शिक्षण योजनेचे उद्दिष्ट एकदा निश्चित केल्यानंतर ते अंमलात आणण्याची साधने व उपाय कोणते याचा उहापोह करावयास हवा ! चालू शिक्षणपद्धतीत हे उद्दिष्ट गाठण्याचा कितपत प्रयत्न होतो ? दुर्दैवाने आपणास असे अनुभवास येते की उपरिनिर्दिष्ट सत्पुरुषांनी व विचारवंतांनी नमुद केलेले शिक्षणाचे ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे तर दूरच राहो; पण त्या ध्येयाची आठवण तरी ज्ञान दानाचे कार्य-प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे करणाऱ्या 'शासक', 'चालक' व 'शिक्षक' यांना आहे किंवा नाही याची शंका यावी, इतकी निराशजनक परिस्थिती आज आहे ! शिक्षणाच्या अत्युच्च ध्येयाची जाणीवच मुळी इतकी लोप पावली आहे की, त्या ध्येयासाठी प्रयत्न करून त्याचा परिणाम विद्यार्थी जीवनात दृगोचर होण्याचा मुळी फारसा प्रश्नच सद्यः स्थितीत उद्भवत नाही. एका लेखकाने [१६] सुशिक्षणाचा परिणाम कसा व्हावा या बाबत लिहितांना म्हटले आहे,

" Do not ask if a man has been through college; ask if a college has been through him–if he is a walking University ". आज विद्यार्थी कॉलेजमधून केवळ बाहेर पडतात. कॉलेज या विद्यार्थ्यांच्या अंतः करणात कुठे शिरते का ? असा प्रश्न केला तर दुर्दैवाने नकारार्थी उत्तरच बहुतेक संस्थांच्या बाबतीत देणे भाग पडेल ! भारतीय विश्वविद्यालयीन शिक्षणाचे एक सूक्ष्म निरीक्षक श्री. रॉबर्ट गॉडिनो[१७] यांनी म्हटले आहे, *" The most important fact about the Indian Students education is that he is untouched by it "*.

शाळा कॉलेजांची सद्यः स्थिती !

मग आज हजारो शाळा कॉलेजातून सुरू असलेले शिक्षण कोणते आहे ? असा प्रश्न वाचक सहजच विचारतील. खरोखरी आज शिक्षणाच्या नावाखाली नेमके काय सुरू आहे ? विद्यार्थी शिकतो व शिक्षक शिकवितात त्यावेळी शिक्षण-प्रक्रियेत कशाची देवघेव सुरू असते. शिक्षक व विद्यार्थी या शिक्षणातील प्रमुख घटकांकडून नेमके काय

घडत असते ? एखाद्या शिक्षण संस्थेत डोकावून पहा ! आपल्या काय दृष्टीस पडते ?

शाळा व कॉलेज सुरू होण्याच्या विशिष्ट वेळी सकाळी १०।। वा ११ वाजता एक घंटा होते. विद्यार्थी पटांगणावर एकत्रित होतात. 'जन गण मन' हे राष्ट्र गीत (रोज म्हणणे संयुक्तीक आहे कां ? व त्याचा काय परिणाम होतो? याचा विचार न करता) घाईघाईने कसेबसे उरकले जाते ! मुले नंतर झटपट आपापल्या वर्गात पोहचतात. वेळापत्रकात नमूद केल्या प्रमाणे विशिष्ट विषय शिकविण्यास विद्यार्थ्यांच्या मागोमाग शिक्षक पोहचतात. कुणी गणित तर कुणी इंग्रजी, कुणी भूगोल तर कुणी वाणिज्य असे विषय विद्यार्थ्यांना शिकवायला सुरवात होते. हे विषय शिकविले जातात म्हणजे काय केले जाते ? क्रमिक पुस्तकातील वा त्या विषयातील अभ्यासक्रमात नेमून दिलेला एक विशिष्ट भाग शिक्षक विद्यार्थ्यांना समजावून सांगतात. विद्यार्थी बुद्धीने तेवढा भाग ग्रहण करतात. सुमारे ४०-४५ मिनिटानंतर तास (पिरेड) संपल्याची घंटी होते. शिक्षक बदलतात; पुन्हा दुसऱ्या एखाद्या विषयाची माहिती दुसऱ्या शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना पुरविली जाऊ लागते. असे पाच-सहा तास सारखे सुरू असतात. शेवटी थोडी कवायत वा खेळ घेतले जातात. नंतर पाच-साडेपांचचे सुमारास विद्यार्थी शाळा किंवा कॉलेज संपवून स्वगृही परततात. दुसरे दिवशी पुनः १०।।-११ वाजता ठोका वाजवून शाळा सुरू झाल्याचे घोषीत केल्या जाते. तोच क्रम पुनः सुरू होतो.

या शाळा वा महाविद्यालयाच्या दैनंदिन कार्यक्रमात थोडा बदल होतो, तो नैमित्तिक कार्यक्रमामुळेच ! क्वचित एखादे भाषण, उत्सव वा थोर पुरुषांची जयंती वा पुण्यतिथी होते. औत्सुक्य, उपस्थिती व उत्साह या कार्यक्रात जेमतेम आढळतात ! एखाद्या कुळाचाराप्रमाणे या गोष्टी उरकल्या जातात; हे कार्यक्रम पार पडले की डोक्यावरचे ओझे उतरले असे संस्था-प्रमुखांना व शिक्षकांना वाटते ! शाळा व कॉलेज मधील शिक्षण कार्यात फरक एवढाच की शाळापेक्षा कॉलेजात अभ्यासाचा वेळ कमी असल्यामुळे अवांतर कार्यक्रम थोडे

जास्त होतात. स्नेहसंमेलन अधिक गाजते ! परंतु या कार्यक्रमांच्या जास्तीच्या संख्येबरोबरच बेशिस्त, बेजबाबदारपणा, बेछूटपणा यांचेही प्रमाण वाढते असते !

आणि ते तसे नसले तरच नवल ! कारण अखेर या शिक्षणात शिक्षक व विद्यार्थ्यांची देवघेव होते ती कशाची ? देवघेव होते ती केवळ यांत्रिक ज्ञानाची व तांत्रिक कौशल्याची (*Mechanical Knowledge and Technical Skill*) ! वाढ होते ती केवळ पुस्तकी पोपटपंचीची व बौद्धिक अहंकाराची ; येथे बडेजाव माजविला जातो तो पोषाखी श्रीमंतीचा व बाह्य अवडंबराचा ! केवळ काही विषयांतील, सर्वांगीण ज्ञान नव्हे तर, काही विशिष्ट पुस्तकांचे बौद्धिक ज्ञान विद्यार्थी प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यन्तच्या १५–१६ वर्षाच्या कालखंडात मिळवितो. या विषयाची इतरापेक्षा थोडी अधिक माहिती या विद्यार्थ्याला असते एवढेच ! इंग्रजी वा संस्कृत विषय घेऊन एम. ए. पदवी मिळविलेला विद्यार्थी त्या भाषेत तासभर काही भाषण देऊ शकत नाही ! काही निवडक पुस्तकांचे वाचन करून तो पदवी ग्रहण करीत असल्याने खऱ्या अर्थाने तो काही त्या विषयाचा ज्ञाता (*Master*) झालेला नसतो.

नि ते स्वाभाविकच म्हणावे लागेल कारण एकूण अभ्यासक्रमापैकी आजकाल १ / ३ भागच परिक्षेत विचारला जातो. त्यातला १ /२ भागच (१० पैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवा या पद्धतीने) केवळ परिक्षार्थीना सोडवायचा असतो नि सोडवलेल्या उत्तरातला १ / ३ भाग बरोबर असला म्हणजे तो ज्ञानसंपन्न म्हटला जातो. ३३ टक्के गुणांनी उत्तीर्ण होणें ही ज्ञानाची विटंबनाच नव्हे काय? ज्या ज्ञानात नि:संशयता, नि:संदिग्धता नाही ते ज्ञानच नव्हे ! श्री. गेराल्ड वॅन[१८] म्हणतात त्याप्रमाणे शिक्षण म्हणजे विशिष्ट विषयाच्या आकलनासाठी शारीरिक व आध्यात्मिक कौशल्याचे संपादन करणें.

मानवाची दानवीकडे प्रवृत्ती

पण शिकलेल्या विषयाचे संपूर्ण बौद्धिक ज्ञान देखील जेथे आजचे हे शिक्षण देऊ शकत नाही; मग सद्विचार, सद्गुण व सदाचार

यांच्या अभिवृद्धिसाठी विशेष प्रयत्न झाले नाहीत तर आश्चर्य वाटावयास नको ! केवळ इथेच नव्हे, परदेशात देखील या बाबतीत या पेक्षा फारसा वेगळा अनुभव येत नाही. अमेरिकेतील कॉलेजातील विद्यार्थ्यांची स्थिती वर्णन करतांना फिलिप जॅकोब[१९] याने आपल्या व्यासंगपूर्ण अशा प्रबंधात नमूद केले आहे की, *The College education barely touches their standards of behaviour, quality of judgement, sense of social responsibility, perspicacty of understanding and guiding beliefs.*"

विद्यापीठांचा सूक्ष्म अभ्यास केलेल्या जोस ऑरटेगा[२०] या विद्वानाने विश्वविद्यालयांतील आत्मवचनेचे केलेले खालील मार्मिक वर्णन देण्याचा मोह आवरत नाही.

" *The University of to day is an abuse in itself, because it is, in itself, a falsehood. It is so thoroughly impossible for the ordinary student to master what the University tries to teach him, that it has become a part of University life to accept the failure We accept the falsity of the University's inward life.... When the habitual behaviour of a man or an institution is false, the next step is complete demoralization.*" आजचे शिक्षण विद्यार्थ्यांची काही प्रमाणात शारीरिक व बौद्धिक विकासाची काळजी घेते असे फार तर म्हणता येईल. परतु केवळ शारीरिक व बौद्धिक शिक्षण देऊन मनाची व आत्म्याची जर उपेक्षा केली तर सुसंस्कृत नसलेला तो सुशिक्षित मानव – दानव झाल्याशिवाय राहणार नाही !

" *Mental slums are more dangerous to mankind than material slums.*"

हे डॉ. राधाकृष्णन[२१] यांचे म्हणणे काही खोटे नाही! "साक्षरो विपरित्वेच्च राक्षसो भवति ध्रुवम् !" या सुभाषितात हाच नियम वेगळ्या शब्दात व्यक्त केला आहे. पू. विनोबांनी तर गमतीने एकदा म्हटले की[२२], "हल्लीच्या शिक्षण पद्धतीच्या काळात जर मी विद्यार्थी असतो तर आजच्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त धूम मी केली असती," आणि त्यांचे ते म्हणणे फार सूचक आहे ! कारण वनसेन[२३] म्हणतो त्याप्रमाणे,

" Culture of intellect without religion in the heart, is only civilized barbarism and disguised animalism."

कोणत्याही उच्च आध्यात्मिक अधिष्ठानाअभावी सुधारलेल्या रानटीपणाचा व पशुतेचा आविष्कारच आज विद्यार्थी विश्वात सर्वत्र दृगोचर होत नाही का ?

श्री दासबोधात सद्विद्या व कुविद्या यांची जी लक्षणे श्री समर्थांनी[२४] वर्णन केली आहेत त्यातील खालील कुविद्येची लक्षणेच आजच्या विद्यार्थ्यात विशेषत: आढळून येतात.

" काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार ।
गर्व ताठा अहंकार । द्वेष विषाद विकल्पी ।।
नेणे आणि नायके । नये आणि न सीके ।
न करी आणि न देखे । अभ्यास दृष्टि ।।
हीन देह आणि ताठा । अप्रमाण आणि फाटा ।
बाष्फळ आणि करंटा । विवेक सांगे ।।
युक्तिहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन ।
क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशई ।।
भक्तीहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन ।
शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लकू ।।
समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे ।
आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहीच नेणे अभागी । "

सुशिक्षित पण असंस्कृत

सुशिक्षित विद्यार्थी हा सुसंस्कृत व सुशील होईलच अशी शिक्षण पद्धती वस्तुत: असावयास हवी ! एकेकाळी तशी ती होती! पण आज सुशिक्षितता व सुसंस्कृतता या दोहोंची फारकत झालेली दिसून येते. सुशिक्षित मनुष्य सुसंस्कृत असेलच अशी हमखास खात्री देता येत नाही. सुशिक्षित असूनही असंस्कृत नि अशिक्षित असूनही सुसंस्कृत अशा व्यक्ती आज समाजात पुष्कळच आढळतात! आईच्या श्राद्धासाठी पैसे उसने नेऊन पुन्हा पैसे परत करण्याचे नावही न काढणारा, जन्मभर खस्ता खाल्लेल्या जन्मदात्या आईवडिलांची घोर अवहेलना करून बायकोचे

मात्र मन मानेल तसे लाड पुरविणारा; व्यभिचार, लाचलुचपत, मद्यपान व देशद्रोह हे गुन्हे करण्यास सहज प्रवृत्त होणारा हा सुशिक्षित असेल पण सुसंस्कृत मात्र नव्हे ! या उलट चुकून जास्त आलेली नोट, आर्थिक हलाखी असूनही परत करणारी मोलकरीण, आईवडीलांच्या सेवेसाठी प्रसंगी लग्न न करता आयुष्य वेचणारा हमाल व कसलेही प्रलोभन दिले तरी व्यभिचार, लाच घेणे, मद्यपान, वा देशद्रोह यासारखे कुकृत्य करण्यास न धजावणारी व्यक्ती कदाचित अशिक्षित असेल, पण ती खासच सुसंस्कृत म्हणावी लागेल. म्हणून गरीबांपेक्षा श्रीमंतांना अशिक्षितापेक्षा सुशिक्षितांनाच आज सदाचारी व सुसंस्कृत करण्याची अधिक गरज आहे असे वाटू लागते. स्वामी विवेकानंद[२५] स्पष्टच म्हणतात,

" Bring all light into the world . . . . Bring light to the poor and bring more to the rich, for they require it more than the poor. Bring light to the ignorant and more light to the educated, for the vanities of the education of our time are tremendous "

कारल्याचे बी लावून द्राक्षाची अपेक्षा

आजच्या शिक्षणाने फार तर समाजाची संपत्ती खोऱ्यांनी ओढण्यात कुशल असे डॉक्टर, वकील, इंजिनिअर होतील; पण हे समाजाचे 'आदर्श घटक' व्हायला, प्रथम आदर्श माणसं व्हायला हवीत तेव्हाच समाजाला त्यांच्या सेवेपासून काही लाभ होऊ शकेल.

" One is to be educated not because he is to make shoes, nails and pins, but because he is a man "

हे एका विद्वानाने[२६] काढलेले उदगार कदापि विसरता कामा नये! परंतु विद्यार्थी सद्गुण संपन्न होऊन मानवी मूल्यांची जोपासना करायला शिकेल असा प्रयत्न शिक्षणक्रमात कुठेही होत नसल्याने त्याचे आज सर्वत्र झालेले अधःपतन होणे अटळ आहे. कडू कारल्याचे बी लावून आपण गोड द्राक्षांची अपेक्षा करू शकत नाही. पुनश्च डॉ. राधाकृष्णन्[२७] यांचेच वचन उद्धृत करता येईल.

" We cannot built rightly with wrong materials More than your intelleetual ability or technical skill, what

makes you valuable to society is your devotion to a great cause."

मानवी जीवनाला काही उदात्त ध्येय, जीवनविषयक दृष्टीकोन व उच्च आदर्श असल्याशिवाय तो कार्य प्रवण होऊ शकत नाही ! "आम्ही ईश्वर वगैरे काही मानीत नाही पण जनता हाच जनार्दन समजून आम्ही त्याची सेवा करतो नि हीच आमची ईशपूजा !" अशी संवंग विधाने आजकाल अनेक जण करतात. परंतु भारतीय तत्त्वज्ञाना-प्रमाणे संतांनी संपूर्ण आयुष्यभर तपस्या करून गाठलेली जीवनाच्या अत्युत्तम आदर्शाची, जनसेवा, ही अंतिम पायरी आहे. "उरलो उपका-रापुरता" असे म्हणणाऱ्या संत तुकारामासारख्या संतांनाच जनतेला जनार्दनाच्या स्वरूपात पाहण्याचे सामर्थ्य असते. इतरांनी तशी भाषा वापरणे केवळ 'दांभिकपणा' होईल ! " बुडती हे जन न पाहवे डोळा" अशी समाजाबद्दल संतांच्या प्रेममय हृदयात असलेली आत्यंतिक तळमळ उत्पन्न होणे वाटते एवढे सोपे नाही. सुशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांची उच्च मनोभूमिका आपणास तयार करता आली, तरी पुष्कळच कार्य झाले असे म्हणता येईल ! सध्याच्या शिक्षणात सर्वसाधारण विद्या-र्थ्यांची एवढीही तयारी केली जात नाही; एवढेच नव्हे तर असे काही कार्य शिक्षणाद्वारे अपेक्षित आहे याची फारशी जाणीवही कुठे आढळत नाही. 'माणूस' घडविण्यासाठी आवश्यक असलेले हे मौलिक कार्य कसे करता येईल ? कशा प्रकारे त्यात यश मिळू शकेल ? पुरूषार्थ गाजवि-णारा पुरूषोत्तम आजच्या शिक्षणाच्या चाकोरीतून कसा निर्माण करता येईल?

(२) शिक्षणाच्या ध्येय प्राप्तीचे साधन - मन

विचारांचा अखंड प्रवाह म्हणजे मन

मागे विशद केलेले शिक्षणाचे अत्युच्च ध्येय साध्य करायचे असेल तर शिक्षण तज्ञांनी प्रथम हे ध्यानात घेतले पाहिजे की शिक्षणाचे मुख्य माध्यम आहे 'मन' वा अंत:करण ! मनाची सोपी व्याख्या सांगायची झाली तर विचारांचा अखंड वहात असलेला प्रवाह म्हणजे मन, असे

म्हणता येईल ! या मनाला नदीची उपमा यथार्थपणे लागू होईल. नदी-तील पाण्याचे प्रमाण शुद्धी, व दिशा *(Volume, purity and Direction)* यावर ज्याप्रमाणे त्या नदीची उपयुक्तता अवलंबून असते, त्याचप्रमाणे मनरूपी नदीतील विचाररूपी पाण्याचा जो प्रवाह वहात असतो त्याचे प्रमाण, शुद्धी व दिशा यावर मनाची उपयुक्तता अवलंबून असते. परंतु कोणत्याही विषयाच्या अभ्यासाचे मुख्य साधन असलेले विद्यार्थीचे मन हे अधिक सामर्थ्यवान कसे होईल याचा विचार शिक्षणक्रमात कुठेच होत नाही.

अंत:करणाचे चार थर वा पापुद्रे [२८]

योगी अरविंद घोषांनी तर अंत:करणाचे चार पापुद्रे कल्पिले आहेत. त्यांच्या मते सर्वात खालचा मुख्य थर चित्ताचा. गेल्या कित्येक जन्मांचे मानसिक ठसे *(Mental impressions)* त्यावर उमटलेले असतात. आपल्या अनेक भावना संग्रहित करण्याचे ते जणू कोठीघर. त्यानंतरचा थर मनाचा. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पांचही अनुभवांच्या आशयांना विचारांचे प्रारूप देणे *(Translate five senses into thought sensations)* हे मनाचे कार्य. मन आपणहून काही विचार ग्रहण करीत असते. व त्याचे सारखे ठसे ही तयार होत असतात. पंचेन्द्रियांच्या अनुभवाने व मनाने स्वत: ग्रहण केलेले जे 'ठसे', ते आहेत विचारांचा आधार ! योग्य विचार करण्यासाठी इन्द्रियांचे हे अनुभव व मनाने स्वत:हून ग्रहण केलेले 'ठसे' परिपूर्ण असणे अत्यावश्यक आहे.

बालकांच्या वरील सर्व इंद्रियांचा यथायोग्य उपयोग करता येण्या-साठी ती पुरेशी विकसित करणे हे शिक्षकाचे साहजिकच कर्तव्य ठरते ! या इन्द्रियांच्या दुरूपयोगामुळे ती बोथट होणार नाहीत वा त्यांना इजा होणार नाही, एवढेच नव्हे तर ती सूक्ष्म अनुभव बिनचूक ग्रहण करू शकतील, इतकी संवेदनक्षम होतील, अशी दक्षता शिक्षकाने घ्यावयास हवी. ज्ञानेंद्रियांनी प्राप्त केलेले ज्ञान कर्मेंद्रियाद्वारे यथार्थरित्या प्रगट करण्याचे कौशल्य विद्यार्थ्याला प्राप्त झाले पाहिजे! उदाहरणार्थ डोळ्यां-नी जे बघितले ते आविष्कृत करता यावयास हवे ! अंत:करणात

असलेले संपूर्ण ज्ञान अचूकपणे शब्दांकित करता येईल अशी वाणीची सिद्धता झाली पाहिजे.

तिसरा पापुद्रा बुद्धी

अंत:करणाचा तिसरा थर आहे बुद्धी. हे विचाराचे प्रमुख साधन आहे. विविध इंद्रियांनी मिळविलेल्या ज्ञानाचे एकत्रिकरण करून आवश्यक गोष्टींची निवड करणे व नको असलेल्या ज्ञानाचा निचरा करणे याचे बुद्धी हें एक यंत्र आहे ! शिक्षणाचे दृष्टीने याचे विशेषच महत्व आहे. बुद्धीच्या कार्याचे अनेक गट नमूद करता येतील; परंतु मुख्य कार्ये आहेत दोन. पहिले कार्य मालकाची भूमिका बजावणे व दुसरे कार्य नोकराचे! नोकर ज्याप्रमाणे विविध वस्तु गोळा करणे, त्याची निबड, स्वच्छता, व्यवस्था करणे इ. कार्ये करतो, त्याप्रमाणे दुसरे कार्य विविध प्रकारच्या गोळा झालेल्या ज्ञानाचे भाग पाडणे, विवेचन करणे, तुलना करणे इ. असते ! तसेच मालकाची भूमिका बजावणाऱ्या पहिल्या कार्यात ज्ञानाचे विविध अर्थ लावणे, त्यांचा निष्कर्ष काढणे, विश्लेषण करणे इ. गोष्टींचा समावेश होतो. पहिले कार्य विश्लेषणात्मक (*Analytical*) तर दुसरे वर्गीकरणात्मक *(Classificatory)*. वर्गीकरणात्मक कार्य केवळ ज्ञानाच्या बाह्यांगाला स्पर्श करते तर विश्लेषणात्मक कार्य ज्ञानाच्या गाभ्यात प्रवेश करून त्याच्या अंतरात्म्याशी संवाद करू लागते. विद्यार्थ्याचे शिक्षण अपूर्ण व एकांगी होऊ नये, यासाठी बुद्धीच्या ह्या दोन्ही कार्याची शक्ती व कार्यक्षमता अत्युच्च पातळी गाठेल, अशी काळजी शिक्षणात घेतली जावयास हवी !

चवथा अंतिम पापुद्रा प्रतिभा

प्रतिभा *(Genius)* हा आहे मानवाचा अंत:करणाचा चवथा अंतिम पापुद्रा. याकडे शिक्षण तज्ञांचे अद्याप पुरेसे लक्ष वेधले गेले नाही. प्रतिभा ज्यांच्या ठिकाणी असते. त्यांचे ठिकाणी एखाद्या कूट प्रश्नाचा सर्वमान्य असा निर्णय देणे *(Sovereign discernment)*, सत्याचे उत्स्फूर्तपणे ज्ञान होणे *(Intuitive perception of Truth)*, वाणीला दैवी स्फूर्ती मिळणे *(Plenary inspiration of speech)*, इ. ज्या गोष्टी प्रयत्नाने सुद्धा साध्य होणे कठिण, अशा गोष्टी सहजपणे प्रगट होतात.

पूर्ण विकसित स्वरूपात ही शक्ती क्वचितच आढळते ! पण कमीजास्त स्वरूपात ही शक्ती अनेकांच्या ठिकाणी दृगोचर होते ! मात्र हे निश्चित, की अशा व्यक्तींच्या अभावी मानवाची आज झालेली प्रगती होऊ शकली नसती. मानवी जीवनाला उपकारक अशी ही शक्ती एखाद्या विद्यार्थ्यात प्रगट झाली तर बहुतेक वेळा शिक्षक आपणास केले गेलेले ते एक बौद्धिक आव्हान आहे असे समजून त्याला नाउमेद करण्याचा वा दडपण्याचाच आटोकाट प्रयत्न करतात ! काही डोळस उदार मनाचे शिक्षक मात्र अशा विद्यार्थ्यांचे कौतुक व स्वागत करतात.

मानवी अंत:करणाचे हे विविध पैलू शैक्षणिक दृष्टया अत्यंत महत्वाचे आहेत. त्यांचा महत्तम विकास साधणे, हें कोणत्याही विद्याशाखेतील ज्ञान ग्रहण करण्यासाठी, फार उपकारक ठरणार आहे. खूप वेळा वाचूनही एखादा विषय समजत नाही व समजलेला भाग स्मरणात राहात नाही अशी तक्रार निदान शे. ६० विद्यार्थ्यांची तरी असते. या तक्रारीचे मूळ कारण शिक्षणक्रमात या विद्यार्थ्यांच्या मनाची झालेली उपेक्षा हेंच मुख्यत: आहें.

एकाग्र मनाचे अनन्य साधारण स्थान

एक साधेच उदाहरण घ्यायचे झाले तर एखाद्या कळशीत, आधी पाणी भरून त्यात दूध भरणे आपण सुरू केले, तर त्यात ते जसे सामावणार नाही, त्याप्रमाणे मन आधीच अनेक विषयांनी व्याप्त असल्यामुळे ते अभ्यासाचा विषय ग्रहण करू शकत नाही. मन पूर्ण रिकामे करण्याची वा संकल्प विकल्प विरहीत करण्याची कला ज्यांना अवगत आहे, ते कोणताही कठीण विषय सहज आत्मसात करू शकतील व फारकाळ पर्यंत त्या विषयाचे ' स्मरण ' त्यांना राहू शकेल. पण त्यासाठी अभ्यास (करतांना) सुरू असतांना अभ्यास–विषयाशिवाय अन्य कसलाही विचार मनात यायला नको. एकचित्त होऊन केवळ तेवढा एकच विषय मनाने अभ्यासायला हवा ! काही व्यक्ती एकपाठी असतात याचे कारण त्यांचे मन असे ' एकाग्र ' होऊ शकते हेच होय ! अर्जुनाची या संबंधीची कथा प्रसिद्धच आहे ! झाडावरील पोपटाच्या डोळ्याचा वेध घ्यावयाचा होता, तेव्हा कुणाला ते झाड नि पोपट, तर कुणाला झाडाची फांदी व

पोपट, बाण मारतेवेळी दिसत होते. पण अर्जुनाला मात्र केवळ पोपटाचा डोळाच तेवढा दिसत होता. नि अचूक नेम तोच मारू शकला ! कथेचे तात्पर्य एवढेच, की एका विषयावर संपूर्ण लक्ष केंद्रित करणे विद्यार्थ्याला शक्य झाल्याशिवाय त्याला विद्या ग्रहण करणे कदापि शक्य नाही. विद्यार्थी दशेत आज 'मनाची एकाग्रता' करायला फारसे कुणी सांगत नाही. त्यासाठी म्हणण्याजोगा प्रयत्न शिक्षणात कोठे होत नाही. सर्व भर दिला जातो तो माहिती गोळा करण्याकडे ! स्वामी विवेकानंदांनी[२९] समर्पक शब्दात एकाग्र मनाचे शिक्षणात असलेले महत्व विशद केले आहे. ते म्हणतात,

"To me the very essence of education is concentration of mind, not the collection of facts. If I had to do my education once again, I would not study facts at all. I would develop the power of concentration and detachment and then with a perfect instrument, collect facts at will."

'एकाकार मन' ज्ञानग्रहणास उपयुक्त

एकदा याप्रमाणे मनाची एकाग्रता साधली म्हणजे या एकाकार मनाने हवा तो विषय आत्मसात करणे अवघड नाही ! आधीच आपली सर्व कर्मेन्द्रिये बहिर्मुख आहेत.त्यांना लहानपणापासून नित्य 'बाहेरचे' ग्रहण करण्याची सवय लागलेली ! त्यांना अंतर्मुख करून ज्ञान ग्रहणासाठी पात्र बनवायचे म्हणजे ज्ञानेन्द्रियांचा राजा जो 'मन' त्याला प्रथम स्वाधीन करून घ्यावयास हवे! त्याला एकदा थोपटून समजावून नियंत्रित केले, म्हणजे मग इतर इन्द्रिये मुकाटयाने मान खाली घालून सांगाल ती आज्ञा पाळू लागतात, मनाबरोबर इतर इन्द्रिये हळूहळू ताब्यात येऊ लागणे हे ज्ञान प्राप्तीला विद्यार्थी पात्र होऊ लागल्याचेच सुचिन्ह आहे ! असा इंद्रियांचा संयम साधणे हे ज्ञानवृद्धीला अत्यंत पोषक ठरते.

कर्मेंद्रियांना प्रशिक्षित करणे

(The training of the senses)

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, यांचा अनुभव घेणारी वाणी, त्वचा, नेत्र, जिव्हा व नासिका ही इंद्रिये, विद्यार्थ्याला ज्ञान प्राप्तीला साहय

करीत असतात. विचाराला खाद्य पुरविणारी विद्यार्थ्याची ही इन्द्रिये, अत्यंत कार्यक्षम होतील याची काळजी, शिक्षकाने घ्यावयास हवी. ज्या मुख्य दोन गोष्टी या इन्द्रियांच्या बाबतीत साध्य व्हायला हव्यात त्या म्हणजे ज्ञानग्रहणात आत्यंतिक अचूकता व संवेदनक्षमता. *(Accuracy and sensitiveness)* या बाबतीत अपूर्णता आणणारे जे अडथळे असतील ते दूर केले जावयास हवेत !

इंद्रियांची संवेदनक्षमता आवश्यक

वरील इन्द्रियांना विविध बाह्य विषयांचे ज्ञान होते ते शारीरिक नाडयांच्या *(Physical nerves)* माध्यमातून. ग्रहण केलेला कोणताही विषय मनापर्यंत नेऊन पोचविण्याचे कार्य या नाड्याच करीत असतात. या नाडयांच्या प्रवाहात जर काही दोष उत्पन्न झाला, तर अचूक असे ज्ञान मनापर्यंत संक्रमित होणार नाही हे उघड आहे. अर्थात प्राप्त झालेल्या माहितीत बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही. कारण विषयांचे ज्ञान वाहून नेणाऱ्या नाड्या या केवळ वाहिन्या आहेत. पण मनापर्यंत हे ज्ञान पोचवितांना ते पूर्णपणे वा अचूकपणे *(Fullness or accuracy of information)* संक्रमित होत नाही. काहीवेळी ग्रहण केलेल्या विषयांचे ज्ञान मनापर्यंत पोचविण्याइतकी इन्द्रिये संवेदनक्षम नसलेली आढतात. उदाहरणार्थ, कानावर जे शब्द पडले किंवा डोळ्यांनी जे दृश्य पाहिले, त्याचा मनाला बोध न होणे किंवा जो बोध झाला तो विपरीत होणे. अशावेळी नाडीप्रवाहाला कुठेतरी प्रतिबंध होत आहे हे उघड आहे. हा प्रतिबंध शारीरिक दोषामुळे होत असला तर अर्थातच त्याचे निराकरण हे डॉक्टरांचे कार्य आहे.

नाडी प्रवाह निर्दोष करण्याचा उपाय–नाडीशुद्धी

नाडी प्रवाहातील संवेदनक्षमता व अचूकता यामध्ये शारीरिक दोषाखेरीज अन्य कोणती उणीव असेल तर ती दूर करण्याचा एक साधा नि सुलभ मार्ग प्राचीन योगशास्त्राने सांगितला आहे. वेगवेगळ्या कारणाने व उद्देशाने युरोप, ऑस्ट्रेलिया, अमेरिका इत्यादि खंडातील देशात या मार्गाचा अवलंब करणे बरेच प्रचलित झाले आहे.

दुर्भाग्याने भारतात मात्र त्याचा व्हावा तेवढा उपयोग केला जात नाही. नि तो उपाय म्हणजे श्वासोश्वासाचे विशिष्ट रीतीने नियमन करून नाडी व्यवस्था शुद्ध (*Purification of nerve system*) करणे ! प्राणायामाचे काही प्रकार नियमितपणे केले तर कर्मेन्द्रियांचा अनुभव मनापर्यंत पोचविण्याचे महत्वपूर्ण कार्य करण्याऱ्या नाडयांची शुद्धी होऊन अप्रतिहतपणे त्या प्रवाहित होवू लागतात.

संवेदन क्षमतेच्या पूर्ण विकासासाठी–सूक्ष्म दृष्टी


मात्र नाडी शुद्धीने यथार्थपणे सर्व ज्ञान मनापर्यंत पोहोचले म्हणजे सर्व कार्यभाग झाला असे नाही; कारण मन हे वरील इन्द्रियांप्रमाणेच सहावे इन्द्रिय असून शिवाय आकलन झालेले ज्ञान बुद्धीपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे ते साधनही आहे. विविध इंद्रियाद्वारा मनावर उमटलेला 'ठसा' शुद्ध स्वरूपाचा असूनही तो पुढे चित्ताकडे संक्रमित करतांना त्यात विकृती उत्पन्न होऊ शकते. मनाला प्राप्त झालेला आशय *(images)* हा क्वचित बुद्धीला पोहोचवलाच जात नाही नि पोहोचविला गेलाच तर चुकीच्या अर्धसत्य स्वरूपात कळविला जातो. मनाच्या संवेदन-क्षमतेच्या पूर्ण विकासाला योग शास्त्रात सूक्ष्म–दृष्टी *(Subtle reception of images)* असे म्हणतात. यथार्थ ज्ञान बुद्धीला देण्याचे प्रशिक्षण मनाला दिल्यास अशी सूक्ष्म दृष्टी प्राप्त होणे अवघड नाही !

निर्दोष ज्ञान प्राप्तीसाठी – चित्तशुद्धी

सारणी क्र. ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे इन्द्रियगम्य विषयांचे ज्ञान जसेच्या तसे थेट बुद्धीपर्यंत पोहोचवितांना एकतर मनाच्या खालच्या किंवा वरच्या बाजूला दोष उत्पन्न होऊ शकतो. खालच्या पचनेंद्रिया-कडील दोष नाडी शुद्धीने व वरच्या बाजूच्या दोषाचे निवारण सूक्ष्म दृष्टी प्राप्त करून घेऊन दूर करता येऊ शकतो. पहिल्या प्रकारच्या दोषाचे उदाहरण म्हणजे दोरीला साप समजण्याचे देता येईल. वस्तुचे यथार्थ ज्ञान इन्द्रियांना न झाल्याने मन दोरीवरच सर्पाची भावना करून किंकाळी फोडण्यास माणसास उद्युक्त करते. दुसऱ्या प्रकारचे उदाहरण, मन एखादी घटना ग्रहण करीत असतांना जे ज्ञान होते त्यात जेव्हा

सारणी क्र. ७

बुध्दिला ज्ञान प्राप्त होण्याची प्रक्रिया



रागलोभादि विविध भावना (*emotion*) वा पूर्वीच्या तशाच घटनामुळे धारण केलेल्या चित्तातील समसंवेदना (*Previous associations ingrained in chitta or passive memory*) या त्यात मिसळतात, तेव्हाचे देता येईल. अ हा ब वर काठी उगारतो आहे किंवा एक स्त्री डोळे मिटून आडवी पडली आहे, या दोन घटना बघितल्यावर, मनातील विविध भावना व आजवर अशाच प्रकारचे पाहण्यात आलेले

प्रसंग यामुळे दोन्ही घटनांमध्ये मन आपल्या बऱ्या वाईट संवेदना जोडते व बुद्धीकडे त्या पोहोचविते. सर्व मानवी भावनांच्या निरपेक्ष व पूर्वदूषित दृष्टिकोन विरहित *(Without warping the impr-ession with emotions and unbiassed outlook)* असे एखाद्या घटनेचे ज्ञान बुद्धीपर्यन्त पोहोचविण्यास चित्तशुद्धी शिवाय *(Purification of mental or moral habits formed in the Chitta)* दुसरा कोणताही उपाय नाही !

योग शास्त्राचा शिक्षणात अंतर्भाव

भारतीय योग शास्त्राच्या प्रक्रियेमध्ये चित्त-शुद्धी ही एक प्राथमिक अवस्था आहे. विद्यार्थ्यांची ज्ञान ग्रहण शक्ती व धारणा शक्ती निर्दोष व प्रबळ करण्यासाठी विविध मार्गाने चित्तशुद्धी करण्याकडे प्राचीन शिक्षण पद्धतीत लक्ष देत असत. पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्यापासून या व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले. ज्ञानाचे यथार्थ आकलन बुद्धीला होण्यात जे अडथळे येतात त्यांचे आज निराकरण करण्यासाठी कोणताच प्रयत्न होत नाही. इतक्या महत्वाच्या विषयांच्या-बाबतीत आपण पाश्चात्य कल्पनांनाच कवटाळून बसणार आहोत का ? भारताच्या राष्ट्रीय शिक्षण पद्धतीत आपण हा विद्याग्रहणाचा तर्कशुद्ध असा प्राचीन वारसा विद्यार्थ्यांच्या हाती नाही का देऊ शकणार ?

पाश्चात्यांत प्रचार का ?

योगशास्त्राचे शिक्षणात असलेले महत्वपूर्ण स्थान पाश्चात विचार-वंतानाही पटू लागले आहे. अनेक परदेशातील विश्वविद्यालयात योगशास्त्राचा स्वतंत्रपणे अभ्यास होऊ लागला आहे. काही ठिकाणी तर त्याचे वेगळे अध्यासन (*Chair for the Science of Yoga*) अस्तित्वात आले आहे अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. सारख्या औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांतील स्त्री पुरुषात योग विद्येचे सप्रयोग ज्ञान देणाऱ्या संस्था शेकडोंनी अस्तित्वात आल्या आहेत. या शास्त्राकडे आकर्षित होणाऱ्या व्यक्ती व त्यांची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी स्थापन होणाऱ्या नवीन संस्था याची संख्या सारखी वाढती आहे ! योगशास्त्रा-तील जाणकार अशा मार्गदर्शकांची मागणी अनेक देशांकडून होत आहे!

योगशास्त्राच्या ह्या जगभर होत असलेल्या सार्वत्रिक प्रचाराचे कारण काय ? अनेकांना आज या भारतीय प्राचीन शास्त्राबद्दल एवढे आकर्षण का वाटू लागले आहे? हा खरोखरी विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

कुणी याचे कारण योगशास्त्राची तर्कशुद्ध बैठक व योगाच्या आचरणाने होणारे सुपरिणाम हे कारण सांगेल; परंतु या गोष्टी जगाला आज नव्याने कळल्या असे म्हणता येणार नाही. आधीपासूनच त्या या शास्त्रात अनुस्यूत आहेत. मग आजच अनेक राष्ट्रांचे लक्ष या शास्त्राकडे का वेधल्या गेले ? अशी कोणती परिस्थिती आज उद्भवली की ज्यामुळे योगाचे आचरण अनेकांना हितावह वाटू लागले ?

अध:पतनामुळे अध्यात्माची आठवण

योगविद्येद्वारा मिळणाऱ्या आध्यात्मिक शिक्षणाची इच्छा उत्पन्न होण्याचे कारण अत्यंत महत्वपूर्ण व प्रत्येक सुविचारी भारतीय नागरिकाने समजावून घ्यावे असेच आहे ! ध्येयविहीन समाजाला भौतिक समृद्धीमुळे अनेक सुखोपभोगाची साधने जरी उपलब्ध झाली तरी तो पूर्णपणे सुखी होत नाही !

विविध प्रकारची इन्द्रियांची इच्छा पूर्ण करणारी साधने फार तर देहाची वासना पूर्ण करू शकतील पण मनाची नी आत्म्याची भूक ती कशी भागवू शकणार ? विविध तऱ्हेची खाद्य पेये, मोठमोठ्या इमारती, मोटारी, विमाने यासारख्या उपभोग्य वस्तु तात्कालिक सुख माणसाला देऊ शकतील पण तेवढ्याने अखंड आनंदासाठी तळमळणारा मानव कायमचे. टिकाऊ असे कसे प्राप्त करू शकणार? जड, विनाशी, व दुःखी अशा भौतिक जीवनाच्या पलिकडे चैतन्ययुक्त, शाश्वत व सुखकारक अशा सनातन अध्यात्मपर जीवनाचा मार्ग दर्शविणारे तत्वज्ञान इतर राष्ट्रांना ज्ञात नसल्यामुळे भौतिक प्रगतीची परिणती, मानवी अध:पतनात होईल की काय अशी त्यांना भीती वाटू लागली आहे! निसर्गाचे भौतिक सामर्थ्य त्यांनी कमावले पण 'स्व' ला मात्र त्यांनी गमावले ! बाह्य सर्व वस्तु त्यांनी मिळविल्या पण 'स्वत:' ला मात्र हरवून बसले ! श्री. बिली ग्रेहॅम[१०] याने ही त्यांची स्थिती फार मार्मिकपणे व्यक्त केली आहे तो म्हणतो,

" The American genius has enabled us to change virtually everything but ourselves . . . . . It is absolutely impossible to change society and reverse the moral trend unless we ourselves are changed from the inside out. "

औद्योगिक उत्कर्षाचे व शिक्षणपद्धतीचे जे भयावह परिणाम आज पाश्चात्य देशात अनुभवास येऊ लागले आहेत. त्यामुळे अनेक विचारवंत सचिंत झाले आहेत.[११] मानवी जीवनावर घाला घालणारे एक प्रकारचे जागतिक अरिष्ट (*World-Crisis*) कोसळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत ! या अरिष्टाला आळा घालण्याचे आव्हान अध्यात्मशास्त्रच स्वीकारू शकते ! योगविद्या हे त्या अध्यात्माचेच एक प्रायोगिक शास्त्र! देह, मन व आत्मा या सर्वांची सारखीच उन्नती एकाच वेळी करण्याचे सामर्थ्य असलेले योगशास्त्र शिक्षणाचे एक साधन म्हणून आपण का का उपयोगात आणू नये ?

योगविद्येचा शिक्षणात अंतर्भाव

मोंघीर येथे स्वामी सत्यानंद यांनी स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय योग संस्थेने (*Inter-national Yoga Institute*) प्रशिक्षित केलेले शेकडो परकीय शिष्य पाहिले म्हणजे उद्योग प्रधान पाश्चात्य देशात या शास्त्राबद्दल केवढी आस्था व प्रेम उत्पन्न झाले हे प्रत्ययास येते ! गोंदिया व रायगड येथे भव्य प्रमाणावर नुकत्याच आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय योग सम्मेलनात तर 'योगाचे शिक्षणातील स्थान' *(Place of Yoga in Education)* हाच संपूर्ण चर्चेचा व भाषणांचा मुख्य विषय होता. योगाद्वारे विविध स्तरावर विद्यार्थ्यांना कसे शिक्षण देता येईल ? याचा तज्ञांनी अभ्यास करून महत्वपूर्ण निष्कर्ष काढले पाहिजेत ! भारतीय शाळातून व महाविद्यालयातून योग विद्येची तत्वे अध्यात्मशिक्षणाचा एक भाग म्हणून कशी अनुस्यूत करता येतील ? याचा विचार करण्याची वेळ आज आली आहे. अन्यथा स्वामी सत्यानंदांनी एका ठिकाणी भाषणात आपलीं या बाबतीतली उदासीनता पाहून " ही आपली विद्या परकीयांकडून आपणास शिकणाची पाळी येईल ! " असे विनोदाने उद्गार काढले होते; ती अवस्था खरोखरच यावयाची[१२] !

संदर्भ टीपा

१. ईशावास्योपनिषद; श्लोक ११ वा.

२. *The Besant Spirits: Vol. II; p. 61–62.*

३. *The Complete Work of Swami Vivekananda; Vol.IV; p. 304.*

४. श्री गुलाबराव महाराज : पत्रव्यवहार भाग १; पृ. ४७–४८.

५. *Evening Talks with Shri Aurobindo; p. 138.*

६. *Quoted from Wit and Wisdom of Swami Dayananda; Ed. by N. B. Sen; p. 178–179.*

७. *J. Krishnamurti : Education and the Significance of Life; p. 14.*

८. *Aurobindo Ghosh : A System of National Education; p. 3 and 4.*

९ *S. Radhakrishnan : Occasional speeches and writing; Vol. I; p 54*

१०. *Ibid : p. 54.*

११. *Development of Education in New India; Ed. by N. B. Sen; p. 192.*

१२. *John Dewey : The Child and the curriculum; p. 9.*

१३. *As always with Indian thinkers he (Aurbindo) sees the aims of education as one with the aim of life; Dr. Sisir kumar Ghosh : Total Education; from " Mother India "; Special Issue; 15 Aug., 1966.*

१४. *Shri Aurobindo and the Mother on Education; p.13.*

१५. *Robert Havighurst; " Social Deviancy among Youth : Types and Significance – Social Deviancy among Youth "; p. 71–77.*

१६. *Glorious Thoughts on Education; p. 21.*

१७. *Robert L: Gaudino: "The Indian University"; p. 218. Also refer G. H. Bantock : Education in an Industrial Society; p. 120–121.*

१८. *Education is not a question of merely accumulating a great deal of factual information; this is only the meterial knowledge; and the wise man is not he who knows much, but he who possesses the intellectual habitus whereby to judge rightly of what is presented by experience."*
Gerald Wann O. P. in "Morals & Man", p. 76-77.

१९. *Philip E Jacob : " Does Higher Education influence Students values ?" in ' Society and Education;' ed. James D. Raths and Jean D. Grambs; p. 195.*
Also refer : David Riesman; The Lonely Crowd " He has pointed out that character - formation in modern times has shifted from the family to the peergroups."

२०. *Jose Ortega: Mission of the University; translated by Howard Lee Nostrand; p 49-50.*

२१. *S. Radhakrishnan : Occassional speeches and writting; p. 65.*

२२. दैनिक 'तरुण–भारत,' नागपूर दि. १२–२–७०.

२३. *Quoted from " Glorious Thoughts on Education; " p. 142.*

२४. श्रीमत् दासबोध : दशक २; समास ३; ओवी ४; ११; १५; ३६; ३७;
३८. आणखी पहा दशक २; समास १ ला - मूर्ख लक्षण
दशक २; समास २ रा – उत्तम लक्षण

२५. *Swami Vivekananda : in his lecture on Vedanta and its application to Indian Life; delivered in Madras in 1897.*

२६. *Quoted from : Glorious Thoughts on Education;p.20.*

२७. *S. Radhakrishnan : Occassional speeches and writtings; p. 65.*

२८. *Yogi Aurobindo Ghosh : A system of National Education.*

या ग्रंथाच्या दुसऱ्या व पाचव्या प्रकरणाच्या आधारे पुढील विवेचन केले आहे.

२९. *Swami Vivekananda : Education; p. 6.*

३०. *Billy Graham: in 'Life' Magazine; 15th Aug; 1960.*

३१. संदर्भासाठी वाचनीय पुस्तके :–

Spengler : The Decline of the west.
Freud : Civilization and its Discontents.
Ortega Y. Gasset : The Revolt of the Masses.

३२. *" Otherwise, it is quite likely, that this Indian Science be imported in our country as a finished product from overseas. This sort of western mindedness is, indeed, a very sad thing, particularly about the science which is their own. "*
D. J. Limaye : The Dynamics of Education; p. 243.

✠ ✠ ✠

नऊ

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम

"कोणीही माणूस देव नाही. परंतु प्रत्येक मनुष्याच्या अंतरंगात देवाचे वास्तव्य आहे. तो प्रगट करणे हाच दैवी जीवनाचा मुख्य हेतू आहे. ही गोष्ट करणे आपणास शक्य आहे. हे काम करणे कठिण आहे हे मला ठाऊक आहे. पण मनुष्य कसाही असो, त्याला एकदा ईश्वराचा स्पर्श झाला किंवा त्याचा आत्मा जागा झाला की लहानमोठा हा भेद रहात नाही. अडचणी येतात. वेळही लागतो परंतु शेवटी हृदयात वास करणारा देव सगळी संकटे दूर करतो."

योगी अरविन्द[1]

"*To build up in every man and women a solid core of spiritual life, which will resist the attrition of everyday existence in our mechanized world – that is the most difficult and important task of school and university.*"

Sir Richard Livingstone.[2]

(अ) अभ्यासक्रमाची स्थूल रूपरेषा

शासकीय समितीतर्फे योजना

सर्व धर्मांना समान असलेल्या व त्यामुळे सर्व धर्म, पंथ व संप्रदाय यांना मान्य असलेल्या, नैतिक व आध्यात्मिक जीवनमूल्यांचे शिक्षण देण्यासाठी एक सार्वत्रिक योजना आखून, तिची अंमबजावणी करण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे उचित व आवश्यक आहे; तसे करण्यास संविधानाची कोणतीही अडचण येत नाही हे आपण पाहिलेच आहे.

तेव्हा या दिशेने उचलावयाचे पहिले पाऊल म्हणून, संपूर्ण राज्यात लागू होऊ शकेल अशी आध्यात्मिक शिक्षणाची सर्वांगीण योजना तयार करण्यास, या विषयाची आस्था असलेले प्रमुख शिक्षणतज्ञ व शिक्षण क्षेत्राबाहेरील पण या विषयाचा व्यासंग असलेले अनुभवी विद्वान, यांची एक समिती शासनाने नेमावी. या समितीने राज्यातील या क्षेत्राशी संबंधीत अशा जाणकारांच्या मुलाखती घेवून व प्रश्नावली पाठवून सर्वांच्या सूचना व कल्पना मागवाव्यात व या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून आपली योजना जनतेसमोर जाहीर करावी. ही योजना जाहीर झाल्यापासून सुमारे दोन महिने समाजातील विचारवंतांची उलटसुलट अनुकूल वा प्रतिकूल मते मागवावीत. विविध धर्मातील प्रमुखांना व

शिक्षणतज्ञांना या समितीतर्फे प्रश्नावली पाठवावी. प्रश्नांची उत्तरे "होय-नाही-माहित नाही" (*Three point scale* च्या) या धर्तीवर मागवावी, म्हणजे चटकन सर्वांची प्रतिक्रिया कळू शकेल. या सर्व प्रतिक्रियांचा योग्य तो विचार करून, समितीने अभ्यासक्रमाच्या आराखड्यासह आपली अंतिम योजना राज्याच्या शिक्षणखात्याला सादर करावी.

ज्ञानाची परिणती आचरणात

मात्र एक गोष्ट येथे आग्रहाने नमूद केली पाहिजे की, इतर अनेक विषयाप्रमाणे आध्यात्मिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात केवळ पुस्तकी वा तात्विक ज्ञानावर *(Bookish or Theorotical Knowledge)* भर दिला जाऊ नये. अन्यथा विद्यार्थी जीवन शीलसंपन्न करण्याचा जो या शिक्षणाचा मूळ हेतू तोच साध्य होणार नाही. तेव्हा अध्यात्मज्ञान केवळ बुद्धीने समजणे एवढेच एकमेव उद्दिष्ट, अभ्यासक्रम आखतांना असू नये तर बुद्धीने या शास्त्राचे आकलन झाल्यावर या ज्ञानाची परिणती आचरणात कुठवर होते, याचाही मागोवा घेतला जाईल, ही दक्षता हा अभ्यासक्रम आखतांना तज्ञांनी घेतली पाहिजे. विचाराबरोबरच आचाराचे महत्वही अभ्यासक्रमात नमूद केले पाहिजे.

विद्यार्थी जीवनाच्या चार अवस्था

आता हे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणानुसार ज्या चार प्रमुख अवस्था कल्पिता येतील त्या खालीलप्रमाणे :—

अवस्था	कालावधी
१. प्राथमिक शिक्षण अवस्था *Primary Stage*	४ वर्षें
२. पूर्व माध्यमिक शिक्षण अवस्था *Middle School Stage*	३ वर्षे
३. माध्यमिक शिक्षण अवस्था *High School Stage*	३ वर्षे
४. महाविद्यालयीन शिक्षण अवस्था *Collegiate Stage* (पदवी परिक्षेपर्यंत)	४ वर्षें
शिक्षणाचा एकूण कालावधी	१४ वर्षें

बौद्धिक पात्रतेच्या दृष्टीने भिन्न असलेल्या या विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अभ्यासक्रम वेगवेगळा राहील हे सांगायला नकोच. प्राथमिक शाळेत नांव टाकल्यापासून पदवी प्राप्त करण्यापर्यंतचा वरील सुमारे १४ वर्षांचा विद्यार्थी जीवनाचा संस्कारक्षम असा कालखंड, अखंडपणे नि कल्पकतेने जर उपयोगात आणला, तर भारतीय अस्मितेचा यथार्थ अभिमान असणारा सत्प्रवृत्त, सुशील व सद्गुणसंपन्न असा नागरिक या अभ्यासक्रमामुळे तयार झाल्याशिवाय राहणार नाही. या चारही प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये एक प्रकारचा दुवा असणे अपरिहार्य आहे. हा दुवा कोणता ? डॉ. ॲनी बेझंट यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, "*Only with an education, full of Indian ideals, full of Indian spirit, full of Indian power, full of Indian unity, full of Indian simplicity, full of Indian purpose, full that is, of Indian life, can India be herself.*"

याप्रमाणे भारतीय आदर्श डोळ्या समोर ठेऊन विविध अवस्थांतील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व मानसिक विकासाच्या चढत्या क्रमानुसार त्यांची नैतिक व आध्यात्मिक धारणाशक्तिही उत्तरोत्तर वाढत राहील अशी दक्षता कार्यक्रमांची आखणी करतांना घ्यायला हवी.

स्थूल स्वरूपाचे मार्गदर्शन

मात्र येथे हे स्पष्ट केले पाहिजे की, वरील चार प्रमुख अवस्था-तील प्रत्येक वर्षात कोणता अभ्यासक्रम नेमावा हे आम्ही या ग्रंथात सुचविणार नाही. त्या अवस्थातील शिक्षणाचा अनुभव घेतलेली तज्ञ मंडळी त्याचा तपशील ठरवू शकतील. येथे आम्ही केवळ या विभिन्न अवस्थे-तील अभ्यासक्रमाचे स्थूल स्वरूप नमूद करणार आहोत. ते देखील मार्गदर्शनपर (*As guide line principles*) तत्वे म्हणूनच ! अनुभवान्ती त्या त्या क्षेत्रांतील शिक्षकांनी या अभ्यासक्रमात सुधारणा सुचवाव्यात अशीच आमची अपेक्षा आहे.

इतर विषयाप्रमाणे आध्यात्मिक शिक्षणाचा एक विशिष्ट अभ्यासक्रम एका विशिष्ट शैक्षणिक सत्रात पूर्ण करणे हा झाला या योजनेचा केवळ एक भाग. पण अशा नेमलेल्या अभ्यासाशिवाय इतर कोणत्या

उपायांनी या शिक्षणाचा हेतू साध्य करता येईल, हे देखील ठरविणे तितकेच महत्वाचे आहे. हे उपाय दोन प्रकारचे राहू शकतील. एक म्हणजे विशिष्ट अवस्थांना अनुलक्षून अमलात आणावयाच्या सहाय्यक बाबी, दुसरे म्हणजे सर्व अवस्थांना सार्वत्रिकपणे लागू करता येण्याजोग्या गोष्टी. या प्रकरणात आम्ही प्रथम प्रत्येक अवस्थेसाठी उपयुक्त अभ्यास-क्रम व त्यासाठी सहाय्यक ठरणाऱ्या बाबी क्रमशः देत आहोत. त्यांत नमूद केलेल्या बाबींची उत्साहाने अंमलबजावणी केली तर अभ्यास-क्रमाला अनुकूल असे वातावरण व विद्यार्थ्यांची मनोभूमिका, तयार करणे खचित सुलभ होईल.

विभिन्न अवस्थांतील अभ्यासक्रमाचे स्थूल स्वरूप.

(१) प्राथमिक शिक्षण अवस्था

प्राथमिक वर्ग १ ते ४, वयोमर्यादा ६ ते १० वर्षे, कालावधी ४ वर्षे.

आवश्यक अभ्यासक्रम

(अ) समर्थंकृत *(Compalsary course)* " मनास बोध " वा तत्सम[२] संतरचित सुलभ श्लोक निदान ५० पाठ करवून घेणे. त्यातले काही सामूहिकपणे रोज म्हणावयास लावणे.

(ब) स्वच्छता, टापटीप, स्नान, केस विंचरणे, नखे कापणे, शुद्धोच्चार, देव, आई वडिल व गुरूजनांना रोज नमस्कार इ. प्राथमिक सवयी लावून त्याचे महत्व विद्यार्थी मनावर बिंबविणे.

(क) नेमलेल्या पाठ्य पुस्तकातील (*Text-Book*) धडे शिकविणे. ही पुस्तके तज्ञांनी विद्यार्थ्यांची वयोमर्यादा लक्षात घेऊन मुद्दाम लिहिलेली असावीत[३]. पाठ्यपुस्तकांच्या[५] आधारावर सुमारे ३० मिनिटांची २५ गुण असलेली लेखी परिक्षा असावी. तसेच नियम पालन व पाठांतर यासाठी व एकूण वर्तन व सदाचरण यासाठी प्रत्येकी २५ असे एकूण ५० गुण असावेत.

सहाय्यक बाबी

(अ) थोर पुरूषांची चित्रे वर्गातील प्रत्येक खोलीत लावावीत. त्यांचा गोष्टीरूपाने अल्पपरिचय शिक्षकांनी करून द्यावा.

(ब) श्रेष्ठ महात्म्यांची बोध–वचने आठवड्यातून निदान दोन वेळ तरी लिहावीत. वेगळ्या वहीत सुवाच्य अक्षरात ती विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगावी.

(क) पाठांतराची व कथा–कथनाची, महिन्यातून एकदा बाल-सभा आयोजित करून, स्पर्धा घ्यावी. स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकांना बक्षिसे द्यावीत.

(२) पूर्व माध्यमिक शिक्षण अवस्था

इंग्रजी इयत्ता ५ ते ८, वयोमर्यादा ११ ते १४, कालावधी ४ वर्षे.

आवश्यक अभ्यासक्रम

(अ) इतर विषयाप्रमाणे प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र पुस्तक नेमलेले असावे. आठवड्यातून निदान दोन तास *(Periods)* राखून ठेवून या पुस्तकाचा अभ्यास प्रत्येक वर्षी पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

(ब) विविध धर्मातील निवडक श्लोक, सुभाषिते, ओव्या, अभंग यांचा संग्रह असलेले एक पुस्तक, प्रत्येक इयत्तेचा दर्जा लक्षात घेऊन छापले जावे. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना, त्यांना नेमून दिलेल्या पुस्तकातील सर्व पद्यात्मक भाग, मुखोद्गत व्हावा.

रोज शाळा सुरू होण्यापूर्वी वा शाळा संपल्यावर शाळेच्या पटांगणात विद्यार्थ्यांनी सामूहिकपणे वा वर्गशः अध्यापकासोबत या पुस्तकातील काही भाग म्हटला तर किशोरावस्थेतील या विद्यार्थ्यांना दरवर्षी सुमारे १०० ते १५० श्लोक वा सुभाषिते पाठ होणे मुळीच अवघड नाही. प्रातःकाळी शाळेच्या पटांगणात नुकत्याच उगवलेल्या सूर्याला अभिवादन करून सुरू झालेल्या या चिरंतन साहित्याच्या सामूहिक पठणाचे हे दृश्य कुणाला विलोभनीय वाटणार नाही ? या दृश्याचा विद्यार्थी मनावर खचितच चांगला ठसा उमटेल.

(क) दरवर्षी इतर विषयासोबतच सुमारे दोन तासांची ५० गुण असलेली, पाठ्यपुस्तकावर आधारलेली, प्रश्नपत्रिका प्रत्येक विद्यार्थ्याला तिमाही, चाचणी व अंतिम परीक्षेत (*Terminal, Test & Final Examination*) सोडवावी लागेल; लेखी परीक्षेप्रमाणे पाठांतराची व विद्या-

श्यांमधील इतर सद्‌गुणांना पारखण्यासाठी तोंडी परीक्षा घेतली जाईल. या दोहोसाठी प्रत्येकी ५० गुण राहतील. परीक्षा घेण्यासाठी दोन शिक्षक राहतील. अेक अंतर्गत (*Internal*) जो त्या वर्गाला शिकविणारा अ यापकच्च असेल; दुसरा बहि:शाल (*External*) ज्याची नेमणूक मुख्याध्यापक करतील या मौखिक परीक्षेत विद्यार्थ्यांचे पाठांतर किती झाले आहे याची चांचणी तर घेण्याची अपेक्षा आहेच; पण त्याहीपेक्षा महत्वपूर्ण बाब म्हणजे त्या विद्यार्थ्यात विविध सद्‌गुणांची, सद्‌भावनांची व सद्‌भिरूचींची जोपासना किती प्रमाणात झाली आहे, हे काही प्रश्नांच्या आधाराने अजमावणे, पाठांतर व नैतिक गुणांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करणे.

सहाय्यक बाबी

(अ) लेखी व मौखिक परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या वा पहिल्या तीन क्रमांकांना आकर्षक बक्षिसे ठेवावीत. ती जाहीर कार्यक्रमातून देण्यात यावीत.

(ब) शाळेत वा समाजात व वावरतांना एखाद्या विद्यार्थ्याने अनुकरणीय व उल्लेखनीय असे सत्कृत्य केले असेल तर, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापकांनी त्याची वाच्यता करून त्या विद्यार्थ्याच्या अंगी त्या घटनेमुळे व्यक्त झालेल्या नैतिक गुणाचे अभिनंदन करावे
उदा :– विहिरीत पडलेल्या वा आगीत सापडलेल्यांना वाचविणे, आजारपणात कुणाची सेवाशुश्रूषा करणे, चोरास पकडून देणे. या घटनाद्वारा जे साहस, परोपकारिता व प्रसंगावधान हे गुण प्रगट झाले, त्याबद्दल जाहीर सत्कार करावा; त्यामुळे इतर विद्यार्थी हे गुण अंगी यावे म्हणून प्रयत्नशील होतील.

(क) सुसंस्कार होऊन चारित्र्य निर्मिती होईल, अशा सुबोध व आकर्षक शैलीत लिहिलेल्या पुस्तकांचे वेगळे दालन ग्रंथालयात असावे. या विभागाकडे शिक्षकांनी विविध प्रकारे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधावे. जो अधिक पुस्तके वर्षभरात वाचेल त्याला पुस्तक रूपाने शाळेने बक्षीस जाहीर करावे.

(ड) प्रेरणादायी असा "बोधपट" दर आठवड्याला फळ्यावर लिहिला जावा. तो वेगळ्या वहीत लिहून घेण्यास सर्वांना प्रवृत्त करावे.

निवडक विद्यार्थ्याकिडून कांही बोधपट पाठ करवून घ्यावे. त्यांची स्पर्धा घेतली तर फार मौज वाटते, हे मोठ्यांचे मोठा आशय असलेले बोल लहानांच्या मुखातून ऐकतांना !

(इ) दरवर्षी प्रत्येक वर्गाला दोन देशभक्तीपर गीते " वर्ग गीते[६]" (*Class songs*) म्हणून नेमून द्यावीत. ती गीते सामूहिकपणे सुयोग्य अशा चाली लावून वर्गशः म्हणता येतील अशी असावी. शक्य असल्यास बासरी, पेटी वा तत्सम एखाद्या वाद्याचा उपयोग करावा. स्नेहसंमेलन वा अन्य एखाद्या कार्यक्रमात प्रत्येक वर्गाने आपले वर्ग-गीत शिस्तबद्धपणे सादर करावे, सर्वोत्कृष्ट गीत ज्या वर्गाचे होईल त्यांना फिरती ढाल देण्यात यावी.

(ई) विविध प्रकारे कांही चांगल्या सवयी व नियम विद्यार्थ्यांना या वयात लावण्याचा प्रयत्न सर्व शिक्षकांनी योजनाबद्धरीत्या करणे फार आवश्यक आहे. उदा :– पहाटे उठणे, नियमित व्यायाम घेणे, मृदु पण मधुर संभाषण करणे इ. नियमांचे महत्व व त्याचे सुपरिणाम अनुभवाने विद्यार्थ्यांना एकदा पटले, म्हणजे आयुष्यभर त्यांना त्यांचा लाभ होईल. या वयात लागलेली सवय मोठेपणी सहसा सुटण्याचा संभव नाही.

(अु) पाश्चात्यांचे *Thank you, Sorry, Excuse me* इ. कृतज्ञता, व सहानुभूती-दर्शक शब्दप्रयोग आपल्या पद्धतीने आपण वापरण्यास शिकविले पाहिजे. सभ्य वागणुकीची पद्धत व रीतीरिवाज *(Etiquette & Manners)* यांचे सद्यःकालात असलेले महत्व, दुर्दैवाने भारतीय विद्यार्थ्यांना अद्याप कळलेले अनुभवास येत नाही. उत्तम रीतीरिवाजाइतकी अत्यंत बिनखर्चाची पण अत्यंत मोलाची बाब जगांत क्वचितच आढळेल.[७] असे असूनही ते आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पुरेसे पडलेले आढळत नाहीत.

ह्याचे मुख्य कारण खालावलेली आजची नैतिक पातळी. जे आंतरिक भाव मनांत उत्कटपणे वसत असतात त्यांचेच प्रतिबिंब व्यक्तीच्या चालीरीतीत नि आचरणात उमटत असते. वर्तणूक हा व्यक्तीच्या भावविश्वाचा आरसा असल्याचे जे गटेने[८] म्हटले आहे ते

पूर्णपणे सत्य आहे, कारण बार्टोलने' म्हटल्याप्रमाणे "*Good manners and good morals are sworn friends and fast allies.*"

(अ) पू. साने गुरूजी कथामाला या वयोमर्यादेत विद्यार्थ्यांच्या वाचनात आल्यात तर अनेक मानवी गुणांचा ठसा त्यांच्या मनावर उमटल्याशिवाय राहणार नाही. "श्यामची आई" या ग्रंथाचे वाचन केल्यावर अंतःकरण हेलावून मातृत्वाच्या उदात्त आदर्शावरील श्रद्धा वाढल्याशिवाय कशी राहील ? साने–गुरुजींचे एकूण वाङ्मयच विद्यार्थ्यांच्या हळुवार मनाला फुंकर घालून, त्यांत राष्ट्रीय गुणांचे बीजारोपण करण्यास, फार सहाय्यक ठरेल याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. सुमारे पंधरवाड्याने वा महिन्याने त्यांनी लिहिलेल्या कथांचे सामुदायिक वाचन हा शालेय कार्यक्रमांत नित्याचा म्हणून उपक्रम व्हावा. विद्यार्थी या कथावाचनाची उत्सुकतेने वाट पाहू लागतात व फार आवडीने त्या ऐकतात असा सर्वत्र अनुभव आहे

(३) माध्यमिक शिक्षण अवस्था

इंग्रजी इयत्ता ९ व १०, वयोमर्यादा १५ ते १६, कालावधी २ वर्षे

माध्यमिक शिक्षणाची जी दुसरी अवस्था वर नमूद केली आहे, त्यापेक्षा थोडचा अधिक वयोमर्यादेतील व मानसिक प्रगल्भावस्थेतील किशोर, या तिसऱ्या अवस्थेत समाविष्ट होतात. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिक्षणाच्या या दोन्ही अवस्थांत नजरेत भरावा असा फरक विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीत पडत नाही. शिवाय शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व एकूण शिक्षणाचे वातावरण या सर्व बाबतीत या दोन्हीत समानता असते.

साहजिकच या तिसऱ्या अवस्थेतील अभ्यासक्रम व त्याला सहाय्यक असलेल्या बाबी यांचा वेगळा स्वतंत्र असा विचार करण्याची गरज आम्हाला वाटत नाही. दुसऱ्या अवस्थेत वर्णिलेला अभ्यासक्रम व सहाय्यक बाबी या गटातील शिक्षणाला देखील अभिप्रेत आहेत. फक्त फरक पडेल तो वाढत्या शिक्षणाबरोबर येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगत मनःस्थितीला व दर्जाला अनुलक्षून कराव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाच्या श्रेणीत ! हा अभ्यास थोडया वरच्या दर्जाचा राहील, हे उघड आहे.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला असा एका अनुभवी शिक्षण तज्ञाचा अभ्यासक्रम परिशिष्ट क्र. १ मध्ये पहावा.

(४) महाविद्यालयीन शिक्षण अवस्था

पूर्वविद्यापीठ ते पदवी परीक्षा

वयोमर्यादा १७ ते २०; कालावधी ४ वर्षे

आवश्यक अभ्यासक्रम

(अ) नेमलेल्या पाठपुस्तकांचा *(Text Book)* दरवर्षी इतर विषयाप्रमाणेच नियमित अभ्यास असावा. यासाठी वेळापत्रकांत दर आठवड्याला २ किंवा ३ तास राखून ठेवलेले असावेत.

(ब) वर्गात शिकविल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांशिवाय दरवर्षी किमान ४ पुस्तकांची पूरक वाचनासाठी *(Books for supplementary-Reading)* शिफारस करावी. ही पुस्तके अर्थातच पाठ्यपुस्तकाला पूरक व नियोजित अभ्यासक्रमाशी संबंधीत अशीच राहतील.

वर्षभरात या पुस्तकांचे केव्हाही वाचन करून सारांश रूपाने त्यांची टिपणे विद्यार्थ्यांनी एका वेगळ्या वहीत काढावीत. ही वही मार्च अखेर प्राध्यापकांना तपासण्यासाठी दिली जावी.

(क) संपूर्ण शैक्षणिक सत्रात कोणत्या दोन चांगल्या सवयी आपण अंगी बाणवणार आहोत हे महाविद्यालयांत प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांने प्रवेश अर्जात नमूद करावे.

वर्षभरात या सवयींचे कितपत पालन झाले हे अध्यापकाने बघावे. वर्षअखेर टिपणवहीत वा रोजनिशीत या नियमांची किती प्रमाणात अंमलबजावणी झाली हे विद्यार्थ्यांने नमूद करावे.

(ड) "नैतिक व आध्यात्मिक शिक्षण" यासाठी होणाऱ्या परीक्षेला एकूण १२५ गुण राहतील. या गुणांची विभागणी विभागणी खालील तीन विभागांत पुढील प्रमाणे केली जाईल.

(१) लेखी *(Theory)* पाठ्यपुस्तकावर आधारित दोन तासांची प्रश्नपत्रिका	गुण ५०

(२) टिपण वही (*Practical Note Book*)	२५	
सद्गुणदृष्टचा व्यक्तिमत्व व तोंडी चाचणीवर आधारित		५० ७५
एकूण गुण		१२५

सहाय्यक बाबी

(अ) महाविद्यालयात दरवर्षी जो वार्षिक अंक प्रसिद्ध होतो त्याची एकूण मांडणी अशी असावी की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा सुसंस्कार उमटेल. काही मोठ्या महाविद्यालयांत साप्ताहिक व पाक्षिकही नियमितपणे प्रसिद्ध होते. त्यात विद्यार्थ्यांच्या अंत:करणातील सदभावनांना प्रोत्साहित करणारे एक आकर्षक सदर अत्यंत कौशल्याने चालविण्याची जबाबदारी एखाद्या साहित्यिक प्राध्यापकाने स्वत:कडे घ्यावी विद्यार्थ्यांचे मनावर हे सदर सुपरिणाम घडविल्याशिवाय राहणार नाही

(ब) विविध विषय विद्यार्थ्यांना शिकवितांना प्राध्यापक अप्रत्यक्षपणे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे पाठ विद्यार्थ्यांना न कळत सहजपणे देवू शकतील, फक्त तसा दृष्टिकोण मात्र त्यांना असावयास हवा! विशेषत: कला विभागात (*Arts Faculty*) हे अधिक शक्य आहे. समाजशास्त्र, नागरिकशास्त्र, मराठी, इंग्रजी इ. भाषा शिकवितांना विद्यार्थ्यांना सदुपदेश करता येईल.

उदा: *Unseen Passage* वा *Precise-Writing* देते वेळी असा मजकूर निवडावा, की त्याद्वारा अभ्यासासोबतच सुविचारांचा उत्तम ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटेल.

ग्रंथालयात वेगळा कक्ष

(क) विविध धर्म, पंथ, संप्रदाय यांचे प्रमुख ग्रंथ, त्यावरील भाष्ये, थोर पुरुषांची चरित्रे व स्फूर्तिदायक असे इतर साहित्य, यांचा ग्रंथालयात एक वेगळा कक्ष असावा. "सत्साहित्य दर्शन, चिरंतन वाङ:मय कक्ष" असे काही समर्पक नांव या कक्षाला दिले जावे. बहुसंख्य

विद्यार्थ्यांना या विभागातील ग्रंथ सहज विनासायास उपलब्ध होतील अशी एकूण व्यवस्था असावी.

अशा प्रकारे निवडक साहित्याचे ग्रंथालय ही उत्तम शिक्षकाइतकीच आवश्यक बाब आहे. कार्लाइलने[१०] देखील *"The true University of these days is a collection of books."* असे त्याच्या काळात विधान केले होते. आदर्श शिक्षक दुर्मिळ होत चाललेल्या आजच्या स्थितीत तर ग्रंथालयाचे महत्व अधिकच वाढले आहे. *'Meak young men grow up in Libraries'* हे इमर्सनने काढलेले उद्‌गार वैचारिक दृष्टया खुरटलेल्या आजच्या युवकांच्या बाबतीत तर अधिकच लागू आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

शीख धर्माची गुरूपरंपरा जेव्हा खंडित झाली तेव्हा शीखांचा दहावा व अखेरचा गुरू गोविन्दसिंह यांनी असे जाहीर केले, की यापुढे गुरूपरंपरा बंद झाली असून गुरूंना असलेले सर्व अधिकार-प्रामाण्य आता केवळ आदिग्रंथात निहित झाले आहे असे समजावे. गुरू गोविन्दसिंह यांचा हा आदेश पाहता, लोकमान्य टिळकांच्या "गुरू हे काही जन्मभर पुरत नाही, म्हणून ग्रंथ हेच आमचे गुरू होत," या सुप्रसिद्ध वचनाची आठवण होते. सारांश, विद्यार्थ्यांच्या वाचनाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

जे विद्यार्थी सर्वाधिक पुस्तकांचे वाचन करतील त्यांना ग्रंथाच्या रूपाने जाहीररित्या बक्षिसे वाटली जावी. प्रत्येक वर्गाला एक याप्रमाणे एका ज्ञानशाखेला (*Faculty*) किमान चार बक्षिसे देण्यात यावी. कला व वाणिज्य शाखा असलेल्या बहुतेक महाविद्यालयातील ८ वर्गांना या प्रमाणे एकूण आठ बक्षिसे दिली जावी. सत्साहित्याच्या वाचनाची गोडी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लागण्याच्या दृष्टीने अशा जाहीर अभिनंदनाचे विशेष महत्व आहे.

(ड) कोणत्याही विक्रेत्याशिवाय सहकारी पद्धतीवर विद्यार्थ्यांनी दैनंदिन आवश्यक साहित्याचे एक दुकान चालवून पहावे. वर्तमानपत्रे, चॉकलेट, बिस्किटे, रबर, पेन्सिल, ब्लेड, साबण यासारख्या अत्यल्प किंमतीच्या वस्तू प्रथम विक्रीसाठी ठेवाव्यात. सुरूवातीस अत्यंत प्रामाणिकपणे सर्व व्यवहार

करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करावे. काही आठवडे हा प्रयोग करून त्याची व्यवहार्यता ठरवावी. या उपक्रमाचे यशापयश हे विद्यार्थ्यांच्या सचोटीचे गमकच म्हणावे लागेल. काही ठिकाणी अशी "प्रामाणिक वस्तु भांडारे" यशस्वी झाली आहेत.

सुधारणा सूचना पेटी

(इ) प्रत्येक महाविद्यालयातील वाचनालयात वा सहज जाता येईल अशा मोक्याच्या जागी "सूचना सुधारणा पेटी" कुलूप लावून ठेवण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या सुप्त मनात येणाऱ्या अनेकविध विचारांना वाचा फोडण्याचे सामर्थ्य अशा पेटीत असते, असे काही ठिकाणच्या प्रयोगाने सिद्ध झाले आहे.

खालील मोठे लाभ या लहान उपक्रमाने होण्याजोगे आहेत.

१. प्राचार्य व प्राध्यापक यांचेबद्दल विद्यार्थ्यांना मनोमन काय वाटते ? त्यांच्या अध्यापकांकडून काय अपेक्षा आहेत ? हे कळते.

२ महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाजात काय उणीवा आहेत, कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे.याची कल्पना येते.

३. अध्यापक व विद्यार्थी यांना आत्मनिरीक्षणाची व डोळसपणे सर्वत्र पाहण्याची सवय लागते.

४. दोष–दिग्दर्शन व सद्गुण संवर्धनास सहाय्य होते

हे लाभ पदरीपडण्यास खालील गोष्टींची मात्र अपेक्षा आहे.

१. सभ्यता न सोडता काय वाटेल ते लिहिण्याचे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यावे. अशी मोकळीक दिली तरच ते दिलखुलासपणे आपले मन मोकळे करतील.

२. सुमारे पंधरवाड्याने दोन विद्यार्थी व दोन अध्यापक यांच्या उपस्थितीत ही पेटी उघडली जावी. सर्व चिठ्या, पत्रे वाचून त्याची एका रजिस्टर मध्ये नोंद करून घ्यावी. पत्राचा सारांश नमूद केला जावा.

३. संबंधित व्यक्तीकडे पत्रे पोहोचती करावी. प्राचार्यांना काही सूचना असतील, एखाद्या अध्यापकांचे गुणवर्णन वा दोष–दर्शन त्यात असेल तर त्यांच्याकडे ते पाठविले जावे.

पूर्व माध्यमिक शिक्षण अवस्थेसाठी "सहाय्यक बाबी" म्हणून ज्या आठ गोष्टी सुचविल्या आहेत त्यांचा थोडयाफार फरकाने महाविद्यालयातही उपयोग होऊ शकेल. पुनरावृत्ती टाळावी म्हणून त्यांचा येथे पुन्हा उल्लेख केला नाही. महाविद्यालयात अंमलात आणावयाच्या उपक्रमांचा दर्जा मात्र शाळेपेक्षा वरच्या प्रतीचा रहावा, अशी अपेक्षा राहील, हे उघडच आहे. शिक्षणाच्या चार प्रमुख अवस्थांमध्ये अपेक्षित असलेल्या अभ्यासक्रमाचे व त्याला सहाय्यक अशा बाबींचे स्थूल विवेचन आपण आतापर्यन्त केले.

वरील सर्व विवेचन हा झाला अभ्यासक्रमाचा स्थूल सांगाडा वा आराखडा ! तो देखील अंतिम स्वरूपाचा खचित नव्हे. त्यांत कुणी बदल सुचविला किंवा नवीन भर घातली तर ती स्वागतार्हच राहील !

सहाय्यक बाबींची विवेकपूर्ण निवड

सर्वसंमतीने जो काही अभ्यासक्रम विविध शैक्षणिक अवस्थांसाठी निश्चित करून सर्वत्र लागू केला जाईल, त्याचे काटेकोर पालन सर्व शिक्षणसंस्थांनी करणे आवश्यक राहील. इतर विषयांच्या अभ्यासक्रमाइतकेच संस्थेने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाला, शिकविण्याच्या बाबतीत महत्व दिले पाहिजे! अभ्यासक्रमाला पूरक म्हणून या प्रकरणात सुचविलेल्या सहाय्यक बाबी व पुढच्या प्रकरणात वातावरण निर्मितीसाठी सुचविलेले उपाय, यांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र असा आग्रह धरणे संयुक्तिक होणार नाही; कारण मुख्य अभ्यासक्रमाला सहाय्यक म्हणून सूचित केलेल्या या सर्व पूरक गोष्टी सर्व संस्थांत एकाच वेळी लागू करण्याची अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल. काल, परिस्थिती व संस्थेतील उपलब्ध साधन सामुग्री यांच्या संदर्भातच या उपायांच्या शक्याशक्यतेचा विचार करावयास हवा. जी बाब एखाद्या शिक्षण संस्थेत अत्यंत यशस्वी म्हणून विद्यार्थीप्रिय होईल तीच बाब दुसऱ्या एखाद्या संस्थेत उपयुक्त न ठरण्याचा संभव नाकारता येत नाही. तेव्हा अभ्यासेतर पोषक असे कार्यक्रम संस्थेत कोणते घेता येतील, याचा निर्णय अत्यंत विवेकाने घेतला पाहिजे तो संस्था–प्रमुखानेच! मात्र केवळ अभ्यासक्रमाच्या आधारावर नैतिक व

आध्यात्मिक शिक्षण फक्त वर्गात शिकवून यशस्वी होण्याचा कधीही संभव नाही, हे सत्य केव्हाही दृष्टिआड करून चालणार नाही. इतर सहाय्यक कार्यक्रमांची जोड त्याला द्यावीच लागेल. फक्त हे विविध कार्यक्रम कोणते, केव्हा, कसे व किती प्रमाणात अमलात आणायचे या बाबत निर्णय घेण्याची प्रत्येक संस्थेला मुभा राहील एवढेच! वेगळ्या शब्दात हेच सांगायचे झाले तर असे म्हणता येईल, की या व पुढच्या प्रकरणात सुचविलेले पूरक वा सहाय्यक "कार्यक्रमच ऐच्छिक नाहीत," तर त्यातील बाबींची "निवड ऐच्छिक" आहे.

(ब) अभ्यासक्रमाबाबतच्या मुद्यांचे स्पष्टीकरण

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची योजना किती प्रमाणात फलद्रुप होते हे ठरणार आहे, प्रामुख्याने नियोजित-अभ्यासक्रमाची अमलबजावणी कितपत यशस्वीपणे केली जाते यावरच ! म्हणून अमलबजावणीचे स्वरूप व तिची दिशा अधिक खुलासेवार स्पष्ट करणे आवश्यक आहे ! या दृष्टीने खालील काही प्रमुख मुद्यांचे स्पष्टीकरण या योजनेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला उपयुक्त व्हावे.

(१) सार्वत्रिकपणे सर्व संस्थांमध्ये सामूहिक सुरूवात

यशस्वितेसाठी सर्वत्र शिक्षणाची गरज

भौतिक विज्ञानातील रसायन शास्त्रासारख्या एखाद्या विषयातील प्रयोग करून पाहावयाचा असला तर प्रयोगशाळेत तदनुकल वातावरण निर्माण केल्याशिवाय त्याविषयी कोणतेही निश्चित अनुमान करता येत नाही; हाच नियम नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला देखील लागू आहे. या शिक्षणाला पोषक असे वातावरण कुटुंब, समाज, शिक्षणसंस्था इ. सर्व क्षेत्रात असावयास हवे; परंतु शिक्षणसंस्था सोडल्यास इतर घटकांवर आपले कोणतेही नियंत्रण नसल्याने, शिक्षण संस्थेबाहेरचे वातावरण या शिक्षण प्रयोगास अनुकूल करून घेणे आपल्या कक्षेबाहेरचे आहे.

असे असले तरी सर्व शिक्षणसंस्थांमध्ये नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची जर एकाचवेळी सामूहिक सुरवात केली गेली तर सर्वत्र

पुरेसे अनुकूल वातावरण निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. एखाद-दुसऱ्या संस्थेत अशी योजना कुणी हाती घेतली तर "आमच्यावरच या शिक्षणाची जबरदस्ती सुरू आहे," असा भाव तेथील विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न होऊन प्रतिकूल वातावरण तयार होते; व अकारणच विरोध होऊ लागतो. चांगली गोष्ट झाली तरी इतर कुणी करीत नसतांना आपण एकट्याने ती करावी असे वाटत नाही, हा माणसाचा सामान्य स्वभाव आहे. आपल्यासोबत इतरही अनेक ती करीत आहेत हे पाहताच सामान्य मनुष्याला ती करण्यात भूषण वाटून दुप्पट उत्साहाने तो ती करू लागतो !

एकाकी प्रयत्न निरूपयोगी

म्हणूनच या शिक्षणातील अडचणीचे विवरण मागे एका प्रकरणात करीत असतांना कोणत्याही एका व्यक्तिचा वा संस्थेचा एकाकी प्रयत्न यशस्वी होण्याचा संभव नसल्याने आम्ही स्पष्ट केले होते. खरे तर कौटुंबिक व सामाजिक जीवन आज एवढे गढूळ झाले आहे, की ते निर्मल केल्याशिवाय या योजनेचा प्रयोग यशस्वी होणार नाही, असेही कित्येकांचे मत आहे. पण समाजामुळे शिक्षण व शिक्षणामुळे समाज दूषित झाले आहेत, असे परस्पर आरोप करीत राहण्याऐवजी, थोड्याबहूत नियंत्रणाखाली असलेल्या शिक्षणाद्वारे समाज-सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी या शिक्षणाची सार्वत्रिक सुरूवात व्हायला हवी. सार्वत्रिक याचा अर्थ केवळ एखादे गांव किंवा तालुका नव्हे, तर निदान एका जिल्ह्याएवढा तरी मोठा भूभाग अंमलबजावणीचे क्षेत्र म्हणून उपयोगात आले पाहिजे ! त्याशिवाय योजनेच्या परिणामांचे मुल्यमापन करता येणे शक्य नाही.

(२) प्राथमिक अवस्थेत प्रयोगाचे मूल्यांकन

वरीलप्रमाणे राज्यस्तरावर सार्वत्रिक अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने या योजनेला आपला प्रगट पाठिंबा जाहिर केल्यानंतर जर एखादा जिल्हा प्रयोग म्हणून निवडावा असे शासनाला वाटले, तर तसेही करावयास हरकत नाही. प्रथम पंचवार्षिक योजनेच्या वेळी, ज्याप्रमाणे काही विकास

खंड (*development Blocks*) निवडून त्यावर शासनाने सर्व बाजूने संपूर्ण लक्ष केन्द्रित करून सखोल प्रयत्न *(Intensive efforts)* केला, त्याप्रमाणे या निवडलेल्या भूभागावर या योजनेसाठी कसोशीने प्रयत्न करावयास हवेत ! एका पूर्व नियोजित कालावधीनंतर (सामान्यतः ३ ते ५ वर्षानंतर) या शिक्षणाचे, तज्ञांकडून मूल्यांकन *(Evaluation)* करून घ्यावे, म्हणजे या शैक्षणिक प्रयोगाचे गुणदोष समजू शकतील ! अंमलवजावणी ज्या क्षेत्रात केली गेली असेल, त्या क्षेत्रातील विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना प्रश्नावली पाठवून आपल्याला मूल्यांकनाच्या दृष्टीने उपयुक्त अशी पुष्कळच माहिती गोळा करता येईल ! विद्यार्थ्यांचे आचरण. व्यक्तित्व व जीवनविषयक दृष्टी यामध्ये या शिक्षणामुळे कितपत सुधारणा झाली याचाच अंदाज प्रामुख्याने या मूल्यांकनाद्वारे घेतला जावा ही अपेक्षा राहील.

अनुभवाने अभ्यासक्रमाचा साचा

या प्रायोगिक शिक्षणाच्या परिणामांचा जो अहवाल या तज्ञांकडून सादर केला जाईल, त्यावरच या योजनेच्या भावी अंमलबजावणीची दिशा व स्वरूप अवलंबून राहील हे उघड आहे ! या मूल्यांकनाच्या आधारावर अभ्यासक्रमात योग्य तो बदल केल्यावर संपूर्ण राज्यात हा सुधारित अभ्यासक्रम लागू करावयास हरकत नाही. या अभ्यासक्रमात देखिल वेळोवेळी होणाऱ्या मूल्यांकनानुसार थोडे बहुत फेरफार पुढेही करावे लागतील.

सुमारे १५–२० वर्षांच्या अनुभवानंतर अभ्यासक्रमांचा साचा निश्चित झाल्यानंतर त्यात विशेष बदल करावा लागणार नाही. अर्थशास्त्रा-सारख्या विषयांच्या अभ्यासक्रमात अभ्यास मंडळाला *(Board of Studies)* दरवर्षी कुठे फारसा बदल करावा लागतो ? अनेक वर्षाच्या अनुभवांनी कॉलेजमध्ये दरवर्षी शिकवायचा अभ्यासक्रम जवळजवळ ठरून गेला आहे. तसेच याही अभ्यासक्रमाचे होईल !

वेळोवेळी निश्चित होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने या विषयाच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती व्हावी ही अपेक्षा राहील.

(३) नैतिक व आध्यात्मिक शिक्षण अनिवार्य *(Compulsory)* स्वरूपाचे

महत्वाचे म्हणून सक्तीचे

अनेकांचे या मुद्यावर दुमत होईल याची आम्हाला जाणीव आहे. शिक्षणशास्त्रानुसार सक्ती व त्यातूनही अध्यात्मासारख्या क्षेत्रात होणे हे निषिद्ध आहे, असे काहींना वाटते पण या मताचा फेरविचार केला पाहिजे असे म्हणावेसे वाटते. अभ्यासातले इतर विषय विद्यार्थ्यांचा मानसिक कल *(aptitude)* वा आवडनिवड पाहून शिकविले पाहिजेत, हे मत सर्वमान्य असूनही शाळा–कॉलेजातून काही विषयांचे (उदा:– मातृभाषा, गणित, इ.) महत्व लक्षात घेऊन आपण जर ते विषय सक्तीचे करतो, तर जीवनाची धारणा व दृष्टी ज्यामुळे विद्यार्थ्याला प्राप्त होते, अशा नीती व अध्यात्माचे शिक्षण अनिवार्य करावयास काय हरकत आहे ? कोणत्याही विद्याशाखेचा विद्यार्थी असला तरी त्याला भाषाज्ञान आवश्यक असते, म्हणून त्याला आपण एखाद् दुसरी भाषा महाविद्यालयापर्यंत घेणे सक्तीचे करतो, मग तितकेच किंबहुना अधिक महत्व असलेले सदाचाराचे सच्छीलतेचे, नागरिकत्वाचे व माणुसकीचे वळण लावणारे नैतिकतेचे शिक्षण का आवश्यक करू नये?

"Education can never be complete without inculcation of moral principles in the minds of the youth of the country."

हे मत माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अहवालातच जर नि:संदिग्धपणे व्यक्त केले आहे, तर नैतिक शिक्षण ऐच्छिक ठेवून काही विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण ठेवण्याचे पातक आपण शिरावर का घ्यायचे? अर्थात घटनेचा आधार घेऊन हे शिक्षण नको असणाऱ्यांचा विचार करण्याचे आपणास काही कारण नाही.

तहान लागल्यावर विहिरीची आठवण

चीनने युद्ध पुकारताच इतके दिवस सैनिकी शिक्षणाविषयी निद्रिस्त असलेले सरकार खडबडून जागे होऊन ज्याप्रमाणे यच्चयावत सर्व विद्यार्थ्यांवर एन्. सी. सी. शिक्षणाची सक्ती करते झाले, त्याप्रमाणे नैतिक

अध:पतन आटोक्याबाहेर गेल्यावर आपण याविषयी सावध होणार आहोत का ? शिवाय आज समाजात नित्य अनुभवास येत असलेले मोठ्यापासून तो छोट्या समजल्या जाणाऱ्या व्यक्तिपर्यंत सार्वत्रिक झालेले चारित्र्यपतन पुरेसे नाही का ? आपण या शिक्षणाच्या सार्वत्रिक अंमलबजावणीसाठी आणखी कोणत्या भयानक परिस्थितीची वाट पाहणार आहोत ?

(४) अभ्यासक्रम अवस्थानुसार की वर्गानुसार

मात्र योजनेच्या प्रारंभाला पहिल्यावर्षी कोणता अभ्यासक्रम मान्य करायचा ? हा प्रश्न स्वाभाविकपणेच सर्वांसमोर येईल. दोन प्रकारांनी हा अभ्यासक्रम तयार करता येईल ! एक म्हणजे १४ शैक्षणिक वर्षांसाठी अभ्यासक्रमाचे चौदा आराखडे वा चार शैक्षणिक अवस्थानुसार अभ्यासक्रमाचे चार स्थूल आराखडे बनविणे. त्यांच्या अनुषंगाने पाठ्यपुस्तके, त्यासाठी नेमलेल्या समितीद्वारे, मुद्दाम तयार करून घ्यावीत. तसेच पाठ्यपुस्तके सर्व १४ वर्षांसाठी असलीच पाहिजेत असेही नाहीत. विशेषत: प्राथमिक शाळेतील पहिल्या दोन इयत्ता व महाविद्यालयीन चार वर्षे यासाठी पाठ्यपुस्तके न ठेवणेच अधिक संयुक्तिक ! शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेत वयाच्या ८ व्या वर्षापर्यंत फारशी समज नसते म्हणून तर महाविद्यालयीन, अवस्थेत वयाच्या १६ व्या वर्षानंतर बरीच अधिक समज असते म्हणून, पाठ्यपुस्तकांच्या माध्यमाशिवाय शिक्षकांनी सरळ अभ्यासक्रमानुसार विद्यार्थांना शिकविणे अधिक उत्तम. शिक्षणातली ही सुरवातीची व अखेरची काही वर्षे सोडली तर इतर वर्षांसांठी अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकांच्या आधारे शिकविणे जास्त श्रेयस्कर !

सर्वांना मान्य होईल असा १४ वर्षांसाठी वा चार शैक्षणिक अवस्थांसाठी योग्य असा अभ्यासक्रम कुणा एका व्यक्तीने सादर करणे धाडसाचे होईल. ज्या भागातील शिक्षणात हा अभ्यासक्रम समाविष्ट करायचा असेल त्या भागातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणात रस असलेले शिक्षणतज्ञ एकत्र येऊन त्यांनी अभ्यासक्रमाची काळजीपूर्वक आखणी करणे संयुक्तिक ठरेल. त्यांना उपयुक्त होईल असे काही मार्गदर्शक अभ्यासक्रम परिशिष्ट क्र. १ व २ मध्ये दिलेले आहेत.

(५) अभ्यासक्रम हे केवळ साधन, साध्य नव्हे

अभ्यासक्रम हा शब्द इंग्रजीतील " *Curriculum* " या शब्दाचा समानार्थी म्हणून वापरला जातो. "*Curriculum*" या लॅटिन शब्दाचा जो शब्दशः अर्थ ध्वनित होतो तो " एखादा धावणारा आपले उद्दिष्ट गांठण्यासाठी ज्या मार्गाने धावतो ते शर्यतीचे मैदान " *(It is a run way, a course which one runs to reach a goal)* असा आहे.

" अभ्यासक्रम " या शब्दाचा मूळ अर्थ व या संज्ञेच्या आजच्या विविध व्याख्या या नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेच्या उद्दिष्टाला पूरक अशाच आहेत. श्री. सैयद्दिन[११] यांच्या मते " परिस्थितीशी जुळते घेण्याच्या प्रक्रियेत सहाय्यभूत होणारे आणि भावी काळात कृती करण्यास उपकारक ठरणारे साधन म्हणजे अभ्यासक्रम ". आध्यात्मिक व आधिभौतिक जीवनाची गरज भागविण्याठी अनेक विषयांचा अभ्यास करण्याची गरज मानवाला भासू लागली म्हणून अभ्यासक्रमाची कल्पना जन्माला आली. कृती, भावना व विवेक ही मानवी व्यवहाराची तीन प्रमुख अंगे असल्याने या तिन्हींचा योग्य विकास होईल असे अभ्यास-क्रमातील विषयांचे उपकारक स्वरूप असावे अशी विचारसरणी हळूहळू दृढ झाली.

अभ्यासक्रमाची आखणी करतांना " अभ्यासक्रम " या शब्दाचा वरील अर्थ व आशय लक्षात घेतला पाहिजे. विशिष्ट अभ्यासक्रमाचे अध्ययन वा अध्यापन म्हणजे शिक्षणाची परिपूर्तता नव्हे. अभ्यासक्रम हे केवळ एक साधन आहे हे विसरून चालणार नाही. तेव्हा नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा नियोजित अभ्यासक्रम शिकणे व शिकविणे हे साध्य होऊ नये. योजनेतील अंतिम फलित प्राप्त करण्याच्या मार्गातील तो एक महत्वाचा टप्पा आहे हे मात्र निःसंशय !

[६] शिक्षणाची परीक्षा पद्धती

परीक्षांना अवास्तव महत्व

परीक्षा प्रधान शिक्षण पद्धती *(Examination-oriented Educational System)* ही प्रामुख्याने आजच्या विद्यार्थी– विश्वातील सर्व अनिष्ट प्रवृत्तींचे मूळ आहे, असे शिक्षणतज्ञांनी आपले मत व्यक्त केले आहे.

विधानाच्या सत्यासत्यतेचा परामर्ष आपणास येथे घेण्याचे प्रयोजन नसले तरी लेखी परीक्षेला आपण शैक्षणिक जीवनात जे आत्यंतिक महत्व दिले आहे. (हे कुणालाही मान्य व्हावयास हरकत असू नये) त्यामुळे शिक्षणातील इतर अनेक प्रमुख अंगांना गौणत्व आले आहे. सर्व शिक्षणसंस्थांचे संपूर्ण लक्ष त्यामुळे केन्द्रित झाले आहे परीक्षांवर ! वर्षाअखेर जाहीर होणाऱ्या निकालावर ! साहजिकच उत्तम निकाल ही आजच्या उत्तम शिक्षणाची जवळजवळ कसोटी झाली आहे. ज्या शाळेतील विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे शेकडा प्रमाण अधिक, ती शाळा चांगली समजली जाते व तेथे सर्वांची प्रवेशाची गर्दी होते. त्या शाळेतील शैक्षणिक जीवनाचा केन्द्रबिन्दु असतो परीक्षा– त्यांचे निकाल ! जेणे करून उत्कृष्ट निकाल लागतील अशा रीतीने संस्थेतील सर्व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या सर्वाचा परिणाम म्हणजे परीक्षेत अत्यंत यशस्वी, पण जीवनांत अत्यंत अयशस्वी विद्यार्थ्यांची आजची वैफल्यग्रस्त पिढी !

काही उपाय

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या परीक्षा पद्धतीत तरी वरील दोष राहू नये यासाठी अत्यंत जपायला हवे. केवळ वार्षिक परीक्षांना अवास्तव महत्व येऊ नये म्हणून खालील काही उपाय सुचविता येतील.

(अ) वार्षिक परीक्षा पद्धती ऐवजी अमेरिकेत प्रचलित असलेली व भारतात काही विद्यापीठात अवलंबिलेली द्विसत्र परीक्षा पद्धतीचा *(Semester System)* उपयोग केला जावा.

(ब) नैतिक मूल्यांचे आचरण, सद्ग्रंथांचे वाचन– मनन व काही चिरंतन वाङमयाचे पाठांतर (शक्य तर अर्थासह) यासाठी असलेल्या गुणांची संख्या लेखी परीक्षेपेक्षा कमी नसावी.

(क) गट पद्धतीप्रमाणे *(Tutorial System)* ज्या अध्यापकाकडे विद्यार्थी सोपविला गेला असेल त्या अध्यापकाने विद्यार्थ्याच्या संपर्काच्या व निरीक्षणाच्या आधारावर मूल्यांकन करून गुण द्यावेत.

(ड) कोणत्याही परिस्थितीत लेखी परीक्षेला एकूण गुणांपैकी निम्यापेक्षा अधिक गुण असू नयेत. वरील तिन्ही बाबींना साधारणपणे समान गुण ठेवले तर हे अनायासे साधू शकेल.

सारांश, सदाचरण सद्भाव व सत्प्रवृत्ती यांना गुणांकनात प्रधान स्थान देऊन बौद्धिक ज्ञानाला परीक्षेत गौणत्व यावे याची दक्षता एकूण योजना आखतांना घ्यावयास हवी !

[७] शिक्षण वर्गाची सर्वसाधारण रूपरेषा.[१२]

बौद्धिक अवडंबर नको

परीक्षा– पद्धतीत ज्याप्रमाणे आचरणापेक्षा बौद्धिक ज्ञानाला गौणत्व देण्याची काळजी घ्यावयास हवी, त्याचप्रमाणे अभ्यासक्रमातील नियोजित विषयाचे बौद्धिक ज्ञान देतांना देखील शिक्षकाने वर्गात हीच दृष्टी डोळ्यासमोर ठेऊन केवळ बोजड ज्ञानाचे अवडंबर माजविले जाणार नाही यासाठी सावध राहीले पाहिजे.

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण वर्गाला, केवळ बौद्धिक वर्गाचे स्वरूप दिल्याने, इष्ट हेतू साध्य होणे केव्हाही शक्य नाही हे कदापि विसरावयास नको. अभ्यासजड कार्यक्रमाला उपस्थितीची अडचण हा नित्याचाच अनुभव आहे. तेव्हा बुद्धी व भावना या दोन्ही शक्तींना आवाहन मिळेल, किंबहुना अंत:करणातील सात्त्विक भावना जेणेकरून जागृत होईल, असेच स्वरूप या वर्गाचे ठेवणे अत्यावश्यक आहे. अभ्यासक्रमामधील विषयाचे प्रतिपादन अध्यापकाने असे करावे की, त्यातील विवेचनाने विद्यार्थ्यांची बौद्धिक भूक तर भागेलच पण तिचे समाधान झाल्यावर, मनाचा स्वाभाविक कल बुद्धीला पटलेल्या गोष्टींच्या प्रत्यक्ष आचरणाकडे व्हावा. एवढेच नव्हे तर शिक्षकाने वर्गात सूचित केल्याप्रमाणे वर्तन करणे आपले कर्तव्य आहे असे विद्यार्थ्याला मनोमन जाणवावे; तेव्हाच हे शिक्षण आचरणप्रधान होऊ शकेल !

भक्ती भावनेला ज्ञानापेक्षा प्राधान्य

या शिक्षण वर्गाकडे पाहण्याची दृष्टी भक्तिप्रधान असणेही श्रेयस्कर ठरेल. केवळ नैतिकतेच्या माहितीवजा ज्ञानात मनुष्य थोडासा कमी पडला तरी फारसे बिघडणार नाही, परंतु कितीही ज्ञानाची व्याप्ती वाढवून जर अंत:करण तर्ककर्कश व रूक्ष राहत असेल तर त्या ज्ञानाचा त्याला माणुसकीचे जीवन जगण्यासाठी काही उपयोग होत नाही, हे अनेकदा अनुभवास येते !

स्वदेश, स्वधर्म, संस्कृती इ. च्या जीवनमूल्यासंबंधी अविचल श्रद्धेचा स्थायीभाव निर्माण करावयाचा असेल तर तो भक्तियुक्त अंतःकरणातूनच विकसित करणे शक्य असते; त्याशिवाय बौद्धिक विकास लंगडा पडतो, याची साक्ष सध्याच्या भोगप्रधान जीवनात सर्वत्र पाहावयास मिळते. सद्भावनांना आवाहन करूनच स्वधर्मप्रेम निर्माण होऊ शकेल, त्याच्या अभावी केवळ बौद्धिके निष्फळ ठरतात.

शिक्षण वर्गाची स्थूल रूपरेषा

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या वर्गाची स्थूल रूपरेषा शिक्षकांच्या सामान्य मार्गदर्शनासाठी येथे देणे अनुचित ठरणार नाही. नैतिक शिक्षणाच्या तासाचे प्रामुख्याने ४ भाग पडतील. ४० मिनिटांचा एक तास कल्पिला तर तो खालीलप्रमाणे विभागला जाईल.

(१) मंगलाचरण

श्री गजानन, सरस्वती या विद्येच्या देवता वा इष्टदेवता (स्वधर्मानुसार असलेली कोणतीही) यांचे ध्यानपूर्वक स्मरण; सुमारे ३ मिनिटे डोळे मिटून निश्चलतेने सर्वांनी एकचित्ताने करावे. डॉ. राधाकृष्णन समितीने सुचविलेले *"Silent Meditation or Worship"*, याचा अवलंब. ३ मिनिटे.

(२) अभ्यासक्रमाचे शिकवण

अभ्यासक्रमातल्या एखाद्या विषयाचे वा पाठ्यपुस्तकातल्या एखाद्या धड्याचे सुबोध असे स्पष्टीकरण; त्याला अनुलक्षून एक वा अनेक गद्य वा पद्यात्मक बोधपर वचने सांगावीत; लिहून द्यावीत. विषयाला वा धड्याला समर्पक अशा थोर व्यक्तींच्या जीवनातील बोधप्रद प्रसंग, वर्तमानपत्रात आलेल्या अनुषंगिक घटना यांचा वापर करावा.

२० मिनिटे

(३) प्रश्नोत्तरे व चर्चा

वर्गात जे शिकविले त्याची अुजळणी चर्चेच्या स्वरूपात व्हावी. याचा उपयोग विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या मनातील अडचण दूर करणे व त्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करणे यासाठी व्हावा. तसेच शिक्षक व विद्यार्थी

यांच्यातील औपचारिकता नाहीशी व्हावा उद्देश चर्चेमागे असावा. शिक्षक कुणी उपदेशक नसून केवळ एक मार्गदर्शक आहे, ही भावना या चर्चेने विद्यार्थ्यांत उत्पन्न व्हावी. १० मिनिटे

(४) सामूहिक प्रार्थना

ज्ञान, भक्ती, सेवा इ. सद्गुण संवर्धनाने सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून परमेश्वराजवळ करूणा भाकणारी प्रार्थना अखेर म्हणावी. शक्यतोवर विद्यार्थ्यांनेच ती सांगावी व इतरांनी ती पाठोपाठ म्हणावी.

७ मिनिटे

एकूण अवधि ४० मिनिटे

वर्गासाठी काही विशेष सूचना

१. नैतिक व आध्यात्मिक गुणांचे वा श्रेष्ठ महापुरूषांच्या चरित्राचे अनुकरण विद्यार्थ्यांना करण्याचे आवाहन करतांना शिक्षकांकडून स्वतः शुद्ध आचारविचारांचे पालन करण्याची अपेक्षा स्वाभाविकच बाळगली जाते. आपण देत असलेल्या शिकवणुकीशी विसंगत असे वर्तन "नैतिक शिक्षण देण्याच्या आपल्या अधिकारास कमीपणा आणते" हे शिक्षकाने विसरून चालणार नाही.

२. वर्गात प्रामुख्याने आवाहन असावे अंतःकरणाला ! बौद्धिक समाधान अनायासे साधेल ही काळजी घेणेही जरूर आहे.

३. उद्बोधक अशी माहीती देत असतांना, उपदेशपर असा मौलिक आशय असलेले पद्यात्मक वा गद्यात्मक परिच्छेद विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगावे ! वर्गात हात बांधून विद्यार्थी केवळ श्रवण करीत आहेत, हे दृश्य योग्य नव्हे!

४. भक्तिपर स्तवने, बोधपर श्लोक, अभंग, दोहे, ओव्या किंवा पथ्यकर अशी श्रेष्ठ व्यक्तींची वचने मुखोद्गत करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन प्रसंगविशेषी त्यांच्याकडून ती सर्वांसमोर म्हणवून घेतली पाहिजेत.

५. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे विवेचन वा स्पष्टीकरण करतेवेळी कोणत्याही विशिष्ट पंथ, संप्रदाय वा धर्माच्या विद्यार्थ्यांचे

अंत:करण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे यत्किंचितही दुखावले जाणार नाही, याची अत्यंत खबरदारी शिक्षकाने घेतली पाहिजे.

६. राष्ट्राच्या भावात्मक एकतेची प्रतिमा विद्यार्थ्यांच्या अंत:करणावर अधिक ठसेल असा प्रयत्न जाणीवपूर्वक झाला पाहिजे. ही प्रतिमा भंग होईल असा एखाद्या प्रांत, भाषा वा जाती या विषयींचा उल्लेख वा वर्णन कटाक्षाने टाळले पाहिजे.

७. कोणतीही व्यक्ती वा पक्ष यांचेवर वर्गात टीका होऊ नये.

८. " शिक्षक ही आपल्या व्यक्तिगत विकासात सहाय्य करणारी व जीवनात सर्व प्रसंगी मार्गदर्शन करणारी हितचिंतक व्यक्ती आहे, " अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न होईल, असा वर्गातील वातावरणाचा व शिकवण्याचा साकल्याने परिणाम झाला पाहिजे.

(८) 'नैतिक व आध्यात्मिक शिक्षण'

विषयाची परीक्षा

परीक्षा का असावी ?

काहीजण तर या शिक्षणाची परीक्षा घेण्यात येवू नये असेही मत व्यक्त करण्याचा संभव आहे. एकप्रकारे हे मत समर्थनीयही आहे; कारण अशा परिक्षेमधील गुणांपेक्षा आचरणानेच विद्यार्थ्यांचे मूल्यांकन होणे अधिक संयुक्तिक !

परंतु आचरणाची तरी प्रगती कशी समजणार ? तेव्हा आचरणाला प्राधान्य देऊन परीक्षा पद्धती अवलंबिली तर विद्यार्थ्यांच्या जीवनावर शिक्षणाच्या झालेल्या परिणामांचे अनुमान तरी काढता येईल !

दुसरे असे की नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या बौद्धिक ज्ञानाची, जी लेखी परीक्षा घेतली जाते ती निरूपयोगी आहे असे तरी कसे म्हणता येईल ? इष्ट व अनिष्ट, चांगले व वाईट यामधील फरक करण्याचे ज्ञान नसेल, तर चांगल्या गोष्टींचे आचरण तरी त्यांच्या हातून कसे होणार ? सदाचरण करण्यापूर्वी त्याचे ज्ञान तर आवश्यकच आहे.

सद्गुणांचे व जीवनमूल्यांचे ज्ञान बुद्धीला झाल्यावर ते कृतीत कितपत उतरले हा पुढला मुद्दा आणि त्यासाठी अवलोकनात्मक कसोट्यांचा अवलंब केला पाहिजे.

परीक्षा ठेवण्याचे तिसरे पण महत्वाचे कारण असे की, वर दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थी जीवनात परीक्षेला एवढे प्राधान्य आपण आजवर दिले आहे की, परीक्षा ठेवल्याशिवाय विद्यार्थी एखाद्या विषयाकडे आवडीने व गंभीरतेने बघायलाच तयार नसतात. परीक्षा घेतली जाणार असेल तरच विद्यार्थी त्या विषयाचा अभ्यास करतात. अन्यथा त्याची उपेक्षाच होते. या कारणामुळे देखील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची परीक्षा घेणे इष्ट ठरेल.

वरील तीन कारणामुळे जरी या विषयाची परीक्षा असावी हे मान्य झाले, तरी त्याबाबत कांही शंका–विशेषत: शिक्षकांच्या मनात–उद्भवणे स्वाभाविक आहे.

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

एकतर लेखी परीक्षेसाठी तयार करावयाची प्रश्नपत्रिका कशा स्वरूपाची असावी? प्रश्न कसे विचारले जावेत? नियोजित अभ्यासक्रम वा अभ्यासक्रमानुसार नेमलेले पाठ्यपुस्तक, यांच्या आधारावर इतर विषयांच्या प्रश्नपत्रिकेप्रमाणेच नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची प्रश्नपत्रिका असावी, असे सामान्यत: म्हणता येईल. विशेषत: महापुरूषांच्या जीवनातील ठळक गुणांबाबत प्रश्न असावेत. उदा: राणाप्रतापाचे देशप्रेम व त्याग, म. गांधींची साधी राहणी, जहांगीरची न्यायप्रियता, कर्ण, दधिची व हातीम यांची दानशूरता, येशू ख्रिस्ताची क्षमाशीलता यांच्याबाबत प्रश्न विचारता येतील. तसेच, विद्यार्थ्यांचे, स्वत:च्या जीवनाचे प्रतिबिंब उमटेल असेही काही प्रश्न अवश्य विचारावेत. उदा:– तुम्ही वर्षभरात केलेल्या एकाद्या सत्कृत्याची माहिती द्या किंवा अभ्यासक्रमात असलेल्या कोणत्या महापुरूषाचे अनुकरण करायला तुम्हाला अधिक आवडते व का ? या सारख्या प्रश्नांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक धारणांचा कल कळून येऊ शकतो !

काही प्रश्नावलींचे नमुने परिशिष्ट क्र. ४ मध्ये उद्धृत केले आहेत. त्यामुळे प्रश्नांच्या स्वरूपाबाबत उपयुक्त मार्गदर्शन होवू शकेल.

अवलोकनात्मक परीक्षा

अवलोकनाने वा निरीक्षणाद्वारे शिक्षकाने विद्यार्थ्यांची मनोगत धारणा व आचरण याबाबत घ्यावयाच्या परीक्षा हे देखील एक शिक्षकाच्या कौशल्याची परीक्षा घेणारेच कार्य आहे. एखाद्या वस्तूचा व्यापारी, आपल्या वस्तूची गुणदृष्ट्या परीक्षा, ज्याप्रमाणे ती वस्तू पाहताक्षणीच करू शकतो, त्याप्रमाणे कसलेला अनुभवी शिक्षक, विद्यार्थ्यांशी आलेल्या अल्पसहवासाने त्याच्याविषयी आपले मत सहज बनवू शकतो, असा अनुभव आहे. प्रवेशाच्या वेळी मुलाखतीसाठी आलेल्या विद्यार्थ्याचा चेहरा, त्याचे कपडे, त्याचे चालणे व बोलणे या बाह्यांगाचे जे परीक्षण ५–१० मिनिटात होते त्यावरून मुख्याध्यापकाने वा प्राचार्याने त्या विद्यार्थ्याविषयी बनविलेला ग्रह त्याला सहसा बदलावा लागत नाही. एवढी त्यात अचूकता येते. त्यातून बाल–मनोविज्ञानाचा *(Child psychology)* त्याने अभ्यास केला असेल तर अधिकच उत्तम !

तेव्हा अवलोकनात्मक परीक्षा घेऊन गुणांकन करणे वाटते तितके अवघड नाही. अनेक विषयांत आपण प्रायोगिक परिक्षांचा *(Practical Examination)* अवलंब करतोच ना ? तसेच या विषयाबाबत शक्य होईल !

अवलोकनात्मक परीक्षांच्या पद्धती

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना, मार्गदर्शन होऊ शकेल व मूल्यांकनात एकवाक्यता येऊ शकेल, अशा अवलोकनात्मक परीक्षांच्या काही पद्धती देता येण्याजोग्या आहेत.

(अ) **समालाप वा चर्चा** :– प्रसंगोपात्त विद्यार्थ्यांच्या भेटी घेऊन योग्य दिशेने चर्चा घडवून आणली तर विद्यार्थ्यांच्या नैतिक धारणांचे अनुमान काढता येऊ शकेल ! अशा चर्चा व्यक्तिगत वा विद्यार्थ्यांच्या गटाशी होऊ शकतील. विद्यार्थ्याशी सहज भेट झाली असता "कायहो, तुमची प्रकृती का खालावली ? काही व्यायाम वगैरे करता की नाही?" अशी सुरवात करून किंवा "एवढ्यात कोणता सिनेमा पाहिलात तुम्ही ?" असा प्रश्न विचारून चर्चेला सुरवात होऊ शकते व विद्यार्थ्याची अभिरूची, आवडनिवड, संवयी यांची माहिती करून घेता

येते. त्याचप्रमाणे हरिजन बंधूसोबत "भगवान बुद्धांचे जीवन कार्य," किंवा शीख विद्यार्थ्यांसोबत "गुरू नानकांचा जगाला संदेश," अशा विषयावर अनौपचारिक वार्तालाप केला तर त्या विद्यार्थ्यांचे आपल्या धर्मसंस्थापकाविषयीचे ज्ञान अजमावता येईल ! संकुचित दृष्टिकोन असेल तर तो व्यापक करण्याची संधी घेता येईल.

(ब) **प्रश्नोत्तरे** :– प्रश्नोतराच्या माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांच्या अंत: करणातील अत्यंत सुप्त विचार प्रगट होऊन त्यांच्या अंत:करणाची खरी-खुरी ओळख होऊ शकते. चतुरतेने विविध प्रश्न विचारले तर विद्यार्थ्यांचे आदर्श, त्यांचा स्वभाव, मनाची ठेवण, यांचा परिचय करून घेता येईल.

(क) **विशिष्ट परिस्थिती उत्पन्न करून परीक्षा घेणे** :– हे कार्य काहीसे कठीण आहे. विशेषत: अध्यापकावर सोपविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जेव्हा मोठी असेल, तेव्हा परीक्षेचा हा प्रकार अवलंबिणे विशेषच अवघड जाते. कारण अशी परीक्षा घेण्यासाठी लागणारी उपयुक्त परि-स्थिती उत्पन्न करून विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यास आवश्यक तेवढा वेळ व पुरेशी संधी वर्षभरात शिक्षकाला उपलब्ध होईलच असे नाही.

तेव्हा ज्या विद्यार्थ्याबद्दल निश्चित मत बनविता आले नाही व जे विद्यार्थी प्रश्न चिन्हे होऊन बसले आहेत, (*Problem-Cases of students*) अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत या प्रकारच्या परीक्षांचा अवलंब करता येईल. उदा :– कॉलेजमध्ये कुणीही नसतांना विद्यार्थ्याला तिथे पाठवून तो तिथे त्या अेकांतात काय करतो यावर लक्ष ठेवणे, भिंतीवर अश्लील लिहिणे, वस्तूंची चोरी करणे इ. प्रवृत्ती मुलात आहेत काय याचा छडा या पद्धतीने लावता येईल !

या तिन्ही पद्धतीद्वारा केलेल्या अवलोकनात्मक परीक्षांचे गुण एकत्रितच नमूद केले जातील.

[९] परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांचा विचार

वरीलप्रमाणे घेतलेल्या लेखी व अवलोकनात्मक अशा दोन्ही परीक्षांत मिळालेले एकूण गुण हे "नैतिक व आध्यात्मिक शिक्षण" या विषयात मिळालेले गुण समजले जातील हे उघडच आहे !

पुढचा प्रश्न स्वाभाविकपणेच उद्‌भवतो तो असा की विशिष्ट वर्गाच्या निकालासाठी घेतल्या जाणाऱ्या अंतिम परिक्षेसाठी या गुणांचा अंतर्भाव केला जाईल किंवा नाही ? " नैतिक व आध्यात्मिक शिक्षण " या विषयात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक असावे का ? या विषयात मिळालेले गुण उत्तीर्ण होण्यास वा श्रेणी मिळविण्यास लागणाऱ्या गुणात समाविष्ट केले जातील का ? अशा अनेक शंका मनात येतात.

तीन संभवनीय प्रकार

या विषयाच्या गुणांचा निकालाशी असलेल्या संबंधाच्या बाबतीत खालील ३ प्रकार संभवतात.

१ हे गुण स्वतंत्रपणे दाखवायचे; एकूण परीक्षेच्या गुणांपासून वेगळे ठेवायचे. मात्र परीक्षेत पास वा नापास होणे या गुणांवर अवलंबून ठेऊ नये. अर्थातच या विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य राहणार नाही

२. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची परीक्षा सर्वांना अनिवार्य (*Compulsory*) राहील. परंतु त्यांत उत्तीर्ण होण्याची अट मात्र असणार नाही. परंतु या विषयात प्राप्त केलेले गुण, उत्तीर्ण होण्यास वा श्रेणी (*Division*) मिळवण्यास एकूण गुणांच्या बेरजेत *(Aggregate of Total Marks*) मिळविले जातील.

३. इतर विषयाप्रमाणेच " नैतिक व आध्यात्मिक शिक्षण " विषयाला मान्यता देणे; म्हणजेच स्वतंत्रपणे या विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच या विषयाचे गुण एकूण बेरजेत मिळविले जातील.

या विषयाला क्रमश: अधिक महत्व देणाऱ्या वरील तीन पद्धती आहेत ज्या माध्यमिक शिक्षण मंडळाला व विद्यापीठाला या विषयाला शिक्षणक्रमात जेवढे महत्वपूर्ण स्थान द्यावेसे वाटले, त्याप्रमाणे वरील पैकी कोणतीही एक पद्धत अंमलात आणली जाईल, हे अुघड आहे. उदाहरणार्थ दिल्ली प्रशासनाच्या शिक्षण विभागाने सुरु केलेल्या नैतिक शिक्षण योजनेत पहिल्या पद्धतीचे अवलंबन केले गेले तर नागपूर विद्यापीठाने या योजनेचा विचार करण्याकरता नेमलेल्या समितीने दुसरी पद्धत आपल्या अहवालात सुचविली आहे.

मुख्य प्रश्न आहे तो हा की, कोणत्या प्रकाराचा अवलंब केल्याने नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचे जे हेतू व परिणाम अपेक्षित आहेत ते साध्य होऊ शकतील ?

पहिली पद्धत अवलंबिली तर परीक्षा घेण्याचा मूळ हेतूच डावल-ल्यासारखा होतो. परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा जर आग्रह नाही तर परीक्षा घ्यायची कशाला? परीक्षा घेऊनही ती न घेतल्यासारखाच परिणाम त्यामुळे दृष्टोत्पत्तीस यायचा ! परीक्षा न घेणे व परीक्षा घेऊन ती उतीर्ण होण्याची अट नसणे सारखेच ! एका अर्थाने तर या दोहोमध्ये परीक्षा न घेणे हा मार्ग चांगला कारण उत्तीर्ण होण्याची अपेक्षा नसलेल्या परिक्षेची थट्टा होण्या-चाच संभव जास्त! ज्या विषयांत उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे, त्या विषयांच्या बाबतीत देखील पुरेसे गांभीर्य आज राहीनासे झाले आहे; मग जिथे पास होण्याचीही गरज नाही, अशा त्रिपगाच्या परीक्षांची उपेक्षा न झाली तरच नवल!

याचा अर्थ योजनेच्या सुरवातीसच, तिसऱ्या प्रकाराला मान्यता देऊन, इतर विषयांचा दर्जा या विषयाला द्यावा, असे आम्हाला सुचवा-वयाचे आहे, असा नाही, पुढे समाजाला, विशेषत: शिक्षक व पालकांना या योजनेचा हितावह परिणाम दिसून आल्यावर, हे अखेरचे पाऊल उच-लण्याचा विचार करता येईल; आजच त्यासाठी घाई करणे प्रयोगावस्थेच्या प्रारंभकाळात योग्य होणार नाही!

दुसरा प्रकार स्वीकारार्ह

राहता राहिला दुसऱ्या पर्यायाचा सुवर्णमध्य! पहिला वा अखेरचा असे दोन्ही प्रकार सद्य:स्थितीत अव्यवहार्य म्हणून जर सोडले, तर दुसऱ्या प्रकारच्या अवलंबनाने आपणास योजनेचा इष्ट तो हेतू साध्य करता येऊ शकेल. योजनेच्या प्राथमिक अवस्थेत योजनेचे स्वरूप जनमान्यता मिळवून पक्वता गाठेपर्यंत, विद्यार्थ्यांनी नैतिक व आध्यात्मिक शिक्षण विषयात उत्ती-र्ण झालेच पाहिजे, असा अट्टाहास धरणे, त्यांच्यावर अन्यायकारक होईल. परंतु या सवलतीमुळे वर निर्देशिलेले संभाव्य परिणाम टाळता यावेत म्हणून एक मध्यम मार्ग, या प्रकारामध्ये सुचविला आहे. तो म्हणजे पास

नापासाचा निर्णय, जरी या विषयात उत्तीर्ण होण्यावर अवलंबून राहणार नसला तरी, या विषयात मिळणारे गुण परीक्षेस लागणाऱ्या किमान गुणांची उणीव भरून काढण्यास वा प्रथम किंवा द्वितीय श्रेणी मिळविण्यासाठी लागणाऱ्या गुणांची भरपाई करण्यास, उपयोगी पडणार असल्याने प्रत्येक विद्यार्थी, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या प्रश्नपत्रिकेत अधिकात अधिक गुण मिळवून, उत्तीर्ण होण्याची वा श्रेणी–प्राप्तीत येणाऱ्या संभाव्य अडचणींची, सोय साहजिकच करून ठेवणार. आपला परीक्षा ठेवण्यामागील हेतू सध्या तरी हाच आहे.

विद्यार्थ्याने कोणत्या का कारणाने होईना, या शिक्षणाच्या अभ्यासाकडे लक्ष देऊन जास्तीत जास्त गुण मिळविण्याची खटपट करावी; या विषयाची उपेक्षा करू नये. आमच्या मते हा दुसरा प्रकार योजनेच्या प्रारंभावस्थेत अधिक स्वीकारार्ह होय!

(१०) शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज

शिक्षणास पूर्णता येण्यासाठी

वरील सर्व विवेचन वाचल्यावर या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे हे कुणालाही पटेल. एकतर आज देशभर शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या शाळेत वा महाविद्यालयात *(Teacher's Training School or Collegs)* विद्यार्थ्यांच्या नैतिक व आध्यात्मिक जीवनाचा मुळीही विचार केला जात नाही ! एखाद्या विषयाची माहिती व ज्ञान बौद्धिक दृष्ट्या देण्याचे तंत्रच केवळ शिक्षकांना शिकविले जाते. शारीरिक शिक्षण महाविद्यालयात *(College of Physical Education)* विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले जाते. आज उपलब्ध असलेल्या या दोन्ही प्रकारच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक विकासाचाच तेवढा विचार केला जातो.

" Education to be complete, it must have five principal aspects relating to the five Principal activities of the human being, the Physical, the Vital, the Mental, the Psychic and the Spiritual."

हे श्री. अरविन्दाचे मत जर आपण गृहीत धरले, तर एकूण शिक्षणापैकी फक्त दोन पंचमांश शिक्षणाची सोयच आज आपण करीत आहोत असे दिसून येईल. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा अंतर्भाव केला तर शिक्षण पद्धतीस पूर्णता येण्यास बरेच सहाय्य होईल अशी आशा करावयास हरकत नाही!

पण या शिक्षणाचा अंतर्भाव करावयाचा असेल तर शिक्षकांच्या प्रशिक्षणात प्रथम त्याचा समावेश केला पाहिजे. शिक्षकाची मानसिक पार्श्वभूमी योग्यरीत्या तयार केल्याशिवाय हे शिक्षण विद्यार्थ्यांला देणे अनुचित ठरेल !

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे वेगळेपण

विद्यार्थ्यांना जे शिकवायचे त्याचे बौद्धिक ज्ञान व ते देण्याचे तांत्रिक ज्ञान शिक्षकाला असलेच पाहिजे, या मूलभूत तत्वानुसार नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे प्रशिक्षण शिक्षकाला द्यावयास हवेच; याशिवाय या शिक्षणाचे इतर विषयांच्या शिक्षणापेक्षा जे आगळेपण आहे त्यामुळेही या प्रशिक्षणाची विशेष गरज आहे. इतर विषयांच्या तुलनेने, खालील बाबतीत नैतिक व आध्यात्मिक शिक्षण, हा विषय वेगळा असल्याचे आपल्या निदर्शनास येईल.

शिक्षकाकडून सदाचरणाची अपेक्षा

(१) इतर कोणत्याही विषयाचा शिक्षकाच्या आचार-विचाराशी कसलाही संबंध नसतो. अर्थशास्त्र वा राज्यशास्त्र शिकविणाऱ्या अध्यापकाला अर्थशास्त्रीय व्यवहार राजकीय जीवनातील डावपेच व मुत्सद्दीपणा जमलाच पाहिजे अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा नसते. त्या विषयांचे बौद्धिक ज्ञान व ते देण्याची हातोटी शिक्षकाजवळ असली म्हणजे पुरे !

तसेच नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाबद्दल म्हणता येत नाही. या शिक्षणाचे माध्यम असलेला शिक्षक नैतिकदृष्ट्या जेवढा श्रेष्ठ, तेवढे त्याचे शिकविणे परिणामाच्या दृष्टीने उत्कृष्ट राहील.

विद्यार्थ्यांशी संपर्काची अपेक्षा

(२) विद्यार्थी व शिक्षक यांचा जेवढा निकट संपर्क या योजनेत अपेक्षित आहे, तेवढ्या प्रमाणात तो इतर विषयांच्या बाबतीत नाही

विद्यार्थी व शिक्षक यांचे परस्पर प्रमाण लहान असले (उदा:- एका शिक्षकामागे १५ वा २० विद्यार्थी), तर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी जो गट शिक्षकाच्या सुपूर्द केला असेल, त्या विद्यार्थ्यांवर मातापित्यांच्या ममतेने डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे अशी अपेक्षा या योजनेत बाळगली जाईल. असे प्रमाण फार थोडया संस्थेत सापडण्याचा संभव असल्याने एवढी काळजी घेणे, व्यवहारात आज सर्व संस्थांत शक्य नसले तरी, विद्यार्थ्यांशी होईल तेवढा व्यक्तिगत संबंध ठेऊन त्यांच्यावर लक्ष ठेण्याची दक्षता शिक्षकांना घ्यावी लागेल. त्यासाठी अध्यापकाला सूक्ष्म निरीक्षणशक्ती असावयास हवी !

पूर्णपणे नवा विषय

(३) नैतिक व आध्यात्मिक शिक्षण हा विषय शिक्षकांनी इतर विषयाप्रमाणे आपल्या विद्यार्थी दशेत शिकलेला नसतो. पूर्णतया स्वत:-लाच नवा असलेला विषय दुसऱ्याला शिकविणे सामान्यत: अवघडच ! त्यामुळे हा विषय शिकविण्यासाठी शिक्षकाला मुद्दाम स्वतंत्र असे वाचन व अभ्यास करावा लागेल. या विषयाच्या दृष्टीने स्वत:च्या मानसिक तयारीसाठी कोणते ग्रंथ वाचावेत व विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या दृष्टीने कोणती पुस्तके वाचावीत हे प्रशिक्षणाद्वारे शिक्षकाला सांगता येईल. हा विषय वर्गात कसा शिकवावा, कोणती पथ्ये पाळावीत याचेही मार्गदर्शन प्रशिक्षणामुळे शक्य होईल !

वेगळी परीक्षा पद्धती

(४) इतर विषयापेक्षा नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची परीक्षा पद्धती, यापूर्वी सुचविल्या प्रमाणे वेगळी रहाणार असल्याने, त्याचे ज्ञान शिक्षकांना प्रशिक्षणाद्वारे देणे आवश्यक होईल. लेखी परीक्षेपेक्षा आचरणावर अधिक भर असल्याने केवळ निरीक्षणाने व अवलोकनाने विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कसे करावे हे शिक्षकाला शिकवावे लागेल. सर्व शिक्षकांच्या मूल्यांकन पद्धतीमध्ये एकवाक्यता रहावी यासाठीही असे प्रशिक्षण उपयुक्त होईल.

सारांश, इतर विषयाइतकीच किंबहुना काहीशी जास्तच आवश्यकता नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाबाबत, शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची आहे,

हे स्पष्ट होईल. हे प्रशिक्षण कसे द्यावे याचा सविस्तर उहापोह अखेरच्या प्रकरणात केलाच आहे.

(११) धर्मज्ञान नव्हे, अध्यात्म शिक्षण हा हेतू

धर्म व अध्यात्म हे व्यापक अर्थाने जरी एकच असले व अंतिम अवस्थेत त्यांच्यामधील सूक्ष्म भेद जरी नाहीसा होत असला, तरीही या शिक्षणाद्वारे नेमके आपल्याला काय अभिप्रेत आहे हे शिक्षकाने समजावून घेणे आवश्यक आहे !

विधी व आचारांचा नव्हे, तात्त्विक सिध्दान्ताचा अभ्यास

प्रत्येक धर्मात आपल्या अनुयायाने पाळावयाच्या नित्य व नैमित्तिक आचाराचे एक विशिष्ट शास्त्र व पद्धती (उदा– संध्या, यज्ञ, हे हिंदुविधी, मुसलमानांचे रोजा, जकात, नमाज इ. विधी) निश्चित झालेल्या असतात. त्यामध्ये अनुस्यूत असलेल्या कल्पना व विचार यामध्ये पुष्कळच मत-भिन्नता असते आणि ते स्वाभाविकही आहे. या सर्व विभिन्न आचार-विधींचा काहीही संबंध नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाशी नाही, हे शिक्षकाने लक्षात घेतले पाहिजे. आचाराशिवाय मूलभूत तात्विक विचार-सरणीत जो भेद असतो, त्याची केवळ माहिती म्हणून तुलनात्मक बौद्धिक ज्ञान, प्राध्यापकाद्वारे महाविद्यालयाच्या अखेरच्या दोन वर्षात दिले जाईल. बुद्धीच्या प्रगल्भ अवस्थेत धर्मग्रंथांचा केलेला तौलनिक अभ्यास, शेकडो वर्षापासून पसरलेले इतर धर्माविषयींचे गैरसमज दूर करण्यास हातभार लाऊ शकेल, असे "राधाकृष्णन् आयोयाने" आपले मत दिले आहे. ह्यूएनसंगने नमूद केल्याप्रमाणे प्राचीन काळातील नालंद विद्यापीठापासून परस्परविरूद्ध असलेल्या धर्म, पंथ व संप्रदाय यांचा एकत्रित अभ्यास करण्याची परंपरा भारताने जोपासली आहे !

मात्र महाविद्यालयीन शिक्षण सोडले तर, खालच्या शैक्षणिक अवस्थांमध्ये वरप्रमाणे भिन्न तात्त्विक सिद्धान्ताचे विवेचन करण्याचा मुळी प्रश्नच उद्भवत नाही. माध्यमिक शिक्षणापर्यंत सर्व धर्मांना समान असलेल्या जीवनमूल्यांचे ज्ञान दिले जावे. व्यक्ती कुठल्याही धर्म, पंथ वा जातीची असली, तरी तिला बुद्धी व शरीरासोबत मन व आत्मा आहे, हे

सत्य विद्यार्थ्याच्या मनावर बिंबवून, या सर्वांचे मधुर मिश्रण व्यक्तित्वाच्या पूर्णत्वासाठी अपरिहार्य आहे आणि या सर्वांचा समतोल विकास या शिक्षणाने आपणास साधावयाचा आहे हे शिक्षकाने लक्षात ठेवले पाहिजे! म. गांधीच्या[१४] खालील वचनात प्रगट झालेले शैक्षणिक तत्व डोळ्यासमोर असणे खचित लाभप्रद होईल.

"Man is neither mere intellect, nor the gross animal body, nor the heart orsoul alone. A proper and harmonious ccmbination of all these is required for the making of the whole man and constitute the true economics of Education."

आत्मिक विकासाची सामाजिक कल्याणाशी सांगड

नैतिक व आध्यात्मिक गुणाद्वारे विद्यार्थ्यांचा आत्मिक विकास या योजनेच्या पहिल्या काही वर्षात अपेक्षेप्रमाणे साधला, म्हणजे या व्यक्तिगत आत्मिक विकासाची सांगड, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय व आंतर्राष्ट्रीय याप्रमाणे वयोमानानुसार अधिकाधिक व्यापक, मानवी जीवनाशी कौशल्याने घातली गेली पाहिजे. व्यक्तीच्या आत्मिक वा आध्यात्मिक विकासाचा लाभ मानवी जीवनाच्या विविध अंगांना आनुषंगिकरीत्या अपरिहार्यतेने मिळतच असतो. कारण व्यक्ती अखेर राहात असते समाजातच. कोणतेही गुण म्हटले म्हणजे त्यांचा उपयोग होणारच आणि तो त्या व्यक्तीच्या आवतीभोवती असलेल्या समाजाव्यतिरिक्त अन्य कुठे होण्याचा संभव आहे? साहजिकच समाजाला त्याचा लाभ मिळणारच. फक्त वाढत्या वयाबरोबर व्यक्तीच्या व्यवहाराचे, हालचालीचे, विचाराचे क्षेत्र व्यापक होत असल्याने, या विशाल होत जाणाऱ्या क्षेत्रांची यथार्थ जाणीव व या गुणांचा योग्य वापर करण्याची दिशा शिक्षकाने विद्यार्थ्याला द्यावयास पाहिजे.

प्रेमभावनेचा परिमोष.

हे अधिक स्पष्ट करायचे झाले तर, प्रत्येकाच्या अंत:करणात असलेल्या प्रेम भावनेचे उदाहरण घेता येईल. कुटुंबातील व्यक्तीवर कुणाचेही स्वाभाविक प्रेम असते. प्राथमिक अवस्थेत वर्ग बंधूंवर, शेजाऱ्यांवर, शिक्षकांवर प्रेम करायला विद्यार्थ्याला शिकविता येईल. माध्यमिक शाळेत

हीच भावना प्रांत व देशापर्यंत वाढविता येईल. महाविद्यालयीन जीवनात आत्मिक एकतेच्या आध्यात्मिक सिद्धान्ताचा आधार देऊन, संपूर्ण मानव समाजच नव्हे, तर सृष्टीच्या यच्चयावत चेतन अचेतन वस्तूंवर प्रेम करण्याची भावना उद्दीपित करता येईल. विश्वातील सर्व जीव-सृष्टीबद्दल अपार प्रेम-भावना खऱ्या अर्थाने तेव्हाच उत्पन्न होऊ शकेल, ज्यावेळी सर्वत्र एकच तत्व भरले आहे हे आध्यात्मिक ज्ञान त्याला आकलन होईल! "सर्वांचा आत्मा हा त्या सर्वशक्तिमान सर्वव्यापी परमात्म्याचा अंश आहे", या आध्यात्मिक तत्वाचे ज्ञान होताच "अवघेची सुखी असावे नारायणा". या समर्थोक्तिप्रमाणे सर्वाविषयी वाटणाऱ्या प्रेमरसाने तो न्हाऊन निघून लागेल ! त्या प्रेमाचा मला काय मोबदला मिळतो ? याचा विचार तो कदापि करणार नाही. असे दैवी प्रेम खरोखरी उत्पन्न झाले तर त्याच्या पाठोपाठ, सुख, शांतता, क्षमाशीलता, करूणा, निस्वार्थ भावना, सहनशीलता इ. कितीतरी सद्भाव हृदयात जागृत होऊ लागतील सेंट पॉल[१५] यांची खालील प्रेमाची व्याख्या त्या अत्युच्च प्रेमावस्थेत गेल्याशिवाय कळण्याचा संभव नाही.

" Love is always patient and kind, it is never rude or selfish, it does not take offence, and is not resentful. Love takes no pleasure in other people's sins but delights in the truth, it is always ready to excuse, to trust, to hope and to endure whatever comes. "

अर्थात ही अत्युच्च आदर्शावस्था विद्यार्थी दशेत येणे अवघड आहे. एखाद्या गुणाचे विकसन कसे होत जाते याची कल्पना यावी म्हणून हे विवेचन.

सारांश, अध्यात्म शिक्षण म्हणजे कोणत्याही धर्मातील पोथ्या, पुराणे वा धर्मग्रंथातील आचारविधी व चमत्काराच्या कथा मुलांना ऐकविणे नव्हे, तर सर्व धर्मीयांना मान्य होणारी अशी मूलभूत तत्वांची शिकवण, जी नैतिक जीवन अधिक समृद्ध व परिपुष्ट करण्यास सहाय्यभूत होईल. राधाकृष्णन् समितीने याबाबत केलेले मार्गदर्शन शिक्षकाने या संदर्भात दृष्टीसमोर ठेवण्यासारखे आहे.

" If religion is a matter of realisation, it can not be reached through a mere knowledge of the dogmas. It is attained through discipline, training, sadhana. What we need is not formal religious education but spiritual training."

(१२) सदाचरण स्वान्तःसुखाय

प्रेम करा, सत्य बोला, क्षमाशील व्हा असा केवळ उपदेश कुणी केला तर, असे वर्तन का करावयाचे हा बुद्धिनिष्ट युक्तिवाद मनात उद्भवतो. अमुक प्रकारे मी का वागायचे ? या आजच्या विज्ञानयुगात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाची चर्चा आपण ग्रंथाच्या पहिल्या विभागात केली आहे. पण शिक्षकाने सदाचरणासाठी विद्यार्थ्यांना आवाहन करतांना कोणती दृष्टी बाळगावी हे येथे नमूद करणे अनुचित ठरणार नाही.

"सर्वच जण खोटे बोलू लागले, परस्पर द्वेष करू लागले, तर समाजरूपी रथ सुरळीत चालू शकणार नाही" म्हणून खरे बोलणे, प्रेम करणे आवश्यक आहे, असे वरील प्रश्नाचे सकृतदर्शनी विद्यार्थ्याला निरुत्तरित करणारे उत्तर शिक्षकाला देता येईल. नाही असे नाही. पण थोडा अधिक विचार केला तर या युक्तिवादातला फोलपणा जाणवतो. पहिली अडचण अशी की मला स्वत:साठी नव्हे, तर समाजस्वास्थ्यासाठी असे सदाचरण करायचे आहे, ही स्खलनाला उद्युक्त करणारी भावना मनात येते. त्यामुळे अनेकजण खोटे बोलतांना दिसले की, "मी एकट्यानेच काय म्हणून खरे बोलावे? समाजरक्षणाचा मक्ता काय मी एकट्यानेच घेतला आहे का"? हा विचार सहजच मनात येतो. नि नेहमी नाही, तरी गरज पडेल तेव्हा (म्हणजे स्वार्थाचा-मोहाचा प्रसंग उद्भवेल त्या सर्व वेळी) खोटे बोलावयास, खोटी वृत्ती बाळगण्यास काय हरकत आहे? या प्रश्नाला उत्तर देणे अवघड जाते. कारण व्यक्ती स्वत:साठी नव्हे, तर समाजासाठी सत्यतेचे पालन करीत असते.

समाजहितासाठी, कुणाला दुखवू नये म्हणून, कुणावर अत्याचार, अन्याय होऊ नये म्हणून सदाचरण, केले पाहिजे, असे शिकविण्यात दुसरी एक अडचण येते. वरील पैकी काहीही न होता-व्यक्ती वा समाजाला हानी न पोहोचता-केलेले दुष्कर्म या विचारसरणीमुळे क्षम्य ठरू

शकते. उदा:– कुणाच्याही लक्षात न येता केलेला बिनातिकीट प्रवास, पतीला न कळू देता त्याच्या स्त्रीशी केलेला व्यभिचार वा सधन मालकाच्या केव्हाही न लक्षात आलेली वा जाणवलेली १०० रु. ची नोकराने केलेली चोरी या सर्वच क्रियांत कोण दुखावले गेले? कुणाला त्रास झाला?

अध्यात्मामुळे अध:पतनाला आवर

मनुष्य स्वत:च्या दुष्कृत्यावर पांघरुण घालण्यासाठी ज्यावेळी वरील प्रमाणे अनेक युक्तिवाद सोयिस्करपणे करू लागतो, त्याचवेळी अध्यात्म पुढे सरसावून त्याला या कुकृत्यापासून थोपवू शकते. मनासोबत स्वैराचाराकडे वहावत चाललेल्या मानवाला कुकर्मापासून परावृत्त करू शकते. अध:पतनाच्या खोल गर्तेकडे वेगाने वाहणाऱ्या मानवी समाजाला केवळ एक अध्यात्मच आवर घालू शकते!

कारण अध्यात्म मनुष्याला ठामपणे बजावते की, "अरे समाजासाठी-जगासाठी नव्हे, तर तुझ्या कल्याणासाठी, आत्मसुखासाठी सद्वर्तनी असणे तुला क्रमप्राप्त आहे! सत्य, अहिंसा, दया, क्षमा, विवेक, वैराग्य या सर्व गुणांचे अनुकरण तुला तुझ्याच हितासाठी, आत्मोन्नतीसाठीच करायचे आहे. या सद्गुणांचा आश्रय केल्याने तुझे अंत:करण शुद्ध होऊन परम अर्थाचा, परमात्म्याचा अधिकारी तू होणार आहेस. सर्व संतानी ज्या दैवी आनंदरसाचे पान करून तृप्तीची ढेकर दिली, त्याची प्राप्ती तुलाही होण्याचा संभव आहे."

शुद्धाचरणासाठी अध्यात्मसाधना

नैतिक जीवनमूल्यांसाठी आध्यात्मिकतेची कास धरावी लागते ती या ठिकाणी! नैतिक जीवनाला अध्यात्माचे पाठबळ असावे लागते, ते विद्यार्थ्यांचा अशा रीतीने शुद्धाचरणाकडे बघण्याचा दृष्टिकोनच मूळी पार बदलून टाकण्यासाठी! सदाचरण स्वान्त:सुखाय करण्यासाठी!

विभिन्न धर्म, पंथ, संप्रदाय यांना मान्य असलेल अध्यात्मिक सिद्धांत सुलभतेने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनावर कौशल्याने बिंबवले तर विद्यार्थ्यांचे बौद्धिक समाधान तर खचित होईलच; शिवाय त्यांच्या जीवनदृष्टीत बदल होऊन निरपेक्ष आचरणाकडे त्याचा कल वाढू लागेल.

या प्रकरणातील पहिल्या व दुसऱ्या विभागांतील विवेचनावरून नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचे स्थूल स्वरूप स्पष्ट होण्यास साह्य होईल. विद्यार्थ्यांचा आध्यात्मिक उत्कर्ष हा आपल्या प्रशासनाद्वारे साधावयाचे असलेले साध्य आहे, ह्याची जाणीव शिक्षण संस्थेच्या चालकांना मनोमन असेल, तर शाळा वा कॉलेज यामधील नैतिक व आध्यात्मिक अभ्यासक्रमाला कसा आकार व गती द्यायची हे सहज समजू शकेल. निबर्मिगहॅमच्या एका शिक्षण संस्थेच्या बाबतीत खालील उद्गारात[१] जशी जाणीव संस्था प्रमुखांकडून व्यक्त झाली आहे, तशी ती असेल तर हा अभ्यासक्रम यशस्वी व्हायला कितीसा उशीर?

"There has always been in the minds of those who have been at the head of the college, a realization of the fact that the religious welfare of the students is one of the chief concerns of the admininistration"

संदर्भ टीपा

१. योगी अरविन्द यांनी आपले बंधू बारीन्द्रकुमार यास दि. ७ एप्रिल १९२० रोजी पाठविलेल्या पत्रातून उदधृत

२. *Sir Richard Livingstone : Some Tasks For Education; p. 14–15.*

३. उदाहरणार्थ, श्री गुलाबराव महाराज कृत 'चित्तोपदेश,' मोरोपंतांची केकावली, गीताई, संस्कृत सुभाषिते, व विविध सुलभ स्तोत्रे. पाठांतरासाठी खालील पुस्तकातील प्रार्थना उपयोगी ठरतील:

ब) *Unity of Religions : Swami Shivananda. The Divine Life Society; Rishikesh ; U. P.*

व) *Assembly Prayers Central Institute of Education; New Delhi:*

क) आश्रम भजनावली; नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद; १९५६.

४. गीताप्रेस, गोरखपूर, या संस्थेने हिन्दीत 'बाल–पोथी' प्रसिद्ध केलेली. या नावाने विविध वयोमर्यादेसाठी प्रसिद्ध केलेली पुस्तकें या संदर्भात विचारात घेण्याजोगी आहेत. नैतिक शिक्षणासाठी जी सात कलमी व्यावहारिक योजना बंगालचे प्रख्यात विचारवंत श्री. केशवचंद्र सेन यांनी सुचविली आहे त्यात सद्‌गुणांचा ठसा उमटेल अशी पुस्तके अभ्यासक्रमात नेमावी अशी सूचना आहे. पहा, *'Keshubchunder Sen's Nine letters' p. 47–48.*

५. पाठपुस्तकातील पाठ कसे असावेत याची साधारण कल्पना यावी म्हणून प्रस्तुत लेखकाचे खालील दोन कथावजा पाठ पहा.

१. चाले हे शरीर कोणाचिये सत्ते ? : बालक मासिक; यवतमाळ नोव्हेंबर १९६०.

२. खेक् खेक् खेकडी : बालक मासिक ; जानेवारी १९६१.

६. खालील देशभक्तीपर गीतांचे संग्रह वर्गगीतांची निवड करण्यास उपयुक्त ठरतील.

अ. स्फूर्तिगान : प्रकाशक – द. शं. वझे, गिरगांव, मुंबई, ४.

ब. राष्ट्र वंदना : राष्ट्रसेवादल प्रकाशन.

क. जागृतिके स्वर: राष्ट्रधर्म पुस्तक प्रकाशन, लखनौ १९६९.

७. *Quoted from 'Glorious Thoughts on Education.' Ed. N. B. Sen; p. 154.*

८. *" Behaviour is a mirror in which everyone shows his a image " Goethe; Ibid; p. 165.*

९. वरप्रमाणे; पृ. १५५.

१०. वरप्रमाणे; पृ. १४८:

११. श्री. प्र. माणकीकर : शिक्षणशास्त्राची मूलतत्वे; पृ. १००;

१२. श्री. भा. रा. देशपांडे, नागपूर; या अध्यात्म शिक्षणाच्या अनुभवी प्रयोगकर्त्याच्या टिपणवहीच्या आधारे.

१३. *The Mother : On Education; p. 12.*

१४. *Mahatma Gandhi ; Quoted in : Development of Education in New India; p. 15.*

१५. *Quoted from : Mahatma Gandhi; " Non-Violence in Peace & War." p. 113.*

१६. *W. D. Perry : A History of Bermingham Southern College; 1856-1931. pp. 75-76.*

❑❑❑

दहा

वातावरण निर्मितीचे उपाय व योजनेची सप्तसूत्रे

" समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥ "

अर्थः– आमचा सर्वांचा संकल्प समान असो; सर्वांची हृदये एक असोत. सर्वांचे मन एक असो, जेणेकरून सर्वांमध्ये सुसंवादित्व उत्पन्न होवो.

ऋग्वेद[१]

" *Education divorced from religion is doomed to spiritual sterility; religion divorced from education is doomed to superstition. A dogmatic religions faith and a dogmatic secular philosophy of education are bound to be mortal enemies but religion and education in proportion as both are honest, informed and humble that is truly liberal, are natural allies.* "

Theodore M. Green[२]

(अ) शिक्षणसंस्थेतील पोषक वातावरण निर्मितीसाठी काही उपाय

शिक्षण संस्थेचे आकर्षण

सामान्यत: सर्वच अवस्थांतील विद्यार्थ्यांना उपयुक्त होऊ शकतील अशा काही उपायांचा विचार आपण आता करू. विद्यार्थ्यांच्या मनावर अभ्यासक्रमात शिकविण्यात आलेल्या उच्च तत्वांना पूरक होईल, असा संस्काराचा ठसा उमटविणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी शिक्षण संस्थेतले एकूण वातावरण पावित्र्याने, गांभीर्याने, कडक शिस्तीने व शिक्षकांच्या संयमपूर्ण व्यवहाराने असे भारले गेले पाहिजे की त्या विद्यामंदिराच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या मनात सद्विचाराशिवाय व वागण्यात सदाचरणाशिवाय दुसऱ्या कशाचा प्रवेशच होऊ नये. शाळेत वा महाविद्यालयात प्रवेश करताच आपण एका वेगळ्या जीवनात प्रवेश केला आहे, अशी जाणीव विद्यार्थ्याला व्हावयास हवी. शिक्षण संस्थेचे एवढे आकर्षण विद्यार्थ्याला वाटावे की रोज शाळा वा कॉलेज सोडतेवेळी वा एखाद्या दिवशी काही कारणामुळे शाळा कॉलेजात न जाता आल्यास, त्याला मनापासून वाईट वाटले पाहिजे. त्याला शाळेत न गेल्याने चुकल्यासारखे व्हायला हवे. आपण मोठ्या लाभाला आज मुकलो, अशी त्याची भावना

व्हायला हवी. शाळेत विद्यार्थी उत्साहाने आनंदाने आला पाहिजे. याउलट आज सामान्य विद्यार्थी सुटया लागण्याची वाट पहात असतो. रोजचे तास केव्हा संपतील असे त्याला झाले असते. कमीतकमी वेळ शाळा कॉलेजात घाल वावा असा त्याचा प्रयत्न असतो. असे का होते ?

वातावरण निर्मितीची उपेक्षा

अशा रीतीने विद्यार्थी शाळेत वा कॉलेजमध्ये येण्याचे टाळतो, याचा दोष त्या विद्यार्थ्यापेक्षा, योग्य अशा वातावरण निर्मितीची उपेक्षा करणाराकडे, प्रामुख्याने जातो. शिक्षणसंस्थेतील वातावरणाचे महत्व अद्याप अनेकांच्या ध्यानात आले नाही. अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांत उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांसाठी सुद्धा पोषक वातावरणाची निर्मिती व्हावी म्हणून केवढे तरी संशोधन झाले आहे. भिंतींना रंग कोणता असावा ? कार्यक्षमता वाढीसाठी संगीताचा उपयोग कसा करावा ? कामाच्या परिसरातील आवाजावर कसे नियंत्रण ठेवावे ? इ. लहान लहान बाबींचाही विचार तिथे केला जातो. मग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला सहाय्यक असे वातावरण शिक्षण संस्थामध्ये उत्पन्न करण्यासाठी सूक्ष्म विचार व्हावयास नको का ?

वैचारिक धारणेनुसार व्यक्ती भोवती वलय

प्रख्यात थिऑसॉफिस्ट डो. अॅनी बेझंट यांच्या मतानुसार प्रत्येक व्यक्ती भोवती तिच्या मनांतील विचारानुसार एक वलय उत्पन्न होते. केवळ व्यक्तीच काय, पण एखादे घर, संस्थेची इमारत, वा देवालय यांच्या भोवतीसुद्धा, त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींच्या वैचारिक ठेवणीप्रमाणे विशिष्ट वलये निर्माण झालेली असतात. ही वैचारिक धारणा जेवढी उच्च वा नीच असेल, त्या प्रमाणात हे वलय देखील चांगले किंवा वाईट प्रकारचे तयार होते. श्रीमती बेझंट यांना या वलयातील रंग देखील प्रत्यक्ष दिसत असत ! विविध व्यक्ती व इमारती यांच्या विभिन्न रंगातील वलयांची चित्रे दाखवून, त्यांनी विचारांचे व वातावरणांचे परिणाम व्यक्तीवर केवढे प्रचंड होतात, हे एका पुस्तकात[१] नमूद केले आहे. आचरणशून्य अशा एखाद्या पोपटपंची करणाऱ्या विद्वानाच्या पांडित्यपूर्ण भाषणापेक्षा, मौन धारण करणाऱ्या एखाद्या साक्षात्कारी सत्पुरूषाचा

साधा सहवाससुद्धा, मनावर अधिक प्रभावी ठसा का उमटवितो, याचा उलगडा या पुस्तकाने होतो. एखाद्या गरीबाच्या झोपडीत प्रवेश करताच पवित्रता जाणवते, या उलट एखाद्या श्रीमंताच्या महालात, सर्व ऐश्वर्य, स्वच्छता, व टापटीप असूनही अमंगल भाव उत्पन्न होऊन, फार वेळ तिथे बसावेसे वाटत नाही, याचे मुख्य कारण या दोन्ही व्यक्तींच्या विचार-घनामुळे पडणारा त्या ठिकाणच्या वातावरणातील फरक होय.

विशुद्ध वातावरणाचा हेतू

तेव्हा विशुद्ध वातावरणाची निर्मिती करण्याचा शिक्षण संस्थानी जागरूकतेने प्रयत्न केला पाहिजे. असे विशुद्ध वातावरण उत्पन्न करण्या-मागे मुख्य हेतू असावा सुसंस्कार करण्याचा, नि हे संस्कार उत्पन्न होऊन चिरस्थायी व्हायला गरज असते ती आंतरिक श्रद्धेची ! आणि दुर्दैवाने आज भौतिक समृद्धीमुळे लोप पावत आहे ती या मानवी मूल्यांवरील व परमेश्वरावरील श्रद्धाच ! या श्रद्धेच्या अभावी सुसंस्कार सुस्वभाव व सुसंस्कृतता यांचा अभाव जाणवू लागला तर त्यात काय आश्चर्य !

भारतीय जीवन ज्या महापुरूषांनी आपल्या अलौकिक सामर्थ्याने व तपस्येने घडविले, भारतीय इतिहासाला ज्या शूरवीरांनी आपल्या स्वार्थत्यागाने व कर्तबगारीने. सुयोग्य वळण लावले आणि भारतीय संस्कृतीचा तेजस्वी नंदादीप ज्या सत्पुरूषांनी आपल्या विशुद्ध चारित्र्याने व चिरंतन वाङमयाने अखंडपणे तेवत ठेवला, त्या सर्व भारतीय नरश्रे-ष्ठांच्या प्रचंड पुरूषार्थाच्या आविष्काराचे मूळ त्यांच्या परमेश्वरावरील प्रगाढ श्रद्धेतच आढळते; परमार्थाच्या अधिष्ठानात दिसते. भारतीयांचा 'परम अर्थ' म्हणजे नेहमी परमेश्वरच ! या परमार्थाचे, परमेश्वराचे अधिष्ठान पौरूषाला व पुरूषार्थाला नित्य प्रेरक असते. समर्थांनी यथार्थपणे म्हटले आहे,

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ॥
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥

भगवंताच्या अधिष्ठानाचा विसर

आज विसर पडला आहे तो नेमक्या या भगवंताच्या अधिष्ठानाचा ! त्यामुळे मजबूत पाया नसलेले घर जसे हळूहळू सर्वबाजूने जमिनीत

खचत जाते, तशी राष्ट्राची आज या प्रबळ अधिष्ठानाच्या अभावी, सर्वदिशांनी अधोगती, होतांना दिसत आहे. कोणत्याही मानवी क्रियेला काही तरी हेतू असावा लागतो, प्रयोजन असावे लागते. बाह्य क्रिया कशी नि कोणत्या दर्जाची आहे, यापेक्षा ती कोणत्या कारणासाठी मनात कोणता भाव धरून केली जात आहे, हे फार महत्वाचे आहे !

उदाहरणार्थ, तिघेजण स्वत:च्या मोटारने मुंबईहून दिल्लीला जात आहेत. एक जण चोरून आयात केलेला माल नेत आहे, दुसरा मोटार स्पर्धेमधे भाग घेत आहे, तर तिसरा मातृभूमीच्या संरक्षणार्थ युद्धकाळात सैन्यात रूजू होण्यासाठी जात आहे. पहिल्याचा हेतू अयोग्य मार्गाने पैसा मिळवणे, दुसऱ्याचा एक छंद भागविणे, तर तिसऱ्याचा आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणे, हा असतो. त्यामुळे बाह्य क्रिया जरी एकच असली, तरी ज्या हेतूने ती केली जाते त्या हेतूची उच्चता व उदात्तता यामुळे ती क्रियाही तेवढीच उच्च व उदात्त ठरत असते ! त्यामुळे परमार्थप्राप्ती वा परमेश्वरप्राप्ती हा एकमेव हेतू मनात धरून सर्व क्रिया केल्या की त्या क्रियांना उजाळा प्राप्त होऊन त्या भव्योदात्त होतात. अशा शेकडो क्रियामुळेच सुसंस्कृत मानवी जीवन निर्माण होते व अशा ईशप्राप्तीच्या सर्वोच्च हेतूने केलेल्या क्रियांमुळे मानवी जीवनाला सहजगत्या भगवंताचे अधिष्ठान प्राप्त होते. अशा दैवी अधिष्ठानाची आज राष्ट्राला अत्यंत निकड आहे.

आचरणावर भर असणारे उपाय

सामाजिकच, शिक्षणसंस्थेमध्ये वातावरण निर्माण करतांना असे अधिष्ठान कसे उत्पन्न होईल ? याचा जाणीवपूर्वक विचार व्हावयास हवा. विद्यार्थ्यांच्या मनात हा विचार कसा रूजवता येईल? या दृष्टीने एकूण सर्व शैक्षणिक कार्यक्रमांची आखणी व्हावयास हवी !

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणात तात्त्विक चर्चेपेक्षा दैनंदिन आचरणावर अधिक भर द्यावा, हा कटाक्ष असल्यामुळे' अशा पवित्र व प्रसन्न वातावरणाला विशेषच महत्व द्यावयास हवे. असे वातावरण कसे निर्माण करता येईल ? त्यासाठी कोणते उपाय अंमलात आणावे ? हा प्रश्न ओघानेच येतो.

आम्ही खाली काही उपाय सुचवीत आहोत, त्यांचा प्रयोग शिक्षण-संस्थांत करून पाहण्यासारखा आहे !

(१) दैनंदिन प्रार्थनेने शुभारंभ

शाळा असो वा महाविद्यालय, संस्थेतील सर्वांनी मिळून, (प्राचार्या-पासून चपराशापर्यंत) रोज वर्ग सुरू होण्यापूर्वी सामूहिक प्रार्थना म्हणावी, ही प्रार्थना सर्वांनी सहज म्हणता येईल इतकी सुलभ व साध्या चालीची असावी. प्रार्थनेची निवड करतांना त्यातील अर्थ, भावगांभीर्य व अंत:करण प्रभावित करण्याचे सामर्थ्य, याकडे संस्था प्रमुखांनी लक्ष पुरविले पाहिजे ! प्रार्थना अधिक आकर्षक व संस्कारक्षम व्हावी यासाठी शक्य असेल तर पेटी, तबला, बासरी इ. वाद्यांपैकी एक दोन साधनांचा उपयोग करावा. प्रार्थनेचा कालावधी फार लहान वा फार मोठा नको. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अवस्थेप्रमाणे, हा कालावधी कमी जास्त राहणार असल्याने तो निश्चित सांगणे अवघड आहे. पण ही प्रार्थना केव्हा बंद व्हावी याचे एक गमक सांगता येईल. आणखी काही वेळ प्रार्थना चालू रहावयास हवी होती, अशी विद्यार्थ्यांची भावना ज्या क्षणी असते, त्याचवेळी ती बंद होणे इष्ट ! ती कंटाळवाणी होऊन नकोशी वाटेपर्यंत लांबविणे योग्य नव्हे !

(२) मौन मानसपूजन

प्रार्थना आटोपल्यावर आपआपल्या वर्गात विद्यार्थी व शिक्षक स्थानापन्न झाले की एक सांकेतिक गजर व्हावा. त्यानंतर ३ मिनिटे संपूर्ण मौन सर्वत्र पाळले जावे. तीन मिनिटानंतर दुसरा गजर व्हावा. त्याने मौन संपले असून वर्गात शिकविण्यास प्रारंभ व्हावा हे दिग्दर्शित केले जाईल.

माजी राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांनी आपल्या शिक्षणावरील अहवालात मौन ध्यान वा पूजन *(Silent Meditation or Worship)* याची जी कल्पना सुचविली आहे, तिचा अंमल अशाप्रकारे करता येईल. या मौन काळात सर्वांनी देहाच्या हालचाली सोबतच मनातील आंदोलने

कमी करून; आपल्या इष्ट देवतेचे एकाग्रतेने ध्यान करावे, अशी अपेक्षा राहील. कोणत्याही विषयाच्या ज्ञानग्रहणासाठी मनातील सर्व अवांतर विचारांची हकालपट्टी करून, ते पूर्णतया रिकामे करणे आवश्यक आहे. जर जगन्नियंत्याच्या एखाद्या स्वरूपाशी, रोज याप्रमाणे काही वेळ मन एकाकार होऊ लागले, तर कोणताही अभ्यास विषय आत्मसात करणे, विद्यार्थ्यांना सुलभ होईल.

(३) प्रार्थनोत्तर सुविचार वाचन

आठवडयातून दोन किंवा तीन दिवस, प्रार्थनेच्या नंतर वेगवेगळया शिक्षकांनी, पाळीपाळीने, थोर पुरूषांच्या जीवनातील एखादा लहानसाच, पण मार्मिक असा, प्रसंग किंवा आठवण सांगावी. यासाठी केव्हाही २–३ मिनिटांपेक्षा अधिक वेळ मात्र लागता कामा नये.

पुरेसे वाचन असलेले काही उत्साही विद्यार्थी या कार्यक्रमासाठी स्वेच्छेने तयार असतील, तर त्यांनाही यात अवश्य समाविष्ट करावे. मात्र जे विद्यार्थी निवेदन करणार आहेत त्यांची अगोदर चाचणी घ्यावी.

" स्फुल्लिंग, प्रेरणा, मणिमंजुषा, " यासारखे एखादे नाव या कार्यक्रमाला द्यावे. सुटसुटीत पण प्रभावी असे एकूण या उपक्रमाचे स्वरूप असावे. या कार्यक्रमात एखाद्या दिवशी वर्तमानात वा भूतकाळात काही विशेष घटना घडली असेल तर त्याचा परिचय करून देणे देखील उपयुक्त ठरेल.

(४) विचार मौक्तिक संग्रह

प्रत्येक दिवशी किंवा निदान आठवडयाला, थोर व्यक्तीचा प्रेरणा देणारा एक सुविचार, शिक्षणसंस्थेत, एखाद्या ठळक जागी फळयावर लिहून ठेवावा. सर्व विद्यार्थ्यांनी मुद्दाम एक वेगळी वही करून त्यांत ही सर्व विचार मौक्तिके लिहून घ्यावीत. अशा प्रेरक विचारांचा एकत्र संग्रह, श्रेष्ठ पुरूषांची ओळख तर विद्यार्थ्यांना करून देईलच, पण त्याशिवाय विषण्ण व विमनस्क मनस्थितीत, हे संग्रहित विचार, भावी काळात विद्यार्थ्याला प्रोत्साहक व उत्तेजक ठरल्याशिवाय रहाणार नाहीत.

जे विद्यार्थी विशेष काळजी घेऊन सुंदर व सुवाच्च अक्षरात अशा वह्या लिहितील, त्यांना विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात वक्षिसे जाहीर करावीत

(५) समान गणवेश

प्रत्येक शिक्षणसंस्थेने आपल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी (शक्य-तोवर भारतीय पद्धतीचा) एक पोषाख निश्चित करावा; तो सर्वांना आर्थिकदृष्ट्या परवडेल व बाज़ारात उपलब्ध होईल, असा निवडावा शक्य झाल्यास रोज किंवा आठवड्यातून निदान एक दिवस, त्या पोषाखात सर्वजण यावेत, असा प्रयत्न व्हावा. 'आपण सर्व एक आहोत,' ही भावना विद्यार्थ्यांत उत्पन्न व्हायला त्याचा उत्तम उपयोग होतो. श्रेष्ठ कनिष्ठतेची जाणीव लोप पावण्यास त्यामुळे सहाय्य होते!

(६) संपूर्ण मौन - दिन

आठवड्यातून वा फार तर पंधरवाड्यातून एक दिवस "मौन-दिन" म्हणून पाळला जावा. आवाराच्या प्रवेशद्वारात पाऊल टाकल्या-पासून तो पुन्हा त्यातून बाहेर पडेपर्यंत, अभ्यासानिमित्त अध्यापकांशी वर्गांत, जे बोलणे आवश्यक असते तेवढे वगळल्यास, कुणीही एक चकार शब्दसुद्धा बोलू नये. चपराशी, कार्यालयातील कर्मचारी, अध्यापक, प्राचार्य, या सर्वांनी हा नियम कडकपणे पाळावा. विद्यार्थ्यांचे कार्यालयाशी होणारे सर्व व्यवहारही त्या दिवशी शक्य झाल्यास बंद ठेवावे!

अशा वाक्संयमाचा संस्थेतील वातावरणावर अत्यंत प्रभावी परिणाम उमटतो व विद्यार्थ्यांचे आत्मबल वाढते, असा अनुभव आहे. महात्मा गांधी देखील असे मौन, सप्ताहातील एक संपूर्ण दिवस नेमाने पाळत असत, ते वाणीवर संयम ठेवून आध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्यासाठीच! शाळा कॉलेजातील ४–६ तासच का होईना, वाचेचे असे नियंत्रण करायला विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे.

(७) ईश - संकिर्तन

पंधरवाड्यातून वा महिन्यातून एक वेळ सामुदायिक भजनाचा कार्यक्रम आयोजित करावा. एकादशी, पौर्णिमा अशी एखादी तिथी वा इंग्रजी तारीख, यासाठी मुक्रर करून ठेवावी. सुमारे १–१।। तासाचा हा कार्यक्रम प्रातःकाळी वा सायंकाळी घ्यावा. यावेळी वातावरणात

निसर्गतः अनुकूलता असते. कुणी, कोणत्यावेळी काय म्हणायचे हे निश्चित असावे. त्यामध्ये योग्य क्रम ठरलेला असावा. एक मिनिट देखील वाया जाऊ नये. गप्पाष्टकांना तर मुळीही वाव असू नये. वाद्यांचे सहाय्य अवश्य घ्यावे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहणे अनिवार्य असू नये. स्वेच्छापूर्वक विद्यार्थी यावेत हीच अपेक्षा असावी. बंधन लादले तर भजनात रंग येणार नाही!

(८) कथा - कथन

सुमारे १५ दिवसातून वा महिन्यातून एक वेळ, संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी कथा–कथनाचा सुमारे ३० मिनिटांचा कार्यक्रम घ्यावा. प्रत्येक शैक्षणिक सत्रात, निदान असे १० कार्यक्रम तरी असावेत! दहा शिक्षक यासाठी पुढे आले, तर वर्षभरात एका शिक्षकावर साधारणपणे एकदाच कथा सांगण्याची वेळ येईल.

मनोवेधक गोष्टींचे मुलांना विलक्षण वेड असते हे आपण नेहमी अनुभवतो. साने गुरूजी मुलांना एवढे प्रिय झाले याचे कारण, अंतःकरणाचा ठाव घेणारी त्यांची कथाशैली! कुटुंवातली आजी नातवंडांना एवढी आवडते याचे एक कारण, ती मनोरंजक गोष्टी सांगते, हेंच नव्हते का ?

या कथांच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांना नकळत, नैतिक व अध्यात्म शिक्षण देता येईल! त्यांना माहीत नसलेली, नचिकेत, महाप्रभु चैतन्य, जन्मांध संत श्री गुलाबराव महाराज इ. सत्पुरूषांची; पन्नादाई, खंडोबल्लाळ, मदनलाल धिंग्रा, या देशभक्तांची किंवा गणिततज्ञ रामानुजम्, नोबेल बक्षिस विजेते श्री. रमण, स्थापत्यशास्त्रज्ञ विश्वेश्वरअय्या, इ. शास्त्रज्ञांची सविस्तर हकीगत निवेदन करावी. खुमासदार शैली व मनोवेधक कथा विषय असला, तर या कार्यक्रमाची विद्यार्थीवर्ग आतुरतेने वाट पाहिल्याशिवाय राहणार नाही.

शक्य झाल्यास मधून मधून संस्थेबाहेरच्या वक्त्यांना कथा सांगण्यासाठी पाचारण करावे!

(९) व्यक्तिगत मार्गदर्शनासाठी संपर्क योजना

लोकशाहीतील एक महत्वाची शैक्षणिक समस्या अशी की, शाळा कॉलेजात शिकणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी एकाच प्रकारची कौटुंबिक परंपरा व सांस्कृतिक पार्श्वभूमी *(Family traditions and caltural background)* यामधून आलेले नसतात. त्यामुळे त्यांच्या मानसिक व भावनात्मक गरजा *(Mental and emotional requirements)* वेगवेगळ्या असतात. प्रत्येक विद्यार्थ्याची ही गरज आज भागविली जात नाही. त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करून एक विशिष्ट ज्ञानाची व आचाराची पातळी गाठण्यास सहाय्य करणे हे संस्थेचे कर्तव्य असते. अर्थात हे मार्गदर्शन व्यक्तिपरत्वे भिन्न राहील हे उघड आहे.

परंतु असे मार्गदर्शन सामूहिकपणे चालणाऱ्या वर्गातील नैतिक शिक्षणाद्वारे मिळू शकणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांचे लहान लहान गट पाडून त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी अध्यापकांवर सोपवावी लागेल. आपल्या गटातील विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती काढून अध्यापकाने त्यांचा मानसशास्त्र दृष्टया अभ्यास केला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक इ. सर्व बाजूंचा सर्वांगीण विचार केल्यावर त्याची नेमकी उणीव नि गरज ओळखून अचूक असा सल्ला द्यावयास हवा. असे वैयक्तिक लक्ष जर पुरविले गेले तर आज भेडसावणारे विद्यार्थ्यांचे काही प्रश्न सहज सुटतील.

हा उपाय अंमलात आणण्याच्या दृष्टीने शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांचा एक गट प्रत्येक अध्यापकाकडे सोपविला जावा. या गटातील विद्यार्थ्यांशी साधारणतः पंधरवडयातून एक वेळ संपर्क साधून (सामूहिक वा वैयक्तिकरित्या, वर्गात वा वर्गाबाहेर) अध्यापकांनी त्यांना विश्वासात घेवून विविध प्रकारे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या गटातील विद्यार्थ्यांसंबंधीचा सविस्तर अहवाल अध्यापकांनी ३१ सप्टेंबर पूर्वी प्राचार्यांना वा मुख्याध्यापकांना सादर करावा. त्यांनी प्रत्येक पालकाला, पाल्याकडे कोणत्या बाबतीत

अधिक लक्ष पुरवावयास हवे, याबाबत सुमारे ३० आक्टोंबर पर्यंत पत्र पाठवावे.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक वा बौद्धिक विकासामध्ये विशेष अडचण वा उणीव लक्षात आली किंवा विशेष दुर्गुण लक्षात आला तर, अध्यापकाने तो मुख्याध्यापकाच्या त्वरित लक्षात आणून द्यावा व तसे पालकांना ताबडतोब कळविण्याची व्यवस्था व्हावी. पालकाशी गरजेनुसार वर्षभर संबंध असावेत.

विद्यार्थ्यांवर सुयोग्य नियंत्रण व सद्गुण संवर्धन या दृष्टीने हा उपाय फार गुणकारी ठरेल. एवढेच नव्हे, तर या निकट संपर्कामुळे शिक्षकां विषयी ढळत चाललेला विद्यार्थ्यांचा आदरभाव वृद्धिगत होण्यास त्यामुळे सहाय्य होईल. डॉ. राधाकृष्णन[1] यांनी म्हटले आहे,

" When teachers cease to be respected, when authority is not listened to, that means the beginning of the decline of a country. But if teachers are to be respecied, they must get to know the pupils closely and intimately."

(१०) सवय व शासन म्हणून नाम-लेखन

मन एकाग्र होऊन अंतर्मूख व्हावे म्हणून नामलेखनाचा अभ्यास, अध्यात्म साधनेचे एक अंग म्हणून, भारतात प्राचीन काळापासून ज्ञात आहे. इतर धर्मांतही त्याचा अवलंब साधकाकडून केला जातो. एका स्वतंत्र वहीत आपल्या आवडीच्या इष्टदेवतेचे नाव साधकाने रोज होईल तितके लिहित रहायचे, अशी आहे ही साधी-सोपी साधना ! मन फार वेळ एकाग्र होत नाही, भगवंताचे ध्यान करण्याची मनाची अद्याप तयारी नाही म्हणून करावयाचे, हे आहे एक प्राथमिक साधन !

कोणत्याही विषयाच्या अभ्यासास अभिप्रेत असलेली मनाची एकाग्र धारणा होण्यासाठी या साधनेचा उपयोग होऊ शंकेल. शाळा-कॉलेज संपणाच्या सुमाराला एक विशिष्ट वेळ निश्चित करून, सुमारे १०-१५ मिनिटे सर्व विद्यार्थ्यांनी, एका वेगळ्या वहीत रोज आपल्या धर्मानुरूप, आपले प्रेम असलेल्या देवाचे वा सत्पुरूषाचे नाम लिहावे. मात्र हे नाम नेहमीसाठी सामान्यत: एकच असावे. सारखे बदलले जाऊ नये.

विद्यार्थ्याने अभ्यास न केल्यास वा काही गुन्हा केल्यास या साधनाचा उपयोग करता येईल. विद्यार्थ्यानें केलेल्या चुकीचे गांभीर्य लक्षात घेऊन अध्यापकाने शिक्षा म्हणून १०० ते १००० वेळा विद्यार्थ्याला नाव लिहिण्यास सांगावे. किंवा " हे परमेश्वरा, माझ्या चुकीबद्दल मला क्षमा कर, मला सन्मार्ग दाखव. " याप्रमाणे वा अशाच अर्थाची पश्चात्तापाची प्रार्थना करणारी वाक्ये, काही पाने लिहिण्यास सांगावी; किंवा गुन्ह्याचे स्वरूप लक्षात घेऊन, त्या गुन्ह्याचे दुष्परिणाम मनावर ठसविणारा, एखादा संस्कारक्षम असा नैतिक पाठ लिहण्यास सांगण्यात यावा.

याप्रमाणे नियमितपणे दैनदिन परिपाठ म्हणून व नैमित्तिक शिक्षा म्हणून, विद्यार्थ्यांकडून नाम - लेखनाची साधना झाली तर विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत व संस्थेच्या शैक्षणिक वातावरणात इष्ट तो बदल होण्यास खचित सहाय्य होईल प्रार्थना तोंडाने म्हणणे वा वाचणे यापेक्षा ती वारंवार लिहिणे याचा मनावर अधिक ठसा उमटतो असा स्वानुभव एका प्रयोगकर्त्याने " नमूद केला आहे तोंडाने काही म्हणत असतांना मन इतरत्र भरकटू शकते, तसे लिहितांना झाले तर विद्यार्थ्यांची चूक होण्याचा संभव असतो, त्यामुळे मन सहजपणे एकाग्र होते.

लेखनाच्या बाबतीत सर्व विद्यार्थ्यांत समानता असावी म्हणून कोणत्याही देवाचे नाव लिहण्यास सांगण्याऐवजी नियमितपणे सर्वांनाच, " हे सर्वशक्तीमान परमेश्वरा, मला सन्मार्ग दाखव " *(Oh Almighty-God, put me on the right path)* हे वाक्य १० ते १५ मिनिटे रोज लिहिण्यास सांगावे. काही चूक झाल्यास प्रायश्चित्त म्हणून, " हे परमदयाळू परमेश्वरा, मला क्षमा कर, " हे वाक्य काही पृष्टे लिहिण्यास सांगावे.

(११) दैनंदिनीची संवय

दैनंदिनी वा रोजनिशी लिहिण्याची विद्यार्थ्यांना सवय लावणे उपयुक्त ठरेल. शिक्षणसंस्थेने अशी दैनंदिनी छापून घेऊन जर विद्यार्थ्यांना अल्प किंमतीत पुरविली तर ते अधिक सोयीचे होईल. या रोजनिशीत मनांत येणारे बरे वाईट विचार, सदाचरणाचे प्रसंग, हातून

घडलेल्या चुका इ. गोष्टींची नोंद असावी. या योजनेच्या अंतर्गत जे नियम वा सवयी आपण विद्यार्थ्यांना लावण्याचा प्रयत्न करणार आहोत, त्यांचे पालन विद्यार्थ्यांकडून किती प्रमाणांत होते, याचे निरीक्षण एका दृष्टिक्षेपात करता येईल अशी, दैनंदिनीची एकूण मांडणी असावी. रोज नेमाने दैनंदिनी लिहिण्याचा, विद्यार्थी आळस करतील, ही अडचण कांहीच्या मनात येण्याचा संभव आहे. त्यासाठी दैनंदिनी रोज लिहिण्यास केवळ दोन तीन मिनिटापेक्षा अधिक कालावधी लागणार नाही, अशीच त्याची रचना असावी.

शिक्षक व पालक ह्यांचेद्वारा परीक्षण

या दैनंदिनीचे साप्ताहिक वा पाक्षिक निरीक्षण जर शिक्षक व पालक यांनी नियमितपणे केले, तर विद्यार्थी विशेष तत्परतेने रोजनीशी लिहिण्याचे हे कार्य करतील. आपल्या दैनंदिन घटनांची (नियम-पालन, सवयी, सद्‌गुण–दुर्गुण) लेखी नोंद कुटुंबातील जेष्ठ मंडळी, शिक्षक, स्नेही इ. सर्व पहात आहेत, ही जाणीव सद्‌गुणसंपन्न होण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करील. चांगल्या गोष्टीचे कौतुक व वाईट गोष्टींचा निषेध सामाजिकरित्या होणे, हे मानसशास्त्रीयदृष्ट्या फार आवश्यक असते. चांगले कृत्य केल्यानंतर, समाजाकडून वाहवा मिळावी अशी अपेक्षा, कुणाही सामान्य व्यक्तीची असतेच ! विद्यार्थ्यांची तर विशेषच! तेव्हा पालक व शिक्षक यांनी मुद्दाम वेळ काढून विद्यार्थ्यांच्या दैनंदिनी तपासल्या पाहिजेत. योग्य तो शेरा त्यावर लिहिला पाहिजे. नियमांचा भंग करणाऱ्यांची कधी एकांतात तर कधी सर्वांदेखत कान उघाडणी केली पाहिजे. *" Education is for behaviour and habits are the stuff of which it consists, "* हे जेम्सचे' वाक्य डोळ्यासमोर ठेवले तर या रोजनिशीचे महत्व सहज लक्षात येईल.

(१२) विद्यार्थ्यांद्वारे योजनेची अंमलबजावणी

या शिक्षण योजनेची अंमलबजावणी यथायोग्य रीतीने होण्यासाठी प्रत्येक वर्गातील काही निवडक विद्यार्थी व अनुभवी अध्यापक यांची एक समिती मुख्याध्यापक वा प्राचार्यांनी दरवर्षी नियुक्त करावी. या

समितीने संपूर्ण वर्षभराच्या विविध कार्यक्रमांची कल्पकतेने आखणी करून ते अमलात आणण्याची जबाबदारी अंगावर घ्यावी. विद्यार्थ्यांना विश्वासात घेवून त्यांच्या संगनमताने कार्यक्रम व्हावेत. हे शिक्षण म्हणजे "आपली, आपल्या कल्याणासाठी व आपल्याकडून राबविली जाणारी एक योजना" आहे, असे विद्यार्थ्यांना वाटावे! असा भाव विद्यार्थ्यांत निर्माण होण्यावरच या योजनेचे यश अवलंबुन आहे.

वर नमूद केलेले उपाय काही अंतिम स्वरूपाचे नव्हेत. वातावरण निर्मितीसाठी वरीलप्रमाणेच आणखीही अनेक कल्पना सुचविता येतील. मात्र अशा सर्व कल्पना सर्व शिक्षण संस्थांत एकाचवेळी लागू कराव्यात, असा कुणीच आग्रह धरणार नाही. त्याची निवड संस्थाप्रमुखाने परिस्थितीनुसार केली पाहिजे, हे मागील प्रकरणात नमूद केलेच आहे.

समाज – शुध्दीस सहाय्यकारक

हे सर्व उपाय वाचतांना काही वाचकांच्या मनाला एक वेगळाच प्रश्न चाटून गेला असणे शक्य आहे. समाजातील एकूण वातावरण आज इतके गढूळ झाले आहे की, शिक्षणसंस्थेच्या परिसरातील वातावरणात या उपायांचा अवलंब कितपत शक्य आहे? या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न मागे एका प्रकरणात केला आहे. द्विरूक्तीचा दोष पत्करूनही, या ठिकाणी असे विश्वासपूर्वक नमूद करावेसे वाटते की, एखादा जिल्हा किंवा तालुका यातील, फक्त शासन कर्ते व शिक्षक यांनी देखील, परस्परांच्या सहकार्याने जर अत्यंत चिकाटीने – सर्व शक्तिनिशी – ही योजना सर्व शाळा कॉलेजातून एकाचवेळी अमलात आणली तर, बाहेरच्या वातावरणाचा पगडा शिक्षणसंस्थेच्या परिसरावर पडतो, असे जे दृश्य आज आपण पाहतो, त्याच्या उलट, शिक्षण क्षेत्रातील वातावरण सामाजिक जीवन शुद्ध करण्यास कारणीभूत होऊ शकते, असा सुखद प्रत्यय आल्याशिवाय राहणार नाही!

काहींना हे विधान धाडसाचे वाटण्याचा संभव आहे, परंतु सर्व शिक्षण संस्थातील शिक्षकांचे परस्पर सहकार्य असलेल्या एखाद्या १०–२० हजार वस्तीच्या शहरात हा प्रयोग केला तर सुमारे एक वर्षाच्या आतच समाजातील वातावरणावर त्याचा इष्ट असा परिणाम

सर्वांना जाणवल्याशिवाय राहणार नाही. असे खात्रीपूर्वक वाटण्याचे कारण विद्यार्थ्यांची गेल्या काही वर्षांत वाढलेली प्रचंड संख्या! एकूण लोकसंख्येशी विद्यार्थ्यांचे असलेले शेकडा प्रमाण पूर्वीच्या मानाने आज इतके वाढले आहे की, काही तालुका वा जिल्ह्याचे गांवी, (आसपासच्या खेडयातून तिथे शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच असल्याने) संपूर्ण लोकसंख्येत १ /४ केवळ विद्यार्थीच असतात!

एवढया प्रचंड प्रमाणात असलेल्या विद्यार्थ्यांचे जीवन, या योजनेद्वारा, पार बदलवून टाकण्याचा, त्यांना सुविचारी व सद्गुण संपन्न करण्याचा चंग, आपण शिक्षकांनी बांधला, तर सद्विचारांचे–सदाचरणाचे लोण उरलेल्या ३ /४ समामाजापर्यंत पोहोचावयास कितीसा वेळ लागेल? विद्यार्थ्यांची, नगरातील एवढी मोठी संख्या, अत्यंत विनयशील, विवेकी व संयमपूर्ण जीवन जगू लागली, तरी त्याचा ठसा समाजावर उमटल्याशिवाय राहणार नाही. उदाहरणार्थ, राष्ट्रीय गीते सामूहिकपणे म्हणण्याचा उपक्रम घ्या. गावातील प्रत्येक शिक्षण संस्थेने वर्षभरात प्रभावी अशी पाचच राष्ट्रीय गीते पाठ करवून घेतली, तर घरी दारी, विद्यार्थी सहजच ही गीते गुण-गुणू लागतील! उच्छृंखल व कामुक अशी सिनेमातील गाणी गाणे, त्यामुळे हळुहळू कमी होईल. तेवढ्या प्रमाणात या गीतांचा मनावर होणारा वाईट परिणाम नष्ट होऊ शकेल. याशिवाय दैनंदिन प्रार्थना, मौन पालन, सद्ग्रंथांचे वाचन पाठांतर इ. योजनेतील अनेक बाबींची कटाक्षानें अंमलबजावणी केली, तर उगवत्या पिढीबरोबर हळूहळू संपूर्ण समाजाचे आजचे चित्र पालटल्याशिवाय रहाणार नाही.

(ब) योजनेची मार्गदर्शक सप्तसूत्रे

शिक्षण हृदय चिकित्सेसारखे

वरवर विचार करता वाटते तितके हे अर्थातच सुलभ नाही. समाजाची स्थिती सर्वच बाजूने इतकी ढासळत आहे व ही अधःपतनाची प्रक्रिया एवढया वेगाने सुरू आहे की तिला, या योजनेद्वारा, उलट गती देण्यासाठी, प्रयत्नांचा प्रचंड डोंगर उभा करावा लागेल ! राष्ट्रहिताचा

निस्वार्थपणे विचार करणाऱ्या शुद्ध अंत:करणाच्या तळमळीच्या हजारो कुशल युवकांची अभेद्य फळी या शिक्षणाद्वारे प्रथम घडवावी लागेल ! त्यासाठी मागील दोन प्रकरणांतील अभ्यासक्रमाची व उपायांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना सर्व संबंधितांना फार दक्षता घ्यावी लागणार आहे. कारण या योजनेद्वारे आपण विद्यार्थ्यांच्या अत्यंत सूक्ष्म व अमूर्त अशा भावनिक, मानसिक व आत्मिक जीवनाच्या अंतरंगात प्रवेश करीत असतो. हृदयाची शल्यचिकित्सा (*Heart-operation*) करतांना ज्याप्रमाणे कुशल व अनुभवी डॉक्टर जास्तीत जास्त खबरदारी घेतो त्याप्रमाणे भावी पिढ्यांच्या हृदयाचे शुद्धीकरण व संस्करण करण्याचा हेतू असलेल्या या शिक्षणाची कार्यवाही फार सावधानतेने व्हावयास हवी ! म. गांधीनी आपल्या आत्मचरित्रात लिहिल्याप्रमाणे,

" I had always given the first place to the culture of the heart or the building of character. I regarded character building as the proper foundation for . . . . . education"

चारित्र्य निर्मितीची ही योजना शिक्षणाचा पायाच आहे. तो चांगला नि भरभक्कम होणे महत्वाचे नाही का ?

स्वामी विवेकानंदांनी सुद्धा *" I look upon religion as the innermost core of education"*, असे आपले मत प्रगट करून आध्यात्मिक शिक्षण हा एकूण शिक्षणाचा गाभाच आहे यावर भर दिला आहे. एखाद्या देवस्थानात, आपण ज्या ठिकाणी देवतेची प्रतिष्ठापना करतो, तो गाभारा ज्याप्रमाणे स्वच्छ, सुंदर शोभिवंत राहील, याकडे सर्वप्रथम लक्ष पुरवितो, त्याप्रमाणे शिक्षणाचा केवळ गाभा किंवा प्राणच असलेले नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देतांना, अत्यंत दक्षता घ्यावयास हवी. *" Handle with Care "*, असे ज्याप्रमाणे आपण फुटण्याजोग्या वा स्फोटक वस्तूंच्या वेष्टनावर, ती वस्तू वापरणाऱ्यासाठी सूचना म्हणून लिहून ठेवतो, त्याचप्रमाणे ही योजना अंमलात आणणारासाठी *"Apply with care and caution"* अशी सूचना देऊन ठेवणे आवश्यक आहे.

अधिष्ठानाभावी शिक्षण अनर्थावह

मानवी ज्ञानाच्या वाढीबरोबरच अभ्यासाच्या कक्षा व विषय यात विविध दिशेने विस्तार झाला असला तरी संपूर्ण शिक्षणपद्धतीला आज

कोणतेही अधिष्ठान असलेले आढळत नाही. अमेरिकन विद्यापीठावर अत्यंत कडक टीका करून श्री. अब्राहम फ्लेक्झनर[१०] म्हणतो की, *" No sound or consistent philosophy, thesis or principle lie beneath the American University today."*

हीच परिस्थिती कमीजास्त प्रमाणात भारतीय शिक्षणक्षेत्रातही सर्वत्र दिसून येते. जीवनधारणेशी सुसंगत असे कोणतेही, तत्वज्ञान शिक्षणाच्या मुळाशी नसल्याने कविवर्य रविन्द्रनाथांनी वर्णन केल्याप्रमाणे "ज्ञान कोंबून भरलेल्या" पोपटाच्या कथेसारखी पंडितांची स्थिती झाल्यास आश्चर्य नाही. विद्वत्तेसोबत जीवननिष्ठा व आचरणाचे जे अंग स्वाभाविकपणे उत्पन्न व्हायला हवे होते, ते त्यामुळे झाले नाही. एका अमेरिकन नेत्याने[११] तर या संदर्भात स्वच्छच मत दिले की, *" . . . . after three centuries of higher education, the scholars of the world had to confess that they had made no real impact on human character and conduct. "*

गेल्या तीन शतकांतीत उच्च शिक्षण मानवी शील व सदाचरण यांच्या बाबतील कोणताही अपेक्षित ठसा उमटवू शकले नाही, हे अतिशयोक्तिपूर्ण विधान सर्वांना मान्य होण्यासारखे नसले, तरी अनेक विचारवंताच्या मनांत असलेले शल्य, त्यात व्यक्त झाले आहे आणि हे अनेक वर्षांपासून, अनेकांच्या अंतःकरणांतील, शल्य, दूर व्हावे यासाठीच तर आध्यात्मिक शिक्षणाची ही योजना ! इतर शेकडो विषय शिकविले जात असूनही, आवश्यक असलेली ! इतर विषयापेक्षा अनेक बाबतील मूलतः वेगळी असल्यामुळे वेगळ्या पद्धतीनेच राबविल्या जाण्याची अपेक्षा असणारी !

शिक्षणातील यांत्रिकता

आजच्या उच्च शिक्षणात तर एवढी यांत्रिकता आली आहे की, त्याचा परिणाम म्हणून, सर्वत्र घडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दंगलीतसुद्धा, कंटाळवाणा तोच तोपणा जाणवू लागला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष श्री. निक्सन यांच्या प्रशस्तीस पात्र ठरलेल्या एका लेखात सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ टॉन्सर[१२] म्हणतो,

"Higher Education has become in many ways a single mechainism, its professors and students interchangeable parts. Under these circumstances, even student riots are monotonously alike."

शिक्षणात आलेल्या या यांत्रिकतेमुळे भीती वाटते ती अशी की, इतर विषयांप्रमाणेच नैतिक व आध्यात्मिक शिक्षण हा विषय देखील यांत्रिक पद्धतीने कसाबसा शिकवून, शिक्षक मोकळा होईल की काय ? तसे दुर्दैवाने झाले तर या योजनेपासून केलेल्या साऱ्या आशा अपेक्षांची राखरांगोळी झालीच म्हणून समजावे. इतर विषयांच्या यादीत मग ह्या एका जास्तीच्या विषयाची भर पडेल, एवढेच ! कोणत्याही अपेक्षित सुपरिणामांची फलनिष्पत्ती होण्याचा, मग संभवच कुठला ?

केवळ काही अध्यात्म ग्रंथांचा अभ्यास वा माहिती एवढ्यापुरते या शिक्षणाचे ध्येय सीमित राहू नये, म्हणून या शिक्षणाची कार्यवाही करीत असतांना, मार्गदर्शन करू शकतील अशी तत्वे वा बाबी, येथे नमूद करणे इष्ठ ठरेल. त्यांचे स्पष्टीकरण क्रमशः खालीलप्रमाणे देत आहोत.

(१) प्रचलित जुन्या पद्धतीमध्ये कालानुरूप बदल

कालानुरूप नव्या तंत्राचा अवलंब

कांही शिक्षणसंस्थातून, विशेषतः ख्रिश्चन मिशनतर्फे संचालित होणाऱ्या शाळाकॉलेजातून, (कारण इतर संस्थांत मुळी या बाबतीत काहीच हालचाल नाही.) आज जे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण दिले जाते, त्या शिक्षण पद्धतीचा पुनश्च फेरविचार केला पाहिजे. प्रामुख्याने धार्मिक शिक्षण म्हणून जे आज अनेक ठिकाणी विद्यार्थ्याला दिले जाते, ते २५–५० वर्षापूर्वी जसे दिले जात असे, तसेच आजही दिले जात आहे. त्यामुळे ते कालबाह्य झाले असून, बव्हंशी निरूपयोगी ठरले आहे. त्यातील चैतन्य नाहीसे होऊन, कोणत्याही प्रेरक अशा ध्येयांची वा निष्ठांची निर्मिती, अशा शिक्षणातून होण्याचा मुळीही संभव नाही.

या शिक्षण–पद्धतीतला पहिला दोष असा की कालानुरूप उपलब्ध झालेली शिक्षणाची नवी तंत्रे (*New techniques of Teaching*

Science) पद्धती व साधने, यांचा उपयोग केला जात नाही. त्यामुळे शिक्षण पुरेसे प्रभावी ठरत नाही.

" Research in this field has demonstrated fully that most traditional approaches to character education will not suffice."

शील – संवर्धनाचा, जुना पारंपारिक दृष्टिकोन ठेवून शिक्षण देणे, आता पुरेसे नसल्याचे संशोधनानेही सिद्ध झालेले आहे.[१३]

तर्कनिष्ठ बुद्धिवादाची जोड

प्रचलित शिक्षण पद्धतीतला दुसरा ठळक दोष असा की नैतिक व आध्यात्मिक शिक्षण, अंधश्रद्धेवर आधारलेले आढळते ! आजच्या विज्ञानयुगांत या शिक्षणास, तर्कनिष्ठ अशा बुद्धिवादाची जोड देणे अपरिहार्य आहे. एखाद्या धर्म संस्थापकाने, अमुक एक आध्यात्मिक तत्व सांगितले आहे, एवढे सांगून सध्याच्या तरूण पिढीचा त्यावर विश्वास बसेल, असे वाटत नाही. त्यासाठी ते तत्व शास्त्रीयदृष्ट्या कसे सत्य आहे, हे विद्यार्थ्याला सांगायला हवे. विज्ञानाच्या कसोटीवर घासून, त्याचा खरेपणा मनावर बिंबला, तर त्याची डोळस निष्ठा, त्या अध्यात्म-तत्वावर बसेल व त्याचा आचरणावरील अपेक्षित सुपरिणाम, आपल्या प्रत्ययाला येईल.

वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून जर नैतिक व आध्यात्मिक शिक्षण दिले गेले नाही, तर एक प्रकारचा बौद्धिक व भावनात्मक संघर्ष, विद्यार्थ्यांच्या मनात उत्पन्न होतो व विद्यार्थ्यांच्या प्रगल्भ व पक्व मानसिक अवस्थेत, तो, भावनेपेक्षा बौद्धिक विवेक श्रेष्ठ मानतो नि ते स्वाभाविकच आहे ! परंतु त्यामुळे, प्रामुख्याने भावना व श्रद्धा, यावर आधारलेल्या पूर्ण सत्य अशा नीती व अध्यात्म तत्त्वांची हकालपट्टी होवून, विद्यार्थी, अर्धसत्य अशा वैज्ञानिक कल्पनांचा स्वीकार करतो. असे आज सर्वत्र होत असलेले दिसून येते.

उदाहरणाने हे अधिक स्पष्ट करावयाचे झाले तर, गीतोक्त "पुनर्जन्माच्या" सिद्धान्ताचे देता येईल. "बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जून, जन्म कर्मच मे दिव्य" इ. अनेक ठिकाणी भगवान

श्रीकृष्णांनी या सिद्धांताचे मंडन केले आहे. परंतु आज केवळ श्री गीतेचा आधार देऊन, या सिद्धांतावर विद्यार्थी श्रद्धा ठेवायला तयार नाही. तेव्हा धर्मग्रंथाच्या श्रेष्ठ पुराव्याशिवाय, अतिन्द्रिय मानसशास्त्राप्रमाणे *(parapsychology)* हा सिद्धान्त अनेक पुराव्यांच्या शास्त्रीय संशोधनाने कसा सत्य ठरतो, हे देखील समजावून सांगितले पाहिजे, म्हणजे हा सिद्धान्त विद्यार्थ्यांच्या अंत:करणावर, अधिक ठसेल व पुनर्जन्माच्या तत्वामुळे, वागणुकीवर, इष्ट असा पूर्वी नमूद केलेला परिणाम पहावयास सापडेल.

सारांश, आजवर नीती व अध्यात्म यांचा पाया खिळखिळा करण्यासाठी विज्ञानाचा उपयोग केला गेला, यापुढे तो पाया पक्का करण्यासाठी विज्ञानाचा उपयोग केला पाहिजे !

(२) क्रियात्मक अशा विधायक बाजूला प्राधान्य

काय करावे त्यावर भर

किशोरावस्थेत असलेल्या ६ वी ७ वीतल्या मुलांशी सहज एक दिवस बोलत होतो. मी त्यांना विचारले, "कोणत्या गोष्टी करणे वाईट आहे ?" वर्गात शिकविले असल्याने, पोपटपंचीप्रमाणे ते सांगू लागले, "चोरी करणे वाईट, खोटे बोलणे वाईट, लहानांना मारणे वाईट आहे इ." मग मी त्यांना दुसरा प्रश्न केला. "काय करणे चांगले आहे ?" त्यावरोबर ते गोंधळले. त्यांना नेमके काय सांगावे सुचेना. अखेर एकजण थोडा विचार करून उत्तरला, "चोरी न करणे व खोटे न बोलणे चांगले आहे."

अर्थातच मला हे उत्तर पसंत पडले नाही मी त्यांना म्हटले, "काय न करणे चांगले हे मी तुम्हाला कुठे विचारले ? काय करणे चांगले हे सांगा." आश्चर्य असे की ते एकही गोष्ट चांगली म्हणून सुचवू शकले नाहीत.

तेव्हा नकारात्मक नीतितत्वे सांगून शील घडविण्यास फारसे सहाय्य होत नाही; तर चांगल्या क्रिया कोणत्या हे सांगून विद्यार्थ्याला विधायक दृष्टिकोन मिळायला हवा, म्हणजे करावयास नको असलेल्या गोष्टी आपोआपच होईनाशा होतील.

चांगल्या वाईटाचा निर्णय अवघड

" The key to strong character is to define to youth what it is right to do and to challenge them to build moral and spiritual strength with a positive approach."

अमेरिकन तज्ञ श्री. लिगन[१४] यांचे हे विधान खचित मार्गदर्शक ठरू शकेल. अर्थात चांगले कोणते हे ठरविणे देखील वाटते तितके नेहमीच सोपे नसते. प्रत्येकाला काही अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते, ज्यामध्ये चांगल्या वाईटाचा फरक करणे अवघड होवून बसते. तेव्हा या शिक्षणात विद्यार्थ्याला सामान्यत: चांगल्या क्रिया कोणत्या हे जाणीव-पूर्वक शिकवायला हवे !

सामाजिक, आर्थिक इ. अनेक क्षेत्रात मानव जेव्हा प्रगती करू लागतो, तेव्हा गुंतागुंत अधिकाधिक वाढत जाते व चांगल्या वाईटाचा निर्णय करणे, जास्तच कठीण होते. एका फ्रेंच तत्वज्ञाने[१५] म्हटल्याप्रमाणे,

".....the more societies become complex the more difficult for morality to operate as a purely automatic mechanism. Circumstances are never the same and as a result the rules of morality require intelligence in their application."

निर्णयाच्या अंमलबजावणीस बुद्धी व कौशल्य

नैतिकता अंमलात आणणे अवघड तर असतेच, पण दरवेळी परिस्थितीत भिन्नता उत्पन्न होत असल्याने नैतिकतेचे नियम लागू करण्या-साठी एका विशिष्ट बुद्धिमत्तेची देखील आवश्यकता असते. तेव्हा चांगल्या क्रिया कोणत्या ते समजावून घेवून त्या करण्याची इच्छा असणे हा एक भाग व त्या इच्छेनुरूप वर्तन करण्यासाठी लागणारी बुद्धी व कौशल्य असणे हा दुसरा भाग. या दोहोंची शिकवण या शिक्षणात विद्यार्थ्यास द्यावयास हवी. एका उदाहरणाने, हे म्हणणे अधिक स्पष्ट करता येईल. एक वयस्क गृहस्थ आपल्या जीवनाचा आढावा घेतांना सांगू लागले की, "उभ्या आयुष्यात कुणी दुखावले जाईल, कुणाला वाईट वाटेल, असे बोलण्याचे व वागण्याचे मी टाळले आहे ! मग मुद्दाम तसा प्रयत्न करणे तर दूरच ! पण अनेक जण माझ्या वर्तनाने

दुखविले गेल्याचे माझ्या लक्षात आले आहे. कित्येकांना माझ्या वागण्या-बोलण्याचे वाईट वाटले आहे. माझी इच्छा वा प्रयत्न नसतांना असे का व्हावे"? व्यक्तिगत व सामाजिक व्यवहार कसा करावा याबाबत त्यांची बुद्धी व कौशल्य उणे पडले असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. इच्छा नसतांना लोक दुखावले गेले, याचा अर्थ मनात आहे, नेमके तेच वर्तना-द्वारे व्यक्त होईल, असे कर्म–कौशल्य साधले नाही, हाच होय! या बाबतीत पुन्हा श्री. लिगन[१६] यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, असे म्हणता येईल की,

" It takes skill as well as will to do right. So character education must be concerned with teaching young people how to do right thing, even after they know what it is. "

सारांश, नकारात्मक बाबी ऐवजी, विधायक असे सत्कर्म कोणते हे प्रथम समाजाऊन सांगून, ते प्रत्यक्ष जीवनात कसे आचरावे, या दोन्ही गोष्टींचे ज्ञान या शिक्षणात विद्यार्थ्याला मिळाले पाहिजे.

(३) विवेकाने विचारांचे उन्नयन

नुकतेच म्हटल्याप्रमाणे सत्कर्म करण्याची इच्छा व कुशलता, जर या शिक्षणाने विद्यार्थ्याला प्राप्त झाली, तर नैतिक व आध्यात्मिक शिक्षण काही वर्षे घेतलेला विद्यार्थी व इतर विद्यार्थी या दोहोत डोळयात भरण्याजोगा फरक जाणवला पाहिजे. हे शिक्षण यशस्वी झाल्याचे हे एक गमकच म्हणावे लागेल.

हे शिक्षण घेणारा विद्यार्थी इतरांपेक्षा वेगळेपणाने तेव्हाच उमटून पडू शकेल, जेव्हा विकारांचे विकसन विवेकात व दुष्ट भावनांचे परिवर्तन सद्भावात कसे करावे याचे व्यावहारिक शिक्षण या योजनेद्वारे विद्यार्थ्याला दिले जाईल. हे शिक्षण देण्यासाठी एक प्रक्रिया सुचविता येण्याजोगी आहे. राग, द्वेष, भीती इ. विकार ज्या परिस्थितीत वा घटनेमुळे उत्पन्न होतात त्याचे वर्णन करून सांगायचे व प्रत्येक प्रसंगी हे विकार घालवून सत्प्रवृत्तीला कसे आवाहन करता येईल हे समजावून द्यायचे.

विनाकारण मनस्ताप

उदाहरणार्थं काही पाहुणे 'क्ष' च्या गांवी प्रथमच येणार असल्याचे पत्र येते. 'क्ष' मुद्दाम सुटी काढून भर उन्हात दुपारी १२ च्या सुमारास गाडीच्या वेळी स्टेशनवर त्यांना उतरवून घेण्यास जातो. गाडी १ तास उशीरा येते. परंतु इतका वेळ थांबूनही अखेर पाहुणे येत नाहीतच. 'क्ष' चे जेवण तर त्यामुळे लांबतेच. शिवाय पाहुण्यासाठी केलेला स्वयंपाक वाया जातो. 'क्ष' चा संताप अनावर होतो. चडफडतच तो घरी येतो. कितीतरी वेळ तो रागातच असतो. विकाराधीन होतो ! सायंकाळी पाहुण्यापैकी एकजण आजारी पडल्याने येऊ शकत नसल्याची तार येते. तार बरीच आधी केली असते पण पोस्टाच्या दिरंगाईमुळे पोहोचत नाही.

ही घटना सांगून अशा परिस्थितीत 'क्ष' ने रागावणे कसे अनुचित होते व त्या रागावण्याने काहीच लाभ न होता केवळ स्वत:ची मन:स्थिती बिघडवून त्याने कसा उगाचच त्रागा करून घेतला, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवता येईल. "आपण पाहुण्यांच्या जागी असतो नि इतर कुणी असाच संताप करून घेतला तर आपल्याला काय वाटेल ?" असाही विचार करायला शिकवावा. अशाच आणखी कित्येक घटना सांगून मन शांत व स्थिर ठेवण्यास शिकविता येईल !

" As a result of many years of research, I am convinced that we can channel virtually all of our emotional energy into the positive emotions."

वरील विधानाने[१७] हे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांच्या भावशक्तींना योग्य वळण दिले तर त्याचे रूपांतर, सद्भाव व सत्प्रवृत्ती यामध्ये ग्वचित होवू शकते. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाने हे जर साधले तर हे शिक्षण प्राप्त झालेला विद्यार्थी इतरांपेक्षा, जीवनातील एखादी नैतिक समस्या व कठीण परिस्थिती, अधिक यशस्वीपणे हाताळेल, हे नि:संशय! या शिक्षणामुळे अशा प्रकारे समतोल साधलेले विद्यार्थी, ज्या शाळेत मोठ्या संख्येत आहेत त्या शाळेत, बेशिस्तीचा प्रश्नही फारसा उद्भवण्याचा संभव नाही. कारण एकाने[१८] स्वानुभवपूर्वक उद्गार काढले आहेत की,

" Problems of discipline in the school are problems of final – adjustment."

(४) शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासाची प्रक्रिया[१९]

अंतर्बाह्य सर्व पाकळ्या उमलण्यास वाव

गुणवत्तेचा विकास म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, त्यांच्या भावात, कर्मस्फूर्तीत सृजनता आणणे असा आहे. विज्ञानाचे, निरनिराळ्या छंदाचे, कलांचे वा व्यवसायांचे शिक्षण, यामुळे कदाचित सर्वतोपरी सुसज्ज मानव तयार होईल, परंतु त्यामुळे त्याच्या व्यक्तित्वाच्या सहस्त्रदलातील बाहेरच्याच पाकळ्या तेवढ्या प्रफुल्लित होतील. एकापेक्षा एक आंत असलेली गाभ्यातील दले मात्र आंत अंधारात कोंडलेली, मिटलेली सांपडतील ! संपूर्ण सहस्त्रदल उमलण्यास अंतर्बाह्य सर्व पाकळ्या, पूर्णपणे उमलण्यास परिपूर्ण वाव व पुरेशी संधी मिळाली पाहिजे. गुणवत्ता विकासाची प्रक्रिया म्हणजे आंतून सहस्त्रदल उमलविण्याची प्रक्रिया आहे

गुरू तटस्थ तर शिष्य क्रियाशील

श्रीमद्भागवतात यज्ञसंस्थेचा दृष्टांत देवून, ज्ञान संक्रमित करण्याची प्रक्रिया कशी असावी, याचा मोठा मार्मिक उल्लेख आहे. यज्ञसंस्थेत अग्नि चेतविण्याकरिता अरण्यांची गरज असते. खालच्या अरणीवर वरच्या अरणीने घर्षण केले जाते व त्या घर्षण प्रक्रियेतूनच यज्ञाग्नी चेतविला जातो. ज्ञानाग्नीचे प्रज्वलनही तसेच व्हावे ! शिक्षण ही आद्य अरणी तर शिष्य हा वरची अरणी. वरच्या अरणीने आद्य अरणीवर घर्षण व्हावे ! शिष्य हा क्रियाशील *(Active)* असावा तर शिक्षकाची भूमिका तटस्थतेची *(Passive)* ! शिष्याने जिज्ञासेने, नम्रतेने प्रश्न विचारून गुरूला प्रसन्न करून घ्यावे, म्हणजे ज्ञानी, तत्वदर्शी गुरू, ज्ञानोपदेश करतील, असे भगवंतानी[२०] खालील श्लोकात म्हटले आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ।।

अर्थ : ते आत्मज्ञान आचार्यांजवळ जावून नमस्काराने, त्यांना प्रश्न करून व त्यांची सेवा–शुश्रूषा करून, संपादन कर ! तत्ववेत्ते ज्ञानी ते

ज्ञान तुला सांगतील ! जिज्ञासा, विनय, संयम, आज्ञापालन याद्वारे ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया या श्लोकात सांगितली आहे ! "काय आजचा शिक्षकसुद्धा अशी भावना ठेवण्यास योग्य आहे ?" अशा काहींच्या मनातील प्रश्नाला श्री. गोळवलकर[११] (गुरूजी) यांनी फार समर्पकपणे उत्तर देतांना म्हटले आहे,

"विद्यार्थीयोको इस प्रकारके विकृत दृष्टिकोण का शिकार नही बनना चाहिए। (शिक्षककी भक्ती) हमारे ही हितमे, हमारे ही परिष्कारके लिए है। हम मन्दिर मे हनुमान जी की मूर्ति का पूजन करते है। कुछ समय पश्चात लगातार सिन्दूर लगाते रहनेसे वह मूर्ति सिन्दूर के मोटे पर्त से ढक जाती है। और उसका रूप इतना बदल जाता है कि किसी भी प्रकार पहिचाना नही जा सकता। किन्तु फिर भी उसी भक्तिभावसे उसका पूजन हनुमान के रूप मे होता रहता है।"

विद्यार्थ्याच्या पुढाकाराची गरज

परंतु शिक्षकाविषयी हा भाव आज कुठे आढळत नाही. गुणवत्ता विकासाची प्रक्रिया उलट दिशेने सुरू आहे. शिक्षक हा ज्ञानप्रदानासाठी पुढाकार घेतो आहे तर विद्यार्थी शिक्षकाला ब्याद समजून टाळण्याच्या प्रयत्नात दिसत आहे. अशा आळशी शिष्याविषयी श्री तुकाराम महाराज म्हणतात,

"लोहो परिसासी रूसले । सोनेपणासि मुकले ॥ ॥ १ ॥
येथे कोणाचे काय गेले । ज्याचे त्याने अनहित केले ॥२॥
गंगा आली आळशावरी । आळशी देखोनि पळे दुरी ॥३॥
तुका म्हणे होउनी दास । गुरुसी न भजती शिष्य" ॥४॥

मानवी जीवनाच्या बाह्यांगाचा विचार करणाऱ्या, लौकिक शास्त्रांच्या बाबतीत, याप्रमाणे घडले तर एकवेळ ते क्षम्य मानता येईल. पण अंतरंग जीवन उजळण्याचा प्रयत्न करणाऱ्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाबाबत मात्र, असे मुळीही घडता कामा नये. विद्यार्थी आवडीने, जिज्ञासेने व स्वेच्छेने पुढे यावा, एवढी या शिक्षणाची कळकळ त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे.

(५) वातावरणात नैतिक व अध्यात्म शक्तीचा प्रभाव जाणविणे

विद्यालय देवालयासारखेच

या योजनेसाठी पूर्वी सुचविलेला अभ्यासक्रम व त्याला पूरक असे सहाय्यक कार्यक्रम यांच्याद्वारे, शिक्षण संस्थेतील संपूर्ण वातावरण एवढे भारले गेले पाहिजे की, विद्यार्थ्याने शाळा वा कॉलेजात प्रवेश करताच, अमूर्त अदृश्य अशा, नैतिक व अध्यात्म शक्तींचा प्रभाव त्याला जाणवावा. स्वच्छता, सुव्यवस्था व शांतता यांची अत्यंत काळजी जिथे घेतली जाते, अशा पवित्र देवस्थानात वा प्राचीन तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी असा अध्यात्म शक्तींचा प्रभाव जाणवतो. आपण एका वेगळ्या वातावरणात प्रवेश केला आहे, हे आपण रामकृष्ण मिशनच्या एखाद्या प्रार्थना मंदिरात पाऊल ठेवताक्षणीच, मनुष्याच्या मनोमन प्रत्ययाला येते. कुठल्याही स्थानातील व्यक्तींच्या विचारवलयांचा सामूहिक परिणाम, म्हणजे तेथील वातावरण ! आचारविहीन शब्दांच्या बुडबुड्यापेक्षा, उत्कट अशा विचारांचे सामर्थ्य फार प्रचंड असते. म. गांधी[२२] याविषयी लिहितात.

" I believe in thought power, more than in the power of the word wheather written or spoken. And if the move-- ment that I seek to represent has vitality in it and has divine blessing upon it, it would permeate the whole world without any physical presence in its different parts. "

विद्यार्थ्यांच्या दैचारिक व मानसिक स्थितीमध्ये या शिक्षणाने जर अनुकूल परिणाम घडविता आला, तर हळूहळू शाळा व महाविद्यालयाचे रूपांतर, पवित्र अशा ज्ञानमंदिरात झाले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. श्री. विल्किन्स[२३] यांनी विद्यालयाचा परिसर, एखाद्या देवालयासारखा शांत व गांभीर्ययुक्त असला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

पावित्र्य व गांभीर्य यांचा उगम

देवालयात काय किंवा शिक्षणसंस्थेत काय, पावित्र्याचा व गांभी-र्याचा भाव केव्हा उत्पन्न होतो ? संपूर्ण विश्वाला नियंत्रित करणारी सर्वशक्तिमान व सर्वश्रेष्ठ अशी शक्ती विद्यमान असून, तिच्या सान्निध्यात

आपण वावरतो आहोत, असे जेव्हा व्यक्तीला जाणवते, तेव्हा नकळत अत्युच्च अध्यात्माचा वा दैवी शक्तीचा स्पर्श तिच्या अंत:करणाला होतो. मंदीर, मशीद, वा चर्च या पूजास्थानामध्ये प्रत्यक्ष देवतेची वा त्याच्या प्रतीकाची प्रतीष्ठापना केली असल्याने, ईश्वरी अस्तित्वाची भावना चटकन उद्दीपित होणे, जसे सुलभ असते, तसे ते शिक्षणसंस्थात होणे अवघड, हे तर खरेच ! पण अत्यंत डोळस अशा श्रद्धा व निष्ठा यांची निर्मिती केल्यास, काही देवस्थानातही पहावयास न मिळणारा वातावरणातील पावित्र्याचा सुगंध शिक्षण संस्थेत, विशेषत: उच्च शिक्षणक्षेत्रात, दरवळलेला अनुभवावयास मिळू शकेल. या प्रकरणात सुचविलेले पूरक कार्यक्रम, विशेषत: सामुदायिक प्रार्थना, वर्ग प्रारंभ होण्यापूर्वी २-३ मिनिटांचे ध्यान, आठवडयातून एक दिवस संपूर्ण मौन, सर्व विद्यार्थ्यांचा एका रंगाचा एक विशिष्ट पोषाख, मासिक वा पाक्षिक भजन, राष्ट्रगीतांचे सामूहिक गान, या व अशाच इतर कार्यक्रमांचे स्वेच्छेने व योग्य त्या गांभीर्याने व निष्ठेने अवलंबन केले, तर कोणत्याही धर्माच्या पूजास्थानांचे पावित्र्य, शिक्षण संस्थांना आल्याशिवाय राहणार नाही.

आत्मसुखाची ओळख सत्कर्माला सहाय्यक

वातावरणातील पावित्र्यामुळे नैतिक व अध्यात्म शक्तीचा प्रभाव जर विद्यालयात विद्यार्थी अनुभवू लागला, तर ही योजना यशस्वी होत चालल्याचे ते एक प्रमुख लक्षणच म्हणावे लागेल. वर्गात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमापेक्षाही अधिक कायम असा परिणामकारक ठसा केवळ या वातावरणामुळे, विद्यार्थ्यांच्या मनावर उमटल्याशिवाय राहणार नाही. सद्विचारांचे प्राबल्य वाढेल, विवेकपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता वृद्धिगत होईल, सदाचरणाकडे मन ओढ घेईल, अंत:करण सत्कृत्य करण्याची संधी शोधू लागेल ! ज्ञानाचा, बुद्धीचा उपयोग समाजासाठी, देशासाठी होण्यात, कृतकृत्यता वाटेल; "मी–माझे" ऐवजी "तू–तुझे" ही भावना उचंबळू लागेल ! अहंकार कमी होऊन, समर्पणाची, त्यागाची ज्योत हृदयात प्रज्वलित होईल; राष्ट्रहितासाठी ईश्वरकार्यासाठी, सर्वस्वार्पण करण्याची सिद्धता होईल! देश व देव यांच्या सेवेत, उभे आयुष्य वेचलेल्या महापुरूषांचे अनुसरण करण्याची,

स्वाभाविक प्रेरणा मिळेल ! आत्मसुख वा ईश्वरी साक्षात्कार, यामुळे प्राप्त होणाऱ्या अखंड अपरिच्छिन्न व अविनाशी, अशा आनंदाची अनुभूती मिळविणे, या सर्वोच्च ध्येय प्राप्तिसाठी, अविरत प्रयत्नशील राहणे, यात जीवनाची धन्यता आहे, हा भाव अखेर प्रस्फुटित होईल. मानवी आयुष्यातील अंतिम साध्याची ओळख पटून, ते प्राप्त करण्यासाठी, वाटचाल करू लागलेले, हाताच्या बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी जरी या शिक्षणामुळे संस्थेत तयार झाले, तरी या थोड्या विद्यार्थ्यांच्या सद्भावांचा व डोळस अशा प्रत्यक्ष सदाचरणाचा परिणाम, वातावरणावर व वातावरणाचा परिणाम या विद्यार्थ्यांवर, अशी परस्परपोषक अशी प्रक्रिया, एकूण विद्यालयीन जीवनात, आमूलाग्र बदल घडवून आणू शकेल! परिणामत: सामान्य विद्यार्थ्यांचा सत्कर्माकडे कल व्हावयास, योग्य अशी परिस्थिती निर्माण होऊ शकेल. फ्रान्सिस बेकरचे[१४] खालील विधान लक्षात घेतले म्हणजे, या परिस्थितीचे महत्व कुणालाही पटावे.

" The fundamental reason why children do not act right is because they do not have the conditions for right actions."

तेव्हा विद्यार्थी जीवनाला योग्य दिशा मिळण्यास, पोषक अशा वातावरणनिर्मितीसाठी, शिक्षणसंस्थामधून जाणीवपूर्वक कसोशीने प्रयत्न व्हायला हवा !

(६) आध्यात्मिक अनुभूतीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

अनुभूतीशिवाय आध्यात्मिक शिक्षण निरर्थक !

वर सुचविल्याप्रमाणे नैतिक व अध्यात्म शक्तीचा स्पर्श जाणवेल असे प्रभावी वातावरण, जर शिक्षणसंस्थांमधे उत्पन्न झाले, तर भारताचे सर्वोत्तम वैशिष्ट म्हणून जगप्रसिद्ध असलेला 'आध्यात्मिक अनुभूतीच्या अलौकिक आनंदाचा' सोपान, विद्यार्थी हळूहळू चढू लागतील ! अखेर धर्म वा अध्यात्म यास अनुभूतीशिवाय कोणताही अर्थ नाही, हे सर्व धर्मातील सत्पुरूष एकमुखाने प्रतिपादतात. त्यामुळे कोणतेही धर्म वा अध्यात्म शिक्षण, हे प्रत्यक्ष साधना करून अनुभवल्याशिवाय, निरर्थकच

म्हणावे लागेल ! योगी अरविन्द [१५] म्हणतात,

" No religious teaching is of any value unless it is lived and the use of various kinds of Sadhana, spiritual self-training and exercise is the only effective preparation for religious living."

आध्यात्मिक – साधनेचे मार्गदर्शन

अर्थात असे हे प्रत्यक्ष आध्यात्मिक साधनेचे शिक्षण सर्व संस्थांतील सर्व विद्यार्थ्यांना देणे मुळीही अभिप्रेत नाही. परंतु या विषयाची आवड असलेल्या, जिज्ञासा असलेल्या, बुद्धिमान विद्यार्थ्यांना यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन करण्याची व्यवस्था असण्यास काय हरकत आहे? विशेषतः उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यापीठातील कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, आध्यात्मिक प्रगतीची सोय नको का? मिचिगान विद्यापीठाबाबत आपले मत व्यक्त करतांना श्री. अलेक्झांडर रुथवेन[१६] म्हणतो,

" The University should recognize and honour all creads and religions and place no obstacles in the way of the spiritual growth of the students."

एवढेच नव्हे तर अध्यात्माच्या अनुभवाच्या अभावी, महाविद्यालयाच्या अस्तित्वाचा पायाच उखडला जातो, असे मननीय मत श्री. रिस्टन[१७] यांनी खालीलप्रमाणे व्यक्त केले आहे.

" To fail to make religious experience part o-f the students life, is to distroy utterly, the foundation, upon which, alone, the college may justify its existence. To impoverish that experience by sectarian or other irrel-evancies, is tragic, but to neglect it, is fatal."

शैक्षणिक विकासासाठी अध्यात्म साधना

आध्यात्मिक अनुभूतीविषयी मार्गदर्शन करण्याचे कार्य केवळ धर्माचार्य, पारमार्थिक गुरू वा धार्मिक संस्थाचे आहे, असे बहुतेकांना वाटत असते. विद्यापीठाशी धर्म वा अध्यात्मजीवनाचा काय संबंध ? असा प्रश्न त्यामुळे अनेकांकडून विचारला जाणे स्वाभाविक आहे. परंतु

एका विशिष्ट अवस्थेपर्यन्त, आध्यात्मिक प्रगती, ही शैक्षणिक विकासा-साठी पायाभूत ठरत असते व तिची जबाबदारी शिक्षणसंस्थांनी घेणे, अगत्याचे आहे! एका अभ्यासपूर्ण पाहणीचा निष्कर्ष नमूद करतांना एक अमेरिकन लेखक श्री. लिंकन हेल [१८] लहतो,

" The very fact that religion. . . . is deeply entangled with life purposes, places on the colleges a heavy responsibility. This does not transform them into churches. Nor can the colleges lightly pass on to churches essential educational job that is involved. "

अमेरिकेसारख्या, भौतिकवादी समजल्या जाणाऱ्या, देशात देखील शाळेपासून कॉलेजपर्यन्तच्या विद्यार्थ्यांच्या स्थित्यंतराच्या केलेल्या पाहणीवरून, विद्यार्थ्यांच्या सृजनशील व यशस्वी अशा धर्मजीवनाच्या विकासाला, अद्याप सुपीक क्षेत्र असल्याचा भरपूर पुरावा असल्याचे दिसून आले आहे. पाहणीच्या मागच्याच अहवालात पुढे म्हटले आहे, [१९]

Our findings present ample evidence, that there is a fertile field within the lives of the students, for helping them develop creative and triumphant religious living. "

पाहणी करून काढलेल्या या निष्कर्षाचे ज्ञान भारतीयांना फार पूर्वीपासून होते ! लहानपणी विद्यार्थीदशेत, अध्यात्म साधना जितकी सुलभ असते, तितकीच ती पुढे अवघड होऊन बसते ! कोवळा बांबू सहज वाकविता येतो, परंतु पक्का बांबू वाकवू गेल्यास, मोडून जातो; लहानपणी बोलावयास शिकविले तर पोपट चटकन बोलू लागतो. कंठ फुटल्यावर मग तो बोलावयास शिकत नाही; त्याचप्रमाणे तरूण युवकांचे मन ईश्वराकडे सहज वळविता येते, पुढे म्हातारपणी मन ईश्वराकडे लागता लागत नाही, हे भारतात आजवर सर्वजण सांगत आलेत.

बालपणात साधना सुलभ

भगवान रामकृष्ण परमहंस,[२०] "तरूण मुलावर माझे इतके प्रेम का असते, माहित आहे ? " असा प्रश्न करून स्वत:च उत्तर देतांना म्हणतात, "ह्या वयात त्यांचे मन अगदी सोळा आणे स्वाधीन असते; पुढे मग क्रमश:

त्यांचे भाग पडत जातात. लग्न झाल्यावर ते आठ आणे स्त्रीच्या वाटयाला जाते; मुले झाली की चार आणे त्यांच्याकडे जाते; अन् बाकी चार आणे आईवाप, मानसन्मान, वेषभूषा, वगैरेत विभागले जाते ! करिता तारूण्यातच जे ईश्वरलाभाचा प्रयत्न करतात, ते सहजासहजी त्याचा लाभ करून घेऊ शकतात. म्हाताऱ्या माणसांना महाप्रयास पडतात. सूर्योदयापूर्वी दही घुसळले असता जसे चांगले लोणी निघते, तसे नंतर निघत नाही. त्याचप्रमाणे बालपणापासून जे ईश्वरानुरागी असतात व साधन-भजन करतात, त्यांनाच ईश्वराचा लाभ होतो !

आध्यात्माची अंशतः तरी अनुभूती युवकाला, विशेषतः भारतीय तरूणाला, विद्यार्थीदशेतच झाली पाहिजे, असा आग्रह का ? कारण या वयात मुलांची अंतःकरणे शुद्ध असतात, त्यांच्या हृदयात विषयवासनेचा शिरकाव मुळीच झालेला नसतो. अशावेळी तरूणांना अध्यात्म-मार्गाला लावण्याचा प्रयत्न अधिक उचित होय. प्रपंचात पडल्यावर एकदा हृदयांत विषयबुद्धी घुसली, की मग त्याला परमार्थमार्गावर आणणे कठीण कर्म!

ज्ञानप्राप्तीसाठी मनाची एकाग्रता !

माणसाचे मन म्हणजे मोहऱ्यांची गाठोळी ! ती फाटून मोहऱ्या जिकडे तिकडे उधळल्यानंतर त्या गोळा करणे फार अवघड ! तद्वतच माणसाचे मन संसारात एकदा इतस्ततः विखुरले गेले की मग त्याला स्थिर करणे भारी कठीण ! तरूणांच्या मनाचा असला विखरा झालेला नसल्याने, ते थोडयानेच स्थिरावते ! परंतु पुढे वय वाढू लागल्यावर, मन संसारातून काढून ईशचरणी स्थिर करतांना जीव नकोसा होऊन जातो.

आणि मनावर संयम ठेऊन, ते एका जागी स्थिर करणे, ही तर ज्ञानप्राप्तीसाठी व अध्यात्मजीवनाच्या प्रारंभासाठी, प्रमुख अट ! मन एकाग्र होणे, हे दोहोसाठी अत्यंत आवश्यक असते. अखंड वाहणारा विचारांचा प्रवाह, हा सर्ववाजूंनी थोपवून, इच्छा असेल त्या ठिकाणी केन्द्रित करता आला, तर बुद्धीची ग्रहणशक्ती वाढून, ज्ञानप्राप्तीची क्षमता अतोनात वाढते. आणि ज्ञानदानाचे कार्य यशस्वीपणे करता येण्यासाठी, ध्यानयोगासारख्या अध्यात्म साधनेची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे, आवश्यक आहे. केवळ शैक्षणिक दृष्टया विचार केला, तरी भार-

तीयांनी प्राचीन काळापासून प्रगतावस्थेत नेलेल्या ज्ञानप्राप्तीसाठी सहा-य्यक होणाऱ्या, अध्यात्म मार्गाचा परिचय, विद्यार्थ्यांना करून द्यावयास नको काय ?

शांति – निकेतनातील उपक्रम

शाश्वत सत्याची वा ईश्वराच्या अस्तित्वाची, प्राथमिक ओळख पटावी, यासाठीही अध्यात्म अनुभूतीला प्रोत्साहन, विद्यालयातच दिले जावयास हवे ! शांति – निकेतनमध्ये गुरूवर्य टागोरांनी सकाळ सायंकाळ सुमारे १५ मिनिटे प्रार्थना व ध्यान, यासाठी देण्याचा पायंडा पाडला, तो याच दृष्टीने ! ते [३१] म्हणतात,

" There are things that we get from outside and take to ourselves as possessions. But with meditation it is just the opposite. It is entering into the very midst of some great truth, so that, in the end we are possessed by it. "

(७) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची पथ्ये

शेकडो धर्म, पंथ व संप्रदाय यांचे माहेर असलेल्या या धर्मभूमीत धर्माभ्यासाच्या प्रक्रियेला फार खबरदारीने व शहाणपणाने उत्तेजन द्यावयास पाहिजे[३२] ! ज्या भूमिकेतून या शिक्षणाकडे सर्व संबंधितांनी बघावे असे वाटते, ती भूमिका स्पष्टपणे समजावून घेणे उपयुक्त ठरेल. म्हणजे विभिन्न विचारसरणीच्या धर्मानुयायांमध्ये गैरसमज वा कलह उत्पन्न होण्याची काहीच्या मनात जी भीती वाटते, ती तर दूर होईलच; उलट परस्पर सामंजस्य व स्नेह यांचीच वाढ होऊ शकेल !

ही भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने, खालील प्रमुख मुद्दे व त्या सोबत येणारी पथ्ये लक्षात घ्यावयास पाहिजेत.

(अ) आध्यात्मिक उत्कर्षासाठी विज्ञानाचा वापर

सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे, की आध्यात्मिक सुखाचा वा आत्मिक आनंदाचा व तदनुषंगिक आंतरिक शांततेचा मार्ग, जगाला दिग्दर्शित करण्याची पात्रता भारताला ज्या अध्यात्मज्ञानामुळे प्राप्त झालेली आहे, त्या ज्ञानाची ओळख भारतीय तरूणांना करून द्यावी, यासाठी

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची कांस प्रामुख्याने आपण धरतो आहोत! विद्यमान वैज्ञानिक युगास "केवळ भौतिक समृद्धीची देणगी" देण्यापेक्षा, भारतवर्ष त्या विज्ञानाच्या अंकित न होता, आपल्या ध्येयास धरून "ऐहिक समृध्दीला, आध्यात्मिक जीवनाला जुंपण्याच्या बाबतीत," खरे मार्गदर्शन करू शकतो. व ते त्याने करावयास पाहिजे. त्याची अद्वितीय परंपरा त्या दृष्टीने विशेष लाभदायक आहे ! श्रॉडिजर या जगप्रसिद्ध विज्ञानवेत्याने आपल्या *What is life ?* ह्या पुस्तकात *" represents quintessence of deepest insight into the happenings of the world "* या शद्धांत भारतीय ऋषीमुनींचा जो गौरव केला आहे तो लक्षात घेण्याजोगा आहे. केनोपनिषदाचा प्रारंभीचा श्लोक आजही तेच आव्हान देत आहे. पाश्चात्यांनी संपादन केलेल्या वैज्ञानिक फलश्रुतीस भारतवर्ष काही नवीन परिमाण *(Dimension)* देऊ शकेल काय[२३] ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा एक नम्र प्रयत्न म्हणून आध्यात्मिक शिक्षणाचा प्रयोग करावा ही या योजनेची पहिली भूमिका ! या भूमिकेतून अध्यात्माचे बीजारोपण भारतीय नवयुवकांच्या अंतःकरणात केले गेले तर विज्ञानाचा जागतिक शांततेसाठी वापर करणारे ते अग्रदूत ठरतील.

[ब] मातृ भावनेचा उत्कर्ष

कोणत्याही देशातील संस्कृतीच्या श्रेष्ठतेचे गमक कोणते ? असा प्रश्न कुणी केला तर त्या देशात राहणाऱ्या समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण पाहून चटकन त्या संस्कृतीची श्रेणी बहुधा ठरविता येईल.

स्त्रीकडे केवळ एक भोग्य वस्तू म्हणून आज बघितले जाते. नाटक, नृत्य, सिनेमा, इ. करमणूकीच्या क्षेत्रात तर स्त्री विषयक उदात्त भावनेच्या विडंबनाची जणू स्पर्धा सुरू आहे आलिशान हॉटेल्समधील कॅबेरा डान्स व चुंबनालिंगनादि असलेले चित्रपट चवीने पाहणारा एक वर्गच हळूहळू समाजात निर्माण होत आहे. वस्तुची जाहिरात मग ती कोणत्याही प्रकारची असो – एखाद्या सुंदर स्त्री देहाचा विमुक्तपणे वापर हा व्हायचाच ! पाश्चात्य देशात तर आसुरी म्हणता येईल अशा प्रकारची नवनवीन साधने उपयोगात आणून[३१] स्त्रियांची विटंबना

सुरू आहे. नुकत्याच व्हिएतनाम व बंगला देशात झालेल्या युद्धाच्या वेळी माताभगिनींची जी ससेहोलपट व क्रूर अवहेलना झाली तिला तर इतिहासात तोड नाही. सुधारणा कळसाला पोचली असली तरी संस्कृती मात्र रसातळाला जात असल्याचेच हे लक्षण नव्हे का ?

या अधःपातापासून रक्षण व्हावयाचे असेल तर 'मातृवत परदारेषु' हा भारतीय संस्कृतीचा दृष्टिकोन या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या मनावर आपण बिंबवला पाहिजे.

"या देवी सर्व भूतेषु मातृरुपेण संस्थिता ।
इति सप्तशतीवाक्यात् सर्वमंबामयं जगत् ।।

अर्थः— जी देवी सर्वभूतांचे ठिकाणी आई रूपाने वास करीत आहे, या सप्तशतीतील वाक्यावरून सर्व जगत मला अंबारूप असल्यामुळे कोणतीही स्त्री अंबारूपच वाटते.

या श्लोकातील[३५] मातृत्वाचा भाव नव्या पिढीच्या अंतःकरणात पाहिजे. त्यांचे सर्व व्यवहार या भावनेने व्हावेत असा प्रयत्न केला पाहिजे. भगवान रामकृष्ण परमहंसाच्या जीवनावरील *'My Master'* या स्वामी विवेकानंदाच्या सुप्रसिद्ध व्याख्यानात व्यक्त झालेला खालील भारतीय आदर्श विद्यार्थ्यांसमोर या शिक्षणात ठेवला पाहिजे.

"We hear in the West about worshipping woman but this usually for youth and brauty . . . I myself have seen this man standing before those women whom society would not touch and falling at their feet bathed in tears saying, "Mother, in one form thou art in the street and in another form thou art the Universe. I salute thee, mother I salute thee."

सारांश, अध्यात्म शिक्षणाने मातृभावनेचा परिपोष वाढत्या प्रमाणावर होण्याची दक्षता शिक्षकाने घेतली पाहिजे. 'बलवान इन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति' या आप्तवाक्याचा मथितार्थ ध्यानात घेऊन, अध्यापकाने देखिल निरंतर सावध राहून आपला स्त्रीविषयक व्यवहार आदर्श असाच ठेवला पाहिजे.

अंतरी परमार्थ धरावा । बाहेरी व्यवहार करावा ।
आवडी भगवंत भजावा । हळु हळु मिळवावा विराग ।

हे साधनेचे सूत्र सर्वांनी अंत:करणात ठसविले तर उपरोक्त अंबा-भावनेचा उत्कर्ष साधणे अवघड जाऊ नये.

(क) विभिन्न धर्मियात प्रेम परिपोष

यथार्थ धर्मज्ञान दिल्याने भिन्न धर्मियात प्रेमभावनेचा परिपोष सहजशक्य आहे ही या शिक्षणाची तिसरी ठाम धारणा होय. ज्याप्रमाणे आईचे प्रेम साऱ्याच मुलांवर समान, परंतु कुणासाठी पुरी तर कुणासाठी लाह्या–बतासे, ज्याची जशी गरज असेल त्याप्रमाणे ती व्यवस्था करीत असते, त्याप्रमाणे भगवंत देखील विभिन्न साधकांकरिता अधिकार व परिस्थिती यानुसार साधनांची योजना करीत असतो, धर्मांना जन्म देत असतो. ह्या जगात लोक, " ही माझी जमीन, हे माझे घर " म्हणून जमिनीचे अनेक भाग करतात; परंतु वर असते ते एक अनंत आकाश, त्याचे कोणी भाग करू शकत नाही! तद्वतच माणूस अज्ञानाने आपलाच धर्म श्रेष्ठ म्हणून व्यर्थ दंगल माजवितो.[१६] स्वामी विवेकानंदानी[१७] घोषित केलेला खालील सिद्धांत प्रत्येकाने आपल्या मनावर कोरला तर कितीतरी प्रश्न चटकन सुटू शकतील!

" . . . the wonderful truth that all religions of the world are not contradictory or antagonistic. They are all but various phases of one eternal religion."

हे सत्यज्ञान असल्यानेच भारताच्या राष्ट्रीय शिक्षणाचे धर्म हे एक अविभाज्य अंग असावे असे स्वामी विवेकानंदाचे[१८] मत होते! कारण " जिच्यावर मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि जी मानवाच्या ठायी स्वरूपत:च वसत असते त्या अनंत शक्तीचा साक्षात्कार करून घेण्यासाठी जर मानवाला कुणी सर्वात जास्त प्रेरणा देत असेल तर तो धर्मच होय. चारित्र्य बनविण्यासाठी, जे काही चांगले आहे आणि थोर आहे ते घडविण्यासाठी, लोकांच्या जीवनात आणि स्वत:च्या अंतरात्म्यात शांति आणण्यासाठी प्रेरणा देणारी सर्वात मोठी शक्ति म्हणजे धर्म होय आणि म्हणून धर्माचे अध्ययन व्हावयासच हवे." स्वामीजीचे[१९] हे विचार

मननीय नाहीत का? आगखीही कितीतरी विद्वानांनी[१७] अध्यात्म शिक्षणाचा विविध दृष्टीने पुरस्कार केला आहे.

श्रद्धा– निष्ठा दृढ करणे

मात्र धर्माभ्यासाद्वारे प्रेम परिपोष होण्यासाठी एक पथ्य पाळले पाहिजे. ही शिक्षण योजना अमलात आणतांना कोणताही धर्म वा संप्रदाय इतरांच्या तुलनेने कनिष्ट वा गौण आहे, असे कळत वा नकळतही कधी ध्वनित होणार नाही, याची दक्षता घ्यावयास पाहिजे! या शिक्षणामुळे कुठल्याही विचाराच्या वा मताच्या व्यक्तीला, आपल्यावर इतर कोणत्या विचारांचे वा मताचे दडपण येत आहे, असे थोडेही वाटता कामा नये! अध्यात्माविषयी आपले आजवर असलेले विचार अधिक स्पष्ट झाले, आपले धर्ममत आपणास अधिक चांगले समजले, आपल्या मनातील "संदेहाच्या राशी निमाल्या," असे हे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला जाणवले पाहिजे! हिन्दु हा अधिक चांगला हिंदु नि मुसलमान हा पूर्वीपेक्षा चांगला मुसलमान होण्यास, या शिक्षणाचे सहाय्य व्हावे! त्यांच्या जिथे कुठे निष्ठा, श्रद्धा असतील, त्या वाढल्या पाहिजेत. त्यांना धक्का तर मुळीच लागता कामा नये!

डॉ. ॲनी बेझंट यांनी याबाबतीत केलेला उपदेश ध्यानात घेण्यासारखा आहे.

"Teach them to be religious without being sectarian, teach them to be devoted without being fanatical, teach them to love their own faith without decrying or hating the faiths of their fellow citizens."

'जितकी मते तितके मार्ग! कुणीही कोणत्याही भावाने, कोणत्याही नावाने व कोणत्याही रूपात त्या एका अद्वितीय सच्चिदानंदाचीच उपासना व भक्ती करील तर त्याला अक्षय्य अशा आत्मसुखाचा, ईश्वरदर्शनाचा लाभ होईलच! 'सर्वं देव नमस्कारः केशवं प्रति गच्छति' कोणत्याही देवाला केलेला नमस्कार हा अखेर त्या सर्वव्यापी भगवंतालाच प्राप्त होतो, असा विशाल व व्यापक भाव या शिक्षणाने विद्यार्थ्याच्या मनात जागविला गेला, तर विद्यार्थी समतोल व सहिष्णु झाल्या-

शिवाय राहणार नाही! परस्पर प्रेम, साहचर्य व सहानुभूती, सर्व धर्मीयात उत्पन्न होऊन, स्थिर अशी कायम शांतता समाजात त्यामुळे प्रस्थापित होऊ शकेल.

शिक्षण व धर्म यांचे परस्परावलंबित्व

पण हे प्रत्यक्षात यायला शिक्षणात धर्माला स्थान असावे; एवढेच नव्हे तर शिक्षण व धर्म हे स्वतंत्र राहूच शकत नाहीत, एवढी परस्परांना परस्परांची गरज असते असे मत चिकॅगो विद्यापीठातील एक प्रभावी पदाधिकारी प्रेसिडंट बर्टन[११] यांनी व्यक्त केले आहे, ते आपल्या ग्रंथात म्हणसात,

"..... We believe that the whole history of the race shows, and never more clearly than now, that learning and religion can never be divorced. Each needs the other. Religion needs the free atmosphere of the University to keep it from becoming superstition or bigotry. Learning needs religion to keep it from becoming selfish and pedantic."

शिक्षण क्षेत्रातल्या स्वतंत्र वातावरणाच्या अभावी धर्मात खुळचट कल्पना व समजुती शिरतील म्हणून व धर्माच्या अभावी शिक्षणात स्वार्थ व दंभाचार माजेल म्हणून, धर्म व शिक्षण या दोहोंचे साहचर्य आवश्यक आहे. सुमारे ३० वर्षे विद्यापीठांशी निकट संबंध असलेल्या या विद्वान शिक्षण तज्ञाने मृत्युशय्येवर असतांना आपले पक्व मत[१२] खालील शब्दांत व्यक्त केले आहे.

"..... the moral and religious life of the University is more central and important than I have ever before realized it to be !"

वर विषद केलेली मार्गदर्शक सप्तसूत्रे डोळ्यासमोर ठेवून ही योजना व्यापक प्रमाणावर सातत्याने अमलात आणली तर तिच्या यशस्वितेची ग्वाही देण्यास कुणा ज्योतिषाची गरज नाही.

संदर्भ टीपा

१. ऋग्वेद. १०, १९१; ३ व ४.

२. *Theodore M. Green : Religion and the Philosophies of Education; 'Article in 'Religious Education;' March–April, 1954 p. 82 ff.*

३. *Dr. Annie Beasant ; Thought–Forms.*

४. *Report of the Secondary Education Commission 1952–53; p. 120–121.*

५. डॉ. प्र. न. जोशी : दिन-विशेष; या ग्रंथाचा उपयोग ऐतिहासिक दृष्टया विशिष्ट दिवसाचे महत्व सांगण्यासाठी करून घेता येईल.

६. *Quoted by Prof. Indra Vidya Vachaspati in "Gurukul- contribution to Present Educational System", Educational India; Dec. 1955; p 189*

७. *Dr. H R. Wadhawani : Record of proceedings of All India Colloquium on Ethical & Spiritual Values; p. 230–231.*

८. *Percival Wren : Indian Teacher's Guide; p. 26.*

९. *M. Gandhi : Autobiography; p. 408.*

१०. *Abraham Flexner : Universities, American, English, German; p. 213.*

११. *President C. F. Wishart of Wooster : in symposium "On-going to College;" p. 230.*

१२. *Stephen J. Tonsor . The Role of the University; Two views; article in 'American Review;' April, 1970; p. 102.*

१३. *Ernest M. Ligon : Education for Moral Character;*

the article included in Philosophies of Education edited by P. H. Phenix; Chap; p. 57.

१४. वरप्रमाणे, पृ. ५७ पहा.

१५. *Emile Durkheim : Moral Education; Trans.– Everett K. Wilson & Herman Schnur; p. 52.*

१६. *Earnest M. Ligon : Education for Moral Character; p. 57–58.*

१७. *Ibid; p. 61.*

१८. *Goetting : Teaching in the Secondary School; p 504.*

असेच मत खालील ग्रंथातही व्यक्त केले आहे.

Bossing : Teaching in Secondary Schools; p. 501–502.

१९. डॉ. त्र्यं. गो. पंडे : "शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासाची समस्या;" या दैनिक तरूण–भारत, नागपूर दि. २९–६–६८ च्या अंकातील लेखाच्या आधारे.

२०. श्रीमद्भगवद्गीता; अध्याय ४, श्लोक ३४.

२१ मा. स. गोळवलकर : विचार नवनीत; पृ. ५६.

२२. *M: K. Gandhi; Non–Violence in Peace and war; Vol. 1; p. 32.*

२३. *E. H. Wilkins, " The College and Society " p. 95.*

आणखी पहां :

President Robert C. Clothier : The Inaugural Address; June 11, 1932; p. 13–14.

२४. प्रा. सौ. लीला पाटील व श्री. ह. शहाणे : प्रचलित शैक्षणिक समस्या; पृ. १२३ वरून उद्धृत.

२५. *Yogi Aurbindo : The Brain of India; p. 21.*

२६. *Alexander G. Ruthven : "Some Problems of the University . . . . . ;" Un. of Michigan Official Publication XXXI, 27, p. 9.*

२७. *H M. Wriston : The Nature of a Liberal College p. 120.*

२८. *Lincoln B. Hale et.al. "From School to College; a study of the Transition Experience p " 316.*

२९. *Ibid; p. 283–284.*

३०. श्रीरामकृष्ण परमहंस : श्रीरामकृष्ण-वाक्सुधा, श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर, पृ. ३२ ते ३४.

३१. *R. Tagore : Personality; p. 51.*
ब. ग. खापर्डे : ध्यानयोग, मराठी थिऑसाफिकल फेडरेशन, तृतीय संस्करण.

३२. *University Education Commission's Report (Kothari);p. 21.*

३३. *Ibid; p. 21–22.*

३४. *'Sex and Sadism;'* या विषयांवर ब्लिटज्' या साप्ताहिकात १४ आक्टो. १९७३ पासून प्रसिद्ध झालेली विस्तृत लेखमाला पहा. त्यातील २५ नोव्हे. ७३ च्या लेखात ज्या उपकरणांनी विकृत लिंगवासनेचे शमन केले जाते त्याचे विस्तृत वर्णन छायाचित्रांसह आले आहे.

३५. श्री. गुलाबराव महाराज : सप्तम यष्टि; पृ. ७.

३६. श्रीरामकृष्ण वाक्सुधा ; पृ–७६–७७.

३७. *The complete Works of Swami Vivekananda; Vol. IV; p. 176.*

३८. *The Complete Works of Swami Vivekananda: Vol. I; p. 109.*

३९. स्वामी विवेकानंद ग्रंथावली; खंड तिसरा; पृ० १०२

४०. खालील संदर्भ पहा:

Indiana University, 1820–1920; Centennial Memorial.

T. C. Mendenhall : ed " History of the Ohio State University " II (1926); p. 142.

W. T. Stace : Man against Darkness; Atlantic Monthly, 182, No. 8 (1948) p. 58.

Robert G. Sproul, President of the Un. of California: The Obligation of Universities to the Social Order; p. 382–383.

मा. स. गोळवलकर : कुरुक्षेत्र येथील गीता हायस्कूलच्या रौप्य महोत्सवातील भाषण; पहा. तरूण भारत, नागपूर दि. २५–१–७३.

स्वामी चिन्मयानंद यांची त्रिवेन्द्रम येथील वृत्तपत्र परिषदेतील संभाषण; पहा. *Nagpur Times; Nagpur; dt. 24–1–73.*

४१. *E. D. Burton : Education in a Democratic World; p. 52–53.*

४२. *Quoted in R. H. Edwards, J. M. Artman and Galan M. Fisher, " Undergraduates", Doubleday, Doran & Co. 1928; New York; p. 251.*

अकरा

योजनेचे प्रयोग व प्रतिसाद

" बरा निश्चयो शाश्वताचा करावा । म्हणे दास संदेह तो विसरावा ।।
घडीने घडी सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ।।
देहेबुद्धि हे ज्ञानबोधे त्यजावी । विवेकें तये वस्तुची भेट घ्यावी ॥ "

श्री. समर्थ रामदास[१]

" *.....Life cannot go on without spiritual meaning. If it is to have aim, direction and purpose. . . . . it must have the inspiration and support of religion.* "

. . . President E. A. Gilmore.[२]

प्रयोग नगण्य स्वरूपाचे

मागील सर्व प्रकरणे वाचून वाचकांच्या मनांत एक प्रश्न स्वाभाविकपणेच उद्‌भवला असेल. तो म्हणजे, " नैतिक व आध्यात्मिक शिक्षण प्रत्यक्ष कुणी, कुठे आजवर दिले आहे का ? तसे त्याचे प्रात्यक्षिक झाले असल्यास त्याची प्रगती कुठवर झाली ? त्या प्रयोगाला प्रतिसाद कितपत मिळाला ? किती यश आले ? "

प्रथमच हे स्पष्ट केले पाहिजे की शासन व समाज हे या शिक्षणाबाबत अत्यंत उदासीन असल्यामुळे व्यापक प्रमाणावर त्याची अंमलबजावणी फारशी कुठे झालेली आढळत नाही.

तसे प्रयत्न होते तर हा ग्रंथ लिहिण्याची पाळीच येती ना ! कारण असा व्यापक प्रयत्न एखाद्या राज्यात जरी योजनाबद्धरित्या झाला असता तरी तेथील सुपरिणाम पाहून इतरत्र या योजनेचे लोण सहजच पोचले असते. पण दुर्दैवाने तसे घडले नाही. नाही म्हणायला मध्यप्रदेशात १९६७ साली श्री. परमानंद भाई पटेल हे शिक्षण मंत्री असतांना त्यांनी नैतिक व आध्यात्मिक शिक्षण संपूर्ण राज्यभर लागू करण्याची योजना जाहीर केली होती. विद्यार्थ्यांना हे शिक्षण देण्यास सहाय्यक होतील अशी पाठ्यपुस्तकेही त्यांनी मुद्दाम तयार

करवून घेतली. पण पुढे ते मंत्रिमंडळ तत्कालीन राजकीय धुमः श्चक्कीत गडगडले नि त्यासोबत त्यांच्या या योजनेचीही वासलात लागली. केन्द्रशासित दिल्लीमध्ये जनसंघाचे शासन असतांना त्यांनी आखलेल्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचे आयुष्य असेच अल्पकालीन ठरले ! जनसंघ अल्पमतात येताच योजना बारगळली.

काही थोड्या राज्यात शिक्षण अधिकाऱ्यांनीही थोडेबहुत प्रयत्न केले. उदाहरणार्थ महाराष्ट्राच्या माजी शिक्षण संचालिका कु. पाणंदीकर यांनी एक परिपत्रक[३] काढून हे स्पष्ट केले, की शासन निधार्मिक असल्यामुळे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणावर बंदी आहे व शिक्षकांनी त्यापासून अलिप्त असणे बरे, ही जी समजूत जनमानसात प्रसृत झाली आहे ती अत्यंत चुकीची व घातक आहे. या पत्रकात पुढे त्या म्हणतात,

" I wish to emphasize that the ideals of a secular democratic society demands the greatest attention to the moral and spiritual values which should, therefore, continue to be the supreme concern for educators in this as in past ages ."

राज्यस्थान येथील माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. वर्मा यांनीही सर्व प्रमुख धर्मग्रंथातील उत्कृष्ट मजकूर निवडून एक पुस्तक[४] विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी तयार केले होते. पण शासनातर्फे झालेले असे सर्व प्रयत्न त्यावेळचे शासन, त्यातील व्यक्ती वा त्यांचा काल यांच्यापुरते सीमित राहिले.

खाजगी शिक्षण संस्थांमध्ये काही व्यक्तींच्या प्रेरणेतून भारतात अनेक ठिकाणी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे लहान मोठे प्रयोग झाले असणार हे उघड आहे. पण त्या सर्वांची धड एकत्र नोंदही कुठे सापडत नाही, मग त्यांचे मूल्यमापन करणे दूरच्च ! शासकीय प्रोत्साहन नसूनही पद्धतशीर प्रयोग करून ज्याचे अहवाल या ना त्या स्वरुपात प्रसिद्ध झाले त्यापैकी काही पुढील प्रमाणे :—

प्रयोग करणाऱ्या संस्था	संदर्भ
१. गोखले स्मारक मुलींची शाळा, कलकत्ता	*The Great Unity Margaret Barr, The Lindsey Press, 5 Essex Street; London; p 7-9 & 91-95.*
२. न्यू हायस्कूल; नाशिक	*Report of the Head-Masters & Educational officers Seminar (held at Mahabaleshwar in 1954); Poona 1956; p. 53*
३. एस्. एन्. डी. टी. कॉलेज; पुणे	*A report of the Study of influence of prayer and meditation on student's attitude and behaviour; S. N D. T. College ; Poona; 1964.*
४. राम मोहन इंग्लीश स्कूल, मुंबई	*Article by Mr. G. L. Chandavarkar in "Quest in Education;" Vol III; No. 1; March 1966 p. 242-243.*

वरील प्रमाणे जो काही प्रयत्न झाला तो बहुधा शिक्षकांच्या, चालकांच्या प्रेरणेमुळे, केवळ आपआपल्या संस्थेत स्वतंत्रपणे केला गेला तेवढाच ! त्याला संघटीत असे व्यापक स्वरूप दिल्याची उदाहरणे फारच क्वचित.

माझ्या माहितीत असलेले अशा शिक्षणाचे सामुहिकरित्या झालेले प्रयोग फारच थोडे ! त्यांतील काही प्रातिनिधी कप्रयोगाविषयींची स्थूल माहिती थोडक्यात येथे देत आहोत.

नागपूर विद्यापीठातील प्रयत्न.

पहिला नमूद करण्याजोगा प्रयोग म्हणजे नागपूर विश्वविद्यालयाचा. डॉ. राधाकृष्णन् यांच्या शिक्षणविषयक अहवालाच्या प्रसिद्धिनंतर नागपूर विद्यापीठाच्या विद्यासभेत *(University Court)* याबाबत एक ठराव मांडण्यात आला होता. या अहवालात केलेल्या शिफारशींच्या

संदर्भात विद्यापीठात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला प्रारंभ करावा अशा आशयाच्या त्या ठरावावर बरीच चर्चा झाली. विद्वद्सभेने (*Acadecmic Council*) या ठरावातील सूचनेचा सर्वांगीण विचार करण्यासाठी डॉ. मोझेस यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. सुदैवाने या समितीचा एक सभासद या नात्याने सुरूवातीपासूनच या योजनेचे जवळून निरीक्षण करण्याची मला संधी मिळाली.

या समितीने पुष्कळ विचारविमर्ष करून आपला अहवाल सादर केला. या अहवालाला विद्वद्सभेने दि. ३ फेब्रुवारी १९६४ रोजी झालेल्या सभेत एक मताने मान्यता दिली. या अहवालातील प्रमुख सूचना अशा:-

१) विश्वविद्यालयामधील संलग्न महाविद्यालयांतील प्राचार्यांनी जेष्ठ प्राध्यापकांची एक समिती या प्रश्नाचा विचार करण्याकरिता नेमावी. या समितीने नैतिक शिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करून आपापल्या महाविद्यालयात त्यांच्या अंमलबजावणीसाठी उपाय सुचवावेत.

२) प्रत्येक महाविद्यालयाला आपला अभ्यासक्रम निवडण्यास मोकळीक असावी. मार्गदर्शनासाठी श्रीप्रकाश समितीचा अहवाल व डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या विश्वविद्यालयीन शिक्षण समितीचा अहवाल असावा.

३) नैतिक शिक्षण प्रदान करण्याच्या कार्यात जे प्राध्यापक सहभागी झाले असतील, त्यांचे एक संमेलन विश्वविद्यालयाकडून शैक्षणिक वर्षाच्या शेवटी आयोजित केले जावे. या संमेलनात विविध महाविद्यालयांतील परस्पर अनुभवांच्या देवघेवीने पुढील अभ्यासक्रमाची व योजनेची रूपरेखा आखावी.

उपरिनिर्दिष्ट पहिल्या सूचनेप्रमाणे सुमारे १५ प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील जेष्ठ अध्यापकांची समिती नेमली. समितींनी आपापल्या महाविद्यालयातील परिस्थितीनुसार नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम तयार केला.[५] त्याप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी काही मोजक्या महाविद्यालयात केली गेली. परंतु अपेक्षिल्याप्रमाणे त्यात यश येऊ शकले नाही.

महाविद्यालयात या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठाने सक्ती केली नव्हती. आधीच अशा शिक्षणाबद्दल शिक्षक व विद्यार्थी यामध्ये औदासिन्य! त्यांतून ते त्यांच्या इच्छेवर सोपविले गेले. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. फारच थोडया महाविद्यालयात वर्षभर या योजनेची अंमलबजावणी होऊ शकली.

अहवालात सुचविल्याप्रमाणे वर्ष अखेर या कार्यात सहभागी झालेल्या व आस्था असलेल्या प्राध्यापकांचे एक संमेलन नागपूर येथे दि. २४ व २५ जानेवारी १९६६ रोजी आयोजित केले होते. आनंदाची गोष्ट म्हणजे प्राध्यापकांचा या संमेलनाला मात्र उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. सुमारे ७५ प्रतिनिधींनी उत्साहाने दोन्ही दिवस प्रत्येक कार्यक्रमात भाग घेतला. इतकेच नव्हे, तर सुमारे १५ लेख अध्यापकांनी सर्वांच्या विचारार्थ आगाऊ लिहून पाठविले होते. सम्मेलनापूर्वी त्यांच्या प्रती सर्व प्रतिनिधींना पुरविल्या गेल्या तसेच या सम्मेलनाला जोडून विद्यापीठ ग्रंथालयाच्या सहकार्याने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला पोषक व पूरक अशा पुस्तकांचे प्रदर्शन भरविले होते. विद्यार्थी व शिक्षकांना हे शिक्षण घेतांना व देतांना कोणती पुस्तके उपयुक्त ठरू शकतील याचे मार्गदर्शन या प्रदर्शनामुळे झाले. महाराष्ट्राचे तत्कालीन उप शिक्षणमंत्री व विद्यमान खा. डॉ. कैलास यांनी सम्मेलनाचे उद्घाटन केले. माजी कुलगुरू न्या. देव यांनी अध्यक्षपद भूषविले.

उद्घाटनानंतर नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या तीन प्रमुख अंगाचा विचार करण्यासाठी सर्व प्रतिनिधींचे तीन गट पाडण्यात आले. जे तीन विषय चर्चेसाठी प्रामुख्याने घेतले ते खालीलप्रमाणे :—

१) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे ध्येय वा उद्देश.
२) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा अभ्यासक्रम
३) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अंमलबजावणीचे मार्ग व योजना. —

या तीन अभ्यास मंडळाचे वेगवेगळे अध्यक्ष व आमंत्रक नेमले गेले. वरील विषयाच्या विविध बाजू निर्देशीत करणारे अध्यापकांचे निबंध *(Papers)* विचारविनिमयासाठी पायाभूत म्हणून सर्वांसमोर ठेवण्यात

आले व प्रत्येक गटाने आपापल्या विषयांची साधक बाधक चर्चा दोन्ही दिवस केली. प्रत्येक अभ्यास-मंडळाने आपल्या चर्चेचा निष्कर्ष अखेरच्या दिवशी सर्वसामान्य सभेसमोर (*General Body*) ठेवला. या सर्व मंडळांनी मांडलेल्या मसुद्यांची कलमवार चर्चा करून त्यावर अखेरचे शिक्कामोर्तब केले गेले. या सम्मेलनात या योजनेची कार्यवाही करण्यासाठी एक स्थायी समिती नेमली गेली.

परंतु त्यातील काही सभासद निवृत्त झाल्याने विद्वत् सभेने डॉ. ग. त्र्यं. देशपांडे याच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एका नव्या समितीची नियुक्ती केली व पुन्हा अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे दि. २९-५-६७ रोजी झालेल्या विद्वत् सभेसमोर समितीचा हा अहवाल ठेवण्यात आला. दुर्दैवाने तो अहवाल जसाचा तसा मान्य झाला नाही[1]. त्यात एवढे बदल केले गेले की त्यामुळे नागपूर विद्यापीठात आज ही योजना नावालाच उरली आहे.

रामकृष्ण मिशनचे प्रयत्न

दुसरा प्रयोग केला गेला तो स्वामी विवेकानंदांनी स्थापन केलेल्या श्रीरामकृष्ण मठ आणि मिशनतर्फे. म्हैसूर व मुंबई येथील या संस्थेच्या प्रख्यात आश्रमाने पुढाकार घेऊन विविध विद्यापीठातील विद्यार्थी निवडून सुटीत नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची वासंतिक शिबीरे (*Summer Retreat*) आयोजित केली. म्हैसूर येथील शिबीर १९६७ साली उन्हाळ्यात सुमारे २० दिवसांचे व मुंबईचे शिबीर ४ मे ते १८ मे १९६८ असे १५ दिवसांचे होते. म्हैसूर येथे जवळपास ५० तर मुंबईला ४० विद्यार्थ्यांना या शिबिरात प्रवेश देण्यात आला होता. अध्यात्म शिक्षणाचा उद्देश समोर ठेवून मिशनने ही शिबिरे अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. रामकृष्ण मिशनची सुविख्यात असलेली टापटीप, शिस्त, वक्तशीरपणा वातावरणातील पावित्र्य व गांभिर्य या सर्व गोष्टीचा ठसा त्या विद्यार्थ्यांच्या मनावर न उमटला तरच आश्चर्य ! याशिवाय सर्वात महत्वाची बाब म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण केलेल्या व्रतस्थ सन्याशांचा विद्यार्थ्यांना घडलेला सत्संग ! केवळ १५ दिवसांच्या अल्प-

काळात या विद्यार्थ्यांच्या जीवनाला वेगळे वळण लागले. अमृतराय यांच्या शब्दात सांगायचे तर,

संतपदांची जोड देरे हरि । संतपदांची जोड ॥
सुफलित करोनि पूर्ण मनोरथ । सुंदर उगवे मोड ॥

त्यांच्या मनाला या संत-सन्याशांच्या सहवासाने सुंदर मोड, मुरड बसली. अळवाकडे वहात असलेले पाणी उसाकडे वहायला लागले. विद्यार्थ्यांच्या मनावर झालेला हा इष्ट परिणाम शिबीर संपल्यानंतर प्रश्नावली पाठवून जे मूल्यांकन मिशनतर्फे करण्यात आले त्यावरून स्पष्ट होतो.

श्री तुलसींचे अनुव्रत आंदोलन

नमूद करण्याजोगा आणखी एक प्रयोग केला गेला तो जैन धर्म गुरू आचार्य श्रीतुलसी यांच्या प्रेरणेने ! यासाठी त्यांचे 'अनुव्रत' आंदोलनच सुरू आहे. आंदोलनाचा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण मिळावे हाच आहे. त्यांच्या शेकडो शिष्यांनी शाळा-कॉलेजातून हे शिक्षण मिळावे असा प्रयत्न चालविला आहे.

आचार्य तुलसींचे एक सत्शिष्य मुनी राकेशकुमार यांनी रायपूर विभागात (मध्यप्रदेश) सुमारे १००० प्राथमिक व माध्यमिक शाळाद्वारे सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्याचा यशस्वी उपक्रम केला. या विषयाची परिक्षा घेतली गेली. एवढेच नव्हे तर शाळेतील वार्षिक परिक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी जे परिक्षक नेमले जातात त्यांची गरज पडू नये एवढा प्रामाणिक भाव विद्यार्थ्यांच्या मनात जागृत झाला. परिक्षेत नक्कल करण्याच्या आजच्या वाढत्या प्रवृत्तीच्या संदर्भात प्राप्त झालेले या प्रयोगाचे अल्पावधींतील हे यश पाहून राज्य शासनाने या प्रयोगाला सर्व सहाय्य देण्याचेही मान्य केले"

मेहकर मधील प्रयोग

अशा अनुकूल परिणामाची अनुभूती आम्हाला आमच्या छोट्याशा महाविद्यालयातही पहावयास मिळाली. मेहकर येथे १९६१ साली महाविद्यालयाची स्थापना झाल्यापासून प्राचार्य म्हणून कार्य करण्याची, सुसंधी मला प्राप्त झाली. तत्पूर्वी यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून घालविलेल्या ३–४ वर्षाच्या कालावधीत

मी अध्यात्म शिक्षणाचे प्रयोग केले होते. 'सांस्कृतिक विकास मंडळ' या नावाची विद्यार्थ्यांची एक संस्थाच या कार्यासाठी सुरू झाली होती. विद्यार्थ्यांत तर तिने कार्य केलेच; पण विशेष म्हणजे यवतमाळ येथील सेन्ट्रल जेलमधील कैद्यांना नैतिक शिक्षण देण्याचे प्रशंसनीय कार्य देखील विद्यार्थ्यांनी या संस्थेमार्फत यशस्वीपणे केले. साहजिकच मेहकरला आल्यामुळे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाविषयी अनेक सुप्त कल्पना व योजना अमलात आणण्यासाठी एक सुंदर क्षेत्र लाभल्याचा आनंद मला झाला. या कार्याचा शुभारंभही फार अनपेक्षित व मजेदाररित्या झाला.

त्याचे असे झाले. एक दिवस सुमारे २॥–३ मैल लांब पैनगंगेच्या वाळवंटात आम्ही सर्व प्राध्यापक व विद्यार्थी डबे घेऊन सहलीला गेलो होतो. फार मजेत सर्व कार्यक्रम पार पडले. परतायला थोडा उशीर झाला. चांदणी रात्र होती, स्वच्छ पिठूर चांदणे पडले होते. एका बाजूला निसर्गाने गवताची हिरवीगार मखमल पसरली होती, तर दुसऱ्या बाजूने अंजिठ्याच्या लहानमोठ्या टेकड्या विसावल्या होत्या. मधोमध डांबरी सडक सर्पाकार वळणे घेत धावत होती. त्या रमणीय वातावरणाने व दिवसभराच्या मनोरंजक कार्यक्रमामुळे सर्वांची मने आनंदित नि उल्हसित झाली असल्यास आश्चर्य नाही. नाचत-बागडत, गप्पाविनोद करीत परतीची वाट सर्वजण मागे टाकत होते. तोच कुणाला तरी कंठ फुटला. त्याने 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' हे गीत गायला सुरवात केली. इतरांनी त्याला साथ दिली. त्या शांत नि स्तब्ध वातावरणात उच्च स्वरात ते गीत सामुहिकपणे सुरू झाले. आणखी एक दोन देशभक्तीपर गीते म्हणून झाल्यावर एका प्राध्यापकाने विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून एका भजनाला सुरवात केली. ठेक्यावर सर्वजण मोठ्याने भजन म्हणू लागले. एका भजनाच्या शेवटी "ज्ञानेश्वर माऊली। ज्ञानराज माऊली तुकाराम।" हा वारकऱ्यांचा प्रसिद्ध नामघोष सुरू झाला आवाज द्रुतगतीने वाढू लागला. टाळ्यांचा गजर होऊ लागला. "ज्ञानेश्वर माऊली," "ज्ञानबा–तुकाराम" या मंत्राचा एकच गदारोळ उठला. विद्यार्थ्यांनी तन्मयतेने एका तालात घोष सुरू केला. सुरात सूर मिसळले;

तल्लीनता वाढू लागली. भक्तिरसात सर्वंजण देहभान विसरले. प्राध्यापकांबरोबर विद्यार्थ्यांचे पाय तालावर ठेका घेत केंव्हा नाचू लागले ते कुणाला कळलेच नाही. वरील जप करित, टाळया वाजवित व आनंदानें नृत्य करित आम्ही सर्व गावांत केव्हा येवून पोचलो हे समजले नाहीं.

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा हाच आमचा पहिला वहिला कार्यक्रम ! न योजता घडून आलेला, न कळत सुरू झालेला ! त्या दिवसापासूनच आमच्या महाविद्यालयात या योजनेला सुरवात झाली असे म्हटले पाहिजे. प्रारंभ झाला हे अधिकृतपणे घोषित न करताच झालेला हा शुभारंभ! तेव्हापासून महाविद्यालयात नियमीतपणे मधूनमधून राष्ट्रगीते होऊ लागली. वर्ग सुरू होण्यापूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराजांचे 'पसायदान' प्रार्थना म्हणून सर्वंजण आवडीने म्हणू लागले. वेगवेगळ्या निमित्ताने विद्यार्थी भजनपूजनाचे कार्यक्रम प्रेमाने करू लागले. व्यासपौर्णिमा, गीताजयंती इ. कार्यक्रम सोत्साह संपन्न व्हायला सुरवात झाली. नागपूरच्या श्री रामकृष्ण आश्रमाच्या वसतीगृहात काही वर्षे राहिलेले प्रा. निरखी यांनी तन्मयतेने आपल्या रसाळ वाणीने तेथे म्हटली जाणारी प्रार्थना व रामनाम विद्यार्थ्यांना शिकविले तेव्हा तर मुलांना त्याचे इतके वेड लागले की मधून मधून तो कार्यक्रम झाल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

श्री. तुकारामांचे व नामदेव महाराजांचे अभंग विद्यार्थी वर्ग करमणूक म्हणून गाऊ लागला. श्री. मैथिलीचरण गुप्त यांचे "खडा हिमालय बता रहा है !" श्री. साने गुरुजींचे "देशभक्ति प्रारंभ जीवनाचा। आत्मयज्ञाने अंत व्हावयाचा" इ. अनेक स्फूर्तिप्रद राष्ट्रगीते विद्यार्थी इतकी सुंदर गात की कुणालाही ती वारंवार ऐकावीशी वाटत. त्यावेळी महाविद्यालय भरत असे त्या आमच्या शाळेच्या इमारतीजवळ रहाणारे एक सरकारी अधिकारी यांनी बदली झाली तेव्हा, नेहमी कानावर पडणारे हे सुंदर कार्यक्रम यापुढे ऐकायला मिळणार नाही म्हणून मजजवळ खेद व्यक्त केला.

दैनंदिन अभ्यासक्रम आटोपून उपलब्ध होणारा वेळ, दरवर्षी येणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्साह व इतर अनुकूलता यांच्या

अनुषंगाने दरवर्षी कमीजास्त प्रमाणात नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे विविध प्रयोग केले गेले. वर्ग संपल्यावर रोज हरिपाठ म्हणणे ; वर्ग सुरू होण्यापूर्वी तीन मिनिटे मौन (*Silent Meditation)* पाळणे; आठवड्यातून एक तास तरी नैतिक शिक्षणाचा वर्ग, कथा कथन, भाषण, ईशसंकिर्तन इ. गोष्टी केल्या गेल्या. वातावरण - निर्मितीसांठी या ग्रंथात पूर्वी सुचविलेल्या अनेक गोष्टी अमलात आणल्या गेल्या

परिक्षेच्या दृष्टीने २६ जानेवारी नंतर नैतिक शिक्षणाचे काही कार्यक्रम (उदा. आठवड्याचे वर्ग, ईशसंकिर्तन; देशभक्तीपर गीत गायन) आम्ही बंद करीत असू. तसे करताच काही वर्गांचे वर्ग–प्रतिनिधी "नैतिक शिक्षण वर्ग बंद करू नका, सर! वाटल्यास अभ्यासाच्या वेळा व्यतिरिक्त आम्ही कॉलेजमध्ये यायला तयार आहोत!" अशी विद्यार्थ्यांची मागणी माझ्याकडे घेऊन आलेत. विद्यार्थ्यांचा अनेक वेळी व्यक्त होणारा हा उत्साह पाहून आम्ही प्रोत्साहित होत होतो ! या कार्यक्रमावरील आमचा विश्वास द्विगुणित होत होता !

स्नेहसम्मेलनाचे ज्ञानसत्रात रूपांतर

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या या उपक्रमाचे पडसाद इतरही महाविद्यालयीन कार्यक्रमावर उमटत असत; उदाहरण द्यायचे झालें तर स्नेहसम्मेलनाचे सांगता येईल. फार क्वचितच अन्यत्र आढळणारे आगळे स्वरूप आमच्या स्नेहसम्मेलनाला आलेले नागरिकांनी अनुभवले ! हे स्नेहसम्मेलन आहे, कलह सम्मेलन नव्हे हे आम्ही विद्यार्थी मनावर बिंवण्याचा प्रयत्न करीत असू ! महाविद्यालयासारख्या उच्च शिक्षण प्रदान करणाऱ्या ज्ञान मंदीराच्या सम्मेलनाचे मुख्य प्रयोजन असावे ज्ञान–ग्रहण व तदनंतर मनोरंजन! या भूमिकेतून दरवर्षी स्नेह सम्मेलनाचे निमित्ताने विद्वान पंडितांना पाचारण करण्याचा पायंडा सुरू झाला ! पहिल्याच वर्षी आनंदाने आमचे आमंत्रण स्विकारले कै साहित्याचार्य बाळशास्त्री हरदासांनी! 'ज्ञानेश्वर ते रामदास' या विषयावर सम्मेलनाचे पाचही दिवस त्यांनी दिलेली भाषणे गाजली. या ज्ञानसत्रात जनतेने मनसोक्त अवगाहन केले; प्रथमच झालेल्या अशा व्याख्यानमालेचे लोकांनी स्वागत केले, प्रचंड प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक झाले ! या नंतर

एखाद्या विद्वान वक्त्याची व्याख्यानमाला हे स्नेहसम्मेलनाचे एक अविभाज्य अंग होऊन गेले ! कै. अप्रबुद्ध,सौ. प्रभावतीबाई राजे, डॉ. वर्णेकर, डॉ. द्रवीड, इ. अनेक विद्वानांनी आमचे व्यासपीठ भूषविले. या सर्वांचा मानधन देऊन सत्कार करण्याची प्रथा सुरू झाली.

संख्या वृद्धीमुळे सुसंस्काराची समस्या

मात्र महाविद्यालयाचे आयुष्य जसजसे वाढू लागले तसतसा त्याचा संख्यात्मक आकार स्वाभाविकच वाढू लागला. अध्यापक-विद्यार्थी यांच्या परस्परांशी असलेल्या प्रमाणात फार तफावत पडू लागली. आम्ही अध्यापक, विद्यार्थ्यांच्या तुलनेने कमी पडू लागलो. विद्यार्थ्यांच्या वाढत्या व बदलत्या संख्येला सुसंस्कारित करण्याचे सामर्थ्य कमी पडत चालल्याचे मनोमन जाणवू लागले. दिवसेंदिवस विकृत होत चाललेल्या वाह्य वातावरणाचा पगडा काहींच्या मनावर पडू लागल्याची चिन्हें दृग्गोचर होऊ लागली ! आम्ही अध्यापक या बदलत्या परिस्थितीला आवर घालण्यासाठी काय करता येईल याचा खल करू लागलो.

हे प्रतिकूल होत चाललेले वातावरण अनुकूल करण्यासाठी दोन दिशांनी प्रयत्न करण्याचे आम्ही योजले. एक म्हणजे विद्यार्थी सुसंस्कारित करण्याचे व्यापक प्रमाणावरील प्रयत्न; दुसरे म्हणजे निवडक विद्यार्थ्यांच्या शील संवर्धनासाठी सखोल असे प्रयत्न *(Efforts on Extensive and Intensive scale)*! व्यापक प्रयत्न तर प्रथम पासून सुरूच होते. संख्या वाढल्याचे जाणवताच महाविद्यालयाच्या साधारण तिसऱ्या वर्षापासून सखोल प्रकारचे प्रयत्न सुरू झाले.

नमूद करण्याजोग्या व्यापक प्रयत्नांची प्रथम नोंद घेऊन नंतर आपण सखोल प्रयत्नांकडे वळू.

व्यापक प्रयत्नांचे स्वरूप

१. म. गांधींच्या जन्मशताब्दिनिमित्त झालेल्या कार्यक्रमाच्यावेळी विद्यार्थ्यात बोकाळत चाललेल्या सिगारेट, तंबाखू, नस इ. व्यसनांच्या दुष्परिणामांचे विवेचन करून, ही पैशाचा व प्रकृतीचा अपव्यय करणारी व्यसने, सोडून देण्यासाठी सर्वांना आवाहन केले गेले. व्यसनमुक्तीचा संकल्प करून तशा प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतल्या.

२. म. गांधींनी मौन पालनाचे विशद केलेले महत्व सांगून दर सोमवारी महाविद्यालयात संपूर्ण मौन पाळण्याचे ठरविले.

३. मौनासोबतच सोमवारी पांढरा शुभ्र पोषाख सर्वांनी घालून यावा असा नियम केला. हे दोन्ही कार्यक्रम एकाच दिवशी योजण्याचे कारण स्वच्छ पांढऱ्या पोषाखात येण्याच्या भावनेशी मौन-संकल्पाची सांगड विद्यार्थ्यांच्या अंत:करणात घातली जावी. शुभ्र पोषाख अंगावर चढवितांच आज कॉलेजात मौनही पाळायचे आहे याचे स्मरण विद्यार्थ्याला व्हावे ही अपेक्षा!

४. राष्ट्रभक्तीपर गीतांचे सामूहिक पठण मधून मधून घेणे.

विद्यार्थी संपर्क योजना

५. गेल्या २–३ वर्षांपासून 'विद्यार्थी संपर्क योजना' सुरू केली. शैक्षणिक सत्राला प्रारंभ होण्यापूर्वीच एकेका अध्यापकाकडे प्रवेश घेणार असलेले सुमारे ४० विद्यार्थी सोपविण्यात आले. त्यांची मुलाखत *(Interview)* संबंधीत अध्यापकांनी घेतल्याशिवाय महाविद्यालयांत प्रवेश दिला जाणार नाही असा दंडक घालण्यात आला. शक्यतोवर पालकासह विद्यार्थ्यांनी मुलाखतीला यावे असे सूचित केले गेले. या पहिल्याच मुलाखतीद्वारे विद्यार्थ्याची शक्य तेवढी माहिती अध्यापकाने मिळवावी अशी अपेक्षा करण्यात आली. पुढे वर्षभर त्या अध्यापकाने संबंधीत विद्यार्थ्याला मार्गदर्शन करावे, त्याच्या अडचणी सोडवाव्या, त्याच्या अभ्यासाची काळजी घ्यावी व त्याचे जीवन आहे त्यापेक्षा अधिक सुखी, सफल व सुसंस्कारित करण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. त्यानुसार काही प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे विविध सामूहिक कार्यक्रम आयोजित करून तर काहींनी त्यांच्या घरी वा खोलीवर मुद्दाम जाऊन त्यांना यथोचित मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची मनोधारणा, त्यांची आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक पार्श्वभूमी इ. अनेक घटक लक्षात घेऊन लागणारे हे मार्गदर्शन अर्थात व्यक्तीक्रमाणे भिन्न असे. पण या व्यक्तीगत संबंधातून शिक्षकाकडे पाहण्याचा विद्यार्थ्याचा अलिप्तपणाचा त्रयस्थ दृष्टिकोण दूर झाल्याचे व असा संबंध आलेला विद्यार्थी

अधिक विश्वासाने व आपुलकीने जवळ येऊ लागल्याचे. एका अध्यापकाने आपल्या अहवालात नमूद केले.

विद्यार्थ्यांचे तीन प्रकारात विभाजन

साधारणपणे आपल्या गटाशी साधलेल्या संपर्कांचा तिमाही वा सहामाही अहवाल अध्यापकाकडून मागविण्याची पद्धत रूढ झाली. या अहवालात विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची प्रगती, आर्थिक सहाय्याची गरज, सवयी, छंद, मनोधारणा इ. बाबीविषयी उपलब्ध माहिती सादर केली जाते. याशिवाय विद्यार्थ्यांना साधारणपणे खालील ३ गटात विभागून त्यांच्या याद्या सर्वांना तयार करण्यास सांगण्यात आले.

१ *Nucleus Students* प्रभावी सत्प्रवृत्त विद्यार्थी
२. *Neutral Students* तटस्थ प्रवृत्तीचा विद्यार्थी
३ *Nuisance Students* उपद्रवकारी विद्यार्थी

गेल्या दोन्ही वर्षांच्या अखेरीस घेतलेल्या पाहणीनुसार पहिल्या व अखेरच्या गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शेकडा ५ देखील निघाली नाही. तटस्थ विद्यार्थ्यांचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे फार अधिक होते. सत्प्रवृत्त गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तिसऱ्या उपद्रवकारी विद्यार्थ्यांपेक्षा जरी सुमारे दीडपटीने जास्त होती, तरी जाणीव होत असे उपद्रवी विद्यार्थ्यांचीच! प्रभाव जाणवत असे या दुष्प्रवृत्त मुलांचाच! नेहमीचे पाणी पितांना जसे काही वाटत नाही, पण एखादवेळेस त्यात मीठाचा खडा पडला असतांना मात्र एकदम जाणवते, तसे कदाचित कॉलेजातील या अनुभवांचे होत असावे! नित्याचे सुरळित शांत जीवनाचे श्रेय या सत्प्रवृत्त विद्यार्थ्यांकडे वस्तुतः जाते हे अनेकदा विसरले जाते. क्वचित एखाद् वेळेस विद्यार्थ्यांचा तात्कालिक उद्रेक झाला म्हणजे आपण पहिल्या व दुसऱ्या गटातील बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या नावाने बोटे मोडून असे का होते? म्हणून बेचैन होतो! उपद्रवी विद्यार्थ्यांच्या प्रभावाखाली मधूनमधून तटस्थ विद्यार्थी यायचेच!

सत्प्रवृत्तांच्या संख्यावाढीची समस्या

या तिसऱ्या गटातील उत्पातकारी विद्यार्थ्यांचा प्रभाव किती आहे, यावर या उद्रेकांचे प्रमाण अवलंबून राहील हे उघड आहे. फक्त प्रश्न

आहे तो त्यांचा प्रभाव वाढू न देण्याचा ! पहिल्या व तिसऱ्या गटाची मधल्या गटाला आपल्या प्रभावाखाली आणण्याची ही जी रस्सीखेच सुरू असते त्यात कोण विजयी होतील यावर त्या महाविद्यालयातील एकूण वातावरण अवलंबून असते असा आमचा गेल्या काही वर्षांचा अनुभव ! प्राध्यापक मंडळाच्या सभेमध्ये या संपर्क योजनेच्या अहवालावर जेव्हा चर्चा होते तेव्हा प्रामुख्याने आम्हा सर्वांचा विचार केन्द्रित झाला असतो तो उपद्रवकारी विद्यार्थ्यांचे प्रमाण घटवून सत्प्रवृत्तांची संख्या कोणत्या उपायांनी वाढविता येईल यावर ! यात आम्ही जेवढे यशस्वी होऊ त्या-प्रमाणात महाविद्यालयीन जीवन अधिक शिस्तबद्ध, विशुद्ध व संस्कार-क्षम होण्यास सहाय्य होईल हे उघड आहे !

सखोल स्वरूपाचे उपाय

पहिल्या सत्प्रवृत्त गटातील विद्यार्थ्यांची संख्या वृद्धिगत करण्याचा विशेष प्रयत्न म्हणून सखोल प्रकारात मोडणारे खालील उपाय अमलात आणण्यात आले.

१) **ध्यान वर्ग :** रविवारी सकाळी पाऊण ते एक तासाचा ध्यान-वर्ग (*Class of Meditation*) आयोजित केला जाई. अर्थात यात केवळ निवडक विद्यार्थीच असत. ध्यान वर्ग म्हणजे अव्याहत ध्यान धारणा नसे होत यावेळी ! विविध कार्यक्रमाद्वारे केवळ सद्भावनाच स्फुरतील असे वातावरण उत्पन्न करून, एकाग्रता साधण्याचा अभ्यास या वर्गात विद्यार्थ्याला शिकविला जाई. याचा फार चांगला ठसा विद्यार्थ्यांच्या अंत:करणावर उमटल्याचे अनुभवास आले.

२. **विद्यार्थी वसतीगृह :**–१९६७ च्या उन्हाळ्यातली गोष्ट ! नुक-ताच मॅट्रीकचा निकाल जाहिर झाला होता. प्रथम श्रेणीत उत्तिर्ण झालेला श्री. तुकाराम चव्हाण नावाचा आई, वडील नसलेला जवळच्या खेड्या-तील एक अत्यंत गरीब विद्यार्थी डोक्यावर सामानाची पेटी घेऊनच कॉलेजमध्ये आला ! "काय वाटेल ते काम करतो पण जेवण्याराहण्याची व शिक्षणाची व्यवस्था लावा सर!" असे म्हणून डोळ्यात आसवे आणून तो विनवू लागला! लवकरच काय ते कळवतो असे सांगून तात्पुरते तुकारामला तर थोपविले; पण या निमित्ताने सुरू झालेले माझे विचार-

चक्र काही थांबविता येईना! सहकारी प्राध्यापक मित्रांशी व नगरातल्या प्रतिष्ठीत नागरिकाशी बोलणे केले. व प्रथम वर्गात उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क वसतीगृह स्थापन करण्याचे ठरविले.

आज सुमारे २५ प्रथम श्रेणीतील बुद्धिमान पण गरीब विद्यार्थी या वसतीगृहात आहेत. या निवडक विद्यार्थ्यांवर अध्यात्म संस्कार करण्याचे अनेक प्रयोग सातत्याने केले गेले. पहाटे ४।। ला उठण्यापासून रात्री १० पर्यंत आखलेला नियमित कार्यक्रम त्या विद्यार्थ्यांची मानसिक घडण घडविण्यात बराच यशस्वी होत आहे.

या वसतीगृहाचा महाविद्यालयाशी कोणताही प्रत्यक्ष संबंध नाही. तरीही वसतीगृहात राहणाऱ्या या बुद्धीमान व सदाचरणाचा सोपान चढण्याची धडपड करणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांमुळे कळत नकळत कॉलेजातील वातावरण सत्प्रवृत्तीचे पोषण करण्यास सहाय्यभूत झाले. योगाचार्य श्री. जनार्दनस्वामी, डॉ. ग. श्री. खैर, प्राचार्य श्री. माणकीकर, नागपूर विद्यापीठ गांधी केन्द्राचे संचालक श्री. मा. ज. कानेटकर; तरूण भारताचे संपादक श्री. मा. गो. वैद्य इत्यादी अनेक जेष्टांनी हे वसतीगृह पाहून अत्यंत समाधान व्यक्त केले.

३. **राष्ट्रीय सेवा योजना**– महाविद्यालयातील या योजनेचा उपक्रम हा देखील विद्यार्थांच्या नैतिक जीवनाची घडण करण्याच्या दृष्टीने फार पोषक ठरला. सहसा कुठल्याही महाविद्यालयात न निवडल्या गेलेला 'धोतर, बनियन व बंगाली शर्ट' हा भारतीय पोषाख विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने पसंत केला. इतरत्र होतात तशी श्रमदान शिबिरे व अन्य सामाजिक कार्ये तर त्यांनी शिस्तीने पार पाडलीच; पण २६ जानेवारी रोजी स्वच्छ धोतर व शर्ट घालून या सुमारे ५०–६० विद्यार्थ्यांनी, गळ्यात टाळ घेऊन व 'ज्ञानबा तुकाराम' च्या नामात धुंद होऊन जी प्रभातफेरी काढली, ती सर्वांच्या कौतुकाचा विषय झाली यात आश्चर्य नाही.

गणराज्य दिनाच्या निमित्ताने झालेल्या ध्वजवंदनाचे दृश्य खरोंखरी विलोभनीय होते. ध्वजाच्या एका बाजूला सैनिकी गणवेषांत राष्ट्रभक्तीची दिक्षा घेतलेले छात्र सेनेचे विद्यार्थी सज्ज होते, तर दुसऱ्या बाजूला आत्मसुखाचा आनंद अनुभवण्यास आसुसलेली शुभ्र भारतीय पोषाखातील

"वैष्णवांची मांदी" ध्वजाला अभिवादन करण्यास सिद्ध होती. राष्ट्रसंरक्षणार्थ प्राणार्पण करण्याची मनिषा बाळगणाऱ्या देशभक्त जवान विद्यार्थ्यांचा व अध्यात्माच्या अधिष्ठानावर राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवण्याचा शुभसंकल्प केलेल्या देवभक्त सात्त्विक विद्यार्थ्यांचा, गंगा–यमुनेसारखा पावन–पवित्र संगम पाहून सर्व प्राध्यापकांची अंत:करणे आनंदाने उचंबळून आल्या–शिवाय राहिली नाहीत. हे यश लाभले ते अर्थात या योजनेत समाविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे संबंधित प्राध्यापकाशी वैयक्तिकरित्या घनिष्ट संबंध प्रस्थापित झाल्यामुळेच !

४ सद्गुण–संवर्धन योजना :– सुप्रसिद्ध अमेरिकन नेते श्री. बेंजामिन फ्रँकलिन यांच्या आत्मचरित्रात आत्मनिरिक्षणद्वारा गुणवृद्धीचा जो प्रयोग वर्णिला आहे,' त्याच्या आधाराने उपरोक्त वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या सहाय्याने एक प्रयोग आम्ही अमलात आणला. त्याची स्थूल रूपरेषा खालील प्रमाणे:–

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेचा पाया आहे सद्गुण-संवर्धन ! पण हे सद्गुण नेमके कोणते ? नि त्यांचा निश्चित अर्थ काय ? हे विद्यार्थ्यांच्या मनात स्पष्ट नसते. मग या गुणांचे वर्धन होणार कसे ? समजा हे सद्गुण व त्यांचा अर्थ आपण विशद केला तरी प्रत्येक दिवशी सर्व सद्गुणावर लक्ष ठेवून ते अंगी बाणविणे सामान्याला अशक्यच आहे.

या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने सद्गुण संवर्धनाची एक योजना तयार केली. सर्वप्रथम विद्यार्थ्याने अंगी बाणवावे अशा १२ सद्गुणांची एक यादी तयार केली व थोडक्यात त्यांचा व्यावहारिक दृष्टया नेमका अर्थ विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे लिहून दिला.

१ सत्य :– मनात व जनात एकच भाव वसणे; कृती वाणी, मन वा कोणत्याही इंद्रियाद्वारे आत एक व बाहेर दुसरे असे होता कामा नये.

२ अहिंसा :– आपल्यामुळे कुणाचेही जाणीवपूर्वक शरीर वा मन दुखविले जाणार नाही याची दक्षता घेणे.

३ निश्चय :– जे काही करायला हवे त्याचा निश्चय करणे. ज्या गोष्टी करण्याचा निश्चय होईल तो कोणत्याही कारणामुळे पार पडला नाही असे होऊ न देणे.

४ काटकसर :– इतराच्या वा स्वत:च्या हिताशिवाय अन्यत्र खर्च न करणे; सर्व प्रकारचा अपव्यय टाळणे.

५ उद्योगशीलता :– एक मिनिटही व्यर्थ वेळ वाया न घालविणे. काही-तरी आवश्यक व उपयुक्त गोष्टीसाठी नेहमी वेळ खर्च करणे. अनावश्यक क्रियांना पूर्णपणे फाटा देणे.

६ मौन :– स्वत:ला वा इतरांना उपयोगी वा हितावह एवढेच फक्त बोलणे. क्षुल्लक व वायफळ विषयावरील गप्पा बंद.

७ आरोग्य :– नित्याची योगासने व व्यायाम नियमितपणे करणे. कडक ब्रम्हचर्य पालन; खानपानात योग्य संयम.

८ सुव्यवस्थितपणा :– यात वेळ व वस्तु प्रामुख्याने समाविष्ट. विविध कार्यांत उपलब्ध वेळेचे सुयोग्य वाटप व स्वत:च्या वस्तुंची निश्चित ठिकाणी नीटनेटकी मांडणी.

९ स्वच्छता :– शरीर, कपडे व सवयी यामधील अस्वच्छता टाळणे.

१० प्रेम :– जगात सर्वांत प्रेमळ दयाघन परमेश्वर आहे ही भावना ठेवणे. कृपाळू भगवंतावर मनापासून आवडीने प्रेम करणे. ज्या कुणाशी जीवनात संबंध येईल तो ईश्वरी अंश आहे असे समजून अत्यंत प्रेमाने व्यवहार करणे.

११ ईशस्मरण :– हरिपाठ व चित्तोपदेश वा तत्सम ग्रंथ यासाठी रोज निदान १० मिनिटे खर्च करणे. झोपतेवेळी व उठताक्षणीच दोन मिनिट ध्यान करणे.

१२ ध्यानयुक्त चिंतन :– बोलणे, वाचणे, लिहिणे, झोपणे या क्रिया सोडून इतर सर्व वेळी आपल्या इष्ट देवतेचे डोळ्यासमोर ध्यान व मनाने स्मरण करा. ' रामकृष्ण ध्यानी रामकृष्ण मनी,' याप्रमाणे सवय जडावी. "ज्याचे जया ध्यान, तैसे होय त्याचे मन" या तुकोक्ती प्रमाणे "हळूहळू पांडुसुता, मीची होशील" या ज्ञानेशांच्या वचनाचा प्रत्यय यावा हा सर्वोच्च आदर्श !

त्यानंतर प्रत्येक आठवड्यासाठी आपल्या इच्छेनुसार वरीलपैकी कोणताही एक गुण निवडण्याचे ठरविले. या निवड केलेल्या गुणाच्या उप-रोक्त व्याख्येनुसार संपूर्ण आठवडाभर संपूर्ण लक्ष या गुणाच्या पालनावर

केन्द्रित करण्यास सांगितले. अर्थात इतर११ गुणाकडे या आठवड्यात दुर्लक्ष करावे असे नाही. फक्त निवडलेल्या गुणाला प्राधान्य देऊन तो प्रथम अंगी बाणवावा व इतरांना तात्पुरते गौणत्व द्यावे एवढाच त्याचा अर्थ. एकाचवेळी सर्व गुणाकडे लक्ष राहून त्यांचे पालन होत नाही म्हणून 'एका आठवड्यास एक गुण' असे वाटप सर्वांना सुचविण्यात आले.

आता या गुणांचे पालन आठवड्यात कितपत झाले याचा एका दृष्टिक्षेपात आढावा घेता यावा म्हणून खालीलप्रमाणे एक तक्ता एका वहीच्या प्रत्येक पृष्टावर काढावयास सांगितला.

विविध गुण संवर्धिनी तक्ता

निवडलेल्या गुणाचे नांव– सत्य

नियम पाळण्याचा कालावधी
दि. ३०।१०।७२ ते ५।११।७२

अ. नं.	गुणाचे नांव	सोम	मंगळ	बुध	गुरू	शुक्र	शनि	रवि
१	सत्य							
२	अहिंसा							
३	निश्चय							
४	काटकसर							
५	उद्योगशिलता							
६	मौन							
७	आरोग्य							
८	सुव्यवस्थितपणा							
९	स्वच्छता							
१०	प्रेम							
११	ईशस्मरण							
१२	ध्यानयुक्त–चिंतन							

सिंहालोकन :–

या तक्त्याच्या सुरवातीला पालनासाठी निवडलेला गुण व निश्चित केलेला कालावधी नमूद केला आहे. रात्री झोपतेवेळी प्रत्येकाने सर्व गुणांचे पालन किती झाले याचे मनाशी निरीक्षण करून पालन झाले असल्यास बरोबरची खूण, व नसल्यास फुलीची खूण त्या गुणाच्या रकान्यात करावी. विशिष्ट आठवड्यात पालनासाठी निवडलेल्या गुणासमोर एकही दिवस फुलीची खूण पडणार नाही यासाठी आटोकाट प्रयत्न प्रत्येकाने करावा !

प्रत्येक आठवड्याला एक याप्रमाणे १२ आठवड्यात १२ गुणांबाबत आत्मनिरीक्षण करावयाचे. एखाद्या गुणाचे पालन अवघड वाटले तर त्याला आणखी एक आठवडा द्यायचा ! गुणांच्या संपूर्ण फेरीमध्ये असे कोणत्याही एकाच गुणाच्या बाबतीत करण्याची संधी दिली गेली. याप्रमाणे १३ आठवड्यात सर्व गुणांची एक फेरी पूर्ण होते. त्यानंतर लगेच दुसऱ्या फेरीला सुरूवात करायची. वर्षभरात अशा चार फेऱ्या होऊ शकतात.

अशी ही गुणसंवर्धन योजना प्रथम समजाऊन सांगून वसतीगृहातील २२ विद्यार्थ्यांनी ती अंमलात आणण्याचा दृढसंकल्प केला ३० आक्टों. १९७२ ते २८ जाने. १९७३ पर्यंतच्या आठवड्यात सर्व गुणांची फेरी पूर्ण झाली. या कालखंडात यासाठी तयार करण्यात आलेल्या विविध गुणसंवर्धिनी हे नामाभिधान दिलेल्या विद्यार्थ्यांच्या वह्यांचे निरीक्षण वेळोवेळी केले गेले. साप्ताहिक तक्त्याच्या शेवटी प्रत्येकाला त्या विशिष्ट आठवड्याचा अनुभव लिहिण्यास सांगण्यात आले.

सर्व गुणांची एक फेरी पूर्ण झाल्यावर सर्व वह्यांच्या व प्रत्यक्ष मुलाखतींच्या आधारे आढावा घेऊन निष्कर्ष काढण्यात आले. कृती संशोधनाच्या (*Action research*) शास्त्रानुसार काही तक्ते तयार करून या प्रयोगाचे जे मूल्यमापन केले, तो सर्वच येथे उद्धृत करणे शक्य नसले तरी सारांशरुपाने खालीलप्रमाणे ते नमूद करता येईल.

१. गुण पालनातील कठिणता व सुलभता लक्षात घेऊन त्यांच्या निवडीचा क्रम १४ विद्यार्थ्यांनी अवलंबिला. इतर ६ जणांनी आहे तोच क्रम कायम ठेवला.

२. ज्या गुणांचे पालन विद्यार्थ्यांना अवघड गेले त्यांच्या कठिणतेचा प्रमाणानुसार लावलेला क्रम असा :–

कठिणतेचा क्रम	गुण	किती विद्यार्थ्यांना कोणता गुण सर्वात अवघड वाटला?
१	ध्यानयुक्त चिंतन	२२
२	सत्य	७
३	मौन; आरोग्य	६
४	सुव्यवस्थितपणा	४
५	स्वच्छता; उद्योगशीलता	३
६	प्रेम; निश्चय; अहिंसा	२
७	काटकसर; ईशस्मरण	०

३. एखादा गुण अत्यंत अवघड व आव्हान देणारा वाटावा म्हणून 'ध्यानयुक्त चिंतन' या गुणाचा समावेश मुद्दामच केला होता. तो सर्वांना कठिण वाटणे स्वाभाविकच होते. तसेच विद्यार्थी गरीब असल्याने काटकसर व वसतीगृहातील कार्यक्रमाचा दैनंदिन भाग असल्यानें ईशस्मरण, हे दोन गुण सर्वांना सुलभतेने पाळता आले.

४. वरील ३ गुण अपवाद म्हणून सोडल्यास विद्यार्थ्यांना पालनाच्या दृष्टीने अवघड वाटलेले गुण म्हणजे सत्य, मौन. आरोग्य व सुव्यवस्थितपणा हे होय.

५. (साप्ताहिक सिंहावलोकन जरी चाळले तरी) विद्यार्थ्याच्या आचरणावर झालेला सुपरिणाम सहज जाणवतो. त्यांच्या वहयांमधील खालील वाक्ये झालेला इष्ट बदल सूचित करतात.

–पुष्कळ वेळा खोटे बोलल्यानंतर सत्य गुण पाळायचा आहे याची आठवण होई. पुढे पुढे खोटे बोलण्याचा प्रसंग येताच आधी आठवण होऊ लागली.

–नियमित करत असलेली विनाकारणची बडबड बंद झाली. त्यामुळे डोक्याला पडत असलेला ताण कमी होऊन अभ्यासाला, स्मरणशक्तीला फायदा झाला.

–'अहिंसा' पालनाने आमूलाग्र बदल मला माझ्या अंत:करणात झाल्यासारखा वाटतो. कुणी एखादा टोचून बोलला तर खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून त्याच्याशी सहमत व्हावे लागे.

– मी किती अस्वच्छ राहतो हे प्रत्ययाला आले. प्रत्येक व्यक्तीशी बोलतांना ही व्यक्ती कुणीतरी आपल्या जवळची आहे असा भाव, प्रेम या गुणामुळे उत्पन्न झाले.

–नामस्मरणाने एक प्रकारचा आनंद व उत्साह संचरतो.

अर्थात या प्रयोगाचे परिणाम स्थान, विद्यार्थी–संख्या व त्यांची परिस्थिती व पार्श्वभूमी यानुसार बदलतील हे उघड आहे. प्रयोगाचे स्वरूप व दिशा लक्षात यावी म्हणून सारांशरूपाने हे विवेचन केले आहे.

व्यापक व सखोल अशा दोन प्रकारांत उपरिनिर्दिष्ट उपायांचे केलेले विभाजन स्थूल स्वरूपाचे आहे हे वाचकांच्या लक्षात आले असेलच. काही उपक्रमांचे स्वरूप असे आहे की ते दोन्ही प्रकारात मोडू शकतात. अशा वेळी अभिप्रेत असलेल्या प्रयत्नांची दिशा व्यक्तिगत असली तर तो उपाय सखोल प्रकार म्हणून व सामूहिक असली तर तो उपक्रम व्यापक स्वरूपाचा गृहित धरला आहे.

सर्व शाळांचा सामुदायिक कार्यक्रम

गतवर्षीपर्यंत झालेले सर्व कार्यक्रम केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यापुरते सीमित होते. १९७१ च्या शैक्षणिक वर्षांत आम्ही कॉलेज बाहेर एका प्रयोगाची मुहूर्तमेढ रोवली. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला संपूर्ण नगरात अनुकूलता उत्पन्न व्हावी म्हणून गावातील पाचही शाळांच्या सर्व मुख्याध्यांपकाशी विचार विनिमय केला. सर्वांनी आमच्या कल्पनेला आनंदाने सहकार्य देण्याचे ठरविले.

त्यानुसार सर्व शाळांतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक, श्री शिवाजी हायस्कूलच्या पटांगणावर शनिवारी सकाळी ८ पर्यंत एकत्रित झाले. कार्यक्रमाची आधीपासूनच जय्यत तयारी होती. ठळक जागी श्रेष्ठ पुरूषांच्या तसबिरी लावल्या होत्या. शाळेच्या आवारात पाऊल ठेवताच विद्यार्थ्यांच्या दृष्टीला एक फलक पडत होता. त्यामध्ये या कार्यक्रमाचा हेतू व संपूर्ण मौन पालनाचे आवाहन केले होते. बोलणे थांब-

बून मुले पटांगणात जाताच सुरू असलेल्या सामूहिक गीतांमध्ये आपला सूर मिसळू लागत. संभाषण करण्याची मुळी त्यांना संधीच मिळत नव्हती. प्रत्येक शाळा आपापल्या निश्चित जागी याप्रमाणे स्थानापन्न होताच चित्तोपदेशाच्या गंभीर निनादात कार्यक्रमाला सुरूवात झाली. सुमारे १० श्लोक सामूहिकपणे म्हणून झाल्यावर सर्वांना मांडी घालून देह व मनाची निश्चलता ठेवून ताठ बसविण्यात आले व तीन मिनिटांचे संपूर्ण मौन पाळण्यात आले. सुमारे ३००० विद्यार्थी आपल्या शिक्षकासह डोळे मिटून ध्यान करीत असल्याचे ते दृष्य सर्वांच्या मनावर एक ठसा उमटून गेल्याशिवाय राहिले नाही. 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' म्हणून ही शांतता संपविण्यात आली. त्यानंतर आमच्या प्राध्यापकांचा आकर्षक व बोधप्रद असा कथा कथनाचा सुमारे २५ मिनिटांचा कार्यक्रम झाला. पसायदानाने या नैतिक शिक्षण वर्गाची सांगता झाली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत नीटनेटका, आटोपशीर व शिस्तीत पार पडला.

असे ५–६ सामूहिक वर्ग शनिवारी प्रातःकाळी घेण्यात आले. अर्थात हे सर्व घडून यावयास पूर्वतयारी बरीच करावी लागली. सर्व शाळेतील सर्व शिक्षकांसोबत एकत्रित बसून विचार विनिमय केला, या प्रयोगाचे महत्व व भूमिका समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक शाळेत विद्यार्थी पाठवून तेथील विद्यार्थ्यांची श्लोक व गीते म्हणण्याची तयारी करवून घेतली गेली.

मूल्यांकन करण्याइतपत या प्रयोगाचा विस्तार अर्थातच अद्याप झालेला नाही. पण आम्ही शिक्षक–विद्यार्थी, शाळा भिन्न असल्या तरी, कुठल्याही चांगल्या उपक्रमासाठी अंतःकरणाने एक आहोत हा भाव प्रस्फुटित झाला. विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम आवडलेला दिसला. एका शनिवारी हा एकत्रित वर्ग घेता न आल्याने श्रीशिवाजी शाळेचे विद्यार्थी तसाच कार्यक्रम निदान शाळेपुरता तरी व्हावा म्हणून फार आग्रह करू लागले. मुख्याध्यापकांना अखेर या वर्गाची योजना करून वेळेवर कार्यक्रम घ्यावा लागला !

सर्व नाही तरी काही थोडचा कार्यक्रमांची जी छायाचित्रे काढली गेली. ती ग्रंथात समाविष्ट केली आहे. त्यावरून मेहकरमधील या उपक्रमाची थोडीबहुत कल्पना येऊ शकेल.

प्रयोगाची फलश्रुती

आता उरली ती या प्रयोगाची फलश्रुती! या सर्व खटाटोपाचा प्रत्यक्ष परिणाम काय झाला ? या योजनेचे अखेर निष्पन्न काय निघाले? असे प्रश्न जिज्ञासू वाचकांच्या मनांत साहजिकच उद्भवतील. दृष्य स्वरूपात त्याचा परिणाम मोजणे अशक्य असल्यानें या प्रश्नाचे उत्तर देणे खरोखरी अवघड आहे. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे फलित मुख्यतः मानसिक व भावात्मक *(Abstract)* असल्यामुळे त्याची मोजदाद करणे धाडसाचे होईल.

परंतु सर्वसामान्य विद्यार्थ्याचे वर्तन व जीवनक्रम ह्यांत जर त्याच्या मानसिक व वैचारिक स्थितीचे प्रतिबिंब पडत असेल तर इतर महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी–जीवन हे अंशतः कां होईना वेगळे असलेले आढळून यावे. दैनंदिन सामुहिक प्रार्थनेने, रोजच्या दोनच मिनिटे कां होईना पाळल्या जाणाऱ्या ध्यानामुळे व इतर अनेक कार्यक्रमामुळे एक प्रकारची शिस्त त्यांच्या अंगी बाणलेली अनुभवास येईल नैतिक गुणांची जोपासना करावी अशी भावना विद्यार्थ्यांत वाढीला लागली. उच्छृंखलतेला बराच आळा बसू शकला. पालकांनी व विद्यार्थ्यांनी शिक्षण सुरू असतांना वा महाविद्यालय सोडल्यावर धाडलेल्या पत्रांत व्यक्त झालेले आंतरिक समाधान व कृतज्ञता हे जर या शिक्षणाच्या यशस्वितेचे स्वल्पसे गमक मानले तर अत्यल्प का होईना या योजनेला यश मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरू नये. किती तरी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडून गेल्यावर आपल्या स्मृतींना उजाळा देऊन जीवनाला ही योजना उपकारक ठरल्याचे आवर्जून नमूद केले आहे.[1]

यशाचे श्रेय–प्राध्यापकांना

मात्र या यशाचे श्रेय प्रामुख्याने जाते ते माझ्या प्राध्यापक मित्रांना! प्राध्यापक म्हणजे प्राचार्यांचे जणू हातच ! ते जेवढे प्रभावी, कुशल नि कल्पक असतील तेवढ्या प्रमाणात अशा योजना सफल व्हायच्या ! सुदैवाने या बाबतीत मी भाग्यवान म्हणायचा ! समान विचारांचा एकजिनसी अध्यापक वर्ग मला मिळाला ! महाविद्यालयाच्या प्रारंभा-

पासून तळमळीने खांद्याला खांदा लावून खपणारे या योजनेतील माझे मुख्य सहकारी प्रा: म. के. निरखी; आपल्या वक्तृत्वाने विद्यार्थ्यांना प्रभावित करून त्यांच्या अंतरंगाची घडण घडविण्यात चतुर असलेले आचार्य प्रा. नि. आ. वक्काणी, विद्यार्थीनींच्या हिताकडे विशेष लक्ष पुरवून लागेल ते सहकार्य देण्यास नित्य तत्पर असलेल्या प्रा. सौ. भाग्य-रेखाबाई देशमुख, अशा किती नावांचा उल्लेख करावा ! सर्वात जेष्ठ म्हणून वेळोवेळी प्रेमाचा सल्ला देणाऱ्या प्रा. पुराणिकापासून तो न कुरकुरता अव्याहत कष्ट उपसणाऱ्या श्री महादेव चपराशापर्यंत सर्वांनी वरील प्रयोगासाठी जिव्हाळ्याने कार्य केले.

हे सर्व नमूद करण्याचे कारण इतकेच की कुणाही एकट्या-दुकट्या व्यक्ती कडून हे काम होणे नाही हे वाचकांच्या लक्षात यावे. काही अध्यापक विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या तळमळीने जीवाभावाने एकत्र आले आणि त्यांनी परस्पर सहकार्याने सातत्याने कार्य सुरू ठेवले तरच थोडे बहुत कार्य होण्याचा संभव !

प्रयोगाविषयी असमाधान

काही वाचकांना, त्यांच्या अंत:करणातील सद्भावामुळे, जे काही वरील अल्पस्वल्प प्रयत्न कॉलेजात केले गेले, त्याचे कौतुक वाटेल. पण हे मी स्पष्ट करू इच्छितो की या प्रयोगाबद्दल माझ्या मनांत पुरेसे समाधान नाही. हे विधान वाचून वाचकांना आश्चर्य वाटेल पण ही वस्तुस्थिती आहे. या अत्यल्प यशामुळे माझी असंतुष्टता अधिक वाढली आहे. या प्रयोगाला प्रयत्नाच्या मानाने पुरेसे यश आलेले नाही असे माझे पूर्ण विचारांती मत बनले आहे. त्याची मुख्य कारणे तीन.

पहिले असे कीं कॉलेजातील सर्व योजनात सहभागी झाले पाहिजे असे बंधन नसल्याने किती तरी चांगले विद्यार्थी हा प्रयोग लांबून पहात राहिले. नदीकाठी असूनही एखादा तृषित अज्ञानामुळें तहानलेला रहावा तसे यांच्या बाबतीत घडले. या शिक्षणाविषयी कांही गैरसमज; उपहासाचा भाव व आजच्या दूषित वातावरणामुळे कुठलीही चांगली गोष्ट करण्याविषयीची लाज यामुळे हे सत्प्रवृत्त विद्यार्थी या योजनेपासून अलिप्त राहिले.

मुळचीच अनिष्ट प्रवृत्ती असलेले जे थोडे विद्यार्थी प्रत्येक महाविद्यालयात असतात त्यांच्या जीवनात व प्रवृत्तीत अपेक्षेप्रमाणे बदल घडून आला नाही. बाह्यतः जरी काही कार्यक्रमात ते सहभागी असल्याचे दिसत असले तरी त्यांच्या अंतरंगात ही योजना प्रवेश मिळवू शकली नाही.

तिसरे कारण म्हणजे शासन वा विद्यापीठातर्फे नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेला अधिकृत पाठिंबा नसणे. तसा तो मिळता तर या योजनेची पार्श्वभूमीच एकदम बदलली असती. त्याकडे पहाण्याचा सर्वांचा दृष्टिकोनच बदलला असता. या योजनेतील सर्व कार्यक्रमांना एक प्रकारे प्रतिष्ठा प्राप्त झाली असती.

असमाधान तरीही प्रयोगावरील विश्वासात वृद्धी

वरील सर्व अडचणी नि अडथळे असूनही या योजनेला विद्यार्थ्यांनी केवढा तरी प्रतिसाद दिला! अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळाली, कांही थोडयांची जीवने पालटून गेली. मग वरील अडचणी दूर झाल्या तर.....?

केवढा तरी प्रचंड अनुकूल बदल झाल्याचे प्रत्ययाला येईल. आजवरच्या अनुभवाने या योजनेच्या यशस्वितेची व या शिक्षणाच्या संभाव्य सुपरिणामाची मला येवढी खात्री वाटू लागली आहे, माझा त्यासंबंधिचा विश्वास एवढा दुणावला आहे की, शिक्षण क्षेत्रात भेडसावणारे अनेक प्रश्न सहजपणे सुटण्यास या योजनेमुळे फार मोठी मदत होऊ शकेल असे उत्कटपणे वाटते. माझी श्रद्धा आहे की वाचकापैकी कुणी या दिशेने तळमळीने पाऊल उचलले तर त्यांनाही हाच अनुभव येईल.

संदर्भ टीपा

१. श्री. समर्थ रामदास स्वामी : मनास बोध; श्लोक १६७; १७०.

२. *E. A. Gilmore : Religion in a State University; Address on Sept. 22, 1935; State University of Iowa.*

३. *Miss. S. Panandikar : Circuler No. 150/199-c dt. 9-6-1956. Poona 1; from the Director of Education; Bombay State.*

४. *Moral and Spiritual Values for Mankind; Rajastan Board of Secondary Education; Ajmer; 1962.*

५. परिशिष्ट क्र २ मध्ये कांही महाविद्यालयातील समितीचे अभ्यासक्रम दिले आहेत.

६. *Vide item No. 6 of the Agenda of the Academic Council Meeting of Nagpur University on 29-5-67.*


७. पहा दैनिक नागपूर टाईम्स् नागपूर दि. १२-२-७०.

८. *The Autobiography of Benjamin Franklin; Grolier Classics; p. 213 to 217.*


९. विद्यार्थ्यांच्या निवडक पत्रांसाठी पहा.
'प्रेरणा;' वार्षिक १९६६ मे. ए. सोसायटी कला वाणिज्य महाविद्यालय, मेहकर द्वारा प्रकाशित.



महाविद्यालयाचा ध्यान-वर्ग : ध्यानातून प्रेरणा-प्राप्ती



ज्ञान मंदिरात भक्ती आणि कर्म यांची उपासना



सर्व शाळांतील सुमारे ३००० विद्यार्थी श्री ज्ञानदेवांचे
पसायदान मागतांना

बारा

शिक्षणाची अल्पावधी व दिर्घावधी योजना

" तात्पुरत्या भविष्यकाळाकडे पाहण्यापेक्षा दूरच्या भविष्याकडे पाहून स्वत:बद्दल आदर निर्माण होईल अशी पुढील पिढी निर्माण करण्याकडे कोणी जबाबदार नेते कसे बघत नाहीत? पंच-वार्षिक योजना तयार करण्याऐवजी साऱ्या जगाला योग्य नैतिक शिक्षण देणारी योजना कुणी नरश्रेष्ठ कसा काढीत नाही? असे जर कुणी केले तर ते एक भव्य व अजरामर कार्य होईल! "

लॉक्म्टे डी. नॉय[१].

" *India is the one country in the world in which it is still easy to be religious, in which the atmosphere of the land and the psychic currents are not yet wholly penetrated with materiality. If religion perish here, it will perish everywhere . . . India, bereft of spirituality will have no future, but will pass on into the darkness, as Greece and Rome have passed.* "

Annie Besant.[२]

योजना का, कोणत्या रीतीने व कशी ?

अंतिम प्रकरण म्हणजे ग्रंथाचा कळस ! कळसाचे दर्शन घेतले तरी देवालयातील देवाचे दर्शन घेतल्याचे फळ मिळते, ही सामान्य समजूत ! ग्रंथरूपी मंदिराचा कळस समजल्या जाणाऱ्या या अंतिम अध्यायाच्या बाबतीत वाचकांची अशीच समजूत असली तर ती वावगी कशी म्हणता येईल ? म्हणूनच संपूर्ण ग्रंथाचे सार समाविष्ट करण्याचा यथामती प्रयत्न केला आहे तो प्रामुख्याने या प्रकरणातच !

आपण अनुक्रमणिकेवर नजर टाका. आपल्या लक्षात येईल की पहिले व शेवटले – उपोद्घात् व उपसंहाराचे – प्रकरण सोडले तर, या ग्रंथात केलेल्या संपूर्ण विवेचनाचे प्रमुख असे तीन विभाग पडतात. सारांशरूपाने असे म्हणता येईल कीं, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजना का, कोणत्या अडचणींना तोंड देऊन व कशी अंमलात आणायची या त्रिविध प्रश्नांचे समाधानकारक उत्तर शोधण्याचा यथामती केलेला एक प्रयत्न म्हणजे या तीन विभागात आलेले विवेचन !

कोणत्याही समस्येचे उत्तर द्यायला कुणी पुढे आले, म्हणजे ते उत्तर देणाऱ्याला, ते उत्तर का ? व कसे ? *(How & why)* हा प्रश्न विचारला जातोच नि ते स्वाभाविकही आहे. कारण जीवनातील विविध

समस्यांना - मग ती व्यक्तिगत असो की सामाजिक – प्रत्येक जण आपापल्या बुद्धी व धारणेनुसार काहीनाकाही उत्तर शोधत असतो. त्यामुळे समस्या अेकच असली तरी उत्तरांची संख्या मात्र मोठी असते. अर्थात ही सर्व उत्तरे बरोबर असणे संभवनीय नाही. " एक प्रश्न - एक उत्तर " असे सूत्र अचूक अशा विज्ञानशास्त्रात आढळते. सामाजिक वा शिक्षण शास्त्रांत मात्र एका समस्येला अनेक उत्तरांचा संभव नाकारता येत नाही. त्यामुळे अशा शास्त्रांत अमुकच उत्तर का व कसे ? या प्रश्नाला विशेष महत्व येते; कारण ते जेवढे तर्कशुद्ध, व प्रभावी असेल, तेवढे ते अधिक पटणार !

शिक्षण–राष्ट्र घडविणाऱ्या नागरिकांची टाकसाळ

डॉ. अॅनी बेझंट[१] शिक्षणाचे महत्व विशद करतांना लिहितात, " *No more important question can occupy the attention of a nation than that of the education of the youth of both sexes, for as the immediate future lies in the hands of those who are now children, the direction of the national development depends on the training given to these embryo men and women.* "

कोणत्याही राष्ट्रीय समस्यांमध्ये शिक्षण समस्येला एवढे महत्व असल्यानेच संरक्षण, आरोग्य, इ. बाबींप्रमाणेच नागरिकांच्या शिक्षणाच्या बाबतीत चूक होऊ देणे, देशाला परवडण्यासारखे नाही[२], कारण राष्ट्र म्हणजे काही केवळ त्यामध्ये असलेले नद्या, पर्वत व जंगले नव्हेत, तर राष्ट्र म्हणजे त्यातील शीलसंपन्न व सदाचारी नागरिक, ज्यांच्यामुळे सर्व गोष्टी अनुकूल होतात व जे आपल्या पाठीशी प्रत्यक्ष परमेश्वर उभा करू शकतात ! मग हवे ते सर्व त्यांना प्राप्त झाल्यास काय आश्चर्य[३] ? तेव्हा राष्ट्र घडविणारे नागरिक घडविण्याची टांकसाळ म्हणजे शिक्षण !

शिक्षण ही राष्ट्रपुरूषाची जणु नाडी

शिक्षण ही राष्ट्रपुरूषाची जणु नाडीच ! नाडी पाहून हृदयाचे ठोके कसे पडत आहेत हे कळते, त्याचप्रमाणे शिक्षण व्यवस्था कशी आहे, हे पाहून भावी नागरिकांच्या हृदयातील विचार व आचार यांच्या प्रवाहाची दिशा समजते; विद्यार्थ्यांच्या हृदयावर होणारे संस्कार समजतात ! सद्गुणरूपी रक्तवाहिन्यात दुर्गूणरूपी रक्तदोषाचे प्रमाण किती वाढले आहे

ते समजते ! स्वातंत्र्यरूपी साखरेचे सेवन अति झाल्याने स्वैराचाराचा मधुमेह विद्यार्थीवर्गाला जडला आहे की काय ? हे शिक्षणाची नाडी पाहिल्यानें तेव्हाच कळते. विद्वत्तेसोबत येणाऱ्या अहंकाररूपी क्षयाची दुर्धर व्याधी युवकवर्गाला जडली काय? याचा अंदाज करता येतो! व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक व अहंमन्यता या रोगाची परिणती विद्यार्थी विश्वांतील सामुदायिक उद्रेकरूपी कॅन्सर सारख्या भयानक रोगात झाली किंवा कसे ? याचे अनुमान करणे अवघड नसते. विद्यार्थ्यांतर्फे सामुदायिकरीत्या होत असलेला विध्वंस व विनाश हा एक प्रकारचा कॅन्सर जडण्याचे द्योतक नव्हे तर काय ? सारांश, शिक्षण कसे आहे ? यावरून त्या देशातील विद्यार्थी कसा आहे ? व विद्यार्थी कसा आहे, यावरून त्या राष्ट्राचे भवितव्य कसे आहे ? हे सहज समजू शकते! विद्यार्थ्याची कुंडली पाहून देशाचे भविष्य सहज वर्तविता येते. तेव्हा आदर्श विद्यार्थी तयार करणे हे आदर्श राष्ट्र तयार करण्याइतके मूलभूत कार्य आहे !

शिक्षण – समस्येवर अनेकांची अनेक उत्तरे

अनेक विद्वान ही समस्या सोडविण्यासाठी अनेक उपाय सुचवितील, नव्हे, आज देशभर, विविध राज्यांत, शासन व अनेक समाजसंस्था यांच्याद्वारे, त्यांच्या दृष्टिकोनातून, विभिन्न प्रयत्न सुरू आहेत. शिक्षणाला लागलेल्या रोगाचे, ज्याचे जसे निदान, तसे उपचार, अवलंबिले जात आहेत. राष्ट्ररक्षणासाठी क्षात्रतेज वाढविण्याची गरज आहे, म्हणून सैनिकी-शाळांची स्थापना काहींनी केली, सामाजिक प्रश्नांची जाणीव समाजाला नाही, असे वाटून समाज प्रबोधन संस्था अस्तित्वात आल्या, विज्ञानातील पिछेहाटीमुळे देश मागासला असे वाटून, विज्ञान शिक्षण देण्याची विशेष व्यवस्था काहींनी उपलब्ध केली, उत्तम साहित्य विद्यार्थ्यांनी वाचावे, म्हणून ग्रंथालयासाठी अनुदान सुरु झाले, शारीरिक शिक्षणाचा अभाव, हे विद्यार्थी जीवनातील मुख्य शल्य आहे असे वाटून शारीरिक शिक्षण– महाविद्यालयांची स्थापना झाली, समाज-सेवा व राष्ट्रप्रेम उत्पन्न व्हावे म्हणून मध्यवर्ती शासनाने "राष्ट्रीय सेवा योजना" (*National Service Scheme*), देशभर आयोजित करून, लक्षावधी

रूपये खर्च केले, विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन द्यावे म्हणून "राष्ट्रिय युवक मेळावे" (*National Youth Seminar*) राष्ट्रीय पातळीवर दरवर्षी साजरे केले जात आहेत; परंतु शिक्षणाची मूलभूत समस्या मात्र अद्यापही सुटल्याचे चिन्ह दिसत नाही ! किंवहुना ही समस्या अधिकाधिक गुंतागुतीची होत असून, विद्यार्थी वर्ग वाढत्या वेगाने, बेफाम, बेशरत, व बेदरकार होत असल्याचे दिसून येत आहे !

सोयी - सवलतींचा दुरूपयोग

आणि असे होणे स्वाभाविकच आहे. कारण हे सर्व प्रयत्न म्हणजे शिक्षणाला लागलेल्या रोगाची केवळ बाह्य लक्षणे दूर करण्याची धडपड होय! अर्थात वरील सर्व उपाय निरुपयोगी व निरर्थक आहेत, असे कुणीच म्हणणार नाही. शिक्षणाचे जे विशिष्ट अंग सुधारावे म्हणून हे विभिन्न मार्ग अवलंबिले जात आहेत, त्यामुळे ते अंग पुष्ट करण्यास थोडे बहुत सहाय्य खचित होईल पण शिक्षणाच्या सर्वांगाचा साकल्याने विचार करून संपूर्ण विद्यार्थी जीवन पुष्ट होईल, अशी मूलभूत औषध योजना व्हावयास हवी. कल्पना करा, एक अत्यंत बुद्धिवान, सुशिक्षित, धडधाकट प्रकृतीचा देखणा तरूण आहे. परंतु त्याच्या मेंदूत थोडा बिघाड आहे, असे कळताच त्याच्या इतर सर्व चांगल्या गोष्टी मातीमोल ठरतात. त्याचप्रमाणे विविध खेळ, ग्रंथालय, सैनिक, वा शारीरिक शिक्षण, अभ्यास व संशोधनासाठी अनेक सवलती व शिष्यवृत्त्या इ. अनेक सोयी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या, तरी या सर्व शिक्षण साधनांचा लाभ घेण्यासाठी मनाची व बुद्धीची तर प्रवृत्तीच नसेल, तर त्या सर्व निरुपयोगीच ठरतील. इतकेच नव्हे तर विद्यार्थी विकृत मनाचा व विपरीत बुद्धीचा असेल, तर शिक्षणाच्या या सर्व साधनांचा दुरूपयोग झाल्यास आश्चर्य वाटायला नको ! खेळ व व्यायामाने कमावलेलो देहयष्टी व सैनिक शिक्षणाने मिळालेले अद्यावत आयुधांचे ज्ञान, दुर्बलांचे सहाय्य व राष्ट्राचे संरक्षण, यासाठी उपयोगात येण्याऐवजी दुर्जनांना सहाय्य व राष्ट्राचा द्रोह, यासाठी वापरले जाईल. ज्ञानाचा लाभ जनकल्याणाप्रित्यर्थं होण्याऐवजी जनतेच्या पिळवणुकीला तो कारणीभूत होऊ शकेल. शिक्षणाद्वारे प्राप्त होणारे भाषावैभव चिरंतन - प्रेरक साहित्याच्या सृजनासाठी वापरले

जाण्याऐवजी, मानवी विकारांना उत्तेजन देणारे, चटोर वाङ्मय निर्माण करण्यासाठी, वेठीस धरले जाईल. विद्यार्थ्यांचे युवावस्थेतील व्यक्तित्व व कर्तृत्व राष्ट्रकार्यासाठी वा तत्सम उच्च ध्येयासाठी समर्पित होण्याऐवजी, क्षुल्लक व्यक्तिगत स्वार्थांसाठी वेचले जाईल. दुर्दैवाने आज सर्वत्र ही विकृती देशभर थैमान घालत असलेली दिसत नाही का ?

कान बधिर करणारी वार्ता

परवा आलेली वातमी तर फार गंभीर आहे. मद्रासच्या एका महिला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळी काही विद्यार्थ्यांनी अर्ध्या तासासाठी वीज पुरवठा तोडून टाकला व सर्वत्र अंधार होताच गुंडांनी कॉलेजच्या मुलीवर अत्याचार केले. अध्यापिका व बाहेरून कार्यक्रम पाहण्यासाठी आलेल्या मुली यावरही अत्याचार केले गेले.[६] आतापावेतो विद्यार्थ्यांचे संप, परीक्षांवर वहिष्कार, सामुदायिक नक्कल, सार्वजनिक मालमत्तेचा व शिक्षणसंस्थेचा विध्वंस, दंगल, मारामारी, गोळीबार, राष्ट्रीय नेत्यांची प्रतिमा व राष्ट्रध्वज यांचे दहन इ. सारख्या चिंताजनक घटना सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. भारतीय तरूणांनी, योजनापूर्वक, स्त्रीत्वाचा सामुदायिकरीत्या, अपमान करण्याचे नुकतेच केलेले हे दु:साहस, खरोखरी कान वधिर करून टाकणारे आहे. चित्त भयचकित करणारे आहे. समाजातील माताभगिनींनी यापुढे कुणाच्या भरवंशावर रस्त्यावर पाऊल ठेवायचे ? संरक्षणासाठी कुणाच्या सामर्थ्याचा समर्थ आधार शोधायचा ?

ज्ञान इतिहासात कधीही न उद्भवलेली समस्या

आमच्या मते सद्य:स्थितीत विद्यार्थी–जीवनाचे जे प्रश्न आज भारताला, नव्हे जगाला भेडसावत आहेत, ते तशा स्वरूपात यापूर्वी जागतिक इतिहासात आजवर केव्हाही उत्पन्न झाले नव्हते. हे विधान मी फार खोल विचारांती व पूर्ण जबाबदारीने करीत आहे. मागच्या पिढीने पुढच्या पिढीला नावे ठेवावयाची या सामान्य प्रथेपुरतेच या प्रश्नांचे स्वरूप सिमीत आहे, असे कुणी गृहीत धरत असेल, तर ते एका अति गंभीर होत चाललेल्या प्रश्नाला अतिसौम्य स्वरूप देत आहेत असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. तसे खरोखरीच असते तर बदलत्या काळाच्या त्या

पाऊल खुणा आहेत असे म्हणून त्याची सहज उपेक्षा करता आली असती; पण वस्तुस्थितीने केव्हाच गंभीर वळण घेतले आहे; इतकेच नव्हे, तर आणखी १०–२० वर्षे आहे हीच शिक्षण सुधारणेची आबाळ चालू राहिली, तर परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल. तिला सावरणे अशक्यप्राय होईल असे म्हणणे अतिशयोक्तिचे ठरू नये.

मूलभूत जीवनमूल्यावरच कुठाराघात

पूर्वी कधीही न उद्भवलेली एवढी गंभीर परिस्थिती खरोखरीच आज उत्पन्न झाली आहे का ? आणि तुम्ही म्हणता अशी काळजी करण्याजोगी स्थिती असेल तर त्याची कारणे कोणती ? असे प्रश्न वाचकांच्या मनात साहजिकच येतील. ही समस्या आम्हाला इतकी भयानक वाटते याचे मुख्य कारण नागरिकाने 'माणूस' म्हणून जगण्या-साठीं जी काही 'जीवनमूल्यें' आजवर जोपासली आहेत, जगात रूढ केली आहेत. परस्पर साहचर्य व सामंजस्य यांच्यासाठी मान्यता पावली आहेत. त्यांच्यावरच आज कुठाराघात होऊ लागला आहे. तीच आज पायदळी तुडविली जात आहेत.

जीवनमूल्ये नीतीचा मापदन्ड

ही जीवनमूल्ये क्षीण होणे ... एवढ्यावरच हे थांबले असते तरी त्याचे फारसे दु:ख वाटण्याचे कारण नव्हते. कारण इतिहासात अनादि-काळापासून अनेकवेळा त्याची पुनरावृत्ती झाली आहे. पण आज जे घडत आहे त्याचे बाह्य स्वरूप जरी पूर्वी घडले तसेच असले, तरी त्याची पार्श्वभूमी मात्र अगदी वेगळी आहे. आजवर जेव्हा जेव्हा जीवनमूल्याची पायमल्ली होईल तेव्हा तेव्हा ती गोष्ट निंद्य निषिद्ध व त्याज्य म्हणूनच ओळखली जाई. ज्या व्यक्तिकडून हे घडे तिची समाजात हेटाळणी होई. प्रतिष्ठा संपुष्टात येई. समाजात त्या व्यक्तिची अवहेलना, अवमूल्यन होत असे. समाज जीवनात तिचे स्थान व दर्जा खालावत असे. अशा होणाऱ्या सामाजिक प्रतिक्रियेला अनुरूप असाच प्रतिसाद व्यक्तिचाही असे. विविध प्रकारे व्यक्त होणारा सामाजिक क्षोभ ती व्यक्ती निमूटपणे सहन करी. किंबहुना आपल्या हातून जीवनमूल्यांच्या झालेल्या अवमानाचा हा अपरिहार्य परिणाम आहे, अशीच त्या व्यक्तिची धारणा असे. असे

वर्तन करणारी व्यक्ती देखील, एक तर आपल्या चुकीची कबुली देऊन, चूक केलीच नाही असे प्रतिपादन करून वा कोणत्या अपरिहार्य कारणाने चूक झाली हे विशद करून कां होईना, पण जीवनमूल्यांना मान्यता दर्शवित असे, पश्चात्ताप व्यक्त करित असे. लॉ रॉचेफाकॉल्ड याने म्हटल्याप्रमाणे, *" Hypocray is the homage which vice pays to virtue "* दांभिकपणाला देखिल अखेर आधार असतो या जीवनमूल्यांचाच

आव्हान आहे ते या मापदन्डालाच !

परंतु आज आव्हान दिले जाऊ लागले आहे ते या जीवनमुल्यांच्या मापदंडालाच ! माणूस बंड करून उठला आहे. ते या जीवन धारणेच्या तत्वांच्या विरुद्धच ! नीतिमत्तेचे कसलेच विधिनिषेध त्याला नको आहेत. समाज जीवनाची सर्व बंधने झुगारून स्वैर जीवनाकडे त्याची वाटचाल सुरू झाली आहे. मन मानेल तसे वागण्याचे स्वातंत्र्य त्याला हवेसे वाटूलागले आहे. आणि हे सर्व प्रागतिक *(Progressive)*, वैज्ञानिक *(Scientific)* व न्यायोचित *(Justifiable)* आहे असा डांगोरा पिटीत केले जात आहे हे विशेष ! शतकानुशतके मानवी जीवनात स्थिरावलेली जीवनमूल्ये स्विकारणे, त्याचे पालन करणे म्हणजे पुराणमतवादीपणाचे, मागासलेपणाचे व कालबाह्यतेचे लक्षण आहे असा विचार पुढे येऊ लागला आहे. मानवी मनाची, देहाची व आचरणाची शुद्धता इ. गोष्टी अनावश्यक व इतिहासजमा होऊ लागल्या आहेत. आणि भावी संकटाचे भयानक सांवट भेडसावित आहे ते हेच !

स्त्रियांचे शिलहरण हा गुन्हा ? एक खुळचटपणा !

विचाराचा कसा उलटा प्रवाह वाहू लागला आहे, व त्याचे कसे भयानक दुष्परिणाम होऊ लागले आहेत हे आपण एका उदाहरणाने पाहू. स्त्रियांचे शील हा सामान्यत: सर्व देशात व समाजात अत्यंत पवित्र व संरक्षणीय असा एक मानबिंदू मानला जातो. त्याचे संरक्षणासाठी भारतात व इतर अनेक देशांत हजारों स्त्री-पुरूषांनी प्रसंगी प्राणार्पण केल्याच्या घटना इतिहासांत प्रसिद्ध आहेत. चितोडचा जोहार ही तर एक अभिमानास्पद व गौरवाची बाब म्हणून भारतवर्षात सर्वत्र सांगितली जाते. पण आजवर या एकाच कारणासाठी शेकडो

लोकांनी केलेले बलिदान हे खुळचटपणाचे समजले जाईल की काय अशी शंका येऊ लागली आहे. कारण आज विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंध हे केवळ सार्वत्रिकपणे होत आहेत, एवढेच नव्हे, तर ती बाब हळूहळू सहज नि स्वाभाविक म्हणून मान्यता पावू लागली आहे. असे स्त्री जीवन कुणाला निंद्य व निषिद्ध वाटेनासे झाले आहे. घटस्फोट अपवाद म्हणून नव्हे, तर नियम म्हणून सहजपणे मान्यता पावत आहेत. स्त्रिच्या सौन्दर्याचे, नग्नतेचे गलिच्छ प्रदर्शन एवढ्या मोठ्या प्रमाणावर सर्वत्र होऊ लागले आहे, की स्त्रीविषयक शुद्धता व पावित्र्य यांच्या कल्पनातच बदल व्हावा. समलिंगी संभोगाच्या किळसवाण्या गुन्ह्याचे प्रमाण इंग्लंडमध्ये एवढे वाढले की अखेर हा प्रकार यापुढे गुन्हा समजला जाऊ नये असे तेथील विधी-परिषदेने बहुमताने ठरविले आहे. म्हणजे कोणत्याही निकषावर घासून पाहिले असता सुसंस्कृतता व सभ्यता यांना सोडून असलेली व अत्यंत अस्वाभाविक व अशास्त्रीय अशी ही गोष्ट केवळ समाजात फार मोठ्या प्रमाणावर घडते म्हणून प्रतिष्ठित, सर्वमान्य व कायद्याने संमत अशी आपण ठरविली हे केवढे आश्चर्य!

थोडक्यात म्हणजे एके काळच्या जीवनमूल्यांचे उच्चाटन प्रगती व सुधारणा म्हणून समाजात रूढ होऊ लागले आहे. अशा मूलभूत मानवी तत्वांची गळचेपी अध:पतनाचे व स्खलनाचे द्योतक म्हणून समाज समजेनासा झाला आहे. मानवी स्वातंत्र्याचे गोंडस नावाखाली अशाच अनेक गुन्ह्यांना व अपराधांना प्रतिष्ठीतपणा आला आहे.

हिप्पी जीवनाच्या झपाट्याने प्रचार

सुदैव एवढेच की, पाश्चात्य देशांत आज जी मानवी मूल्यें व धारणा यांचे सार्वत्रिक उच्चाटन व अपहरण सुरू आहे, त्याचे लोण तेवढ्या भयानक स्वरूपात अद्याप भारतवर्षात पोहोचलेले नाही पण वहातुकीच्या वेगवान वाहनामुळे सर्व मानव जात परस्परांच्या इतक्या जवळ आली आहे की, आज ना उद्या अनेक देशांत पसरलेली व प्रभावी होत चाललेली ही विचारसरणी भारतात लवकरच प्रादूर्भूत व्हायला वेळ लागणार नाही. हिप्पी, नेगो, बिटल्स इ. स्वैर जीवनाचा प्रचार करणाऱ्या संप्रदायातील अनेक अनुयायी आजच भारतात दिसू लागले आहेत.

अधोगतीकडे नेणाऱ्या व जीवनातील कसल्याही विधिनिषेधांचे सोयरसुतक नसलेल्या अशा जीवन धारणेचा प्रसार व्हायला कितीसा उशिर?

स्वैराचार म्हणजे सुधारणा

जेष्ठांच्या अनुकरणाची स्वाभाविक प्रवृत्ती असलेल्या विद्यार्थ्यांनी पाश्चात्यांची ही वरील जीवन प्रणाली, प्रगती व सुधारणेची द्योतक म्हणून उचलली तर आश्चर्य वाटावयास नको. नव्हे तसे अनुकरण (मोठ्या शहरातून) वाढत्याप्रमाणात सुरू झालेले आहे. जिथे संयम, सद्रूचि व सदाचाराच्या वातावरणाची अपेक्षा करावयाची त्या विद्यापीठातील वातावरणांत स्वैराचार अहंकार व दुराचाराचे दृश्य आज पदोपदी आढळू लागले आहे. ज्या वयात विद्यार्थी काटेकोर नियमांच्या व शिस्तिच्या चाकोरित जीवनाची उभारणी एकाग्रचित्ताने करतांना दिसायला हवा त्या वयात मनमानेल तसे स्वेच्छापूर्वक निरंकुश असे आयुष्य तो घालवितांना दिसू लागला आहे. हे अनुसरण होत आहे ते पाश्चात्याप्रमाणे सुधारणा व प्रगतीच्या नावाखाली भूषणावह आहे, अशा धारणेने! आजवर निदान जीवनमूल्यांचे पालन न करणारे आपण चुक केली आहे, समाजाचे गुन्हेगार आहोत असे समजत असत. त्यासाठी त्यांना पश्चाताप होई.

निंद्य तेच वंद्य घातक तेच पोषक ?

जोपर्यंत एखादे कृत्य निंद्य व समाजहितास घातक वाटेल तोवरच त्याबद्दल पश्चात्तापाची वा दुःखाची भावना उत्पन्न होण्याचा संभव! पण जर वंद्य व निंद्य, पोषक व घातक किंवा योग्य व अयोग्य याबाबत असलेली समाजाची सामाजिक दृष्टीच जर बदलली तर . . , .

तर दुर्दैवाने निंद्य तेच वंद्य, घातक तेच पोषक व अयोग्य तेच योग्य म्हणण्याची पाळी येईल ! नव्हे तशी स्थिती हळूहळू येऊ लागली आहे. आणि पूर्वी उल्लेखिलेली आजवर जगात केव्हाही न उद्भवलेली बिकट परिस्थिती ती हीच; आणि अशी ही भयावह परिस्थिती असल्याची जाणीव बहुसंख्य समाजाला नाही ही या भयंकर परिस्थितीपेक्षाही अधिक चिंताजनक बाब होय. एका कवीने म्हटल्याप्रमाणे,

" Alas, not only has the caravan lost its riches,
It has even lost the sensitiveness to feel the loss."

अशी दुर्दैवी स्थिती आज आपल्या समाजाची झाली आहे. आणि दु:खाची गोष्ट म्हणजे या परिस्थितीच्या दुष्परिणामाची फारशी कुणाला कल्पना नाही.

जगातील सर्व विचारवंतांनी एकत्रित बसून खल करावा अशी ही चिंताजनक स्थिती नाही का ?

बाह्य अराजक आत्मग्लानीचे द्योतक.

तेव्हा कोणत्याही एकांगी, तात्कालिक व वरवरच्या उपायाने ही शिक्षण समस्या सुटण्याची आशा बाळगणे व्यर्थ आहे. बाह्य जीवनात दृग्गोचर होणारा गोंधळ मनातील आंतरिक अराजकतेचे प्रतीक आहे ! आत्मग्लानीचे द्योतक आहे ! डॉ. राधाकृष्णन् यांनी आजच्या परिस्थितीचे हेच निदान केले आहे. ते म्हणतात, *" The outward chaos and confusion of our life reflect the confusion of our hearts and minds. What is missing in our age is the soul. There is nothing wrong with the body. We suffer from sickness of spirit. "*

तेव्हा आत्म्याचे आजारपण, आत्म्यावर असलेले अज्ञानाचे आवरण, आत्मज्ञानाद्वारेच नाहीसे होऊ शकेल. आध्यात्मिक आदर्श जीवनासमोर असल्याशिवाय, आत्मज्ञानाकडे प्रवृत्ती होणार नाही. शिक्षणाने आत्मज्ञानाचा आध्यात्मिक आदर्श समोर ठेवला पाहिजे. विद्यापीठात धर्माभ्यासाचे स्थान विशद करतांना श्री सीर्लेस यांनी प्रतिपादन केले आहे की, *" education needs the religious ideal and religion needs more of the educational ideal. In view of the certainty of educational aims it would seem that a broad religious ideal in education would tend to unify and inspire education as a spiritual enterprise. "*

ज्ञान म्हणजे प्रामुख्याने आत्मज्ञान

शिक्षण हे आध्यात्मिक कार्य समजून, अत्यंत तळमळीने हाती घेण्याची आज गरज आहे. एकेकाळी भारतात ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, हाच अर्थ सर्वांना अभिप्रेत होता. अध्यात्मज्ञानाशिवाय इतर सर्व लौकिक विद्यांचे ज्ञान हे " व्यावहारिक विद्या " म्हणून संबोधले आई.

आज सर्वंच परिस्थिती विपरीत झाली आहे. भौतिक-लौकिक व्यवहार शिकविणारी विद्या प्रधान झाली आहे. एवढेच नव्हे तर लौकिक-विद्यांचे ज्ञान, हेच शिक्षण, अशी समजूत सर्वत्र प्रचलित झाली आहे; त्यामुळे अर्थार्जनाची योग्यता मिळवून देणारे बौद्धिक ज्ञान संपादन केले, म्हणजे विद्वत्ता प्राप्त झाल्याचा भ्रम उत्पन्न होतो. इंग्रजी शिक्षणाद्वारे अशा विद्वानांच्या काही पिढ्या, सुशिक्षित म्हणून, आधुनिक विद्यापीठांनी तयार केल्या. एकूण लोकसंख्येच्या तुलनेने, अशा इंग्रजी शिक्षितांची संख्या, सुरवातीला कमी असल्याने, या एकांगी शिक्षणाचे दुष्परिणाम, तितकेसे जाणवले नाहीत. पण जसजशी जास्त वर्षे लोटली जाऊ लागली व शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले तसतशा आग्लांळलेल्या, स्वाभिमानशून्य स्वत्वहीन, पिढ्यांचे दर्शन देशभर होऊ लागले! स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, परकीयांनी, मुत्सद्दीपणाने सुरू केलेली-राष्ट्रीय परंपरा व इतिहास, याविषयी गैरसमज उत्पन्न करणारी शिक्षणप्रणाली भारतीयांनी तशीच पुढे चालू ठेवली.

धर्म-मोक्ष या ऐवजी अर्थ–काम हे ध्येय

म. गांधींना श्री. कार्लटन वॉशबर्न[८] यांनी एकदा विचारले, "भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर आपले शिक्षणाचे ध्येय काय राहील?" ते तात्काळ उद्गारले,

"Character -- building. I would try to develop courage, strength, virtue, the ability to forget oneself in working towards great aims. This is more important than literacy."

दुर्दैवाने शिक्षणाच्या ध्येयदृष्टीत, स्वातंत्र्यानंतर बदल झाला नाही. देह, बुद्धी, मन, आत्मा या चार प्रमुख घटकांनी मानवी जीवनाला आकार येत असतो; या चारही घटकांचा सुयोग्य समन्वय साधून, मानवाचा सर्वांगीण विकास ज्यामुळे होईल, ते खरे शिक्षण![९] पण शारीरिक व बौद्धिक एवढ्यापुरतेच अर्वाचीन भारतीय शिक्षण आजवर मर्यादित राहीले. शारीरिक व बौद्धिक विकास जर आत्मिक सामर्थ्याच्या तुलनेने अधिक झाला तर, त्या मनुष्याचे वर्णन करतांना रविंद्रनाथ टागोर[१०] म्हणतात,

". . . . (the man is like) an exaggerated giraffe whose head has suddenly shot up miles away from the rest of him, making normal communication difficult to establish ".

अशा प्रकारे, एकतर्फी झालेल्या बौद्धिक विकासामुळे, केवळ आर्थिक दृष्टिकोनातून सर्व व्यवहार होऊ लागतात! उपयुक्ततावाद बोकाळतो! मनुष्य म्हणजे "पोट व मेन्दु असलेला चालताफिरता प्राणी" होऊन बसतो![११] मन, आत्मा, धर्म, राष्ट्र, इत्यादिची भाषा त्याला समजेनाशी होते. पदवी प्राप्त करून, सुशिक्षित होऊनही पशु व मानव यातला फरक शिक्षणाने जो आत्मसात व्हायला हवा, तो त्याला अज्ञातच राहतो.[१२] अर्थ व काम या दोन पुरुषार्थांकडेच भारतातील आधुनिक शिक्षण आजवर लक्ष पुरवीत राहिले, मानवाचे कर्तृत्वाला व सामर्थ्याला आव्हान देणारे, धर्म व मोक्ष, हे जे प्रमुख पुरुषार्थ त्याकडे पूर्णतया पाठ फिरवली गेली.

ध्येयदृष्टीतील दोषांचा दुष्परिणाम

या सर्वाचा परिणाम अटळ होता. भारतीय तरूणांच्या जीवनाला कोणतेही ध्येय उरले नाही! कोणतेही राष्ट्रीय उद्दिष्ट राहीले नाही! जीवन उदात्त व उन्नत बनवावे अशी कोणतीही भव्य आकांक्षा उरली नाही. उत्साहाने व उल्हासाने जीवन जगावे असे आदर्श लोप पावले. आध्यात्मिक ध्येयदृष्टीशी घटस्फोट घेताच, मानवी जीवनमूल्यांची उभारणी होण्याऐवजी, त्यांचे अवमूल्यनच अधिक होऊ लागले. खालील शब्दांत त्याने वर्णन एका पत्रिकेत[१३] केले आहे.

" Divorced from the spiritual aspirations of the individual and of the group, education is likely to distroy greater values than it creates. The basic purpose of education is to integrate its curricula with character building activities and a normal religious life to the end that young people may be not only more efficient but better motivated by a sense of duty and obligation. "

जाळ्यात अडकल्यासारखी स्थिती

सरदार वल्लभभाई पटेल[१४] यांनीसुद्धा स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या शिक्षण पद्धतीबद्दल अत्यंत असंतोष प्रगट करतांना म्हटले होते,

"आजकल हायस्कूल और कॉलेजमे प्राप्त होनेवाली शिक्षा बिलकुल निकम्मी है। इतनाही नही, हानिकारक भी है।"

चालू शिक्षणप्रणाली इतकी अपायकारक असूनही, सर्व देशाची सत्ता स्वाधीन असतांना, त्यात बदल घडवून का आणीत नाही? या प्रश्नावर त्यांनी काढलेले खालील उद्गार महत्वाचे आहेत.

"हम सब लोक अैसे जालमे फसे है की, उसमेसे निकलना भी मुष्कील है।"

सरदार वल्लभभाईं सारख्या लोहपुरूषाला असे म्हणण्याची पाळी यावी, यावरून परिस्थितीची भीषणता वाचकांच्या लक्षांत यावी.

निधार्मिकतेचा विपरीत अर्थ

सर्वात अधिक नुकसान झाले, ते घटनेतील "निधार्मिक" या तत्त्वाचा अर्थ, "धर्मविहीन," असा घेतला गेल्याने. परिणामतः शिक्षणाचे निधार्मिकीकरणाची प्रक्रीया, सुरू झाली. श्री. पोटिएटने[१५] म्हटल्याप्रमाणे, "*The complete secularization of education means in the end national disorder, disintegration and decay*"

हे निधार्मिकतेचे फलित आपल्या पदरात पडले! सर्वत्र अराजकता व फुटीरता आज देशात दृष्टीस पडते, याचे एक महत्वाचे कारण शिक्षणात धर्म व अध्यात्म यांचा अभावच नव्हे का? रॉबर्ट स्प्रॉऊल[१६] यांनी धर्माभावामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या या परिणामांची मीमांसा करतांना म्हटले आहे की,

"*I believe that without religion, we are forced to substitute weak conventions for permanent values and abiding standards; that without religion, civilization, with no adequate reinforcement for the great strains that come upon it, must yield inevitably to disintegration and decay.*"

हे सर्व दुष्परिणाम ज्या नैतिक व आध्यात्मिक अधःपातामुळे होतात तो अधःपात प्रामुख्याने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अभावामुळे होतो. भारताचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. मेहेरचंद महाजन[१७] यांनी आपल्या एका लेखात हेच मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात,

"....the absence of religious and moral instructions in our schools and universities under the wrong conception of a secular state is greatly responsible for the low moral and ethical standards of our people."

इंग्रज राजवटीत सुमारे एक शतकापूर्वी सुरू झालेल्या निधार्मिक शिक्षणाचा हा परिपाक आहे.

अध्यात्मरूपी परिसाने शिक्षणाचे सोने

सारांश, राष्ट्रीय जीवनमूल्ये व आदर्श जोपासणाऱ्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची आज देशाला अत्याधिक गरज आहे. अध्यात्म मार्गाचा सोपान चढू लागताच, अनेकांच्या जीवनयात्रा सफल झाल्या आहेत. अध्यात्माचे खतपाणी मिळताच कित्येक जीवनपुष्पे फुललेली, बहरलेली आहेत. अध्यात्माचा सुगंध जीवनात दरवळताच, त्यांच्या श्रेष्ठतेचा कीर्ती परिमल जगभर पसरल्याचे, इतिहास सांगत आहे. ऐतिहासिक अनुभवाच्या कसोटीवर, सत्य सिद्ध झालेल्या व आजवर अनेक श्रेष्ठींनी आचरलेल्या, अध्यात्म तत्त्वांचे शिक्षण भारतीय नव-युवकांना देणे ही आधुनिक काळाची निकड आहे. अध्यात्माच्या या परिसाचा स्पर्श आजच्या शिक्षणाला झाला तर, ते शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने झाल्याशिवाय राहणार नाही.

अल्पावधी व दीर्घावधी योजना

आता या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्यक्ष कार्यवाही म्हणून, जी पावले, विशेषतः शासनाने उचलावीत, अशी अपेक्षा आहे, त्यांचे विवेचन या प्रकरणात करण्याचे योजिले आहे. अशा कार्यवाहीचा कार्यक्रम दोन कालखंडात विभागण्यात आला आहे.

ज्या बाबी सुमारे ५ – १० वर्षांत अंमलात आणणे संभवनीय आहे त्या बाबी अल्पावधी योजनेत समाविष्ट केल्या आहेत. यापेक्षा अधिक

कालखंड ज्या गोष्टींच्या यशस्वितेसाठी लागण्याचा संभव आहे, अशा सूचना दीर्घविधी योजनेत प्रविष्ट केल्या आहेत. पुनरूक्तीचा दोष पत्करूनही मागील प्रकरणात विखुरलेल्या काही सूचना महत्वाच्या वाटल्यावरून यात नमूद केल्या आहेत.

अल्पावधी व दीर्घविधी योजनांत सुचविलेल्या उपायाशिवाय आणखीही उपाय वाचकाकडून सुचविले जाऊ शकतील, याची आम्हाला जाणीव आहे; परंतु योजनेच्या प्रारंभी तिला आवश्यक अशी विशिष्ट गती मिळण्याच्या दृष्टीने *(Take off at the preliminary stage of the scheme)* किमान कार्यक्रम म्हणून आम्ही पुढील उपाय सुचवित आहोत.

अल्पावधी योजना

१. सर्व राज्यांकडून राज्यस्तरावर समितीची स्थापना

राज्यातर्फे श्वेतपत्रिका

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी सर्व राज्य शासनाकडून समिती नेमली जावी हें यापूर्वी सुचविलेच आहे. या समितीच्या शिफारसीच्या आधारावर बनविलेली श्वेतपत्रिका *(White-Paper)* शासनाने विधानसभेसमोर मांडावी. श्वेतपत्रिका पारित होऊन त्याला कायद्याचे स्वरूप आल्यानंतर मात्र राज्यशासनाने त्यांत नमूद करण्यात आलेल्या ध्येय-धोरणांची कडक अंमलबजावणी होईल याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी.

केन्द्रिय आयोगांचे अनुकूल मार्गदर्शन

केन्द्रसरकारने या प्रश्नासाठी समिती नेमण्याची सद्य:स्थितीत मुळीच गरज नाही. एकतर शिक्षण हा विषय प्रामुख्याने राज्याच्या अखत्यारीतला; केन्द्राने केवळ स्थूल मार्गदर्शन करावे एवढीच अपेक्षा; आणि या विषयापुरते केन्द्र सरकारचे अनुकूल धोरण त्यांनी वेळोवेळी स्थापन केलेल्या आयोगाद्वारे जाहीर झालेलेच आहे. या विविध आयोगांनी आपापल्या परीने ज्या शिफारसी केल्या आहेत त्यांच्या

आधारावरच देशातील सर्व राज्यांनी आपल्या श्वेतपत्रिकेचे प्रारूप ठरवावे.

कोठारी समितीच्या शिफारसी

सर्वांत अखेरीस केन्द्राने नेमलेल्या, "कोठारी समितीने" पूर्वीच्या शिक्षण आयोगांचा मागोवा घेत नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाबाबत जी प्रगतिपर अशी निश्चयात्मक दिशा दर्शविली आहे ती येथे उद्धृत करणे अनुचित होणार नाही. सर्व राज्यांनी आपल्या धोरणाची आखणी करतांना साधारणपणे समोर ठेवावी, अशी या योजनेची जी एक स्थूल चौकट *(Frame-work)* समितीने बहवालात दिली आहे, ती खालील प्रमाणे :–

१. केन्द्रीय व प्रांतीय शासनांनी नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणाची, त्यांच्या ताब्यात असलेल्या सर्व संस्थांतून व्यवस्था करावी. राधाकृष्णन् समितीने दिग्दर्शित केलेल्या आखणीनुसार ती असावी.

२. खाजगी शिक्षण संस्थांनीही त्यांचेच अनुकरण करावे.

३. शिक्षण संस्थांच्या सर्व कार्यक्रमांचा एकजीव अवयव म्हणून या मूल्यांना सदासर्वदा स्थान असावे. पण त्याच बरोबर त्याच उद्देशाने काही तासांचीही *(Period)* योजना करावी. याकरिता वेगळ्या शिक्षकांची नियुक्ती असू नये. असलेल्या शिक्षकांकडूनच ते काम करवून घ्यावे, व प्रशिक्षण संस्थांनी त्यांची तशी तयारी करून घ्यावी.

४. विद्यापीठामध्ये धर्माचा तौलनिक अभ्यास करणारी खाती असावीत. त्यांनी ही "मूल्ये" शहाणपणाने व परिणाम कारकतेने शिकविण्याचे मार्ग शोधून काढावे; त्याचप्रमाणे विद्यार्थी व शिक्षक यांच्या करीता आवश्यक ते वाङ्मय निर्माण करावे.

५. उच्च शिक्षणक्षेत्रातील प्रथम पदवी अभ्यासक्रमात सर्व धर्मांच्या अभ्यासाचा भाग असावा व त्याकरितां पाठ्यक्रम ठरवावा. उदा-पहिल्या वर्षांच्या पाठ्यक्रमात निरनिराळ्या धर्मनेत्यांच्या जीवनांची माहिती द्यावी. दुसऱ्या वर्षात जागतिक आकर्षण राहील या पद्धतीने

वेगवेगळ्या धर्मांच्या पवित्र ग्रंथांतून काढलेल्या वेचांचा अभ्यास असावा; आणि तिसऱ्या वर्षात धर्माच्या तात्त्विक पण मूलभूत प्रश्नांचा अभ्यास असावा. गणश: निस्तब्धतेने ध्यानाचा अभ्यास करविण्यात येण्यावर आम्ही जोर देऊ इच्छितो.

६. शाळांमधून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्हीही पद्धतींनी नैतिक व धार्मिक शिक्षण दिले जावे. अप्रत्यक्ष पडणारा प्रभाव हा चारित्र्य निर्मितीच्या बाबतीत फार महत्वाचा आहे. शाळेचे एकूण वातावरण, शिक्षकांचे व्यक्तित्व व त्यांची वागणूक आणि शाळांमधील विविध सोयी व सवलती या सर्वांचा, मूल्यविषयक जाणीव उत्पन्न होण्यात फार वाटा असतो; सर्व अभ्यासक्रम व कार्यक्रम यातून मूल्यविषयक जाणीव ओतप्रोत भरून असली पाहिजे. श्री प्रकाश समितीने सुचविल्याप्रमाणे आठवी-ड्यातून दोन तास या शिक्षणाकरिता राखून ठेवण्यात यावेत. प्राथमिक शाळांमधून धर्मनेत्यांच्या कथांवर भर असावा व माध्यमिक शाळांमधून धर्मविषयक चर्चा विद्यार्थी व शिक्षक यात घ्याव्यात. माध्यमिक अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दोन वर्षांमध्ये वेगवेगळ्या धर्माच्या शिकवणींच्या अभ्यासास स्थान असावे.

कोठारी – समितीची दृष्टी, आस्था व कळकळ प्रशंसनीय आहे. राज्य सरकारांनी याबाबत त्वरेने पाऊल मात्र उचलायला हवे.

(२) सर्व राज्यातील विद्यापीठ व माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या संहितेत इष्ट सुधारणा

विद्यापीठ कायद्यात बदल

प्रत्येक राज्यामध्ये वरील प्रमाणे श्वेतपत्रिका जाहीर होताच त्या पाठोपाठ उचलावयाचे पुढले पाऊल म्हणजे राज्याच्या अंतर्गत असलेली सर्व विद्यापीठे व मंडळे यांच्या संहितेत नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने इष्ट त्या सुधारणा करणे. मॅट्रीक वा तत्सम परीक्षा घेणाऱ्या मंडळाचे महाराष्ट्रात झाले आहे तसे एकीकरण झाले असेल, तर एका मंडळाच्या संहितेत बदल करून हे कार्य होईल. विद्यापीठ मात्र कायद्याने स्थापन झालेली स्वायत्त संस्था असल्याने, एक

तर विद्यापीठ कोर्ट वा सिनेट यांनी या शिक्षणाची तरतुद करावी वा शासनाने राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कायद्यात योग्य तो बदल करावा. राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या विद्यासभेने या बाबतीत स्वतंत्र ठराव घेण्यात अनेक गैरसोयी व कालापव्यय होण्याचा संभव आहे, त्यापेक्षा श्वेतपत्रिकेत नमूद केलेले धोरण अंमलात आणणे सुलभ जाईल, अशा तरतुदी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कायद्यात विधानसभेद्वारा करून घेणे, अधिक संयुक्तिक ठरेल.

अभ्यासक्रमाचा समावेश तीन प्रकाराने

कोठारी समितीने शिफारस केल्याप्रमाणे परोक्ष व अपरोक्ष अशा दोन्ही पद्धतीने काही तास ठरवून देऊन, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण, इतर विषयाप्रमाणे अभ्यासक्रम म्हणून समाविष्ट करायचे असेल, तर परिस्थितीनुसार खालीलपैकी एक वा तिन्ही गोष्टींची तरतूद, माध्यमिक शिक्षण मंडळ वा विद्यापीठ यांच्या संहितेत करावी लागेल.

अ) अभ्यास–मंडळाची स्थापना

ब) शिक्षण योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी स्वतंत्र विभाग उघडणे.

क) अध्यासनाची प्रस्थापना करणे.

अभ्यासमंडळ

इतर अनेक विषयांच्या अभ्यास–मंडळाप्रमाणे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी स्वतंत्र अभ्यास–मंडळ स्थापन होणे तर क्रमप्राप्तच आहे. फक्त हा विषय कोणत्या विषय–गटात वा विद्या–शाखेत *(Subject – group or Faculty.)* समाविष्ट करावा हा प्रश्न उपस्थित होईल. प्राथमिक अवस्थेत तरी, हा विषय इतर विषय गट वा विद्या–शाखा, यापासून स्वतंत्र ठेवावा, असे सुचवावेसे वाटते. जसजसे या विषयाचे स्वरूप व त्याची व्याप्ती, काही वर्षांनी स्पष्ट होईल, तसतसे या विषयाला स्वतंत्र स्थान असावे की इतरत्र त्याचा समावेश करावा, हे यथावकाश ठरविता येईल.

स्वतंत्र–विभाग

शारीरिक शिक्षण, युवक कल्याण, *(Youth Welfare)* सामान्य

शिक्षण, *(General-Education)* यासारख्या कार्यासाठी माध्यमिक मंडळ व विद्यापीठ यात स्वतंत्र कार्यालय उघडण्याची प्रथा आजही आहेच ! त्याच धर्तीवर या महत्वाच्या कार्यासाठी वेगळा विभाग उघडणे उचित होईल. असे विभाग अनेक देशात स्थापन झाल्याची उदाहरणे आहेत.[१८] अशा विभागाच्या प्रमुख कार्याचे विवेचन पूर्वी एका प्रकरणात केलेच आहे.

अध्यासन

या योजनेला विशेष प्रतिष्ठा येईल, ती स्वतंत्र अध्यासनाच्या प्रस्थापनेने! स्वतंत्र विभाग वा अध्यासन यांच्या कार्यात तसा फारसा फरक राहणार नसला तरी, एखाद्या संस्थेच्या वा व्यक्तीच्या प्रचंड देणगीच्या व्याजातून, अध्यासन जन्माला येत असल्याने व हे अध्यासन भूषविण्यास विख्यात सदाचरणी अशा विद्वानाची नेमणूक करण्याची संधी उपलब्ध होत असल्याने, जनमानसांत आदराचे आगळे असे स्थान, अशा अध्यासनाला प्राप्त होते. विद्यापीठातील प्रमुख धुरीणांनी, अध्यासनासाठी आवाहन केले तर, भारतात आजही या सत्कार्यासाठी, उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाल्याशिवाय राहणार नाही.

(३) वार्षिक अंदाजपत्रकात योजनेसाठी तरतूद

लाभाच्या तुलनेने खर्च नगण्य

या शिक्षणाच्या अल्पावधी व दीर्घावधी योजनेतील ज्या गोष्टी राज्य सरकारने एका विशिष्ट वर्षी अंमलात आणण्याचे ठरविले असेल, त्या यशस्वीपणे हाती घेण्यासाठी लागणाऱ्या रकमेची सोय शासनाच्या वार्षिक अंदाजपत्रकात असली पाहिजे.

योजना नवीन असल्यामुळे आजवर न केलेला हा खर्च सोसतांना शासनाला थोडे जडच जाणार आहे. परंतु अर्थशास्त्रातील महत्तम सामाजिक समाधानाचे तत्त्व *(Principle of Maximum Social Satisfaction)* जर लक्षात घेतले, तर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कराव्या लागणाऱ्या आर्थिक सहाय्याच्या तुलनेने, त्यापासून मिळणारा सामाजिक व राष्ट्रीय लाभ एवढा मोठा आहे, की त्याची आर्थिक बाजू कुणाही विचारवंतास नगण्य वाटावी. ही संपूर्ण योजनाच इतकी

मूलभूत स्वरूपाची आहे की, ती खरोखरी जर सर्व शक्तीनीशी, आटोकाट प्रयत्न करून, यशस्वी केली तर देशातील सर्वच क्षेत्रातील समस्या सोडविण्यास मोठेच सहाय्य होणार आहे. व्यक्तीचे शील घडविण्याची काळजी घेतली तर समाजाची वेगळी काळजी घेण्याची गरज पडणार नाही. म. गांधी[१९] या संदर्भात एका ठिकाणी म्हणतात,

"I would feel that if we succeed in building the character of the individual, society will take care of itself. I would be quite willing to trust the organisation of society of individuals so developed." आणि असे शील घडवून समाजाची कोनशीला भक्कम करण्याचे कार्यच तर या योजनेद्वारा व्हावयाचे आहे. राष्ट्राची पायाभरणी करणाऱ्या अशा कार्याच्या शीलान्यासाला लागणारी आर्थिक तरतूद करणे, शासनाचे कर्तव्यच नव्हे का ? *" Money given to education by the Nation is not a gift, but an investment'* या डॉ. ॲनी बेझंट[२०] यांच्या मताप्रमाणे शिक्षणाचा मूलमंत्र देणाऱ्या या कार्यासाठी गुंतवणूक करायला शासनाने पुढे यावे ही अपेक्षा !

(४) निवडक विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन

Public Schools for selected Students.

मानवी रत्नांच्या तेजस्वितेसाठी

मौल्यवान झाडाचे रोप आधी मुद्दाम तयार केलेल्या जमिनीत लावतात आणि ते आपल्या विशिष्ट गुणांचा पूर्ण आविष्कार करीत फोफावू लागले, म्हणजे ते सामान्य जमिनीत रोवतात. त्याचप्रमाणे मूळच्याच तेजस्वी व बुद्धिमान असलेल्या बालकांना संस्कारक्षम वयात चांगल्या वातावरणाची मुद्दाम निर्मिती करून जोपासले पाहिजे, तेव्हाच त्यांच्यातील विशेष गुणांचा परिपूर्ण लाभ समाजाला होऊ शकतो.

ईशसेवेसाठी आणि देशकार्यांसाठी पूर्ण उमललेली सुगंधित जीवनपुष्पे जर खरोखरीच हवी असतील तर शासनाने त्यासाठी फार जाणीव पूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. लाख मोलाचे पण अचेतन असे साधे रत्न हवे असेल तर कित्येक कोळशाच्या खाणी धुंडाव्या लागतात व असे रत्न हाती लागल्यावरही, त्यावर अनेक संस्कार करून ते घडवावे, तेव्हा

कुठे ते तेजस्वी बनून चकाकू लागते; व मग बाजारात त्याला किमत येते. जागतिक स्पर्धेत जर आपल्याला टिकायचे असेल, नव्हे लौकिक मिळवायचा असेल, तर समाजातून अशी मानवी रत्ने शोधावी लागतील. जीवदशेमुळे झाकलेले हे परब्रह्म, शिवस्वरूपाप्रत पोचविण्यासाठी त्याला शुभसंस्काराचे पैलू पाडावे लागतील. ज्ञानाग्नीने या रत्नांना आकार द्यावा लागेल. आकार आलेल्या या जीवरूपी रत्नांवर, कर्मरूपी रंग, भक्तिरसांत मिसळून त्याचा सुंदर मुलामा चढवावा लागेल. अशा रीतीने ज्ञान, भक्ती व कर्म या तिन्हींच्या सुरेख छटांनी शोभिवंत झालेले मानवी रत्न जेव्हा आपल्या पूर्ण तेजाने चमकू लागेल, तेव्हा अनेकांना त्याच्या प्रकाशात आपला मार्ग दिसू शकेल. सामान्यजनांना आपले जीवन अधिक सुखकर व कल्याणप्रद होण्यास सहाय्य होऊ शकेल.

जीवनपुष्प फुलविण्यास काटेरी कुंपण

दीपस्तंभाप्रमाणे दिशा दाखविण्याचे कार्य अविरतपणे करणारे जीवन घडवायचे म्हणजे त्यासाठी करावयाची साधना व तपस्या, तशीच श्रेष्ठ दर्जाची करावी लागेल हे उघड आहे. ज्या बीजातून हे जीवनपुष्प फुलवायचे ते तसेच शुद्ध व तेजस्वी असावे लागेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. डॉ. ॲलेक्सिस कॅरेल[२१] म्हणतो,

"Two essential conditions for the progress of the individual are relative isolation and discipline."

असे शुद्ध बीज वेगळे काढून ते वेगळ्या शिस्तीत वाढवा, हाच या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाच्या म्हणण्याचा मथितार्थ. शेळ्या व गाई यांच्यापासून संरक्षण व्हावे म्हणून पिंपळाला प्रथम कुंपण घालणेच आवश्यक असते. पण एकदा का तो पिंपळ मोठा होऊन मजबूत झाला म्हणजे त्याला १०–२० शेळ्या व गाई बांधल्या तरी चालू शकते. वृक्षाच्या वाढीचा हा सामान्य नियम मानवी शिक्षणालाही लागू होतो.

गुण व बुद्धी हीच कसोटी

म्हणूनच प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील अत्यंत बुद्धिमान बालकांची निवड करून, त्यांचे विशेष चांगल्या रीतीने शिक्षण होण्यासाठी, विद्यानिकेतने वा ज्ञानपीठे यांची स्थापना केली पाहिजे. केवळ

बुद्धिमत्ता व गुणवत्ता यांचाच निकष, निवड करतेवेळी लावला जावा. धर्म, व्यवसाय, संपत्ती, उच्च पद यांच्या प्रभावाचा, निवडीवर परिणाम होऊ नये. तसेच उत्पन्नाच्या तुलनेने या विद्यार्थ्यांच्या पालकांवर शिक्षणाचे ओझे सहज झेपेल एवढे अवश्य टाकावे. मात्र कोणताही निवडलेला विद्यार्थी केवळ शिक्षण खर्च देऊ शकत नाही, म्हणून निकेतनात प्रवेश घेऊ शकला नाही असे मात्र कदापि होऊ नये.

"Our childrens' minds are the nations greatest resource" हे अमेरिकेतील राष्ट्रीय शिक्षणक्षेत्रातील धुरिणांचे अलिकडचे सूत्र[२१] या संदर्भात आपणही डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने, मॅट्रीक पावेतो, निवडक विद्यार्थ्यांना, असे वेगळे विशेष शिक्षण देण्यासाठी, पब्लिक स्कूलच्या धर्तीवर, काही विद्यालये यापूर्वीच स्थापन केली आहेत. उच्च शिक्षणासाठी देखील, याच पद्धतीचीं विद्यानिकेतने (*Quality colleges*) सुरू करण्याचा, अभिनंदनीय उपक्रम, महाराष्ट्र शासनाच्या विचाराधीन आहे.

आदर्श शिक्षकांचा अभाव

अशा विद्यालयांत, विशेष प्रकारचे शिक्षण देण्यासाठी विशेष शिक्षण घेतलेले शिक्षक कुठून आणायचे ? हा प्रश्न साहजिकच उत्पन्न होणार. सामान्य शिक्षणाच्या चाकोरीत तयार झालेले, सामान्य प्रतीचे शिक्षक, विशेष बुद्धिमान म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांना, आपणास अपेक्षित असलेले, खास असे शिक्षण कसे देऊ शकणार ? शिकविणाऱ्या शिक्षकापेक्षा त्याच्या हाताखाली शिकणारा विद्यार्थी, अधिक चांगला निपजणे अपवादात्मकच. महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री मा. श्री. मधुकरराव चौधरी यांनी शिक्षकाचे महत्व फार समर्पकपणे विषद केले आहे. ते म्हणतात,

" गतिमान समाजासाठी शिक्षण गतिमान असले पाहिजे. शिक्षणापेक्षा समाज अधिक गतिमान असणे असंभव आहे. व शिक्षकापेक्षा कोणत्याही देशातील शिक्षण अधिक गतिमान असणे शक्य नाही. तेव्हा आमचे शिक्षण व त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे आमचे शिक्षक गतिमान असले पाहिजेत. "

शिक्षकाचे समाजातील स्थान अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे भारतीयांनी प्राचीन काळापासून ओळखले आहे. जगातील कुठल्याही देशात प्राप्त न झालेले महत्व "गुरू" ला भारतात प्राप्त झालेले त्यामुळेच आढळते. आपल्या विद्वत्तापूर्ण प्रबंधात डॉ. अळतेकर[२३] नमूद करतात की,

"No person on the earth deserves greater reverence than the teacher, not even the father or the mother."

भारतात, प्राचीन काळापासून असलेल्या आदर्श शिक्षकांची ही परंपरा, पुन्हा कशी निर्माण करता येईल ? ही खरी मूलभूत समस्या आहे. ही समस्या आपण जितक्या यशस्वीपणे सोडवूं शकू तेवढ्या प्रमाणांत शिक्षणाला व समाजाला आपण गतिमान करू शकू, प्रगतिपथावर नेऊ शकू.

विद्यानिकेतनाद्वारे शिक्षकांचा पुरवठा

या महत्वपूर्ण कार्यासाठी आपण या विद्यानिकेतनांचा उपयोग नाही का करू शकणार ? या विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालीलपैकी कोणत्याही एका प्रकारच्या बंधनाची निवड करून, त्यांच्यावर असलेल्या समाजऋणातून मुक्त व्हावे, असे आपण त्यांना आवाहन केले, तर शिक्षकांचा प्रश्न अंशतः सुटू शकेल.

१. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुरवातीची ५ ते १० वर्षे अध्यापक म्हणून कार्य करून नंतर इतर व्यवसायात प्रवेश करणे.

२. प्रथम आपल्या आवडीचा उद्योग करून, त्यातून निवृत्त होण्यापूर्वीची १० वर्षे, शिक्षक म्हणून कार्य करणे. आयुष्याच्या उत्तरार्धातील, अनुभवसंपन्न व पक्व असा जीवनाचा काळ, या श्रेष्ठ कार्यासाठी, समाजातील या बुद्धीमान वर्गाने जर खर्च केला, तर नव्या पिढीला तर त्याचा अमोल असा लाभ होईलच, शिवाय आयुष्याच्या उतरणीवर असलेल्या, पण समाजाची सायच असलेल्या या अनुभव संपन्न मंडळींना आंतरिक समाधान देऊ शकेल, असे अध्यापन व संशोधन कार्य करण्याची संधी प्राप्त होऊ शकेल.

३. शिक्षणानंतर श्रेष्ठ वेतनाची नोकरी मिळण्याची संधी असूनही स्वेच्छेने कमी वेतनाचे अध्यापनाचे कार्य आयुष्यभर स्विकारणे.

शिक्षणाच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत, अध्यापकाला योग्य त्या सन्मानाचे स्थान प्राप्त झाले तर, पगारमान कमी असूनही, विद्यानिकेतनातील अनेक विद्यार्थी, ज्ञानार्जन व ज्ञानदानाच्या पवित्र कार्यासाठी, ज्ञानमंदिरात पुजारी म्हणून आयुष्य वैचण्यात धन्यता मानतील, असा विश्वास वाटतो.

व्यावसायिक कौश्यल्याबरोबरच सद्वृत्तीकडे लक्ष

मात्र अशा निकेतनाद्वारे दिले जाणारे शिक्षण, हे केवळ व्यावसायिक कौश्यल्य *(Professional skill)* व कार्यक्षमता वाढविण्यापुरते सीमित असू नये. तसे झाले तर या मुद्दाम स्थापन केलेल्या विद्यालयांचा हेतूच मुळी साध्य होणार नाही. व्यवसायाइतकेच किंवहुना अधिकच महत्व, सद्गुण व सद्वृत्ती वैभवाला दिले पाहिजे. डॉ. राधाकृष्णन-आयोगाने म्हटल्याप्रमाणे,

" What we need is not the imparting of instructions but the transmitting of Vitality "

जोमदार जीवन घडविण्याचा कसोशीने प्रयत्न झाला पाहिजे. या विद्यालयात तयार होणारे विद्यार्थी म्हणजे, राष्ट्रातील सर्वोत्तम विद्यार्थी कसा असावा, याचा आदर्श सर्वांसमोर आपण उभा करणार आहोत! इतर विद्यार्थ्यांनी या विद्यालयातील विद्यार्थ्यांचे अनुकरण करावे, अशी अपेक्षा आपण बाळगणार आहोत. राष्ट्रातील विविध व्यवसाय व उद्योगांना हवे असलेले अत्यंत कुशल, कार्यक्षम असे तज्ञ व शास्त्रज्ञ, आपण या विशेष माध्यमाद्वारे पुरविणार आहोत, आणि या सर्वांपेक्षा महत्वाचे म्हणजे, शिक्षणाची उज्वल परंपरा असलेल्या, या भारतवर्षातील श्रेष्ठ अध्यापकांचा आदर्श, अक्षुण्ण राखण्यासाठी, राष्ट्रीय अस्मिता आकांक्षा व अभिमान, अंगप्रत्यंगातून ओसंडत असलेल्या आदर्श अध्यापकांची उणीव, या विद्यालयामार्फत अंशत: भरून काढावी, असा प्रयत्न आपणास करावयाचा आहे. अशा विद्यालयांचे मूलभूत कार्य कोणते, हे विशद करतांना, श्री क्लिफ्टन फॅडिमन[१] यांनी काढलेले खालील उद्गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

"The primary job of the school is the efficient

transmission and continual reappraisal of what we call tradition. Tradition is the mechanism by which all past men teach all future men."

(५) नैतिक व आध्यात्मिक शिक्षण प्रदान करणाऱ्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्रे

वरील विद्यानिकेतनाद्वारे उपलब्ध होणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण या योजनेसाठी लागणाऱ्या एकूण शिक्षकांच्या तुलनेने अत्यल्प राहील हे उघड आहे. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण एखाद्या राज्यात प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयातील पदवी शिक्षणापर्यंत सार्वत्रिकरित्या सुरू करावयाचे असेल तर पहिल्याच वर्षी या विषयाचे विशेष प्रशिक्षण घेतलेले शिक्षक उपलब्ध होणे शक्य होणार नाही. तेव्हा सुरवातीला तर, आहे त्या शिक्षकांनाच आवाहन करून, या योजनेस प्राथमिक सुरवात करावी लागेल.

मात्र योजनेची अनेक अंगे अंमलात आणण्यासाठी व तिचा व्याप वाढविण्यासाठी, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी लागेल. ही व्यवस्था दोन प्रकारे करता येईल.

१. चालू संस्थाद्वारे प्रशिक्षण

सध्या अस्तित्वांत असलेल्या प्रशिक्षण संस्थांद्वारे इतर विषयासोबतच नैतिक व आध्यात्मिक शिक्षण कसे द्यावे याची तयारी शिक्षकांकडून करून घेता येईल. कोठारी-आयोगाने हाच उपाय सुचविला आहे. परंतु या पद्धतीत तीन अडचणी संभवतात.

अ) ज्या सध्याच्या शिक्षकांनी आधीच प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्यांचे प्रशिक्षण कसे व्हावे ? नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे कोणतेही प्रशिक्षण न घेताच त्यांनी हा विषय शिकवावयाचा का ?

ब) सामान्यतः एक वर्षाचे असलेले प्रशिक्षण संस्थेतले या विषयाचे शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या शिक्षकांचे, दरवर्षीचे प्रमाण एवढे अल्प असते की, योजनेसाठी किमान आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या प्रशिक्षित व्हायला, बऱ्याच वर्षांचा कालावधी लागेल. तोवर कसलीच पार्श्वभूमी नसलेल्या शिक्षकांकडून कसेतरी या शिक्षणाचे कार्य रेटत राहणे, कितपत

सयुक्तिक होईल ?

क) का कुणास ठाऊक, पण शाळेत नौकरीसाठी अट म्हणून अपरिहार्य समजली जाणारी शिक्षणशास्त्रातील प्रमाणपत्र वा पदवी, (*B. Ed.* वा *Dip. T*) जी यशस्वी अध्यापनासाठी खरोखरी आवश्यक आहे, महाविद्यालयातील प्राध्यापकाला, असावी असा आग्रह धरला जात नाही. ही विशेष सवलत उच्च शिक्षणात असल्याने त्यांना प्रशिक्षण संस्थेत या विषयांचे शिक्षण मिळण्याचा, त्यामुळे प्रश्नच उद्भवत नाही. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नैतिक व आध्यात्मिक शिक्षण कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय प्राध्यापकांनी शिकवावे का ?

या अडचणीच्या निराकरणासाठी प्रशिक्षणाची दुसरी पद्धत उपयुक्त ठरेल.

२. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे प्रमाणपत्र प्रदान करणारा अल्पावधीचा अभ्यासक्रम

(Short-term condensed course leading to a Certificate)

योजनेला वेगाने गती द्यावयाची असेल, तर, शिक्षणाच्या सर्व स्तरावर, या शिक्षणाची मानसिक व बौद्धिक पार्श्वभूमी असलेले शिक्षक, मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणे आवश्यक आहे आणि लक्षावधी विद्यार्थ्यांची या विषयाची भूक भागविण्यासाठी, हजारो शिक्षक शिकवून तयार करावे लागतील. अशा प्रचंड संख्येत शिक्षकांची प्रशिक्षणाची व्यवस्था करायची असेल तर हल्लीच्या प्रशिक्षण संस्थावर विसंबून भागणार नाही.

त्यासाठी जागोजाग सुमारे १ ते २ महिन्यांचे अल्पावधी अभ्यासक्रम आखून, आजच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची, त्वरित व्यवस्था करावी लागेल. व्यावहारिक दृष्ट्या, हे प्रशिक्षण उपयुक्त होण्याच्या दृष्टीने, खालील सूचना करता येतील.

काही महत्वाच्या सूचना

अ) हे अभ्यासक्रम दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुटीत आखले जावेत म्हणजे अभ्यासक्रमासाठी जाणाऱ्या शिक्षकांमुळे, शाळेच्या दैनंदिन अभ्यासात व्यत्यय येणार नाही. चालकांना, शिक्षकांना त्यासाठी सुट्टी

देण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

ब) तालुकानिहाय असे अभ्यासक्रम आखावे. तालुका फार मोठा असेल तर, तालुक्यातील एखाद्या मोठ्या सोयीच्या गावी, जास्तीचे केन्द्र असावे. कोणत्याही शिक्षकाला आपल्या तालुक्याबाहेर प्रशिक्षणा-साठी जावे लागणार नाही, असा प्रयत्न व्हावा. फार लांब जावे लागल्याने होणारा त्रास व खर्च कमी व्हावा, हा मुख्य हेतू.

क) या लहान अभ्यासक्रमासाठी तालुक्याच्या प्रत्येक केन्द्रात कायम अशी व्यवस्था *(Permanent Establishment)* करण्याची गरज वाटत नाही. तालुक्याच्या गांवी असलेल्या शासकीय वा खाजगी शिक्षण संस्थेमध्येच, या अभ्यासक्रमाचे आयोजन करता येईल. सुटीतच हे प्रशिक्षण व्हावयाचे असल्याने, जागेची अडचण येण्याचे कारण नाही.

ड) महाविद्यालयातील प्राध्यापकांना, प्रशिक्षण देण्यासाठी, एक वा दोन जिल्ह्यासाठी एक केन्द्र राहील.

अभ्यासक्रमाच्या कालावधीत, निवास व भोजन यांचा संपूर्ण खर्च शासनाने करावा. शिक्षक वा शिक्षणसंस्था यांच्यावर, अशतः वा पूर्णतः या खर्चांचा भार टाकल्यास, अनेक अडचणी येऊन, अपेक्षित अध्यापक संख्या, या अभ्यासक्रमाचा लाभ घेणार नाही. हे शिक्षण अनिवार्य करायचे असेल, तर हे प्रशिक्षण शासनाच्या खर्चानेच देणे उचित ठरेल.

ई) सर्व राज्यांत असे छोटे अभ्यासक्रम, सर्व तालुका केन्द्रात एकाच वर्षी दोन वेळा घ्यावयाचे असतील तर प्रत्येक तालुक्यातील दोन व्यक्ती निवडून त्यांना प्रथम एकत्रितरीत्या सुमारे २–३ महिने, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे सर्वांगीण ज्ञान द्यावे लागेल. प्रत्येक तालुक्यातून निवडलेल्या या व्यक्ती, जाहीर आवाहन करून, अर्ज मागवून, निवडाव्यात. त्या शिक्षकच असल्या पाहिजेत अशी अट मुळीच राहणार नाही. प्रशासन-कौशल्य, योजकता, लोकप्रियता व नीतिमानता इ. गुण असलेली, व या कार्याबद्दल आस्था असलेली, कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती, चालू शकेल. एखाद्या तालुक्यात अशा व्यक्ती उपलब्ध न झाल्यास, इतर तालुक्यातील योग्य व्यक्तींची निवड करावयास, अर्थातच हरकत राहणार नाही. प्रत्येक तालुक्यातून दोन व्यक्ती असाव्यात, असे म्हणण्याचे कारण

एवढेच की, त्या व्यक्तींना त्यांच्या तालुक्यातील परिपूर्ण ज्ञान असल्याने, सर्व संबंधितांचे सहकार्य मिळवणे सोपे जाईल.

निस्वार्थ शुध्दाचरणी सज्जनाद्वारे शिक्षण

तालुकानिहाय निवडलेल्या या व्यक्तींना, प्रशिक्षित करण्यासाठी संपूर्ण राज्यातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचे सखोल चिंतन केलेल्या, विद्वान व शुध्दाचरणी सज्जनांचे सहाय्य घ्यावे लागेल. सुदैवाने भारतात अद्याप, अशी मंडळी विविध संस्थातून, निस्वार्थपणे आपली सेवा आनंदाने रूजू करीत आहेत. या सेवेत यत्किंचितही खाजगी जीवनाचा व्यत्यय येऊ नये म्हणून यापैकी कित्येकांनी तर आजन्म अविवाहित राहून, प्रपंचाचा कोणताही पाश मागे ठेवलेला नाही. असे समर्पित कर्मयोग्याचे जीवन व्यतीत करणाऱ्या महाभागांना, प्रशिक्षण देण्यास आमंत्रित करून, योजनेचा शुभारंभ करता येईल. प्रशिक्षण देण्याची योग्यता असलेल्या व्यक्तींनाच, राज्याची योजना आखण्यासाठी नेमलेल्या समितीत समाविष्ट केले तर अधिकच सोयीस्कर होईल. कारण, प्रत्यक्ष योजनेचा आराखडा आखणारे अंत:करण, या योजनेत यथार्थ प्रशिक्षण देऊ शकेल.

तीन वर्षात पुरेसे प्रशिक्षित शिक्षक

हे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या व्यक्ती, तालुक्यातील केन्द्राचे संचालन करतील. या अल्पावधी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, जर वरील पद्धतीने एखाद्या कर्तबगार अधिकाऱ्याने, संपूर्ण राज्यात यशस्वीपणे करून दाखविली तर, या शिक्षण योजनेचा भरभक्कम पाया घातल्या-सारखे होईल. केवळ २–३ वर्षात, राज्यातील सर्व शिक्षक प्रशिक्षित होऊ शकतील. तालुक्यातील माध्यमिक शाळांची संख्या साधारण पणे २० पर्यन्त असते. या प्रत्येक शाळेतील शिक्षकांची सरासरी संख्या १५ धरली तर तालुक्यातील एकूण शिक्षकांचा आकडा सुमारे ३०० पर्यन्त जाईल. वर्षातून २ वेळा, ५० शिक्षकांचा एक गट, याप्रमाणे ३ वर्षात ६ वेळा जर प्रशिक्षण दिले गेले तर तालुक्यातील ३०० शिक्षकांचे शिक्षण पूर्ण करता येईल. शाळा व शिक्षकांची संख्या, जशी कमीजास्त असेल, त्याप्रमाणात हा अवधी थोडा कमीजास्त असेल

एवढेच.

माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या तुलनेने, प्राथमिक शाळेतल्या शिक्षकांची संख्या जास्त असल्याने, त्यांचे शिक्षण व्हायला, कालावधी जास्त लागेल, तर महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या कमी असल्याने त्यांचे प्रशिक्षण कार्य लवकर पूर्ण होईल.

सर्व शिक्षकांना प्रशिक्षण आवश्यक

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा प्रत्येक शाळेत एक स्वतंत्र गट असू नये. होता होईल तोवर, हे शिक्षण सर्व शिक्षकांकडे सोयीनुसार, आलटून पालटून द्यावे, कारण हे कार्य करण्याची सर्वांवर सामूहिक जवाबदारी आहे. "शारीरिक शिक्षक" म्हणून, जसा एखाद्या व्यक्तीवर शिक्का मारला जातो व त्याचेच ते कार्य आहे, अशी सर्वांची भावना असते, तसे या शिक्षणाच्या बाबतीत होऊ नये. त्यासाठी सर्वच शिक्षकांनी, आपल्या सोयीनुसार, नोकरी लागल्या पासून तीन वर्षांत हे प्रशिक्षण पूर्ण केले पाहिजे, असे बंधन असावे.

(६) शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी व्यक्तित्व चांचण्या (*Presonality Tests*) व त्यांची अंमलबजावणी

शिक्षक होण्यास पात्रता.

शिक्षकांची वृत्ती वा नोकरी कुणी पत्करावी ? कुणाला या पवित्र कार्यात सहभागी होऊ द्यावे ? हे सर्वसामान्य प्रश्न नैतिक व आध्यात्मिक-शिक्षण योजना अमलात आणल्यावर, विशेषच महत्वाचे ठरतात. सैन्यात, खाजगी व्यवसायतात वा अन्यत्र जबाबदारीचे पद भूषवायचे असेल, तर त्यांनी निश्चित केलेल्या चांचण्यात उत्तीर्ण होऊन, आपली पात्रता सिद्ध करावी लागते, शिक्षक होण्यासाठी काही पदव्यापलिकडे, कोणत्याच विशेष पात्रतेची काहीच गरज असू नये, इतका शिक्षण हा नगण्य विषय आहे का ?

सर्वत्र अपात्र तो अध्यापनास पात्र

भावी पिढ्यांची जडणघडण ज्या शिक्षकाद्वारे व्हायची, ते शिक्षक कसे व कोणत्या पात्रतेचे असावेत याचा विचार आजवर न झाल्याने, आज शिक्षकांची, नि त्यामुळे शिक्षणाची, फार शोचनीय अवस्था दृष्टीला

पडते शेतकऱ्याच्या व शिक्षकाच्या, भारतातील सद्य:स्थितीत बरेच साम्य आहे. एखाद्या गृहस्थाला असलेल्या चार मुलापैकी बुद्धिमान असलेल्या तीन मुलांना वकील, डॉक्टर, इंजिनिअर बनवून, सर्वांत निकृष्ट दर्जाच्या चौथ्या मुलाला, तो खेडयातील आपली शेती सांभाळायला सांगतो जणू शेती हा कुणीही करू शकेल असा बुद्धिहीनांचा व्यवसाय ! या गृहस्थाच्या मनोवृत्तीचे प्रतिबिंब समाजात पडलेले दिसून येते. भरपूर प्रतिष्ठा व पैसा प्राप्त करून देणारे मनाजोगे व्यवसाय साध्य झाले नाही, म्हणजे अगतिक म्हणून, अनिच्छेने, आजचा तरूण, शिक्षक व्हायला प्रवृत्त होतो. अन्नदाता शेतकरी व ज्ञानदाता शिक्षक, ह्या दोन्हीकडे आपण जर थोडे बारकाईने पाहीले तर बौद्धिक व शारीरिक कार्यक्षमता व कर्मकुशलता या दोन्ही-दृष्टीने समाजातल्या सर्वात खालच्या थरावर, या प्रमुख कार्याची जबाबदारी सोपविली गेली आहे, असे दिसून येईल. 'मुको बिचारी कुणी हाका', अशी त्यांची स्थिती ! कोणत्याही शासकीय योजनांचा प्रसार करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षक ! मग ती अल्पबचत मोहीम असो की संतती नियमन आघाडी असो ! पक्षीय प्रचाराचे साधन पुन्हा शिक्षकच ! कोणताही फंड गोळा करायाचा असला म्हणजे, बिनदिक्कतपणे राबवला जातो तो शिक्षकच ! एखाद्या ठिकाणी हक्काचे श्रोते म्हणून, सक्तीचे आमंत्रण असते, शिक्षक नि त्यांच्या विद्यार्थ्यांना ! सत्ता व मत्ता यांच्या कच्छपी लागलेल्या आजच्या समाजास नटनटी. उद्योगपती इ. ची जास्त प्रतिष्ठा वाटते आणि शिक्षक हा दुर्लक्षित व दलित राहतो हे आजचे एक विस्मयकारक, पण विमनस्क करणारे चित्र आहे.

केवळ पगाराने प्रतिष्ठा अशक्य

आदर्श शिक्षकाचा तुटवडा आज जगभर जाणवत आहे सर्वत्र त्यांचा वेगाने ऱ्हास होत आहे. हे शिक्षकाचे अध:पतन थांबविण्याचे अनेक प्रयत्न आज सुरू आहेत. पगारमान वाढविणे हा त्यातीलच एक ! पण केवळ पगाराने प्रतिष्ठा प्राप्त होईल, ही काहीची कल्पना चुकीची आहे. कोठारी समितीने सुचविलेले वेतनमान लागू करताच पैशावर दृष्टी ठेऊन, जीवनयापन करणारी काही बुद्धिमान मंडळी, शिक्षक व्हायला, विशषत: प्राध्यापक होण्यास, स्पर्धा करू लागले आहेत.

पण या स्वार्थीबुद्धीच्या बुद्धिमंतापेक्षा, सामान्य बुद्धीचा पण निस्वार्थ वृत्तीचा शिक्षक पुष्कळ बरा असे म्हणायची पाळी कदाचित यायची. तेव्हा आमच्या मते, शिक्षक हा उद्योगपती, व्यापारी, राजकीय पुढारी, चित्रपट व्यवसायी इ. च्या तुलनेने, पैसा-आडक्याने कमी दर्जाचा चालेल; पण मानमान्यता, आदर्श, जीवनाचे मार्गदर्शकत्व इ. गोष्टी शिक्षकाच्या वाटयाला, सर्वात अधिक याव्यात, अशी सर्व क्षेत्रांची उभारणी व्हायला हवी !

मानसशास्त्रीय चाचण्याद्वारे पात्रता

आदर्श शिक्षकांचे स्वप्न साकारायचे असेल तर शिक्षकाचे शिक्षण व त्याची व्यक्ती म्हणून सर्वांगीण वाढ, याकडे विशेषेकरून लक्ष दिल्या-शिवाय, संपूर्ण शिक्षणाचा, त्यातल्या त्यांत नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा, प्रश्न सुटणे शक्य नाही. शिक्षकांच्या व्यक्तित्वाचे अनुमान काढता येण्याच्या दृष्टीने, त्यांचे शील, अध्ययन–अध्यापन प्रवृत्ती, त्यागी भावना, विद्यार्थी व समाज या विषयी कळकळ, इत्यादि शिक्षकाला लागणाऱ्या, मानसशास्त्रीय चाचण्यांचे संशोधन केले पाहिजे. आधुनिक मानसशास्त्राने *rating scales, Situation tests, projecting tests* जशा तयार केल्या आहेत, त्या धर्तीवर, शिक्षकाची व्यक्तिगत गुणवत्तेची कसोटी पाहण्यासाठी, नव्या चाचण्या शोधाव्या लागतील. या चांचण्या अनुभवान्ती सिद्ध झाल्यानंतर, निःपक्षपातीपणे त्यांची अंमलबजावणी केली जावी ! या चांचण्यामध्ये जो उत्तीर्ण होणार नाही, त्याला शिक्षक म्हणून सर्व दरवाजे बंद व्हावेत. शिक्षकाची पात्रता ठरविणाऱ्या या चांचण्यांत, जो अनुत्तीर्ण झाला असेल, तो इतर अनेक बाबतीत (उदा :– बुद्धी, शारीरिक क्षमता, इ) जरी सर्वोत्तम असला, तरी शिक्षक म्हणून त्याचा विचार केला जाऊ नये !

विद्यार्थ्यांसाठी नैतिकता–चारित्र्य कसोट्या

शिक्षकाप्रमाणे, विद्यार्थ्यांच्या विविध अवस्थांना अनुसरून नीती व अध्यात्म अध्यात्म यादृष्टीने, त्यांच्या चारित्र्याचे मापन करणाऱ्या चाचण्या संशोधिल्या पाहिजेत. प्रगत अशा प्रायोगिक मानसशास्त्राला *(Experimental–Psychology)* नैतिकता–चारित्र्य कसोट्या,

(Morality-Character Test) तयार करणे शक्य झाले आहे.[१५] बालक मंदिरापासून तो महाविद्यालयापर्यन्त सर्व विद्यार्थ्यांची, या चांचण्याद्वारा करून परीक्षा व्हावी. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण जर सर्व स्तरावर लागू केले गेले तर पुढच्या पायऱ्यावरील चांचण्यात, विद्यार्थी उत्कृष्ट ठरत जातील. प्रत्येक संस्था प्रमुखाने, इतर बाबतीत ठेवतो तसा, अध्यापक व विद्यार्थी यांचा या चाचण्याबाबतचा "आलेख" जतन केला पाहिजे.

चारित्र्याच्या प्रमाणपत्राला आधार

कुठलीही लहानमोठी नौकरी असली, की आज, इतर प्रमाणपत्रा-सोबत आवश्यक म्हणून सर्वत्र अपेक्षिले जाते, ते म्हणजे चारित्र्याचे प्रमाणपत्र *(Character-Certificate)*. अधिक जबाबदारीच्या उच्च पदावर नेमणूक व्हायची असेल तर अर्जदाराकडून, दोन प्रतिष्ठित व्यक्तींची नांवे मागवून त्यांचेकडून अर्जदाराच्या चारित्र्याविषयी, लेखी विचारणा करण्याची प्रथा, आज प्रचलित आहे. याचा अर्थच असा की शैक्षणिक पात्रतेखेरीज प्रामाणिकता, कार्यनिष्ठा, उद्यमशीलता, विश्वास-पात्रता अशा शीलसंपन्नता वा नैतिकता या सदरात मोडणाऱ्या, काही-सद्गुणांची, कुठल्याही नौकरीसाठी, अपेक्षा असते. "थोडा कमी शिकलेला चालेल, पण प्रामाणिक व विश्वासू मनुष्य हवा," हे कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचे, नेहमी कानावर पडणारे उद्गार, शैक्षणिक पात्रतेपेक्षा, नैतिक गुणांचे मोल नौकरीत अधिक आहे, हेच सुचवीत नाही काय ?

पण आश्चर्य असे की, एवढे महत्वाचे असे हे चारित्र्याचे प्रमाणपत्र शाळा-कॉलेजातून, एक नित्याची बाब म्हणून (*as a matter of routine*) दिले व घेतले जाते. काही अपवाद सोडले, तर सहसा, ते कुणाला नाकारले जात नाही. मागितले म्हणजे, संस्था प्रमुखाने विशिष्ट नमुन्यात, ते द्यायचे असते, एवढाच अर्थ त्याला यावा, इतक्या यांत्रिक-पणे, या प्रमाणपत्राची देवघेव सुरू असते. शारीरिक क्षमतेची चांचणी देखील आपण घेतो, पण मानवाची खरी ओळख ज्यामुळे पटावी, अशा महत्वपूर्ण नैतिक गुणांच्या बाबतीत मात्र कसलाच विचार केला जावू नये, हे केवढे नवल ?

सारांश, निष्कलंक चारित्र्य, सर्वमान्य प्रतिष्ठा व अंतर्बाह्य शुद्धता, या शिक्षकाला आदर्शत्व प्राप्त करून देणाऱ्या गोष्टींचे मूळ, अध्यात्माधिष्टित त्यागी जीवननिष्ठेत आहे. समाजातील इतर घटकांप्रमाणे विलासी व चैनीच्या जीवनाची, यत्किंचितही इच्छा मनात न ठेवता, अध्ययन–अध्यापनाच्या उच्च आनंदात, मानसिक समाधान व सुख मानणारा शिक्षक, ज्ञानदाता म्हणून, सर्वांच्या आदराचे स्थान होऊ शकेल. सामान्य व्यक्तीप्रमाणे केवळ इंद्रिय सुख प्रमुख मानून, जीवन घालविण्याऐवजी बौद्धिक, मानसिक व आध्यात्मिक सुख प्राप्त करण्यात, जीवनाची इतिकर्तव्यता मानणारी व्यक्ती शिक्षकाच्या पवित्र कार्यास पात्र आहे, हे विसरता कामा नये. वेगळ्या शब्दात हेच सांगायचे झाले तर, उच्चतर सुखासाठी निम्नप्रतीच्या सुखाचा त्याग, हे पूर्वी विशद केलेले अध्यात्म सूत्र, शिक्षकाच्या जीवनात प्रकर्षाने उमटून पडले पाहिजे.

तेव्हा शिक्षणात शिक्षकाच्या दृष्टीने, खालील २ बाबी अंमलात याव्या.

१. मानसशास्त्रीय चांचण्याद्वारा, समाजातील त्यागी व सुशील व्यक्तींची शिक्षक म्हणून निवड करून त्यांचा एक उच्चतम दर्जाचा वर्ग तयार करणे.
२. शिक्षकत्वाचे प्रशिक्षण व अधिकार त्याला प्रदान करणे.
३. कुठल्याही राजकीय हस्तक्षेपास वाव न देता या वर्गाच्या हाती सर्व शिक्षण सोपविणे.

स्वामी विवेकानंदांनी[16] हेच सारांशाने सुचवितांना म्हटले आहे की,

" the imparting of knowledge has always been done through men of renunciation, and that the charge of imparting knowledge should again fall upon the shoulders of renuciators or त्यागी. "

प्राचीन भारतात शिक्षण कार्य नैष्ठिक ब्रम्हचाऱ्यांकडे सोपविले गेले होते याचे मर्म हेच होय. कण्व, जाबाली, दिवाकरसेन यासारखे प्रख्यात विद्वान विद्यापीठाचे जे कुलपती होते ते सर्व नैष्ठिक ब्रम्हचारी होते हे

या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे. नैष्ठिक ब्रम्हचाऱ्यांच्या त्यागमय समर्पित जीवनाचा आदर्श प्राचीन भारतातील सर्वंकष समृद्धतेला सहाय्यक ठरला[२७] हे विसरता येत नाही.

दीर्घावधी - योजना

विकाराची विचारावर मात

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या गेल्या सुमारे पाव शतकात घटनेने बहाल केलेल्या व्यक्तीस्वातंत्र्याचा संपूर्ण देशभर एवढा दुरुपयोग सुरू आहे की ज्या राष्ट्रीय स्वतंत्रतेमुळे व घटनेमुळे हे स्वातंत्र्य भोगण्याची मुभा मिळाली आहे, त्या स्वातंत्र्यावर व घटनेवर आपणास तिलांजली द्यावी लागते की काय अशी रास्त शंका आज अनेक विचारवंताना भेडसाऊ लागली आहे. विचार हे क्रमशः लोप पावत असून विकारांचे प्रमाण वाढते आहे. यत्नावाचून अंतःकरणाची वृत्ती उत्पन्न होण्याचे नाव विकार आणि यत्नपूर्वक अंतःकरणाची वृत्ती उत्पन्न होण्याचे नाव विचार आहे.[२८] आज मानवी जीवनाला हितावह अशी वृत्ती यत्नपूर्वक कुणी उत्पन्न करतांना दिसत नाही. सर्वत्र साम्राज्य आहे ते विकाराचे विकृतीचे नि वैफल्याचे! सर्वदूर वातावरण पसरले आहे ते मानसिक दौर्बल्याचे नि दूषित दृष्टिकोनाचे! जिकडे पहावे तिकडे सर्वांची जणू स्वैराचाराची – अनाचारांची चहूबाजूंनी चढाओढ चालली आहे.

विकृती वाढविणाऱ्या बाबी

निसर्गप्राप्त अशा सहज स्वभावाविरूद्ध, माणूस वर्तन करू लागला, म्हणजे अशी विकृती उत्पन्न न झाली तरच आश्चर्य. भारतात उत्पन्न झालेल्या, या विकृतींना, अधिकच विकृत करण्याचे कार्य, आज काही प्रतिष्ठा प्राप्त गोष्टीद्वारा, अव्याहतपणे सुरू आहे. पाश्चात्यांच्या अंधानुकरणाला व अभारतीयकरणाच्या आजच्या प्रक्रियेला, या गोष्टींमुळे अधिकच खतपाणी मिळत आहे. शिक्षणासाठी पोषक अशा वातावरण निर्मितीसाठी तर, या अनिष्ट गोष्टींना प्रथम पायबंद घातला पाहिजे.

भारतीयांच्या जीवन धारणेस घातक ठरत असलेल्या या बाबी, म्हणजे आजचे चलचित्रपट, मादक वस्तूंचे सेवन, विविध प्रकाराची

सट्टेबाजी व अश्लील वाङमयाचे वाढते प्रकाशन! समाजरूपी शरीराला लागलेल्या या एकप्रकारच्या व्याधीच आहेत. समाजातील सारी सात्विकता व सभ्यता शोषून घेणाऱ्या या जणू जळवा! यांचा वेळीच बंदोबस्त केला नाही, तर नकळत, हळूहळू, समाज तेजोहीन, पौरूषहीन, झाल्याशिवाय राहणार नाही!

नैतिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी पोषक असे वातावरण शिक्षण संस्थांबाहेरही उत्पन्न करावयाचे असेल, तर समाजजीवन दूषित करणाऱ्या ज्या प्रमुख बाबी आहेत, त्यांचे काही प्रमाणात नियंत्रण तर करायला हवेच पण त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे त्यांना योग्य ती विधायक दिशा द्यायला हवी. लोक शिक्षणाचे कोणतेही साधन हे दुधारी शस्त्रासारखे असते. योग्य उपयोग केल्यास लाभ, पण त्यांत चूक होताच, तितकीच हानी ठरलेली! आज लोकशिक्षणाची साधने, यथायोग्य समाजहितासाठीच राबविली जात आहेत, असे म्हणण्याचे धाडस करवत नाही.

समाजजीवनात गढूळता उत्पन्न करून. उगवत्या पिढीवर कुसंस्कार करणाऱ्या, ज्या प्रमुख बाबी आहेत, त्यांचा प्रथम विचार करून नंतर इतर उपाय सुचवू.

१. चलचित्रपट

समाजजीवनाचे अविभाज्य अंग

"राजा हरिश्चंद्र" हा पहिला मूक चित्रपट १९१३ साली चित्रित केल्यापासून, गेल्या सुमारे ६० वर्षाच्या कालखंडात भारतातील चित्रपट व्यवसायाचा व्याप एवढा विस्तृत झाला आहे की आंतरराष्ट्रीय-दृष्ट्या, या व्यवसायात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतीय उद्योगधंद्यात गुंतलेल्या भांडवलाच्या अनुक्रमानुसारही, या उद्योगाने दुसरे स्थान पटकाविले आहे. आजवर संपूर्ण लांबीचे सुमारे ७००० चित्रपट भारतात तयार केले गेले सध्या देशभर सर्वत्र विखुरलेल्या अंदाजे ५००० चित्रपटगृहामध्ये ५० लक्ष व्यक्ती रोज, तीन साडेतीन तास खर्च करून, आपले रंजन करून घेत असतात. त्यामुळे सरकारला वार्षिक ५० कोटी रूपयापेक्षाही अधिक उत्पन्न, करमणूक व आय-कराच्या

रूपाने, या धंद्याद्वारे होत असते. सुमारे ६ लक्ष लोकांची उपजीविका, या व्यवसायावर अवलंबून आहे.

वरील प्रचंड आकडेमोड एवढ्याचसाठी प्रथम उद्धृत केली आहे, की चलचित्रपट, समाजजीवनाचे एक अविभाज्य अंग बनू पहात आहे, हे विधान केले असता कुणाला ते एकदम अतिशयोक्तीचे वाटू नये. समाजाच्या कोणत्याही थरात जाऊन तुम्ही कानोसा घ्या! सुशिक्षित –अशिक्षित, गरीब–श्रीमंत, विद्यार्थी–पालक अशा कुणाचेही लौकिक संभाषण ऐका! कुणाही दोघांची सुरू असलेली चर्चा ऐका! आपणास असे आढळून येईल की, बहुजनसमाजाच्या मुखी प्रामुख्यानें व आपुलकीने, जर कोणता विषय घोळत असेल, तर तो म्हणजे चित्रपटसृष्टी व तिच्याशी निगडित असलेल्या " नटनटी " आदि प्रमुख व्यक्ती! सामान्य समाजाची सिनेमाविषयीची आसक्ती एवढी वाढली आहे, की सिनेमा ही बाब, व्यक्ती तद्वतच समष्टिजीवनातील एक अविभाज्य घटक होऊ लागली आहे!

प्रतिसृष्टी निर्मिणारी कलांची कला

तसे होणे स्वाभाविकही आहे. कारण चित्रपट कला ही ज्याप्रमाणे सप्तरंगांच्या सुंदर मिलाफातून चित्ताकर्षक असे इंद्रधनुष्य जन्माला येते, त्याप्रमाणे अनेक कलांच्या सुरेख मिश्रणातून, जन्म घेणारी मनोवेधक कला आहे! इतर सर्व कला माध्यमातून, जीवनाच्या एकेका विशिष्ट अंगाचेच काय ते प्रगटीकरण होऊ शकते. त्यामुळे त्या प्रत्येक कलेला सीमा पडतात, काही मर्यादा उत्पन्न होतात. उदा:– शिल्पकला वा चित्रकला या दोहोत स्थिरता व स्तब्धता हे दोष आहेत. संगीतकाराजवळ अधिक लवचिक माध्यम असते. स्वरासारख्या सूक्ष्म व तरल साधनाद्वारे संवेदनांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करून व्यक्ती व प्रसंग यांची विशिष्ट चित्रे ऐकणाऱ्याच्या मन:चक्षूसमोर उभी राहतात. परंतु संगीताचे स्वरूप अति अमूर्त असते. गेल्या शतकापर्यंत कोणतेही एक कला-माध्यम जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडवू अकले नाही याचे कारण त्या प्रत्येकात असलेला असा दोष!

परंतु चित्रपटकला ही अशी एकमेव कला चालू शतकात मानवाला उपलब्ध झाली आहे, जिच्या सहाय्याने बाह्य सृष्टी व मानवी मनाची अंत:सृष्टी संपूर्ण आत्मसात करून साक्षात प्रतिसृष्टी निर्माण करण्याचे यश तिला प्राप्त झाले आहे. त्यामुळे मानवी जीवनात या कलेने एवढे महत्वाचे स्थान संपादन केले त्यांत आश्चर्य नाही व दु:ख तर मुळीच नाही.

प्रभावी माध्यमाचा दुरूपयोग

दु:ख आहे ते या प्रभावी कला–माध्यमाचा आज सत्कारणी उपयोग होत नाही याचे! चित्रपट केवळ निष्क्रीय करमणूक करणारी चीज नसून समाजावर सुसंस्कार करण्याचे प्रमुख साधन आहे, याचा विसर पडल्याचे! जीवनातील संस्काराचे अत्यधिक महत्व व त्याचे चित्रपट हे प्रभावी–माध्यम, हा अन्योन्य संबंध ओळखून निर्मात्यांनी आजच्या सिनेसृष्टीचे, दिग्दर्शन केले आहे काय? भारती–यांचा परमपुरूषार्थ जो परमेश्वर–प्राप्ती तो साध्य करण्यास या कलेचा कितपत उपयोग होतो? भारतीय जीवनाचा मूलाधार असलेले सत्य, अहिंसा, प्रेम, त्याग, दया–क्षमा, शांती, सेवा आदि गुणांचा परिपोष चित्रपटात होतो काय? आपली संस्कृती, इतिहास, परंपरा यांच्याशी सुसंगत अशाच चित्रपटांची निर्मिती व्हावी, अशी दृष्टी चित्रपटाद्वारे व्यक्त होते काय? या प्रश्नांची उत्तरे सद्य:स्थितीत तरी आपणास नकारार्थीच द्यावी लागतील!

सत्प्रवृतीला आव्हान

ज्या कलेद्वारा भारतासारख्या नवोदित राष्ट्रातील नवयुवकांच्या सुप्त आशाआकांक्षांना प्रज्वलित करून देशभक्ती व शीलनिर्मितीची लाट सर्वत्र पसरविता आली असती त्याच या कलेचा उपयोग आज तरूणांना दुर्बल, तेजोहीन व स्त्रीलंपट करण्याकडे केला जात आहे! सिनेमातील आचार, विचार व पोषाख हे बव्हंशी भारतीय धोरणांशी विपरीत असलेले व पाश्चात्यांशी मिळतेजुळते असलेले, पण त्यांचे न झेपणारे, प्रकृतीला न पेलणारे भ्रष्ट अनुकरण करण्याचा आजच्या पिढीचा केवढा अट्टाहास सुरू आहे. चित्रपटसृष्टीने समाजाचे, विशे-

षत. विद्यार्थी वर्गाचे, जीवनच इतके व्यापून टाकले आहे की, त्यापासून अलिप्त राहतो असे म्हटले, तरी सत्प्रवृत विद्यार्थ्यास अवघड जावे. रस्त्याने जावे तर चुंबनालिंगनाचे जाहीर प्रदर्शन करणारी, मोक्याच्या ठिकाणी लावलेली प्रचंड भित्तिपत्रके, घरी बसले तरी शेजारच्या रेडिओवर वा जवळपास दूरध्वनिक्षेपकावर प्रक्षेपित होणारी भानोत्तेजक अशी कामुक गाणी, सार्वजनिक वाचनालयात पाऊल ठेवले वा प्रवासाला निघाले तर चित्रपटांतील अश्लील चित्रांचे प्रदर्शन मांडणारी व जिज्ञासेने वाचली जाणारी साप्ताहिके व मासिके नि शाळा-कॉलेजात, नव्हे शेजारच्या व प्रसंगी स्वत:च्या कुटुंबात, फुरसतीच्या वेळी, चालू चित्रपटाविषयी चाललेली जिव्हाळ्याची चर्चा ! अशा प्रकारे सर्वत्र पसरलेल्या चित्रपटाच्या चंदेरी दुनियेतून, स्वत:ची सुटका करून घ्यायला, खरोखरी एखादा शुकदेवच असायला हवा ! समाजाचे सर्व वातावरणच चित्रपटाने एवढे भारले गेले आहे की, कोण विद्यार्थी कसा सत्प्रवृत निपजतो ? हे आम्ही पाहतो, असे आव्हानच जणू ते सर्वांना देत आहे.

कुसंस्काराचा कारखाना

पालकांच्या सदुपदेशाने, शाळा व कॉलेजात मिळणाऱ्या नीतिमत्तेच्या अल्पस्वल्प शिकवणीने किंवा पुढाऱ्यांच्या व्याख्यानामुळे, एका महिन्याच्या कालावधीत आजच्या तरूणावर जेवढे सुसंस्कार होत असतील त्याच्या कित्येकपट कुसंस्कार मुक्त कामचेष्टा दर्शविणारा एखादा सिनेमा पाहून होत असतात हे मानसशास्त्रीय दृष्टया अंत:करणाचे बारकाईनें निरोक्षण केले तर सहसा कुणी अमान्य करणार नाही. कारण केवळ २॥-३ तासांचा अवधी असला तरी चालते बोलते असे संपूर्ण हालते जीवन चित्रपट बघतांना प्रेक्षकापुढे गतिमान होत असते. कान व डोळा ही दोन्ही अत्यंत प्रभावी इन्द्रिये या संपूर्ण कालावधीत कार्यरत ठेवली जातात. ऐकल्या व बघितल्या जाणाऱ्या सर्व गोष्टीसंबंधी मनाचे विचारचक्र सारखे सुरू असते, आणि म्हणूनच चित्रगृहातून बाहेर पडतांना प्रत्येक व्यक्ती, विशेषत: अपक्व मनाचा विद्यार्थी, प्रवेश करतांना ज्या मन:स्थितीत होती त्या अवस्थेत राहणे संभवत नाही. चित्रपट संपल्यावर कितीतरी वेळ

त्याचे बरेवाईट परिणाम देह व मन या दोहोवर होणे अपरिहार्य ठरते ! शिवाय रेडिओ व मासिके पाहिलेल्या चित्रपटातील घटनांची वारंवार स्मृती जागवित असतात.

कौशल्यपूर्वक नियंत्रण

वरील सर्व विवेचन अर्थातच प्रसारित होणाऱ्या सर्वच चित्रपटांना लागू आहे असा निष्कर्ष कुणी काढणार नाही हा विश्वास आहे. पण "अपवादाने नियम सिद्ध व्हावा" एवढे अशा आदर्श चित्रपटांचे प्रमाण कमी आहे! आज होणारे चित्रपटांचे, विद्यार्थी वर्गावरील भयानक आक्रमण थोपवायचे असेल तर, अत्यंत कौशल्याने पण कडक पाऊल उचलावे लागेल, हे उघड आहे. समाजाची चव चित्रपटाने एवढी बिघडली आहे व चित्रपटाची चटक त्याच्या चहात्यांना एवढी लागली आहे की शासनाने उद्या अशा बहुसंख्य गल्लाभरू चित्रपटावर बंदी टाकतो म्हटले, तर समाज, प्रामुख्याने विद्यार्थीच त्याविरूद्ध बंड करून उठेल. एखाद्या लहान मुलाने खेळणे म्हणून ब्लेड हाती पक्की धरून ठेवली व पुष्कळ समजूत घालूनही ती देण्यास त्याने नकार दिला तर ज्या कौशल्याने त्याचे इतरत्र लक्ष वेधून वा दुसरे आकर्षक पण निरूपद्रवी खेळणे देऊन, एखादी माता त्याचे हातून ती ब्लेड काढून घेईल, तीच हुशारी हे चित्रपट प्रकरण हाताळतांना शासनाने दाखविली पाहिजे.

स्थूल उपाय योजना

या विषयाचे फार सविस्तर विवेचन करण्याचे आपणास प्रयोजन नसल्याने, चित्रपटामुळे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला जे प्रतिकूल वातावरण उत्पन्न होते, ते कमी करण्यास काय करता येईल, याची स्थूल उपाय–योजना खाली सुचवित आहोत.

अ) कुणाच्या फारशी लक्षात येणार नाही, अशी बंधने चित्रपटाचे बाह्य स्वरूप, संगीत, कथा, संवाद, अभिनय, चित्रपटातील आचार विचार, पोषाख इ. बाबतीत क्रमशः घातली जावीत. भारतीय जीवन-ध्येयांशी सुसंगत असे चित्रपटांचे चित्रिकरण होईल अशी प्रेरणा व दिशा मिळेल अशी व्यवस्था हळूहळू करावी.

ब) चित्रपटगृहाशिवाय चित्रपटांतील चित्रांची दृश्ये, नगरात

इतरत्र प्रदर्शित करण्यास पूर्णपणे बंदी असावी. साधी जाहीरात करण्याची मोकळीक असल्यावर, समाजहिताच्या दृष्टीने, असे पाऊल शासनाने उचलले, तरी समाजातले वातावरण दूषित होण्यास बराच आळा बसू शकेल.

क) " केवळ वयस्कासाठी व सर्वांसाठी " असे जे वर्गीकरण आज केले जाते ते दोन करण्यासाठी हास्यास्पद ठरते. एकतर सर्वासाठी, म्हणजे विद्यार्थ्यांना देखील दाखविण्याजोगे, म्हणून ज्या चित्रपटांना प्रमाणपत्र बहाल केले जाते, त्यात कितीतरी दृश्ये, अल्पवयीनांच्या दृष्टीस पडू नयेत अशी असतात. विद्यार्थ्यांना खुले असलेले चित्रपट, कुसंस्काराचा लहानसा ठसाही मनावर उमटविणार नाहीत असेच असले पाहिजेत, असा कटाक्ष सेन्सॉर बोर्डाने ठेवला पाहिजे.

दुसरे असे की " केवळ वयस्कासाठी " असा छाप असलेले चित्र विद्यार्थ्यांनी आवर्जून पहावे असा संकेत आज जवळपास रूढ झाला आहे. या वर्गीकरणाकडे आज सर्वत्र थट्टेने व टिंगलीने बघितले जाते. चित्रपटगृहाच्या मालकांना जबर दंड करून व " वयस्कासाठी " असलेले चित्रपट दुपारच्यावेळी न दाखविण्याचे बंधन घालून शासनाला अपेक्षित असे प्रौढच हे चित्रपट पाहतील अशी व्यवस्था केली जावयास हवी.

ड) " महान धार्मिक " म्हणून ज्यांची जाहिरात केली जाते व समाजातील धर्म श्रद्धेच्या भांडवलावर. स्वत:च्या स्वार्थाची तुंबडी भरण्याचा प्रयत्न ज्याद्वारे केला जातो, अशा धर्मविषयक चित्रपटांच्या बाबतीत शासनाने फार सावधगिरी बाळगली पाहिजे. हजारो वर्षांपासून आपल्या संस्कृतीने काळजी पूर्वक जतन केलेली व अमूर्त स्वरूपांत असूनही जीवनास भव्योदात्त असे वळण लावणारी श्रद्धाकेन्द्रे, पौराणिक व्यक्तिरेखातून रेखाटली आहेत. त्या श्रेष्ठ व्यक्तींची कुचाळी, चिरफाड व तोडमोड करून व प्रसंगी त्यांच्या नांवावर हीन दर्जाचा विनोद करून चित्रपटांनी आज या श्रद्धास्थानांना धक्का दिला आहे. धर्मभावनांना निम्नस्तरावर आणले आहे. महापुरूषांना सामान्याप्रमाणे चित्रित केले आहे.

विद्यार्थ्यांचे शील आदर्श चित्रपटांमुळे अधिक उंचावले नाही तरी, त्याला खाली ओढण्याचे दुष्कर्म तरी त्यांचेकडून होणार नाही, याची शासनाने खबरदारी घेतली पाहिजे.

इ) वरील सर्व उपाय आहेत केवळ नकारात्मक; आजच्या दुष्परिणामांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करणारे ! पण या उपाया-शिवाय काही आदर्श चित्रपटांची स्वत: निर्मिती करून शासनाने निर्मात्या समोर आदर्श घालून दिला पाहिजे. त्यासाठी एक महामंडळ नेमून शासन निर्मित फिल्म स्टुडिओतर्फे लघुचित्रपट, व पूर्ण लांबीचे चित्रपट मुद्दाम चित्रित करून शिक्षणसंस्था व ग्रंथालयास.रख्या इतर ज्ञानदान करणाऱ्या समाजसंस्थांना पुरविले पाहिजेत. तसेच खाजगी निर्मात्यांना देखील विविध प्रकारे प्रोत्साहन देऊन अशा इष्ट वळण देणाऱ्या चित्रपट निर्मितीसाठी शासनातर्फे आवाहन केले जावे.

वरील गोष्टी येत्या काही वर्षाच्या कालखंडात अमलात आणणे शासनाला फारसे अवघड नाही. नैतिक व अध्यात्मिक शिक्षणाचा, चित्रपटाशी प्रत्यक्ष संबंध नसला, तरी या शिक्षणामुळे प्रत्यक्ष होणाऱ्या परिणामापेक्षा, चित्रपटाचा विद्यार्थी मनावर होणारा अप्रत्यक्ष परिणाम एवढा प्रचंड आहे, की त्याचे विवेचन वगळणे, म्हणजे या शिक्षणाचा सर्वस्पर्शी विचार न केल्यासारखे झाले असते. एका महत्वाच्या घटकाची उपेक्षा करण्याचा दोष उत्पन्न झाला असता ! म्हणूनच या विषयाचा एवढा सविस्तर उहापोह !

२) आकाशवाणी

भारतीय जीवन ध्येयाचा विसर

सामान्यांना कुठेही उपलब्ध असलेले घरबसल्या करमणूक करणारे आकाशवाणी हे आणखी एक प्रमुख साधन ! पूर्णपणे शासनाचे नियंत्रण असल्याने त्याचे स्वरूप काहीसे समाधानकारक आहे. काहीसे म्हणण्याचे कारण असे की आकाशवाणीतर्फे प्रसारित होणारे कार्यक्रम अद्यापही भारतीयांचे परमोच्च ध्येय दृष्टीसमोर ठेउन आखले गेल्यासारखे वाटत नाहीत.

खरे म्हणजे, आकाशवाणीवर प्रसारित होणारा प्रत्येक कार्यक्रम देशाच्या कानाकोपऱ्यातील लहान–मोठे, पक्व-अपक्व, पिता–पुत्र भाऊ-बहिण, सुशिक्षित–अशिक्षित, असे सर्व प्रकारचे लक्षावधी लोक, एकत्र बसून ऐकत असतील, त्यावेळी त्यांच्यावर या कार्यक्रमाच्या होणाऱ्या परिणामाचा शासनाने नको का विचार करायला ? कुटुंबनियोजनासारखे विषय लहान–मोठे असे सर्वच वयोमर्यादेतील व्यक्तींच्या कानी पडतील अशावेळी ऐकवावेत का ? सकाळी साडेआठ ते साडनऊ पिता–पुत्र, दुपारी अडीच ते साडेचार सासवा–सुना, सायंकाळी भाऊबहिणी व रात्रींच्या वेळीं सर्व कुटुंबीय यांनी लोकप्रिय झालेल्या " विविध भारती " चे सिनेसंगीत, एकत्रित बसून ऐकावे म्हणून, आपण दिवसातून ४-५ वेळा ५-७ तासांचा हा समाज संस्कारांचा सुरेख कार्यक्रम कित्येक वर्षा-पासून अखंडपणे सुरू ठेवण्याचे महत्कार्य करीत आहोत का (?)

मांगल्याचे व पावित्र्याचे शोषण

यावर कुणी असा युक्तिवाद करील की हे सर्व कार्यक्रम सर्वांनी ऐकलेच पाहिजे अशी कुणी जबरदस्ती केली आहे का ? खाजगी संस्था वा परराष्ट्राच्या आकाशवाणी – चालकांनी असा युक्तिवाद केला तर तो शोभून दिसेल. म्हणूनच पाश्चात्य खाजगी नभोवाणी संस्थेद्वारा अव्याहत प्रसारित होणारे नृत्य संगीताचे कार्यक्रम वा सिलोनच्या व्यापारी संस्थेने नफ्यासाठी चालविलेले सिने संगीताचे पुरश्चरण, याबद्दल आम्हाला काहीच म्हणायचे नाही. परंतु सद्भावनांचा, सद्विचारांचा व सुशिक्षणाचा सत्संस्कार करून समाज जीवनाचे पोषण करण्याचे कंकण हाती घेतलेल्या शासनाने, जर मानवी मांगल्याचे व पावित्र्याचे असे शोषण सुरू केले, तर काय म्हणायचे ? कुणाला बोल लावायचा ? कुणाकडे तक्रार न्यायची ?

मनोरंजन, जाहिरात व प्रतिष्ठेचे साधन

सामान्य मनुष्य हा स्खलनशील असतो. विद्यार्थी वर्ग तर अगदीच अपरिपक्व मनाचा ! प्रगतीचा, संस्कृतीचा, शिखराकडे नेणारा, चढावाचा मार्ग नेहमीच कठीण व परागतीचा, विकृतीचा खाली जाणारा घसर-गुंडीचा मार्ग नेहमीच फार सुलभ असतो. पाणी वर चढवायचे म्हणजे मुद्दाम पंप बसवावा लागतो. तेच खाली आणायचे असेल तर ? कसलीच

गरज नाही. कारण वरून खाली जाणे हा पाण्याचा सहज स्वभाव. लहान वयाचा, अपक्व मनाचा, अशिक्षित – असंस्कृत विचारांचा समाज कोणत्याही देशातील लोकसंख्येत अधिक असायचाच ! त्यांना चांगल्या व वाईट कार्यक्रमांमध्ये योग्य विवेक करून योग्य वेळी योग्य कार्यक्रम ऐकण्याचे शहाणपण कुठून असणार ? राष्ट्रपतींचे राष्ट्रीय महोत्सवा-निमित्त राष्ट्रीय एकात्मतेवर, राष्ट्रभावना जागविणारे भाषण सुरू अस-तांना, बाजार ओळीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आपण जर फेरफटका मारला तर मोहबत्तीचे गुणगान करणारे एखादे आकर्षक द्वंद्व गीत आपणास अखंडपणे, संपूर्ण ऐकावयास मिळू शकते. विविध ठिकाणा-हून प्रसारित होणाऱ्या ४–६ चांगल्या कार्यक्रमासोबत एक जरी अनिष्ट वळण लावणारा कार्यक्रम कुठे असेल, तर त्याच कार्यक्रमाकडे बहुसंख्य समाजाचे लक्ष आकर्षित होते. आणि बहुसंख्य समाज ज्या दिशेने वाटचाल करीत असतो, त्या दिशेने चांगल्या – वाईटांच्या सीमारेषेवर असलेले लोक, विशेषत: विद्यार्थी आपले पाऊल टाकीत असतात. उदा. सुमारे ६० टक्के असलेला अपक्व अशिक्षित समाज व २० टक्के सीमा-रेषेवर असलेला समाज अशा सुमारे ८० टक्के लोकसंख्येची जी प्रवृत्ती असते त्याच्या विरूद्ध जाण्याचे मनोधैर्य व साहस फार क्वचित् ! साहजिकच ५–१० टक्यांचा अपवाद वगळता संपूर्ण समाजच आकाश-वाणीचे कार्यक्रम ऐकण्याच्या बाबतीत आपला विवेक गमावून बसतो. प्रसारित होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे, ते श्रवण करणाऱ्या व्यक्तीशी संपर्क साधून, जर कुणी शास्त्रीय दृष्टीने निरीक्षण करून निष्कर्ष काढले तर वरील विधानांना खचित पुष्टी मिळेल ! लोकशिक्षणाचे म्हणविले जाणारे हे साधन आज केवळ मनोरंजन, जाहिरात व प्रतिष्ठेचे गमक झाले असल्याचे अनुभवास येईल; नव्हे तशी प्रचीती आज पदोपदी येत आहे.

नैतिक व आध्यात्मिक उन्नतीला पोषक

ही आकाशवाणी कार्यक्रमाची वस्तुस्थिती वर्णन करण्यामागे आकाशवाणीचे कार्यक्रम सर्वस्वी चुकीच्या मार्गाने आयोजित होत आहेत किंवा ते अजिबात बंद केले जावे असे दुरान्वयानेही सुचवण्याचा हेतू नाही.

परंतु दर दिवशी कित्येक तास, स्वयंपाकघरापावेतो संस्कार करण्याचे सामर्थ्य असलेले हे एकमेव साधन, फार जपून वापरले गेले पाहिजे असे वाटते. जनमानसावर त्याचा निदान विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली गेली पाहिजे. गेल्या कित्येक पिढ्या, शिक्षणाचा गंधही नसलेल्या या देशातल्या बहुजन समाजाच्या बालकांची नवोदित पिढी, आकाशवाणीच्या रंजनात्मक कार्यक्रमाने सुरवातीसच खुरजटून जाणार नाही, यासाठी डोळ्यात तेल घालून अहर्निश काळजी घेतली पाहिजे ! समाजाच्या नैतिक व आध्यात्मिक उन्नतीला पोषक असे वातावरण निर्माण करण्यासाठी, आकाशवाणीने आपला महत्वपूर्ण वाटा, आनंदाने उचलला पाहिजे. राष्ट्राची आजची ती गरज आहे !

काही सूचना

ही गरज भागविण्यासाठी खालील उपाय सुचविता येतील.

अ) पक्षनिरपेक्ष अशा समाजधुरीणांचे व शिक्षणतज्ञांचे सल्लागार मंडळ नेमून आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांची फेरआखणी करणे. नैतिक व आध्यात्मिक जीवन घडविण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे. करमणुकीसाठीच केवळ होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रमाण व त्यासाठी खर्च होणारा वेळ यात घट करणे.

ब) देशातील सर्व आकाशवाणी–केन्द्रात संपूर्ण वेळ उपयोगात आणण्याजोगे, पुरेसे कार्यक्रम उपलब्ध होत नसतील, तर कोणते तरी रटाळ कार्यक्रम आखून वेळेची भरपाई करण्यापेक्षा, प्रसाराचे काही तास कमी करण्यात यावेत, पण सामाजिक रूची व परंपरा यांना बिघडविणारे कार्यक्रम ऐकवून, पूर्ण वेळ केन्द्र सुरु ठेवले याचे भ्रामक समाधान मिळविण्याच्या भरीस पडू नये !

क) युवकांसाठी आकाशवाणीचे एक शक्तिशाली केन्द्र, देशाच्या मध्यभागी सुरू करण्यात यावे. प्रबळ सत्प्रवृत्ती, रंजकता व विधायक सक्रियता यांचा सुंदर मिलाफ या केन्द्राच्या कार्यक्रमाद्वारे व्यक्त झाला पाहिजे ! राष्ट्रीय ऐक्य व एकात्मतेचा भाव जागविला गेला पाहिजे ! सद्गुण संवर्धनासाठी या केन्द्राने प्रोत्साहन दिले पाहिजे. चांगल्या

विद्यार्थ्यांना त्यामुळे चांगला पर्याय तरी उपलब्ध होईल. आज तशी पुरेशी सोय नाही असे म्हणणे भाग आहे !

(३) चित्रवाणी *(Television)*

चित्रवाणीची सुरूवात भारतात नव्याने नुकतीच झाली आहे; आणि सुदैवाने याचा सर्वप्रथम प्रयोग भारताच्या राजधानीत प्रामुख्याने शिक्षणक्षेत्रांत होत आहे. भविष्यात चित्रवाणीच्या प्रसाराचे स्वरूप कसे बदलते, यावर त्याचा परिणाम अवलंबून आहे. पण चित्रपटाप्रमाणे पुढे ते एक प्रश्नचिन्ह होऊ नये म्हणून, आत्तापासूनच या बाबतीत जपून पावले उचलली पाहिजेत, असा इषारा द्यावासा वाटतो.

पाश्चिमात्य देशाकडे पाहून आपल्याला चित्रवाणीच्या प्रसारातील धोके खचित टाळता येतील. "पुढच्यास ठेच मागचा शहाणा" या उक्तीप्रमाणे त्या देशात चित्रवाणीमुळे जे प्रश्न उत्पन्न झाले आहेत, ते टाळण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. चित्रवाणीच्या व्यवसायात खाजगी व्यक्तींना वाव दिल्यामुळे बिभत्स आणि भयानक वर्णने व दृश्ये यावर इतका भर दिला जात आहे, की पाश्चात्य शिक्षणतज्ञांना, त्याच्या दुष्परिणामापासून समाजाला कसे वाचविता येईल, याचा विशेष विचार करावा लागत आहे. सामान्य लोकांच्या आवडी विरूद्ध जाऊन, या प्रकाराला आळा घालणेही आता त्यांना जड झाले आहे.

तेव्हा याबाबतीत पूर्ण सावधगिरी बाळगून प्रचार व्हावा, एवढेच या ठिकाणी सुचवावेसे वाटते.

(४) साहित्य निर्मिती व ग्रंथालयात "सत्साहित्य कक्ष" योजना

विद्यार्थी जीवनात, प्रेरक साहित्याचे व ग्रंथालयाचे महत्व केवढे आहे, हे मुद्दाम सांगितले पाहिजे असे नाही. असे साहित्य आज थोडे-बहुत आहे, परन्तु ते पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे असे म्हणता यावयाचे नाही. शिवाय ते सहजपणे विद्यार्थ्यांच्या हाती पडण्याची सोय नाही.

दुर्मिळ पण मौलिक ग्रंथ प्रकाशन

या दोन्ही अडचणी दूर व्हाव्या म्हणून "सत्साहित्य निर्माण व प्रसार निगम" *(Corporation for Publication and Propogation of Moral & Spiritual-Literature)* अशासारखे एखादे नाव देऊन, मध्यवर्ती शासनाने, एक संस्था स्थापन करावी; व या संस्थेने विविध राज्यातील व विविध भाषांतील, चिरंतन स्वरूपाचे, जे साहित्य आज आर्थिक टंचाईमुळे वा समाजाच्या उपेक्षेमुळे दुर्मिळ झाले आहे, ते आकर्षकरीत्या प्रसिद्ध करावे. भारतातील आज कितीतरी वाङमय, या ना त्या कारणाने पुनर्मुद्रांकन न झाल्याने अद्याप अंधारात आहे. भगवान बुद्धांच्या जातक-कथा, रे. टिळकांनी थॉमस ए केम्पिसचे "ख्रिस्तानुवर्तन" हे सुप्रसिद्ध *"Imitation of Christ"* या ग्रंथाचे केलेले सुरेख भाषांतर, किंवा योगवाशिष्ठ, अशासारखे कितीतरी मौलिक ग्रंथ आज दुर्मिळ होत चालले आहेत. अशा ग्रंथामधील, विद्यार्थी जीवनाला उपयुक्त, असा भाग निवडून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करायचा ठरवला, तरी सुमारे १० वर्षे, केवळ उपलब्ध दुर्मिळ साहित्य प्रकाशित करण्यासाठी मंडळाला खर्ची घालावी लागतील, एवढे हे साहित्य प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे.

सत्साहित्याचा अत्यल्प किंमतीत प्रचंड पुरवठा

"मागणी तसा पुरवठा" हा अर्थशास्त्रीय नियम, वाचावयाच्या साहित्याला तरी लागू होता कामा नये! विविध भाषांतील, जीवन सुसंस्कारित करणारे, परिणामकारक व प्रभावी साहित्य, आकर्षक शैली व सजावटीसह, एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना पुरविले गेले पाहिजे, की आपोआप त्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होऊ लागेल. युवकांसाठी मुद्दाम लिहिलेल्या वा संपादित केलेल्या ग्रंथाचा, आज देशात अत्यंत अभाव आहे. ती उणीव स्वस्त व सोप्या भाषेत लिहिलेल्या, ग्रंथ-प्रकाशनाने, या निगमाने पूर्ण करावी अशी अपेक्षा राहील. संस्कारक्षम वयात, कालापव्यय करून अनिष्ट वळण लावणाऱ्या, अश्लील व डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचू नका, असा केवळ टाहो फोडण्यापेक्षा

विद्यार्थ्यांच्या हाती, सदाचरणास प्रवृत्त करणारे सत्साहित्य देण्याची आज खरी गरज आहे.

पाठ्यपुस्तक म्हणून सद्ग्रंथाची निवड

अशा प्रकाशनानंतर, पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडतील, अशी व्यवस्था करावयास हवी. त्यांतील काही पुस्तके, शैक्षणिक अवस्था लक्षात घेऊन, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक म्हणून, शाळा-कॉलेजातील अभ्यासक्रमासाठी नेमता येतील. अशा पुस्तकांचा, मुलांकडून रीतसर अभ्यासच करून घेता येईल. परंतु अशा पुस्तकांची संख्या साहजिकच थोडी राहणार!

ग्रंथालयात विद्यार्थ्यांला सुलभ प्रवेश

तेव्हा वयोमर्यादेनुसार, विविध स्तरासाठी, निगमाद्वारे मुद्दाम प्रकाशित केलेली पुस्तके, विद्यार्थ्यांच्या हाती पडावीत यासाठी, मुख्य माध्यम आहे ग्रंथालय! भारतातील शिक्षण संस्थाच नव्हे, तर सरकारी व निमसरकारी अशा सर्व ग्रंथालयांनी, युवकासाठी, अशा वाङ्मयाचा, 'सत्साहित्य कक्ष' म्हणून वेगळे दालन सुरू करण्याचा, शासनाने आग्रह धरावा. आवश्यक वाटल्यास, ग्रंथालय कायद्यात, तशी तरतूद करावी. पण विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा भागवून इष्ट वळण लावणारे साहित्य, त्यांना गावात सहजपणे, फारसे शुल्क द्यावे न लागता कुठेही उपलब्ध होईल, अशी व्यवस्था देशभर असावी. विद्यार्थी सुटीत परगावी जातात, तेव्हा देखील कुठल्याही गांवी प्राचार्य वा मुख्याध्यापक यांच्या प्रमाणपत्रावर, नाममात्र वर्गणी घेऊन, हा युवक कक्ष, विद्यार्थ्यांला वाचनासाठी खुला असला पाहिजे. या कक्षांचा खर्च भागविण्यासाठी, अनुदान देता आले तर अधिकच उत्तम! निदान निगमाद्वारे प्रकाशित होणारे साहित्य, या कक्षासाठी, सवलतीच्या दराने उपलब्ध व्हावे. ग्रंथालयाच्या वतीने, पुस्तके विकण्याची व्यवस्थाही करता येईल.

"सत्साहित्य कक्षा" द्वारे सुयोग्य दिशा

शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असल्याने व वाढत्या जिज्ञासेला

तृप्त करण्यास भरपूर साहित्य उपलब्ध होत नसल्याने, आजचा विद्यार्थी हाती पडेल ते पुस्तक वा मासिक वाचत सुटला आहे. एका विशिष्ट वयात, विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ती जागी होऊन, विवेचक बुद्धीला वाचा फुटते. अशा वेळी काय वाचावे, कसे वाचावे, जे वाचले त्याची नीट छाननी करून त्यातील काय ग्रहण करावे, ह्याचे मार्गदर्शन आज कुठेच होताना दिसत नाही. त्यामुळे अति निकृष्ट वाङमय, विद्यार्थ्यांचे मन, आज घडवित आहे. ग्रंथालयातील 'सत्साहित्य कक्ष,' विद्यार्थ्यांना यावाबत योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य करू शकेल.

५) नैतिक व आध्यात्मिक शिक्षणास वाहिलेले मासिक व साप्ताहिक चालविणे

मध्यवर्ती शासनाने वा सर्व राज्य शासनांनी, या योजनेला पोषक अशी विचारसरणी प्रसृत करणारे नियतकालिक चालवावे, मग ते साप्ताहिक, पाक्षिक, मासिक वा त्रैमासिक कशाही स्वरूपाचे असो. शिक्षक, पालक, व सामान्य नागरीक, यांच्याशी हितगुज करून या योजनेसाठी त्यांचा विश्वास व सहकार्य संपादन करणे, हा या नियतकालिकांचा प्रमुख उद्देश राहील.

नियतकालिकांची प्रमुख कार्ये

या नियतकालिकाद्वारे खालील कार्ये सामान्यत: व्हावीत ही अपेक्षा राहील.

अ) सर्व धर्म, प्रांत, भाषा, जाती, यामध्ये परस्पर सलोखा व सामंजस्य वृद्धींगत होईल, असे लिखाण प्रसिद्ध करणे.

ब) ईशभक्ती व राष्ट्रनिष्ठा जोपासली जाईल, असा प्रयत्न करणे.

क) राष्ट्रीय महापुरूषांची माहिती देऊन, त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न करणे.

ड) विविध राज्यातील, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या प्रयोगांची माहिती पुरविणे.

इ) सद्ग्रंथाचे समीक्षण व सद्भिरूचीसंपन्न चित्रपटांचे परीक्षण

ई) विद्यार्थी – विश्वातील अनुकरणीय घटनांचे वृत.

उ) वरील कार्यांना पोषक असे विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख, लघुकथा व कविता प्रकाशित करणे.

भारताच्या पंचवार्षिक योजना यशस्वी व्हाव्या म्हणून, ज्याप्रमाणे काही मासिके (उदा :– योजना, लोकराज्य) शासनातर्फे आर्थिक तोटा सोसूनही चालविली जातात, त्याचप्रमाणे वरील कार्ये, कल्पकतेने करण्यासाठी, या शिक्षणाला पूरक असे मासिक सुरू केले जावे. विद्यार्थ्यांसाठी वर्गणीत सवलत ठेवली जावी. वृतपत्रांचे तंत्र अवगत असलेला कुशल लेखक, संपादक म्हणून असला तर, अल्पावधीत असे मासिक लोकप्रिय तर होईलच, पण आर्थिक उत्पन्नाचे साधनही होऊ शकेल.

(६) शुद्धाचरणी विद्वानांच्या वास्तव्यस्थानी

गुरूकूल

चालते-बोलते विद्यापीठ

ज्यांची विद्वता व चारित्र्यसंपन्नता वादातीत आहे, अशा जेष्ठ, सर्वमान्य, दुर्मिळ बुद्धिमतांचा, आज भावी पिढ्यांना पुरेसा लाभ होत नाही. हाताच्या बोटावर मोजता येण्याजोगे असे जे अत्यल्प विद्वत्वर्य भारतात आहेत, त्यांना खरोखरी चालते बोलते विद्यापीठ म्हणावे लागेल. त्यांच्या षष्ठ्यब्दीच्या, वा इतर कशाच्या निमित्ताने, त्यांचा सत्कार केला, की समाज व शासन जणू त्यांची उपयुक्तता आता राष्ट्राच्या दृष्टीने संपली असल्याचेच जाहीर करीत असते.

लाभ घेण्यात अडचणी

खरे म्हणजे, त्यांच्या पक्व ज्ञानाचा व अनुभवाचा यापुढेच खरा उपयोग असतो. खालील अडचणींमुळे आज त्यांच्या उतारवयातील उर्वरित आयुष्याचा लाभ समाजाला होत नाही.

अ) स्वत:चा खर्च भागविण्याइतपत वा कौटुंबिक जबाबदारी पार पडेल एवढी, आर्थिक सुस्थिती नसल्याने, अशा विद्वानांना मानसिक स्वास्थ नसते; एकतर त्यामुळे त्यांना कुठे नौकरी करणे अपरिहार्य असते. ते न जमले तर दोन वेळची विवंचना त्यांना स्वस्थता लाभू देत नाही.

ब) असे विद्वान जिथे वास्तव्य करतात त्याच गांवी त्या विद्वानाच्या विषयाचा व्यासंग असलेले विद्यार्थी, साहजिकच संख्येने कमी असणार ! अशा थोडया विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास लागणारी मन:स्थिती, आर्थिक अडचणीमुळे अनेकदा नसते. मग परगावच्या विद्यार्थ्यांना, ओळख नसता, अशा विद्वानांचा लाभ कसा होणार ?

क) विद्यापीठ वा प्रसिद्ध ग्रंथालय, यातील सोयी सवलतींचा लाभ घेता यावा म्हणून जशी विद्यापीठ अनुदान मंडळाची आर्थिक मदत देण्याची योजना आहे (*Travel Grants Scheme*) तशी कोणतीही योजना या विद्वानांच्या रूपाने उपलब्ध असलेल्या जिवंत विद्यापीठाबाबत नसते.

पांडित्याचा लाभ घेण्यास गुरूकूल

वरील तिन्ही अडचणी दूर करून सेवानिवृत्त विद्वानांचा लाभ, विशेषत: पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हावयाचा असेल तर, राष्ट्रीय किर्तीत भर टाकणाऱ्या अशा प्रकांड पंडितांच्या वास्तव्यस्थानीच गुरूकुलाची स्थापना करावी. अशा विद्वानांनी दरवर्षी निवड केलेल्या निवडक विद्यार्थ्यांना व्यासंग, लेखन, संशोधन इ. करण्यासाठी त्या विद्वानाजवळ रहावयास सांगावे. या सर्वांचा योगक्षेम, शासनाने चालवावा. या योजनेत पाच ते दहा यापेक्षा अधिक विद्यार्थी, अर्थातच एकावेळी रहाणार नाहीत. विद्यार्थी मनाजोगे कार्य करीत असेल, तरच हा विद्याभ्यास त्याला सुरू ठेवता येईल अमे बंधन असावे. अन्यथा ज्या पंडितांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विद्याभ्यास करीत असेल, त्यांचे समाधान न झाल्यास, कोणत्याही क्षणी विद्यार्थ्याचे निष्कासन होऊ शकेल.

सारांश, हे एकप्रकारे आधुनिक गुरूकूल व्हावे, ही अपेक्षा राहील. राष्ट्रातील जगन्मान्य अशा विद्वानांच्या, प्रत्यक्ष सहवासात राहून, त्यांच्या लहानलहान चांगल्या संवयीपासून, तो तत्वनिष्ठ अशा, तपस्वी जीवनांगाचा परिचय, विद्यार्थ्यांना जवळून व्हावा व त्याचा ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटावा, हा जो गुरूकुलातील मुख्य लाभ, तो या योजनेद्वारा व्हावा हा प्रमुख हेतू.[२१]

(७) निवडक महाविद्यालये व विद्यापीठ यांची निवांतस्थळी, नगरापासून दूर स्थापना

विलासी वातावरणात अध्ययन अवघड

अनेक आकर्षणे व मनोरंजनाची साधने विद्यार्थ्यांच्या आवती-भोवती असतांना, कोणत्याही गंभीर विषयाचे सखोल अध्ययन होण्याची अपेक्षा बाळगणे वावगे ठरेल. मोठमोठ्या, मी मी म्हणविणाऱ्याचे मन, जिथे आधुनिक करमणुकीची साधने पाहून मोहित होते, तिथे कोवळा अपक्व विद्यार्थी, त्याला बळी पडला तर त्याचे का आश्चर्य वाटावे ? त्यातून चैनीची व विलासाची माहेरघरे म्हणून मानली जाणारी प्रचंड शहरेच, आपण विद्यापीठांची केन्द्रे म्हणून निवडली आहेत. चार दिवस मौज करायला येणाऱ्यांची संख्या जिथे हजारोंनी मोजावी एवढी असते, अशा नगरात, सुखोपभोगाचे वातावरण सर्वत्र उत्पन्न झाल्याशिवाय कसे राहील ? या वातावरणात अध्यात्मज्ञानाची, व्यावहारिक विद्येची, सदाचरणाची उपासना विद्यार्थ्याला करावयास सांगणे म्हणजे त्याचा उपहास करण्यासारखेच आहे. आज विद्यार्थ्यांचे जे अध:पतन झाले आहे, त्याचे एक प्रमुख कारण, विद्यापीठांसाठी केलेली या महानगरांची निवड !

गुरूकुलांचा आधुनिक उपक्रम

प्राचीन भारतीयांनी हे नेमके हेरले होते ! म्हणूनच गुरूकूल पद्धतीचा जन्म झाला. अध्यात्म शिक्षणासाठी, परमतत्वाशी तादात्म्य पावण्याची जी संधी शिक्षणसंस्थेतील वातावरणामुळे उपलब्ध व्हावी लागते, ती गुरूकुलात विद्यार्थ्याला प्राप्त होते. डॉ. राधाकृष्णन् म्हणतात,

" . . . . Life in nature and in the open air is the best means of spiritual progress, for in nature the religious eye will see the infinite lying stretched in silent, smiling repose. "

गुरूकुलाचा प्राचीन आदर्श डोळ्यासमोर ठेऊन, श्री. रविन्द्रनाथ टागोरांनी भारतीय शिक्षणाची समस्या सोडविण्यास, तपोवन आश्रमाची

स्थापना केली. स्वामी दयानंदांनी तर शिक्षणसंस्था नगरापासून निदान ८ मैल तरी लांब असली पाहिजे, असे आपले मत व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे तर कौटुंबिक चिंतांपासून विद्यार्थी मुक्त रहावा म्हणून, मातापित्यांनी आपल्या पाल्यांना सुद्धा भेटू नये असे सुचविले आहे.[११] लाला लजपतराय[१२] यांना सुद्धा गुरूकुलपद्धती, फार पसंत होती, असे दिसते. ते स्वामी दयानंदाच्या कांगडी गुरूकुलाबद्दल मत व्यक्त करतांना म्हणतात,

"The Gurukul is one of the most original and interesting experiment carried on; one of the most wonderful, interesting and stimulating institution; We have a hand of ascetics devoted to their duty, and working in the wilderness following the traditions of the ancient Risis, combined with the most modern scientific methods."

विद्यापीठे नगरापासून दूर

अर्थात जी विद्यापीठ वा महाविद्यालये सध्या प्रस्थापित झाली आहेत त्यांच्या बाबतीत आता काहीच करता येणं शक्य नाही. पण यापुढे देशात कुठेही नवे विद्यापीठ वा विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालय स्थापन व्हायचे असेल तर ते आवासिय *(Residential)* पद्धतीचे टेऊन नगरापासून निदान ८–१० मैल दूर राहील, असा प्रयत्न केला पाहिजे; म्हणजे गुरूकुलाचे अनेक लाभ मिळू शकतील, व नैतिक व आध्यात्मिक शिक्षणासाठी हवे असलेले पोषक वातावरण अनायासे प्राप्त होईल ! रमणीय निसर्गाच्या व श्रेष्ठ अध्यापकांच्या निकट सान्निध्यात, विद्यार्थी आला तर, तो अधिक निष्कपट, सरळ मनाचा व साध्या राहणीचा, होऊ शकेल, नियंत्रित जीवन तो जगू शकेल. मात्र प्राचीन गुरूकुलाचा आधुनिक पद्धतीशी योग्य तो मेळ घालून अशी काही विद्यापीठे भारतात स्थापन केली पाहिजेत. डॉ. ॲनी बेझंट[१३] यांनी बौद्धिक व आध्यात्मिक उन्नती–साठी गुरूकुलाच्या आदर्शाचे, शिक्षणक्षेत्रात, पुनरूज्जीवन केले पाहिजे, असे म्हटले आहे. त्या म्हणतात,

"Here is an Indian ideal that it would be well to revive ..... It (India) must have a few represent–

atives (of the ancient Ashram) if she is to rise to her former level in supreme intellectual and spiritual achievement. ''

(८) ब्रह्मचर्य व्रत पालनास विद्यार्थ्यांना आवाहन व प्रोत्साहन

ब्रह्मचर्याची उपेक्षा हे अवनतीचे मूळ

प्राचीन भारतीय शिक्षणाचा प्रमुख पाया कोणता ? असा जर प्रश्न कुणी केला तर, विद्यार्थ्यांचे कडक ब्रह्मचर्य पालन, असेच उत्तर द्यावे लागेल. ज्ञानोपासना करणाऱ्या प्राचीन काळातील नैष्टिक ब्रह्मचाऱ्याने समाजात कोणते उच्च स्थान संपादन केले होते, हे तत्कालिन चिनी प्रवासी, युआन चाँग[३] याने खालील शब्दांत वर्णिले आहे.

" They (Brahmachari) used to promenade through life away from human affairs unmoved by honour or reproach. They were held in the highest veneration by society, ... Their sole concern was a thorough acquisition of knowledge. Forgetting fatique they expatiate in arts and sciences seeking for wisdom ..... "

बुद्धी कुशाग्र होण्यासाठी व धारणशक्ती वाढविण्यासाठी, विद्यार्थी दशेत ब्रह्मचर्याचे कडकपणे पालन करण्याचे महत्व, अनेक ग्रंथातून विविध प्रकारे वर्णन केले आहे. जीवनात आचरण करावयाच्या चार आश्रमापैकी, विद्याध्ययनाच्या कालावधीला ब्रह्मचर्याश्रम म्हणूनच पूर्वसूरींनी संबोधिले आहे. ब्रह्मचर्याची उपेक्षा, हेच भारतीयांच्या अवनतीचे कारण आहे, असे स्वामी विवेकानंदानीही[५] आपले मत व्यक्त केले आहे.

" ..... simply by the observance of strict Brahmacharya (continence), all learning can be mastered in a very short time – one has an unfailing memory of what one hears or knows but once. It is owing to this want of continence that everything is on the brink of ruin in our country."

ब्रह्म ज्याचे उपास्य तो ब्रह्मचारी

विद्यार्थी या शब्दाला, भारतीयांनी समान अर्थाची दिलेली पर्यायवाची संज्ञा "ब्रह्मचारी" हीच होय. ब्रह्म हे ज्याचे उपास्य आहे, ईश्वर प्राप्ती हे ज्याचे उद्दिष्ट आहे, तो ब्रह्मचारी![१६] एवढे भव्योदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेऊन, जीवन जगणाऱ्या ब्रह्मचाऱ्याने प्रचंड शारीरिक व मानसिक सामर्थ्याचा संचय, विद्यार्थीदशेत केला पाहिजे, हे ओघानेच आले. हे ध्येय प्राप्त करतांना, भावी जीवनात येणाऱ्या कसल्याही सुख-दु:खाला तोंड देण्यासाठी, देह व मन या दोहोंची तयारी, या वयातच त्याने करावयास हवी! यासाठी, ब्रह्मचर्याश्रमात, विद्यार्थ्यावर, पूर्वी अनेक नियमांचे बंधन असे, म्हणूनच ब्रह्मचाऱ्याने, मऊ गादी घेऊन पलंगावर झोपू नये; मांसाहार व मद्यपान करू नये; साधे व सकस अन्न, वेळच्या वेळी खावे; केस वाढवू नयेत; नाच, तमाशे पाहू नये; थंड पाण्याचे स्नान करावे; पहाटे उठावे, व्यायाम करावा, अशा किती तरी लहान लहान वाटणाऱ्या, पण वळण लावणाऱ्या बाबींचा, कटाक्ष बाळगला जाई.[१७] या सर्व नियमांचा मुख्य उद्देश, विद्यार्थी, संयमी स्वावलंबी, काटक व कष्टाळू व्हावा, हा प्रामुख्याने असे. रविन्द्रनाथ टागोर[१८] शान्तिनिकेतन येथील आपल्या एका सहकाऱ्याला लिहिलेल्या पत्रात लिहितात,

"शिक्षण हे ब्रह्मचर्य व्रत होय. ब्रह्मचर्य–व्रताचे पालनासाठी, विद्यार्थ्याला जीवनातील अनेक अडचणींची व कष्टांची संवय झाली पाहिजे. आणि त्यांच्या अंत:करणातून, धन–लालसा व गर्व, नाहीसा झाला पाहिजे. चैनीच्या फॅशनेबल व विशिष्ट आवडनिवड दर्शविणाऱ्या, वस्तुंची आसक्ती तर, विद्यार्थ्याला नकोच; केवळ मानसिक कल देखील त्याकडे असला, तर त्यास प्रोत्साहन दिले जावू नये. सौंदर्य–प्रसाधने व पोषाख, यांच्या बाबतीतली चैन, तर पूर्णपणे टाळली पाहिजे!"

अध्यात्म विकासाला योग्य देह धारणा

विद्यार्थ्याला, याप्रकारे अत्यंत शारीरिक शीण व कष्ट देण्याचे कारण, आध्यात्मिक विकासाचा मुख्य आधार, असलेला देह, कोणत्याही

कठीण परिस्थितीत, सुस्थितीत रहावा हेच होय ! ब्रह्मचर्याश्रमात शिक्षण घेतांना, विविध संवयी, आवडी-निवडी व व्यसने, यांनी विद्यार्थी जखडला गेला, तर या अनेक व्यसने व वस्तू, यांच्या आधीन झालेला देह, शिक्षण ग्रहणासाठी, आध्यात्मिक साधनेसाठी, कितीसे सहाय्य देऊ शकेल? "शरीरमाद्य खलु धर्मसाधनम्!" धर्माचे वा ईश्वरप्राप्तीचे मुख्य साधन देह होय. हा देह शुद्ध, स्वच्छ व स्वाधीन असणे आवश्यक नाही काय? या देहसामर्थ्याचा उपयोग, आध्यात्मिक शक्तीचे वर्धन करण्यासाठी, होत असतो, असे भारतीय शास्त्रवेत्यांचे म्हणणे आहे. आधुनिक ऋषिवर्य, योगी अरविंद घोष[१९] या संदर्भात एका ठिकाणी लिहितात,

"The practice of Brahmarya is the first and most necessary condition of increasing the force within, turning it to such uses as may benefit the possessor or mankind .. The source of life and energy is not material but spiritual; but the basis the foundation on which the life and energy stand and work is physical ..... To raise up the physical to be spiritual is ब्रह्मचर्य, *for by the meeting of the two, the energy which starts from one and produces the other is enhanced and fulfils itself."*

कठीण पण गुणकारी उपाय

सारांश, नैतिक व आध्यात्मिक शिक्षण, उपयुक्त, सिद्ध होण्यासाठी ब्रह्मचर्य व्रत पालनाच्या प्राचीन परंपरेची प्रतिष्ठापना, प्रयत्न पूर्वक केली पाहिजे. या व्रताला अपेक्षित असलेले, कडक आचरण नित्य नव्या चित्रपटातील नटनटयांच्या बदलत्या फॅशनच्या मागे, भ्रमराप्रमाणे लागलेल्या, व्यसनाधीन. भारतीय विद्यार्थ्याकडून पाळले जाईल, ही अपेक्षा अव्यवहार्य, हास्यस्पद व स्वप्नाळू आहे, असा कांहीचा आक्षेप येईल, याची आम्हास कल्पना आहे आजच्या विचारांचा विचित्र प्रवाह अनुकूल दिशेने बदलविणे कठीण आहे, याची आम्हास जाणीव आहे पण आज अवघड वाटत असलेली ही गोष्ट प्रत्न केल्यावर अशक्य आहे, असे मात्र मुळीच वाटत नाही.

आदर्श म्हणून निवडलेल्या, निवडक विद्यालयात, कडक आचरणाचा कटाक्ष बाळगला, तर त्यातून बाहेर पडणारे, सर्वच दृष्टीने श्रेष्ठ दर्जाचे विद्यार्थी, आजचे प्रतिकूल वातावरण बदलविण्यास, अत्यंत सहाय्यभूत होतील. अशा निकोप व सर्वांगपरिपूर्ण विद्यार्थ्यांची, योग्य ती प्रतिष्ठा समाज व शासन यांनी सांभाळली, तर इतरत्र त्यांचे अनुसरण होण्यास वेळ लागणार नाही. दीर्घकाल, सातत्याने, आदरपूर्वक प्रयत्न केल्यावर साध्य होणारा, हा मार्ग लांबचा आहे खरा ! पण शिक्षणाचा भारतीय, अत्युच्च आदर्श, प्रत्यक्षात आणण्यासाठी, दुसरा जवळचा मार्ग नाही हे काही खोटे नाही. तसे नसते तर स्वामी दयानंद, ॲनी बेझंट° रविन्द्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, योगी अरविन्द, महात्मा गांधी, या सर्व आधुनिक विचारवंत, तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ञ यांनी ब्रह्मचर्यव्रताचा आग्रह धरून, विद्यार्थी वर्गाला त्याचा शिफारस केला नसती.

(९) अखिल भारतीय नैतिक व आध्यात्मिक शिक्षण संशोधन केन्द्र

कोणताही नवा उपक्रम सुरू केला म्हणजे त्याचे हळूहळू एक तंत्र व शास्त्र तयार होते. नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजना, देशभर, विविध राज्यात, सुरू झाली म्हणजे असे होणे क्रमप्राप्तच आहे. या शिक्षणाचा प्रयोग, जसजसा वाढत्या प्रमाणात अमलात येईल, तसतसे दैनंदिन शिक्षण पद्धतीविषयी, काही प्रश्न वा अडचणी, शिक्षकांना सोडवाव्या लागतील. त्यांचे स्वरूप व महत्व जरी सुरवातीला नगण्य असले तरी विद्यार्थ्यांवर परिणाम होण्याच्या दृष्टीने, त्यांची योग्य उत्तरे शोधणे, महत्वाचे राहील. उदाहरणार्थ, मौन पूजन वर्ग सुरू होण्यापूर्वी किती अवधीचे असावे; परीक्षापद्धतीचा तपशील, किती वेळाची, कशा प्रकारची परीक्षा असावी हे ठरविणे; नैतिक व आध्यात्मिक गुणाचे प्रमाण व विकसन दर्शविणाऱ्या कसोट्या *(Tests)* व सूत्रे *(Formulae)* शोधून काढणे. या व अशाच कितीतरी प्रश्नांच्या बाबतीत शिक्षणसंस्थाना मार्गदर्शन करण्याची गरज, विशेषत: या योजनेच्या प्राथमिक अवस्थेत, उत्पन्न होणार आहे. त्यासाठी मध्यवर्ती शासनाने काही शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ यांची नेमणूक

करून, एक सशोधन केन्द्र प्रस्थापित केले पाहिजे.

या केन्द्राने स्वतंत्र प्रयोग करून वा विभिन्न राज्यात सुरू असलेल्या विविध प्रयोगांचे निरीक्षण करून, या शिक्षण-योजनेच्या विविध अंगांबाबत निश्चित सिद्धान्त शोधून काढले पाहिजेत. त्यामुळे संपूर्ण देशातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाला निश्चित दिशा व स्वरूप तर प्राप्त होईलच; पण या शिवाय त्यात एकवाक्यता निर्माण होण्यास सहाय्य होईल. या विषयाचे सशोधन करतांना सर्व अद्यावत अशा साधनांचा व पद्धतींचा उपयोग करण्यात यावा, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

(१०) अंतरराष्ट्रीय नैतिक व आध्यात्मिक शिक्षण केन्द्र

देशात कांही वर्षे नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा प्रयोग यशस्वीपणे अंमलात आणला गेला म्हणजे इतर राष्ट्रांतील नवयुवकांच्या अंत:करणात शांततेचे, सद्भावनेचे, बीज पेरण्यांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण केन्द्राची स्थापना, केन्द्र सरकारने, केली पाहिजे. या केन्द्रात कुठल्याही देशाचा, धर्माचा वा वशाचा विद्यार्थी प्रवेश घेऊ शकेल. अर्थात हे केन्द्र गुरुकूल पद्धतीने, निवांत जागी, चालविले पाहिजे. या केन्द्रातील शिक्षक, प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड, एकूण वातावरण व तेथील दिनक्रम इ. सर्व बाबतीत हे केन्द्र, आदर्श असावे. भारताचा आध्यात्मिक संदेश, जगाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्याचे मौलिक कार्य, विभिन्न देशातून शिक्षण घेण्यासाठी आलेले हे विद्यार्थी करणार आहेत, याची जाणीव ठेऊन, या केन्द्राची एकूण उभारणी व्हावी. मानवाच्या आध्यात्मिक जीवनाचे मार्गदर्शन करण्याचा, ऐतिहासिक वारसा भारताकडे परंपरेने चालत आला असल्याने, हे केन्द्र अल्पकालातच जगविख्यात होऊन सर्वांच्या आदराचे व श्रद्धेचे स्थान झाल्याशिवाय राहणार नाही!

आध्यात्मिक महामंत्र देण्याचे कार्य

पाश्चिमात्य जगाची भारताने असे कार्य करावे, हीच प्रामुख्याने अपेक्षा आहे शाश्वत शांतीचा, अखंड सुखाचा, अपरिमित आनदाचा, आध्यात्मिक महामंत्र देण्याचे महान कार्य, नियतीने भारतावर सोपविले आहे. ते कार्य करण्याचा शुभारंभ, असे केंद्र स्थापन झाल्यास होऊ शकेल ! भारतीय जीवनाचा सखोल अभ्यास केल्यानंतर, डॉ. ॲनी-

बेझंट[४१] यानी आपले विचार या संदर्भात माडतांना म्हटले आहे,

"..... it is the perpetual affirmation of spirituality as the highest good that is India's mission to the world. As her past glory resulted from her spiritual knowledge and devotion, so must her future be based on the revival and reploclamation of the same. Her genius is for religion and not for politics, and her most gifted children are needed as spiritual teachers, not as competing candidates in the political arena. Let lesser nations and lesser men fight for conquest, for place and for power."

डॉ. बेझंटबाईनी, बनारस येथे स्थापन केलेल्या सेंट्रल हिन्दु कॉलेजच्या स्थापनेमागे, आध्यात्मिक जीवनादर्श आचरणात आणणारे विद्वान तयार करून, सर्वत्र प्रचारासाठी पाठवावे, हाच प्रमुख उद्देश होता.[४२] भारतीय सुपुत्रांचा हा उद्देश साध्य करण्यासाठी, भारताच्या शैक्षणिक व्यासपीठावर, पौर्वात्याचा व पाश्चिमात्यांचा सुरेख संगम घडवून आणण्यासाठी, वर सुचविल्याप्रमाणे "आंतरराष्ट्रीय अध्यात्म केन्द्र" स्थापन करण्याचा उपक्रम, केन्द्र शासनाने हाती घेण्याचा अवश्य विचार करावा !

दहापैकी पाच प्रचार साधने

वरील दहा योजनेपैकी नमूद केलेल्या पहिल्या पाच बाबी तर केवळ, आधुनिक जगात प्रचाराची साधने म्हणून प्रसिद्ध आहेत. ही सर्व साधने, मानवी जीवनात, प्रथम लोकशिक्षणाचा मुखवटा चढवून, जरी आली असली, तरी पुढे त्याचे स्वरूप पार बदलून गेल्याचे आपणास अनुभवावयास मिळते. करमणूक, मालाची जाहिरात, गैरसमजुती, विपरित कल्पना, चुकीचे ज्ञान, इत्यादि हानिकारक गोष्टी, यांचे ते माध्यम होते. वातावरण दूषित होण्यास, अनेक वेळा, ही साधने कारणीभूत होतात. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणास, हे अत्यंत घातक ठरते. ॲलेक्सिस कॅरेल[४३] म्हणतो,

"Moral sense, beauty and mysticity are learned only when present in our surroundings and part of our

daily life. The intellectual classes have been debased by the immense spread of newspapers, cheap literature, radios and the cinemas. Unintelligence is becoming more and more general, inspite of excellence of courses given in schools, colleges and universities. School children and students, form their minds on the silly programmes of public entertainments. "

प्रेरणा सोपी, नियंत्रण अवघड

कसलेही उच्च ध्येय समोर ठेऊन असो, पण आजच्या यांत्रिक युगात, यंत्राला एकदा गती दिली की ते बहुधा मनुष्याच्या हाताबाहेर जाते. यंत्राच्या विशाल चक्राला गती देणे, मानवाच्या हातात असले, तरी एकदा गती मिळाली म्हणजे, ते नियंत्रणाबाहेर जाऊन, मनुष्यालाच आपले व्यवहार त्याच्या तंत्राने करावयास भाग पाडते. मुख्य उद्दिष्ट बाजूला रहाते नि मानव यंत्राचा गुलाम होऊन बसतो. यंत्राला सतत काम मिळत राहून, ती यंत्रे निर्माण करणाऱ्यांना आर्थिक लाभ कसा मिळत राहील, हीच सर्वात महत्वाची बाब होऊन बसते " असेच काहीसे या सर्व आधुनिक प्रचार यंत्रणेचे होऊन बसले आहे. मानवी जीवनाचे पोषण करण्याऐवजी, शोषणाचे साधन झालेल्या, या सर्व प्रचारयंत्राना, इष्ट वळण मिळणे महत्वाचे असल्याने, त्यासाठी एवढी गुंतवणूक आम्हाम खर्ची घालावी लागली आहेत.

सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याचो अपेक्षा

अल्पावधी व दीर्घावधी योजनांमध्ये सुचविलेल्या बहुतेक कल्पना, शासनातर्फे अंमलात आणता येण्याजोग्या असल्या तरी, समाजाच्या ज्या ज्या व्यक्तींचा वा घटकांचा, विद्यार्थ्यांवर प्रभाव पडू शकतो, त्या त्या सर्वांनी, नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या, या मूलभूत कार्यात, आपला वाटा आपल्या जबाबदारीची जाणीव ठेऊन उचलला पाहिजे आज कोणतेही नैतिक कार्य असो, जो तो स्वत:ला वगळून, इतरावर ते लादायच्या प्रयत्नात असतो.[४५] निदान शिक्षणाच्या बाबतीत तरी असे होऊ नये. कारण, शिक्षण बिघडेल तर, सर्व समाजच बिघडेल व या ना त्या प्रकारे

समाजाच्या प्रत्येक घटकाला, त्याचा परिणाम भोगावा लागेल. प्रा. पॉल लिओनर्ड[४६] या विचारवंताने म्हटल्याप्रमाणे,

" the school not only changes with society but serves also as an active agent of social evolution ". शिक्षणसंस्था, समाजाबरोबर बदलत असतात, पण सामाजिक उत्क्रांती घडवून आणण्याचे देखील, ते एक क्रियाशील साधन असते !

विश्वात्मक विश्वविद्येद्वारा अध्यात्म विश्वावर श्रद्धा

विश्वविद्यालयातून, ' विश्वात्मक अशी विश्वविद्या ' विद्यार्थ्यांना शिकवायची असेल तर आध्यात्मिक जीवनमूल्यें शिक्षणाद्वारे रूजवावयास हवीत. आणि हे अध्यात्मज्ञान केवळ जिज्ञासा भागवावी एवढ्यापुरते सीमित नको. तर ते अनुभूतीच्या आटोक्यात येईल व तद्द्वारा शिक्षण संस्था व त्या भोवतीचे वातावरण घडविले जाईल, असा जाणीवेने प्रयत्न व्हावा![४७] हे वातावरण एवढे प्रभावी असावे की, ज्यामुळे विद्यार्थ्यांची मूर्त अशा लौकिक जगाइतकीच, नव्हे त्याचे अविभाज्य असे अंतर्निहित सत्य म्हणून, आध्यात्मिक विश्वाच्या अस्तित्वाबद्दल श्रद्धा उत्पन्न व्हावी.[४८] अध्यात्म वा धर्मतत्वावरील अविचल निष्ठेच्या अभावी, नैतिकतेचे शिक्षण निरर्थक व निरूपयोगी ठरेल. जागतिक किर्तीचे इंग्रजी विचारवंत जॉर्ज बनार्ड शॉ[४९] यांनी हाच विचार आपल्या प्रभावी भाषेत मांडतांना म्हटले आहे,

" Morality without religion is a tree without roots; a stream without any spring to feed it; a house built on the sand; a pleasant place to live in till the heavens grow dark and the storm begins to beat ."

धर्म व अध्यात्म यांचे शिक्षणातील हे स्थान, भारतातील बहुतेक विचारवंतांना मान्य झाले आहे ते,जीवनाला पायाभूत आहे म्हणूनच! स्वामी विवेकानंद, योगी अरविन्द, श्रद्धेय श्रद्धानंद, गुरूवर्य टागोर, महात्मा गांधी इ. सर्वच शिक्षणतज्ञ व तत्वज्ञ म्हणून, सर्वमान्य झालेल्या भारतीय श्रेष्टींनी, नैतिक शिक्षणासोबत, धर्म व अध्यात्म शिक्षणाचा पाठपुरावा, एकमताने केला आहे;[५०] यावरूनही त्याची सर्वाधिक निवड, सहज लक्षांत येऊ शकते!

प्रबंधाचे पंचशील

नैतिक व आध्यात्मिक शिक्षण योजनेची वरील विविध अंगाची अंमलबजावणी मूर्त स्वरूपात करतांना, मग आपणास अभ्यासक्रम बनवायचा असो, अभ्यासक्रमाला पूरक पाठयपुस्तके तयार करावयाची असो की एखादे शिबिर घ्यावयाचे असो, खालील गोष्टी साध्य होतील याकडे प्रामुख्याने लक्ष दिले जावे.

१. सर्वांतर्यामी, सर्वव्यापी व सर्वशक्तिमान असलेली जगच्चालक अशी शक्ती वा ईश्वर, यावर अविचल श्रद्धा उत्पन्न होणे !
२. सर्वगुणसंपन्न अशा ईश्वराचे प्रेषित अवतार वा भक्त यांचे असामान्य चरित्र व अलौकिक गुण, यांचे प्रेरक ज्ञान प्राप्त होणे !
३. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महापुरूष व सत्पुरूष, यांच्या सच्चरित्रांचे व सद्गुणांचे अनुसरण करण्याची प्रवृत्ती अंत:करणात निर्माण होणे!
४. ईश्वरप्राप्तीच्या हेतूने आचरणात आणलेल्या सद्गुण–उत्कर्षाचा, कुटुंब, समाज, राष्ट्र व विश्व, यामधील सर्व घटकांना लाभ होणे !
५. अध्यात्म व विज्ञान यामधे कोणताही विरोध नसून, या दोहोत परस्परपूरकता व सामंजस्य आहे, हे सत्य मनावर बिंबविणे.

संपूर्ण प्रबंधाचे पंचशील म्हणून संबोधता येईल अशा या वरील पांच बाबी ! त्यांची अंमलबजावणी विद्यार्थी जीवनात होईल अशा रीतीने जर एकूण योजनेची कार्यवाही झाली तर ....

" यतेमहि स्वराज्ये "

तर भारतात पुनश्च सुवर्णयुग अवतरेल! आजच्या कलहयुगाऐवजी कृतयुगाची, प्रेममय जीवनाची पहाट फुटेल ! सर्वत्र स्नेह, सौहार्द व सामजस्य यांचे साम्राज्य पसरेल ! सुख समाधान व शांती ह्यांचे सर्वांच्या अंत:करणात अधिराज्य प्रस्थापित होईल ! स्वेच्छापूर्वक स्वत:वर घातलेल्या संयमामुळे, बाह्य शासनाची मुळी गरजच उरणार नाही. मग कुणी शासक व शासित असणार नाही ! खऱ्या स्वराज्याचा उदय होईल.

"स्वराज्य" म्हणजे स्वत:चे स्वत:वर राज्य! माझ्यावर दुसऱ्याची सत्ता चालत असली, तर ते कसले स्वराज्य ? वेदान्तातील ऋषी म्हणतो

" यतेमहि स्वराज्ये " स्वराज्यासाठी प्रयत्न करा. शास्त्रातही लिहिले आहे, " नत्वहम् कामये राज्यम् " म्हणजे मला राज्य नको, स्वराज्य पाहिजे ! या स्वराज्याच्या स्थापनेसाठी " स्व " ची ओळख प्रत्येकाला करून द्यावयास हवी. विज्ञानासोबत आत्मज्ञान व्हावयास हवे. नैतिक व अध्यात्मिक शिक्षण योजनेने, प्राचीन ऋषिवर्यांचे स्वराज्याचे हे स्वप्न साकार होण्यास खचित सहाय्य होईल. खालील श्लोकात व्यक्त झालेले, पूर्वसूरींचे स्वप्न मूर्त स्वरुपात येण्यासाठी, सर्वांनी या योजनेला निष्ठा-पूर्वक सक्रिय सहयोग द्यावा हीच सर्वाना सप्रेम विनंती.

" न राज्यं नैव राजासित् न दण्डयो न च दाण्डिकः ।
धर्मेनैव प्रजाः सर्वे रक्षन्ति स्म परस्परम् ॥

अर्थः— (जिथे) राज्य नाही (त्यामुळे) राजा नाही. शासक नाही (त्यामुळे) शासित नाही. सर्व प्रजा धर्मपालनाने परस्परांचे रक्षण करते.

संदर्भ टीपा

१. *Locamte du Nouy : Human Destinidy;*
अनुवादक डॉ. चि. श्री कर्वे : मानवाचे भवितव्य; पृ. १८३–१८४.

२. *Annie Besant : India; p. 31.*

३. *Dr. Annie Besant : India; p. 304.*

४. *" A country cannot afford to make mistakes in the education of its citizens any more than it can afford them in matters of defence, nutrition and*

health."
Jean Thomas in article, 'A fair deal for the teacher' in The Unesco Courier; Sept. 1966

५. *" States are made, not from rocks and trees, but from the characters of their citizens, which turn the scale and draw anything after them. "*
Plato. Quoted by Sir R. L. Livingstone : Some Tasks for Education; p. 25.

६. दैनिक 'तरूण भारत' शहर आवृत्ती दि २२ सप्टेंबर १९७०, मथळा " मद्रास शहरात रविंद्र सरोवर कांडाची पुनरावृत्ती."

७. *H. L. Searles : The Study of Religion in State Universities; p. 56.*

८. *Carlton Washburne . Remarks of Mankind; p. 105.*

९. *By education, I mean an all-round drawing out of the best in child and man, body, mind and spirit. Literacy is not the end of education nor even the beginning. It is one of the means whereby man and woman can be educated. Literacy in itself is no education."*
Mahatma Gandhi-Harijan, July 31, 1937.

१०. *R. Tagore : Nationalism, Lectures delivered in Japan & U. S. A , p. 35–36.*

११ *"..... utilatarianism make men mere " walking stomachs and brain."*
R. Tagore : Creative Unity; p. 24

१२. *" Education should automatically serve to bring home to children the essential distinction betweeu man and brute, to make them realize that it is man's special privilege and pride to be gifted with the faculties of head and heart both."*
Mahatma Gandhi : Harijan, Nov. 21, 36.

१३. *Bulletin of the Citadel; IV, 2 (May, 1940), 47.*

१४. पू. विनोबा : शिक्षण–विचार; पृ. क्र. ५०–५१.

१५. *President W. L. Poteat of Wake Forest : Quoted in Frederick Eby "Christianity and Education," p. 194.*

१६. *Robert G. proul, President of the Un. of California developed his meaning at the New York Un. centennial conference, in his now famous testament of faith.*
Vide : The obligation of Universities to the Social Order; p. 382–383.

१७. *Meharchand Mahajan : there is one way to fight corruption; article in Hindusthan Standard dt. 19–8–64.*

१८. *.....the University of Michigan provided for a "Counselor in Religious Education", followed by a Director of the Students Religions Association in 1937. See also : The Woman's College of the University of North Carolina Bulletin, XXIX, 3 (April. 1940), 37.*

१९. *Washburne Carlton ; Remembers of Modern India p. 104.*

२०. *The Besent Spirit; Vol. p 37*

२१. *Dr. Alexis Carell : Man the Unknown. p. 216*

२२. *Harold W. Stoke ; National Necessity and Educational Policy ; urrent issues in Higher Education; Washington.The Association for Higher Education. The National Education Association: Recent Statement of national Educational Leaders 1959: p. 13.*


२३. *Dr. A. S. Altekar ; Ancient Indian Ebucation; p. 47.*
२४. *Clifton Fadiman : in " The case for Basic Education " edited by James D. Koerner. p. 5-6.*
२५. *D. J. Limaye : The Dynamics of Education; p. 114. For experiments on ' Mental Health ' and Test of Honesty & Test of Persistence, see Chap. 12 of this book.*
२६. *Dr. Sisir Kumar Ghosh : Total Education : article from " Mother India " – 15th Aug., 1966.*
२७. *Dr. A. S. Altekar : Ancient Indian Education; p. 114–115.*
२८ श्री. गुलाबराव महाराज : साधुबोध, मधुर प्रकाशन. नागपूर १९६७; पृ. १३४.
२९. *"My idea of Education is* गुरूगृहवास. *Without personal contact with the teacher; there would be no education. " The Complete Works of Swami Vivekananda; Vol. V; p. 285.*
३०. *Dr. S. Radhakrishnan : The Philosophy of Rabindranath Tagore; p. 21.*
३१. स्वामी दयानंद : सत्यार्थ प्रकाश, पृ ४७.
३२. *Quoted in Lala Lajpat Rai : Arya Samaj; p. 209.*
३३. *Dr. Annie Besant : The Besant Spirits; Vol. II; p. 48-50.*
३४. *Watters, on Yuan Chwang's Travels; Watters, I. p. 160 - 161.*
३५. *Swami Vivekananda : The complete works of S. Vivekananda Vol. VII; p. 222.*
३६. *Mahatma Gandhi : Young India; Sept. 8, 1927.*
३७. *Satyavrata : Fundamental Principles of the Gurukul System; p. 6.*
३८. *R. agore :* 'विद्या और विद्यालय का आदर्श;' शान्तिनिकेतन येथील आपल्या सहकाऱ्याला पाठविले पत्राचा 'शिक्षा' जुलै १९५२ च्या अंकात प्रसिद्ध झालेला अनुवाद.

३९. *Shri Aurobindo : The Brain of India; p. 17-18.*
४०. *Annie Besant : Anniversary, address 1911, to the Central Hindu College,*
४१. *Annie Besant : India; p. 3.*
४२. *Annie Besant : The Besant Spririt; Vol. 7 (Essentials of an Indian Education); p. 45.*
४३. *Alexis Carrel : Man the Unknown; p. 118*
४४. *Ibid; p. 15.*
४५. *Philip H Phenix (ed.) : Philosophies of Education; p. 60.*
४६. प्रा. पॉल लिओनार्ड यांचे *'Education and Democracy'* विषयावर २९ डिसें. १९६५ रोजी दिल्ली येथील व्याख्यान.
४७. *" The purpose of this knowledge is not to satisfy our curiosity but to rebuild ourselves and our surro undings". Dr. A. Carrel : Man the Unknown, p. 51.*
४८. *R. Tagore : Personality, I st edition, 1917, Chap 'My School'.*
४९. *J. B. Shaw : Dictionary of Thoughts. p. 406.*
५०. *" It hardly needs to be mentioned that leading educational thinkers of modern times like Vivekananda, Shri Aurbindo and Mahatma Gandhi have all categorically demanded the religious and spiritual orientation of education"*
H. B. Mukherjee : Education For Fulness. p. 438.

परिशिष्ट क्र. : १

THE SYLLABUS FOR THE SECONDARY SCHOOLS

The syllabus can be conveniently divided into two main parts These can be further divided as shown below :-



(A) General :- This should include Religious Philosophy as-moral philosophy.

(B) Particular :- This include concrete stories with a definite moral principle in each, as well as real stories from lives of great personages of all times and climes.

(A) GENERAL :

(I) Topical :-

(1) The Almighty God and His Infinite Universe. (Riddle.)
(2) Man Vs. God
(3) Divine Prayers and Worship.
(4) Father as an emblem of God.
(5) Mother as an emblem of God.
(6) Preceptor as an emblem of God.
(7) Individual Duties-to Family-Relations-and Friends.
(8) Man Vs. Society.
(9) Personality and Character.
(10) Life-Past, Present and Future.
(11) Man and His Pilgrimage to the Holy.
(12) Religion and Morals.

(13) Man Vs. Nation
(14) Citizen of the World
(15) Natural Laws

(II) Ethical ;-

This includes Qualities, Habits, Social Laws, Positive Virtues' Negative Virtues (Sins and Vices) etc. (Such as Truth, Goodness' Sincerity, Honesty, Unity, Benevolence, Justice Discretion, Order' Prudence, Fidelity-Or Trust, Dishonesty, Lying, Ungreatfulness' Conceit, Envy, Idleness, Violence, or Anger etc.)

(B) PARTICULAR :

(I) Moral Storics :-

Stories from Ramayan and Mahabharat, The Bible, The Quran, Selected allgorical or mythological stories.

(II) LIVES :-

(1) Gautam Buddha
(2) Ashoka
(3) Jesus Christ
(4) Mohamed
(5) Swami Vivekananda
(6) Swami Dayananda
(7) Guru Nanak
(8) Saint Kabir
(9) Iqbal.
(10) Ramkrishna Paramahanss
(11) Dnyaneshwar
(12) Saint Tukaram
(13) Ramdas.
(14) Abraham Lincoln
(15) Dadabhai Naoroji
(16) Mahatma Gandhi

Before concluding, it is necessary to make few things clear

(i) The syllabus suggested is to be taken in a broad sense. It should be treated as elastic and not rigid..... (pupils) may project their personalities to the Great Gurus–(Lords) and thus come to understand or predict others' behaviour and control, check and improve their own.

(ii) The words " God' ' and " Religion " require some clerification to avoid misunderstanding. "God" does not mean any concrete person such as "Shiva", "Christ", or "Krishna". "God" means the Creator of the Universe–The Over Lord of all, The Almighty, The Omnipotent and The Omniscient who is only visible to the inner eye, and audible o the inner conscience.

From Limaye D. J. : The Dynamics of Education

***

परिशिष्ट क्र. : २

नागपूर विश्वविद्यालयाच्या विद्वत् सभेने ३ फेब्रुवारी १९६४ रोजी पारित केलेल्या ठरावानुसार काही महाविद्यालयांनी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अंमलबजावणी साठी समिती नेमली. त्या समित्यांनी जे अभ्यासक्रम तयार केले त्यातील काही अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे :-

(1) Amolakchand Mahavidyalaya, Yeotmal.

General Suggestions :-

It should be a three–years course beginning with the First Year Class of Three–Year Degree Course.

There should be two periods per week for moral education for one class.

College work should begin with Prayer.

The Colleges should conduct Annual Examination and certificates should be awarded to successful candidates. Prizes in the form of books to be given to brilliant candidates.

First Year of Three–Year Degree Course.

Individual Moraiity.

Cultivation of virtues and rejection of vices

Virtues from तैतिरीयोपनिषद् especially such commandments as

मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव, etc.

Virtues from the Bhagvadgita from XII, XIII and XVI Chapters.

Bible— Ten commandments

— Virtues in Quran

Cardinal virtues.

Second Year of Three–Year Degree Course.

Social Morality

Social and Political obligations;

Rights and Duties. Respect for life, liberty, prosperity,

Social order and Social Progress

My station and its duties.

Virtues relative to Society and Nation.

Concept of one World; World Citizenship.

Universal Brotherhood Dignity of the Individual.

Values of life.

Third Year of the Three Year Degree Course.

Essential Unity of all Religions.

Fundamental of major Religions of the World. One Humanity. One World and One God.

(2) Moral Science Courses In The St.Francis de Sales' College

1 PRE-UNIVERSITY :

Moral Science : How it differs from the other sciences. It is a practical science–its end is the improvement of the individual human being

Conscience– the first rule of conduct. Erroneous conscience–the obligation to put it right presupposes knowledge. Enlightened conscience. Lax consicence.

Common sense virtues : sincerity (truth). honesty (justice friendship (charity) duty (religion, piety). patriotism [true and false]

2. FIRST YEAR :

Natural Theology. Proofs for the Existence of God. Attributes of God

Introduction to the concept of Morality : the final end of man : what it is not and what it is.

Problem of evil. Meaning of Suffering.

3. SECOND YEAR :

Religion. The nature of Religion.

Man's obligation to God.

The Origins of Religion. Revelation.

4. THIRD YEAR :

The virtues in detail. Their basis, their unity in Prudence, their value, their end.

The Social system. Different forms of economic organisation.

Capitalism : its virtues and its defects.

Communism. Totalitarianism. Democracy : presuppositions of a healthy democracy; Education, Honesty, justice.

World Peace. Individual problems : War, Nuclear warfare. poverty, population, etc.

(3) Mahatma Fule Mahavidyalaya, Warur

PRE-UNIVERSITY ARTS.

1. Significance of the higher values in life of man.
2. Differentiation between [1] Right and Wrong [2] Good and Evil [3] Moral and immoral. [4] Just and unjust.
3. Culture– Elements of culture, the Role of culture in Societ in politics, and in religion.
4. Religion– The aim and object of Religion, Religion & Superstitious beliefs. Religion & Caste, Castism is an evil.
5. Citizen– The characterstics of citizen, citizen and his responsibility with special reference to Indian citizen & his responsibility for establishing welfare state.
6. Morality, Justice, Liberty, Fraternity and Equality for al. human beings.
7. Social problems and their solution
   1. Dowry
   2. Poverty
   3. Un, employment & beggary
   4. Education
   5. Health is Wealth
   6 Crime and punishment

N. B. :- Suitable illustrations on the above topics should be given from the lives of great men and women and histories of different nations.

B. A. PART I

1. Appreciation of the following qualities or virtues of Man Purity of mind, Wise apportionment of knowledge and concentration, charity, generosity, self–control, Endurance, Sacrifice for noble cause, Intensive study of scriptures, Austerity. straight forwardness, Uprightness, Non-violence, Harmlessness. Renunciation of tke first of action. Tranquility. Aversion to fault-finding acquiring generous frame of mind. gentleness. modesty. being ashamed of evil actions steadiness, courage, purity and cleanliness, freedom from excessive pride or not being over dignified

With special reference to
Mahatma Gandhi's contribution.

2. Bad Tendencies–

1. Obstensatation
2. Hypocrasy
3. Arrogance
4. Excessive pride
5. Over dignity
6. Anger
7. Cruelty

Why these evils should be avoided.

3. Man is a social animal–

Man and Society, Man and State, Man, Nation–World.
The significance of family.
Religious Economic and Political institutions and their contribution in the Development of man's character personality. Its basis, Culture and personality.

4. Leadership–

Essential qualities of a leader, with special reference to the following leaders.

1. Ramchandra
2. Harischandra
3. Dnyaneshwar
4. Gautam Budha
5. Mahatma Gandhi
6. Lokmanya Tilak
7. Vivekanand
8. Shivaji
9. Nanak
10. Vinoba Bhave
11. Kabir
12. Tolstoy
13. Pt. Jawaharlal Nehru.

5. Ideal State–

Its implications, Man as a subject of ideal state, his duties and rights.

B. A. PART II

1. Changing pattern of society with a special reference to the evolutionary theory of state.

Man and State
Rights and Duties of man
Citizenship and responsibility

2. Responsibility of citizen in Democracy and Dictatorship
3. State and Interstate relation

Law and obedience

4. Reliability in monetary Transactions, Bribe, Flattery Corruption, favouritism, Nepotism, Monopoly its bad Effects.
5. Why parents, Members of family, teachers community, nation and human being in general be obeyed.

6. Harmony-How to achieve.
7. Neighbour and Neighbour-hood
   Shramdan in Political, Social, Economical and other spheres of life.
8. Discipline and character. Good manners in social functions.
6. Equal opportunities. in the fields of education, business and commerce, politics and other spheres.

Men and women in all walks of life should have the equa status in the society.

Monopolization in any form by an individual or by a certain community must cease.

***

परिशिष्ट क्र. : 3

द्वितीय महायुद्धाच्या सुमारास अमेरिकेतील अनेक शिक्षणसंस्थात धर्म वा अध्यात्म शिक्षणांवर विशेष भर देण्यात आला. यापैकी काही संस्थांनी उद्घोषित केलेले शिक्षणाचे ध्येय त्यांच्याच शब्दात वाचा.

" to encourage the growth.....of vigorous bodies scholarly minds, strong character, and a real-religious experience ".

Haverford College Bulletin, XXXIX
(November, 1940) 7-8.

The College (Illinois College) is convinced that appreciation of spiritual values and growth in moral qualities are fundamental purposes of a College of liberal arts.

"Illinois College Bulletin, XXVIII 3
i SeresI)March, 1940), 81.

"The College (Westminister College, Pennsylvania) recognizes its distinctively Christian tradition and character; its aim is to consciously inculcate the basic truths of the Christian religion ".

Westminister College Bulletin (Pennsylvania)
Catalogue Issue, January - March, 1940.

".....Furthermore, in as much as religious faith is the essential basis of right conduct and as that faith is best cultivated through the aid of Divine Revelation, the Un. of the South regards as indispensable to the realization of its ideals of cultured and useful manhood, systematic courses of instruction in the Bible.....".

Bulletin of the Un. of the South,
XXXIV, 4 (February 1940), 20-21.

❖ ❖ ❖

परिशिष्ट क्र. : ४

खामगांव येथील गो. से. कला व वाणिज्य महाविद्यालयात आखलेल्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमावर आधारलेल्या काही प्रश्नपत्रिका थोडा फेरबदल करून येथे नमुन्यादाखल उद्धृत केल्या आहेत, लेखी प्रश्नांचे स्वरूप काय असावे याची थोडी कल्पना त्यावरून येईल.

वेळ ३ तास) **पूर्व विद्यापीठ वर्ग** (पूर्ण गुण–१००

विशेष सूचना :– सर्व प्रश्नास सारखे गुण व सर्व प्रश्न आवश्यक.

प्रश्न १. नैतिक शिक्षण म्हणजे काय ? हे सांगून त्याचा समाजास कसा फायदा होतो याचे विवेचन करा.

प्रश्न २. दैवी संपत्तीचा षोडक्यात अर्थ सांगून कोठल्याही दोन गुणांचे विवेचन करा.

प्रश्न ३. व्यक्ति व समाज यांचे संबंध स्पष्ट करून व्यक्ती समाजाच्या उत्कर्षा-पकर्षास कशा कारणीभूत होतात, हे सोदाहरण स्पष्ट करा.

प्रश्न ४. "सर्व धर्मांचे मार्ग भिन्न असले तरी सर्व धर्मांचे अंतिम ध्येय एकच आहे." उदाहरणासहित स्पष्ट करा.

वेळ ३ तास) **पूर्व विद्यापीठ वर्ग** (पूर्ण गुण–१००

सूचना :– सर्व प्रश्नास समान गुण.

प्रश्न १. रस्किनने आजच्या अर्थशास्त्राला अनर्थ शास्त्र का म्हटले आहे ? सोदाहरण समजाऊन सांगा.

प्रश्न २. साधनशुचिता म्हणजे काय ? तिचे मानवी जीवनात काय महत्व आहे ?

प्रश्न ३. रस्किनच्या मते राष्ट्राचे धन कोणते ? ते कसे वाढवता येईल ?

प्रश्न ४. समाज जीवनात नैतिकता निर्माण करण्याचा यत्न करणाऱ्या कोणत्याही एका महापुरुषाच्या चरित्राचा व कर्तृत्वाचा परिचय करून द्या.

वेळ ३ तास) **पूर्व विद्यापीठ वर्ग** (पूर्ण गुण–१००

सूचना :– कोणतेही पाच प्रश्न सोडवा. सर्व प्रश्नास सारखे गुण आहेत.

प्रश्न १. उच्च नैतिक मूल्यांचे जीवनातील महत्व सांगा.

प्रश्न २. मूल्यांचे वर्गीकरण कसे करता येईल ?

प्रश्न ३. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनांत नैतिक तत्वांचा उपयोग कसा केला जातो ?

प्रश्न ४. जागतिक विश्व बंधुत्व किंवा जागतिक नागरिकत्व यांचे आधुनिक जगातील महत्व पटवून दाखवा.

प्रश्न ५. मानवाचे ध्येय काय असावे ? सुख प्राप्ती हे ध्येय होऊ शकते काय ? भौतिक सुख व आत्मिक सुख यातील भेद स्पष्ट करा.

प्रश्न ६. "सद्गुणांच्या ऱ्हासामुळे सर्व समाज रसातळास जाईल." चर्चा करा.

प्रश्न ७. उच्च सद्गुण वास करीत असलेल्या कोणत्याही एका महापुरुषांचे जीवन रेखाटा.

वेळ ३ तास) **प्रथम वर्ष** (ए. गुण–१००

प्रश्न १. "आत्म्याशिवाय शरीर त्याप्रमाणे नीती शिवाय जीवन होय."साधार चर्चा करा. (गुण – २०)

प्रश्न २. 'आदर्श जीवनासाठी आम्हाला रामायण महाभारतातूनच गेले पाहीजे' या विधानाची सत्यता पटवा. (गुण – २०)

प्रश्न ३. 'विद्यार्थी समाजाचा एक नैतिक आदर्श' या विषयावर सुमारे ५०० शब्दांचा निबंध लिहा. (गुण – ४०)

प्रश्न ४. टिपणे लिहा कोणत्याही दोन विषयावर

१) शुद्ध प्रेम. २) विवेकानंद ३) सुख. ४) मोक्ष.
५) सत्यं–शिव–सुंदरम्.

वेळ ३ तास) **प्रथम वर्ष** (पूर्ण गुण–१००

सूचना :– कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा.

प्रश्न १. 'शाळा कॉलेजातून नैतिक शिक्षणाची आवश्यकता' या विषयावर मुद्देसूद विचार लिहा.

प्रश्न २. "शालीनता ही अंत:करणे काबीज करण्याचे एक मोठे हत्यार आहे." निबंध लिहा.

प्रश्न ३. "व्यक्तित्व अंगी आल्यावर योजकता साधली पाहिजे." थोर व्यक्तींच्या जीवनातील काही दाखले देऊन स्पष्ट करा.

प्रश्न ४. "कर्तव्य जागृत अंत:करणेच पवित्र देव मंदिरा सारखी शुद्ध उदात्त प्रीतीची निवासस्थाने शोभतात." विषद करा.

प्रश्न ५. संयम म्हणजे शरणता नव्हे. संयम जीवनाच्या विकासासाठीं आवश्यक आहे. निबंध लिहा.

प्रश्न ६. तेज आणि क्षमा हा एकमेकांच्या व्याख्या आहेत. विनोबांच्या ह्या उक्तीचे समर्थन करा.

वेळ ३ तास) **तृतीय वर्ष** (पूर्ण गुण—१००

सूचना :- कोणतेही पाच प्रश्न सोडवावेत. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्रश्न १. व्यक्ति आणि समाज यांचे परस्पर संबंध कसे असावेत, याचे विवेचन करा.

प्रश्न २. खालील विधानांची साधक बाधक चर्चा करा. एका व्यक्तिची आपत्ति ही दुसऱ्या व्यक्तिसाठी सुवर्ण संधी असते.

प्रश्न ३. व्यसने, आरोग्य, नीतिमत्ता यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

प्रश्न ४. भारतीय संस्कृतीमध्ये विवाहाचे मांगल्य आणि त्याग प्रियता यांचे वैशिष्ट सोदाहरण निर्देशित करा.

प्रश्न ५. "नैतिक सामर्थ्याने संपन्न व्यक्तीच विश्वाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी सफल प्रयत्न करू शकतात." ह्या विधानाचे विवेचन करा.

प्रश्न ६. नीतिमत्ता आणि दैनिक आचार पद्धती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करा. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांच्या आदर्श दैनंदिनीची तीन पाने लिहून दाखवा.

प्रश्न ७. परिमार्जित शुद्ध मनापासून भिन्न भिन्न अवस्था मधून प्रगत होत असतांना सुख आणि आनद यांची परिणती व्यक्तिच्या जीवनात कशी होऊ लागते याचे शद्ध चित्रण करा

प्रश्न ८. व्यक्तिगत कर्तव्य आणि अधिकार यांचे सामंजस्य, सुसंवादित्व आणि संतुलन कसे साधावे, हे उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

प्रश्न ९. जीवनाची महानता, सखोलता, गंभीरता, चैतन्यशक्ती आणि सौंदर्य-संपन्नता यांची अनुभूती नीतिमान माणूस का व कशी घेऊ शकतो. याचे सविस्तर विवेचन करा.

***

निवडक संदर्भ ग्रंथांची सूची

(विशेष महत्वाच्या ग्रंथाचाच येथे निर्देष आहे)

मराठी–हिंदी

१. भावे, पू. विनोबा : शिक्षण विचार; परंधाम प्रकाशन; पवनार.

२. गोळे, म. शि. : हिन्दु धर्म व सुधारणा; दुसरी आवृत्ती १९२७

३. जोशी, वा. म. : " विचार सौंदर्य " व्हीनस प्रकाशन; १९६१

४. भावे, पू. विनोवा : आचार्य कुल; महाराष्ट्र सर्वोदय मंडळ वर्धा.

५. वैद्य, रामगोपाल शास्त्री : वेद मे आर्य–दास–युद्ध संबंधी पाश्चात्य मत का खंडन; प्रकाशक, रामलाल कपूर ट्रस्ट, बहालगढ १९७०.

६. कर्वे, डॉ. चि. श्री.: मानवाचे भवितव्य; *Locomte du Nouy*:*Human Destiny* चा अनुवाद; पर्ल पब्लिकेशन प्रायव्हेट लि. मुंबई; १९५८

७. श्री. गुलाबराव महाराज : अलौकिक व्याख्यानमाला; मधुर प्रकाशन १९६१ प्रथम आवृत्ती.

८. त्रिपुरवार, राजेश्वर शास्त्री : श्री गुलाबराव महाराजांचे चरित्र, (उत्तरार्ध); मधुर प्रकाशन १९६४ द्वितीय आवृत्ती.

९. ज्ञानेश्वरी.

१०. जोशी श्री. वामन मल्हार : नीतिशास्त्र प्रवेश १९३२ तिसरी आवृत्ती.

११. पंडित श्री. बाबाजी महाराज : श्री. ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका;

१२. टिळक रे. ना. वा: ख्रिस्तानुवर्तन *Thomas A. Kempis : The Imitation of Christ* या ग्रंथाचा अनुवाद; ख्रिस्ती ज्ञान प्रसारक मंडळ; मुंबई १९३०.

१३. कुराण.

१४. नेऊरगांवकर स. के. : ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांचे चरित्र प्रा. दांडेकर धार्मिक वाड्.मय प्रकाशन मंडळ; जुलै १९६९.

१५. श्री. गुलाबराव महाराज : साधुबोध; मधुर प्रकाशन; नागपूर १९६७, चतुर्थ आवृत्ती.

१६. स्वामी दयानंद : सत्यार्थ प्रकाश, सत्यार्थ प्रकाश सोसायटी अजमेर; चतुर्थावृत्ती संवत २००७

१७ प्रा. पाटील सौ. लीला व प्रा. शहाणे श्री. ह : प्रचलित शैक्षणिक समस्या; शिक्षणातील वाद, शोध व बोध; प्रकाशक : ठाकूर आणि कं. लि. अमरावती १९६३.

१८ माणकीकर श्री. प्र. : शिक्षणशास्त्राची मूलतत्वे; ठोकळ प्रकाशन; लक्ष्मी रस्ता पुणे–२; आवृत्ती दुसरी १९६६.

१९ श्रीरामकृष्ण : वाक्सुधा; श्रीरामकृष्ण आश्रम; नागपूर.
२० गोळवलकर मा. स. : विचार नवनीत; भारतीय संस्कृति पुनरुत्थान समिती प्रकाशन; उत्तर प्रदेश; तृतीय संस्करण.

संस्कृत

मनुस्मृति
संस्कारप्रकाश
संस्कारकांड;
हिरण्यकेशी गृह्य सूत्र
गौतम–धर्म–सूत्र
जैमिनी गृह्य सूत्र
तैतरिय संहिता
मैत्रयनिय संहिता
अथर्ववेद
महाभारत
दक्षस्मृति
कठोपनिषद
वीरमीत्रोदय,
याज्ञवल्क्य स्मृती
संस्काररत्नमाला
भारद्वाज गृह्य सूत्र
मानव गृह्य सूत्र
वराह गृह्य सूत्र
सत्पथ ब्राम्हण
कथक संहिता
श्री पातञ्जल योगदर्शन;
श्रीमद्भगवत्गीता

ENGLISH

1 Dr. Altekar. A. S.: Education in Ancient India; Pub. The Indian Book Shop; Benares City; 1934.
2 Megasthenes, Fragment.
3 Elliot; History of India; as told by its historians' London, 1870
4 Yule: Marco Polo; Vol. II Third Edition.
5 Alberuni's India, edited by Sachan I.
6 Bernier : Travels in the Mogul Empire.
7 Swami Vivekananda : On India and her problems; Compiled by Swami Nirvedananda; Almora; Advaita Asram, 1946. The Besant Spirit Vol 2 Ideas in Education. Theosophical Publishing House ; Adyar (Madras) 1939.
9 Sitarammava ; " History of the Indian National Congress: Vol. I and II. Bombay; Padma Publications; 1946 and 1947.
10 Sen N. B. : Glorious Thoughts on Education, New Book Society of India , New Delhi
11 Dr. Arundale : Religious Education in Senior school, New York, 1944

12. Mrs. Max-Muller : The Life & Letcrs of Friedrich; Vol. I and II. Longmans, Gren and Co. 1902'.
13. Healy Edwin F. : Moral Guidence, Loyla University Press, Chicago, 1942.
14. Durkheim Emile : Moral Education, Translated by Everett K. Wilson and Herman Schnuerr, Edited by, Everett K wilson. The Free Press of Glencoe Inc. New York.
15. Sully James: Studies of childhood, London, Longmons, Green and Co, 1896.
16. Wren Percival: The Indian Teachers Guide, Longmans Green and Co.
17 Hemingway Earnest: Death in the aternoon, Pub- Butler and Tanner Ltd. Sixth edition, 1954.
18. Ramchandra Magdal : Buddhiyoga, Gitashairam, Bangalore City, 1948.
19. Wishart C. F.: Religious, in Svmposium "On going to College ," New York, Oxford University Press, 1938.
20. Hoffman, John W.: The Religious Ideal in education in T. C. Mendenhall, ed. History of the Ohio State University, Vol. III, Addresses and proceedings of the Semicentennial Calebration, Oct. 13 to 16, 1920; Columbus, Ohio state; University Press, 1922.
21. Cuninggin Merriman : The College seeks Religion, New Haven, Yale University Press, U. S. A. 1948.
22, Wriston H. M: The Nature of a Liberal College Appleton, wis, Lowrence College Press, 1937
23. Hussain Sir Ahmad : Nots on Islam : edited by khan Bahadur Haji khaja Mohammad Hussain, Govt. Central Press, Hydrabad.
24, Shivananda : Unity of Religions, The Divine Life Society, Shivanandanagar U. P. 1962,
25. Gandhi M. K : All Religions are true, Bharatiya Vidya Bhavan, Bombay-7, 1962.
26. Dixit S. S.: Nationalism and Indian Education, Sterling Publishers P. Ltd, 1966, Delhi.
27. Livingstone Sir Richard : Some Task for Education, Oxford University Press, London 1946.

28. George A Coe. Educating for Citizenship, Charles Scribners Sons, New York, 1932.
29 Dewey John : Demoracy and Education, New York Free press, 1944.
30. Lawrence Cremin : The Geneius of American Education, New York, 1966, Vintage Books.
31. Limaye D. J. : The Dynamics of education, Dadar Bombay, Usha Prakashan.
32. Encyclopedia of Educational Research, A Project of the American Educational Research Association, Edited by
33. Chester W. Harris. Third edition, Macmillan Company, New York, 1960.
34. Thomas F. W. : History and prospects of British Education in India, Deighton Bell, London 1891.
35. Wren Percival : Indian school Organisation; Longmans Green and Co. London, 1912
36. Esther Mc D. Lloyed Jones : Student Personal work at Northwestern University, New York, Harper and Brothers 1929.
37. Philip H. Phenix : Philosophies of education : John wiley and Sons Inc, New York, 1961.
38. Naik and Narullah : A History of Education in Iudia, Macmillan and Co. Ltd, Bombay, 1951.
39. Huxley Aldous : Ends and Means, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1962.
40. Purani A. : "Evening Talks with Shri Aurbindo", Pub. Shri Aurbind Ashram, 1961.
41. "Shri Aurbind and the Mother on Education" Shri Aurbind International Centre of Education, 1960.
42. Dewey John : "The child and the Curriculum", The University of Chicago, I, II, U. S. A. 1902. 26 th impression, 1959
43. Havighurst Robert : Social Deviancy among youth, Types and Significanee, ed' William W. watenberg The National Society, Chicago, 1966.
44. Gaudino Robert L, : "The Indian University", Popular Prakashan, Bombay, 1965.
45. Bantock G. H. : "Education in an Industrial Society", Faber and Faber, London, 1958.

43. Krishnamurti J. : "Education and the Significance of Life", Victor Gollancz Ltd, London, 1962.
44. Niblett W. R. : Education and the Modern Mind, Faber and Faber 24 Russel square, London 54.
45. Ghosh Aurobindo: A System of National Education; Arya Publishing House, Calcutta, Second Ed, 1944.
46. Livingstone Sir Richard: Some task For Education. Oxford University Press, London, 1946.
47. Flexner Abraham: Universities, American, English, German, New York, Oxford Un. Press, 1930.
48. Gandhi, M. K.: Violence in Peace and War, Vol. 1. Navajivan House, Ahamadabad, 1948.
49. Wriston H. M.: The Nature of a Liberal College, Appleton, Wis, Lowrence College Press, 1937.
50. Burton E. D. : "Education in a Democratic world", Chicago, University of Chicago Press, 1927.
51. Wilkins E. H. : The College & Society, The Century Co, New York, 1932.
52. Besant Dr. Annie : "India", Theosophical Publishing Society, 161, New Bond Street, W. London, 1913.
53. Tagore R. : "Nationalism" (Lectures delivered in Japan & U. S. A.), The Macmillan Company, New York.
54. Tagore R. : Creative Unity", Macmillan, 1950.
55. Fadiman Clifton : in "The case for Basic education" ed. James &. Koerner, Little, Brown and Company, Boston, 1959.
56. Dr. Radhakrishnan S : "The Philossphy of Rabindranath Tagore." Good Companions publishers, Baroda, 1961.
57. Aurobindo: The Brain of India, The Aurobindo Ashram, Pondicherry.
58. Partridge George E : Genetic Philosophy of Education, The Macmillan Ccmpany, New York, 1912.
59. Simpson George Gaylord : The Meaning of evolution; Oxford and J. . H. Publishing Co., 36 Chowringhee Road, Calcutta, 16. First Indian edition, 1965.
60. Ulich Robert : The Education of Nation; Harvard University Press, Cambridge, Massachusetts, 1961.

61. Hutchins Robert M : The Higher Learning in America, New Haven, Yale University Press, 1936.
62. Tagore R. : "Personality," Macmillan, London, 1917, 1 st Edition.
63. Mukherjee H. B. : Education for Fulness, Asia Publishing House, Bombay, 1962.
64. Gasset Jose Ortega : Mission of the University, Transl ated by Howard Lee Nostrand, Pub., Kegan Paul, Trench Trulener & Co. London, 1946

विषय सूची

प्रारंभी दिलेल्या विस्तृत अनुक्रमणिकेवरून ग्रंथात समाविष्ट झालेल्या अनेक विषयांची वाचकांना कल्पना येईलच. पण केवळ प्रमुख विषयांचीच नोंद अनुक्रमणिकेत होणे स्वाभाविक आहे. म्हणून अभ्यासू संशोधक व चोखंदळ वाचक यांच्या सोयीसाठी, अनुक्रमणिकेत आलेले विषय वगळून, ग्रंथातील इतर बहुतेक विषयांची सूची वर्णानुक्रमे देत आहोत. सामान्य वाचकांना देखिल ती संदर्भ पहाण्यास उपयुक्त ठरेल ही अपेक्षा !

विषय	पृष्ट क्र.
अ	
अंत:करणाचे चार थर	२७३–२७५
अध्यात्मावर अधिष्ठित राजकारण	२९
अध्यात्म विकासाला उत्तम देहधारणा	४५८–४५९
अध्यात्म वर्गासाठी काही सूचना	३११–३१२
अध्यात्म म्हणजे काय ?	१०२
अध्यात्मामुळे अध:पतनाला आवर	३२५
अध्यात्मरुपी परिसाने शिक्षणाचे सोने	४१८
अध्यापकापेक्षा पालकावर जबाबदारी अधिक	२०४
अनारोग्याचे कारण अनीती	१५५
अनुभूतीशिवाय अध्यात्म शिक्षण निरर्थक	३५७–३५८
अनुदानाचे प्रकार	२१६
अनुभवाने अभ्यासक्रमाचा साचा	३०४
अनैतिकतेचा आदर ?	२०७–२०८
अभ्यासक्रमाचा समावेश तीन प्रकारे	४२२–४२३
अभ्यासक्रमाचे स्थूल स्वरूप	२९२–२९८
अणुव्रत आंदोलन	३७९
अवलोकनात्मक परीक्षा	३१४–३१५
अहंमन्यतेने आत्मनाश	१४५

आ

आकाशवाणीबाबत सूचना ४४८
आचारवान तो आचार्य १८४
आत्मसुख व वैयक्तिक सुख ९८–१००
आत्मसुखाची ओळख सत्कार्याला सहाय्यक ३५६
आत्मसुखासाठी धर्म १००
आदर्श अध्यापकाकडून अपेक्षा १८३
आदर्श शिक्षकाचा अभाव ४२६–४२७
आध्यात्मिक महामंत्र देण्याचे कार्य ४६१
ऑक्सफोर्ड विद्यापीठ ११

इ

इंग्रजी शिक्षणाने शिक्षक दोषपूर्ण १८५–१८६
इस्त्रायलचे तेजस्वी उदाहरण २०

ए

एकाग्र मनाचे अनन्यसाधारण स्थान २७५
एकात्म निर्मितीचे प्रकार १३४–१३५

क

कर्तव्य व हक्क १४२–१४५
कर्मेन्द्रिय प्रशिक्षित करणे २७६–२७७
कठीण पण गुणकारी उपाय ४५९–४६०
कारल्याचे बी नि द्राक्ष्याची अपेक्षा २७१–२७२
कुसंस्काराचा कारखाना ४४२
कौटुंबिक जीवनातील शिक्षण ६३–६८

ख

खर्च कुणी किती सोसायचा ? २१५

ग

गर्भधारणेपासून संस्कारधारणा १९५
गुरू तटस्थ तर शिष्य क्रियाशील ३५३
गृहीत तत्वे ३७
ग्रंथालयाचे स्थान २९८

च

चलचित्रपट १९३–१९४–४४०
चलचित्रपट–जीवनाचे अविभाज्य अंग ४३९
चारित्र्याच्या प्रमाणपत्राला आधार ४३६–४३८
चारित्र्य, नीती, धर्म–अभंग साखळीतील दुवे १२१
चित्रपटावर नियंत्रण ४४३–४४५

ज

जीवनध्येयापासून शिक्षणाची फारकत २५८–२५९
जीवनपुष्प फुलविण्यास काटेरी कुंपण ४२५

त

तर्कनिष्ठ बुद्धिवादाची जोड ३४८

द

दुर्मिळ पण मौलिक ग्रंथ प्रकाशन ४५०

ध

धर्म भारताचा प्राणच १२१
धर्म – मोक्ष याऐवजी अर्थ – काम हे ध्येय ४१५
धर्म व नीती यांचे ऐक्य १०१
धर्मसिद्धान्ताचा आर्थिक व्यवहारावर ठसा ११४
धर्म सहिष्णुतेचा भारतीय इतिहास १७९
धर्माने प्रयत्नाला प्रेरणा ११७
ध्येयदृष्टीतील दोषांचा दुष्परिणाम ४१६

न

नागपूर विद्यापीठातील प्रयोग ३७५–३७८
नालंद विद्यापीठ ३ ; ९
नीती व अध्यात्माचे अधिष्ठान धर्म १००–१०५
नीती देहासारखी तर धर्म आत्म्यासारखा १२३–१२४
नीती, अध्यात्म व धर्म यातील एकात्मता १०२
नीतिनियम – व्यक्तिभोवतीचे कुंपणच १२२–१२३

नीतिनिष्ठ व धर्मनिष्ठ यामधील भेद १०३–१०५
निर्दोष ज्ञानप्राप्तीसाठी चित्तशुद्धी २७८
निधार्मिक घटनेच्या अडचणींचे निराकरण १७६–१७८
निधार्मिकतेचा विपरित अर्थ ४१७
निधार्मिकतेचे भिन्न अर्थ २२४–२२५
नैतिक आचरणाचे प्रयोजन ९१
नैतिकता व रुढी ५८
नैतिकता म्हणजे काय ? ४९-६२
नैतिकतेचे प्रकार ५०, ५२
नैतिकदृष्टया शिक्षणसंस्थांचे प्रकार ७०
नैतिकता व कायदा ६१–६२
नैतिक शिक्षणाच्या दोन पद्धती ७६–७८
नैतिक शिक्षण पाठ्यपुस्तक समिती २०२

प

पगाराने प्रतिष्ठा अशक्य ४३५
परीक्षा का असावी ? ३१२–३१३
परीक्षांना अवास्तव महत्त्व ३०७
पांडित्याचा लाभ घेण्यास गुरुकूल ४५४
पारमार्थिक प्रगतीचा परिणाम लौकिक व्यवहारावर १३१–१३३
पावित्र्य व गांभीर्य यांचा उगम ३५५–३५६
पूर्णत्वाच्या आविष्कारासाठी शिक्षण २६०–६६१
प्रत्येक धर्माचे शिक्षण देण्यात अडचणी २३६
प्रबंधाचे पंचशील ४६५
प्रभावी माध्यमाचा दुरुपयोग ४४१
प्रशिक्षणाचा अल्पावधी अभ्यासक्रम ४३०–४३१
प्रशिक्षण – चालू शिक्षण संस्थाद्वारे ४२९–४३०
प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ३१३
प्राचीन भारतीय शिक्षण ३

प्राचीन शिक्षण पध्दतीचा ऱ्हास ९–१९
प्राचीन शैक्षणिक तत्वज्ञान ६
परिक्षा गुणांचा तीन प्रकारे विचार ३१६

ब

बक्षिस तत्त्व ८०–८२
बालकात नैतिकतेचा विकास ६३–७८
बाह्य अराजक आत्मग्लानीचे द्योतक ४१४
बाह्य शांततेसाठी आंतरिक शांतता १५७
बौद्धिकापेक्षा भक्ति भावनेला प्राधान्य ३०९
बंगाल शिक्षण समिती अहवाल, १८८२ १०
ब्रह्मचर्याची उपेक्षा – अवनतीचे मूळ ४५७
ब्रह्माचा उपासक तो ब्रह्मचारी ४५८

भ

भगवंताची भक्ती हाच धर्म ९७–९८
भगवंताच्या अधिष्ठानाचा विसर ३३३–३३४
भारतीय वैशिष्ठ्य जोपासण्यासाठी २४५–२४६
भारतीयांची नीतिमत्ता ४
भारतीय संस्कार ५–८

म

मध्यवर्ती शिक्षण मंडळ, १९४४ २३०, २३१, २३५, २४६
माध्यमिक शिक्षण आयोग अहवाल १९५२-५३ १७१, २३२, ३०५
मानवी रत्नांच्या तेजस्वितेसाठी ४२४, ४२५
मानवाची दानवी प्रवृत्ती २६८–२७०
मानसशास्त्रीय चाचण्याद्वारे पात्रता ४३५–४३६
मांगल्याचे व पावित्र्याचे शोषण ४४६–४४७
मेकॉलेची कुटील योजना ११–१३
मेहकरातील प्रयोग ३७९–३९४
मूलभूत जीवनमुल्यावरच कुठाराघात ४१०–४१२

य

यशस्वितेसाठी सर्वत्र एकदम सुरुवात ३०२
योगशास्त्राचा शिक्षणात अंतर्भाव २८०
योजनेचा आधार – अध्यापक १६५
योजनेचे नगण्य प्रयोग ३७३–३७५
योजनेतील प्रमुख अडचणी १७३
योजना समाजशुद्धीस सहाय्यकारक ३४३
योजनेच्या वेगळेपणामुळे प्रशिक्षणाची गरज ३१९–३२०
योजनेच्या लाभाच्या तुलनेने खर्च नगण्य ४२३
योजनेसाठी स्वतंत्र विभाग १९०–१९२
योजनेसाठी होणारा खर्च उत्पादक २१४

र

राज्यातर्फे श्वेतपत्रिका ४१९
राधाकृष्णन् आयोग ४२८
रामकृष्ण मिशनमधील प्रयोग ३७८
राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग १७–१८

व

वर्धा बेसिक शिक्षण योजना १७
वातावरण निर्मितीची उपेक्षा ३३२–३३३
विकाराची विचारावर मात ४३८–४३९
विकारांचे विवेकात विकसन ३५१–३५२
विकास योजनेत शिक्षणाला गौणत्व २१–२४
विद्यार्थी संपर्क योजना ३८४–३८६
विद्यार्थी हितासाठी शिक्षेची गरज २११–२१२
विद्यानिकेतनाद्वारे आदर्श शिक्षक ४२७–४२८
विद्यापीठे नगरापासून दूर ४५६
विद्यापीठ शिक्षण आयोग १९६६ ७, ३२–३३, २३३, २३४, ४२०–२१
विद्यालय देवालयासारखे ३५५

विद्वानांचा लाभ घेण्यात अडचणी ४५३–४५४
विभिन्न धर्म विभिन्न भाषांसारखे ११९–१२०
विलासी वातावरणात अध्ययन अवघड ४५५
विशिष्ट पंथाच्या शिक्षणाची मुभा २४७–२४८
विज्ञानाबाबत गैरसमजुती १५२–१५५
व्यक्तीस्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्य यामध्ये घटनेद्वारा समन्वय २२६

श

शाळा-कॉलेजातील सद्य:स्थिती २६६–२६८
शाळांचा सामुदायिक उपक्रम ३९३–३९४
शांतिनिकेतन १७, ३१
शासकीय समितीतर्फे योजना २८९, २९०
शिक्षणाचे आध्यात्मिकरण २७, ३१
शिक्षा तत्त्व ७८–८०
शिक्षणाचा उद्देश–किमान मूल्यांचा आविष्कार २६५
शिक्षणाचे अंतिम साध्य–साक्षात्कार २६३–२६४
शिक्षण नको असणाऱ्यांची व्यवस्था २४८–२५१
शिक्षणाच्या नव्या तंत्राचा अवलंब ३४७–३४८
शिक्षक घडविण्यास शिबिरे १८६–१८८
शिक्षणाची परिणती आत्मानुभवाच्या प्रवृत्तीत ११८–११९
शिक्षण म्हणजे गुणवान नागरिकांची टाकसाळ ४०६
शिक्षणाच्या ध्येयाच्या जाणीवेचा लोप २६६
शिक्षणातील यांत्रिकता ३४६–३४७
शिक्षण–राष्ट्रपुरुषाची जणू नाडी ४०६, ४०७
शिक्षण व धर्म यांचे परस्परावलंबित्व ३६६
शिक्षण संस्थेचे आकर्षण ३३१
शिक्षण संस्थेतील नैतिक शिक्षण ६८, ७५
शिक्षण समस्येवर अनेकांची अनेक उत्तरे ४०७
शिक्षणाच्या सोयी–सवलतींचा दुरुपयोग ४०८

शिक्षण हृदय—चिकित्सेसारखे ३४४–३४५
शीलसंपन्न नागरिक हेच राष्ट्रीय धन १२०
शुद्धाचरणासाठी अध्यात्मसाधना ३२५
शुद्धाचरणास सर्व धर्मांचे प्रोत्साहन १०८–१०९
श्रीप्रकाश समिती २३२–२३४
श्रीरामकृष्ण आश्रमाचे सहाय्य १८८, १८९

स

सत्साहित्याचा प्रचंड पुरवठा ४५०
सद्गुण संवर्धन योजना ३८८–३९३
सदाचरण स्वान्तःसुखाय १०७–१०८
सर्वमान्य धर्मतत्त्वे २, ३९, २४२–२४३
सर्वत्र अपात्र तो अध्यापनास पात्र ४३३–४३४
संस्थेचा पालकाशी संपर्क २०५–२०७
संस्थेचा स्वतंत्र प्रयोग अव्यवहार्य १६७–१६८
सर्व धर्मांना समान वाबी १०६
सहिष्णुता—श्रद्धा वृद्धिगत करणे ३६५
स्वतंत्र अभ्यास मंडळ १८९
स्वातंत्र्यानंतरही शिक्षणाची आबाळ १९–२६
स्वधर्माच्या यथार्थ मुल्यमापनासाठी २४६
साने गुरुजी कथामाला २९६
साक्षात्कारी सत्पुरुषांचे मत ग्राह्य २५९–२६०
सुखाचे साधन धर्म ९२–९६
सुख प्राप्तीचे प्रकार ९८
सुखदुःखाची समान संवेदना म्हणजे एकात्मता १३६
सुधारणा सूचना पेटी ३००
सुशिक्षित पण असंस्कृत २७०–२७१
सेंट्रल हिंदू स्कूल, बनारस १७, ३१
स्वैराचार म्हणजे सुधारणा ४१३

ह

हिन्दू व मुसलमान यामध्ये धर्मदृष्टया अभेद १०९–११०
हिप्पी जीवनाचा झपाट्याने प्रसार ४१२
हंटर कमिशनच्या शिफारशी २२९–२३०

ज्ञ

ज्ञान प्राप्तीची प्रक्रिया २७९
ज्ञानप्राप्तीसाठी मनाची एकाग्रता ३६०–३६१
ज्ञान म्हणजे प्रामुख्याने आत्मज्ञान ४१४–४१५

* * *

व्यक्ति-नामसूची

अ

अमृतराय ३७९
अर्नोल्ड मॅथू २१०
अरविन्द योगी १२०,१४०,१४७
२२५. २६१, २६२, २६४ २७३
२८४, ३१९, ३५८, ४५९
अल् इड्रिसी २
अल् बेरूनी ९
अश्वपती, राजा ३
अळतेकर, ए. एस. १, ४२७
अरिस्टॉटल २६२

आ

आइन्स्टाईन १२२
आसबोर्न १५३
ऑर्टेगा, जोस २६९
इमर्सन २९९
इलियट ७

ए

एव्हरसल्ट हॅरी २४४

क

कबीर १११, १७८
कार्लाइल २१९
केम्पिस, थॉमस ए ४५०
कैलास ३७७
कुमार स्वामी १७
कृष्णमूर्ती, जे २६२
कॅरेल, ॲलेक्सिस; १५५,४२५,४६२

ख

ख्राईस्ट, येशू १५८, १७७
खिलजी अल्लाउद्दिन, १३३

ग

गटे २९५
गांधी, इंदिरा २१८
गांधी, महात्मा १७,१८,३०,३१,
१०७, १२०, १४०, १६६ ३२२
३३७, ३४५, ३५५, ४१५,४२४
गिरी, व्यं. व. २२८
ग्रीग, जॉन २२८
ग्रीन, थिओडोर एम. १२९, १९९
ग्रिफिथ; टी. एच. १३
गिलमोर, इ. ए. ३७१
गुप्त, मैथिलीशरण ३८१
गुलाबराव महाराज ८९, ११८
ग्रेहॅम, बिली १२०, १८३, २१२,
२६१, २८१
ग्रेशस कार्डिनल २२९
गोखले, गो. कृ. २९, १४७, १९५
गोविंदसिंह, गुरू २९९
गोळवलकर, मा. स. ३५४
गॉडिमो, रॉबर्ट २६६

च

चव्हाण, पृथ्वीराज १३३

चार्वाक ११३
चौधरी, मधुकर घ. ४२६
चाँग युआन ४५७
चिन्मयानन्द, स्वामी १५१, १९२

ज

जीन्स; जेम १२२
जोशी, वा. म. २९
जंग, सी. जी. १५६
जॅकोब, फिलीप २६९

ट

टागोर, रविंद्रनाथ १७, ३१, १४१ २६२, ३४६, ३६१, ४१५, ४५५
टिडमाऊथ, लॉर्ड १४९
टिळक, लोकमान्य १७, १४७
टेलर; ए. इ. २९९, २२७
टॉन्सर स्टीफन जे ३४६

ड

डेवे, जॉन १५०, २६४

त

तुकाराम महाराज ९३,१०९,११६. ११७,२७२, ३५४
तुलसी, आचार्य ३७९

थ

थॉमस, जीन १८४
थॉमस, एफ, डब्लू १६३

द

दयानंद स्वामी १७,३१,१९९,२६१ ४५६
देव, पी. पी. ३७७
देशपान्डे, गं. त्र्यं. ३७८
देशमुख; सौ. भाग्यरेखा ३९६

न

नाईक, जे. पी. २३
नामदेव महाराज ९५,१०९
नानक गुरू ११०
निरखी म. के. ३८१,३९६
नॉय, लॉक्मटे डी. ४०३

प

पटेल, परमानंदभाई ३७२
पटेल, वल्लभभाई ४१७
पतञ्जली ६७
पाणंदीकर, कु. सुलभा ३७४
पॉल, सेंट ३२३
पुराणिक, रा. य. ३९६
पुरंदरे, ब. मो. १९२
प्राऊल, रॉबर्ट जी. ४६८
प्लेटो ७,२६१
पोटिएट, डब्लू, एल. ४६८

फ

फ्लेक्झनर, अब्राहम ३४६
फ्रँकलिन, बेंजामिन ३८८
फॅड्डिमन, क्लिफ्टन ४२८

ब

बर्टन, इ. डी. ३६६

बनसेन २७०
बर्नियर १०
बाजपेयी, नंददुलारे १०५
बार्टोल २९६
बारझम, जेक्स २६
ब्लॅक, जस्टिस २२५
ब्रंटन पॉल १५५
बेकन, फ्रान्सिस ३५७
बेझंट, ॲनी १६,३१,१४०,१४६ २५३,२९१,३६५,४०३,४०६ ४२४,४५८,४६२
बुद्ध भगवान १७९
बोडन, कर्नल ११

भ

भगवती १५१

म

मनू ६, ८
महम्मद, धर्मगुरू १७७
महाजन, मेहेरचंद ४१८
मार्को पोलो ४
माथूर राधेशरणजी २५
मुदलीयार डॉ. १७१, १७२
मुनशी के. एम. २२८
मेकॉले १२, १३
मेगास्थेनिस २
मोनिअर, विल्यम ११
मॅक्सप्लँक १२२
मॅक्समुल्लर १२

र

रंगनाथानंद, स्वामी २२९
रमण महर्षी १२०
राकेशकुमार, मुनी ३७९
राधाकृष्णन, सर्वपल्ली २२८, २६३ २६९, २७१, ४१४, ४५५
रानडे, रा. द. १७८
रामतीर्थ, स्वामी १७९
रामदास, स्वामी २७०, २९२, ३७१
रिस्टन, एच एम. ३५८
रूथवेन, अलेक्झांडर ३५८
रूसो २६३
रेन, पर्सिव्हल ४७
रेमॉन्ट, टी ४९
रेने, होमर पी २४४
रॉचेफाकॉल्ड लॉ ४११

ल

लजपतराय, लाला १८, ४५६
लिओनर्ड, पॉल ४६४
लिगन, अर्नेस्ट एम १९९, ३५०, ३५१
लोज, सर ओलिव्हर १८६
लिटबर १०, ११
लिव्हिंगस्टोन, सरर्चार्ड २८६

व

वक्काणी, नि. आ. ३९६
वर्मा ३७४
विल्किन्स, इ. एन. ३५५

विनोबा १, १४०, १८३, २१८, २६९
विवेकानंद, स्वामी १६, ३१, ११३, १२०, १७९, २४४, २६१, २७१, २७६, ३४५, ३६३, ३६४, ४३७, ४५७
त्रिशार्ट, सी. एफ. ८९
वुलनर, ए. सी. १३
वॅन, गेराल्ड २६८
वॉशबर्न, कार्लटन ४१५

श

शिवानंद, स्वामी ११९
शेलट २२७
शंकराचार्य ११६
शॉ, जॉर्ज बर्नाड १२२, ४६४
श्रीमाळी २११
श्रीरामकृष्ण परमहंस ३८, १२०, १७६, १७७, ३५९, ३६३
श्रॉडिजर ३६२

स

सच्चिदानंद स्वामी २८२
साने गुरुजी २०३, २९६, ३३८, ३८१
सिर्लेस, एच.एल. ४१४
सुलिव्हन १२२
सुश्रुत १५६
सेन, केशवचंद्र ३२
स्पेन्सर, हर्बर्ट २६४
सैयद्दिन ३०७
सॉक्रेटिस २६१
स्कॉट, सर वॉल्टर २०९

ह

हक्सले अल्डस् ३०, २२१
हुसैन, सर अहम्मद १११
हयूएनसंग ३२१
हुसेन, झकीर २२८
हेमिंग्वे अर्नेस्ट ४९
हेल लिंकन ३५९
हॅवग्रस्ट, रॉबर्ट २६५

ज्ञ

ज्ञानेश्वर महाराज ९३, ९४, १०१, १०२, ११८, १५८, २६२

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५	१९	शेष	विशेष
५५	११	भतृहारि	भतृहरी
२५	२२	पृष्टांचे	शेकडो पृष्टांचे
३५	३	ती	तो
३१	१८	धळं	धर्म
३२	१४	दुसस्या	दुसऱ्या
८९	६	शुद्ध	शुद्धी
९५	१९	भारमुक्त	भारयुक्त
१३५	४	दृष्टिकोन	दृष्टिकोण
१३९	१३	शकेल	शकेल या
१४३	२०	प्रकिया	प्रक्रिया
१४५	१०	त्रिआत्मनाशाकडे	आत्मनाशाकडे
१५५	२४	*normous*	*enormous*
१५५	२५	*in*	*is*
१५७	शेवटी	अध्याय १	अध्याय २
१६६	२२	*but*	*but not.*
१६६	२३	*betrayed not.*	*betrayed.*
१९६	१९	पहिल	पहिला
२०८	११	हेतुने.	हेतुने,
२०८	१२	माणसें.	माणसे,
२१६	१८	*dividualism"*	*individualism.*
		Laisssez Faire	*Laissez Faire*
२१६	१	वद्यार्थ्यांच्या	विद्यार्थ्यांच्या
२१६	१८	आदेशावर	आदर्शावर

२१७	१	कायक्रमासाठी	कार्यक्रमासाठी
२४५	८	योणारा	येणारा
२४६	१७	धर्मातील	धर्मातीत
२५०	१	मुद्दलेला मजकूर	त्याप्रमाणे घालवितो
२६६	१२	लेखखाने	लेखकाने
२६७	२५	कार्यंक्रात	कार्यक्रमात
२६९	८	*Perspicacty*	*Perspicacity*
२६९	१०	आत्मवंचनेचे	आत्मवंचनेचे
२८१	२०	असे	असे सुख
३२१	१८	आयोयाने	आयोगाने
३३२	४	घाल वावा	घालवावा
३४४	१०	समामापर्यंत	समाजापर्यंत
३५७	१२	बेकर	बेकन
३५९	४	लहतो	लिहितो
३७५	२२	प्रातिनिधी क	प्रतिनिधीक
४०९	२१	ज्ञान	ज्ञात
४३७	१४	खालील २	खालील ३
४४६	१२	(?)	?

REFBK-0018712